म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित

१६वा वार्षिक अहवाल वित्तीय वर्ष २०२०-२१

अनुक्रमणिका

अनु. क्र.	तपशील	पान क्र.
१.	**संचालक मंडळ**	
२.	**संचालक मंडळाचा अहवाल**	०१
३.	**स्वायत्त वित्तीय विवरणपत्र**	
	स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल	११४
	ताळेबंद	१२७
	नफा व तोटा विवरण पत्र	१२९
	रोकड प्रवाह विवरण पत्र	१३१
	समभाग बदलाचे विवरण पत्र	१३३
	लेखां वरील टिपा क्र. १ ते ३६	१३५
४.	**एकत्रित वित्तीय विवरणपत्र**	
	स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल	१८२
	ताळेबंद	२१५
	नफा व तोटा विवरण पत्र	२१७
	रोकड प्रवाह विवरण पत्र	२१९
	समभाग बदलाचे विवरण पत्र	२२२
	लेखां वरील टिपा क्र. १ ते ५६	२२४

म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित

वित्तीय वर्ष २०२०-२०२१ साठी संचालक मंडळाची सूची
(वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत म्हणजे दि. २९.१२.२०२१)

अध्यक्ष

डॉ. नितीन राऊत (मा. मंत्री, ऊर्जा, महाराष्ट्र) दि. ०५.०१.२०२० पासून

उपाध्यक्ष

श्री. प्राजक्त तनपुरे (मा. राज्य मंत्री, ऊर्जा, महाराष्ट्र) दि. ०५.०१.२०२० पासून

व्यवस्थापकीय संचालक

श्री. असीम कुमार गुप्ता दि. १७.०१.२०२० पासून दि. ०१.०२.२०२१ पर्यंत
श्री. दिनेश वाघमारे दि. ०१.०२.२०२१ पासून

संचालक (वित्त व मुख्य वित्तीय अधिकारी)

श्री. सुनिल पिंपळखुटे दि. ०४.०८.२०१८ पासून

संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी)

श्री. अनुप कुमार सिंह १६.०५.२०१९ पासून २७.०८.२०२१ पर्यंत
श्री. जगन्नाथन सरवानासामी २७.०८.२०२१ पासून

इतर संचालक

श्री. असीम कुमार गुप्ता भा.प्र.से. दि. १७.०१.२०२० पासून ०१.०२.२०२१ (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण)
श्री, दिनेश वाघमारे भा.प्र.से. दि. २८.०१.२०२० पासून (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण)
श्री. संजय खंदारे भा.प्र.से. दि. १०.०८.२०२० पासून (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती)
श्री. विजय सिंघल भा.प्र.से. दि. ०१.०२.२०२१ पासून (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण)
श्रीमती शैला आबू भा.प्र.से. दि. १७.०१.२०२० पासून दि. १०.०८.२०२० पर्यंत (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती)

स्वंतत्र संचालक

श्री. अशोक सेठी दि. २१.०६.२०२० पर्यंत
श्रीमती चारूलता टोकस दि. २३.०६.२०२० पासून दि. २३.०७.२०२० पर्यंत

कंपनी सचिव

श्री. सुबोध रमेशरावजी झारे दि. २१.०८.२०१५ पासून

संचालक मंडळाचा अहवाल

प्रति,
मा. सदस्य,
मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड,

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीचा १६ वा वार्षिक अहवाल आपणास सादर करताना आनंद होत आहे. यासोबत दि. ३१ मार्ज २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाची आपल्या कंपनीची लेखा परिक्षण केलेली वित्तीय विवरणपत्रके जोडली आहेत.

१.वित्तीय निष्कर्ष -

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**२०२०-२१**	**२०१९-२०**
एकूण उत्पन्न	८३,६९,९९,६२६	८४,१३,५०,२१९
खर्च		
कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक आणि लाभ	६,५३,१०,३६२	७,०२,१५,९२०
इतर खर्च	२७,७२,९६,१७७	२८,८४,१९,३४०
घसारा	४०,६१,१२,९७३	४६,११,९९,३४६
एकूण खर्च	**७४,८७,१९,५१२**	**८१,९८,३४,६०६**
कर पूर्व नफा / (तोटा)	८,८२,८०,११४	२,१५,१५,६१३
करासाठी तरतूद - विद्यमान वर्षाचा कर	-	-
मागील वर्षाचा कर आणि स्थगित कर निव्वळ	**८,८२,८०,११४**	**२,१५,१५,६१३**
नफा किंवा तोट्यात पूनर्वर्गीकरण करावयाच्या बाबी	११,६४,५७४	(६०,०३,०५५)
या कालावधीत सर्वकष उत्पन्न	**८,९४,४४,६८८**	**१,५५,१२,५५८**

आपल्या कंपनीच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत हा कंपनीच्या मालकीच्या इमारतीचे भाडे हाच आहे. या इमारती प्रामुख्याने समुहातील उपकंपन्यांना त्यांच्या उपयोगासाठी भाडेपट्टीवर दिलेल्या आहेत.

दि. ३१.०३.२०२१ रोजी अखेरीस कंपनीच्या एकूण ठोक मत्तांचा पाया रु. १,४९०.०९ कोटी होता.

१.१ वित्तीय ठळक वैशिष्ट्ये -

१. कंपनीच्या विविध मत्ता वापरल्या बद्दल उपकंन्यांनी दिलेले भाडे रु. ८१.६२ कोटी कंपनीच्या एकूण उत्पनात समाविष्ट आहे.

२. एकूण उत्पनात मुदतीच्या ठेवीचे व्याज रु. १.९० कोटी आणि इतर संकीर्ण बाबी पासून चे उत्पादन रु. ०.१८ कोटी समाविष्ट आहे.

३. भारतीय लेखा मानक पद्धती स्वीकारल्यानंतर / संक्रमणानंतर लेखांकनामधे खालील प्रमाणे समायोजने करण्यात आली.

अ) आपल्या कंपनीने, केंद्रिय शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे कंपन्यासाठीची (लेखा मानके) नियमावली २००६ यामधे विनिर्देशित केलेली तसेच कंपनी अधिनियम १९५६ यात दिलेल्या इतर तरतूदी नुसार यापूर्वीच्या भारतातील सर्वसाधारणपणे स्वीकरल्या जाणाऱ्या लेखातत्वे वापरुन मोजणी केलेल्या गुंतवणुक मालमत्तांचे दि. ०१ एप्रिल २०१५ रोजीचे धारणा मूल्य स्वीकारण्याचा पर्याय निवडला आणि कंपनी धारणा मूल्य म्हणजे गुंतवणूक मालमत्तांचे अभिदत्त किंमत आहे या प्रकारे त्याचा उपयोग करीत आहे.

ब) कंपनीच्या स्वमालकीची जमीन आणि कार्यालयाच्या इमारती यांचे वर्गीकरण गुंतवणूक मालमत्ता असे केले आहे.

क) या वर्षात येणे असलेल्या भाडी यांच्या अपेक्षित पत हानी साठी रु. २.८६ कोटीची तरतूद केली आहे.

ड) मागील वर्षी २०२०-२१ यामधील आकडेवारीचे पूनर्निवेदन केले आहे.

२. उद्योग व्यवसायाचे स्वरुप बदलेले असल्यास त्याची माहिती

आपल्या कंपनीने तिच्या व्यवसायाचे स्वरुप बदलले नाही.

३. लाभांश -

या वर्षातील नफा हा स्थगित कर दायित्वे यांच्यातील तरतूदीमुळे झालेला आहे. हे लक्षातच घेऊन तसेच कंपनीच्या संचित तोट्याचा विचार करुन संचालक मंडळाने ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी कोणताही लाभांश देऊ नये अशी शिफारस केभ्वे आहे.

४. संचालक -

४.१. श्री अशोक सेठी, कंपनीचे स्वतंत्र संचालक यांनी २१.०६.२०२० रोजी वैयक्तिक वचनबध्दता लक्षात घेऊन राजीनामा दिला.

४.२ श्रीमती. चारुलता टोकस यांची २३.०६.२०२० रोजी कंपनीचे स्वंतत्र संचालक पदावर नेमणूक केली होती. त्यांनी निश्चित वचनबध्दता लक्षात घेऊन २३.०७.२०२० रोजी राजीनामा दिला.

४.३. श्री. संजय जगनाथ खंदारे यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महानिर्मिती कं. लि. यांच्या जागी श्रीमती शैला आबू, यांची १०.०८.२०२० पासून नियुक्ती झाली.

४.४. श्रीमती जुईली मिलिंद वाघ यांची महिला संचालकांच्या नियुक्तीशी संबंधित तरतुदींचे पालन करण्यासाठी १६.१२.२०२० पासून नियुक्ती करण्यात आली.

४.५. श्री. विजय जगदीश प्रसाद सिंघल यांची अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण या पदावर श्री. असिमकुमार गुप्ता यांच्या जागी ०१.०२.२०२१ पासून नियुक्ती करण्यात आली.

४.६. श्री. दिनेश वाघमारे यांची शासकीय आदेशानुसार प्रधान सचिव(ऊर्जा) आणि कंपनीचे संचालक पदावर श्री.असिमकुमार गुप्ता यांच्या जागी नियुक्ती केली.

मंडळ सोडून जाणाऱ्या वरील संचालकांनी त्यांच्या कार्यकाळात कंपनीसाठी जे मौलिक योगदान दिले त्याबद्दल संचालक मंडळ त्यांची प्रशंसा नोंदविते.

उपरिनिर्दिष्ठ संचालकांसंबंधी जेथे आवश्यक आहे तेथे त्यांच्या नियुक्तीबाबत ठराव करुन त्यांचा समावेश वार्षिक सभेच्या सूचनेत करण्यात आला आहे.

५. व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्ती (के एम पी)

वित्तीय वर्ष २०२०-२१ मधे कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार कंपनीच्या व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावर खालील व्यक्ती होत्या.

अनु, क्र..	के एम पी चे नाव	पद	नियुक्तीची तारीख	कार्यकाळ समाप्तीची तारीख
१.	श्री असीम कुमार गुप्ता	व्यवस्थापकीय संचालक	०१ जानेवारी २०२०	०१ फेब्रुवारी २०२१
२.	श्री दिनेश वाघमारे	व्यवस्थापकीय संचालक	०१ फेब्रुवारी २०२१	-

३.	श्री सुनिल लक्ष्मण पिंपळखुटे	संचालक वित्त आणि मुख्य वित्तीय अधिकारी	०४ ऑगस्ट २०१८	-
४.	श्री अनुप कुमार सिंग	संचालक (सुरक्षा आणि अंमलबजावणी)	१६ मे २०१९	२७ ऑगस्ट २०२१
५.	श्री सुबोध रामेशरावजी झारे	कंपनी सेक्रेटरी	२१ ऑगस्ट २०१५	-

६. संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन -

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(५); यातील आवश्यतानुसार आणि व्यवस्थापनाने दिलेली माहिती यांच्या आधारे येथे याची पुष्टी केली जाते.

अ) दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे वार्षिक लेखे तयार करताना, त्यासाठी लागू असणारी लेख्यांच्या तत्त्वांचे पालन करण्यात आलेले अहे आणि जेथे मोठी विचलन झाले असल्यास त्यासंबंधी योग्य स्पष्टीकरण देण्यात आलेली आहेत.

ब) कंपनीच्या संचालकांनी योग्य अशी लेखा धोरणे निवडली आहेत आणि ती सुसंगतपणे लागू केलेली आहेत तसेच संचालकांनी रास्त, प्रमाणशीर अंदाज केलेले आहेत; जेणेकरुन वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीच्या व्यवहाराचे आणि या मुदतीत कंपनीला झालेल्या नफा किंवा तोटा यांचे सत्य आणि रास्त दर्शन होईल.

क) कंपनीच्या संचालकांनी योग्य आणि पुरेशी काळजी घेऊन कंपनीच्या लेख्यांचे दस्त ऐवज कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदीनुसार जतन केले आहेत आणि त्याद्वारे कंपनीच्या मत्ता सुरक्षित राखणे आणि लबाडी आणि इतर अनियमीतता शोधणे व त्याला आळा घालणे ही कार्ये केली आहेत.

ड) दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखे हे कंपनी सतत कार्यरत असलेली संस्था आहे या तत्त्वांना अनुसरुन तयार केलेली आहे.

इ) कंपनीमध्ये पालन करण्यासाठी संचालकांनी अंतर्गत वित्तिय नियंत्रणे तयार केली. ही नियंत्रणे योग्य असून प्रभावीपणे कार्यरत आहेत आणि

फ) कंपनीला लागू होणारे सर्व कायदे व यातील तरतुदी यांच्या अपुनालनाची हमी मिळावी यासाठी संचालकांनी योग्य कार्यप्रणाली अमंलात आणली आहे. ही प्रणाली पुरेशी असून प्रभवीप्रमाणे कार्यरत आहे.

७. स्वतंत्र संचालकांचे प्रतिज्ञापत्र -

कंपनीच्या सर्व स्वतंत्र संचालकांनी, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४९(७) यानुसार आवश्यक असलेले प्रतिज्ञापत्र सादर केले आहे आणि त्याद्वारे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४९ (६) या विहित केलेले स्वातंत्र्याचे निकष आपण पूर्ण करीत आहोत याची खात्री देणारे निवेदन सादर केले आहे.

८. संचालकांच्या कार्याचे मूल्यमापन -

कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या अधिसूचना दि. ५ जून २०१५ याप्रमाणे, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७८(२) नुसार संचालकांच्या कार्याचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता पूर्ण केली आहे

९. ठेवी -

कंपनी अधिनियम २०१३ चे प्रकरण पाच (५) यात ज्यांचा समावेश केला जातो, अशा कोणत्याही ठेवी, कंपनीने या अहवालाच्या वर्षात जनतेकडून स्वीकारलेल्या नाहीत किंवा कंपनीला कोणत्याही ठेवी मिळालेल्या नाहीत.

१०. भाग भांडवल -

दि. ३१.३.२०२१ रोजी कंपनीचे भाग भांडवलात कोणताही बदल झालेला नाही. ते पूर्वी इतका रु. ९९,०००/- कोटी इतके स्थिर आहे.

आढावा वर्षात कंपनीच्या पूर्ण भरणा करण्यात आलेले समभाग भांडवल यात खालीलप्रमाणे वृध्दी झाली.

तपशील	भाग भांडवल
दि. ३१.०३.२०२० रोजीचे भाग भांडवल	८९१०९,७१,१५,०२०
या वर्षातील वाटप	६४,००,००,०००
दि. ३१.०३.२०२१ रोजीचे भाग भांडवल	८९१७३,७१,१५,०२०

११. राखीवमध्ये स्थानांतरित केलेली रक्कम -

कंपनीला तोटा झाल्यामुळे, कोणतीही रक्कम राखीव यामध्ये स्थानांतरित करण्याचा प्रस्ताव कंपनीने केलेला नाही.

१२. एकत्रित लेखे -

दि. ३१ मार्च २०२१ रोजी, कंपनीच्या थेट पूर्णपणे मालकी असलेल्या उपकंपन्याची संख्या तीन (३) आहेत तर त्यानंतरच्या पायरीवरील उपकंपन्यांची संख्या चार (४) आहे.

भारतीय लेखा मानक ११० (एकत्रित वित्तीय विवरण पत्रके) याला अनुसरुन आपल्या कंपनीची एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार केलेली असून ती वार्षिक अहवालाचा भाग आहेत. या एकत्रित विवरणपत्रकात कंपनीच्या सर्व उपकंपन्याची वित्तीय विवरण पत्रकांचाही अंतर्भाव केला आहे. ती वित्तीय विवरण पत्रके उपकंपन्यांच्या लेखा परिक्षण केलेल्या आणि उपकंपन्यांच्या संबंधित संचालक मंडळांनी मंजूर केलेल्या वित्तीय विवरण पत्रकानुसार तयार करण्यात आली आहेत. वित्तीय वर्ष २०२०-२१ साठीची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके या वार्षिक लेख्यांच्या एक भाग म्हणून जोडण्यात आली आहेत.

या एकत्रित तत्त्वानुसार निष्कर्ष संक्षित स्वरुपात येथे खाली दिलेले आहेत -

(रक्कम रु. कोटीत)

तपशील	२०२०-२१	२०१९-२०
महसूल		
प्रवर्तनातील महसूल	७४,७१९.२९	७४,५१९.५३
इतर उत्पन्न	६,०३१.१५	८,९१६.८५
एकूण उत्पन्न	**८०,७५०.४४**	**८३,४३५.३९**
खर्च		
वापरलेल्या साहित्याचा खर्च	५२,१९०.०९	५७,०००.०४
कर्मचारी पारिश्रमिक आणि लाभ	७,९०४.५६	८,३०४.४७
वित्त खर्च	९,२५३.२०	७,८८८.५३
घसारा आणि कर्जफेड	७,३६९.६४	७,०६७.४३
इतर खर्च	८,९२१.४६	१०,२५९.७५
एकूण खर्च	**८५,६३८.९५**	**९०,५२०.२२**
सहयोगी आणि संयुक्त साहस कंपन्याच्या नफ्यातील वाटा	६.५०	५.०६
नियामक उत्पन्न / (खर्च)	२,९०९.१९	७,०१०.७५

करपूर्व नफा / (तोटा)	**(१,९७२.८१)**	**(६९.०२)**
करासाठी तरतूद चालू वर्षाचा कर मागील वर्षाचा कर आणि स्थगित कर (निव्वळ)	६५४.४०	४७६.१६
करोत्तर नफा / (तोटा)	**(२,६२७.२१)**	**(५४५.१८)**
नफा किंवा तोट्यात पुनर्वर्गीकरण केलेल्या बाबी	८.१४	(३०६.५४)
मुदतीतील सर्वकष उत्पन्न	**(२,६१९.०७)**	**(८५१.७२)**

वित्तिय वर्ष २०२०-२१ मधील तोटा मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ कमी झाला. त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. महावितरण कंपनीच्या इतर प्रवर्तनीय महसूलात वाढ .

१) १ एप्रिल २०२० पासून बदलेले दर आणि

२) लघु दाब कृषी वापरात दक्षलक्ष युनिटस मध्ये वाढ

२. महावितरण कंपनीच्या मागील वर्षाच्या उत्पनामध्ये रु. ३२८२ कोटी संशयास्पद कर्जासाठी तरतूद पूनर्लिखित केलेली रक्कम समाविष्ट आहे.

३. महानिर्मितीद्वारे कमी वीज निर्मितीमुळे कोळशाच्या वापरात घट

४. महावितरणच्या वीज खरेदी खर्चात घट

१) महावितरण व्यतिरिक्त इतर कंपन्यांकडून वीज खरेदी कमी

२) (केंद्रीय वीज नियामक आयोग) (सीईआरसी) निर्देशकांत घट झाल्यामुळे वैयक्तिक वीज प्रकल्पांच्या खरेदी खर्चात घट

३) २०२०-२१ च्या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या एनटीपीसी आणि पीजीआयसीएल साठी कोवीड १९ मुळे स्थिर आकारावर रु. २७९ कोटींची सूट.

५. मागील वर्षी कर्मचाऱ्यांच्या खर्चामध्ये वेतन निश्चिती थकबाकीचा समावेश होतो. चालू वर्षाचा खर्च वास्तविक आहे.

६. महावितरणच्या कारखाने व यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती आणि देखभाल खर्चामध्ये रु. ३४५ कोटीने वाढ.

७. खेळत्या भांडवलावरील व्याज, पुरवठादार आणि कंत्राटदारांना देय व्याज आणि महावितरणच्या बिल सवलतीवरील व्याजामध्ये वाढ झाली आहे.

१३) वित्तीय अहवालाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची पर्याप्तता

आपल्या कंपनीने सांविधिक आवश्यकाची पूर्तता करणे आणि कार्पोरेट (कंपनी) कामकाजात उच्च दर्जाची अंमलबजावणी यंत्रणा असावी या हेतूनू अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची अतिशय दृढ प्रणाली तयार केली आहे. तसेच सर्व स्तरावर तपासणी व्हावी आणि शिलकी योग्य जागी जतन केल्या जाव्यात याची हमी मिळविण्यासाठी आणि वित्तीय अहवालासाठी सर्व अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यरत असावी यासाठी कंपनी अंतर्गत लेखापरिक्षण एका अनुभवी सनदी लेखापालांच्या संस्थेकडून करण्यात येते आणि त्याचा कंपनीला वित्तीय आणि लेखा विभागांशी समन्वय असतो.

याशिवाय, कंपनीमधे एक लेखापरिक्षण समितीही कार्यरत आहे. तिचे अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या कामावर बारकाईने लक्ष असते. या वर्षात या नियंत्रणाचे परिक्षण करण्यात आले आणि तिची रचना आणि कामकाज यामध्ये कोणतेही मोठे दुर्बल घटक आढळले नाहीत.

१४. नियामक/न्यायालये/न्यायाधिकरण यांनी पारित केलेले महत्वपूर्ण किंवा भौतिक आदेशांचे कंपनीच्या विद्यमान कार्यरत स्थितीवर आणि भविष्यातील कार्यावर होणारे परिणाम -

कंपनी सतत कार्यरत असलेली संस्था आहे. त्यावर तसेच तिच्या भविष्यातील कार्यावर परिणाम - किंवा प्रभाव टाकतील असे कोणतेही मोठे आदेश किंवा निर्णय कुठल्याही मा. न्यायालय किंवा नियामक किंवा न्यायाधिकरण यांनी यावर्षी दिलेले नाहीत.

१५. कंपनीच्या वित्तीय स्थितीवर परिणाम करणारे मोठे बदल व बांधिलकी

वित्तीय विवरणपत्रके ज्या वित्तीय वर्षा अखेरीस तयार करण्यात आली त्याची तारीख आणि अहवालाची तारीख या दरम्यानच्या कालावधीत कंपनीच्या वित्तीय स्थितीवर परिणाम किंवा बाधा करतील असे कोणतेही मोठे बदल आणि बांधिलकी घडलेले नाहीत.

१६. कर्जे, हमी, प्रतिभूती किंवा गुंतवणूकी यांची माहिती -

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८६ याच्या लागू होणार्या मर्यादेत, कंपनीने दिलेली कर्जे व हमी केलेल्या गुंतवणूकी याची माहिती स्वायत वित्तीय विवरणपत्रकांच्या टिपामध्ये दिलेली आहे.

१७. जोखिमांचे व्यवस्थापन -

आपल्या कंपनीच्या व्यवस्थापनाने जोखीम व्यवस्थापनाचे धोरण तयार केले आहे. त्यामध्ये कंपनीला होऊ शकणारे संभाव्य धोके आणि ते कमी करण्याची कृती योजना यांचा तपशीलवार वर्णन केले आहे.

१८. दक्षता यंत्रणा -

आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाने दि. ११ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत एका दक्षता यंत्रणेला मंजुरी दिली आहे. त्यामध्ये कंपनीमधील अयोग्य कारवायांची माहिती मिळवणे आणि तशी गैरकृत्ये/गंभीर स्वरुपाच्या अनियमितता याविषयी चिंता करणाऱ्या/ त्याविषयी सावध करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरंक्षण देण्याची तरतूद केली आहे.

१९. कामाच्या जागी महिलांचा लैंगिक छळ यासंबंधी अधिनियम २०१३ (प्रतिबंध, बंद आणि गाऱ्हाणी सोडविणे) याचे कंपननीमध्ये पालन करणे -

कामाच्या जागेवर महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी एक नवीन कायदा 'महिलांचा कामाच्या जागी' लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि तक्रारी सोडविणे) अधिनियम २०१३ अधिसूचित करण्यात आला.

आढावा वर्षात प्राप्त झालेल्या आणि त्याचे निवारण केलेल्या लैगिंक अत्याचार तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे

प्राप्त तक्रारी - निरंक

तक्रारीचे निवारण - निरंक

२०. माहिती अधिकार अधिनियम २००५

आपल्या कंपनीने माहिती अधिनियम २००५ च्या पूर्तता करण्याची खातरजमा करते. वर्ष २०१९-२० मध्ये एकूण ६ (सहा) अर्ज मिळाले होते. त्यांची उत्तरे देण्यात आली.

२१. मंडळाच्या बैठकी

दि. १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या वित्तीय वर्षात आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या एकूण ४ (चार) बैठका झाल्या. त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	बैठकिचा क्रमांक	बैठकीची तारीख
१.	९२ वी मंडळ बैठक	२३.०६.२०२०
२.	९३ वी मंडळ बैठक	१४.१०.२०२०
३.	९४ वी मंडळ बैठक	१६.१२.२०२०
४.	९५ वी मंडळ बैठक	२९.१२.२०२०

बैठकींच्या मधील अंतर कंपनी अधिनियम २०१३ मध्ये विहीत मुदतीप्रमाणे आहे.

या बैठकीमधील संचालकांच्या उपस्थितीची माहिती खालीलप्रमाणे -

अनु. क्र.	संचालकांची नावे	उपस्थितीचा हक्क असलेल्या बैठकीची संख्या	उपस्थित बैठकीची संख्या
१.	श्री नितीन काशीनाथ राऊत	४	४
२.	श्री प्राजक्त प्रसाद तनपुरे	४	४
३.	श्री असिमकुमार सुरेंद्रकुमार गुप्ता	४	४
४.	श्री दिनेश ताराचंद वाघमारे	४	४
५.	श्री सुनिल लक्ष्मण पिंपळखुटे	४	४
६.	श्री अनुप कुमार सिंह	४	३
७.	श्री विजय जगदीश प्रसाद सिंघल	०	०
८.	श्री संजय जगन्नाथ खंदारे	३	३
९.	श्रीमती शैला अबू	१	१
१०.	श्री अशोक सेठी	०	०
११.	श्रीमती चारूलता टोकस	०	०
१२.	श्रीमती जुईली मिलिंद वाघ	१	१

२२. मंडळाच्या समिती -

कंपनीच्या उद्योग व्यवसायावर अधिक लक्ष केंद्रित करता यावे शासन आणि कार्य चांगल्याप्रकारे व्हावे यासाठी संचालक मंडळाने खालीलप्रमाणे काही समित्या गठीत केल्या. त्यांच्या तपशील असा -

२२.१. लेखा परिक्षण समिती -

२२.१.१ लेखापरिक्षण समिती ही सांविधिक, सचिवांचे आणि अंतर्गत या तिघांशी आणि कंपनीच्या संचालक मंडळ यामध्ये समन्वयक म्हणून काम करते. वित्तीय स्थितीची माहिती घेणे व त्यावर लक्ष ठेवणे, वित्तीय विवरणपत्रके आणि लेखापरिक्षणाची कामे यांचा आढावा घेणे याबाबत संचालक मंडळ मदत करण्याचे काम लेखापरिक्षण समिती करते.

२२.१.३ लेखा समिती मध्ये श्री. संजय खंदारे (पदसिध्द संचालक), श्री.अनुपकुमार सिंग (संचालक सुरक्षा आणि अंमलबजावणी) आणि सुनिल पिंपळखुटे (संचालक वित्त) हे सदस्य आहेत.

२२.१.३ यावर्षी लेखापरिक्षण झाल्या त्याचा तपशील समितीच्या दोन बैठका अनुक्रमे ०८.१२.२०२० आणि १८.०३.२०२१ रोजी

अनु. क्र.	समिती सदस्यांची नावे	पदनाम	एकूण सभासदांची संख्या	उपस्थितांची संख्या
१	श्री संजय खंदारे	अध्यक्ष	२	२
२	श्री अनुपकुमार सिंह	सदस्य	२	२
३	श्री सुनिल पिंपळखुटे	सदस्य	२	२

२२.२ नामांकन आणि परिश्रमिक समिती

२२.२.१ या समिती मध्ये श्री. दिनेश वाघमारे (अध्यक्ष), श्री.अनुपकुमार सिंह (संचालक सुरक्षा आणि अंमलबजावणी) आणि सुनिल पिंपळखुटे (संचालक वित्त) हे सदस्य आहेत.

२२.१.२ यावर्षी या समितीची बैठक झाली नाही.

२२.३ कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती

२२.३.१ ही कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या धोरणाची रचना करुन त्याची मंडळाकडे शिफारस करण्याचे काम करते. या धोरणानुसार कंपनी सामाजिक जबाबदारीची कोणतीही कामे कशा प्रकारे अंमलात आणावयाचे हे ठरविते. त्याचा आकृतिबंध रकमाची शिफारस आदी ही समिती करते.

२२.३.२ सी एस आर समितीमधे श्री प्राजक्त तनपुरे हे अध्यक्ष, श्री असिमकुमार गुप्ता, व्यवस्थापकीय संचालक आणि श्री. अनुपकुमार सिंग(संचालक सुरक्षा आणि अंमलबजावणी यांचा सदस्य म्हणून समावेश होता.

२२.३.३ या वर्षी या समितीची बैठक झाली नाही.

२३. सांविधिक लेखापरिक्षक -

वि. वर्ष २०२०-२१ करीता, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनीचे सांविधिक लेखा परिक्षक म्हणून मेसर्स एस पी सी एम, सनदी लेखापाल पुणे (संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यु) यांना नियुक्त केले.

आपल्या कंपनीने स्वायत्त आणि एकत्रित वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरिक्षण करण्याच्या कामी रु. ७,५०,०००/- (रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) अधिक लागू होणारे कर असे लेखापरिक्षण शुल्क निश्चित केले.

२४. सांविधिक लेखा परिक्षकांचा अहवाल -

सांविधिक लेखापरिक्षकांनी दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वत्तीय वर्षाच्या वित्तीय पत्रकात दर्शविलेल्या काही बाबींवर त्यांचे पात्रतेचे मत दिले आहे.

दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त आणि एकत्रित वि. वि. पत्रकांवर लेखापरिक्षकांनी दिलेले पात्रतेचे मत आणि निरिक्षणे नोंदलेली तसेच या पत्रकांवरील त्यांचा अहवाल यावर कंपनीच्या संचालक मंडळाने आपल्या अहवालामध्ये योग्यती उत्तरे दिलेली असुन ते अनुक्रमे या अहवालाचे 'परिशिष्ट-१ आणि परिशिष्ट-१अ' येथे जोडले आहे.

२५. भारताचे मा. लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचा अभिप्राय -

भारताचे मा. लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनीच्या संचालक मंडळाने स्वीकारलेल्या आणि सांविधिक लेखा परिक्षक यांनी लेखापरिक्षण केलेल्या स्वायत्त आणि एकत्रित वि.वि. पत्रकांचा आढावा घेतला आहे.

कंपनीच्या दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त आणि एकत्रित या दोन्ही वि.वि. पत्रकांवर मा. लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय निरंक आहेत.

कंपनीच्या स्वायत्त व एकत्रित वि. वि. पत्रकांवर लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्रायाचे पत्र या अहवालाचे परिशिष्ट-२ आणि परिशिष्ट-३ येथे अनुक्रमे जोडले आहे. तसेच व्यवस्थापनाची उत्तरे अनुक्रमे 'परिशिष्ट-२अ आणि ३-अ' येथे जोडली आहे.

२६. अंतर्गत लेखा परिक्षक -

आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाने वि. वर्ष २०२०-२१ साठी अंतर्गत लेखा परिक्षक म्हणून काम करण्यासाठी मे. अनार (ए एन ए आर) अँड कंपनी, मुंबई (संस्था नोंदणी क्र. १२४२ ११ डब्ल्यु) याची नियुक्ती केली.

२७. कंपनी सेक्रेटरीयल ऑडिटर -

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४ ज्याचे वाचन कंपनी (व्यवस्थापकीय कर्मचारी वृंदाची निवड आणि पारिश्रमिक) नियमावली २०१४ यामधील नियम क्र. ९ सोबत केले जाते; त्यानुसार, कंपनीच्या संचालक मंडळाने ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे सेक्रेटेरीयल ऑडीट करण्यासाठी मेसर्स ए.वाय.साठे आणि कंपनी, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी मुंबई यांची नियुक्ती केली होती. सदर व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी फर्मने सादर केलेला सेक्रेटरीयल ऑडीटचा अहवाल या संचालकांच्या अहवालाचे परिशिष्ट-४ येथे जोडलेला आहे.

२८. सेक्रेटरीयल ऑडिट रिपोर्ट -

वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी, उपरोक्त सेक्रेटरीयल ऑडीटर फर्म यानी केलेल्या परिक्षणाचा अहवाल फॉर्म 'एमआर नं.३ङ्ख यामध्ये सादर केलेला आहे. तसेच त्यांची यावर्षीच्या कार्यावर पात्रतेची मते/निरिक्षणे सादर केली. त्यावर संचालक मंडळाने सेक्रेटरीयल ऑडीटर यांच्या निरिक्षणावर त्यांची मते या अहवालाचे 'परिशिष्ट-५' येथे जोडली आहे.

२९. सेक्रेटरीयल मानके -

इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया या संस्थेने कंपनीचे संचालक मंडळ आणि सर्वसाधारण सभा याविषयी सेक्रेटरीयल मानके केली आहेत, आणि त्यांना भारत सरकारने कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ११८(१०) अंतर्गत मंजुरी दिलेली आहे. यातील जी मानके लागू होतात त्यांची पूर्तता आपल्या कंपनीने केलेली आहे.

३०. ऑडीटर खर्च -

कॉस्ट ऑडिटरच्या नियुक्तीसंदर्भातील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत. कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४८ च्या उप-कलम (१) अंतर्गत केंद्र सरकारने निर्दिष्ट केल्यानुसार खर्चाच्या नोंदींच्या देखभालीच्या संदर्भात तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

३१. ऊर्जा,संवर्धन,तंत्रज्ञानाचा अंगिकार व परकीय चलनातील मिळकत आणि खर्च -

कंपनी अधिनियम २०१३ त्यातील कलम १३४ ज्याचे सहवाचन कंपन्यांचे (लेखे) नियमावली २०१४ यातील नियम क्र.८(३) सोबत होते; त्यात दिलेल्या ऊर्जा तत्रंज्ञान - अंगिकार व परकीय चलनातील मिळकत आणि खर्च याविषयीची प्रकटने 'परिशिष्ट-६' येथे जोडलेली आहेत.

३२. कर्मचाऱ्यांविषयी माहिती -

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९७ आणि त्या अंतर्गत केलेली नियमावली यातील तरतुदीनुसार, शासकीय कंपन्यांना, जे कर्मचारी संबंधित अधिनियम व नियमावली यात विहित केलेल्या मर्यादापेक्षा जास्त पारिश्रमिक मिळवितात, त्यांचे विषयी संचालक मंडळाच्या अहवालात निवेदन समाविष्ट करण्यास सूट दिली आहे.

३३. वार्षिक परताव्याचा उतारा -

कंपनी अधिनियम २०१४ चे कलम ९२ मधील उप कलम(३) यानुसार वार्षिक परताव्याचा उतारा www.msebindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३४. उपकंपन्या -

दि. ३१ मार्च २०२१ रोजी आपल्या संपनीच्या खाली दिलेल्या उपकंपन्या अस्तित्त्वात आहेत -

१. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. - वीज वितरण करण्याचे काम करते.

२. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. - वीज निर्माण करण्याचे काम करते.

३. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. - वीज वाहून नेण्याचे काम करते.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२९ च्या उपकलम (३) नुसार उपकंपन्यांच्या वित्तीय विवरणावर ठळक वैशिष्ट्ये असलेले एक निवेदन एओसी-१ या अहवालात 'परिशिष्ट-८' मध्ये जोडले आहे. आढावा वर्षात कंपनीची कोणतीही उपकंपनी बंद झाली नाही.

३५. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम यांची कामगिरी आणि कंपनीच्या संपूर्ण कार्यक्षमतेत त्यांचे योगदान-

कंपनी (लेखा) नियामक २०१४ च्या नियम ८(१) नुसार (सुधारित स्वरुपात) उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांच्या कामगिरी संदर्भात माहिती लागू प्रमाणात आणि त्यांच्या संपूर्ण कामगिरी मध्ये योगदान म्हणून कंपनी अहवालात 'परिशिष्ट-९' मध्ये जोडला आहे.

३६. कंपनीची सामाजिक जबाबदारी -

कंपनीची सामाजिक जबाबदारी मध्ये कंपनी विश्वास ठेवते की, त्याच्या भागधारकांना आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ अशा प्रकारे व्यवसायाचे संचालन करण्याची जबाबदारी कंपनीने पारदर्शी व नैतिकतेने पार पाडली आहे. आपल्या कंपनीला मागिल ३ वित्तिय वर्षामध्ये झालेल्या नूकसानिमुळे कंपनीला सामाजिक जाबाबदारी कार्यामध्ये अंशदान करण्याची आवश्यकता नाही. बांधिलकी वाढविण्यासाठी आपल्या कंपनीने एक व्यापक धोरण विकसित केले आहे.

कंपनीची सामाजिक जबाबदारी या उपक्रमाचा वार्षिक अहवाल या अहवालाची 'परिशिष्ट-१०' मध्ये जोडला आहे.

३७. संबंधित पक्षासह करार किंवा व्यवस्था

कंपनी कायदा २०१३ या तरतुदीच्या अनुषंगाने कंपनीने त्याच्या संबंधित व्यक्तीबरोबर केलेल्या करार व व्यवस्थेचे तपशीलावर माहिती या अहवालाच्या 'परिशिष्ट -११' म्हणून जोललेल्या फॉर्म एओसी २ मध्ये जोडले आहे.

भारतीय लेखा मानक २४ संबंधितांविषयीची प्रकटने यानुसार इतर संबंधितांबाबतच्या व्यवहाराची प्रकटने लेख्यांच्या टिपा यामध्ये समाविष्ट केली आहेत.

३८. सर्वसाधारण

१. कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने भाग धारण केले नसल्यामुळे कंपनी कायदा २०१३ च्या कलम ६७ (३) (क) चे सहवाचन कंपनी नियम १६(४) (कंपनीचे भाग भांडवल आणि कर्ज रोखे) नियम २०१४ नुसार त्यांच्याकडून थेट मतदान करण्याचे अधिकाराच्या संदर्भात दिलेला नाही. यापुढे कंपनीने वित्तीय वर्षादरम्यान कंपनीच्या समभागांची खरेदी करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस कोणतीही आगाऊ रक्कम दिली नाही.

२. समभाग भिन्न अधिकार असलेला लाभांश, मतदान किंवा तसे काही आणि कोणत्याही योजनेखाली कोणत्याही कर्मचार्याला समभाग जारी केलेल्या अश्या प्रसंगाची नोंद नाही.

३. वित्तीय संस्थांच्या कोणत्याही बँकेसोबत एकवेळ समझोता केल्याचे उदाहरण नाही.

४. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३(१२) अनुसार लेखा परिक्षणाच्या प्रक्रियेदरम्यान वैधानिक लेखापरिक्षकाकडून फसवणूकीचा कोणताही प्रकार उघडकीस किंवा नोंद केल्याची कोणत्याही प्रसंगाची नोंद नाही.

३९. ऋणनिर्देश -

कंपनीत यावर्षी केंद्र व राज्य शासनाची विविध मंत्रालय/विभाग यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांचे विषयी कृतज्ञता व्यक्त करतात तसेच या वर्षी कंपनीच्या कर्मचार्यांनी यावर्षी तळमळीने व समर्पित वृत्तीने काम केले त्याबद्दल त्यांची प्रशंसा करुन ती या अहवालात नोंदवित आहेत.

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ	**दिनेश वाघमारे**
संचालक	व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०६८९२४७८	डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

नोंदणीकृत कार्यालय -
हाँगकाँग बँक इमारत, ३ व ४ मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१, महाराष्ट्र.
सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४९
ईमेल आयडी - msebhcl@gmail.com
दुरध्वनी क्र. - ९१ -२२ -२२६०८३८३
फॅक्स क्र. - ९१ -२२ -२२६१९१०१

जोडपत्र - १

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या दि. ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ च्या कालावधीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांचे स्वतंत्र लेखापरिक्षक यांनी केलेला अहवालातील अभिप्रायावर वंपनीच्या व्यवस्थापनाची उत्तरे खालीलप्रमाणे आहेत.

अनु. क्र.	लेखा परिक्षकांचा परिच्छेद	व्यवस्थापनाचे उत्तर
१.	**वित्तीय विवरण पत्रकाच्या लेखा परिक्षणाचा अहवाल** **पात्रतेचे मत** म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनी लिमिटेड (या अहवाल पुढे सदर कंपनी असे संबोधले आहे), या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रके येथे जोडली असून त्याचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. या पत्रकामधे दि.३१ मार्च रोजीचा कंपनीचा ताळेबंद, त्यावर्षीचे नफा आणि तोटा पत्रक रोख प्रवाह पत्रक आणि त्या वर्षातील समभागातील बदलांचे माहिती पत्रक तसेच महत्वांची लेखा धोरणे व त्या विषयीची स्पष्टीकरणे यांचा समावेश आहे. (या वि.वि. पत्रकांना या अहवालात या पुढे भारतीय लेखामानकांनुसार तयार केलेली स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके किंवा भा.ले.मा. नुसार स्वायत्त वि.वि. पत्रके असे संबोधले आहे.) आमच्या अभ्यासधिष्ठीत मतांनुसार आणि आमचे सर्वोतपरी मतांनुसार आमचे सर्वोतपरी ज्ञान यानुसार तसेच आम्हास दिलेली सर्व माहिती यानुसार ही वि. वि. पत्रके आमच्या अहवालतील पात्र मतांचा आधार आणि भा. ले. मानकांची पूर्तता केली नसण्या संबधीचा परिच्छेद ७.३ ड, यांचा अपवाद वगळता, वरील भा. ले. मानकानुसार केलेली स्वायत्त वि.वि. पत्रके, संबंधित अधिनियमानुसार आवश्यक असलेली त्यात दिलेल्या आकृती बंधानुसार देण्यात आली आहे. आणि ती माहिती भा.ले. मानके यासह भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेली लेखातत्वे यांच्याशी सुसंगत असून ती कंपनीचे दि. ३१ मार्च २०२१ रोजीच्या स्थितीने सत्य व रास्त चित्र दर्शवितात. तसेच त्या तारखेस संपलेला वर्षीतील कंपनीचा नफा (इतर सर्वकष उत्पन्नांसह कंपनीची वित्तीय कामगिरी) कंपनीचा रोकडता प्रवाह आणि त्यावर्षीतील समभागाचे बदल दर्शवितात.	वस्तुस्थिती
२. अ)	**पात्रतेच्या मतांचा आधार** आम्ही येथे निम्नलिखित बाबींवर आमच्या लेखा परिक्षणासाठी आवश्यक माहिती आणि स्पष्टीकरणे मिळविण्यास असमर्थ ठरले - शासन निर्णय क्र. सुधारणा २०१०/ प्र.क्र.११७, ऊर्जा यानुसार हंगामी हस्तांतरण योजनेचे अंतिमीकरण दि.३१ मार्च २०१६ रोजी झाले. त्यानुसार स्थानांतरित केलेल्या रु. १४,४५३,४००,०००/- एवढ्या मूर्त स्थिर मत्तांची मालकीचे निश्चिती करणेबाबत. (टिपा क्र. ७.२)	पूर्वीच्या म.रा.वि. मंडळाच्या मालकीच्या ज्या जमिनी आहेत त्यांचे नावे बदलून ती आता मराविमं सुत्रधारी कं. लि. च्या मालकीच्या नावाने करण्याची प्रक्रिया चालू आहे. संबंधित प्राधिकार्यांना हस्तांतरणासंबंधीची पत्रे दिली आहेत.

ब)	या कंपनीच्या नोंदवह्यात तिच्या उपकंपन्या महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती यांच्याकडील शिल्लक थकीत बाबींबद्दल, मेळ आणि विचार विनिमय करणे चालू आहे. (संदर्भ - टिपा क्र. ९.१ आणि १९.१) आणि त्याचा वित्तीय स्थितीवर आणि वित्तीय विवरणपत्रांतील प्रकटनांवर परिणाम होऊ शकतो.	सुत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या याच्यामधे आंतर कंपनी शिलकी विषयी काही मत भेद आहेत. त्यामुळे त्यांच्या शिलकी राहिल्या आहेत. उपकंपन्या संबंधित मत्ता/दायित्त्वे, राखीव यांचे त्याच्याकडे हस्तांतरण केले आहे. पण त्यांनी ते पूर्णपणे स्वीकारलेले नाही. ही कृती पूर्ण झालेली नाही आंतर कंपनी शिलकीमधे काही फरक उदभवले आहेत.
क)	म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने तिच्या उपकंपन्या - महावितरण आणि महानिर्मिती यांनी ग्रामीण विद्यूतीकरण विकास महामंडळाकडून अनुक्रमे रु. ८४०० कोटी आणि रु. १२८४ कोटी अशी कर्जे घेतली असून या कर्जांना म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने हमी दिलेली आहे. भा.ले. मानक १०९ च्या नुसार या हमी विषयी रास्त मूल्यांकन केलेले नाही. त्यामुळे संभाव्य परिणाम निश्चित सांगता येत नाहीत. (संदर्भ - टिपा क्र. २६.७ पहावी)	महामारीची परिस्थिती उद्भवल्यामुळे व्यवस्थापनाला त्याचे मूल्यांकन करणे शक्य झाले नाही. वित्तिय वर्ष २०२१-२२ मध्ये सदर मूल्यांकन करण्यात येईल.
ड)	वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये 'शेअर अप्लीकेशन मनी' रु. ४२.५० कोटी रक्कम मिळाली. त्याचे समभाग ०२/०९/२०२१ रोजी देण्यात आले. यामध्ये कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतूदीचे उल्लंघन झाले आहे. (टिपा क्र. १४.१ पहावी)	राज्य सरकारकडून थेट उपकंपनीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाचे पैसे,परंतु वेळेच्या मर्यादेत कळवलेले नाहीत. सक्षम प्राधिकाऱ्याने राज्य सरकारकडून शेअर अर्जाची रक्कम मिळाल्यानंतर आम्हाला ताबडतोब कळवावे असे निर्देश संबंधित अधिकाऱ्याला दिले आहेत.
इ)	वर्षभरात रु. ६४०,०००,०००/- इतक्या किंमतीच्या शेअर स्वरूपातील रक्कम महाराष्ट्र शासनाकडून महानिर्मिती या अंगीकृत कंपनीस शासन निर्णयानुसार थेट देण्यात आली आणि त्यामुळे कंपनी अधिनियम२०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झाले. (टिपा क्र. १३ (क) पहावी) उपरोक्त परिच्छेद (अ) ते (ई) यांचा विचार करता नफा, राखीव निधी आणि प्रतिभाग मिळकत यांचे निश्चित स्वरूप ठरविले जाऊ शकत नाही आणि प्रकटही केले जाऊ शकत नाही.	राज्य सरकारने त्यांच्या कार्यपध्दतीनुसार सहाय्यक कंपन्यांना थेट दिलेले भांडवली गुंतवणुकीचे पैसे
	आम्ही वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण सदर अधिनियमातील कलम १४३(१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखापरिक्षणांची मानके याला अनुरुप केलेले आहे. या लेखा मानकाप्रमाणे आमच्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण करण्याच्या परीक्षक या नात्याने आमच्या जबाबदाऱ्या, या आमच्या अहवालातील तेखापरीक्षकांच्या जबाबदारीशी संबंधित प्रकरणात विशद केल्या आहेत. आम्ही एक स्वंतत्र कंपनी आहोत. आम्ही भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांनी जारी केलेली नीती नियमांची संहिता आणि त्यासोबत अधिनियमातील तरतूदीमध्ये दिलेले वि.वि. पत्रकांच्या लेखापरिक्षणाची नीतीतत्त्वे या एकत्रितपणे जशा लागू होतात आणि आम्हाला लागू होणाऱ्या सर्व नितीनियमांनुसार आम्ही आमचे लेखापरीक्षण केले आहे. .	वस्तुस्थिती

	त्यासाठी अधिनियमातील तरतूदी आणि त्यातील नियमावलींचा आधार घेतला आहे. अधिनियम आणि आय सी ए आय यांची नीतीविषयक संहिता यानुसार आमची नैतिक जबाबदारी पार पाडली आहे. आमचा विश्वास आहे की आम्ही मिळविलेले लेखापरिक्षणासाठीचे पुरावे हे पुरेसे आहेत, आणि त्या वि.वि. पत्रकांवर आमचे मत व्यक्त करण्यास ते योग्य आधार देतात	
३.	**भर देण्यायोग्य प्रकरणे** आम्ही वि. वि. पत्रकाच्या टिपा मधील खालील विषयांवर लक्ष वेधू इच्छितो	
३.१	टिपा क्रमांक ९.२ पहावी - यामध्ये कंपनीने लेखे वह्यातील अग्रीम कराची निव्वळ तरतूद रु. १,६६७,७१०,८८८/- (मा. व. रु. १,६०२,३९३,६०५/-) असून लेखा पुस्तकात कंपनीने करापोटी रु. ४००,७२७,७२९/- इतक्या रकमेची तरतूद केली आहे. आणि आपली असहमती व्यक्त करीत कंपनीने रु. २९१,७००,०८१/- भरले आहेत. कराचे प्रकरण अपीलात गेले असल्याने आयकर अभिलेखानुसार दायित्व नाही. कंपनीने स्वत - घेतलेल्या निर्णयानुसार रक्कमेची तरतूद केली आहे आणि दर्शविलेली वसुलीची रक्कम ही योग्य रकमा याचा मेळ आणि खात्री करण्याच्या अधीन आहेत.	आकर विभागाने वि. वर्ष २००५-०६ पासून बरेच खर्च अमान्य केले.आयकर प्रकरणी वि. वर्ष २००५-२००६ पासून कंपनीने आपील केलेले आहेत. अशा प्रकरणात नंतर मोठ्या प्रमाणात दंडाची रक्कम भरावी लागू नये म्हणून कंपनीने भाडी आणि व्याज यांच्या उत्पनावर अग्रीम कर भरण्याचा निर्णय घेतला आहे. वि. वि. पत्रकानुसार असे दायित्त्व नाही.
३.२	टिपा क्रमांक १०.१ पहावी - उपकंपन्यांकडून मालमत्तांच्या भाड्यापोटी थकीत कर्जाऊ रक्कम रु. ४,१६,६२,८६,२६६/- (मा. वर्षी रु. ३,७१६,८६५,५६७/-) बऱ्याच वर्षापासून थकीत आहे. भारतीय लेखा मानक १०९ नुसार अपेक्षित पतहानीसाठी तरतूद लेखावह्यात योग्यप्रकारे केलेली आहे.	उपकंपन्या आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. आमच्या निधीच्या आवश्यकतेनूसार आम्ही आमच्या उपकंपन्यांकडून जेव्हा केव्हा गरज असलेल्या तत्वावर मागणी करतो.
३.३	टिपा क्रमांक ८.२ पहावी. यात कंपनीने महावितरणमध्ये केलेल्या गुंतवणूकीचे मूल्य रु. ४७७,२३९,८४९,०४०/- (मा. वर्षी रु. ४७७,२३९,८४९,०४०/-) महावितरण कंपनीला ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या काळात सातत्याने झालेल्या तोट्यामुळे कमी झाले आहे. शेअर्सच्या मूल्यातील घटीसाठी लेखा वहीत तरतूद केलेली नाही. जरी महावितरण कंपनीला वि. वर्ष २०१९-२०२० मध्ये नफा झाला असला तरी ३१ मार्च २०२० पर्यंतचा राखीव निधी ऋणात्मक आहे. ३१.०३.२०२१ चे आकडेवारी अद्याप अंतिम झालेली नाही.	वस्तुस्थिती
३.४	असे निरिक्षण आहे की, स्थापत्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे उपदान आणि रजा रोखीकरण यांची तरतूद वहयात नोंदली आहे. ती त्यांच्या मराविम सूत्रधारी मध्ये प्रतिनियुक्तीच्या तारखेऐवजी म्हणजे वित्तीय वर्ष २०१३-२०१४ पासून न करता रुजू होण्याच्या तारखेपासून केली आहे.	वस्तुस्थिती
३.५	टिपा क्रमांक २७ पहावी - यात कंपनीने म्हटले आहे की, भाडयाने घेतलेल्या मालमत्तेचा कालावधी बाबत सकारण अनिश्चितता असल्याने कंपनीच्या मालमत्ता वापरांचा हक्क याला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे जेथे कंपनी भाडेकरु आहे, अशा भाडेपट्टीच्या व्यवस्थांच्या संबंधित भाडेपट्टीचे संलग्न दायित्व मान्य केलेले नाही.	वस्तुस्थिती

३.६	आम्ही भारतीय लेखा मानक वि. वि. पत्रकांच्या सोबतच्या टिपा क्रमांक ३५ कडे लक्ष वेधू इच्छितो जी अनिश्चितता आणि कोविड-१९ची साथीच्या सदृष्ट स्थितीमुळे लावलेल्या ताळेबंदी व इतर बंधने यामुळे आर्थिक स्थितीवर झालेला परिणामांचे व्यवस्थापनाने केलेले मूल्यांकन स्पष्ट करते. या स्थितीच्या परिणामांचे निश्चित निर्धारण व त्याचा प्रभाव हा नंतरच्या काळातील परिस्थिती कशी बदलत जाते यावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे. वरील सर्व विषयावर आमच्या अहवालात अभ्यासावर आधारित निष्कर्ष आमच्या अहवालात नोंदवता आलेले नाहीत.	कंपनीने माहितीच्या आधारे मालमत्ता, कारखाने आणि उपकरणे आणि व्यापार मिळणाऱ्या मालमत्तेवर कोविड १९ च्या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन केले आहे आणि वाजवी अंदाज आणि निर्णयांचा वापर करुन, या मालमत्तेची वहन रक्कम वसूल करण्यायोग्य असल्याचे निश्चित केले आहे. वरील आणि कंपन्या कार्यक्षमतेत हळूहळू तरलता स्थिती सुधारत आहेत, नजीकच्या भविष्यात आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात कोणतीही भौतिक अनिश्चितता नाही.
४.	**वित्तीय पत्रके, त्यावर लेखापरिक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त अन्य माहिती -** • इतर माहिती देण्याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची असते. इतर माहितीमध्ये संचालकांचा अहवाल, आदि बाबी समाविष्ट असतात. मात्र त्यात वित्तीय विवरण पत्रे आणि त्यावर आमचा लेखापरिक्षण अहवाल यांचा अंर्तभाव नसतो. संचालकांचा अहवाल हा लेखापरिक्षण अहवालाच्या नियत तारखेनंतर मिळेल अशी अपेक्षा आहे.	
	• वि.वि. पत्रकांवरील आमची मते इतर माहितीवर व्यक्त केलेली नाहीत आणि ती माहिती, त्यातील निष्कर्ष यावर आम्ही कोणत्याही स्वरुपात खात्रीलायक निष्कर्ष व्यक्त केलेले नाही.	वस्तुस्थिती
	• वि.वि. पत्रकांच्या परिक्षणाच्या संबंधात दिलेली इतर माहिती वाचणे आणि ती प्रत्यक्षपणे वि.वि. पत्रकाशी विसंगत आहे किंवा कसे, किंवा आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत आम्ही मिळविलेल्या माहितीशी योग्य आहे किंवा मोठया प्रमाणात टिपा क्रमांक विसंगत आहे की नाही याची आमच्यावर जबाबदारी आहे.	वस्तुस्थिती
	• संचालकांचा अहवाल वाचताना, जर त्यात काही गैर विवरण आहे असे आमचे मत झाले तर, ते व्यवस्थापनातील/ प्रशासनातील संबंधितांना कळविणे हे लेखापरीक्षण मानक (७२०) अंतर्गत –'' लेखापरिक्षकांची इतर माहिती संबंधीची जबाबदारी'' यातील सूचनांनुसार आवश्यक आहे.	वस्तुस्थिती

५	**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी -** कायद्याचे कलम १३४(५) यामध्ये कंपनीच्या संचालक मंडळ वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यास जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. ही वि. वि. पत्रके भारतीय लेखा मानकानुसार कंपनीच्या वित्तीय स्थितीचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी असावे. त्यामध्ये इतर सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह आणि कंपनीच्या समभाग धारणेतील बदल या माहितीसह वित्तीय कामगिरी स्पष्ट झाली पाहिजे. भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेली इतर लेखा तत्वानुसार ही वि.वि. पत्रे असली पाहिजेत. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या मालमत्ता सुरक्षा कायद्यातील तरतूदीनुसार करणे, अन्य लबाडी किंवा अनियमितता शोधणे आणि त्यांना आळा घालणे, योग्य लेखा धोरणांची निवड करून ती अंमलात आणणे, प्रमाणशीर व सुज्ञ असे न्यायनिर्णय आणि अंदाज करणे, अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे संकल्पचित्र तयार करून ती अंमलात आणणे आणि ती जतन करणे, कोणत्याही प्रत्यक्ष गैरविवरणापासून आणि लबाडी किंवा अनवधान यापासून मुक्त असे दर्शन घडवणारी वि.वि. पत्रके सादर करणे. कंपनी चालू ठेवण्यायोग्य आहे याचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे आणि त्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती जाहीर करण्याची आणि जोवर कंपनी विकण्याचा किंवा काम बंद करण्याचा निर्णय घेतला जात नाही वा तसे करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी स्थिती उदभवत नाही तोवर कंपनी चालू ठेवण्यायोग्य आहे या आधारावर लेखे तयार करण्याची जबाबदारीही आपली आहे हे लक्षात घेऊन व्यवस्थापनाने वित्तीय विवरण पत्रके तयार करायला हवी. कंपनीचे संचालक मंडळ कंपनीच्या आर्थिक अहवाल तयार करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी देखील जबाबदार आहेत.	वस्तुस्थिती
६	**लेखापरीक्षकांची जबाबदारी -** वि.वि. पत्रके कोणत्याही लबाडी किंवा त्रुटीमुळे कोणत्याही गैर विवरणापासून मुक्त असल्याबद्दल योग्य खात्री मिळविणे आणि ही खात्री मिळवून आमची मते, अभिप्राय व्यक्त करणारा अहवाल देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. वाजवी खातरजमा करणे ही अतिशय उच्चस्तरीय हमी असते. सांविधिक लेखापरिक्षण यानुसार केलेले लेखापरिक्षण अस्तित्वातील प्रत्येक मोठे गैर विवरण शोधून काढू शकेलच असे नव्हे. लबाडी किंवा चुकीमुळे गैरविवरण उदभवू शकते. लबाडी आणि त्रुटी यांच्यामुळे हे वित्तीय गैरविवरण केले जाऊ शकते आणि वित्तीय विवरण पत्रकातील माहितीच्या स्वरूपातील या गैरविवरणाला एकत्रितरीत्या वा व्यक्तीगतरीत्या आधार मानून आर्थिक निर्णय घेणाऱ्यांना ते प्रभावित कर शकते.लेखापरीक्षण हे सांविधिक लेखापरिक्षणाशी सुसंगत असते, त्याचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक न्यायनिर्णय बुद्धी वापरतो तसेच लेखापरिक्षणाच्या संपूर्ण भाग कार्यात व्यावसायिक साशंकता बाळगून काम करतो. याशिवाय आम्ही खालीलप्रमाणे कृती करतो.	वस्तुस्थिती

	• वित्तीय विवरण पत्रकात लबाडी आणि त्रुटी यामुळे मोठया प्रमाणात असू शकणारी गैरव्यवहाराची जोखीम ओळखून तिचे मूल्यांकन करणे,या जोखमीचा मुकाबला करू शकेल अशी लेखापरीक्षण प्रक्रियेची आखणी करून त्यानुसार लेखा परीक्षण करणे आणि आमच्या निष्कर्षांसाठी आवश्यक आणि योग्य असे लेखाविषयक पुरावे गोळा करणे. घोटाळ्यामुळे किंवा लबाडीमुळे होणारे वित्तीय गैरविवरण वेळीच शोधले गेले नाही तर त्यामुळे निर्माण होणारी जोखीम त्रुटींमुळे उदभवणाऱ्या जोखीमेपेक्षा ही खूप मोठी असते. कारण घोटाळा किंवा लबाडीमागे काही घटकांची हातमिळवणी, बनावट कागदपत्रे तयार करणे, हेतूपुरस्सरपणे एखादी माहिती वा आकडेवारी वगळणे, चुकीच्या पद्धतीने केले जाणारे सादरीकरण किंवा अंतर्गत प्रशानिक नियंत्रणाची पायमल्ली ही कारणे असू शकतात.	वस्तुस्थिती
	• परिस्थितीनुसार लेखा परिक्षणाशी सुसंगत प्रक्रियेचे स्वरूप ठरविण्यासाठी लेखा परिक्षणाशी सुसंगत असलेली अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे. तसेच अधिनियमाचे कलम १४३(३)(१) यानुसार, कंपनीमधे पुरेशी अंर्तगत वित्तीय नियंत्रणे कार्यरत आहेत का आणि ती प्रभावीपणे कार्य करीत आहेत का या विषयी आम्हाला आमचा अभिप्राय द्यावयाचा असतो.	वस्तुस्थिती
	• वापरलेल्या लेखा तत्वांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, लेख्यातील अंदाज रास्त असल्याबद्दल आणि व्यवस्थापनाने यासंबंधी केलेली प्रकटने योग्य असल्याबद्दल विश्लेषणात्मक मते व्यक्त करणे.	वस्तुस्थिती
	• कंपनी सतत चालू राहणारी संस्था आहे असे व्यवस्थापनाचे मत लेख्यांच्या आणि लेखापरिक्षणात मिळविलेल्या पुराव्याचा आधारे योग्य असल्याबद्दल निष्कर्ष काढणे, काही घटना वा परिस्थिती यामुळे निर्माण होणाऱ्या अनिश्चिततेमुळे कंपनी चालू राहण्याबाबत काही शंका निर्माण तर होत नाही ना हे ठरवावे लागते. जर अशी अनिश्चितता असल्याचा निष्कर्ष आम्ही काढला तर आमच्या लेखापरिक्षण अहवालात वि.वि. पत्रकातील संबंधित प्रकटनां आम्हाला लक्ष वेधावे लागते. किंवा जर अशी प्रकटने अपूर्ण असली तर आम्हाला आमच्या निष्कर्षांमध्ये तसा बदल करावा लागतो. आमचे निष्कर्ष हे लेखापरिक्षणाच्या अहवालच्या तारखे पर्यंतच्या काळात मिळविलेल्या लेखा परिक्षण पुराव्याच्या आधारे काढलेले असतात. मात्र कदाचित भविष्यातील घटना किंवा स्थितीमुळे कंपनी चालू संस्था म्हणून कार्यरत राहू शकणार नाही असे होऊ शकते.	वस्तुस्थिती
	• वि.वि. पत्रकाचे सर्वंकष सादरीकरण, रचना आणि त्यातील अंतर्भूत माहिती व प्रकटने याचे आम्ही मुल्यांकन करतो. तसेच वित्तीय विवरण पत्रकातील व्यवहार आणि घटना यांचे उचित दर्शन वित्तीय विवरण पत्रकात घडविले का नाही याचे विश्लेषण करतो.	वस्तुस्थिती

	वित्तीय विवरण पत्रातील गैरविवरणांमधील रक्कम,व्यवहार आणि त्रुटी यांचे स्वरूप हे व्यक्तीश - किंवा एकत्रित प्रमाणात वि.वि. पत्रकांच्याआधारे विचारपूर्वक आर्थिक निर्णय घेणाऱ्यावर प्रभाव पाडू शकतात. आम्ही या महत्त्वाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक मूल्य अशा दोन्ही प्रकारे पुढील बाबी करताना विचार करतो - १) आमच्या लेखापरीक्षणाच्या कामाच्या व्याप्तीचे नियोजन करताना आणि आमच्या कामाच्या फलनिष्पत्तीचे मूल्यांकन करताना आणि २) वि. वि. पत्रातील ओळख निश्चिती झालेला प्रत्येक गैरविवरणांच्या परिणामाचे मूल्य आजमावताना.	वस्तुस्थिती
	तसेच आम्ही प्रशासनाची भूमिका बजावणाऱ्यांसोबत इतर विषयांबरोबर याबद्दल चर्चा करतो. लेखापरिक्षणाच्या योजनेची व्याप्ती आणि वेळ याला महत्त्व आहे. लेखापरिक्षणात सापडलेल्या महत्त्वाच्या बाकी अंतर्गत नियंत्रणातील त्रुटी याचाही या चर्चेत समावेश असतो.	वस्तुस्थिती
	तसेच आम्ही संकलित केलेल्या माहिती आणि स्वातंत्र्याबाबतची नैतिक आवश्यकता याचीही माहिती आम्ही प्रशासकांना एका निवेदकाद्वारे देतो. आमचे स्वातंत्र्य वृत्तीसाठी लागणाऱ्या संबंधित बाबींच्या गरजा आम्ही स्पष्ट करतो व सुरक्षा बाळगतो.	वस्तुस्थिती
७	**कायदेशिर आणि नियमन विषयक आवश्यकता**	
१	कंपन्यांचे (लेखापरिक्षण अहवाल) आदेश २०१६ (आदेश) केंद्रीय भारत सरकारने कायद्याचे कलम १४३ चे उपकलम (११) यानुसार जारी केला आहे. त्यानुसार आम्ही जोडपत्र (अ) यामध्ये एक निवेदन दिले आहे. त्यात आदेशातील परीच्छेद ३ व ४ मधील विनिर्देशित विषय, ज्याप्रमाणात लागू होतील त्याची माहिती आहे.	वस्तुस्थिती
२.	कायद्याचे कलम १४३ (५) यानुसार आम्ही आमचा अहवाल जोडला आहे. कंपनीच्या ज्या नोंदवह्या आणि अभिलेख आम्हाला तपासण्यास योग्य वाटले त्याच्या आधारे, तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावर आधारित तसेच भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे आदेशानुसार आम्ही तयार केलेला अहवाल जोडपत्र (ब) येथे जोडला आहे.	वस्तुस्थिती
३.	अधिनियमाचे कलम १४३(३) यातील आवश्यकतानुसार, आमच्या लेखापरिक्षण अहवालच्या आधारे आम्ही खालील प्रमाणे माहिती देतो	
अ)	आम्ही आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे शोधली आणि मिळवली आहेत.	वस्तुस्थिती
ब)	आमच्या मते, मात्र आमच्या पात्र मतांचा आधारे या परिच्छेदात वर्णन केलेले विषय हा अपवाद वगळता, आम्ही निवेदन करतो की कंपनीने कायद्यानुसार आवश्यक अशी लेखा वह्या योग्यप्रकारे जतन केल्या आहेत; असे आम्हास आमच्या लेखापरिक्षणात दिसून आले.	वस्तुस्थिती

क)	या अहवालाशी निगडीत असलेली वि.वि. पत्रके म्हणजे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक याशिवाय इतर सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह पत्रके आणि समभागातील बदलांचे पत्रक ही सर्व संबंधित लेखावह्यांशी सुसंगत आहेत.	वस्तुस्थिती
ड)	वरील परिच्छेद-२ व ३ यातील निरिक्षणाच्या अधीन राहून, वरील वि.वि. पत्रके कायद्याचे कलम १३३ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे भारतीय लेखा मानक यांचे पालन करतात असे आमचे मत आहे.	वस्तुस्थिती
इ)	भारत सरकारची अधिसूचना क्र. जीएसआर ४६३ (इ) दि. ०५ जून २०१५ विचारात घेता कंपनी कायदा २०१३ चे कलम १६४ (२) हे या 'कंपनी'स लागू नाही.	वस्तुस्थिती
फ)	कंपनीच्या वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा पुरेसेपणा तसेच या नियंत्रणांचा कामातील प्रभाव या विषयी आमचा वेगळा अहवाल जोडपत्र-क यात दिला आहे. वित्तीय अहवालाकरिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव आणि पुरेसेपणा यावर आमच्या अहवालात कोणतीही दुरुस्ती/सुधारणा न केलेले आमचे मत आम्ही व्यक्त केले आहे.	वस्तुस्थिती
ग)	कायद्याचे कलम १९७ (१६) च्या तरतूदीनुसार आम्ही नमूद करतो की ही कंपनी कायद्याचे कलम २ (४५) यातील अर्थानुसार एक शासकीय कंपनी असून कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. ०५ जून २०१५ नुसार व्यवस्थापकीय पारिश्रमिक या संबंधीचे कलम १९७ या कंपनीला लागू नाही.	वस्तुस्थिती
ह)	लेखापरिक्षकांच्या अहवालात, कंपन्याचे (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली २०१४ तील नियम ११ नुसार समाविष्ट करण्याचे इतर वि. पत्रक दुरुस्त्या केल्या प्रमाणे, आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमूद करतो की;	वस्तुस्थिती
	१) या कंपनीने भा.ले. मानकानुसार स्वायत्त वि. वि. पत्रकातील टिपा क्र. २६ या मध्ये प्रलंबित खटल्याचे संभाव्य परिणाम प्रकट केले आहेत.	वस्तुस्थिती
	२) कंपनी कोणतेही दीर्घ मुदतीचे कंत्राटे केलेली नाहीत, ज्यात डेरिव्हेटीव कॉंट्रक्टचाही समावेश होतो, तसेच मंडळाच्या अंदाजानुसार कोणतेही मोठे तोटे संभाव्य नाहीत. त्यामुळे लागू होणारे कायदे आणि लेखामानकानुसार तरतूदीची आवश्यकता नाही.	वस्तुस्थिती
	३) कंपनीकडे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी यात स्थांनातरित करण्याजोगी रक्कम नाही.	वस्तुस्थिती
स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र - अ		
आमच्या समान तारखेस अहवालातील परिच्छेद क्र. ७.१ - शीर्षक इतर कायदेशिर आणि नियामक आवश्यकता यात संदर्भ दिल्या प्रमाणे -		
१. अ.	**स्थिर मत्तां संबंधी -** या कंपनीने हस्तांतरण योजनेनुसार तिच्या वाट्याच्या मत्तांच्या बाबत एक स्थिर मत्ता नोंदवही जतन केलेली आहे. वरील योजनेनुसार कंपनीचे गठन झाल्यावर मालमत्तांचे हस्तांतर व त्यात पडणारी भर, मालमत्तांचे नेमके स्थान आणि त्यांची संख्या यांचा तपशील नोंदवहीत नोंदला जातो. (संदर्भ टीपा क्र. ७.५)	वस्तुस्थिती

<table>
<tr><td></td><td>कंपनीने स्थिर मालमत्ता नोंदी अधिक सुरळीत करण्याची गरज आहे. जेणेकरुन योग्य आणि ओळख निश्चिती करणारा अभिलेख तयार होतील. त्यात शक्यतो पूर्ण तपशील हवे. स्थिर मत्ताची संख्यात्मक माहिती आणि सद्यस्थिती यांचा तपशील समाविष्ट करावा.</td><td></td></tr>
<tr><td>ब.</td><td>आम्हास स्पष्ट केल्याप्रमाणे या वर्षी कंपनीने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेले नाही. अंतिम पडताळणी वर्ष २०१०-११ मधे केली होती. नंतर जर या नोंदीत काही भौतिक वा इतर विसंगती २०१०-११ नंतर उदभवल्या असल्या तर त्यांचा अंदाज करता येत नाही (टिपा ७.५पहावी).</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>क.</td><td>आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, काही स्थावर मालमत्तांचे मालकीचे विलेख (टायटल डीड) कंपनीच्या नावे धारण केलेले नाहीत. कारण सर्व मताचे हस्तांतरण महाराष्ट्र शासनाने म.रा.वि. मंडळाच्या पूनर्रचनेच्या निर्णयानुसार केलेले आहे. विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण १३ नुसार आणि शासन निर्णय क्र रिफार्म २०१०/प्र.क्र. ११७ / ऊर्जा नुसार दि. ३१ मार्च २०१६ रोजी या हस्तांतरणाचे अंतिमीकरण झाले. जेथे मालकीचे विलेख कंपनीच्या नांवे नाहीत त्या प्रकरणांचा तपशील असा;</td><td>मत्ता कंपनीच्या नांवे करण्याची प्रक्रीयेत पाठपुरवठा करणयात येत आहे</td></tr>
<tr><td></td><td>
<table>
<tr><th>मत्तांचे वर्णन</th><th>प्रकरणांची संख्या</th><th>क्षेत्रफळ एकरात</th><th>३१/०३/२०२१ रोजीचा ठोक गट (रु.)</th><th>३१/०३/२०२० रोजीचा ठोक गट (रु.)</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>जमिनी भाडेपट्टी</td><td>२</td><td>७.१०</td><td>२,०४५,९३४,४६८</td><td>१,५८,०५,२९,६०६</td><td rowspan="3">कंपनीने स्थानांतरणासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उपाय सुरू केले आहेत.</td></tr>
<tr><td>जमिनी मालकीय</td><td>४</td><td>१.८९</td><td>७०८,८८०,०००</td><td>७०८,८८०,०००</td></tr>
<tr><td>इमारती व रचना</td><td>१३</td><td>उपलब्ध नाही</td><td>११,८१५,२९२,६६७</td><td>७,१५५,६८०,९२२</td></tr>
</table>
</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>२</td><td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या वर्ष कंपनीने फक्त भाड्याचे कार्य चालू ठेवले, म्हणून वरील मत्तांची यादी करण्याचे कार्य हाती घेतले नाही म्हणून आदेशातील खंड ३ (२) कंपनीस लागू होत नाही.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>३</td><td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८९ यानुसार जतन केलेल्या नोंदवहीतील समाविष्ट केलेला कोणतीही व्यक्ती किवा संस्था यांना, कंपनीने कर्जदारांकडून कर्ज परत करण्याची हमी देईल अशी संपत्ती वा वस्तू गहाण ठेवून कर्जे किंवा गहाण न ठेवता कर्जे दिलेली नाहीत. त्यामुळे आदेशातील खंड ३ (३) (अ) (ब) आणि (क) हे कंपनीला लागू होत नाहीत.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>४</td><td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षी कंपनीने कोणत्याही कर्जासाठी कलम १८६ नुसार हमी दिलेली नाही, तसेच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८५ आणि १८६ यात समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कर्जाला कंपनीने मंजूरी दिलेली नाही. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८६ च्या तरतूदीनुसार कंपनीने स्वत:च्या संपूर्ण मालकीच्या उपकंपनीत गुंतवणूक केली असल्याने कंपनी अधिनियमाचे कलम १८६ लागू होत नाही.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
</table>

५	आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या वरुन असे दिसते की कंपनीने जनतेकडून ठेवी जमा केलेल्या नाहीत. म्हणून रिझर्व बँक आफ इंडियाचे आदेश, तसेच कंपनी कायदा २०१३ची कलमे ७३ ते ७६ यातील तरतूदी किंवा अन्य संबंधित तरतूदी आणि या अंतर्गत केलेली नियमावली कंपनीला लागू होत नाही. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या संबंधी कंपनी कायदे मंडळ किंवा राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण किंवा लवाद मंडळाने कोणताही आदेश दिलेला नाही.	वस्तुस्थिती
६	ही कंपनी कोणतेही उत्पादन, प्रक्रिया उद्योग किंवा निर्मिती आणि/ किंवा तत्सम कार्य करीत नाही, म्हणून कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८ मधील उपकलम (१) यानुसार खर्च अभिलेखासंबंधी केंद्र सरकारने विहित केलेली नियमावली कंपनीला लागू होत नाही. म्हणून आदेशातील खंड (३) (६) च्या तरतूदी लागू होत नाही.	वस्तुस्थिती
७	अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेले लेखा वह्याचे परिक्षण या आधारे कंपनी ज्या विषयी वाद नाहीत असे सर्व सांविधिक देणी नियमित जमा केली केली आहेत. यामध्ये भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, सेवा कर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क, वस्तू व सेवा कर,उपकर आणि अन्य लागू असणारी सांविधिक देणी समाविष्ट आहेत. त्यांचा भरणा योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे केला आहे.	वस्तुस्थिती
	ब) भविष्य निर्वाह निधीचे दायित्व रु. १२५,४५९ व व्यवसायकर रु. ८०० वगळता ३१ मार्च २०२१ पासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा,आयकर, वस्तू आणि सेवा कर, सीमा शुल्क, उपकर आणि इतर भौतिक वैधानिक देय थकबाकी संदर्भात कोणतीही निर्विवाद रक्कम देय नव्हती.	वस्तुस्थिती
	क) कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ३१ मार्च २०२१ रोजी कंपनीची देय असलेल्या वादग्रस्त देणी खालील तक्त्यात दिली आहे. या मध्ये आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क, मूल्यवर्धित कर आणि वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे.	वस्तुस्थिती

अ. क्र.	सांविधिकांचे नाव	देण्याचे स्वरुप	रक्कम (रु.) मध्ये	संबंधित रकमांचा कालावधी	ज्या मंचाकडे दावा प्रलंबित आहे त्यांचे नाव
१.	आयकर कायदा १९६१	दंड	१४१,६५,५७,००२	निर्धारण वर्ष २००६-०७	आयकर आयुक्त (अपील्स)
२.	आयकर कायदा १९६१	दंड	१,१२१,७३६,८३७	निर्धारण वर्ष २००७-०८	आयकर आयुक्त (अपील्स)
३.	आयकर कायदा १९६१	दंड	१,२७१,०७९,१५९	निर्धारण वर्ष २००८-०९	आयकर आयुक्त (अपील्स)
४.	आयकर कायदा १९६१	दंड	१,०३४,८१५,२०७	निर्धारण वर्ष २००९-१०	आयकर आयुक्त (अपील्स)
५.	आयकर कायदा १९६१	दंड	९८०,३३८,०८९	निर्धारण वर्ष २०१०-११	आयकर आयुक्त (अपील्स)
६.	आयकर कायदा १९६१	कर आणि व्यज	१२,२९,३९०	निर्धारण वर्ष २०१८-१९	अधिकार क्षेत्र अधिकारी

८	कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेकडून किंवा बँकांकडून कोणतेही कर्जे घेतली नाहीत आणि ऋणपत्रे जारी केलेले नाही. मात्र ३१ मार्च २०१६ रोजीचा हंगामी हस्तांतरण योजने अंतर्गत शासन निर्णय क्रं. रिफार्म २०१०/प्र.क्र. ११७ / ऊर्जा नुसार पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने जारी केलेल्या ऋणपत्रे बाबत दायित्वांबाबत कंपनीच्या अभिलेख्यांमध्ये उल्लेख नाही आणि त्यामुळे याबाबत आम्ही काहीही अभिप्राय देऊ शकत नाही.	वस्तुस्थिती
९	आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने प्रारंभिक जनता देकार किंवा अन्य प्रकारे जनतेकडून कुठलाही निधी उभारलेला नाही, मुदतीची कर्जे उभारलेली नाहीत. त्यामुळे आदेशातील खंड ३(९) लागू नाही व त्यामुळे अभिप्राय व्यक्त केलेला नाही.	वस्तुस्थिती
१०	आम्ही लेखावह्यांचे परिक्षण भारतात सर्वसमान्यपणे स्वीकारलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांना अनुसरून केलेले आहे. त्यानुसार तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या वर्षी कंपनीमध्ये कोणतीही लबाडी किंवा घोटाळा झाल्याचे आढळले नाही किंवा लबाडीबाबतचा कोणताही अहवाल जारी झालेला नाही.	वस्तुस्थिती
११	भारत सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली अधिसूचना क्र. जी एस आर ४६३ (ई) दि. ०५ जून २०१५ या नुसार या सरकारी कंपनीला कलम १९७ लागू होत नाही. त्यानुसार आदेशातील खंड ३(११) लागू नाही म्हणून त्यावर अभिप्राय दिलेला नाही.	वस्तुस्थिती
१२	आमच्या मते मराविमं सूत्रधारी ही काही निधि कंपनी नाही म्हणून या आदेशातील निधी कंपनीसाठीच्या खंड ३(१२) च्या तरतूदी लागू नाहीत. म्हणून त्यावर अभिप्राय दिलेला नाही.	वस्तुस्थिती
१३	आम्ही पार पाडलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे आणि आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने कंपनी अधिनियम २०१३चे कलम १७७ आणि १८८ यातील लागू असणाऱ्या तरतूदींचे अनुपालन संबंधित व्यक्ति संस्थांशी केलेल्या व्यवहाराच्या वेळी केलेले आहे. या व्यवहारांचा तपशील भा. ले. मानकाच्या लागू होणाऱ्या आवश्यकतांनुसार वि.वि. पत्रकात प्रकट केलेला आहे.	वस्तुस्थिती
१४	आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आम्ही केलेले कंपनीच्या ताळेबंदाचे सर्वंकष परिक्षण यानुसार कंपनीत या वर्षात शेअर्सचे खाजगी वितरण किंवा प्राधान्य क्रमाणे वाटप केलेले आहे. या वर्षी कंपनीने पूर्ण वा अंशत - रूपांतरित करता येईल अशा ऋणपत्रांचे खाजगी वितरण किंवा प्राधान्य क्रमाणे वाटप केलेले नाही. कंपनीने कायद्याचे कलम ४२ च्या आवश्यकतांची पूर्तता केलेली नाही आणि ज्या हेतूसाठी निधी उभारणी केली; तिचा वापर त्याच कामासाठी केला आहे.	वस्तुस्थिती
१५	आमच्या लेखापरिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने संचालक किंवा त्या संबंधीत कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ मध्ये समाविष्ट व्यक्ति यांचे सोबत कोणतेही गैर रोखीचे व्यवहार केलेले नाही.	वस्तुस्थिती

१६	आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार भारतीय रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४ चे कलम ४५ आय ए अंतर्गत कंपनीची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे संबंधित आदेशानुसार खंड ३ (१६) यातील तरतूदी कंपनीला लागू नाहीत.	वस्तुस्थिती
परिशिष्ट' ब भारताचे मा. लेखा नियंत्रण आणि महालेखा परिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ यातील उपकलम (५) नुसार दिलेले निदेश / उप निदेश याबाबत अहवाल -		
	भारताचे मा. लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी संबंधित अधिनियमाचे कलम १४३ यातील उपकलम (५) यानुसार दिलेल्या निदेश यांचेबाबत कंपनीच्या नोंदवह्या आणि अभिलेख यांच्या तपासणीच्या आधारे आणि अभिलेख यांच्या तपासणीच्या आधारे आणि आम्हास योग्य वाटलेल्या बाबींवर तसेच आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यांच्या आधारे आम्ही या निदेशात विहित केलेल्या विषयांवर खालील निवेदन देत आहोत.	
	सूत्रधारी कंपनी (मराविम. सूत्रधारी कं. लि.) प्रकरणी - **१. अधिनियम १४३ चे उपकलम (५) अंतर्गत दिलेले निदेश**	वस्तुस्थिती

अनु. क्र.	निर्देश	उत्तर
१.	कर्जे / ऋणे / उसनवारी / व्याज सोडून देणे/ निर्लेखित करणे इ. प्रकरणे आहेत किंवा कसे ? असल्यास त्याची कारणे आणि त्यातील रक्कम	आमच्या मते आणि आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार कर्जे / ऋणे / उसनवारी / सोडून देण्याची / निर्लेखित करण्याची कोणतीही प्रकरणे नव्हती.
२.	तिसऱ्या पक्षाकडे पडून असलेल्या वस्तूमाल साठ्यासंबंधी योग्य ते अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ? तसेच शासन किंवा अन्य प्रधिकरणाकडून देणगी स्वरुपात मिळालेल्या मत्ताबाबत नोंदणी केली आहे किवा कसे	आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार, तिसऱ्या पक्षाकडे कोणतेही वस्तू माल साठा पडून राहिलेल नाही तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणांकडून कोणत्याही मत्तांची देणगी मिळाली नाही.
३.	प्रलंबित असलेले खटले / न्यायाधिकरण, लवाद यांचेकडील प्रकरणे यांचा वर्ष निहाय अहवाल द्यावा त्यात प्रलंबित असल्याची कारणे द्यावीत / तसेच सर्व कायदेविषयक प्रकरणाच्या (परदेशी अणि स्थानिक) यांच्या खर्चावर देखरेख करणारी यंत्रणा अस्तित्त्वात / प्रभावी पणे कार्यरत असल्याबद्दल माहिती द्यावी.	ही माहिती या अहवालाचे जोडपत्र - १ यानुसार आहे.
४.	या कंपनीची निर्गुतवणूकी साठी निवड झाली असल्यास, त्यातील स्थितीबाबत तपशीलवार अहवाल द्यावा त्यात मत्तांच्या मूल्यांकन (अमूर्त मत्ता व जमीनी यांचेसह) तसेच दायित्त्वे (बांधिलकीची आणि सामान्य राखीव यांचे सह) याचे मूल्यांकनाचे परिक्षण करावे त्यामधे निर्गुतवणुकीची कार्यपद्धती आणि तिचा विद्यमान टप्पा याची माहिता	आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीची निर्गुतवणूकीसाठी निवड झालेली नाही.
५.	कंपनीकडे सर्व हिशेबांवर प्रक्रिया करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान प्रणाली आहे का? जर असल्यास, खात्यांच्या अखंडतेवर आयटी प्रणाली बाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम, आर्थिक परिणामांसह नमुद केले आहे का	-
६.	विद्यमान कर्जाचे पुनर्गठन आहे का किंवा कंपनीच्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थतेमुळे कंपनीच्या कर्जदाराने केलेली कर्जे/उसनवारी/व्याज इत्यादी माफ/निर्लेखित करण्याचे प्रकरणे आहेत का? होय असल्यास, आर्थिक परिणाम सांगितले जाऊ शकतात. अशा प्रकरणांचा योग्य हिशोब घेतला जातो की नाही? (जर, धनको ही सरकारी कंपनी असेल, तर हे निर्देश धनको कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकासाठी देखील लागू आहे).	आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, कर्जाच्या पुनर्गठनाची किंवा कंपनीच्या धनकोकडून कर्ज/ उसनवारी/व्याज माफ/निर्लेखित करण्याची प्रकरणे नाहीत

	७.	केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सींकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला/प्राप्य असलेला निधी (अनुदान/ अर्थसहाय्य .) त्याच्या अटी व शर्तींनुसार योग्यरित्या जमा/ वापरण्यात आला आहे का? विचलन प्रकरणांची यादी करा.	आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, केंद्र/राज्य सरकारी किंवा त्यांच्या संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी कोणताही निधी (अनुदान/ अर्थसहाय्य इ.) प्राप्त/प्राप्य नाही.	

सांविधिक लेखा परिक्षकांच्या अहवालातील परिशिष्ट ब चे जोडपत्र – १

अनु	वर्ष	इमारतीचे नांव	कोर्ट प्रकरण	कोर्टाचे नांव	कारणे	प्रकरणाची स्थिती
१	२००१	हाँगकाँग शांघाय बँक इमारत ३रा मजला आणि ४था मजल्याचा काही भाग	अपील क्र. २१३/१८ टीइआर/३४६/ ३६६/२००१	लघू वाद न्यायालय मुंबई	३रा व ४था मजलाचा भाग रिकामा करणे. एचएसबीसी येथे हा भाग मराविम सूत्रधारीच्या ताब्यात आहे.	लघू न्यायालयात-०५ मुंबई येथे युक्तीवाद चालू पुढील तारीख २८-१०- -२०२१
२	२००४	एस्ट्रेलाटरीज् विस्तार इमारत धारावी, २रा मजला	वाद क्र. १६६३/ २००४	मुंबई उच्च न्यायालय मुंबई.	एस्ट्रेला बॅटरीज् विस्तार इमारत खरेदी प्रकरणी विशिष्ट भागाचे कार्य - पाल्यासाठी मे.इ.बी. एल. विरोधात दावा दाखल.	उलट तपासणी कोर्ट आयुक्ताच्या साक्षीने चालू या उलट तपासणी नंतर दि. १४.१०.२०१९ पर्यंत सत्यापन सादर करावयाचे आहे. पुढची तारीख दिली नाही.
३	२००९	एस्ट्रेला बॅटरीज् विस्तार इमारत धारावी, २रा माळा	आर ए इ ५३३/८०१/०९	लघू न्यायालय मुंबई.	केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यातील दुसरा माळा रिकामा करणे धारावी येथील इ.बी.एल. कंपाउंडमधील इमारत	लघु न्यायालय १० ची उत्तर दिले. परिशिष्ट २४ व २९ विरोधात उत्तर दिले. पुढील सुनावणी २१/१०/२०२१ रोजी

भाग- २ उपनिर्देश (विभागांनुसार) लेखापरिक्षकांचे अभिप्राय

अनु. क्र.	उपनिदेश	उत्तर	
१.	करारानिविष्ट अटिंप्रमाणे महसूल वसुलीची प्रभावी प्रणाली कंपनीमधे कार्यरत आहे किंवा कसे तसेच कंपनीला लागू होणाऱ्या लेखांच्या मानकांनुसार महसूलांचे योग्य लेखे, लेखा नोंद वह्यांमधे करण्यात येतात किंवा कसे?	उपकंपन्यांकडील भाडे वसुली ही प्रदीर्घ काळापासून थकबाकी आहे, जरी ती योग्यरित्या मोजली गेली आहे.	वस्तुस्थिती
२.	नव्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी जमीनीचे संपादन केले आहे का? त्यातील सर्व प्रकरणी समझोते व थकीत रकमेचा चुकास पारदर्शक पद्धतीने केला आहे किंवा कसे याची माहिती द्यावी विचलन झाल्याच्या प्रकरणांचा तपशील द्यावा.	हा खंड कंपनीला लागू नाही.	

३.	लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेल्या नफा/ तोटा हा कंपनीच्या नफा/तोटा पत्रकानुसार आहे किंवा कसे?	होय, लेखापरिक्षण अहवालातील नमूद केलेला तोटा / कंपनीच्या नफा / तोटा पत्रकानुसार आहे.	
४.	कंपनी कायद्याच्या तरतूदीनूसार कंपनीच्या सामाजिक जबाबदारी संबंधित अहवाल व प्रकटने तपासला आहेत का?	होय, कंपनी कायदा २०१३ चे कलम १३५ च्या अंतर्गत तरतूदीनूसार कंपनीच्या सामाजिक जबाबदारी संबंधीत प्रकटने केली आहेत.	

	स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'क'	
	कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १४३ चे उपकलम ३ अंतर्गत खंड (१)नुसार अंतर्गत वित्तिय नियंत्रणे याबाबतचा अहवाल - आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी लि. या कंपनीचे दि. ३१ मार्च २०२१ या तारखेला संपलेल्या वित्तीय वर्षाचे भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाचे लेखापरीक्षण करीत असताना त्या सोबत वित्तीय अहवालासंबंधी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखा परीक्षण पार पाडले.	
	अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी - भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्थेने वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे घटक नमूद केलेले आहेत. त्याचा विचार करून कंपनीने वित्तीय अहवाल देण्याचे निकष निश्चित केले असतात. त्याच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित करून प्रभावीरित्या त्यांचे संचालन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. या जबाबदारी मध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो - अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे स्वरूप तयार करणे, त्याची अमलबजावणी करून प्रभावीरित्या त्यांचे प्रवर्तन करणे आणि त्यातून कंपनीच्या व्यावसायिक कृती शिस्तबध्द रितीने व कार्यक्षमरित्या चालविणे आणि त्याचवेळी कंपनीच्या धोरणांना धरून वर्तन करणे, तिच्या मत्तांचे रक्षण करणे, लबाडी व चुका शोधणे व त्याला प्रतिबंध करणे, दस्तऐवज अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या आवश्यकतेप्रमाणे विश्वासार्ह वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे.	
	लेखापरीक्षकांची जबाबदारी - कंपनीची वित्तीय माहिती देण्याबाबत तिच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी, आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्था यानी अंतर्गत लेखा परिक्षणाची मार्गदर्शन टिपा आणि कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विनिर्देशित केलेली लेखा मानके यांचे दोन्हीचे विवरण केले आहे. ते कंपनीस ज्या मर्यादेत लागू होते त्याप्रमाणे परिक्षण केले जाते. आम्ही नैतिक गरजेचे अनुपालन होईल अशाप्रकारे आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करून कार्य पार पाडतो, जेणे करुन वित्तीय अहवाल तयार करण्याच्या कामांवर पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे आहे की नाही याची वाजवी खात्री आम्हाला करुन घेता येते. वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पुरेशी यंत्रणा आहे की नाही आणि ती कार्यक्षम आहे की नाही याचे खात्रीलायक लेखाविषयक पुरावे गोळा करण्यासाठी आम्ही आमच्या लेखापरीक्षणात विविध प्रक्रिया करतो. वित्तीय अहवालांवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण समजून घेणे, अहवालांमधील रक्कमा, आकडेवारी वा अन्य स्वरूपातील कमतरता समजून घेणे, जोखीम लक्षात घेऊन आखलेल्या अतंर्गत वित्तिय नियंत्रणांची चाचणी व मूल्यांकनाचे काम आम्ही आमच्या लेखापरीक्षणात करतो.	कंपनीने पुरेशी अंतर्गत आर्थिक अवलंब केली आहे.

	वित्तीय विवरण पत्रकात लबाडी वा त्रुटीमुळे वित्तीय पत्रकातील चुकीची माहिती रुपी जोखमीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया निवडणे हे लेखापरीक्षकाच्या निर्णय प्रक्रियेवर अवलंबून असते. कंपनीची वित्तीय माहितीच्या नोंदी घेण्यावरील(वित्तीय अहवाल तयार करण्यावरील) अंतर्गत वित्तीय नियंत्रणांबाबत आमचे मत व्यक्त करण्यासाठी आवश्यक असे रास्त व पुरेसे लेखा पुरावे आम्ही गोळा केले आहेत	
	वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा अर्थ - कंपनीचे वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे या प्रक्रियेची रचना वित्तीय विश्वासार्हतेची रास्त हमी मिळविण्यासाठी आहे. तसेच सर्वसाधारणपणे स्विकारलेली लेखा तत्त्वे यांना सुसंगत अशी आणि बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे हे सुद्धा यात अंतर्भूत आहे. कोणत्याही कंपनीचे वित्तीय माहिती देण्यावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यामध्ये पुढील धोरणे व प्रक्रियेच्या बाबी समाविष्ट असतात - १. अभिलेख योग्य तपशीलासह जतन करणे व त्यातून कंपनी मत्तांचे व्यवहार, विल्हेवाट इ. चे अचूक व रास्त दर्शन घडते. २. सर्वसाधारण स्वीकारलेल्या लेखा तत्त्वानुसार वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी मान्यता देण्यासाठी आवश्यक असतील अशाप्रकारे व्यवहाराची नोंदणी करण्यात येते आणि कंपनीचे प्राप्ती व खर्च हे व्यवस्थापनाने व संचालकांनी प्राधिकृत केल्याप्रमाणे आहेत याची हमी देणे , आणि ३. कंपनीच्या मत्तेच्या संबंधीच्या वित्तीय विवरणपत्रात प्रत्यक्ष बाधक ठरू शकतील अशी मत्तांशी संबधित अप्राधिकृत(बेकायदेशीर) कृती म्हणजे मत्तांचे संपादन वापर किंवा विल्हेवाट इत्यादींना प्रतिबंध केला जातो किंवा ते वेळीच शोधता येतात याबद्दल योग्य हमी देणे.	
	वित्तीय अहवाल अंतर्गत नियंत्रणाच्या स्वाभाविक मर्यादा - वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत नियंत्रणाच्या स्वाभाविक मर्यादा आहेत. त्यामुळे संबंधितांनी हातमिळवणी करणे, व्यवस्थापनाने अयोग्यरीत्या या नियंत्रणांचे मूल्यांकन करताना भविष्यातील काळासाठी केलेले प्रक्षेप, अंदाज हे जोखीमांच्या अधीन असतात. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अपूरी ठरतात. तसेच परिस्थितीतील बदल, धोरणांचे व कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यातील फरकामुळे अंतर्गत नियंत्रणांचा प्रभाव बिघडू शकतो.	वस्तुस्थिती
	मत आमच्या मते, भारतीय सनदी लेखापाल संस्थेने अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करण्यासाठी दिलेली मार्गदर्शक टिपणी यात नमूद केलेल्या आवश्यक घटकाना विचारात घेऊन आणि सर्व घटकांचा विचार करता, मराविम सूत्रधारी कंपनीमधे 'वित्तीय अहवाल देण्यासाठीची पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणा अस्तित्त्वात आहे आणि दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत ती प्रभावीरित्या कार्यरत होती.	वस्तुस्थिती

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

परिशिष्ट - १ अ

मराविमं सुत्रधारी कं. लि. च्या दि. ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ या कालावधीतील एवत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखा परिक्षण अहवालावर कंपनीची उत्तरे

अनु. क्र.	लेखा परिक्षकांचा परिच्छेद	व्यवस्थापनाची उत्तरे
१.	**एकत्रित वि. वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणाचा अहवाल** **पात्रते विषयी अभिप्राय** आम्ही, मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड (यापुढे कंपनी असे संबोधले आहे) आणि तिच्या उपकंपन्या (सुत्रधारी व तिच्या उपकंपन्या यांचा एकत्रित उल्लेख पुढे 'समुह' असा केला आहे.) यांच्या ३१ मार्च २०२१ रोजीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचे लेखा परिक्षण केले. या पत्रकामध्ये एकत्रित ताळेबंद पत्रक, एकत्रित नफा आणि तोटा पत्रक (यामध्ये इतर सर्वकष उत्पन्न या सह) वरील तारखेला संपलेल्या वर्षातील समभाग धारणेतील बदल, एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक आणि कंपनीच्या महत्वाची लेखा धोरणे आणि इतर स्पष्ट करण्यात आलेली माहिती (यापुढे यांचा उल्लेख 'एकत्रित वित्तीय विवरण पत्रके वि. वि. पत्रके - असा केलेला आहे) यांचा समावेश आहे. आमच्या मते आणि आमची सर्वोतपरी माहिती तसेच आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे याच्या आधारे आम्ही निवेदन करतो की, आमच्या अहवालातील पात्रमतांचा आधार या शीर्षकाच्या परिच्छेदातील मजकूर तसेच परिच्छेदे ९(२)(ड) यात भारतीय लेखा मानके याची पूर्तता नसलेल्या काही बाबी आणि कंपनीच्या उपकंपन्याच्या वेगवेगळ्या एकत्र वि. वि. पत्रकांचे लेखा परिक्षणाचे अहवाल आणि इतर माहिती या सर्वांचा अपवाद करता, ज्यांचे सहवाचन 'भर देण्याची प्रकरणे' आणि महत्वाची लेखा परिक्षणाची प्रकरणे' यासह केले जाते. त्यानुसार आमच्या मते वरील एकत्रित वि. वि. पत्रके कंपनी अधिनियम २०१३ ('कायदा') यात दिलेल्या आवश्यकता प्रमाणे आणि या कायद्याचे कलम १३३ ज्याचे वाचन कंपन्यासाठीची (भा. ले. मानके) २०१५ या सुधारीत नियमावली नुसार आणि भारतातील सर्व साधारणपणे मान्य केलेली इतर लेखांची धोरणे यानुसार या समुहाची दि. ३१ मार्च २०२१ रोजीच्या वित्तीय स्थितीचे सत्य आणि रास्त दर्शन घडवितात. तसेच या समुहाच्या एकत्रित तोटा, एकूण सर्वकष उत्पन (वित्तीय कामगिरी) समभागातील बदलाचे एकत्रित पत्रक आणि एकत्रित रोकडता प्रवाह यांची ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची माहिती देतात. उपकंपनी महापारेषणच्या विषयी आम्ही पात्र अभिप्राय परिच्छदेच्या आधारे नमूद केलेल्या बाबींचा एकत्रित प्रभाव पडताळून पाहण्यासाठी पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षण पुरावे मिळवू शकलो नाही. म्हणून त्यावर अभिप्राय देऊ शकत नाही.	वस्तुस्थिती

२.	**पात्र मतांचा आधार** **मराविमं सुत्रधारी कंपनीचे प्रकरणी** आम्ही आमच्या लेखा परिक्षणासाठी आवश्यक अशी माहिती आणि स्पष्टीकरणे खालील विषयासाठी मिळवू शकलेलो नाही. अ) शासन निर्णय २०१०/प्र.क्र.११७/ऊर्जा नुसार रु. १४,४५३,४००,०००/- च्या ३१ मार्च २०१६ रोजी अंतिम झालेल्या तात्पुरत्या हस्तांतरण योजनेअंतर्गत हस्तांतरित केलेल्या मूर्त स्थिर मालमत्तेची मालकी निर्धारित करणे (संदर्भ टिपा क्र. ४९(१)(१.२)	पूर्वीच्या महावितरण कडून जमीन आणि इमारतींच्या मालकीचे हस्तांतरण प्रक्रियेत आहे. हस्तांतरणासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पत्रे जारी करण्यात आली आहेत.
	ब) कंपनीच्या उपकंपन्या म्हणजे महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती यांच्या कडील थकित शिलकीची नोंद कंपनीच्या लेखा वह्यात केली आहे. त्याविषयी मेळ, चर्चा आणि विमर्श चालू आहे. (संदर्भ - टिपा क्र. ४९(२.१) आणि ४९(५) त्यांचा वित्तीय स्थितीवर आणि वि. वि. प्रकरणातील प्रकटनावर काही परिणाम होऊ शकतील.	सुत्रधारी आणि तिच्या उपकंपन्या यांच्यामध्ये काही मतभेद असल्याने आंतर कंपनी शिलकी थकीत आहेत. उपकंपन्यांच्या संबंधीत काही मत्ता/दायित्त्वे यांचे हस्तांतरण त्यांच्याकडे झाले असले तरी त्यांनी त्या संपूर्णपणे स्वीकारलेल्या नाहीत. काही फरकामुळे आंतर कंपनी शिलकी उद्भवल्या आहेत.
	क) मराविमं सुत्रधारी कंपनीच्या पूर्ण मालकीच्या उपकंपन्या महावितरण आणि महानिर्मिती यानी अनुक्रमे ८४०० कोटी आणि रु. १२८४ कोटी एवढ्या ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाच्या कर्जांना कॉर्पोरेट हमी दिल्या. भा. ले. मानक १०९ मधील आवश्यकतेनुसार त्याचे रास्त मुल्यांकन केलेले नाही म्हणून त्यांच्या प्रभावाचे निर्धारण अनिश्चित आहे. (संदर्भ टिपा ४२ (ए) (अ) (७)	महामारीच्या परिस्थितीमुळे व्यवस्थापन मूल्यांकन करण्यास सक्षम नाही.वि. वर्ष२०२१ -२२ मध्ये मुल्यांकन करु.
	ड) मागील वर्ष २०२० -२०२१ मध्ये प्राप्त झालेल्या समभाग अर्जाची रक्कम रु ४२.५० कोटीचे समभाग २.०९.२०२१ रोजी वाटप करण्यात आले आहेत, यात कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झालेले दिसते. (संदर्भ - टिपा क्र. १९ (ड))	राज्य सरकारकडून थेट उपकंपनीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाचे पैसे, परंतु वेळेच्या मर्यादेत कळवलेले नाहीत.सक्षम प्राधिकाऱ्याने राज्य सरकारकडून शेअर अर्जाची रक्कम मिळाल्यानंतर आम्हाला ताबडतोब कळवावे असे निर्देश संबंधित अधिकाऱ्याला आहेत.
	ई) महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे या वर्षातील रु. ६४०,०००,०००/- उपकंपन्यांच्या शेअर्स मिळवण्यासाठी महानिर्मितीला थेट भरले. यात कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झालेले दिसते. (संदर्भ - टिपा क्र. १८. क)	राज्य सरकारने त्यांच्या कार्यपध्दतीनुसार उप कंपन्यांना थेट दिलेले भांडवली गुंतवणूकीचे पैसे.
	फ) स्वमालकीची जमीनीच्या उपलब्ध तपशीलावरुन असे निदर्शनास आले की, भूतकाळात भाडेपट्टीच्या जमिनींशी संबंधित अनेक घटकांना उपकंपन्यांनी याच लेखाशीर्षा अंतर्गत दाखविले. त्यामुळे भाडेपट्टीची जमीन आणि मालकीची जमीन यांचे स्वतंत्र विलगीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे भाडेपट्टीच्या जमिनीच्या कर्ज फेड करण्यात आली नाही. अशा प्रकारांची माहिती / तपशील उपलब्ध नसल्याने त्यांच्या भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि, पत्रकावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.	महावितरण कालावधीपासून झालेल्या असंख्य करारांचा विचार करता, मालकीच्या जमिनीखाली एकत्रित केलेल्या भाडेपट्टीवरील जमिनीची ओळख पटवणे अवघड आहे, तथापि क्षेत्रिय कार्यालयामध्ये ती ओळखण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

	उपरोक्त परिच्छेद (अ) ते (फ) यांचे तोटा, राखीव, प्रति समभाग मिळकत यांच्यावर होऊ शकणाऱ्या/झालेल्या परिणामांचे सांख्यिकरण केलेले नाही, सांख्यिकीकरण आणि प्रकटन शक्य नाही.	
	महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी अ) या कंपनीने चालू वित्तीय वर्षात, महावितरण कंपनीच्या विलंब भरणा आकाराचे व्याजात्मक महसूल म्हणून मान्यता दिली. ही रक्कम रु. २५११.५१ कोटी आहे. (३१ मार्च २०२१ पर्यंतची संचित रक्कम रु. १४८६२.१० कोटी) कंपनीने विलंब भरणा आकार आकारणीसाठी सातत्याने अंगीकारलेल्या पद्धतीनुसार आहे. ३१ मार्च २०२१ पर्यंतची विलंब भरणा आकाराची रक्कम पूर्णपणे वसुली होण्याजोगी नाही, महावितरणने त्यावर आक्षेप घेतला असल्याने या विलंब भरणा आकाराची वसुली संशयास्पद आहे. महावितरणने सूत्रधारी कंपनीला कळविल्यानुसार विलंब भरणा आकार हिशेबासाठी वेगळी आणि एकतर्फी पद्धती अवलंबिली आहे. महावितरणच्या म्हणण्यानुसार हा आकार रु. ४११२.२७ कोटी इतकाच होतो. त्यामुळे महानिमिर्तीने आकारलेली रक्कम आणि आणि महावितरणने तिच्या हिशेब पद्धतीने मोजलेली विलंब आकाराची रक्कम यामध्ये रु. १०७४९.८३ कोटींची तफावत आहे. त्याची अंतिम निष्पत्ती आणि महावितरणने पुर्नजिवित केलेल्या या वादामुळे ही वसुली होणे संशायस्पद आहे. त्यामुळे त्यासाठी तरतुद केली नाही. विलंब आकाराची रक्कम महावितरण व महानिर्मिती दोन्ही संस्थात मान्य होईल अशी निश्चित होणे आहे. (संदर्भ टिपा क्र. ५० (११) एकत्रित वित्तिय विवरणावरील).	कंपनी वर्ष २००९ -१० पासून महावितरण कंपनी अधिभाराची देयके देत आहे. त्यासाठी महावितरण कडून मिळणाऱ्या निधी करिता विनियोजनाची पद्धत वापरत आहे. प्रथम व्याज आणि नंतर उरलेला निधी, थकीत मुद्दलासाठी वापरला जातो. वि. वर्ष २०१७ -१८ पर्यंत महावितरणने सुद्धा वरील हिशेबाशी सहमती होती व त्याचा लेखे वि. वर्ष २०१७ -१८ च्या वि. वि. पत्रकात होती. मात्र वर्ष २०१८ -१९ मधे महावितरणने विलंब भरण्यासाठी एक तर्फी वेगळी पद्धत स्वीकरली. त्यात मुद्दलाचा भरणा आधी करावा आणि उर्वरित रक्कम व्याजासाठी वापरण्यात आली यामुळे ३१.०३.२०२१ रोजी महावितरण ने लेखा वह्यात अधिभार दायित्व रु. ४११२.२७ कोटीने कमी नोंदले. कंपनीला हा बदल मान्य नाही. तिने तिची पद्धत चालू ठेवली आहे.
	ब) खालील बाबींकडे लक्ष वेधू इच्छितोय - १) वीज खरेदी करारानुसार महानिर्मितीने पुरविलेल्या विजेसाठी महावितरणकडून रु. २७०४०.४८ कोटी,(सध्याच्या रु. २५११.५१ च्या बिल न केलेल्या महसुलासह) वसूल करण्यायोग्य शिल्लक आहे, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. आर्थिक वर्षाअखेरीस महावितरणने महानिर्मितीला देय असलेली रक्कम रु. १५९५७.२४ कोटी असल्याची पुष्टी केली आहे. विवादित बाबींसाठी दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे या दोन शिल्लकींमधील संयुक्तपणे मेळ घातला आहे. आम्हाला सांगण्यात आले आहे की या विवादित बाबी, रक्कम आणि समस्यांचे निराकरण झाल्यावर अंतिम सुधारात्मक लेखांकन आणि समायोजन केले जाईल. २) महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी लिमिटेड कडून वसूल करण्यायोग्य शिल्लक येणी रु. १४३.५२ कोटी मेळ आणि कायम होण्याच्या अधीन आहे. मात्र आम्हाला असे सांगितले की कंपनीने या विषयी पाठविलेल्या पत्रांना अद्याप उत्तरे मिळाली नाहीत. लेखा परिक्षणाचे पुरेसे आणि योग्य पुरावे नसल्याने या शिल्लकी रकमांवर जर काही परिणाम झाला तर त्याचा कंपनीच्या वर्षाच्या तोट्यावर होऊ शकणाऱ्या प्रभावावर मत देता येत नाही..	कंपनीने वर्षभरात महावितरणशी सामंजस्य आणि शिल्लक पुष्टीकरण केले आहे. कंपनी सामंजस्यामध्ये आणल्याप्रमाणे विवादिक समस्यांचे निराकरण करण्याच्या प्रक्रियेत आहे. तसेच कंपनीने महापारेषण कंपनीच्या भार प्रेषण केंद्राला रिएक्टीव्ह एनर्जी चार्जेस बाबत पत्र दिले व उत्तराची प्रतिक्षा आहे.

क) कोळसा कंपनीच्या शिलकी संबंधीत कोळसा कंपनीकडून पुष्टीकरण करणे व मेळ करणे यांच्या अधीन आहेत. आमच्या मते, कंपनीने साधारण खातेवहीच्या शिलकीच्या आधारे ताळमेळ घातलेला नाही. त्याबाबत माहिती नसल्याने त्याचे कंपनीच्या वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत. कोळसा कंपनी निहाय थकीत अग्रीमाची माहिती खालील प्रमाणे आहे.

(रक्कम रु. कोटीत)

पुरवठा दाराचे नाव	***महानिर्मितीच्या वह्यात ३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक***
सिंगरेनी कॉलीयरीज लि.	१२४.८४ जमा
साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड लि.	२५२.१७ खर्च
वेस्टर्न कोलफिल्ड लि.	२०१३.४४ जमा
महानदी कोलेफिल्ड्स लि.	१२०.१६ जमा
एकूण	२००६.२७ जमा

कोळसा कंपन्याकडून पुष्टीकरण करणे आणि मेळ पूर्ण करणे तसेच डेबीट नोट्स योग्य प्रकारे पाठविणे या बाबी प्रलंबित असल्याने कोळश्या कंपन्याच्या कार्यक्षमतेची प्रोत्साहन इनव्हॉईस / कोळसा कमी उचलणे या विषयी तरतूद केलेली नाही. कंपनीने कोळसा कंपन्यावर अपुरे वितरण कमी पतीचा कोळसा पुरविणे. यासारखे काही प्रतिदावे देखील दाखल केले आहेत. हे विवादित दावे आणि प्रतिदावे असल्यामुळे या सर्वांचा परिणाम अनिश्चित आम्ही कंपनीच्या आर्तिक विवरणावर प्रभावी परिणांमावर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.

कंपनीने कोळसा कंपन्या सोबत दर तिमाहिक प्रत्येक क्षेत्राचा मेळ घालण्यात येतो. मात्र काही विविदीत मुद्यामुळे यावर्षी काही वेळ लागला. मात्र शिलकीचा मेळ करण्याचे काम पुढील वर्षी निश्चितपणे केले जाईल.

ड) रेल्वे कंपन्याकडील शिलकीचे पुष्टीकरण करणे / मेळ करणे यांच्या अधीन आहेत. बहुतेक शिलकी मागील काही वर्षातील असमायोजित थकीत रकमांच्या आहेत. त्यांची ठळक माहिती खालील तक्त्यांमध्ये दिली आहे.

(रक्कम रु. कोटीत)

पुरवठा दारांची नावे	***महानिर्मितीच्या नुसार ३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक***
दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ३००००)	*६.८६ खर्च*
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे (खाते क्र. ३०००१)	*४३.६६ खर्च*
मध्य रेल्वे (खाते क्र. ४३००००)	*३१.१५ खर्च*
एकूण	***८१.६८ खर्च***

पुष्टीकरण करणे व मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्याने वित्तीय लेखावह्यात आवश्यक ती समायोजने करता आली नाहीत. यामुळे त्याचे कंपनीच्या वि. वि. पत्रकावर होऊ शकणाऱ्या प्रभावी परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

कंपनीने रेल्वे शिकलीचा आढावा घेतला. काही प्रकरणे मागील वर्षाच्या तूलनेत या वर्षादरम्यान मिटविण्यात आली. येत्या वर्षातील शिल्लक प्रकरणांचा निपटारा करुन आवश्यक लेखा नोंदी केल्या जातील.

	ई) व्यापारी येणी, कर्जे व अग्रीमे, ठेवी आणि वाणिज्यक देणी यांच्या शिलकी यांच्या संबंधितांकडून खातरजमा करणे आणि / किंवा त्याप्रमाणे मेळ करणे, यांच्या अधीन आहेत. अशी निश्चिती आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांची परिणाम स्वरुप समायोजने केलेली नाहीत. मात्र आम्हाला माहिती देण्यात आली आहे की कंपनीने तिच्या पुरवठादारांना पत्रे पाठवून शिलकी खातरजमा करण्यास सांगितले आहे आणि तशी उत्तरे मिळाल्यावर त्यांचा मेळ करणे चालू आहे. तसेच आम्हास असे सांगण्यात आले की मेळ करणे ही कंपनीत सतत चालणारी प्रक्रीया आहे. लेखा परिक्षणाचे योग्य व पुरेसे पुरावे नसल्याने आम्ही शिलकीवर आणि कंपनीच्या तोट्यावर काही परिणाम होणार असतील तर त्या परिणामांवर आम्ही मत देऊ शकत नाही.	विद्यमान संयोगातून विजनिर्मिती व्यतिरिक्त कंपनीने नवीन थर्मल आणि सोलर आधारीत श्रेणीमधील ऊर्जा प्रकल्प स्थापित आणि कार्यन्वित करत आहे. यामुळे कंपनी विविध ग्राहक/ विक्रेत्यासह विविध प्रकारचे व्यवहार करत असते. प्रचलीत पद्धतीनूसार कंपनीने विविध विक्रेते/ग्राहक/कर्जदार इत्यादीला शिल्लकीच्या पुष्टीकरणाची पत्रे जारी करते. या व्यतिरिक्त कंपनी विक्रेत्याशी समेट देखील करते. जी सतत चालू राहणारी प्रक्रीया आहे. तथापि, एकट्या कंपनीला कारणीभूत नसलेल्या विविध कारणांमुळे उदा. विक्रेत्याद्वारे देयके उशीरा सादर करणे, शिलकी पुष्टीकरण करण्याच्या विनंतीला प्रतिसाद नदेणे, विक्रेत्यानी दिलेली चूकीची माहिती दावे/ प्रतिदावे इत्यादी. ताळमेळ किंवा समायोजन करण्यासाठी काही विक्रेत्यांना वेळ लागतो. कंपनी विक्रेत्याच्या शिल्लक रकमेसाठी आवश्यकतेनुसार आवश्यक तरतूदी देखील करते.
	महापारेषण या उपकंपनीच्या प्रकरणी खालील बाबी या आमच्या सुधारित मताचा आधार आहेत - १) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ५३(१३) याकडे लक्ष वेधण्यात येते. त्यात वि. वर्ष २०१५ -१६ मधील इतर उत्पन्न या लेखाशीर्षाअतंर्गत ३१ मार्च २०२१ रोजीची विलंब भरणा आकाराची संचित रक्कम रु. ८५, ४९९ लाख (१० वितरण परवानाधारकांच्या संदर्भात) असल्याची माहिती दिलेली आहे. या कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वर्ष २०१६ चा आदेश क्र. ३१ वर्ष २०१६ याचा संदर्भ दिला आहे. त्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कंपनीची वि. वर्ष २०१५ -१६ या वर्षातील एकूण महसूल आवश्यकता उपरोक्त रकमेने कमी केली होती आणि त्याचे वर्गीकरण 'विना दराचे उत्पन्न' असे केले होते. अशा कंपनीकडे असे उत्पन्न (म्हणजे व्यापारी येणी) वसुली निश्चित करण्यासाठीचा तपशिल उपलब्ध नव्हता. अशा विलंब भरणा आकाराचे लेखे 'इतर उत्पन्न' या वर्षी २०१५ -१६ मध्ये करण्याची कृती ही कंपनीने लेखा धोरणाचे तसेच लागू होणाऱ्या लेखा मानकांचे उल्लंघन करणारी आहे. टिपा क्र. (११) महसूल मान्यता महापारेषणच्या महत्त्वाच्या लेखा धोरणे यात सांगितले आहे कि इतर उत्पनाला उपर्जित तत्वावर मान्यता देण्यात आली,	या वस्तुस्थितीचे प्रकटन वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४४ मध्ये केली आहे. भार प्रेषण केंद्र वितरण कंपन्यांना मासिक दर आकाराची देयके वितरण परवाना आकार भरणा देखील समाविष्ट असतो.

	मात्र जर अशा उत्पन्नातील अंतिम वसुली अनिश्चित असेल तर त्याचा अपवाद करावाठ जर कंपनीने मागील वर्षात अशा उत्पन्नाची रक्कम रु. ८५, ४९९ लाख मान्य केली नसती तर नफा तोटा पत्रकातील ठेवून घेतलेली शिल्लक यातील शिल्लक आणि व्यापारी येण्याच्या लेख्यातील शिल्लक तेवढ्याने कमी झाली असती.	
	२) कंपनीच्या निर्धारित धोरणाचे पालन न केल्यामुळे काही कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाच्या दाव्याची जादा प्रतिपूर्ती केली आहे, ही बाब आम्ही कंपनी व्यवहार मंत्रायलयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३ (१२) यातील तरतूदींनुसार, आर्थिक वर्ष २०१९ -२० मध्ये आमच्या लेखा परिक्षणात नोंदलेल्या या चुकीच्या किंवा फसव्या व्यवहार कार्यपद्धतीचा अहवाल केंद्र शासन, सचिव, कंपनी व्यवहार मंत्रालयाकडे २४ एप्रिल २०२० रोजी गेला आहे. ही कृती कंपनीच्या धोरणाशी अनुसरण करणारी नाही. दाव्यांचे पैसे देणे, कर्मचारी सेवा पुस्तिकात जागा कोऱ्या राहणे या बाबतची नियंत्रणे योग्य नव्हती. अशा जादा दाव्याची अंदाजे रक्कम रु. एक कोटी पेक्षा जास्त असून केंद्र शासनास तसे कळविण्यात आले होते. जादा रक्कम उलट फिरविणे, पुनर्लेखन करणे/तरतूद करणे याचे परिणाम अद्याप निश्चित केलेले नाहीत.	१) लेखा परिक्षकानी सादर केलेल्या उताऱ्यानुसार एकूण ७१७ कर्मचाऱ्यांना जादा रजा रोखीकरण मिळाले. मात्र चौकशीनंतर असे निष्पन्न झाले की जादा रजा रोखीकरणाची फक्त ७४ प्रकार होते. २) इ आर पी प्रणालीतील बहुविध नोंदीपैकी बऱ्याच नोंदी महागाई भत्तांची थकबाकी आणि उच्च श्रेणीचा लाभ देणे यासंबंधीची आहेत. तसेच वर्ष २०१४ मधे वेतन सुधारणांमुळे काही नोंदी झाल्या. ३) मात्र अशा गैर प्रकाराची संख्या कमी असली तर मानव संसाधन विभागाने हे प्रकरण गांभिर्याने हाताळण्याचे ठरविले असून क्षेत्रीय कार्यालये व मुख्य कार्यालये यांना १०० टक्के वसूली करण्याचे आदेश दिले. ४) आत्तापर्यंत जादा रजा रोखीकरण प्रकरणातील रु. ४३,१२,८७९/- वसूल केले आहे. सांविधिक लेखा परिक्षकानी १०० लाखाची गैर प्रकरणे असल्याचे म्हटले असले तरी वस्तूस्थिती तेवढी नाही. ५) केलेली कार्यवाही - अ) पत्र क्र. २१३७ दि. १५.४.२०२० नुसार स्वतंत्र चौकशी व दक्षता करण्यात येत असून त्याच्या अहवालाची प्रतिक्षा आहे. ब) प्रणालीभूत गैर नोंदी होऊ नयेत म्हणून त्याला आळा घालण्यासाठी उपाय योजले. इ. आर. पी प्रणालीची नवीन रचाना करुन ती प्रभावी केली आहे. आता या प्रणाली रजा रोखीकरणाच्या जादा नोंदी होणार नाहीत क) या चूकांना जबाबदार व्यक्तींवर व तपासणी करणाऱ्याना शिस्तभंगाची करावाई यापूर्वीच सुरु झाली. संदर्भ पत्र क्र. २२१७ दि. ०३.०६.२०२०

		ड) यापुढे प्रत्येक गट वर्षासाठी रजा नोंदणी वही तयार करावी आणि त्याचे नंतर लेखापरिक्षण वित्त व लेखा कर्मचाऱ्यांना करावी. त्यासाठी दुहेरी फेरतपासणी पद्धत वापरावी आणि सॅप प्रणालीतील रजा रोखीकरण लेखानोंदीचा मेळ जनरल लेजर अकाउंट सोबत करण्याचे आदेश देण्यात आले आहे.
	३) रजा रोखीकरणाची मूल्यांकन करण्याची कंपनीतील पद्धत / प्रक्रिया ही विमागणिती शास्त्राच्या आधारे असून ती अधिक बळकट करण्याची गरज आहे कारण रजेची आणि उपदानाची माहिती प्रणाली मधून निर्माण केली जाते व ती विमागणिती तज्ञांना देण्यात येते. त्यात अचूकता नसल्याचे दिसते. त्यामुळे रजा रोखीकरण व उपदानाचे मूल्यांकन त्याच्या योग्यतेबद्दल आम्हास मत देता येत नाही किंवा त्याचे विमागणिती मूल्यांकनाच्या व रकमा यावर अभिप्राय देता येत नाही.	याबाबत सर्व कार्यालयांना आदेश देण्यात आले की त्यांनी सेवा पुस्तक (सर्विस बुक) याप्रमाणे फ्रेश नवीन अनूज्ञेय रजेची माहिती संग्रहीत करावी. ही माहिती इ. आर. पी. कोअर पथकाल सादर करावे. त्यानुसार इ. आर. पी कोअर पथक माहिती प्रणालीत नोंदणी करील. आता विमागणिती तज्ञांना विमागणिती हिशेबासाठी माहिती सादर करतांना रजेच्या खात्याची माहितीत विसंगती आढळली तर त्या चूका नंतर दुरुस्त करुन मूल्याकनासाठी विमागणिती तज्ञांकडे पाठविल्या जातात. आता पुढच्यावेळी अधिक दक्षता घेतली जाईल. आणि मूल्यांकनासाठी १०० टक्के निर्दोष माहिती पाठविली जाईल.
	४) २०१९ -२०२० या आर्थिक वर्षी दि. ०१ एप्रिल २०१८ पासून कंपनीने कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा केली. त्याला संचालक मंडळाने कार्योत्तर मंजूरी दिली. असे ठरले की तीन हफ्त्यात हे पैसे दयावेत. त्याप्रमाणे दोन हफ्ते दिले. अन्य ३१ मार्च २०२१ पर्यंत प्रलंबित होते म्हणून त्यासाठी रु. ६,८७४.५१ लाखांची तरतूद केली. त्याचे तपशील पडताळणीसाठी उपलब्ध नव्हते. त्याचा आवश्यक माहिती तपशील नसल्याने या तरतूदीचे आधार, प्रमाण आणि परिपूर्णता तपासता आलेली नाही, त्यावर अभिप्राय देता येत नाही.	थकबाकीची तरतूद करण्यासाठी गणना करून त्याचा तपशील मासं कोर टीमला पाठविण्यात आला. या आकडेवारीच्या आधारे वित्तिय वर्ष २०१९ -२० मध्ये पूस्तकाच्या खात्यामध्ये रु. १२,८९,९६९ लाख रुपये केले गेले. दि. ३१.०३.२०२१ पर्यंत काही वेतन निश्चिती थकबाकी दाराचे देणे रु. ६,८४७.५१ लाख व्यवस्थापनाकडून आवश्यक आदेशानंतर अदा केली जाईल.
	५) व्यापारी येण्याची संख्या/व्यक्ती पार्टीनुसार विभाजन आणि त्यांचा कालावधी (एच) याची माहिती प्रणालीतून मिळत नाही. व्यापारी येणी किती वर्षापासूनची थकीत आहेत याची व्यक्तीश - तयार केलेली माहिती मधे बऱ्याच चुका आहेत. म्हणून लेखापरिक्षणात त्याची पूर्णपणे पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अपेक्षित पत हानी (इसीएल) च्या सोप्या पद्धतीने केलेल्या तरतूदीवर आम्हाला मत मांडता येत नाही.	बिजकांची निर्मिती आणि त्यांचे सॅप प्रणालीत स्वयंचलीत नोंदणी करण्याच्या प्रक्रीयांचा विकास करणे चालू आहे. त्यामुळे व्यापारी येणी किती जूनी आहेत. याचा तपशील एकसेल युटीलीटीमध्ये देण्यात येतो. कंपनी आता वितरण कंपन्याकडून आलेल्या पैशाचा विनियोग प्रथम जुन्या थकीत रकमांसोबत करते. नव्या बिजकांतील थकीत रकमांचा हिशेब होतो. त्याप्रमाणे लेखा परिक्षणासाठी त्यांच्या वयोमानानुसार विश्लेषण उपलब्ध केले जाते.

	५.१) याशिवाय आपल्या लेखा परिक्षणात व्यापारी येण्याचे एकत्रित रक्कम रु. ३,०१,१३१.७९ लाख याचा तपशील /विभागणी/. खातरजमा /पडताळणी करण्यास उपलब्ध नव्हती. या व्यापारी येण्यांच्या वसुलीच्या खात्रीचे जर काही परिणाम होणार असतील तर तसेच कर्जे व त्यासाठी तरतूद याचा भा. ले. मानकानुसार केलेल्या वित्तीय विवरणपत्रकांनुसार होणाऱ्या परिणामांची निश्चिती करता येत नाही. प्रणालीत उपलब्ध माहितीतील निवडक परिक्षणाच्या आधारे आणि राज्य पारेषण केंद्र येथील देयके कक्षातून मिळालेल्या माहिती वरुन असे दिसते की बऱ्याच संस्थाकडून व्यापारी येण्याची एकूण रु. ४,३५०.४८ लाख वसुली संशयास्पद आहे पण त्यासाठी तरतूद केलेली नाही.	जरी व्यापारी येण्यांचा सर्व तपशील दिला तरी त्या शिलकी रकमा कायम असल्याची माहिती सर्व ऋणको पाठवित नाहीत. कंपनीच्या अंदाजानुसार बुडीत आणि संशयास्पद कर्जासाठी केलेली तरतूद पूरेशी आहे.
	६) भा. ले. मानके १०१ ठभा. ले. मानक अंगीकार करण्याचा प्रारंभ यातील तरतुदीप्रमाणे कंपनीने तिच्या मालमत्ता, कारखाने आणि साधने याच्या लेख्यांसाठी खर्च मॉडेल हा पर्याय निवडला. त्यानुसार मालमत्ता, कारखाने आणि साधने संक्रमण तारखेचे विद्यमान मूल्य तिच्या मालमत्तेची किंमत मानण्यात आली. त्यानंतर घसारा व्यक्तीगत हाताने केले. स्प्रेड शिट वर मांडण्यात आला. त्यासाठी मालमत्ता, कारखाने आणि साधने मधील बाकीचे उपयुक्त आयुष्य विचारात घेण्यात आले. पण त्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमनानुसार उर्वरीत मुल्य मर्यादा विचारात घेतल्या नाही. याशिवाय बऱ्याच प्रकरणात घसारा मानवी पद्धतीने जादा हिशेब करण्यात आला. आणि परिमंडळातील किंवा प्रदेशातील जागेवरील मत्तांसाठी मुख्यालयात देण्यात आला. या कारणामुळे भांडवलीकरणाच्या तारखा, महात्वाच्या सुट्या भागांचे भांडवलीकरण याची संपूर्ण माहिती विसंगत आहे. मालमत्ता, कारखाने आणि उपकरणांचे बरेच नग असून त्यांची संपूर्ण माहिती / तपशील उपलब्ध नाही. संयुक्त परिणामामुळे घसारा सदोष होऊन त्याची निश्चिती नाही. वरील सर्वसामान्य बाबी नुसार पूर्वग्रह न ठेवता लेखा परिक्षणा दरम्यान मत्ता नोंद वहीतील उपलब्ध छाननीच्या आधारे खालील विसंगती आढळल्या. ज्यांचे उपयुक्त आयुष्य पूर्णपणे संपले आहे अशा स्थिर मत्तांमधील बऱ्याच बाबींचे मूल्य रु. २९,२४०.२२ लाख (ठोक वहीतील मुल्य) संचित घसारा रु. २९,२४०.२२ लाख आणि निव्वळ वहीनोंद मूल्य रु. ७,४११.९१ लाख या बाकी नोंदवहीचा भाग आहे. त्यामुळे त्या मर्यादेत मालमत्ता, कारखाने आणि साधने यांचे जादा विवरण झाले आहे.	कंपनीने दि. ०१.०४.२०१५ रोजीच्या मालमत्ता कारखाने व साधने यांचे मानीव खर्चाचे समायोजन योग्य प्रकारे केले आहे. भा. ले. मानकातील मार्गदर्शक सूचनानुसार निव्वळ ब्लॉकची मानीव किंमत / खर्च म्हणून हिशेबात घेतली. आय सी ए आय चे अनूसूची दोन भा. ले. मानक १०१ सोबत वाचले जाते आणि त्यानुसार वि. वि. पत्रकात योग्य स्पष्टीकरणे दिली जातात. भा. ले. मानकानुसार घसारा मूळ किंमतीवर पद्धती नुसार त्या रकमेवर आकारला जातो किंवा विद्यमान खर्चावर आकारला जातो. सॅप इआरपी घसारा समान आकड्यात असला तर प्रत्येक मत्तासाठी मूळ रक्कम आणि उर्वरित मूल्य याचा १० टक्के नुसार म. वि. नि. आयोगाच्या नियमनाप्रमाणे वि वि. पत्रकात सॅप इआरपी मध्ये केला जाईल. केवळ प्रकटन करण्यासाठी तसे करण्यात येईल कंपनीला तिच्या स्थिर मत्ताचा नोंदवही आणि प्रणालीतील स्थिर मत्तांची यादी बदलता येत नाही. ज्या मालमत्तेची कार्यान्वित करण्याची तारीख एप्रिल २०१९ पूर्वीची आहे, त्यांच्या घसाराबाबत, ती मानवी गणना करणे आणि सॅप/ई आर पी प्रणालीमध्ये प्रविष्ट करणे आवश्यक आहे. हे काम पूर्णत्वाचा अहवाल उशिरा प्राप्त झाल्यामुळे आहे. तथापि/सॅप/ इआरपी प्रणालीमध्ये काम पूर्णत्वाचा अहवाल निर्मितीसाठी कार्यपध्दती तयार केली जात आहे ज्यामुळे भविष्यात मानवी घसारा नोंदी घेणे दूर होईल.

	६.१) तसेच मालमत्ता, कारखाने आणि साधने या लेखाशीर्षांत स्थगित कर दायित्वे रु. ६,८३७.२४ लाख मान्य केली आहेत. परंतु त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण लेखा परिक्षणाच्या वेळी मिळाले नव्हते. ६.२) ज्या बाबी / घटक यांच्यामुळे स्थगित कर मत्ता / दायित्त्वे यात वाढ होते, त्यांचे पुरेसे तपशील जतन केलेले नाहीत. ते नसल्याने स्थगित कर मत्ता / दायित्त्वे यांच्या मान्यता आणि प्रकटने पूर्ण आणि निर्दोषरित्या पूर्ण होत नाहीत. त्याच्या या वर्षीच्या नफा तोटा पत्रकांवरील प्रभाव निश्चित करता येत नाही.	कंपनीने वि. वि. पत्रकांसाठी भा. ले मानक १६ नुसार वस्तुमाल सूची (राखीव साधने) यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यामधे तरतूद केली. मात्र ते मानवी शक्तीने केली आहे. कारण त्यासाठी सॅप/ इ आर पी मध्ये प्रक्रीया करणेचे काम चालू आहे. याचा परिणामामुळे डी टी ए / डी टी एल उपर्जित होतो. त्याची फेरतपासणी केली जात आहे. भा. ले. मानकाच्या सल्लागारांचा सेवा घेण्यात येत आहे.
	७) स्वमालकीची जमीनीच्या उपलब्ध तपशीलाच्या छाननीनुसार असे दिसले की, भूतकाळात भाडेपट्टीच्या जमिनीचे समूहीकरण(एकत्रीकरण) करून त्या स्वमालकीची जमीनीच्या लेखाशीर्षात दाखविण्यात आल्या. त्यामुळे या जमिनीच्या कर्ज फेडीची तरतूद करण्यात आली नाही. अशा प्रकारांची माहिती / तपशील उपलब्ध नसल्याने त्याच्या भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि. पत्रकावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.	जमिनीचे करार मोठ्या संख्येने असून ते म. रा. वि. मंडळाच्या काळातील आहेत. त्यामुळे भाड्याच्या जागा आणि मालकीच्या जागा निश्चित करण्याचे काम अवघड झाले आहे मात्र क्षेत्रीय कार्यालयांनी हे काम हाती घेतले आहे.
	८) आमच्या लेखा परिक्षणात असे आढळले की, ६६ के व्ही उपकेंद्रे / पारेषणाच्या तारा याचे ठोक पुस्तकी मूल्य रु. १७,८४६.०८ लाख आहे आणि संचित घसारा दि. ३१ मार्च २०२० रोजी रु. १२,२६०.४७ लाख आहे. मात्र त्याचा कंपनीच्या कामकाजात उपयोग थांबला आहे. त्या कमी करण्यासाठीची कृती प्रलंबित आहे. यामुळे या मत्तांची लेखा वह्यात नोंदलेल्या विद्यमान मूल्यावर आम्हाला अभिप्राय देता येत नाही.	६६ केव्ही क्षमतेच्या वीज तारा आणि त्यांची उपकेंद्रे अजूनही कार्यरत आहेत. या मत्तांचे संचलन व त्यांची देखभाल करण्याचे काम महावितरण कंपनीकडे सोपविले आहे. मात्र त्यातील पद्धत निश्चित करण्याबाबत विचार चालू आहे.
	९) असे निरिक्षण आहे की, कंपनीच्या सॅप निर्मित अहवालात (कॅपेक्स रिपोर्ट - ४. ४) काही योजनांचा नकारात्मक भांडवली खर्च आकारला आहे. ही रक्कम ४,२९९.९९ लाख असून त्याविषयी मान्य होणारे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे ताळेबंदामध्ये बांधकाम चालू असलेल्या मत्ता प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे कमी विवरण झाले तसेच काही बांधकाम चालू असलेल्या मत्तामध्ये गेल्या तीन वर्षात हालचाल नाही, त्या कमी करण्यासाठी लक्षणे शोधलेली नाहीत. त्यासाठी तरतूद नाही. त्यामुळे एकत्रित वि. वि. पत्रकावर त्याचे परिणामावर मत देता येत नाही.	प्रगतीपथावरील भांडवली कामांसाठी मिळालेले ओ आर सी ठेवीच्या विरुध्द चे ली समायोजन क्षेत्रीय कार्यालयांनी केले आहे. या वर्षी मागील वर्षांचेही ही समायोजन करण्यात आले. यामुळे यावर्षाचा भांडवली खर्च य ऋणचिन्हयुक्त (निगेटीव्ह) दिसतो. जर भांडवली खर्च आरंभीच्या भांडवली शिलकीपासून समायोजित केला असता तर भांडवली खर्चाची रकमा / निरंक किंवा धनचिन्ह युक्त दिसला असता.

	१०) दि. ०१ एप्रिल २०१९ पासून भा. लेखा. मानक ११६ 'भाडेपट्टी' हे कंपनीने अंमलात आणले. कंपनीने या धोरणाचा स्वीकार सुधारित दृष्टीकोनासह केला आहे. त्यानुसार मत्ता या वापरण्याचा हक्क अशा प्रकारे मान्य केल्या आहेत. (भाड्याच्या मत्ता या ऐवजी वापरण्याच्या हक्कासह भाडेपट्टी मत्ता असे अभिप्रेत आहे). तसेच या भाडेपट्टीचे पैसे भविष्यात देताना विद्यमान मूल्य दायित्व समाविष्ट केले आहे. मात्र भाडेपट्टी संबंधीची कागदपत्रे आणि भाड्याच्या मालमत्तेचे अन्य दस्तऐवज उपलब्ध नसल्याने ज्या भाड्याच्या जागेत वापरण्याचा हक्क समाविष्ट आहे, अशांची ओळख निश्चिती करणे व त्यांना मान्यता देणे कंपनीला शक्य नाही. म्हणून भा. ले. मानक ११६ च्या तरतुदी नुसार अशा भाडेपट्टीच्या मत्तांवर कृती करता आलेली नाही. त्यामुळे त्याचा भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणारे परिणाम निश्चित नाहीत.	भा. ले. मानकाचे सल्लागार यांच्याशी चर्चा केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन/ सिडको / म. औ. वि. महामंडळ यांच्या कडून घेतलेल्या जमिनी या वापर हक्काच्या मत्ता असल्याचे दाखवायचे आहे. मात्र आय टी एफ जी मधे ठरल्याप्रमाणे यासाठी कोणत्याही दायित्व निर्माण करावयाचे नाही. यामुळे या मत्तांसंबंधात कोणतेही उपार्जित भाडे दायित्व नाही.
	११) वस्तुमाल साठ्याच्या मूल्यांकनाची सूची बाबत कंपनीचे धोरण (महापारेषणच्या महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील वस्तूमालसूची बाबतची टिपा क्र. (६)) म्हणते की अशा सूचीतील वस्तुमालाचे मुल्यांकन कमी केलेल्या किंमती नुसार किंवा वसुलीयोग्य मूल्य या प्रमाणे करावे. परंतु आमच्या लेखापरिक्षणात असे आढळले की, कंपनीकडे वसुली योग्य मूल्याची कुठलीही माहिती किंवा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे वस्तूमाल सूची मध्ये मुल्यांकन मूळ किंमत या प्रमाणे केले आहे. अशा पद्धतीचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर होणाऱ्या प्रभावाची खात्री करता येत नाही.	महापारेषणचा मुख्य उद्योग उपकेंद्रे उभारणे, व चालविणे आणि तारा टाकणे आहे. यासाठीचा माल विशिष्ट स्वरुपाचा मिळविला जातो आणि तो काही बाजारात विकण्यासाठी नसतो. महापारेषण च्या कामाच्या अनोख्या प्रकारामुळे तेथे निव्वळ वसुली योग्य मुल्य काढणे अवघड आहे. मात्र या माहिती संग्रहीत करणे आणि वसूली योग्य मूल्य निश्चित करणे यासाठी महापारेषण कंपनी काम सुरू करेल.
	११.१) कंपनीने विक्रेते/बाहयस्त्रोत संस्थांना कर्जाच्या आधारावर दिलेली सामग्री/ उपकरणे यांच्याशी संबंधित धोरण आणि कार्यपध्दती निश्चित केलेली नाही. अशा वस्तूंचे तपशील कंपनीच्या सातही विभागांकडून मागवण्यात आले होते. ते फक्त दोन झोनमधून प्राप्त झाले होते, जेथे असे आढळून आले की कर्जावर दिलेली सामग्री/ उपकरणे वाजवी कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी विक्रेते/ बाहयस्त्रोतांकडे राहिली. अशा बाबींचे संपूर्ण तपशील आणि देखरेखीचा अभाव असल्याने आम्ही एकत्रित वित्तीय विवरणावरील त्यांच्या प्रभावावर मत मांडू शकत नाही.	महापारेषणने प्रकल्प युनिट्स सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन विक्रेत्यांना प्रकल्पाच्या स्थापनेसाठी/ कार्यान्वित करण्यासाठी सुटे साहित्य पुरवतात. अधिकृत रजिस्टर्सद्वारे तपशील हस्तलिखित ठेवला जातो. अशा प्रकरणांमध्ये सर्व संबंधित अभिलेख राखून ठेवण्यासाठी आणि पडताळणीसाठी ते लेखापरीक्षकांना प्रदान करण्यासाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.
	११.२) पुढे निरिक्षणानुसार ट्रान्सफॉर्मर विभागीय कार्यालयांद्वारे पुरवठादारांकडे दुरुस्तीसाठी पाठवले जातात. ट्रान्सफॉर्मर दुरूस्तीसाठी पाठविणे, दुरूस्तीनंतर परत येणे, या दुरूस्तीची गुणवत्ता याबाबतची माहिती व्यवस्थितपणे राखली जात नाही. सर्व झोनमधील ट्रान्सफॉर्मरशी संबंधित अशा आवश्यक माहितीच्या अभावामुळे आम्ही एकत्रित वि. वि. पत्रकावरील त्यांच्या परिणामावर मत देऊ शकत नाही.	संचलन व देखभाल कार्यालयांनी ट्रान्सफॉर्मर दूरुस्तीसाठी सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन मान्यताप्राप्त विक्रेत्यांची दुरुस्तीसाठी पाठविले कार्यालयीन नोंदवहीत तपशील हस्तलिखीत ठेवला जातो. सर्व क्षेत्रिय कार्यालयाला आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत की या प्रकरणांमध्ये सर्व संबंधित तपशील सर्व संबंधित नोंदी राखून ठेवाव्यात आणि ते पडताळणीसाठी लेखापरीक्षकांना प्रदान करावेत.

	१२) वापरात नसलेल्या मत्ता विक्रीसाठी धारणा (जी एल कोड २२२०१०) यासाठी वस्तूमाल सूचीतील माहिती/तपशील /वर्ग पडताळणीसाठी उपलब्ध नव्हते. त्याची रक्कम रु. ३,५५३.२० लाख होते. या शिवाय असा मत्तांची धारणा त्यांच्या संचय मूल्यानुसार केली जाते. विद्यमान मूल्यापेक्षा कमी किंवा वसूली योग्य मूल्याऐवजी अशा मत्ता विद्यमान मूल्याने धारण केल्या आहेत. जर याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर काही परिणाम होणार असल्यास त्याची निश्चिती देता येत नाही.	महापारेषणने एक मोहिम राबविण्यासाठी पावले ऊचलली आहेत ज्यामध्ये स्थिर मालमत्ता नोंदवही अद्यायावत करण्यासाठी मालमत्तेचे प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. या कामामध्ये वापरात नसलेल्या मालमत्तेची पडताळणी/मेळ घालण्याचे काम देखील समाविष्ठ असेल . सदर कार्य पूर्ण झाल्यावर आवश्यक लेखा नोंदी केल्या जातील. सॅप/ इआरपी मध्ये उपकरणे मस्टरसह मत्ता मस्टर टॅग करण्यासाठी विकार प्रक्रियाही सूरु आहे.
	१३) वि. वर्ष २००६ -०७ मधे विशिष्ट प्रकल्पासाठी भांडवली मत्तासाठी शासकीय अनुदाने रु. २३,८५० लाख इतक्या रकमेची मिळाली होती. त्यापैकी रु. १५,४६०.६७ लाख या रकमेला महसूल म्हणून मान्यता देण्यापासून दि. ३१ मार्च २०२१ रोजी स्थगित ठेवले होते. या अनुदानाचा व त्याच्या विनिर्देशित मत्तांचा आणि त्या विषयीच्या अटी, स्थिती यांचा तपशील आम्हाला पडताळणीसाठी उपलब्ध नव्हता. म्हणून भा. ले. मानक २० व्या तरतुदीतील अटीप्रमाणे लेख्यासंबंधीचा अचूकता पूर्णत - यावर अभिप्राय देता येत नाही.	महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण क्षेत्रात उपकेंद्रे व तारा यांचा कामांसाठी शासकीय अनुदान मिळाले आहे. अनुदानाच्या आवश्यकते साठी मत्ता निहाय सूची शासनाला सादर केली आहे. ही अनुदाने शासनाकडून एकत्रितपणे मिळतात ती मत्तानिहाय मिळत नाहीत. महापारेषण मत्तांच्या किमती खर्च या मुळ अनुदानांची विभागणी करते.
	१४) सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ यानुसार नोंदणी केलेल्या पुरवठादार याच्या थकीतांचा तपशील कंपनीमध्ये गोळा व जतन करुन सादर केला जात नाही. म्हणून त्याच्या थकबाकीच्या व्याजाच्या तरतूदीची अचूकता तपासण्यात आली नाही.	ही वस्तू स्थिती वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४१ मधे प्रकटने केली आहे.
	१५) टिपा क्र. ५२ (१८) मधे कंपनीने मागील काळातील उत्पन्न व खर्च प्रकट केले आहेत. परंतु भा. ले. मानक ठलेखा धोरणे, लेखा अंदाजातील बदल व चुका' अंतर्गत बंधनकारक आवश्यकता नुसार त्याचे संबंधीत मागील वर्षात पुन्हा नमूद केले गेले / पुन्हा केले गेले नाहीत.	ही वस्तू स्थिती वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४९ मधे प्रकटने केली आहे.
	१६) केंद्रिय वीज नियामक आयोग यांच्या दि. १९ डिसेंबर २०१७ रोजीच्या आदेश आणि वि. वि. वर्ष २०१४-१५ याला लागू असणाऱ्या आदेशानुसार कंपनीने त्यावर्षी मिळालेल्या एकूण रुपये १०,७८९.४१ लाख या रकमेपैकी रु. ५९९ लाख एवढ्या रकमेला उत्पन्न म्हणून मान्यता दिली. त्यात मागील वित्तीय वर्षापर्यंत पूर्णपणे उपार्जित असे उत्पन्न म्हणून मानले गेले होते. या आदेशाचा परिणाम मागील काळात लेख्यामध्ये देणे शिल्लक आहे. यामुळे नफा व तोटा पत्रकात अधिकच कमी होईल आणि ग्राहका कडील अग्रिमे या रकमेने जास्त होईल. त्याचे परिणाम अनिश्चित असतील.	याचिका क्र.२५६/टीटी/२०१३ दिनांक १८.०५.२०१५ मधील केंद्रीय विदयुत नियामक आयोगाच्या आदेशानूसार ज्यामध्ये आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी विजदर ७७.१० कोटी (प्रति वर्ष) जे याचिका क्र. १७३/टीटी/२०१३ दि. १९.१२.२०१७ मध्ये केंद्रिय नियामक आयोगाच्या आदेशाद्वारे सूधारित करु ते आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी रु. ५.९९ कोटी (प्रतिवर्ष) केले आहे. तथापि, केंद्रिय विद्युत नियामक आयोगाच्या सुधारित आदेशा नंतरही महानिर्मितीने सप्टेंबर २०१९ पर्यंत पूर्वीच्या आदेशाच्या आधारावर अदा केले. त्यानंतर महानिर्मितीकडून कोणतीही अदा केल्याची पावती मिळाली नाही.

	१७) ग्राहकांच्या आऊटराईट करारानुसार अनामतीची रक्कम ३१ मार्च २०२१ रोजीची रु. १,१३,६३९.५७ लाख होती. कंपनी या अनामती मिळाल्यावर त्यावरच्या पर्यवेक्षण आकाराला ठेवी प्राप्त झाल्यावर उत्पन्न म्हणून मान्यता देते. पर्यवेक्षण सेवा जेव्हा जेव्हा पुरविली जाते तेव्हा या पर्यवेक्षण शुल्कास मान्यता दिली जात नाही. मात्र अशी कृती भा. ले. मानक ११५ ठग्राहकांसोबतच्या करारापासूनचा महसूल ठ यातील तरतुदीच्या विरुद्ध आहे.	भा. ले. मानक ११५ मधील पररिच्छेद ३५ नुसार कंपनीला तिचा माल किंवा सेवा याचे नियंत्रणाचे हस्तांतरण करता येते. थोड्या मुदतीसाठी असे करुन कार्यपालन बंधनाचे पालन केले जाते व त्याचा महसूल मान्य केला जाते. मात्र यासाठी खालील निकषांचे पालन झाले पाहिजे. (अ) या काळात ग्राहकाला कंपनीने लाभ मिळवून व त्याने ते उपभोगले पाहिजे (ब) कंपनीच्या कामगिरीद्वारे ग्राहकाच्या नियंत्रणातील मत्ता निर्मिती किंवा मत्ता वृद्धी झाली पाहीजे (उदा. प्रगतीपथावरील कामे) (क) कंपनीच्या कामातून पर्यायी वापराची मत्ता निर्मिती होऊ नये. काम पूर्ण झाल्यास त्याचे पैसे कंपनीला मिळाले पाहिजेत. महापारेषण वरील निकष पूर्ण करीत नाही म्हणून महसूलाला लेखा वहयातील प्राप्तीनुसार मान्यता दिली जाते. शिवाय गोळा केलेला पर्यवेक्षण शुल्क हे परत न करण्यायोग्य स्वरूपाचे आहेत म्हणून ते महसूल स्वरूप म्हणून मानले जातात.
	१७.१) महापारेषणच्या एकत्रित वि. वि. पत्रकातील लेखा धोरणांची टिपा क्र (१०) (शासकीय अनुदान) याकडे लक्ष वेधण्यात येते. यात आऊट राईट वर्क्स (ओआरसी योजना) साठी ग्राहकांकडून प्राप्त अंशदानाचे लेखा यावर माहिती आहे. आमच्या लेखा परिक्षणाच्या काळात आम्हाला सांगण्यात आले कि ओ आर सी मत्ता / दायित्त्वे आणि त्यावरील उत्पन्न याबाबत कंपनीचे विशिष्ट धोरण आहे. परंतु कंपनीने त्याचे सातत्याने अनुसरण केल्याचे आढळले नाही. त्याविषयी आवश्यक माहिती / तपशील नसल्याने त्याचा प्रभाव निश्चित करता येत नाही.	महापारेषणने ओआरसी योजनेच्या अंतर्गत प्राप्त झालेल्या रकमेच्या व्यवहारासाठी विशिष्ट धोरण आहे टीप क्र. १०. तथापि, फील्ड युनिट्समध्ये अनेक स्पष्टीकरणात्मक समस्यांचा सामना करावा लागतो, ज्यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वांसह धोरणाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. धोरणामध्ये आवश्यक सूधारणा संचलन व देखभाल विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी नंतर केल्या जातील.
	१८) अहवाल वर्षात मान्यता दिलेल्या खालील उत्पन्नाच्या बाबी विषयी माहिती/ तपशील नसल्याने त्याचा आधार, प्रमाणे आणि परिपूर्णता याविषयी निश्चितता नाही.	

जीएल	**व्यवहाराचे स्वरुप**	**त्यातील रक्कम (रु. लाखात)**	**महापारेषणकडून उत्तर**
३०००४०	ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ अर्ज शुल्क (फक्त राज्य भार प्रेषण केंद्रासाठी)	५१८.२९	असे नमूद करायचे आहे की, महापारेषणने वैधानिक लेखापरिक्षकाला पडताळणीसाठी सर्व आवश्यक तपशील उपलब्ध करून दिले आहेत. तरीही कंपनी आर्थिक वर्ष २०२१ -२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणादरम्यान आवश्यक असल्यास लेखापरिक्षकाला जी. एल. कोड काढून टाकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

३०००५१	अल्पकालीन ओपन एक्सेसच्या शुल्काबाबतच्या सामंजस्य करारामुळे प्राप्त होणारे उत्पन्न	२७.४९	आर्थिक वर्ष २०२१ -२२ च्या लेखापरिक्षणाच्या अहवालातील पात्रतेच्या यादी नूसार
३०००७०	पुनर्नियोजन शुल्क	३४२.८३	
३१००१०	कर्मचाऱ्यांचे कर्ज व अग्रिमे व्याज	१०.९४	
३१००२०	बँकेतील सुरक्षा ठेवीवरील व्याज	१९२१.५४	
३२५०१०	कर्मचारी निवासस्थानाचे भाडे	३७.१७	
३३००१०	भंगार विक्री	९४२.६१	
३३५०१०	स्थिर मालमत्तेच्या विक्रीवर नफा	६६२.६२	
३८००४०	इतर विविध पावत्या(जीएसटी करपात्र)	१३६३.६१	
३८००४१	इतर विविध पावत्या(जीएसटी नाही)	२९१.२२	
३८००६०	कंत्राटदाराकडून वसूल केलेले नुकसान भरपाई	२८७२.७	
३८०१२०	शासकीय अनुदान उत्पन्न	११६९.७६	
३८०१५१	पूर्वीचा कालावधी - इतर उत्पन्न(जीएसटीसह)	१८६.७	
३८०१४१	आंशिक ओ.ए. ग्राहकाकडून गोळा केलेले परवानाधारकांचे प्रेषण	५१६५.२४	
३८०१४३	खुला प्रवेश/एमओसी अर्ज प्रक्रियेचे शुल्क	१९५.३८	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगानुसार (ट्रान्समिशन ओपन एक्सेस कलम क्र. ५.२) जोडनिसाठीच्या अर्जासोबत डिमांड ड्राफ्ट किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने भरणा केल्याच्या पूराव्यासह खालील रक्कमेचे ना परतावा शूल्क द्यावे लागेल. नवीणीकरणीच ऊर्जा आधारित जनरेटरसाठी रुपये एक लाख द्यावे लागेल. जे ग्राहकांनी रीतसर भरले होते आणि ओपन एक्सेस/ एन ओ सी अर्ज प्रक्रिया शूल्क खात्यात वर्षभरात भरलेल्या रक्कतेच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.
३०००८०	अतिरिक्त प्रेषण आणि नियामकांकडून महसूल	-४,५५७.८६	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून मिळालेल्या निर्देशानुसार अतिरिक्त पारेषण शूल्क विरूद्ध प्राप्त झालेली रक्कम आधीच एसटीयूच्या नियमित किमान पारेषण शूल्क देयकामध्ये समायोजीत केली गेली आहे. ज्यांनी अतिरिक्त पारेषण शूल्क भरले होते. ज्यांनी अतिरिक्त पारेषण शूल्क भरले नव्हते त्याचे आर्थिक वर्ष२०२० -२१ मध्ये अवश्यक उत्पनाची उलटफेर करण्यात आली.

३७००१०	अल्प मुदतीचे पारेषण आकार	११४६.८८	अप्लकालीन ओपन एक्सेस ग्राहक शूल्क राज्य भार प्रेषण केद्राच्या बँक खात्यात जमा करतात आणि तो मूख्य कार्यालयाला परत केले जातात. अन्पकालीन ओपन एक्सेस कडून तपशील उपलब्ध झाल्यानंतरच्या तारखेना ताळमेळ घालण्यात येतो.
३०००२१	पॉवरग्रीड पारेषण शुल्कातून महसूल	२६५७.२४	
३०००१०	प्रेषण शुल्कातून महसूल एसटीयू पूल एसा	१,५२२.९२	म.वि.नि. आयोगाकडून मध्य रेल्वेला म.वि. नि. आयोगाच्या दरपत्रक आदेश क्र. ९१ वर्ष २०१६ द्वारे दरपत्रकाची मंजूरी दिली. त्यानंतर सेंट्रल रेल्वेला या मासिक बिलांसाठी बीआरबीसीएल कडून राज्य पारेषण उपक्रमाच्या पत्र क्र. ८०८९ दि. १९.०७.२०१७ द्वारे १२० मे.वॅ. वीज वाटप करण्यासाठी सेंट्रल रेल्वेला अतिरिक्त लघूदाब ओपन एक्सेस जारी करण्यात आला. दि. १८.०९.२०१८ रोजी जारी केलेल्या २०१८ च्या म.वि.नि आयोगाच्या दरपत्रक आदेश क्र. २६५ या आदेशात म.वि. नि. आयोगाने सेंट्रल रेल्वेचा भाग असल्याने सेंट्रल सेल्वेला जारी केलेल्या अतिरिक्त लघूदाब ओपन एक्सेस लक्षात घेऊन सेंट्रल रेल्वेला दर मंजूर केला . वरील एकत्रित देयके सेंट्रल रेल्वेला सूरू करण्यात आले आणि अतिरिक्त १२० मे. वॅ. साठी वेगळे देयके सेंट्रल रेल्वेसाठी थांबवले.

	१९) एकत्रित वि. वि. पत्रकांच्या आकस्मित दायित्वे आणि आकस्मित मत्ता यांच्या माहितीची टिपा ४२(क) कडे लक्ष वेधण्यात येते. सांविधिक गरजाप्रमाणे दावे करा संबंधी मागणीचे पूर्ण तपशील अचूकपणे जतन केलेला नाही. म्हणून लेखा परिक्षणाच्या अवधीत त्याची पूर्ण पडताळणी करता आलेली नाही. आम्हाला उपलब्ध केलेल्या तपशिलावर आधारित तरतूदीच्या पर्याप्तेवर आम्ही भाष्य करण्यास अक्षम आहोत.	आवश्यक नमुना सॅप/इआरपी प्रणाली मध्ये विकसीत केले गेले आहे. ज्यामध्ये सर्व तपशील पडताळणीयाठी उपलब्ध केले जातील.
	२०) महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड नावाच्या एका सहयोगी कंपनीमध्ये 'कंपनी'ची गुंतवणूक रु १,७६०.९२ लाखांची असून त्या सहयोगीची सतत होणारा तोटा लक्षात घेता या कंपनीच्या हानीबाबत योग्यरित्या चाचणी केली गेली नाही.	एमटीसीआयएल ही दळणवळणाच्या पायाभूत सूविधांच्या विकासाच्या व्यवसायात आहे. ज्यामध्ये झालेल्या उत्पनाच्या तूलनेत प्रारंभिक प्रशासकीय आणि कर्मचारी खर्च जास्त आहेत. तथापि, भविष्यातील वर्षासाठी अंदाजित रोख प्रवाह लक्षात घेता, सर्व संचित तोटा २ -३ वर्षाच्या आत भरून काढण्यात येईल. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने एमटीसीआयएल मधील गूंतवणूकीची मूल्य ऱ्हास चाचणी केलेली नाही.

	२१) कंपनी कायद्याच्या कलम १३५ नुसार आणि या अंतर्गत बनविलेल्या नियमांनुसार कंपनीने कार्पोरेट सामाजिक दायित्वाचे (सीएसआर) पालन अधिक प्रभावीपणे करण्याची गरज आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत १,३३५.०० लाख खर्च करणे अपेक्षित असताना केवळ ७००.१४ लाख खर्च करण्यात आले. अखर्चित उर्वरित रक्कम सीएसआरअंतर्गत आवश्यक असलेल्या विशिष्ट खात्यात खूप उशीराने हस्तांतरित करण्यात आले.	कंपनीने समाजिक जबाबदारी समितीने मंजूर केलेल्या विविध योजना हाती घेते आणि योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातात. कपंनीच्या सामाजिक जबाबदारी नियमानूसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीद्वारे उघडलेल्या निर्दिष्ट बँक खात्यात न खर्च केलेली रक्कम योग्य रित्या हस्तांतरित केली जाते.
	२२) खालील जीएल हेड्स/ कोड्स यातील नमूद केलेल्या आणि मान्यता दिलेल्या रकमा (वौधानिक देय खात्यांव्यतिरिक्त १ लाख रुपयांपेक्षा जास्त) यांचे पुष्टीकरण करणे आणि मेळ करण्याच्या अधीन आहेत. खालील बाबींची आवश्यक माहिती/ तपशील आमच्या लेखा परिक्षणाच्या पडताळणीसाठी उपलब्ध नव्हता.	

जीएल	लेखा शीर्षकाचे नाव	२०२०-२१ (रु. लाखात) मत्ता/खर्च (दायित्त्व /उत्पन्न)	महापारेषणचे उत्तर
१०००५०	भांडवली मत्तांच्या खर्चासाठी अनुदाने	-१५,४६०.६७	महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागात उपकेंद्रे आणि लाईन बांधण्यासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होते. अनुदानाच्या अवश्यकतेसाठी मालमत्ता निहाय यादी राज्य शासनाकडे सादर केली होती. या मालमत्तेसाठी अनुदान राज्य शासनाकडून एकरकमी दिले जातात आणि मालमत्तेनुसार नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने मालमत्तेच्या खर्चावर आधारित अनुदानाचे विभाजन केले.
१०००५४	महानिर्मितीला अनुदान	-६१७.४८	हरित ऊर्जा कॉरिडोर अंतर्गत ११ ठिकाणी नवीकरणीय ऊर्जा व्यवस्थापक केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने पीजीसीआयएलला नीधी दिली आहे. महाराष्ट्र प्रदेशासाठी स्थापना चाचणी आणि कार्यन्वित केल्यावर ते संचलन आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडे सूपूर्द केले जाते.
१०१०७०	एलडीसीडी निधीसाठी राखीव	-६,९४१.५६	आर्थिक विवरण पत्रकामधील टीपा क्र. १३(क) पहावी.
१२२०१०	स्थगित कर दायित्व	-२,५९,४९९.३६	महावितरण कंपनीने लेखापरिक्षकाला पडताळणीसाठी सर्व आवश्यक तपशील उपलब्ध करून दिले होते, तरीही आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला कंपनी अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.

१२३०३०	सुरक्षा अनामती	-६,५२७.५५	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्य स्थितीवर आधारित ताळमेळ करण्यात येईल.
१२३०४०	जॉब्स/कामे यांच्या सुरक्षा अनामती	-११,१२८.७२	
१२३०५०	विक्रेत्याकडून बयाणा ठेव	-१,१३०.२४	
१२३०६०	पुरवठादारांची राखून ठेवलेली रक्कम	-७७,७२०.३४	
१२३०६१	जोखीम आणि खर्च समायोजन	-३,२८५.६४	
१२३०७०	पुरवठादाराकडून संकीर्ण ठेवी	-२१.२०	
१२३०९०	ग्राहकांकडून अग्रिमे	-९७.९२	
१२३१००	ग्राहकांकडून इतर अनामती - ओ. आर.सी.अनामती	-१,१३,६३९.५७	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखा परिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तराही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१ -२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
१२३११०	ठेवून घेतलेली जी. एल. विक्रेत्याकडून रोकडता आकारासाठी	-१२,९४५.७८	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्य स्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
१३००१०	जी आर/आयआर क्लिअरिंग अकाऊंट	-५,९२३.५२	
१३००२०	इ एम डी डमी एंट्री	-११७.१६	
१३१०१०	किरकोळ पतदारांना देय - देशाअंतर्गत (व्यतिरिक्त)	-२३,२०८.९०	
१३३०१०	किरकोळ पतदार – आंतर कंपनी	-४,१२१.१९	
१३४०१०	किरकोळ पतदार –कर्मचारी	-३६.८१	
१४००६०	कर्मचाऱ्यांकडून संकीर्ण ठेवी	-३५.८९	
१४०१७०	क्रेडिट सोसायटी	-३३.९८	
१४०२५०	मेडीक्लेम टॉप अप प्रिमियम	-७.५७	
१४०२५१	मेडीक्लेम सक्तीचा हप्ता – वेतनातून	२.१३	
१४०२५२	कर्मचारी अपघात विमा	१.४८	
१४०२७०	मेडीक्लेम प्रिमियम - निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी	-०.२०	
१४१०४०	मराविम -भ.नि.नि. - नियोजन मत्तांच्या रास्त मूल्यातील तूट	-३,५९३.९२	भविष्य निर्वाह निधी विश्वस्ताने सादर केलेल्या मुल्यांकन अहवालाच्या आधारे भविष्य निर्वाह निधी विश्वास्तच्या गुंतवणूक मुल्यांतील त्रूटीचे दायित्वाची नोंद महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी घेते.
१४२०१०	आयकरासाठी तरतूद	-३,१६,४३१.०३	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
१४३०३०	टीडीएस कंत्राटदारांना देय १९४ सी	-४७.९८	
१४३०३१	ओएसएल तरतूदीवर देय टीडीएस	-२६.४७	

१४४०१०	राज्य विक्री कर देय	०.०६	
१४६०१०	कामगार उपकरातील कपात	-२४.४५	
१५००१०	भांडवली कामासाठी तरतूद	-११,९३९.८६	
१५००११	जीआर/आयआरच्या टीडीएससाठी तरतूद	०.८१	
१५००३०	खर्चासाठी तरतूद – इतर	-१,६४४.१६	
१५००४०	खर्चासाठी तरतूद – कर्मचारी	-३,८९३.०३	
१५००५०	वेतन सुधारणेसाठी तरतूद	-६,८४७.५१	
१५००७०	चौकशी प्रलंबित असलेल्या नुकसानीची तरतूद	-७२२.६५	
१५०११०	कंपनीची सामाजिक जबाबदारी यासाठी तरतूद	-८,१३८.०१	कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३५ (कंपनीची सामाजिक जबाबदारी) मध्ये नमूद योजने प्रमाणे कंपनीचा सामाजिक जबाबदारी निधीची तरतूद केली आहे.
१५०१३०	सेवा विलंबाच्या व्याजासाठी तरतूद	-२६४.४३	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
१५०१४०	वृक्ष/पीके/जमीन यांच्या नुकसान भरपाईसाठी तरतूद	-१,६२६.५४	
१६००१०	मंडळासह कर्मचारी कल्याण निधीचे दायित्व	-६१४.०१	
१६००२०	भ.नि.निधीचे विश्वस्तमंडळ आणि अंतिम समझोते	-२,३६१.८३	
१६००३०	मराविमं कर्मचारी वारस कल्याण ट्रस्ट खाते	-६.४९	
१६५०१०	जुने - धनादेश	-३१९.०३	
१७००१०	त्रयस्थ पक्ष देण्यांसाठी दायित्व	-२०,११६.००	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१ -२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
२०५०३०	सबस्टेशन – व्होल्ट ई १०० के व्ही(१०० के व्ही)	३३,४४०.२२	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२०९६७०	एसएलडीसी हॉर्डवेअर	४२४.६७	हरित ऊर्जा कॉरिडोर अंतर्गत ११ ठिकाणी नवीकरणीय ऊर्जा व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने पीजीसीआयएलला निधी दिला आहे. महाराष्ट्र प्रदेशासाठी स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित केल्यावर मालमत्ता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडे सूपूर्द केले जातील.

२०९६८०	एसएलीडीसी टेलिकॉम उपकरणं	५१.२५	
२०९६९०	एसएलडीसी सुटे भाग	४४.७५	
२१९७०१	ए सी सी घसारा वापरात नसलेल्या	-१०,९१३.७०	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी क्षेत्रिय यूनिटसमधिल मालमत्ता मास्टर तपशीलांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा मानस आहे. हे वापरात नसलेल्या मालमत्तेशी संबंधित तपशीलाची देखील काळजी घेईल.
२२२०१०	मत्ता - वापरात नसलेल्या	१४,४६६.९०	
२२३०३०	मंजुरी नसलेल्या सर्वेक्षण/अभ्यास यांच्यासाठी खर्चाची तरतूद	२९६.२५	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२२३०४०	मंजुरी नसलेल्या योजनांच्या कार्यपूर्व जमिनी संपादनाचा खर्च	४९६.२९	
२३००५०	भाड्याच्या जमिनीच्या विकास एयुसी खर्च व व्होल्ट जी १	२७१.५८	
२३००६०	एयुसी भाड्याच्या जमिनीच्या विकास खर्च व व्होल्ट एच २	२४२.९६	
२३२०१०	एयुसी इतर इमारती कार्यालये, निवास, प्रशिक्षण केंद्रे	८९१.४१	
२३७०१०	एयुसी इतर	२४,०९७.४८	
२३७०२०	एयुसी एल ई	५,५८०.४५	
२३७०३०	एयुसी ओ र सी	८,२०६.९९	
२३७०४०	एयुसी सॉफ्टवेअऱ विकास	३२६.०५	
२३७०६०	प्रगतीपथावरील भांडवली कामे(शासकीय अनुदानाचे परिणाम)	२,३१८.८७	
२३७०६१	प्रगतीपथावरील भांडवली कामे(वस्तू मालाचे परिणाम)	३,४९५.६१	
२४०१००	बँकेत मुदत ठेव	४०,११२.११	
२४०३००	एफडीआर एलडीसीडी फंडस - बँक	५,२६५.१५	
२५००४०	मीटर आणि सबस्टेशन साहित्य	७,९५९.५८	
२५००९०	इतर	१,९५२.४७	
२५०११०	पीपीईसाठी वस्तूमालसूची(भा.ले. प्रभाव)	-२,८९०.९४	भारतीय लेखा मानके धोरणानुसार मानवी काम केल्यामुळे याचा परिणाम होतो. त्याच्या अचूक हिशोबासाठी सॅप/इआरपी मध्ये आवश्यक विकास प्रक्रिया चालू आहे.
२५०१११	प्रगतीपथावरील भांडवली कामांची वस्तूमालसूची (भा.ले.मा.समायोजन)	-३,४९५.६१	
२५५०१०	चौकशी प्रलंबित असलेले साहित्य	०.४७	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२५५०२०	चौकशी प्रलंबित असल्याने साहित्याचे नुकसान	२००.११	
२५५०४०	एम. ए. एस. ए.स्टॉक(वस्तूमालाची प्रत्यक्ष पडताळणी)	-११४.३४	

२५६०१०	निकामी साहित्याचा साठा(भंगारासह)	५२२.०७	
२६००१०	एस टी यु किरकोळ ऋणको -पारेषण शुल्क	३.५१	
२६००११	किरकोळ ऋणको – पारेषण आकार	२,०३,२५७.८२	वितरण परवाना धारकांशी त्याच्या सद्य स्थितीवर आधारीत ताळमेळ घालवण्यात येईल.
२६००३१	किरकोळ ऋणको -एसटीयूएसएल डीसी	५०८.५४	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२६००४०	एस टी यु किरकोळ ऋणको इतर	९१,०४७.६७	
२६००५०	टीडीएस येणी प्रमाणपत्र	१०.०८	
२६००६०	किरकोळ ऋणको आंतर युनिट लेखे	२,०७७.९०	
२६००८०	टीडीएस येणी - एमटीसी	२०,४८६.१५	
२८५०३९	वितरण मुंबई ८०० ऐरोली नवी मुंबई - एसएलडीसी कळवा	२४.३६	
२८५२५१	बँक ऑफ इंडिया एलडीसीडी फंड ऑपरेशन	०.१८	
२८५३१०	त्रयस्थ संस्थांच्या दायित्व देण्यासाठी चालू खाते	२०,११६.००	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
२९००१०	कंत्राटदार/पुरवठादार - यांना अग्रिमे ओ अँड एम	१,७४४.७६	
२९००२०	प्रकल्पाची भांडवली अग्रिमे	५४१.२९	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२९२०५०	कर्मचाऱ्यांना कर्जे व अग्रिमे -संगणक अग्रिमे	११०.६९	
२९२०६०	आंतरराष्ट्रीय मोफत प्रवासासाठी भत्ता - कर्मचाऱ्यांना कर्जे व अग्रिम	९.००	
२९२१२०	कर्मचाऱ्यांना उपदानाचा अग्रिम	७.७९	
२९३०१०	आयकर अग्रिम	२,२२,८५२.७३	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१ -२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
२९३०११	टीडीएस प्राप्त प्रमाणपत्र	१६०.०९	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२९३०१३	टिडीएस देय २०६सी (१एच)	-०.२३	
२९३०१४	टीडीएस येणी १९४०	४.९९	

२९३०४०	स्त्रोतांवर आयकर कपात - इतर पावती	६२,८६५.४६	
२९३०५०	संकीर्ण कर्ज आणि अग्रीमे	६.५०	
२९३०६०	स्वय निर्धारित कर - आयकर	२५,१०८.३६	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
२९४०१०	गुंतवणुक निधीवर उपार्जित व देय उत्पन्न	३४५.४९	क्षेत्रिय कार्यालयाच्या यूनिटच्या सद्यस्थितीवर आधारित ताळमेळ घातले जातील.
२९४०३०	कर्मचारी कर्जाचे उपार्जित पण देय नसलेले व्याज इ.	३१.९१	
२९५०१०	कर्मचाऱ्यांकडील वसुली योग्य रक्कम	६३.६४	
२९५०३०	आय टी आयला दिलेले प्रशिक्षण शूल्क – वसुली योग्य	-५.९०	
२९६०३०	राज्य वीज मंडळ, शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांच्याकडून प्राप्त संकीर्ण रकमा	३९९.६६	
२९६०५०	पुरवठादारांकडील अपेक्षित वसुली	११३.५३	
२९६०६०	कंत्राटदारकडील अपेक्षित वसुली	१५४.३४	
२९६०६१	संशयास्पद समजलेली येणी	११,६१३.५९	
२९६०७०	आगाऊ खर्च	४८८.२४	
२९७०१०	दुरध्वनी प्राधिकरणांकडे ठेव	१९.७८	
२९७०२०	इतर जमा	५,५३६.०५	
४०००१०	दुरुस्ती आणि देखभाल (सर्व पारेषण)	३३,२४०.५५	
४०००५०	साहित्य वापर - प्रकल्प	-१९,८३९.४६	
४१००५०	बोनस/अंशदान	१,१५८.४२	
४२४०१०	महापारेषणचे योगदान – कर्मचारी भविष्य निधिसाठी	७,९९९.५४	
४३००३०	दर आणि कर	१,४९५.५६	
४३०१००	माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार विषयक खर्च	६७५.०१	
४३०१५२	शिकाऊ उमेदवारांचे वेतन	२५७.५१	
४४६०१०	किरकोळ डेबिट निर्लेखित शिल्लक	९.२८	
४५३०१०	निर्लेखित अमूर्त मत्ता	१९२.६६	

४७४०१०	आयकर तरतूद	४९,२०४.६५	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
४७४०३०	स्थगित कर तरतूद	१२,२७२.६०	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
४७४०३१	इतर सर्वकष उत्पन्नावरील आयकर	१०८.५९	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पडताळणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकाला सर्व आवश्यक तपशील उपलब्ध केले. तरीही कंपनी आवश्यक असल्यास आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षकाला अतिरिक्त तपशील उपलब्ध करून देईल.
वरील लेखाशीर्षात राहिलेल्या जुन्या थकीत शिलकी संबंधी मेळ, समायोजना आणि समझोते केले आणि त्यातून प्राप्ती व बाकी वसुली न झाल्यामुळे किंवा अपुरी झाल्यामुळे किंवा निर्लेखित केल्यामुळे काही लाभ / तोटे झाले तर त्यांची निश्चिती करता येत नाही. या शिवाय चालू किंवा चालू नसलेले लेखाशीर्ष अंतर्गत आवश्यक मत्ता / दायित्त्व यांचे विभाजन यांची आवश्यक माहिती / तपशील नसल्यामुळे अचूक पडताळणी करता येत नाही.			

महावितरण या उपकंपनी विषयी	
आम्ही येथे खालील परिच्छेद १ ते १२ मध्ये वर्णन केलेल्या बाबींकडे लक्ष वेधतो. या बाबींचे (सांख्यिकीकरण केलेल्या किंवा अन्य) स्वतंत्र किंवा सामुहिकरीत्या वि.वि. पत्रकावर होणाऱ्या परिणामांची काही प्रकरणात ओळख निश्चित झालेली नाही. कारण योग्य व पुरेसे लेखापरीक्षण पुरावे नव्हते.	
१. मालमत्ता, कारखाने आणि साधने - घसारा आणि कमी करणे अ) पत्रकाची टिपा ५४ (४) वि.वि. एकत्रित यात नमूद केले आहे कि, उपरोक्त मालमत्ता कारखाने आणि साधने भांडवलीकरण आणि काम पूर्ण केल्याचे अहवाल यांच्या तारखेसंबंधीची सर्वकष माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे यातील भांडवलीकरण न होणे आणि / किंवा विलंबाने करणे अशा काही घटना घडल्या (हे भा. ले. मानक १६ च्या आवश्यकते नुसार नाही)	काही प्रकरणात भांडवलीकरण करण्यास उशिर झाला. आता कार्य पूर्णतेचा अहवाल आणि मत्ता निर्मिती प्रक्रीया यांचे स्वयंचलन करण्यात येते आणि ही प्रक्रिया यावर्षी सुलभ करण्यात आली. त्यास काम पूर्ण झाल्याचा अहवाल निर्माण केल्या बरोबर लगेच मत्तांचा लेखा करण्यात येतो.

त्यामुळे भांडवलीकरण न होणे / विलंब होणे आणि त्यामुळे घसारा व त्याचे परिणाम यांचे सांखिकिकरण उपलब्ध नव्हते. म्हणून लेखापरिक्षण वर्षामध्ये त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणारे परिणामाचे सांख्यिकीकरण केलेले नाही.	तांत्रिक काम पूर्णतेच्या अहवाल संयुक्त मोजणी प्रमाणात मंजूर झाल्यावर स्वयचलित रित्या त्याची निर्मिती होते त्या आधारे वित्तीय कार्य पूर्ती अहवाल, कर्मचारी प्रशासन व व्याज खर्च यांच्या माहितीचे स्वयंचलीत रित्या निर्मिती होते आणि त्याची आकारणी वित्तीय लेजर मध्ये होते. मात्र यापुढे भांडवलीकरण करण्यास विलंब लागणार नाही. प्रलंबित भांडवलीकरणाकडे मुख्यालय स्तरावरुन निरिक्षण केले जाते. त्यासाठी विविध सॅप इतिवृत्ते विचारात घेऊन क्षेत्रिय कार्यालयांना सुचना दिल्या जातात. तसेच, मत्तांचे काम पूर्णतेच्या तारखा मत्तांच्या भांडवलीकरणापूर्वी असल्यावर मधल्या काळात घसाऱ्याची तरतूद व्यक्तीश - केली जाते.
ब) या वर्षात सूत्रधारी कंपनीने कर्ज खर्च रु. १०९७.४५ लाख (२०१९ -२० ला रु. २३९.०७ लाख, २०१८ -१९ ला रु. ७५५.६३ लाख) एवढ्या रकमेचे मालमत्ता, कारखाने व साधने यांचे भांडवलीकरण केले. भांडवलीकरण करताना पात्र मत्तांची ओळख निश्चिती केली नाही. सर्वसाधारण आणि विशिष्ट कर्ज यांच्या व्याजाचे वितरण ज्यात प्रकल्पांत खंड झाला त्यांचा व प्रगती पथावरील भांडवली कार्य (सीडब्लूआयपी) यांच्या आरंभीच्या खर्चाचा विचार केला नाही. तसेच एकूण प्रकल्प खर्चाचा ठोक तत्वावर विचार केला त्यातून शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अंशदान वजा केले नाही.	या संबंधीचे लेखा धोरण महत्त्वाची लेखा धोरणे याविषयीची टिपा क्र. २ च्या मुद्दा क्र. ८ (ब) येथे प्रकट केली आहे. त्यानुसार पात्र मत्ता प्राप्त करण्याच्या कालावधीतील बांधकाम खर्चाचे व्याजाचे भांडवलीकरण त्यावर्षीच्या प्रगतीपथावरील कामात यात भर घालून केले जाते ते कर्जाच्या सरासरी व्याजावर आधारित असते.
याशिवाय,सूत्रधारी कंपनीने कर्मचारी खर्च आणि कार्यालयीन खर्च रु. ३९,३७४.१९ लाख (२०१९ -२०२० रोजी रु. ४३,१५८.७४ लाख,२०१८ -२०१९ रोजी ४८,३०९.१२ लाख). वरील खर्च प्रगतीपथावरील भांडवली खर्चाच्या वर १५ टक्के आहे. (मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या लेखा धोरणे यांची टिपा क्र. ३० व ३२ (८) पहावी) मात्र सुत्रधारी कंपनीत या खर्चाची ओळख स्पष्टपणे निश्चित करण्याचे आणि त्याची भांडवली प्रगती पथावरील काम/मालमत्ता, कारखाने आणि साधने मधे भर घालण्याची पद्धती नाही. अशा खर्चाचे भांडवलीकरण करताना व्यत्यय आलेले प्रकल्प, भांडवली प्रगती पथावरील कामे यांची आरंभीची शिल्लक तसेच ठोक तत्वावरील प्रकल्प खर्चातील शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अनुदाने वजा केलेले नाही.	कंपनीने, व्याजाच्या भांडवलीकरणासाठी हे धोरण सातत्याने अनुसरले आहे. कर्ज खर्च(भांडवलीकरणासाठी वापरलेल्या कर्जाचे व्याज) याचे भांडवलीकरण पात्र मत्तांची ओळख निश्चिती केल्यावर होते. कर्ज खर्चाचे खालील भांडवलीकरण होते. १) योजना/कामे भांडवली स्वरुपाचे असावे. २) अशा योजना/कामे मंजूर झालेली असावीत. ३) अशी कामे/योजना पूर्ण होण्याचा कालावधी कामाच्या आदेशानुसार १२ किंवा अधिक महिने असावा. महावितरण मध्ये भांडवलीकरण व संचालन व सुव्यवस्था कामे यासाठी स्वतंत्र शाखा नाहीत क्षेत्रीय आणि मुख्यालय स्तरावर दोन्ही कामे उपलब्ध खात्यातर्फे/कर्मचाऱ्यांकडून केली जातात.

कर्ज खर्चाबाबत भाले मानके २३ आणि मालमत्ता, कारखाने व साधने यांच्याबाबतचे भालेमानके १६ हे एकत्रितरीत्या लक्षात घेऊन विचार केल्यास अशा प्रकारचे व्याज,कर्मचारी खर्च,आणि कार्यालयाचे व प्रशासन खर्च यांचे भांडवलीकरण हे या मानकांच्या आवश्यकतेनुसार झालेले नाही. ह्याबाबत पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षणाचे पुरावे उपलब्ध नसल्याने उपरोक्त भांडवलीकरणाच्या रकमांच्या अचूकते विषयी आम्हाला अभिप्राय देता येत नाही.	म्हणून या कंपनीने अशा मत्ता आणि जागा यांना जबाबदार असणारे कर्मचारी, प्रशासकीय आणि सामान्य खर्च यांची ओळख निश्चिती करण्यासाठी चे काम तपशीलवारपणे केले. आणि व्यवस्थापनाच्या उद्येशाप्रमाणे आवश्यक स्थिती निर्माण करुन ती समर्थ केली. वि. वर्ष २०१५-१६ आणि २०१६-१७ च्या माहिती आधारे ते करण्यात आले.
तसेच मागील सर्व वर्षापासून याच पद्धतीने कर्मचारी खर्च, कार्यालय खर्च आणि कर्ज खर्च यांचे भांडवलीकरण केले आहे. यामुळे स्थिर मत्तांचे भांडवलीकरणाच्या रकमांच्या प्रमाणात जादा विवरण झाले आहे, तसेच अधिक घसारा आकारण्यात आला. याच्या परिणामांचा अंदाज व सांख्यिकीकरण करता येत नाही.	हे काम पूर्ण केल्यावर वि. वर्ष २०१५-१६ मध्ये ज्याचे भांडवलीकरण केले पाहिजे असा कर्मचारींचा, प्रशासकीय व इतर खर्च १३.६६ टक्के होता. तर वर्ष २०१६-१७ मध्ये तो १५.३६ टक्के होता. त्याचे सर्वसामान्यीकरण १५ टक्के करण्यात आले. अशा प्रकारे १५ टक्के दराने भांडवलीकरण करण्याचे धोरण २०१९-२० मध्ये अनुसरले. कर्मचारी/खर्च व प्रशासन यांचे खर्चाचे भांडवलीकरण प्रगतीपथावरील भांडवली कामाच्या आरंभीच्या शिल्लकीनुसार केले नाही. कारण ते त्याला लागू नव्हते. या वर्षातील प्रगतीपथावरील भांडवली कामे यात कर्मचारी खर्च व कार्यलय, प्रशासन खर्च यांची भर घालून त्यांचे भांडवलीकरण केले. ज्यांचे काम खंडित झाले, त्या प्रकल्पाच्या खर्चाचे भांडवलीकरण केलेले नाही. प्रकल्पाची माहिती सॅपमध्ये मास्टर डेटा म्हणून नोंदली आहे. त्यामध्ये प्रकल्पाचा निधीचे प्रकार म्हणजे अनुदान/ग्राहकांचे अंशदान, कर्जे, अंतर्गत स्त्रोत, इ. चे अद्यावतीकरण केले आहे. अशा प्रकारे ज्या प्रकरणाचा खर्च फक्त कर्जातून केला जातो, (अनुदानातुन किंवा ग्राहकांच्या अंशदानातून नव्हे) त्या कर्ज खर्चाचेच फक्त भांडवलीकरण केले जाते. अशा प्रकारे कंपनीने प्रगतीपथावरील भांडवली कामाचे वरील खर्च निश्चित केले. स्थिर मत्ता मिळविण्याचे खर्च निश्चित केले. त्यामुळे त्याचे जादा विवरण चालू किंवा मागील वित्तीय वर्षात झाले नाही.
क) व्यवस्थापनाने सूत्रधारी कंपनीची मालमत्ता, कारखाने व साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी या पडताळणीचे जर काही संभाव्य परिणाम एकत्रित वि. वि. पत्रकात होणार असतील तर त्याचा अंदाज करता येत नाही.	कंपनीने तिच्या स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे धोरण २०१७-१८ मध्ये तयार केले. त्यामध्ये २०१८-१९ या वर्षी सुधारणा केल्या.

	या कार्यपद्धतीनुसार कोणताही प्रकल्प/काम पूर्ण झाल्यावर त्याची संयुक्त मोजणी प्रमाणित केली जाते. पडताळणीनंतर प्रत्येक मत्ता निर्माण झाली असे मानून तिचा नोंदवहीत लेखा करण्यात येतो. तसेच नामवंत तिसरा पक्ष (जसे विज वित्त महामंडळ, ग्रा. वि. महामंडळ इ.) संस्थेकडून निरिक्षण करुन घेतले जाते. जर काही समस्या उद्भवली तर (उदा. पूरवठा खंड) वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी तात्काळ कृती केली जाते आणि कोणतीही मत्ता दीर्घकाळ दुर्लक्षित राहत नाही. ग्राहकांना ७ दिवसात २४ तास वीज पुरवठा दिला जातो (वीज खंडीत होण्याचे काही थोडे अपवाद वगळता यावरुन वितरण जाळे मजबूत असल्याचे दिसून येते. म्हणजेच कंपनीची पायाभूत रचाना कायम उपयोगात असते. कामाचे स्वरुप ७ दिवसात २४ तास वीज पुरवठा करणे हे महत्त्वाचे आहे. नव्या स्थिर मत्तांचे कार्यान्वयाचे तिसऱ्या पक्षाकडून केले आहे. वीज जाळ्यातील कारखाने, यंत्रसामग्री, तारा आदि मत्ता व संपर्क यंत्रणा यांची प्रत्यक्ष पडताळणी नियमीतपणे केली जाते.
ड) प्रगतीपथावरील भांडवली कामे यात प्रकल्पातील वस्तूमाल साठ्याची रक्कम रु. ३,११,३०५.१८ लाख (२०१९-२०२० रोजी रु. ३,३३,२१५.३९ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. १७९,७९४.८९ लाख) समाविष्ट आहे. यावर्षी यात किती स्थानांतर झाले आणि ३१ मार्च २०२१ रोजीची विविध प्रकल्पाची स्थिती यांचे तपशील उपलब्ध केले नाहीत. एकत्रित वि. वि. नसल्याने त्यांचे पत्रकांवरील संभाव्य परिणामावर मत देता येत नाही.	प्रगतीपथावरील कामे - प्रकल्प येथील मालसाठ्याची डबल्यु बी एस. निहाय आणि मंडल निहाय तपशीलानुसार रु. ३,३३,२१५.३९ लाख दर्शविले आहेत. त्यात वर्षानुसार आरंभीची शिल्लक, वर्षा दरम्यान वगळलेले माल, आणि अखेरची शिल्लक आदि तपशील दिले आहेत. प्रत्येक डब्ल्यु बी एस मध्ये हजारो प्रकारचे साहित्य असते. त्यात प्रत्येक वस्तूनिहाय स्थलांतर/देणे, सॅप प्रणालीत सहज उपलब्ध नसते म्हणून ती माहिती देता येत नाही. तसेच वर्षाच्या अखेरीस प्रकल्पाची स्थिती सहज उपलब्ध नाही.
इ) टिपा क्र ५२(९) यात निर्धारित केल्याप्रमाणे, सूत्रधारी कंपनीने तिच्या मत्तांचा आढावा त्यांच्या आर्थिक कामगिरी नुसार केलेला आहे. मात्र त्या मत्ता कमी केलेल्या असल्या तर किंवा त्यांचे कामाचे खात्रीशिर तपशीलवार मूल्यांकन/गणना उपलब्ध नव्हते असे मुल्यांकन/कामाचा अहवाल नसल्याने जर काही या मत्ता कमी करण्याचे परिणाम झाले असले तर भा. ले. मानके ३६ मालमत्ता कमी करणे यातील आवश्यकतांवर आम्ही मत प्रदर्शन करु शकत नाही.	कंपनीच्या मत्तांचा अंतर्गत मार्गाने आढावा घेऊन देखभाल नियमितपणे केली जाते. आणि माहिती मिळविण्यात येते. यामुळे कंपनीचे असे मत आहे की, तिच्या सर्व मत्तांची कामगिरी प्रमाणशिर व योग्य आहे. त्यामुळे ताळेबंदाच्या तारखेला कुठलीही मत्ता कमी करण्याजोगी नव्हती.

२ भाडेपट्टी - अ) टिपा क्र. ४३ (डी) (२) यात सांगितल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीने भाडेपट्टी मत्ता (मत्ता वापराचा अधिकार) आणि भाडेपट्टी दायित्वाला मान्यता देताना भाड्याचे देणे रु. १० लाखपेक्षा प्रतिमाह रक्कमेचे भाडे विचारात घेतले आहे. ही कृती भा. ल. मानक ११६ भाडेपट्टी यात विनिर्देशित केलेल्या मान्यतेच्या निकषांशी सुसंगत नाही. याशिवाय संपूर्ण तपशिल नसल्याने, त्याचे एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.	भा. ले. मानक १ विवरण पत्रे सादर करणे - यामध्ये असे नमूद केले आहे की, वि. वि. पत्रात ज्या चूक भूल झाल्या असतील आणि जर त्याचा व्यक्तिगत किंवा सामाईक रित्या त्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आर्थिक निर्णयावर होत असल्यास त्यास मोठी गैरविवरणे समजावे. कंपनीने काही भाड्यांच्या मत्तांच्या वापर हक्क याला मान्यता दिली आणि ज्या दायित्वाचे पूर्वी केलेले वर्गीकरण प्रवर्तनाची भाडी (रु. ११ लाख रकमेच्या भाड्याचा जागेचा अपवाद केला आहे. कारण जेथे भाडे रु. १० लाख प्रती महा होते अशाच खर्चाना वर्ष २०२०-२१ मध्ये मान्यता होती) असे केले होते. त्यांना कंपनीने मान्यता दिली. म्हणून हे प्रकरण मोठे नसल्याने कंपनीने ज्याची भाडी रु. १० लाख दरमहा यापेक्षा कमी होते त्यांना मान्यतेतून (वापर हक्काच्या मत्ता) यातून वगळले.
ब) पुरेसे आवश्यक तपशील उपलब्ध नसल्याने भा. ले. मानक ११६ च्या गरजांप्रमाणे प्रकटने केलेली नाहीत.	भा. ले. मानक - ११६ - यानुसार भाडेपट्टीचा योग्य तपशील मिळविण्यात येईल.
३. कारखान्यातील वस्तूमाल साठ्याव्यतिरिक्त वस्तूमालसाठा - सूत्रधारी कंपनीने विविध ठिकाणी वस्तूमालसाठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केली आहे. सूत्रधारी कंपनीने स्लो मूव्हिंग/नॉन-मूव्हिंग स्टॉक/अप्रचलित साठ्यासाठी प्रत्यक्ष पडताळणी अहवालावर आधारित ४,९२६.३१ लाख रु. ची तरतूद केली आहे. (आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये रु. २४४४.७९ लाख, आर्थिक वर्ष २०१८-१९ रु. २५९०.२२ लाख) स्लो मूव्हिंग/नॉन -मूव्हिंग/अप्रचलित साठ्याच्या तपशीलावर माहितीचा आणि व्यवस्थेच्या वयोमानाच्या अहवालाशी योग्य प्रकारे मेळ घातला नसल्याने आर्थिक तरतुदीच्या पर्याप्ततेवर आम्ही भाष्य करण्यास अक्षम आहोत.	वि.वर्ष २०२०-२१ मध्ये अंतर्गत लेखापरिक्षकांनी दिलेल्या व्यक्तीगत पडताळणी अहवालाच्या आधारे स्लो मूव्हिंग/ नॉन मूव्हिंग /प्रचलित मालसूचीची तरतूद करण्यात आली आहे.
४. व्यापारी येण्यातील अपेक्षित पत हानी टिपा क्र. (५२) (५) (ii) (i) (अ) यात नमुद केल्या प्रमाणे सूत्रधारी कंपनीने भा. ले. मानक १०९ वित्तीय विलेख यामध्ये अपेक्षित पत हानीबाबत तरतूद केलेली आहे. या प्रकरणी खालील मुद्यावर लक्ष वेधण्यात येते. अ) स्पॅनको नागपूर डिस्कॉम लिमिटेड वितरण फ्रॅंचायझी संदर्भ टिपा क्र. ५२ (८) (ब) कडून प्राप्त होणाऱ्या रु. १६,२९४.१६ लाख (२०१९-२० मध्ये रु. १३१२७.७१ लाख २०१८-१९ मध्ये रु. ११९५२.४१) साठी रुपयाच्या संपूर्ण रकमेची तरतूद करण्याऐवजी सूत्रधारी कंपनीने रु. ६५१.७७ लाखची (व्यापारी येणीवर सामान्य दराने गणना) अपेक्षित पत हानीसाठी तरतूद केली. २०१९-२० मध्ये रु. १७४.६०) (२०१८-१९ मध्ये रु. निरंक)	कंपनीने एसएनडी लि.कडून सामान्य दराने प्राप्त करण्यायोग्य रकमेवर अपेक्षित पत हानी तरतूद केली आहे कारण एसएनडी लि. च्या संदर्भात अंतिम निर्लेखन खाते प्रगतीपथावर आहे आणि एसएनडी लि. ला देय असलेली तात्पुरती रक्कम ५,४०० लाख (मागील वर्षी ५,०९६ लाख), तथापि, लेखा पुस्तकाप्रमाणे शिल्लक रु. १६,२९८ लाख आहेत. ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या आर्थिक विवरणांमध्ये उक्त निर्लेखन कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तेच आकस्मिक दायित्व म्हणून दाखवले आहे.

ब) सूत्रधारी कंपनीने मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को ऑप . सोसायटी लिमिटेड यांच्याकडे व्यापारी येणे रु. २,३४,९२०.०० लाख (२०१९-२० मध्ये रु. २,३४,९२०.०० लाख, २०१८-१९ मध्ये रु. २,३४,९२०.०० लाख) विचारात घेतलेले नाही.	मुळा प्रवरा वीज सहकारी संस्था (एम पी इ सी एस) याचे कडून येणे असलेल्या रु. २३४९२०.०० लाख वसुलीसाठी महावितरणने कायदेशिर प्रक्रिया सुरु केली आहे. व्यवस्थापनाच्या मते संपूर्ण रक्कम वसूल होऊ शकेल त्यामुळे या प्रकरणी पतहानी होणे अपेक्षित नाही.
क) सूत्रधारी कंपनीने व्याज मान्यता खंडित झालेल्या ग्राहकांकडून देय असलेल्या व्याजाच्या रकमेवर (रक्कम निश्चित केलेली नाही) १००% अपेक्षित पतहानी (ईसीएल) तरतूद विचारात घेतली नाही. महावितरणचे महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील टिपा क्र. एफ २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्याज ओळखण्याच्या संदर्भात लेखा धोरणाचे पालन करीत या ग्राहकांची व्याजाची मान्यता खंडित करण्यात आली आहे.	कंपनीने आपला पूर्वानुभव, व्यवहार्य कौशल्य ग्राहकांची विभागणी आणि त्याचे वयोमान बाबी विचारात घेतल्या आहेत. त्याच्या आधारे कंपनीने व्यापारी येणी व त्याचे व्याज याबाबत पतहानीच्या हिशेब केला. व्याजाच्या थकीत रकमेनुसार ३१ मार्च २०२१ रोजी अपेक्षित पत हानी रु. ५.०७,५६१ लाख इतकी होती जे निव्वळ व्याजाच्या ४७ टक्के येते.
ड) टीप ५२(५)(२)(१)(अ) वर्षभरात अपेक्षित पतहानी (ईसीएल) मधील हालचालींशी संबंधित. सूत्रधारी कंपनीच्या व्यवस्थापनाने विविध श्रेणीतील ग्राहकांसाठी 'प्रोव्हिजन मॅट्रिक्स'च्या आधारे ईसीएलसाठी तरतूद केली आहे. कोविड १९ नंतरच्या स्थितीत हळूहळू होणाऱ्या सुधारणांमुळे व्यापारी येण्यांच्या वसुलीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वीच्या वर्षांत बुडीत कर्जे म्हणून भरीव रक्कम निर्लेखित केली गेली आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन,आम्ही ईसीएल आणि त्याची पर्याप्तता प्रदान करण्यासाठी स्वीकारलेल्या आधारावर भाष्य करण्यास अक्षम आहोत. वरील परिच्छेदात नमूद केलेल्या बाबींच्या संदर्भात लेखापरिक्षण पाठपुरावा तपशीलाच्या अनुपस्थितीत आम्ही लेखापरिक्षण अंतर्गत वर्षासाठी कंपनीच्या एकत्रित वित्तिय विवरण पत्रावर प्रभावी परिणांमावर भाष्य करण्याच्या स्थितीत नाही,	कंपनी २.८५कोटी ग्राहकांना सेवा देत आहे. अपेक्षित पत हानी हिशेबासाठी या ग्राकांची पुढील चार श्रेणीत विभागणी केली आहे. १. शासकीय प्राधिकारी/संस्था २. कायमचा वीज पुरवठा खंडीत केलेला ग्राहक ३. शेतीचे ग्राहक आणि ४. नियमीत ग्राहक कंपनीने तिचा पूर्वानुभव, व्यवहार कौशल्य, ग्राहकांची गटवारी आणि त्यांचा जीवनकाल या बाबींचा विचार करुन अपेक्षित पत हानी चा हिशेब केला. तसेच कंपनीने व्यावहारिक सूचकता आणि भविष्यातील वसुली योजना या आधारे ग्राहकांच्या भविष्यकाळातील वर्तनाचा विचार केला यानुसार अपेक्षित प्रत हानी तरतूदी तक्ता तयार केला. कोविड १९ नतंर संथ वसुलीच्या परिणामी व्यापार प्राप्तीमध्ये लक्षणीय वाढ लक्षात घेऊन, कंपनीने कठोर पुनर्प्राप्ती मोहिम हाती घेतली आहे आणि क्षेत्रिय स्तरावर ग्राहक बिलिंग समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिबिरांचे आयोजन केले आहे. परिणामी, वसुली वाढत आहे आणि नियमित ग्राहकांसाठी अपेक्षित पत हानी तरतूद वाढलेली नाही. एकूण ईसीएल १९ टक्के पर्यंत प्राप्त करण्यायोग्य रक्कमेवर प्रदान केले आहे जे पुरेसे असल्याच दिसते.
५.स्पष्ट न केलेल्या शिलकी आणि त्याचे वर्गीकरण व सादरीकरणाबाबत - अ) आमच्या लेखापरीक्षणा दरम्यान सूत्रधारी कंपनीच्या खालील खात्यांशी संबंधित आवश्यक माहिती/तपशील पडताळणीसाठी मिळाले नाहीत.	

जनरल लेजर कोड	लेख्यांचे शीर्षक	मत्ता/(दायित्वे) (रु. लाखात)	उत्तरे
१०३०३०११	ग्राहकांच्या संकीर्ण अनामती	(१६६२.२३)	या शिलकीमध्ये मत्ता आणि दायित्वाच्या खूप जुन्या शिलकी समाविष्ट आहेत. जुन्या शिलकीच्या काही प्रकरणामध्ये तपशील उपलब्ध आहेत आणि काही बाबतीत तपशील सहज उपलब्ध नाहीत. हया शिलकी मराविमंडळाच्या त्रिभाजन कालावधीपासून/किंवा सॅप प्रणालीमध्ये स्थलांतरीत केल्यापासून पडून आहेत मालमत्ता आणि दायित्वाची तपशीलवार छाननी प्रक्रिया सूरू आहे आणि योग्य पडताळणी नंतर आवश्यक कार्यवाही सुरु केले जाईल आवश्यक असल्या जून्या शिलकीचे निलेखन/पूर्नलिखित करण्याचा प्रस्ताव जेथे तपशील उपलब्ध नसेल तेथे सूरू केले जाईल.
१०३०३०१३	इतर संकीर्ण अनामती	(१२७५.०५)	
१०३०३०१५	कर्मचाऱ्याच्या अनामती	(१.३०)	
१०३०३०१९	ग्राहकांना देय असलेल्या सुरक्षा अनामती	(५५६८.९४)	
१०३०३०२०	सौभाग्य योजनेच्या रकमा	(०.५२)	
१०५०१००२	परवानाधारकांना देय रकमांचे दायित्त्व	(४७१.७४)	
१०५०१००७	विक्रेते भांडवल यांच्या सुरक्षा अनामती	(१,२८९.३२)	
१०५०१००८	पुरवठादार व कंत्राटदारां कडून प्राप्त इसारा रक्कम ठेवी भांडवली	(७६२.३५)	
१०५०१००९	विक्रेते संचालन व सूव्यवस्था यांच्या कडून प्राप्त सुरक्षा अनामती	(१२,२४५.०३)	
१०५०१०१०	पुरवठादार,कंत्राटदार इसारा रक्कम ठेवी (संचालन व सूव्यवस्था)	(५,१६९.३२)	
१०५०१०११	सुरक्षा अनामती – इतरांच्या	(७६६.०२)	
१०५०१०१२	नॉन - डीडीएफ योजनेच्या परताव्याची रक्कम	(१०,०२०.७४)	
१०५०१०१४	पुरवठादार - कंत्राटदारांचा ठेवून घेतलेला पैसै	(२,११,२११.४५)	
१०५०१०१५	ग्राहकांकडून प्राप्त इसारा रक्कम ठेवी	(११४.०७)	
१०५०१०१७	ग्राहकांकडून प्राप्त सुरक्षा अनामती	(१९१.१३)	
१०७००५०१	हंगामी सेवा जोडण्याच्या अनामती	(१,९५४.२४)	
१०९००६०५	ग्राहकांचे नामंजूर झालेले धनादेश	(७७.६३)	
१०९०२००१	पुरवठादार / कामे व देखभालीचे विक्रेते याचे दायित्वे	(८२,७३३.२९)	
१०९०२००२	एफ आय विक्रेते यांना देय	(४,१२७.७६)	
१०९०२००४	सेवा देणाऱ्यांना देय रक्कम	(२९.१९)	
१०९०२००९	सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय	(१०४.५१)	
१०९०२१०३	खर्चासाठी दायित्त्व	(७४,१६३.३९)	
१०९०२१०७	कर्मचाऱ्यांच्या देण्यांची दायित्त्वे	(९२२.२६)	
१०९०२१०८	कर्मचाऱ्याच्या ठेवी	(४७.०४)	
१०९०२१११	संचालन व सूव्यवस्था खर्चासाठी तरतूदी	(९,४६५.४९)	
१०९०२३१०	बाह्यस्त्रोत संस्था देय वेतनातील कपाती	८७८.८९	
११०००००२	कर्मचाऱ्यांना केलेल्या खर्चाच्या दायित्वाची तरतूद	(७५६.७५)	
१०९०२१०४	देय - वेतन	(४२.५६)	

१०९०२३०७	लाईफ इंशुरन्स प्रिमियम वसूली	(२५.४१)	
१०९०२३४९	बाह्यस्त्रोत संस्थाना देय असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील वसुली	(५,६८१.१७)	
१०९०२३१६	अधिनियमांतर्गत कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेले कल्याण निधी योगदान	(०.९४)	
१०९०२००८	परवानाधारकांना देय	(०.१३)	
१०९०२११६	वीज खरेदी खर्चासाठी तरतूद	(१,६१,४४९.२१)	
२०६००००२	पुरवठादार / कंत्राटदारांना दिलेली अग्रिमे – इतर	३४,२४६.१३	
२०६००१०३	इतर ठेवी	२,२८४.०९	
२०९०१०२२	चोरी प्रकरणी देय रक्कम	(२,५२०.४७)	
२४०००००८	प्रवास भाडयाची अग्रिमे	४४.१६	
२४००००१२	वैद्यकीय -अग्रिमे	३८३.१२	
२४००००१३	रजा प्रवास सवलतीसाठी अग्रिमे	७.१९	
२४००००१७	आयटीआय प्रशिक्षणाची अग्रिमे	५५.००	
२४१००००६	कर्मचाऱ्यांच्या कर्जाचे उपर्जित व्याज	२१.९२	
२४१००००७	कर्मचारी कर्जाचे देय नसलेले उपर्जित व्याज	४३८.६८	
२४१००००८	माजी कर्मचाऱ्यांकडून मिळू शकणारी रक्कम	१६.०७	
२४१०००१०	इतर राज्य वीज मंडळाकडून मिळू शकणाऱ्या रकमा	९,४२९.४५	
२४१०००१८	भावी कर्मचाऱ्यांना अग्रिमे	१८.४९	
२४१०००२३	गोळा करणाऱ्या संस्था / कर्मचारी / माजी कर्मचारी यांच्याकडून अल्प प्रतिपूर्ती	६६८.७८	
२४१०००२४	पुरवठादार, कंत्राटदारांकडून मिळू शकणाऱ्या रकमा	७६.८२	
२०६००२०५	परवाना धारकांना कर्ज व अग्रिमे	३१.३४	
२०९०१५१३	भंगार विकून मिळू शकणार्या रकमा	२४१.४७	
२०९०१५१०	ठोक विक्रीचे किरकोळ कर्जदार - आंतरराज्य	(१८,२३३.६४)	

* या शिलकीसाठी पूर्णपणे तरतूदी वहयांमध्ये केल्या आहेत. योग्य स्पष्टीकरणे / मेळ नसल्याच्या अनुपस्थितीमुळे या शिलकीच्या निर्दोषतेवर मत देता येत नाही. वरील खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या जुन्या थकबाकींचा ताळमेळ आणि तडजोडीमुळे उदभवलेल्या समायोजनांचा परिणाम आणि वसूली न झाल्यामुळे किंवा अंशत - वसूली किंवा रक्कमा निर्लेखित केल्यामुळे उदभवू शकणाऱ्या संभाव्य नफा/तोटा हे निश्चित केले गेले नाहीत.	

ब) विविध मत्ता आणि दायित्वाच्या शिलकी सूत्रधारी कंपनीच्या लेख्यांमध्ये - १) त्रिभाजनाच्या काळातील पुढे नेलेल्या शिलकी. २) सॅप सॉफ्टवेअर वापरण्यास सुरूवात करताना या स्थलांतराच्या वेळी केलेल्या शिलकी. याविषयीचे पुरेसा तपशील उपलब्ध नसल्याने शिलकी आणि त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर घडू शकणारा प्रभाव यावर काही अभिप्राय आम्हाला देता येत नाही.	मत्ता व दायित्वाच्या तपशीलवार निरिक्षण करण्याची प्रक्रिया सूरू आहे आणि आवश्यक कृती योग्य पडताळणीनंतर सूरू करण्यात येईल. जर आवश्यक असल्यास जेथे तपशील उपलब्ध नाहीत त्या जून्या शिलकीमध्ये निर्लेखित/ पुनर्लेखित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येईल.
क) याशिवाय आवश्यक माहिती/तपशील उपलब्ध नसल्याने मत्ता व दायित्त्वे यांचं वित्तीय आणिअवित्तीय या वर्गीकरण मत्ता व दायित्त्वे यांचे ठोक एकत्रीकरण तसेच यांचे चालू आणि चालू नसलेली यातील द्विभाजीकरण या बाबी भा. ले. मानक ३२ - ''वित्तिय विलेख सादर करणे'' याच्याशी आणि कायद्यातील अनुसूची तीन यातील आवश्यकतेशी सुसंगत आहे किंवा कसे यावर आम्हाला मत देता येत नाही.	कंपनीने मत्ता व दायित्त्वे यांचे वर्गिकरण मुख्यत्वे वित्तीय व अवित्तीय अशा प्रकारे आणि त्याचे विभाजन चालू व चालू नसलेल्या अशा प्रकारे केले आहे. काही प्रकरणामध्ये जुन्या शिलकी पुढे नेल्याने असे वर्गीकरण त्रिभाजनामुळे सॅप प्रणालीमध्ये स्थलांतर केल्यापासून अवघड झाले आहे. अशा बाबी यादीतून सूचीबद्ध करून वर्गीकृत केले.
ड) सूत्रधारी कंपनीचे विविध खरेदी आदेश असे आहेत की त्यांची कार्यवाही ताळेबंदाच्या तारखेपर्यंत झालेली नव्हती. सुत्रधारी कंपनीने भांडवली अग्रिमे आणि भांडवली बांधिलकीच्या प्रकटीकरणासह भांडवली बाबींशी संबंधित खुल्या खरेदी आदेशाचे विवरण तयार केलेले नाहीत. ही माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही भांडवली आणि इतर बांधिलकी याबद्दल टिपा क्र). ४२ (ड) (अ) (३) यात नमूद केलेल्या प्रकटनेच्या अचूकतेबद्दल अभिप्राय देण्यास असमर्थ आहे.	खरेदी आदेशाची विभागणी उपलब्ध माहितीच्या आधारे केली आहे. खुल्या खरेदी आदेशाचा अहवाल सॅप प्रणालीमध्ये उपलब्ध आहे.
६. बाह्य शिलकी कायम करणे / मेळ करणे अ) वि. वि. पत्रकांची टिपा क्र. ५२ (३) याकडे लक्ष वेधण्यात येते यातील कर्जाच्या आणि अग्रिमांच्या शिलकी विविध इतर खर्च/ जमा शिलकी आणि शासनाकडून येणी या कायम होण्याच्या तसेच मेळ आणि त्यातील परिणामांचे समायोजन करण्याच्या अधीन आहे. सूत्रधारी कंपनीची तिसऱ्या पक्षाकडून शिलकी पुष्टीकरण करण्याची व्यवस्था अधिक बळकट करण्याची गरज आहे. याविषयी आवश्यक नोंदी / तपशील नसल्याने आम्ही अशा समायोजनेचे तसेच जून्या देण्याचे मेळ व समझोते झाल्यास संभाव्य नफा /तोटा आणि जर वसूली अपूर्ण किंवा अजिबात झाली नाही तर दायित्वाचा लेख्यावर होऊ शकणाऱ्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.	कर्जच्या प्रकरणी, संबंधित वित्तीय संस्था किंवा बँकांकडून पुष्टी केली जाते. तसेच वीज खरेदीच्या पतदारांच्या बहूतेक प्रकरणात पुष्टी मिळविण्यात आली किंवा मेळ करण्यात आली. शासनाच्या येण्यांबाबत कंपनीचा पत्रव्यवहार याला त्याची निश्चिती मानता येईल. बहूसंख्य विक्रेत्यांसोबत शिल्लक पुष्टी संबंधी पत्रव्यवहार केला आहे. काही प्रकरणी खात्री मिळाली तर बऱ्याच प्रकरणात सातत्याने पाठपुरावा करुनही खात्री/मेळ झालेली नाही.
ब) एकत्रित वि.वि. पत्रकातील टिपा क्र १२ आणि टिपा क्र ५२ (३) यात उपलब्ध नसलेल्या खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात येते - १) टपाल कार्यालयात शिलकी कायम करणे (लेखा वहयातील नोंदी प्रमाणे टपाल कार्यालयातील खालील शिलकीचे पुष्टीकरण उपलब्ध झालेले नाही.	टपाल कार्यलयाकडून शिल्लकीची खात्री मिळविण्याचे प्रयत्न केले. मात्र टपाल खात्याने कळविले की; ज्याची खात्री करण्याची विनंती केली आहे; त्याची खातरजमा करुन देणे त्यांच्या प्रणाली द्वारे शक्य होणार नाही. आता वर्ष २०१९ -२० पासून टपाल खात्याद्वारे जमा करणे थांबविण्यात आले आहे.

<table>
<tr>
<td>

(रु. लाखात)

वि.वर्ष	टपाल कार्यालये शिलकी	
	एकूण खर्ची शिल्लकी	एकूण जमा शिल्लकी
२०२० -२०२१	३३,२७७.३१	२३,२१५.५६
२०१९ -२०२०	३६,४१०.८०	२६,३१३.०८
२०१८ -२०१९	२८,४८०.३८	१८,९३६.०५

२) सूत्रधारी कंपनीच्या सर्व मंडळांसाठी पोस्ट कार्यालयाशी ताळमेळ शिलकीचे पुष्टीकरण / मेळ यांची माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांचा लेखा परिक्षण वर्षाच्या एकत्रित वि. वि. पत्रकातील होऊ शकणाऱ्या परिणामांबाबात आम्हाला मत देता येत नाही.

</td>
<td>त्यांच्यासोबत मेळ करण्याची प्रक्रिया सुरु आहे.</td>
</tr>
<tr>
<td>

क) एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४५(ड)यात नमूद केले आहे की, मिळण्या जोग्या शिलकी/ देणी यांची सूत्रधारी कंपनीच्या लेखा वहयातील नोंदी आणि समूह कंपन्याच्या लेखा वहयातील संबंधित शिलकी यात रु. ९,७१,१७५ लाख (२०१९ -२०२० या वर्षी रु. ४,२७,६१६.०० लाख,२०१८ -२०१९ रोजी रु. २,२५,५०४ लाख) एवढा फरक आहे. या रकमा मेळ आणि कायम करण्याच्या अधीन आहेत.

मेळ नसल्याने या बाबीचा एकत्रित वि. वि. पत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

</td>
<td>

महानिर्मिती आणि महापारेषण यांच्यामधील वीज खरेदी व्यवहरातील फरकाची रक्कम रु. ९,८४,२०९ लाख आहे, जी महानिर्मिती आणि महापारेषण यांनी दावा केलेल्या विलंब भरणा आकार व महावितरणने न स्वीकारलेल्या देयकामुळे आहे. सर्व विज निर्मात्यासोबत ताळमेळ विवरण पत्रक तयार केले असून त्यामध्ये महानिर्मिती व पारेषण कंपनी देखील समाविष्ट आहे. नवीकरणीय ऊर्जा विभागाचे जनरेटरसाठी ताळमेळ केला असून अग्रक्रमांच्या आधारावर थकबाकी इत्यादीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे जवळ आले आहेत. विपुल तपशीलामुळे उर्वरित जनरेटरचे वेळेत ताळमेळ घालणे शक्य नाही. महावितरण सोबत थकबाकी आणि थकबाकीचा ताळमेळ घालण्यासाठी एनसीई संकेतसंस्थळावर जनरेटर देयके आणि थकबाकीचे तपशील प्रकट करण्याची प्रकीया सुरु आहे.

कर्ज आणि आगाऊ रकमेसाठी उपकंनन्यासोबत थकबाकीचे पुष्टी आणि ताळमेळ प्रदान करण्यात आला आहे.

मराविमंसूत्रधारी कंपनी बाबत, पूर्वीच्या मराविंमडळाच्या संबंधीत शिलकी आहेत जी माहवितरण कंपनीद्वारे रु. २०,७०५.५३ लाख स्वीकरली गेली नाहीत आणि मराविमं सुत्रधारी कंपनीला त्याच्या पुस्ताकामध्ये पुनर्लेखन /निर्लेखन करण्याची विनंती केली जात आहे.

</td>
</tr>
<tr>
<td>

ड) सूत्रधारी कंपनीच्या वहयातील नोंदीनुसार शिल्लक रकमेतील रु. ६०७.६७ लाखांच्या फरकाबाबत आणि अंशदायी भविष्य निर्वाह निधी ट्रस्टच्या वहयांमध्ये दिसत असलेल्या शिल्लक रकमेबाबत कोणतेही तपशील/स्पष्टीकरण दिलेले नाही. पुरेशा तपशिलांच्या अभावामुळे नफा आणि तोटा पत्रकावर आणि राखून ठेवलेल्या कमाईवर होणाऱ्या प्रभावी परिणामांवर भाष्य करण्यास अक्षम आहोत.

</td>
<td>

कंपनीच्या पुस्त्कांनुसार शिल्लक आणि अंशदायी भविष्य निर्वाह ट्रस्टच्या पुस्तकांमध्ये दिसणारी शिल्लक ताळमेळ करण्याच्या आधीन आणि आवश्यक सुधारणा नोंदी करावयाच्या आहेत, जर काही असेल तर ते आर्थिक वर्ष २०२१ -२२ मध्ये नोंद घेतली जाईल.

</td>
</tr>
</table>

७. नियामक दायित्व आकाराचा परतावा टिपा क्र. ५२(२४) यात नमूद केल्याप्रमाणे, सूत्रधारी कंपनीने वि. वर्ष २००३-०४ ते वि. वर्ष २००६-०७ दरम्यान ग्राहकांकडून नियामक दायित्त्वाचा आकार गोळा केला होता. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (जमा केलेल्या रकमेपैकी) रु. ३,२२,७०० लाख ग्राहकांना परत करण्याचा आदेश दिला. सुत्रधारी कंपनीने ३१.०३.२०२१ पर्यंत रु. ३,१२,२७३ लाख (२०१९ -२० मध्ये ३,१२,३९४ लाख, २०१८-१९ मध्ये रु. ३,१२,२१७) परत केले आहेत. सूत्रधारी कंपनीने उर्वरीत शिल्लक रु. १०,४२७ लाख (२०१९-२० मध्ये १०,३०६ लाख, २०१८-१९ मध्ये रु. १०,४८३ लाख) या ग्राहकांना परत करण्याच्या रकमेची तरतूद केली नाही.	कंपनीकडे उपलब्ध माहितीनुसार आर एल सी परतावा थकीतासाठी मागणी केलेली नाही. म्हणून त्यासाठी तरतूद केलेली नाही.
८. शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अंशदान - अ) भा. ले. मानक २० - शासकीय अनुदानांचे लेखे करणे आणि शासकीय मदतीची प्रकटने करणे, यानुसार भांडवली मत्तांच्या शासकीय अनुदानांना ज्या कालावधी मध्ये कंपनी त्या संबंधीत भांडवली मत्तांचा खर्चाची परतफेड करते, त्या वेळेच्या नफा तोटा पत्रकात पध्दतशीर आधारावर मान्यता देते. सुत्रधारी कंपनी असे गृहीत धरते की सर्व प्राप्त अनुदाने वापरण्यात आली आणि मत्तांचे भांडवलीकरण त्याच वर्षी केले. अनुदानाच्या उपयोगा संबंधीचे पुरेसे व योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे उपलब्ध नसल्याने आम्ही त्याचे एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर भाष्य करु शकत नाही.	या विषयीचे लेखाधोरण, महत्वाची लेखा धोरणे यातील टिपा क्र. २ मधील मुद्दा क्र. ६ मध्ये खालीलप्रमाणे प्रकट केले आहे. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या खरेदीसंबंधीची शासकीय अनुदाने वित्तीय विवरण पत्रकांमधे भांडवली अनुदाने अशा प्रकारे सादर केली जातात आणि ती नफा व तोटा यामध्ये विहित पद्धतीनुसार जमा केली जातात त्यासाठी संबंधित मत्तांचे अपेक्षित आयुष्य विचारात घेतले जाते व इतर उत्पन्न यामध्ये सादर केले जाते. ही अनुदाने मत्ता निर्मितीसाठी तात्काळ वापरली जातात. आणि त्यांच्या कर्जफेडीची तरतूद त्याच वर्षी सुरु होते वि. वर्ष २०२०-२१ मध्ये कंपनीने खालील महत्वांच्या योजनांसाठी फक्त अनुदानांचा वापर केला. त्यासाठी सनदी लेखापाल यांच्या प्रमाणपत्रांचा आधार घेतला. या योजना म्हणजे डी डी यू जी जे व्ही वाय आणि आय पी डी एस आणि एच व्ही डी एस असून त्या अनुदानाचा परतफेडीची तरतूद केली.
ब) भांडवली मत्तांसाठी ग्राहकांचे अंशदान याला ज्या कालावधीत कंपनी या संबंधित मांडवली मत्तांच्या कर्जफेडीची तरतूद करते त्या कालावधीच्या नफा तोटा पध्दतशीर आधारावर मान्यता दिली जाते. सूत्रधारी कंपनी असे गृहित धरते की, असे सर्व मिळालेले अंशदान त्यावर्षी भांडवली मत्तांसाठी वापरण्यात आले. ग्राहक अंशदानाच्या वापराचा पुरेसे आणि योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे उपलब्ध नसल्याने एकत्रित वि. वि. पत्रकावर संभाव्य परिणामावर आम्हाला मत देता येत नाही.	या विषयीचे लेखा धोरण महत्वाची लेखा धोरणे यातील टिपा क्र. २ मधील मुद्दा क्र ६ यात प्रकट केले आहे. ते असे - मालमत्ता कारखाना आणि साधने याची खरेदी/उभारणी यासाठी ग्राकांनी देलेले अंशदान नफा व तोटा यामध्ये विहित पद्धतीनुसार जमा केले जाते. ग्राहक अंशदान सामान्यपणे प्राप्तीच्या वर्षीचे मत्ता निर्मितीसाठी वापरले जाते, आणि त्याचवर्षी कर्जफेड सुरु होते.

९) टिपा क्र. ४२ (ड) - यात प्रकट केलेल्या आकस्मिक दायित्त्वे व्यवस्थापनाने दिलेल्या व खात्री केलेल्या माहितीवर आधारित आहेत. सूत्रधारी कंपनीने पुरेशी कागदपत्रे दिली नसल्याने आणि लेखा परिक्षणाचा पाठ पुरावा नसल्याने आकस्मिक दायित्त्वांचा प्रकटनाच्या परिपूर्णतेवर आणि सूत्रधारी कंपनीच्या लेखा पुस्तकामध्ये कोणतीही अतिरिक्त तरतूद करणे आवश्यक आहे की नाही यावर भाष्य करण्यास अक्षम आहोत. नफा/तोटा आणि राखून ठेवलेल्या कमाईचा एकत्रित वित्तिय विवरणपत्रकांवर होणाऱ्या परिणांमाचा प्रभाव निश्चितपणे सांगता येणार नाही.	आकस्मिक दायित्वाची मंडल निहाय यादीची तपासणी विधी अधिकारी योग्य प्रकारे करतात त्यासाठी संबंधित कागदपत्रे जसे न्यायालयाचे आदेश, आयकराचे आदेश व अपिलांचे दस्ताऐवज आणि आदेश इ. कागदपत्रे यापूर्वीच लेखा परिक्षकांना देण्यात आली आहेत.
१०. कर्मचारी लाभ खर्च - भाले मानके १९ नुसार कर्मचा -यांना सूत्रधारी कंपनीतर्फे दिले जाणारे कर्मचारी लाभ जसे की, सेवानिवृत्त कर्मचारी लाभ, व्यांख्यांकित लाभ योजना, अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना यांच्या व्याजावरील तूटीचा विमागणिती शास्त्रानुसार मूल्यांकन सूत्रधारी कंपनीने करून घेतलेले नाही. या भविष्य निर्वाह निधीचे व्यवस्थापन मराविमं अंशदायी भविष्य निर्वाह निधी विश्वस्तातर्फे केले जाते. अशा मूल्यांकनाच्या अभावी नफा आणि तोट्याच्या एकत्रित विवरण पत्रकावर आणि राखीव कमाईवर होणा -या परिणामांबाबत आम्ही भाष्य करू शकत नाही.	योजनेच्या तरतुदींनुसार भविष्य निर्वाह नीधी प्रदान केलेल्या वास्तविक डेटाच्या आधारे अंशदानांना वर व्याजाची तूट नियोक्त्याद्वारे भरली जाते.
११. विविध खर्चासाठी तरतुदी केलेल्या नसणे - अ) एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४२(ड) (अ) (३)(ब) (अ) ते (इ) यात नमूद केल्याप्रमाणे देय रकमेची गणना करण्याच्या पद्धतीतील संदिग्धतेमुळे सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असून सूत्रधारी कंपनीने नवीन कोळसा वितरण धोरणानुसार वाढीव कोळसा किमतीच्या भरपाईच्या दायित्वाची तरतूद केलेली नाही. एनसीडीपीनुसार विविध विक्रेत्यांचे सुमारे रु. १४,४४,६०४.५९ लाख (२०१९ -२०२० रु. ७,५८,३८५ लाख २०१८ -२०१९ रु. ४,४२,७२९ लाख) देय आहेत.	वस्तुस्थिती आणि मुद्दा हा वीज निर्मात्यांना घरगुती कोळशाच्या पुरवठ्यातील तुटवड्याशी संबंदित आहे. अशा तुटवड्यामुळे वीज निर्मात्याला अतिरिक्त खर्च करून इतर काही स्त्रोतांकडून कोळशाची व्यवस्था करावी लागली. कोळसा मंत्रालयाने दिनांक २६.०७.२१०३ च्या पत्राद्वारे सीसीईने मंजूर केलेल्या नवीन कोळसा वितरण धोरणातील बदलांना सूचित केले आहे. सरकारच्या निर्णयानुसार, एलओए/ एफएसए मध्ये दर्शविलेल्या प्रमाणामध्ये कमी असलेल्या प्रमाणात सीईआरसी आणि एसीआरसी द्वारे केस टु केस आधारावर पास थ्रू करण्यासाठी आयात /बाजारावर आधारित ई - लिलाव कोळशाच्या उच्च किंमतीचा विचार केला जाईल. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल दि. ११.०४.२०१७ ऊर्जा पहारेकरी प्रकरणात, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने असे मानले आहे की, सरकारद्वारे कोळसा वितरण धोरणातील बदल म्हणजे एनसीडीपी २०१३ आणि शक्ती धोरण २०१७ हे आयपीपीएस सह पीपीएच्या तरतुदीनुसार कायद्यातील बदलाची घटना आहे.

	आर्थिक प्रभावाच्या गणनेसाठी, विविध तांत्रिक बाबींचा समावेश आहे जे थर्मल पॉवर जनरेटिंग प्लांटची कोळशाची गरज ठरवतात, जसे की स्टेशन हीट रेट, कोळशाचे सकल उष्मांक मूल्य इ. महावितरण आणि जनरेटर यांच्यात या पॅरामीटर्सच्या विचाराबाबत विवाद आहेत. वास्तविक पॅरामीटर्स विचारात घ्यायच्या आहेत की मापदंड प्रति बोली आहेत याचा विचार केला पाहिजे. असा वाद मा. सर्वोच्च न्यायालय त्यामुळे रु. १४,४४,६०४.५९ लाख आकस्मिक दायित्व म्हणून दाखवले आहे.
ब) एकत्रित वि. वि. परिमाणाची टिपा क्र. ४२ (ड) (१) (अ) (३) (अ) (क) यात दिल्याप्रमाणे सुत्रधारी कंपनीने रत्नागिरी गॅस पॉवर प्रा. लि. ला देय स्थिर आकाराचे दायित्व रु. ४,३२,७६८ लाख यासाठी तरतूद केलेली नाही (२०१९ -२०२० रोजी रु. ४,२२,८५६.२३, २०१८ -२०१९ रोजी रु. ३,५१,००४ लाख). आरजीपीपीएल कंपनीला रु. १८,१०१.०७ लाख (२०१९ -२०२० रोजी १८,१०१.०७, २०१८ -२०१९ रोजी रु. १८,१०१.०७ लाख) दिलेले असून त्यास अग्रिमे शिर्षकात दर्शविण्यात आले आहे.	१०.०४.२००७ रोजी रत्नागिरी गॅस पॉवर प्रा.लि व महावितरण यांच्यात वीज खरेदी करार करण्यात आला. कृष्णा गोदावरी डी ६ बेसिन (केजी डी६) मधून गॅस पुरवठा सतत कमी होत होता. पर्यायी इंधनाच्या उच्च किंमतीमुळे म्हणजे आरएलएनजीमुळे आणि ग्राहकांवर आर्थिक बोजा टाळण्यासाठी महावितरणने आरजीपीपीएलकडून वीज घेतली नाही. आरजीपीपीएलने ३१.०३.१४ रोजी भविष्यातील कालावधीसाठी गॅस पुरवठा करार सुलभ करण्यासाठी महावितरणशी संपर्क साधला नाही. त्यामुळे महावितरणने पीपीए समाप्त केला. १.०४.२०१४ तथापि, आरजीपीपीएल महावितरणसाठी कोणत्याही निर्मितीशिवाय आणि कोणत्याही शेडयुलिंग पॉवरशिवाय डीपीसी आणि स्थिर आकारावर दावा करत आहे.यापूर्वी महावितरणने रु. १८१.०१ कोटी आगाऊ दिले. त्यामुळे रु. १८१.०१ कोटी रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून गणली जाते. तथापि देय असल्यास ही रक्कम एआरआर मध्ये देखील पास होऊ शकते. त्यामुळे सदर रक्कम देखील आकस्मिक मालमत्ता म्हणून ग्राह्य धरण्यात आली. तथापि, आरजीपीपीएल कडून उत्तरदायित्वाविरुध्द कोणतीही सक्तीची कारवाई सुरु झाल्यास महावितरण त्यांच्या १३.०५.२०१५ च्या आदेशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकते. त्यामुळे ४,३२,७६८ लाख आकस्मिक दायित्व म्हणून दाखवले आहे.
क) एकत्रित वि. वि. पत्राच्या टिपा क्र. ५२(८)(ब) यात दिले आहे की सुत्रधारी कंपनीने वितरण फ्रेंचायजी स्पॅन्को नागपूर डिस्कॉम लिमिटेडची सेवा खंडित केल्याने त्यास देय असलेल्या रु. २१,६९७.२५ लाखांची (२०१९ -२० मध्ये रु. १८,२२३.७१ लाख तर २०१८ -१९ मध्ये ११,४३५ जमा) तरतूद केलेली नाही.	वि. वर्ष २०२० -२१ मधे कंपनीची येणी रु. १६,२९८ लाख आहेत. एस एन डी लि. विरोधात अंतिम व्यवहार बंद करणे प्रक्रिया चालू आहे. अंतिमिकरणानंतर मेळ केल्यावर आवश्यक नोंदी केल्या जातील. तथापी, सदर रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून दर्शविली आहे.

१२. इतर बाबी अ) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा ५२ (२३) यात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सुत्रधारी कंपनीला प्रत्येक वर्षी निर्माण केलेल्या आकस्मिक राखीवच्या समतूल्य रक्कम विनिर्देशित केलेल्या प्रतिभूती मधे गुंतवणे आवश्यक आहे. सुत्रधारी कंपनीने वर्षभरात कोणतीही नियोजित गुंतवणूक केली नाही. अशा प्रकारे ३१ मार्च २०२१ पर्यंतची नियोजित गुंतवणूक रक्कम रु. ३१,३३९.७८ लाख आहे (२०१९ -२०२० रोजी ३१,३६९.८२ लाख, २०१८ -२०१९ रोजी १८,५७२.५५ लाख) आणि आकस्मिक राखीव रु. १,२५,७३२.०० लाख आहेत (२०१९ -२०२० रोजी रु. १,०९,९७६ लाख, २०१८ -२०१९ रोजी ९५,७००.०० लाख).	कंपनी सध्या बिकट वित्तीय स्थितीतून वाटचाल करीत आहे. या काळात पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे नित्य कामाची दायित्वे सुद्धा निभवता येत नाही. संचालक मंडळाच्या बैठकीत यावर चर्चा झाली. त्यात निर्णय झाला की बँकांकडून जादा दराने निधी घेऊन तो कमी दराच्या आकस्मिक निधीत गुंतवणे सूज्ञपणाचे नाही. उपरिनिर्दिष्ट परिस्थितीमुळे आणि द्रव्य सुलभतेच्या अडचणीमुळे नियोजित गुंतवणूकीची रक्कम ३१ मार्च २०२१ रोजी रु. ३१,३३९.७८ लाख (वि. व.२०१९ -२० रु. ३१,३६९.८२ लाख, वि. व.२०१८ -१९ रु. १८,५७२.५५ लाख) होती. आकस्मिक राखीव ३१ मार्च २०२१ रोजी रु. १,२५,७३२ लाख (वि.व. २०१९ -२० रु. १,०९,९७६ लाख, वि.व. २०१८ -१९ रु. ९५,७००.०० लाख) आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी आकस्मिक राखीव विरूद्ध केलेल्या प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या मर्यादेपर्यंत इतक्या खर्चाला मंजुरी देते.
ब) सुत्रधारी कंपनीने मालाच्या सोडवण्याची पावती व देयके पावती रु. १,८९,६१९.१२ लाख (२०१९ -२०२० रोजी रु. २,०४,८०२.१० लाख , २०१८ -२०१९ रोजी १,२२,१५३. ३५ लाख) आणि कामे व देखभाल यांच्या पुरवठा दारांसाठी रु. ८२,७३३.२९ लाख (२०१९ -२०२० रोजी रु. ५३,७०८.३५ लाख, २०१८ -२०१९ रोजी रु. ७०,२०७.९८ लाख) अशी अनुक्रमे दायित्त्वे दर्शविली आहेत. या शिलकी खर्च शिलकीची निव्वळ आहेत. यासाठी आवश्यक आकडेवारी आणि लेखा परिक्षणाचा पाठपुराठा नसल्याने त्यांचा सूत्रधारी कंपनीच्या मत्ता व दायित्त्वे यावर होणाऱ्या प्रभावाचा अंदाज आम्ही करु शकत नाही.	यांचा मेळ करुन आवश्यक सुधारणा वि वर्ष २०२१ -२२ नोंदल्या जातील.
क) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ५२(१०) कडे लक्ष वेधण्यात येत. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजक कायदा या नुसार नोंदवलेल्या पतदारांची ओळख निश्चिती आणि त्यांना देय असलेल्या व्याजासाठी तरतूदी संबंधी आहे. सूत्रधारी कंपनीने दायित्त्वांचे सांख्यिकीकरण केलेले नाही म्हणून असे काही व्याज देय असेल तर, त्यांचे दायित्त्वाची तरतूद याचा अंदाज आम्हाला करता येत नाही. तसेच त्याचा लेखा परिक्षण वर्षातील नफ्यावर कोणते परिणाम होतील हे सांगता येत नाही. अशा सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योजकांची ओळख निश्चिती केली नसल्याने सबंधित कायद्याच्या तरतूदी प्रमाणे स्थितीचे प्रकटन केलेले नाही	सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योजकांच्या रकमा देय वेळेत देण्याबाबत योग्य काळजी घेण्यात येईल.

<table>
<tr>
<td>ड) लेखा वह्या आणि माहिती तंत्रज्ञान डेटा बेस यामध्ये नोंदलेल्या ग्राहकांच्या अनामत रकमेत खालील प्रमाणे फरक आहे. ढसंदर्भ टिपा क्र. ५२(५)(२)(१)(अ)(क)

(रु. लाखात)

<table>
<tr><th>तपशील</th><th>३१.०३.२०२१ रोजी लेखा वह्यातील शिल्लक (अ)</th><th>३१.०३.२०२१ रोजी डेटाबेसमधील शिल्लक (ब)</th><th>फरक (अ) -(ब)</th></tr>
<tr><td>सुरक्षा अनामत</td><td>८,५३,१०२.५६</td><td>८,४४,७१३.०४</td><td>८,३८९.५२</td></tr>
</table>

सुत्रधारी कंपनी या फरकाचा मेळ करण्याची प्रक्रियेत आहे.</td>
<td>वि. वर्ष २०२१ -२२ मधे याचा मेळ केला जाईल आणि सुधारित नोंदी केल्या जातील.</td>
</tr>
<tr>
<td>इ) सुत्रधारी कंपनीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून मंजूर रक्कम रु. ८,५०,०००.०० लाखाचे एक कर्ज घेतले. ३१ मार्च २०२१ रोजी थकीत रक्कम रु. ७,१८,७५० लाख होती. (२०१९-२०२० रोजी रु. ७,५१,२५०.०० लाख, २०१८-२०१९ रोजी रु. ८,०८,१२५.०० लाख) या कर्जाला मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ने हमी दिली असून त्यासाठी सूत्रधारी कंपनीने कुठलीही रक्कम आकारलेली नाही. मात्र भा. ले. मानक १०९ च्या आवश्यकते प्रमाणे या वित्तीय हमीचे रास्त मूल्यांकन झालेले नाही. यामुळे या वर्षीचा संचित तोटा रु. ८,१४४.०२ लाखाने कमी आहे आणि ठेवून घेतलेल्या मिळकतीची संचित शिल्लक ३१ मार्च २०२१ रोजी रु. २२,७८१.४९ लाखाने जास्त आहे.

उपरोक्त परिच्छेद क्र. १ ते १२ यात नोंदलेल्या विविध पात्रतांचा आयकर, नियामक मत्ता आणि स्थगित कर या बाबींवर परिणाम होऊ शकेल. या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

परिच्छेद १ ते १२ मध्ये नमूद केलेल्या विविध पात्र मत्ताचा आयकर तरतूदी आणि स्थगित करांवर परिणाम प्रभावाबद्दल निश्चित मत देता येत नाही.</td>
<td>सुत्रधारी कंपनीने या कंपनीच्या वतीने आर इ सी ला कार्पोरेट हमी दिली आहे. मात्र त्यातून कोणतीही वाणिज्यक लाभ मिळविण्याचा सुत्रधारी कंपनीचा हेतू नाही. तसेच ग्रामिण विद्युतीकरण महामंडळाच्या कर्जातून निर्माण होणाऱ्या मत्तांवर त्याची आकारणी कंपनीने केलेली आहे. सुत्रधारी कंपनीची हमी हे दायित्वाच्या साठी अतिरिक्त छत्र आहे. म्हणून सुत्रधारी ने त्यासाठी कोणतेही कापोरेट शुल्क किंवा दलाली आकारली नाही. म्हणून भा. ले. मानक १०९ नुसार कंपनीने या हमीचे रास्त मुल्य दिलेले नाही तसे लेखावह्यात समाविष्ट केले आहे.</td>
</tr>
<tr>
<td>आमच्या मागील वर्षांतील अहवालातील परिच्छेद क्र. १ (अ ते ड), २ (अ ते ब), ४ (अ ते इ),, ५ (अ ते ड), ६ (अ ते क),७, ८,(अ ते ब), ९, ११ (अ ते क), ११(क), १२, (अ ते इ) यात सुधारणा केल्या आहेत.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>उपरोक्त वर्णन केलेल्या विषयाचे येथे जोडलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामाचे योग्य प्रमाणे निश्चितीकरण व सांख्यिकीकरण खालील तक्त्यात केले आहे.</td>
<td></td>
</tr>
</table>

एकत्रित नफा तोट्यावर परिणाम

(रु. लाखात)

अनु. क्र.	संबंधित परिच्छेद	तपशिल	वि. वर्ष २०२०-२१ उत्पन्न/खर्च विवरण
१	७	तरतूद नसलेले खर्च - आरएलसी	१०,४२७
२	११	तरतूद नसलेले खर्च - एनसीडीपी	१४,४४,६०४.५९
३	११	तरतूद नसलेले खर्च - स्थिर आकार	४,३२,७६८
४	११	तरतूद नसलेले खर्च - डी एफ दायित्व	२१,०४५.२५
५	१२	तरतूद नसलेले खर्च - कॉर्पोरेट गॅरटी	८,१४४.०२
६	१२	ग्राहकांची सुरक्षा अनामत	(८,३८९.५२)
		एकूण	**१९,०८,५९९.३४**

एकत्रित ताळेबंदावर परिणाम

(रु. लाखात)

अनु. क्र.	संबंधित परिच्छेद	तपशिल	वि. वर्ष २०२० -२१ मत्ता / (दायित्व)
१	७	चालु वित्तीय दायित्त्वे - नियामक दायित्त्वे	(१०,४२७)
२	११	तरतूद नसलेले खर्च – कोल पास थ्रू	(१४,४४,६०४.५९)
३	११	तरतूद नसलेले खर्च – स्थिर आकार	(४,३२,७६८)
४	११	तरतूद नसलेले खर्च - कोल डी एफ दायित्व	(२१,०४५.२५)
५	१२	ग्राहकांची सुरक्षा अनामत	(८,३८९.५२)
६	१२	इतर समभाग - कॉर्पोरेट गॅरंटी	(८,१४४.०२)
७		**ठेवून घेतलेली मिळकत**	**(१९,२३,२३६.८१)**

आम्ही कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखापरिक्षणाची मानके यानुसार एकत्रित वि. वि. पत्रकाचे लेखापरिक्षण केले आहे. आमच्या लेखापरिक्षण अहवालात आमची जबाबदारी 'एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाबाबत लेखापरीक्षकांची जबाबदारी' या शीर्षकाखाली विशद केली आहे.

भारतीय सनदी लेखपाल संस्थेने जारी केलेल्या नैतिक संहितेनुसार आम्ही या कंपनी समुहा पासून स्वतंत्र आहोत. त्याचेसह अधिनियम आणि नियमावलीत तरतुदीनुसार एकत्रित वि. वि. पत्रकांचे परिक्षण संबंधी नैतीक गरजांचे पालन करुन आणि इतर नैतीक जबाबदाऱ्या आम्ही पालन केलेले आहे. आमचा विश्वास आहे की या एकत्रित वि. वि. पत्रकांवर आमचे अभिप्राय देणेसाठी आम्ही पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षण पुरावे मिळविले आहेत.	
सतत चालू असणारी कंपनी या विषयीची प्रत्यक्ष अनिश्चिती **महावितरण या उपकंपनी विषयी** टिपा क्र. ५२(१) यात नमूद केल्याप्रमाणे या सूत्रधारी कंपनी समुहाचा ३१ मार्च २०२१ रोजीचा संचित तोटा रु. २५,३२,६२६.९४ लाख (२०१९-२०२० रोजी रु. २४,०१,०११.१९ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. २४,५९,४५९.६० लाख) असून तो समुहाच्या निव्वळ मूल्यापेक्षा ५० टक्के जास्त आहे. ३१ मार्च २०२१ ची चालू दायित्त्वे चालू मत्तापेक्षा जास्त आहेत. मात्र महाराष्ट्र शासन गरज भासेल तेव्हा जादा समभाग निधी देईल अशी अपेक्षा असल्याने, स्वायत्त वि. वि. पत्रकांची मांडणी सतत कार्यरत असलेली संस्था या नुसारच केलेली आहे. आम्ही या विषयी व्यवस्थापनाने केलेले निर्धारण यावर विसंबून आहोत आणि म्हणून या विषयी आमच्या अहवालात सुधारणा केलेल्या नाहीत. या उपकंपनीचे ऋणात्मक (निगेटिव्ह) निव्वळ मूल्य आणि ऋणात्मक प्रवर्तनातील रोकडता प्रवाह असून या उपकंपनीला चालू आणि मागील वर्षातही सातत्याने तोटा झालेला आहे. या बाबी तिच्या अस्तित्वाचा महत्वपूर्ण प्रत्यक्ष अनिश्चिती निर्देशीत करतात आणि उपकंपनीमधे चालू राहण्याच्या पात्रते विषयी लक्षणीय शंका निर्माण करतात आणि त्यामुळे सर्वसाधारण व्यवहार/कार्ये करताना तिचे दायित्वे मिळविण्यास ती सक्षम नसू शकेल असे दर्शवितात.	वस्तूस्थिती
३. भर देण्याची प्रकरणे **मराविमं सुत्रधारी कंपनी लि. च्या प्रकरणी** **आम्ही वित्तीय विवरण पत्रकाच्या टिपामधील खालील विषयांकडे लक्ष वेधू इच्छितो -** ३.१) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा ४७ (अ) यात म्हटले आहे की इतर अंतर्गत स्त्रोतांपासून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे नफा तोटा पत्रकातील संबंधितांच्या व्यवहाराचे विलोपन (एलिमिनेशन) केलेले आहे. यासंदर्भात भा. ले. मानके २४ आणि २५ यानुसार शासकीय कंपन्या / राज्य नियंत्रित उद्योग यांना त्याचे संबंधितांचे सोबतच्या व्यवहाराचे स्वायत्त वि. वि. पत्रकात प्रकट करण्यापासून सूट दिली आहे. म्हणून समूहातील कंपनीच्या उत्पन्न / खर्च यांच्या काही बाबींचे विलोपन केलेले नसल्याने त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकात होऊ शकणारा नेमका परिणाम सांगता येत नाही.	वस्तूस्थिती

३.२) एकत्रित वि. वि. पत्रकांची टिपा ४७ (ब) यात म्हटल्याप्रमाणे उपकंपन्यांचे एकमेकांशी व्यवहारातील आंतर समुहाच्या शिलकीचे विलोपण झाल्यानंतर म्हणजे व्यापारी येणी व्यापारी देणी, कर्जे, उसनवारी यांच्या शिलकीचे एकत्रित वि. वि. पत्रकात जादा / कमी विवरण झालेले आहे. कारण आंतर समूह शिलकीचे विलोपण व्यवस्थापन त्यासाठी समुहातील आंतर कंपनी व्यापारी येणी, देणी यांच्या दि. ३१.३.२०२१ रोजीच्या अखेरच्या शिलकी विचारात न घेता उपकंपन्यांनी नोंदलेले उत्पन्न / खर्च यांच्या रकमांचे विलोपन केले.विलोपनासाठी रक्कमांचा अचूक तपशील उपलब्ध नसल्याने आम्ही यांबाबींचा समुहाच्या मत्ता व दायित्त्वे यावर पडू शकणाऱ्या प्रभावाची निश्चिती करु शकत नाही.	वस्तूस्थिती
३.३) टिपा क्र. ४९(२) (२.२) पहावी. यात कंपनीने अग्रिम कर रु. १,६६७,७१०,८८८ (मागील वर्षी रु. १,६०२,३९३,६०५) पुस्तकातील कर तरतुदींची निव्वळ रु. ४००,७२७,७२९/- आणि निषेध नोंदवून भरलेल्या रकमा रु. २९१,७००,०८१/- अशा दर्शविल्या आहेत. या प्रकरणी दावे दाखल केली असल्याने आयकर अभिलेखांनुसार असे कोणतेही दायित्त्व नाही. लेखावह्यातील तरतूदीची रक्कम केवळ कंपनीच्या न्यायबुद्धीने केली आहे. तर वसुली योग्य रकमा मेळ व पुष्टीकरण होण्याच्या अधीन आहेत.	आयकर विभागाने वि. वर्ष २००५ - ०६ चे बरेच खर्च नामंजूर केले. वर्ष २००५ -०६ पासूनच्या सर्व आयकर प्रकरणे अपील केली आहेत. या विषयी मोठा दंड होणे टाळण्यासाठी व्यवस्थापनाने भाडी आणि व्याज उत्पन्न याविषयी वि. वर्षात दायित्त्व नसले तरी अग्रिम कर भरण्याचे ठरविले आहे. तसे वित्तिय विवरण पत्रकानूसार असे दायित्व नाही.
३.४) टिपा क्र. ४९(५)(५.५) ज्यामध्ये उपकंपन्याकडून मालमत्ता भाड्यापोटीचे थकीत कर्जाच्या रकमा रु. ४,१६,६२,८६,२६६ लाख (मा. वर्षी रु. ३,७१६,८६५,५६७) प्रदीर्घ काळापासून थकीत आहेत. भा. ले. मानक १०९ नुसार अपेक्षित पत हानीची तरतूद लेखावहीत केली आहे.	उपकंपन्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. आमच्या निधीच्या आवश्यकतेनुसार आम्ही आमच्या उपकंपनीकडून निधीची मागणी जेव्हा गरज असेल तेव्हा आधारावर करतो
३.५) असे निरिक्षण आहे की, लेखा वह्यात उपदान आणि रजा रोखीकरण यांच्या तरतूदीमध्ये स्थापत्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तरतूद समाविष्ट आहे. आणि तिची नोंद त्याच्या रुजू होणाऱ्या तारखेपासून आहेत. त्यांच्या मराविम सूत्रधारी क. मध्ये प्रतिनियुक्तीवर येण्यापासून म्हणजे वि. वर्ष २०१३ -१४ पासूनच्या नाहीत.	वस्तूस्थिती
३.६) टिपा क्र. ४३ (ए) पहावा. यात कंपनीने माहिती दिली आहे की भाडेपट्टीने घेतलेल्या जागांसंबंधी वाद असल्याने त्याच्या भाडेपट्टीच्या कालावधीबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे ''मत्ता वापरण्याचा हक्क'' याला मान्यता दिलेली नाही आणि जेथे मत्ता भाडेपट्टीवर आहे तेथे भाडेपट्टी व्यवस्थेला कंपनीने मान्यता दिलेली नाही.	वस्तूस्थिती
३.७) सोबतच्या एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ४९(१०) कडे आम्ही लक्ष वेधतो. यामध्ये व्यवस्थापनेने कोवीड -१९ च्या साथीमुळे लॉकडाउन व इतर बंधने याचा कंपनीवर आलेल्या मर्यादा आणि अनिश्चितता याचे मुल्यांकन केलेले आहे. या प्रभावाचे मुल्यांकन प्रामुख्याने नंतरच्या परिस्थितीवर अवलंबून असेल, त्यावर आमचे पात्र मत नाही.	कंपनीने माहितीच्या अंतर्गत आणि बाह्य स्त्रोताच्या आधारे मालमत्ता, कारखाने व साधने आणि व्यापार येणी रक्कमेवर कोविड -१९ च्या संभाव्य परिणामाचे मूल्यांकन केले आहे आणि वाजवी अंदाज आणि निर्णयांचा वापर करून, या मालमत्तेची वहन रक्कम निश्चिती केली आहे, पूर्नप्राप्त करण्यायोग्य आहेत.

	वरील बाबी आणि कंपन्याच्या कार्यक्षमतेत हळूहळू तरलता स्थिती सूधारत असल्याने नजीकच्या भविष्यकाळात आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात कोणतीही मोठी अनिश्चितता असणार नाही.
महानिर्मिती या उपकंपनीचे प्रकरणी **आम्ही खालील टिपांकडे लक्ष वेधतो -** सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड टिप क्र. ४३(ब) (अ (अ) ही विविध जलविद्युत निर्मिती केंद्राच्या सुविधासाठी महाराष्ट्र शासनासोबत केलेल्या भाडेपट्टी कराराच्या संबंधी आहे. या कराराची अंमलबजावणी अजून प्रलंबित संबंधी आहे. टिपा क्र ५०(१४) ही सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाशी संबंधित आहे. कर्मचाऱ्यांना दिलेल्या काही भत्यांचा समावेश भविष्य निर्वाहनिधी मधे अंशदानासाठी असलेल्या पात्र मिळकती मध्ये करावा असा निर्णय यात देण्यात आला आहे. यासंबंधी व्यवस्थापनाचा दृष्टिकोन निश्चित झालेला नाही. त्यामुळे त्याचा प्रभावाचा अंदाज केला नाही.	वस्तूस्थिती
महागूज कोलायरीज लिमिटेड या उपकंपनी विषयी १. टिपा क्र. ५०(२१) ही महागूज कोलायरीज कंपनीच्या वि. वि. पत्रकांचा भाग आहे. मागील काही वर्षात या कंपनीने मच्छकाटा -महानदी कोळसा खान विकसीत करण्याचा कामात केलेल्या रु. ५४,४०,७०,१११/- एवढ्या खर्चासाठी तरतूद केलेली नाही. मच्छकाटा महानदी कोळसा खान क्षेत्राचे वाटप मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ष २०१४ मध्ये रद्द केले त्यासाठीच्या खर्चाच्या प्रतिपूर्ती बाबत भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने विचार केलेला नाही आणि अजून हे क्षेत्र नव्याने अन्य कुणाला दिलेले नाही. व्यवस्थापनाचे असे मत आहे की सदर क्षेत्रे अन्य कुणा नवीन संस्थेला दिल्यानंतर आणि ते कोळसा मंत्रालयाने मंजूर केल्यानंतर आणि मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच कंपनीच्या लेखा वहयात समायोजन / तरतूद करावी.	वस्तूस्थिती
२. महत्वाच्या लेखा धोरणाच्या परिच्छेद (ड) नुसार, यात महागुज कोलायरीज लिमिटेडचा संचित तोटा आणि पालक कंपनीने दिलेली कर्जे वगळल्यानंतर या कंपनीचे निव्वळ मूल्य पूर्णपणे संपले आहे. या कंपनीचा चालू वर्षीचा आणि मागील वर्षीचा निव्वळ तोटा रु. ३,२७,५६,३९३ आहे आणि ताळेबंद तयार करण्याच्या तारखेस कंपनीची चालू दायित्वे तिच्या चालू मत्तांपेक्षा जास्त झाली आहेत. कार्यरत राहणारी संस्था म्हणून चालू राहण्याची या कंपनीकडे शक्ती असल्याबद्दल या परिस्थितीमुळे प्रत्यक्ष अनिश्चितता निर्माण झाली आहे.	वस्तूस्थिती

मात्र या कंपनीची वि. वि. पत्रके ''चालू संस्था'' या तत्त्वाने केली आहेत. त्याची कारणे या वि. वि. पत्रकांचा भाग असलेल्या कंपनीची महत्त्वाची धोरणे या विषयावरील परिच्छेद (ड) यात दिली आहेत. तथापि,एकत्रित वित्तिय विवरणपत्रकांवर याचा कोणताही परिणाम होत नाही कारण लाइफ बाय लाइन कन्सोलिडेशन सुत्रधारी कंपनीद्वारे केले आहे.	
३. महागुज कोलायरीज लिमिटेड च्या वि. वि. पत्रकाच्या टिपा क्रमांक ४२(ब)(अ)(१)(११) यामध्ये कंपनीच्या विरोधात मेसर्स अदानी इंटरप्राइजेस लिमिटेडने दाखल केलेल्या कायदेशीर खटल्याच्या निकालासंबंधीची अनिश्चितता व्यक्त केली आहे आणि चालू असलेल्या लवाद प्रक्रियेच्या फल निष्पत्ती बाबत वर्णन केलेले आहे. वरील बाबींच्या संदर्भात आमचे पात्रतेचे मत नाही.	वस्तूस्थिती
उपकंपनी (एमएसपीजीसीएल) च्या बाबतीत - **खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात येत आहे.** १. विलंब भरणा आकार (डीपीएस) च्या संदर्भात लेखांकनाशी संबंधित टीप ४२(ड)(क)(ए) कडे लक्ष वेधले आहे. सूत्रधारी कंपनी आणि महानिर्मितीतर्फे व्याजाची गणना करण्यासाठी स्वीकारलेल्या पद्धतीमध्ये फरक आहे. महानिर्मितीच्या देय व्याजांचे विभाजन करून त्याची गणना करण्याऐवजी सूत्रधारी कंपनीने थकित मुद्दल चुकते करण्यासाठी देण्यात आलेल्या रकमांचे विभाजन करून त्यावर विलंब भरणा आकाराची गणना केली आहे. याशिवाय बिलिंगमध्ये काही फरक आहेत. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली गेली आहे.	वास्तविक आणि मा.वि.नि. आयोगाच्या नियमनाखालील विलंब भरणा आकाराच्या तरतूदीनुसार, महावितरणने विलंब भरणा आकाराची गणना केली आहे. तथापि भरणा विनियोगाची पद्धत वीज खेरेदी करारामध्ये परिभाषित केलेली नाही. म्हणून महावितरणने प्रथम मूद्दल या तत्वानूसार भरणा विनियुक्त केले आहे आणि शिल्लक जर असेल तर, त्यानंतर विलंब भरणा आकाराच्या विरूद्ध समायोजन केले जाईल. याशिवाय काही इतर देयकांत फरक आहेत. त्यानूसार महावितरणने विलंब भरणा आकाराच्या दायित्वाची पुर्नगणना केली आहे आणि त्याचा हिशोब पुस्तकांमध्ये केला आहे. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली गेली आहे.
२. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडशी संबंधित विलंब भरणा आकारसाठी सूत्रधारी कंपनीच्या संदर्भात टीप ४२(ड)(क)(ब) कडे लक्ष वेधण्यात आले आहे. सूत्रधारी कंपनीतर्फे विलंब भरणा आकार माफ करण्याचा निर्देश असूनही ३१ जुलै २०१५ रोजी देय असलेल्या मुद्दलाच्या रक्कमेवर विलंब आकाराची मागणी महापारेषणतर्फे केली जात आहे. याशिवाय काही अन्य मुद्यावर वाद असून त्यावर अद्याप तोडगा निघालेला नाही. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली गेली आहे.	वास्तविक आणि मा.वि.नि. आयोगाच्या नियमनाखालील विलंब अदा आकाराच्या तरतूदीनुसार, महावितरणने विलंब भरणा आकाराची गणना केली आहे. तथापि भरणा केलेल्या रक्कमेच्या विनियोगाची पद्धत वीज विक्री करारामध्ये परिभाषित केलेली नाही. म्हणून महावितरणने प्रथम मूद्दल या तत्वानूसार भरणा केलेल्या रक्कमेचे विनियोग केले आहे आणि बाकी, जर असेल तर, त्यानंतर विलंब भरणा आकाराच्या विरूद्ध समायोजन केले जाईल. याशिवाय काही इतर देयकातील फरक आहेत. त्यानूसार महावितरणने विलंब भरण आकाराच्या दायित्वाची पुर्नगणना केली आहे आणि त्याचा हिशोप पुस्तकामध्ये केला आहे. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली आहेत.

३. वर्षाच्या शेवटी सूत्रधारी कंपनीच्या निव्वळ संपत्तीच्या संबंधित महत्त्वपूर्ण असलेल्या आकस्मिक दायित्वांच्या संदर्भात टिपा क्र. ४२(ड) व्दारे लक्ष वेधण्यात आले आहे.	व्यवस्थापनाच्या मतानूसार, हे एक आकस्मिक दायित्व आहे. यामुळे कंपनीला कोणतीही मोठे आर्थिक उत्तरदायित्वे उद्भ्रण्याची अपेक्षित नाही.
४. टीपा क्र.४८ (ड) (अ) (८) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीने आयकर कायदा १९६१ कलम ११५ बीएए अंतर्गत पर्याय विचारात घेऊन त्या वर्षासाठी दाखल केलेल्या उत्पन्नाच्या परताव्याच्या आधारे आर्थिक वर्ष २०१९ -२० शी संबंधित रु. ११०७४ लाखाची आयकर तरतूद उलट फिरवली आहे.	निर्धारण वर्ष २०२० -२१ चे आयकर परतावा भरताना, महावितरणने निर्धारण वर्ष २०२० -२१ पासून म्हणजे वित्तिय वर्ष २०१९ -२० पासून आयकर कायदा, १९६१ च्या ११५ बीएए अंतर्गत कमी दराने घरगूती कंपन्याच्या कर आकारणीचा पर्याय घेतला आहे. कोणतेही करपात्र उत्पन्न देय नसल्याने देय आयकर शून्य होता. त्यामुळे चालू वर्षात रु. ११,०७४ लाखाच्या तरतूदीमध्ये उलटफेर केली आहे.
५. एकत्रित विवरण पत्रकातील टिपा ५२(९) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, भा.ले.मानके १०९ नुसार सूत्रधारी कंपनीने अपेक्षित पत हानी (कालापव्यय) साठी २,३७८.०२ लाखांची (२०१९ -२० मध्ये रु. १०६९.४३ लाख, २०१८ -१९ मध्ये रु. २५५१.४३ लाख) तरतूद केली आहे. थकबाकीच्या प्रारंभीच्या तारखेपासून ही तरतूद करणे अव्यवहार्य असल्याने थकबाकीवर प्राप्त करण्यायोग्य इतर कर्जांसाठी एक एप्रिल २०१५ ही संक्रमण तारीख निश्चित करून ही तरतूद करण्यात आली आहे.	कंपनीने भारतीय लेखा मानक १०९ अंतर्गत इतर कर्ज येणीवर अपेक्षित कालापव्यय साठी तरतूद केली आहे जी भारतीय लेखा मानकाच्या लागू होण्याच्या तारखेपासून म्हणजे ०१.०४.२०१५ पासून अव्यवहार्यतेमुळे मिळू शकते.
६. टिपा क्र ४२(ड)(ए)(१)(ए)(५) कडे लक्ष वेधण्यात आले आहे, मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को -ऑपरेटिव्ह सोसायटी द्वारे सेवा पुरवलेल्या भागात सध्या सूत्रधारी कंपनी वीज पुरवठा करत आहे आणि या उद्देशासाठी मुळा -प्रवराच्या पायाभूत सुविधांचा वापर करत आहे. वापरकर्ता शुल्क भरण्याशी संबंधित प्रकरण वादात आहे. विवादाचे प्रलंबित निराकरण आणि आवश्यक कराराच्या अनुपस्थितीत, भा. ले.११६ च्या लागू होण्याबाबतचे मूल्यांकन केले गेले नाही.	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार कंपनीने मूळा प्रवराच्या पायाभूत सूविधा वापरण्यासाठी मासिक वापरकर्ता शुल्क भरत आहे. वापरकर्ता शुल्क भरण्याच्या संबंधित प्रकरण वादात आहे. वरील बाबी लक्षात घेता कंपनीने भारतीय लेखा मानक ११६ ला लागू केलेले नाही.
७) कोविड १९ च्या प्रादूर्भावानंतर समुहाच्या प्रवर्तनामध्ये मूल्यांकनांवर टीपा क्र.५२(३२) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. वरील (१) ते (७) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींच्या संदर्भात आमचे मत बदलेले नाही.	वस्तूस्थिती
४) लेखापरिक्षणातील महत्त्वाचे विषय **महानिर्मिती या उपकंपनी विषयी** उपकंपनी महानिर्मिती प्रकरणी लेखा परिक्षण विषयक महत्वाची प्रकरणे म्हणजे अशा बाबी की ज्या विद्यमान काळातील एकत्रित वि. वि. पत्रकाच्या आम्ही केलेल्या लेखा परिक्षणात आमच्या व्यावसायिक निर्णय बुद्धीच्या मते आम्हास अधिक महत्वाची वाटली. आम्ही एकत्रीत पत्रकाचे वि. वि. पत्रकाचे संपूर्ण लेखापरिक्षण केले त्यात या महत्त्वाच्या बाबीत आम्ही विशेष लक्ष दिले. आमचे मत निश्चित करतांना आम्ही त्याचा वेगळा अभिप्राय दिलेला नाही. सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी या वर्षात खालील बाबी लेखापरिक्षण दृष्ट्या महत्वाची निश्चित केल्या आहेत	वस्तूस्थिती

१) आकस्मिक दायित्त्वे / आकस्मिक मत्ता कंपनीच्या विरोधात विविध मंचासमोर बरीच कायदेविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत. यातील आकस्मिक दायित्वातील रकमांचे प्रकटन करण्यासाठी व्यवस्थापनाने न्यायबुद्धीने केलेले अंदाज आवश्यक आहेत. कोळसा कंपन्यांनी महानिर्मिता कंपनीच्या वर विविध दावे केले आहेत. तसेच व्यवस्थापनाने सुद्धा आपल्या भूमिकेनुसार अनेक प्रतिदावे कोळसा कंपन्यावर दाखल केले आहेत. आम्ही सदर बाबींना आमच्या लेखा परिक्षणातील महत्वपूर्ण बाब मानले आहे, कारण या प्रकरणांचा योग्य अर्थ लावण्यासाठी आणि त्यांच्या आधारे रकमांचे अंदाज करण्यासाठी उच्च दर्जाचे व्यवस्थापकीय अंदाज आवश्यक आहेत. या बाबी व्यवस्थापनाच्या पूर्वग्रहाचा प्रभाव पडू शकतो. असे दावे आणि प्रतिदावे यासाठी विविध विषयांवर व्यवस्थापनाने केलेले अंदाज आणि लावलेले अर्थ याची गरज असते. तसेच त्यात इतर समस्याही गुंतलेल्या असू शकतात. आणि त्याचे स्वरुप व्यक्तिनिष्ठ असू शकते. (संदर्भ - एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४२ (ब) (अ) (१) आणि टिपा क्र. ४२ (ब) (अ) (१) (४), महानिर्मितीचे महत्वाचे लेखा धोरण क्र १९ सोबत वाचावी.) आम्ही कंपनीच्या अंतर्गत सूचना आणि कार्यपद्धती यामध्ये आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता या विषयीचे अंदाज आणि प्रकटने याविषयीची माहिती मिळविली आणि त्यादृष्टीने लेखा परिक्षणाच्या खालील कार्यपद्धती तयार केल्या. - व्यवस्थापनाने प्रलंबित खटल्या संबंधिची सर्व माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली कार्यद्धती आणि नियंत्रणे यांच्या रचना समाजावून परिक्षण केले. - कायदेविषयक बाबींमधील महत्वाच्या घडामोडी आणि विद्यमान स्थिती या बाबत व्यवस्थापनाशी चर्चा केली. - कायदेविषयक प्रकरणे आणि त्यावर बाहेरची मते (जर असल्यास) या संबंधीचा पत्रव्यवहार व संबंधित कागदपत्रे व्यवस्थापनाकडू मिळवून त्याचे वाचन केले. आकस्मिक दायित्त्वे व मत्ता प्रकटनासाठी पुष्टीदायक महत्वपूर्ण पद्धती व गणना समजवून घेतल्या. - यासाठी तरतूदी करणे आवश्यक आहेत, किंवा कसे यावर व्यवस्थापनाने केलेले न्यायनिर्णय आणि मूल्यांकन यांचे परिक्षण केले. - प्रकटनांचा पुरेसेपणा आणि पूर्णता यांचा आढावा घेतला. वरील कार्यपद्धतीच्या आधारे आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता या पुरेशा आणि प्रमाणशीर आहेत.	वस्तूस्थिती

उपकंपनी - धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड अ) सतत चालू असणारी कंपनी या विषयी प्रत्यक्ष अनिश्चिती या उपकंपनीचे लेखे चालू असलेली कंपनी या तत्त्वानुसार केलेली नाहीत. कारण व्यवस्थापनने ती बंद करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी शासकीय परवानगीची प्रतिक्षा आहे.(महत्वाचे लेखा धोरणातील परिच्छेद ड नुसार).	वस्तूस्थिती
व्यवसाय मॉडेडलवर कोविड -१९ चा परिणाम ही कंपनी सध्या मृतप्राय अवस्थेत असून 'सतत चालू असणारी कंपनी' या तत्वावर तिचे वित्तीय विवरण पत्रक तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कंपनीच्या व्यवसायावर कोव्हिड -१९ चा कोणताही परिणाम नाही.	वस्तूस्थिती
क) रु. ८.२३ कोटींच्या प्रगतीपथावरील कामांचे निव्वळ प्राप्य मूल्य निरंक - चालू नसलेल्या मत्तांच्या वर्गवारीतील प्रगतीपथावरील कामांचे मूल्य रु. ८.२३ कोटी असले तरी निव्वळ प्राप्य मूल्य निरंक आहे. कारण ज्या प्रकल्पासाठी हा खर्च करण्यात आला तो आता गुंडाळण्यात आला आहे. तथापि, याचा एकत्रित वित्तिय विवरणावर कोणताही परिणाम होत नाही कारण लाइन बाय लाइन कन्सोलिडेशन''सुत्रधारी कंपनीद्वारे केले जाते.	वस्तूस्थिती
महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लि. या उपकंपनी प्रकरणी या उपकंपनीला रु. ५,०५४ चा तोटा झाला आहे आणि ३१.०३.२०२१ रोजी संचित तोटा रु. १,४७,०२,९८६ इतका आहे. यामुळे कंपनीच्या निव्वळ संपत्तीची ऱ्हास झाली आहे. त्यामुळे कंपनीच्या 'सतत चालू असणारी कंपनी' च्या तत्वानुसार प्रभाव होतो. आम्ही तांत्रिक गोष्टी समजून घेण्यासाठी व्यवस्थापनाशी चर्चा केली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. आगामी काळात विविध कामे आणि प्रकल्प राबवण्याची व्यवस्थापनाची योजना आहे आणि कंपनीचा व्यवसाय आणि स्थिती पाहता, कंपनीने 'सतत चालू असणारी कंपनी' या संकल्पनेच्या आधारावर केली आहेत. कोविड - १९ मुळे उदभवलेल्या गुंतागुंती प्रस्तूत अहवालात व्यक्त केलेले मत प्रामुख्याने व्यवस्थापनाने आम्हाला इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या माहिती, तथ्ये आणि पुरविलेल्या तपशीलावर आधारित आहे. म्हणून लेखापरिक्षणाच्या संदर्भात लेखापरिक्षण प्रक्रिया पार पाडण्यासाठी आम्हाला डिजिटलरित्या प्रदान केलेल्या माहितीवर विसंबून होतो. याशिवाय व्यवस्थापनाच्या अंदाजानुसार भारताच्या केंद्र सरकारद्वारा लादलेल्या लॉकडॉउनमुळे आणि जागतिक स्तरावर पसरलेल्या साथीच्या आजारामुळे प्रकल्पाच्या संचालनास/अंमलबजावणीस आणखी विलंब होऊ शकतो.	वस्तूस्थिती

आम्ही तुमचे लक्ष त्या उपकंपन्याच्या लेख्याच्या टिपा क्र. ५०(१२) कडे वेधतो, ज्यामध्ये वित्तिय विवरणपत्रे तयार करण्यात काही अंदाजाच्या विकासामध्ये गुंतलेल्या महत्त्वपूर्ण अनिश्चिततेवर कोविड १९ साथीच्या रोगाचा आणि परिणामी लॉकडाऊनच्या प्रभावाचे व्यवस्थापनाच्या मुल्यांकनांचे वर्णन आहे, ज्यामध्ये तरलतेचे मुल्यांकन करणे आणि त्याच्या पूर्नप्राप्त करण्यायोग्य मूल्याचा समावेश आहे. परंतु त्यापुरते मर्यादित काही त्याची मालमत्ता आणि इतर मालमत्तेच्या निव्वळ प्राप्तीयोग्य मूल्य तारखेपर्यंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, व्यवस्थापनाचा असा विश्वास आहे की वित्तिय विकासामध्ये आणखी कोणतेही समायोजन आवश्यक नाही वरिल विषयावर आमचे पात्र मत नाही. मात्र या सर्व घटकांचा एकत्रित विवरण पत्रकावर काहीही परिणाम होणार नाही. कारण सूत्रधारी कंपनीने 'लाईन बाय लाईन' एकत्रीकरण केलेले आहे.	
५) एकत्रित वि. वि. व्यतिरिक्त माहिती विषयी लेखापरिक्षकांचा अहवाल कंपनी समुहाचे संचालक मंडळ अन्य माहितीसाठी जबाबदार आ. या इतर माहितीमध्ये संचालकांचा अहवाल समाविष्ट होतो, मात्र त्यात एकत्रित वि. वि. आणि त्यावर आमची मते यांचा समावेश नसतो. एकत्रित वि. वि. वर आम्ही दिलेल्या मतांमध्ये इतर माहिती वरील मतांचा समावेश नसतो. आणि त्यावर आमची निष्कर्षात्मक हमीही नसते. एकत्रित वि. वि. च्या आमच्या लेखा परिक्षणाच्या बाबत आमची जबाबदारी पुढील प्रमाणे आहे. वरील प्रमाणे निश्चित केलेली इतर माहिती जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा तिचे वाचन करणे, आणि इतर माहिती ए. वि. वि. शी विसंगत आहे किंवा कसे हे तपासणे किंवा आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान किंवा अन्य प्रकारे आम्ही जी माहिती मिळविली आहे, त्याच्याशी तुलना करून मोठ्याप्रमाणात गैरविवरण आहे किंवा कसे हे तपासणे. जर आम्ही केलेल्या कामाच्या आधारे आमचा निष्कर्ष इतर माहितीमधे मोठ्या प्रमाणात गैरविवरण झालेले आहे असे असेल तर लेखा परिक्षकांच्या इतर माहिती विषयीच्या जबाबदाऱ्या, यातील सूचनेप्रमाणे आम्ही हे प्रकरण प्रशासनातील संबंधितांना कळविले आहे. आम्हाला सूचित करण्यात आले आहे की, सूत्रधारी कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी संचालकांचा अहवाल आणि संबंधित परिशिष्टे अंतिम केली जातील आणि संचालक मंडळाच्या बैठकीत स्वीकारली जातील. त्यामुळे आम्ही आत्ताच त्यावर काहीही अभिप्राय देऊ शकत नाही.	वस्तूस्थिती

६) एकत्रित वि. वि. पत्रकासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी	वस्तूस्थिती
या समुहाचे संचालक मंडळ हे कंपनी अधिनियम १३४(५) यात नमूद केलेल्या विषयांसाठी जबाबदार आहेत. यामध्ये भा. ले. मानके आणि इतर भारतात सर्व सामान्यपणे स्वीकारलेली लेखा धोरणे यांचा आणि अधिनियमांच्या कलम १३३ ज्याचे वाचन कंपन्यांचे (लेखे) नियमावली २०१५ यातील नियम ०७ सोबत केले जाते. (दुरुस्ती केल्याप्रमाणे) यात विनिर्देशित केल्याप्रमाणे या कंपनी समुहाचा एकत्रित वित्तीय कामगिरी, एकत्रित वित्तीय स्थिती, एकत्रित सर्वकष समभागातील एकत्रित बदल आणि एकत्रित रोकडता प्रवाह यांचे सत्य आणि रास्त दर्शन घडविणारे एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करणे याची जबाबदारी आहे समूहातील समाविष्ट कंपन्यांचे संबंधित संचालक मंडळ हे अधिनियमातील तरतुदीनुसार समुहातील लेख्यांचे दस्तऐवजांचे जतन करणे आणि मत्ता सुरक्षित सांभाळणे आणि त्यातील होऊ शकणाऱ्या लबाड्यांना आळा घालणे, आणि अशा लबाड्या आणि इतर अनियमितता शोधणे तसेच योग्य लेखा धोरण निवडून ते अंमलात आणणे याला जबाबदार आहेत . यासाठी त्यांना योग्य आणि सूज्ञ न्यायनिर्णय आणि अंदाज करावे लागतात आणि पुरेसे लेखा नियंत्रणे तयार करुन त्याची अंमलबजावणी करुन ती योग्य प्रकारे कार्यरत ठेवणे, आणि त्यातून लेख्यांच्या दस्तऐवजांची अचूकता आणि पुरेसेपणा याची हमी मिळविणे आणि त्याद्वारे कंपनीची सत्य व रास्त दर्शन घडविणारी आणि लबाडी किंवा चूक भूल त्यामुळे होणारे गैर विवरण नसलेली भा. ले. मानके नुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करुन ती सादर करणे. एकत्रित वि.वि.पत्रके तयार करताना समुहातील समाविष्ट कंपन्याचे संचालक मंडळ, याचे वर या समुहाची चालू असणारा समुह आहे, याचे निर्धारण करण्याची जबाबदारी असते. चालू असलेली संस्था या विषयीच्या लागू होणाऱ्या माहितीचे प्रकटन करावे लागते त्यासाठी चालू असणे या आधारे केलेले लेखे वापरावे लागतात. जर व्यवस्थापनास समुहाचे परिसमापन करावयाचा हेतू असेल किंवा काम थांबविण्याचे किंवा तसे करण्याशिवाय अन्य कोणताही वास्तववादी पर्याय नसेल तर वरील ठेवण्यासंबंधीची कृती करावी लागणार नाही. समूहातील संबंधित कंपन्यांचे संबंधित संचालक मंडळाकडे समुहाची वित्तीय अहवाल देण्याच्या प्रक्रियेकडे सुद्धा लक्ष देण्याची जबाबदारी असते.	

७) एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचे लेखा परिक्षणाबाबत लेखापरिक्षकांची जबाबदारी आमच्या लेखापरिक्षणाचे उद्दिष्ट आहे की, ही एकत्रित वि. वि. पत्रके संपूर्णत - कोणत्याही मोठ्या गैर विवरणापासून मुक्त आहेत किंवा कसे याची योग्य कारणासह हमी मिळविणे आणि लेखा परिक्षणाच्या अहवाल देऊन आमची मते व्यक्त करणे (गैरविवरणे लबाडी किवा त्रुटीमुळे होऊ शकतात) प्रमाणानुसार दिलेली योग्य हमी म्हणजे उच्च स्तरावरुन दिलेली खात्री असते. मात्र अशी हमी म्हणजे कोणतेही लेखा परिक्षण हे भारतीय लेखे मानके यांना तंतोतंत अनुसरुन केलेली असूनसुद्धा गैर विवरणाचा शोध लावू शकेल, याची खात्री देणे नव्हे. गैरविवरण लबाडी किंवा त्रुटी यामुळे उद्भवते. आणि अशी कृती व्यक्तीश - किंवा काही जणांनी मिळून केलेली असू शकते. एकत्रित वि. वि. पत्रकाच्या वापर करुन आर्थिक निर्णय घेणाऱ्याच्यावर त्याचा प्रभाव पाडू शकतो. १) एकत्रित वि. वि. पत्रकातील लबाडीमुळे किंवा त्रुटीमुळे झालेले गैर विवरणाच्या जोखिमा शोधणे आणि त्याची ओळख निश्चिती आणि मूल्यांकन करणे. या जोखिमाबाबत प्रतिसादात्मक ठरेल अशा लेखा परिक्षण पद्धतीची रचना आखणे आणि त्यानुसार लेखापरिक्षण करणे त्यातून आमच्या मताना पुष्टी देणारे लेखापरिक्षणाचे योग्य आणि पुरेसे पुरावे मिळविणे. लबाडीने केलेल्या मोठे गैर विवरण शोधून काढणे हे काम त्रुटीमुळे झालेल्या गैरविवरणापेक्षा अधिक जोखिमेचे असते. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट कागदपत्रे तयार करणे, हेतूपुरस्सर दिशाभूल करणे, माहिती न दाखविणे चुकीची निवेदनपत्रे देणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे याचा अंतर्भाव होतो. २) अंतर्गत वित्तीय नियंत्रणेही लेखापरिक्षणासंबंधी असून त्याद्वारे परिस्थितीनुरुप लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना करण्यास योग्य असल्याची ग्वाही मिळविणे. अधिनियमाचे कलम १४३(३) (१) यानुसार, आम्ही या समुहातील सबंधित कंपनी व तिच्या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या यामध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असून एकत्रित वि. वि. पत्रकाच्या संदर्भानुसार वित्तीय अहवाल देण्यासाठी ती प्रभावी व योग्य आहेत किंवा कसे यावर आमचे मत व्यक्त करण्यासठी आमच्यावर जबाबदारी आहे. ३) व्यवस्थापनांकडून वापरण्यात येणाऱ्या लेखा धोरणांच्या योग्यताचे, लेख्यांच्या अंदाजांची वाजवीपणा आणि समुहाच्या व्यवस्थापनाने केलेली संबंधित प्रकटने यांचे मूल्यांकन करणे. ४) व्यवस्थापनाने, कंपनीसमूह हा सतत चालू ठेवण्याच्या स्थितीत आहे अशा प्रकारे व्यवस्थापनाने लेखे केले आहेत. याबाबत निष्कर्ष काढणे, आणि आम्ही मिळविलेल्या लेखा परिक्षणाच्या पुराव्याच्या आधारे मोठ्या प्रमाणातील संबंधित घटना किंवा स्थिती यांच्यामुळे समुहाचे कार्य चालू राहण्याबाबत काही अनिश्चिता आहे आणि बराच संशय वाटतो किंवा कसे यावर अभिप्राय देणे.	वस्तूस्थिती

जर अशी मोठ्या प्रमाणात अनिश्चिती असल्याचे आमचे मत झाले तर आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालात त्याकडे आम्हाला लक्ष वेधावे लागते किंवा या विषयी प्रकटने अपूरी असल्यास आमच्या मतांमध्ये सुधारणा करावी लागते. 'सतत चालू असणारी कंपनी विषयी प्रत्यक्ष अनिश्चितता' यावरील आमच्या अहवालात परिच्छेद संदर्भासाठी वाचावा. आमचे निष्कर्ष हे आम्ही लेखा परिक्षणाच्या अखेरच्या तारखेपर्यंत मिळविलेल्या लेखा पुराव्यांच्या आधारे व्यक्त केले जातात. मात्र, भविष्यात घडणा -या घटनांमुळे समुहाचे काम चालू राहणे बंद होऊ शकते. ५) वि. वि. पत्रकांचे सादरीकरण, रचना आणि त्यात अंतर्भूत बाबी तसेच प्रकटने याचे समग्र मूल्यांकन करणे आणि व्यवहार व घटना यांचे उचित सादरीकरण वि.वि. पत्रकात झाले आहे किंवा कसे हे तपासणे. ६) समुहातील कंपन्यांची वित्तीय माहिती तसेच अंतर्गत उद्योगातील कार्य यासंबंधी पुरेसे आणि योग्य लेखा परिक्षणाचे पुरावे मिळविणे आणि एकत्रित वि. वि. वर मत व्यक्त करणे. अशा एकत्रित वि. वि. मध्ये समाविष्ट कंपन्या संस्था यांचे मागदर्शन पर्यावेक्षण कामगिरी याचीही आमच्यावर जबाबदारी असते. भौतिकता म्हणजे एकत्रित वित्तीय विवरणापत्रामधील चुकीच्या विधानांचे परिणाम आहे. जे वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे एकत्रित वित्तिय विवरणपत्राचे वाजवी ज्ञान असलेल्या वापरकर्त्याच्या आर्थिक निर्णयावर प्रभाव टाकण्याची शक्यता निर्माण करते. यामध्ये आम्ही परिणामकारक भौतिकता आणि गुणात्मक घटकांचा विचार करतो (१) आमच्या लेखापरिक्षण कार्याच्या व्याप्तीचे नियोजन करताना आणि आमच्या कामाच्या परिणांमाचे मुल्यमापन करताना (२) एकत्रित वित्तिय विवरणपत्रावर शोधलेल्या कोणत्याही चूकीच्या विधानांच्या परिणामाचे मुल्यांकन करण्यासाठी तसेच इतर बाबींसह लेखापरिक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ आणि महत्त्वपूर्ण लेखापरिक्षण निष्कर्षाबाबत संवाद साधतो. आम्ही प्रशासनाचे कर्ते यांच्याशी इतर विषयासोबतच आमच्या लेखा परीक्षणात आम्ही शोधलेल्या अंतगत नियंत्रणाच्या उणीवा यावर चर्चा करतो तसेच अशा प्रशासनच्या प्रमुखांना आम्ही निवेदन देतो की आम्ही स्वातंत्र्यासंबंधीच्या नैतिक गरजांची पूर्तता केलेली आहे. तसेच आमच्या स्वातंत्र्याच्या संबंधित सर्व विषयांवर चर्चा करतो अशा लागू होणाऱ्या संबंधित सुरक्षेच्या बाबी याची माहिती देतो. प्रशासनाचा भार सांभाळणाऱ्याशी चर्चा केल्यानंतर आम्ही एकत्रित वि. वि. च्या अंत्यंत महत्वाच्या बाबी आणि लेखा परिक्षणातील महत्वाचे विषय निश्चित करतो.	

त्याचे लेखा परिक्षकांच्या अहवालात वर्णन करतो मात्र जर जे विषय सार्वजनिकरीत्या जाहीर करण्यास कायद्याने मनाई असेल तर त्या बाबीचे प्रकटन टाळण्यात येतात. तसेच काही दुर्मिळ परिस्थितीत असे प्रकटने केल्याने लोकहित साध्य होण्यापेक्षा अधिक अन्य काही विपरीत परिणाम घडतील असे वाटत असेल तर तसे विषय आमच्या अहवालात न कळविण्याचा निर्णय आम्ही घेतो.	
८) इतर विषय **मराविमं सूत्रधारी कं. लि.च्या प्रकरणी** आम्ही या कंपनी समुहातील तीन उपकंपन्या म्हणजे महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण आणि इतर समुहातील त्यांच्या कंपन्या यांचे एकत्रित / स्वायत्त वि. वि. पत्रकाचे लेखा परिक्षण केलेले नाही. त्याच्या वि. वि. पत्रकातील एकूण मत्ता रु. २,४३,५४४.९३ कोटीच्या असून महसूल रु. १,०८,०९०.३४ कोटी आहे. (कमी करण्यापूर्वीचा) असे एकत्रित वि. वि. मध्ये दिसते. या वित्तीय विवरणामध्ये / वित्तीय माहितील लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केले असून व्यवस्थापनाने त्याचे अहवाल आम्हाला पुरविले. आणि एकत्रित वि. वि. वरील आमचे अभिप्राय या उपकंपनीच्या रकमा आणि प्रकटने याच्याशी त्याप्रमाणे संलग्न आहेत आणि अधिनियमाचे कलम १४३(३) आणि (११) यानुसार आमचे अहवाल उपकंपन्यांच्या इतर लेखापरिक्षकांच्या अहवालावर आधारीत आहेत. वरील विषयावर आमचे पात्र मत नाही.	वस्तूस्थिती
महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी **सुत्रधारी कंपनीच्या महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित** या वर्षी कोविड -१९ साथ रोखण्यासाठी शासनाने संपूर्ण लॉकडाऊनचा अंमल लागू केला होता. त्यामुळे सुत्रधारी कंपनीच्या लेखा परिक्षणासाठी आम्ही कंपनीच्या कोणत्याही कारखान्याला किंवा जागांना प्रत्यक्ष भेट देऊ शकलो नाही. अहवालाच्या वर्षात सांविधिक लेखा परिक्षणाचे काम 'घरी थांबून काम करणे' या तत्वानुसार करण्यात आले म्हणजेच कारखाने किंवा कंपनी कार्यालयात जाऊ न शकल्याने व्यवस्थापनाने डिजिटल माध्यमातून म्हणजे डॅश बोर्ड व्हाया व्ही पी एन लिंक मधून सॅप प्रणालीत आम्हाला प्रवेश देत वित्तीय डेटा / माहिती/ अभिलेख /आधारभूत सामग्री उपलब्ध केली. त्याच्या आधारे सांविधिक लेखा परिक्षणाचे काम आम्ही केले.	वस्तूस्थिती
२) कंपनीचे अंतर्गत लेखा परीक्षणाचे काम सनदी लेखापालांच्या बाह्य संस्थेद्वारे केले जाते. त्याचे चालू वित्तीय वर्षातील पहिल्या दोन तिमाहीचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करुन दिले. काही प्रकल्प आणि स्थळांचे चालू वित्तीय वर्षातील तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीचे अहवाल कोविड १९ लॉकडाऊनमुळे उपलब्ध झाले नाहीत.	वस्तूस्थिती

३) यातील ०३ उपकंपन्याच्या वित्तीय विवरण पत्रकाचे /वित्तीय माहितीचे लेखा परिक्षण आम्ही केले नाही. त्यामध्ये ३१ मार्च २०२१ रोजी एकूण मत्ता रु. ६२.८४ कोटी, एकूण महसूल रु. ७०१४८ कोटी आणि निव्वळ रोकडता प्रवाहातील आवक या तारखेला संपलेल्या वर्षी रु. २०५६ कोटी होती असे एकत्रित वि. वि. मध्ये आहे.	वस्तूस्थिती
४) या एकत्रित वि. वि. मध्ये ३१ मार्च २०२१ रोजीच्या निव्वळ तोट्यात समुहाचा वाटा रु. ०.०५ कोटी असून तो व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या अलेखापरिक्षित वि. वि. पत्रके/ अलेखापरिक्षित वित्तीय माहितीवर आधारित आहे.	वस्तूस्थिती
५) आम्ही नमूद करतो की या तीन उपकंपन्यांची वि. वि. पत्रके / वित्तीय माहिती यांचे लेखा परिक्षण आम्ही केले नाही. तर ते अन्य लेखा परिक्षकांनी केले असून व्यवस्थापनाने त्यांचे लेखा परीक्षण अहवाल आम्हाला व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिले व आमचा अहवाल तयार करताना त्यांचा आम्ही अभ्यास केला आहे. दोन सहयोगी कंपन्याचे वि. वि. पत्रके /वित्तीय माहिती ही त्यांच्या हंगामी अलेखापरिक्षित वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहिती यांच्यावर आधारित आहे. ही माहिती आम्हाला व्यवस्थापनाने दिली.	वस्तूस्थिती
६) उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यांच्या उपरोक्त रकमा आणि प्रकटने यांच्या संदर्भात एकत्रित वि. वि. मधे आम्ही दिलेले मत आणि अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम (३) नुसार आमचा उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांच्या विषयीचा अहवाल हा पूर्णपणे इतर लेखा परिक्षकांच्या अहवालावर अवलंबून आहे. आम्ही इतर लेखा परिक्षकांचे अहवाल, त्यांचे काम आणि व्यवस्थापनाने प्रमाणित केलेले वित्तीय विवरण पत्रे/वित्तीय माहिती यावर विसंबून आहोत. त्यामुळे एकत्रित वित्तीय विवरणांवरील आमचे मत आणि इतर कायदेशीर व नियमनांच्या आवश्यकतेवरचे आमचे अहवाल हे 'पात्रतेचे मत' नाहीत	वस्तूस्थिती
महापारेषण या उपकंपनीच्या प्रकरणी जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड (जे. पी. टी. एल.) आणि महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एम.टी. सी. आय. एल.) या भारतातील सहयोगी कंपन्याचे लेखा परिक्षण आम्ही केलेले नाही. त्याचे वित्तीय विवरण पत्रकात त्या तारखेला संपलेल्या वर्षाच्या अखेर करोत्तर निव्वळ नफा रु. ६५४.९९ लाख दिसतो. तसे एकत्रित वि. वि. मधे विचारात घेतलेले आहे. या वि. वि. पत्रकाचे लेखापरिक्षण अन्य लेखापरिक्षकांनी केले आहे. त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हास दिले. त्यामुळे एकत्रित वि. वि. वरचे या रकमेच्या व प्रकटनाचा संबंधातील आमचे मत आणि अधिनियमाच्या कलम १४३ नुसार आमचे वरील कंपन्याबाबत अहवाल हे पूर्णपणे अन्य लेखापरिक्षकांच्या अहवालावर आधारीत आहेत.	वस्तूस्थिती

१) भा. ले. मानकानुसारच्या एकत्रित वि. वि. पत्रक तयार आणि सादर करणे यांचा आधारातील परिच्छदेतील महत्त्वपूर्ण लेखा धोरणांमधील परिच्छेद ब कडे लक्ष वेधतो. कंपनीने तिच्या संपूर्ण मालकीची एक उपकंपनी जिचे नाव 'खारघर विक्रोली ट्रान्समिशन प्रा. लि. (के. व्ही.टी.पी.एल.)' आहे, या समुहात समाविष्ट केलेली नाही. म्हणून याविषयी आमच्या मतात सुधारणा केलेली नाही.	
२) या वर्षी कोवीडसाठी शासनाने संपूर्ण लॉकडाऊन लागू केल्याने अहवाल वर्षातील लेखापरिक्षण प्रक्रियेचे अंतिमीकरण दूरवरून करण्यात आले. (म्हणजेच कंपनीच्या कार्यालया व्यतिरिक्त अन्य जागेवरुन) या साठी व्यवस्थापनाने डिजीटल माध्यम उपलब्ध करुन दिलेली आधार सामग्री (डेटा) उपलब्ध व शक्य होईल तेव्हढे तपशील आणि वित्तीय माहिती/अहवाल या मर्यादेत हे काम केले. लेखा परीक्षणादरम्यान आवश्यक माहितीची खातरजमा आणि पर्यायी पद्धतीने केली.	वस्तूस्थिती
महावितरण या उपकंपनीच्या प्रकरणी या उपकंपनीच्या स्वायत्त वि. वि. पत्रकाचे आणि अन्य माहितीचे आम्ही लेखापरिक्षण केलेले नाही. त्यांच्या वि. वि. पत्रकात ३१ मार्च २०२१ रोजी एकूण मत्ता रु. १२.१२ लाख असून एकूण महसूल रु. ०.७० लाख आणि त्यातारखेस संपलेल्या वर्षाचा निव्वळ रोकड प्रवाह ०.०१२ लाख होता. ही वि. वि. पत्रे आणि इतर वित्तीय माहितीचे लेखा परिक्षण अन्य लेखापरिक्षकांनी केले असून त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला दिले.	वस्तूस्थिती
एकत्रित वि. वि. पत्रकातील या उपकंपन्याचे संबंधित रक्कम आणि प्रकटने यावर आमचे मत आणि अहवाल अधिनियमच्या कमल १४३ मधील उप -कलम (३) यातील अटी प्रमाणे दिले आहे, आणि ते पूर्णपणे इतर लेखा परिक्षकांच्या अहवालावर आधारलेले आहेत.	
९) कायदेशीर आणि नियमनांच्या आवश्यकतेवरील अहवाल १) कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील आवश्यकता नुसार भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम (५) नुसार दिलेले निर्देश / उपनिर्देश यानुसारचे अहवाल कंपनीच्या व उपकंपन्यांचा स्वायत्त वि.वि. पत्रका सोबत दिले आहेत. यामुळे ते अहवाल येथे या संदर्भात पुन्हा दिलेले नाहीत. २) अधिनियमांचे कलम १४३ (३) यातील गरजेनुसार, आमच्या लेखा परिक्षणाच्या आम्ही खालील प्रमाणे माहिती देत आहोत.	वस्तूस्थिती

अ) आम्ही सर्व माहिती मागवली आणि मिळविली, याला पुढील अपवाद आहेत. आमच्या अहवालातील पात्र मतांचा आधार या परिच्छेदातील विषयाच्या संभाव्य परिणामाचा आणि उपकंपन्या महानिर्मिती मधील त्रयस्थ पक्षातील शिलकी कायम करणे याचे सूत्रधारी कंपनी च्या एकत्रित वि. वि. पत्रकावर जर काही परिणाम होतील त्याचा अंदाज करता येत नाही. आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या मते आमच्या लेखा परिक्षणाच्या हेतूसाठी असे अपवाद आवश्यक होते.	वस्तूस्थिती
ब) आमच्या मते आणि 'आमच्या पात्र मतांचा आधार' या परिच्छेदातील मजकूराचा अपवाद करता, असे दिसते की या कंपनी समुहात कायद्याप्रमाणे आवश्यक अशा प्रकारे लेखा वह्या यांचे व्यवस्थित जतन केलेले आहे. असे आम्ही केलेल्या या लेखानोंद वह्यांच्या तपासणीत दिसून आले.	वस्तूस्थिती
क) या अहवाला सोबत जोडलेल्या खालील वि.वि. पत्रके भा. ले. मानकानुसार एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा -तोटा पत्रक (इतर सर्वंकष उत्पन्नासह), एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक आणि इक्विटी बदलांचे एकत्रित विवरण पत्रकातील बरीच माहिती ही संबंधित लेखा वह्यातील नोंदीशी तंतोतंत जुळतात.	वस्तूस्थिती
ड) पात्र मतांचा आधार यात वर्णन केलेल्या बाबींशी अधीन राहून आमचे मत असे आहे की, उपरोक्त भा. ले. मानक नुसार केलेली एकत्रित वि. वि. अधिनयमाच्या कलम १३३ यात विनिर्देशित केलेल्या भारतीय लेखा मानकांची पूर्तता करतात.	वस्तूस्थिती
इ) पात्र मतांचा आधार आणि भर देण्याची प्रकरणे यात वर्णन केलेल्या बाबींचा समुहाच्या कामावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे आमचे मत आहे.	वस्तूस्थिती
फ) भारत सरकारची दि. ०५ जून २०१५ रोजी जारी केलेली अधिसूचना क्र. जी एस आर ४६३ (६) यानुसार कंपनी अधिनियम २००५ च्या कलम १६४ (२) च्या तरतुदी या कंपनीस लागू नाहीत.	वस्तूस्थिती
ग) लेखे यांची देखभाल जतन करणे आणि इतर संलग्न विषयावरील पात्र मतांचा आधार या शीर्षकाच्या परिच्छेदात नमूद आहेत.	वस्तूस्थिती
ह) वित्तीय अहवाला करिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पर्याप्तता आणि अशा वित्तीय नियंत्रणाची समुहाची परिणामकारकता यासाठी जोडलेला वेगळा अहवाल' जोडपत्र 'अ' यात दिला आहे.	वस्तूस्थिती
च) १९७ (१६) यातील तरतुदी नुसार आम्ही खालील प्रमाणे माहिती देत आहोत - अधिनियमाचे कलम २ (४५) यातील अर्थानुसार हा कंपनी समूह एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे अधिनियमातील १९७ मधील व्यवस्थापनांचे पारिश्रामिक याच्या तरतुदी, कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना क्र. जी एस आर ४६३(इ) ०५ जून २०१५ नुसार या कंपनी समुहास लागू नाहीत.	वस्तूस्थिती

ज) कंपन्यांचे (लेखापरिक्षण आणि लेखापरिक्षक) नियमावली वर्ष २०१४ दुरुस्ती नंतरची यातील नियम ११ नुसार लेखापरिक्षक यांच्या अहवालात समाविष्ट करण्याचे इतर विषय याबाबत आमचे मत आणि आमची सर्वोतपरी माहिती आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार खालील माहिती देण्यात येते	
अ) या एकत्रित वि. वि. मध्ये वित्तीय बाबींवर प्रलंबित खटल्याचे परिणाम याची माहिती प्रकट केली आहे. यासाठी एकत्रित वि.वि. पत्रकाचा टिपा क्र. ४२ पहावी. पात्र मत्तांचा आधार या परिच्छदेत वर्णन केलेला बाबींच्या परिणामांच्या अधीन राहून (प्रमाणानुसार किंवा अन्यथा) प्रकटने केली आहेत. (महावितरण आणि महापारेषण या उपकंपन्यांच्या पात्र मताच्या आधारावरील महापारेषणचा परिच्छेद १९ पहावा.)	वस्तूस्थिती
ब) पात्र मत्तांचा आधार या परिच्छदेत वर्णन केलेला बाबींच्या परिणामांमुळे (प्रमाणबध्द किंवा अन्यथा) सदर कंपनी समुहाने दीर्घ मुदतीच्या कंत्राटामध्ये जर कुठले मोठे आणि अंदाज असलेले तोटे झाले तर त्यासाठी पुरेशी तरतुद केली किंवा कसे यावर काहीही निवेदन आम्ही करु शकत नाही. लागू होणारे कायदे आणि लेख्यांची मानके यानुसार अशी पर्याप्ती तरतुद करणे आवश्यक असते. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच इतर लेखापरिक्षकांचे अहवालाच्या आधारे या समुहातील कंपन्यांनी कोणत्याही डेरिव्हेटीव्ह करारासह दीर्घ मुदतीच्या करारात भाग घेतलेला नाही.	वस्तूस्थिती
क) सूत्रधारी कंपनी आणि अन्य कोणत्याही उपकंपन्यांकडे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरण करण्याची गरज नाही.	वस्तूस्थिती
स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवालाचे 'जोडपत्र अ' **कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ मधील उपकलम ३, खंड (१) यानुसार वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची माहिती याविषयी आमच्या समान तारखेच्या अहवालात इतर कायदेशिर आणि नियमनाच्या आवश्यकता या शीर्षकाच्या परिच्छेदात मुद्दा ९(२) (ह) येथे याचा संदर्भ दिला आहे.**	
मत - या कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात आमच्या लेखापरिक्षणासोबत, आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी मर्यादित (यापूढे कंपनी असे संबोधले आहे) आणि तिच्या उपकंपन्याचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण वित्तयी प्रतिवेदन देण्यासाठी केले. ही कंपनी आणि तिच्या उपकंपन्या भारतात संस्थापित झालेल्या आहेत. उपकंपन्यांच लेखा परिक्षकांनी ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षांसाठी वित्तीय माहिती देण्यासाठी त्या उप कंपन्यांतील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण केले.	

मराविमं सूत्रधारी कंपनी प्रकरणी आमच्या मते या कंपनीमधे निवेदनासाठी सर्वोतपरीने पर्याप्त अंतर्गत वित्तीय प्रणाली, वित्तीय प्रतीवेदनासाठी असून ती ३१ मार्च २०२१ पर्यंत प्रभावीरित्या कार्यरत होती. ती कंपनीने वित्तीय माहितीसाठी जे निकष स्थापित केले आहेत, त्या आधारे ही आधारीत आहे. भारतीय सनदी लेखाप संस्थेने वित्तीय प्रतिवेदन देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे यावर एक मार्गदर्शक सूचना वितरीत केली आहे. त्यात दिलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासाठी घटक दिले आहेत. त्याचा विचार करुन ही नियंत्रणे या कंपनीत आहेत.	वस्तूस्थिती
महावितरण या उपकंपनी विषयी **सूत्रधारी कंपनी (मतांचा अस्वीकार) -** आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे, या वर्षी या सुत्रधारी कंपनीने तिच्या वित्तीय विवरण पत्राच्या संदर्भानुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यासाठी एक आकृतीबंध तयार केलेला आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिवेदनांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे या विषयी जी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. (मार्गदर्शक टिपा) याच्या आधारे या आकृती बंधातील महत्वाचे घटक ठरविले आहेत. यानंतर सूत्रधारी कंपनीने, ३१ मार्च २०२१ पूर्वी आणि दरम्यान काही धोके आणि नियंत्रणाची ओळख निश्चिती केली. आणि अशा नियंत्रणाचा प्रवर्तनावर अंशत - परिक्षण सुद्धा केले.	वस्तूस्थिती
आम्हाला माहिती देण्यात आली की, ३१ मार्च २०२१ नंतर उर्वरित धोके आणि नियंत्रणे यांच्या प्रवर्तनावरील परिणामांचे परिक्षण करण्यात आले. मात्र आम्ही सदर धोके आणि नियंत्रणे यांची रचना आणि प्रवर्तनातील परिणामकारकता यांचे परिक्षण ३१ मार्च २०२१ नंतर करु शकलो. कागदोपत्री नोंदलेले सर्व धोके, नियंत्रणे आणि परिवर्तनातील त्यांची परिणामकारकता याच्या रचनेचे परिक्षणाच्या ३१ मार्च २०२१ पर्यंत केलेले नसल्याने त्याची पुरेशी उपयुक्तता आणि योग्यता याचे लेखा परिक्षणात्मक पुरावे नसल्यामुळे या कंपनीमधे वित्तीय प्रतिवेदन करण्यच्या दृष्टीने, पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावी होती किंवा कसे, ३१ मार्च २०२१ रोजी या कंपनीमधे वि. वि. पत्रकासाठी वित्तीय प्रतिवेदनाचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असण्याबाबत आम्ही कोणतेही मत व्यक्त करीत नाही.	वस्तूस्थिती
महावितरणची उपकंपनी (मत) उपकंपनीचे लेखा परिक्षकांच्या मते, दि. ३१ मार्च २०२१ रोजी या उपकंपनी वित्त प्रतिवेदनासाठीचा अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी होती, आणि ती प्रभावीरित्या कार्यरत होती. त्यांची रचना कंपनीने स्थापित केलेल्या वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण यासाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे होती, व त्याआधारे त्यातील घटक होते.	वस्तूस्थिती

महानिर्मिती उपकंपनीच्या प्रकरणी **पात्र मत** ही एक शासकीय कंपनी असल्यामुळे कंपनीची वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याची रचना विविध पुस्तिका, नियमावल्या, परिपत्रके आणि वेळोवेळी दिलेल्या सूचना यांच्यानुसार तयार केलेली आहे. कंपनीच्या वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावरचे आमचे मत त्यानी केलेल्या व्याख्येनुसार आणि सॅप ईआरपी यंत्रणेतील नियंत्रणांना लक्षात घेऊन व्यक्त केले आहे. वि. वि. पत्रकांच्या आमच्या लेखा परिक्षणाच्य काळात आम्ही वित्तीय प्रतिवेदनासाठी परिक्षण तत्वानुसार आणि नियंत्रण प्रक्रियेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा पर्याप्ततेच्या आढाव्याच्या आधारे नियंत्रण प्रक्रीयेची रचना आणि तिच्या पुरेसेपणाची रचना आणि प्रभाव या दोन्ही मधे काही त्रुटी शोधल्या. त्याची माहिती वरील पात्र मत्तांचा आधार या परिच्छेदात दिली आहे. पात्र मतांचा आधार या परिच्छेद (१) यामध्ये सांगितलेले मोठ्या दुर्बलतेचे झालेले/होऊ शकणारे परिणाम यांना वगळल्यानंतर. नियंत्रणाच्या कसोट्याचे यश यावर आमचे मत असे आहे की, कंपनीने ३१ मार्च २०२१ पर्यंत सर्वोतोपरी मोठ्या प्रमाणात वित्तीय प्रतिवेदनेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे कार्यरत ठेवली होती, आणि अशा प्रतिवेदनेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावी रित्या चालू होती. आम्ही ओळखून काढलेल्या मोठ्या दुर्बलतांचा विचार करुन ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या आमच्या लेखापरिक्षण लागू केलेल्या लेखापरिक्षणांच्या चाचण्यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा यांची माहिती वर दिली आहे. ती कंपनीच्या एकत्रित वि. वि. पत्रकांच्या संदर्भात आहे. परिच्छेद (१) यात सांगितलेल्या मोठ्या दुर्बलता या प्रामुख्याने पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमांची समायोजने वेळेवर करणे आणि त्यामुळे दायित्वांची तरतूद करणे यांची आहेत. त्याचा परिणाम ए. वि. वि. वरील आमच्या मत्तांवर झाला आहे. त्यावर आम्ही आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालात एक पात्र मत दिले आहे. पात्र माताचा आधार यातील परिच्छेद (२ आणि ३) यांत नमूद केलेली अन्य मोठी दुर्बलता याचा एकत्रित वि. वि. वरील आमच्या मतांना बाधा येत नाही.	वस्तूस्थिती
महागुज कोलायरीज लि. या उपकंपनीचे लेखापरिक्षण आम्ही केलेले नाही. त्या अन्य लेखापरिक्षकांनी खालील प्रमाणे अहवाल दिला आहे - **मतांचा अस्वीकार -** आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिनिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करणे याबाबत दिलेल्या मार्गदर्शक टिपणी मधे नमुद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक या आधारे किंवा त्याचा विचार करुन वित्तीय प्रतिवेदन करण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केलेली नाही.	

या कारणांमुळे या कंपनीमधे दि. ३१ मार्च २०२१ रोजी वित्तीय प्रतिवेदनासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावरित्या कार्यरत होती, किंवा कसे यावर अभिप्राय देण्यासाठी, पुरेसे लेखापरिक्षणाचे पुरावे मिळवू शकलो नाही. कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण करण्यासाठी आम्ही काही कसोट्या लागू केल्या होत्या. त्या कसोट्यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा यानुसार आम्ही उपरोक्त ठमतांचा अस्वीकारठ विचारात घेतला आहे. आमच्या मुख्य लेखापरिक्षणाच्या अहवाल ''भर दिलेले विषय'' या परिच्छेदाच्या अधीन राहून उपरोक्त ठ मतांचा अस्वीकार हा कंपनीच्या वि. वि. पत्रकांवर आम्ही दिलेल्या मतांना बाधा करत नाही. वित्तीय प्रतिवेदनासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांमधे प्रत्यक्ष दुर्बलता ही एका किंवा अनेक उणीवांचे मिश्रण असते. यामुळे कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम विवरणपत्रकात मोठ्या प्रमाणात गैर विवरण होऊ शकते, त्याला वेळेवर आळा घालणे किंवा शोध घेणे शक्य नसते.	
महापारेषण या उपकंपनीचे प्रकरणी या कंपनीमधील वित्तीय प्रतिवेदनासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आणि तिची रचना यात सुधारणा करण्याची गरज आहे. कारण त्यामधील नियंत्रणाच्या दृष्टीने असलेल्या काही चुका काढून टाकावे लागतील आणि ती सर्वसमावेशक करावी लागेल. प्रक्रिया नियंत्रण सारणी यातील निवडक पडताळणी केली. ही सारणी आम्हाला उपलब्ध करुन दिली असता काही ओळखीच्या प्रक्रिया आणि जोखिम यांच्यासाठी ती अग्रवात केली पाहिजे तसेच वित्तीय प्रतिवेदनासाठीच्या वित्तीय अंतर्गत नियंत्रणाचे निकष कंपनीने स्थापित केली आहे. त्याचा विचार करता मार्गदर्शक टिपात सांगितलेले अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक, प्रक्रिया नियंत्रणाच्या प्रवर्तनातील प्रभाव आणि योग्य कागदपत्रे यांचा समावेश कंपनीचे आकारास व व्यवहारास सुसंगत अशा प्रकारे बळकट केला पाहिजे.	वस्तूस्थिती
'इतर विषय' या शीर्षकाच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रकरणी सहयोगी कंपनीचे भारतात संस्थापित झाल्या आहेत. त्याचे लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केले. त्याचे अहवाल विचारत घेतल्या तेव्हा असे दिसून आले की या सहयोगी कंपन्यामध्ये दि. ३१ मार्च २०२१ रोजी वित्तीय प्रतिवेदन करण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रणाली सर्वोतपरी पुरेशी होती आणि प्रभावीरित्या कार्यरत होती. या सहयोगी कंपन्यांनी वित्तीय प्रतिवेदनाचे निकषाच्या आधारे सनदीलेखापाल संस्थेच्या मार्गदर्शक टिपे प्रमाणे आवश्यक घटक विचारात घेतले आहेत असे मत आहे.	वस्तूस्थिती

पात्र मतांचा आधार - **महानिर्मिती या कंपनीच्या प्रकरणी -** आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण आणि आमचे लेखापरिक्षण यानुसार सुत्रधारी कंपनीच्या प्रकरणी ३१ मार्च २०२१ खालील दुर्बलताची ओळख निश्चिती झाली, जेथे अंतर्गत नियंत्रणे प्रभावीरित्या कार्यरत नव्हती. पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमांची वेळेवर समायोजने करणे आणि त्या दायित्वाची तरतूद करणे याबाबतची कंपनीची अंतर्गत नियंत्रणे. परिसमापनातील नुकसानीची वसुली आणि अंतिमीकरण याविषयी कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे धोरणे. उपकंपन्यामधील कर्मचाऱ्यांचे दस्तऐवजांचे व्यवस्थापनाबाबत सूत्रधारी कंपनीचे वित्तीय नियंत्रण आणि सॅप प्रणालीतील वेतन आणि वित्तीय मोड्युलमधील आकडेवारींचा परस्परसंबंध याबद्दलची माहिती पाहता आली नाही आणि त्यांचा ताळमेळ घालता आला नाही.	वस्तूस्थिती
अंतर्गत वित्तीय नियंत्रणांविषयी व्यवस्थापनाची जबाबदारी ज्या कंपन्या आणि उपकंपन्या भारत देशात संस्थापीत झालेल्या आहेत, त्यांचे संबंधित संचालक मंडळ एकत्रित वि. वि. पत्रकाच्या संदर्भात करावयाच्या प्रतिवेदनासाठी अंतर्गत नियंत्रणे स्थापन करणे आणि त्यांचे संचालन करणे, याची जबाबदारी असते. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे, यावर दिलेल्या मार्गदर्शक सूचनेत याचे आवश्यक घटक दिले असून त्यानुसार प्रत्येक कंपनीने निकषांच्या आधारे ही कृती करावी लागते. या जबाबदारी मधे कंपनीचा उद्योग व्यवसाय कार्यक्षमरित्या व्यवस्थित चालावा यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि जतन करणे यांची अंतर्भाव असतो. तसेच कंपनीच्या संबंधित धोरणांना धरुन कामे करणे, मत्तांचे रक्षण आणि लबाडी किंवा चुका यांना आळा घालणे व त्या शोधणे ही कामे पण समाविष्ट आहेत. कंपनी अधिनियम २०१३ मधील आवश्यकतेनुसार अचूक आणि परिपूर्ण लेख्यांचे दस्ताऐवज तयार करणे आणि वेळेवर वित्तीय माहिती तयार करणे आवश्यक असते.	वस्तूस्थिती
लेखा परिक्षकांची जबाबदारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या आहेत, त्याच्या वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वत्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करुन त्याआधारे अभिप्राय व्यक्त करणे, ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी वित्तीय निवेदनांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखा परिक्षण यावर एक मार्गदर्शक टिपा तयार केली आहे. तसेच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यामधे लेखा परिक्षणांची मानके विहित केली आहेत.	वस्तूस्थिती

ती एकत्रित वि. वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणात ज्या मर्यादेपर्यंत लागू होतात, त्या प्रमाणे आम्ही आमचे लेखापरिक्षण केले आहे. उपरोक्त मानके आणि मार्गदर्शक सूचना यानुसार नैतिक गरजांची पूर्तता करणे, आणि एकत्रित वि. वि. पत्रकांच्या संदर्भात वित्तीय निवेदने देण्याच्या दृष्टीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केली आहेत, आणि ते प्रभावीरित्या मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत, याच रास्त व प्रमाणशिर हमी मिळविणे या दृष्टिने आम्ही लेखा परिक्षण करतो. आमच्या लेखा परिक्षणामध्ये वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पर्याप्त असल्याचे लेखापरिक्षणातील पुरावे मिळावे या हेतूने कामाची पद्धती निश्चित केली जाते. एकत्रित वि. वि. पत्रकाचे संदर्भात वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करुन त्याच्या उपयुक्ततेची हमी मिळविणे त्यात मोठ्या प्रमाणात दुर्बलतेची जोखीम असल्यास तिचे मूल्यांकन करणे आणि त्या जोखिमेच्या मुल्यांकनाचे आधारे अंतर्गत नियंत्रणाची रचना करून काम करणे, दुर्बल जागा शोधणे आणि प्रभावीपणाचे मूल्यांकन करणे अशा प्रकारे प्रक्रियेची निवड ही लेखा परिक्षकांची न्याय निर्णय करण्याच्या बुद्धीवर अवलंबून असते. एकत्रित वि. वि. मधे कोणतेही मोठे गैर विवरण, लबाडी किंवा चुकीने झालेले नाही याचे निर्धारण करावे लागते. आमचा विश्वास आहे कि आम्ही आमचा लेखा परिक्षणातून आणि उपकंपन्यांचा लेखापरिक्षकांनी त्याचा लेखापरिक्षणातून असे लेखी परिक्षणात्मक पुरावे मिळविले आहेत ते येथे खाली दिलेल्या इतर विषय या परिच्छेदात संदर्भ दिल्याप्रमाणे ते पुरेसे व योग्य आहेत आणि वित्तीय निवेदनासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमचे लेखा परिक्षणाच्या मतांना पुरेसा आणि योग्य आधार देतात.	
वित्तीय अहवालांवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा अर्थ एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचा संदर्भात वित्तीय अहवालावरील कंपनीचे अंर्तगत वित्तीय नियंत्रण ही वित्तीय अहावलाच्या विश्वासार्हते बद्दल वाजवी हमी देण्यासाठी सामान्यत - स्वीकारल्या गेलेल्या लेखातत्वानूसार बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरण तयार करण्यासाठी तयार केलेली प्रक्रिया आहे. एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या संदर्भात वित्तीय अहवालावरील कंपनीच्या अंर्तगत वित्तीय नियंत्रणामध्ये धोरणांचा व प्रक्रियांचा समावेश असतो. १. कंपनीच्या मालमत्तेचे व्यवहार आणि रचना वाजवी तपशिलात अचूक आणि निष्पक्षपणे प्रतिवेदन करणाऱ्या नोंदींच्या देखभालीशी संबंधित. २. वाजवी हमी द्यावी की सामान्यत - स्वीकृत लेखा तत्वानुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रक तयार करण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यकतेनुसार व्यवहार नोंदलेले जातात आणि कंपनीच्या जमा आणि खर्च कंपनीच्या व्यवस्थापन व संचालकांच्या मान्यतेनुसार केले जात आहे; आणि	वस्तूस्थिती

३. कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत अधिग्रहण वापर किंवा विल्हेवाट रोखणे किंवा वेळेवर शोधणे यासंबंधी वाजवी हमी द्यावी ज्याचा एकत्रित वित्तीय विवरणावर मोठा परिणाम होऊ शकतो.	वस्तूस्थिती
एकत्रित वित्तीय पत्रकाच्या संदर्भात वित्तीय निवेदनासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा - वित्तीय निवेदनासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या काही अंगभूत मर्यादा आहेत. यामध्ये संगनमत किंवा अयोग्य व्यवस्थापन ही अंतर्गत नियंत्रणांना वरचढ होऊ शकतात. चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरण होते आणि ते शोधले जात नाही. तसेच भविष्यासंबंधी केलेले अंदाज त्या वेळेची परिस्थिती बदलल्यास अपुरे ठरतात आणि ते जोखमांच्या अधीन असतात. किंवा धोरणात मोठ्या प्रमाणात बदल होणे किंवा पद्धती जादा खराब होणे यामुळे ते अपुरे होतात.	वस्तूस्थिती
इतर विषय **सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी** अधिनियमाचे कलम १४३ (३) (१) यानुसार एकत्रित वि. वि. च्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव आणि पुरेसेपणा यावरचा आमचा अहवाल, उपकंपन्यांच्या बाबत त्यांच्या संबंधित लेखा परिक्षकांच्या अहवालावर संपूर्णपणे अवलंबून आहे. वरील विषयावर आमचे पात्र मत नाही.	वस्तूस्थिती
मतरण या उपकंपनी प्रकरणी - अधिनियमांचे कलम १४३ यानुसार एकत्रित वित्तीय (१) (३) विवरण पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव व पुरतेपणा या वरचा आमचा अहवाल, उपंकंपन्यांच्या बाबत त्यांच्या संबंधित लेखापरिक्षकांच्या अहवालावर संपूर्णपणे अवलंबून आहे.	वस्तूस्थिती
महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी अहवाल वर्षात या सूत्रधारी कंपनीच्या कारखाने किंवा अन्य जागा यांना आम्ही कोविड - १९ मुळे संपूर्ण शासकीय लॉकडाऊन असल्याने प्रत्यक्ष भेट देऊन काम करू शकलो नाही. या अहवालाच्या वर्षात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे संबंधीत लेखापरिक्षणाची कामे घरून काम करणे या पध्दतीने करण्यात आली. म्हणून कंपनीचे कारखाने आणि कार्यालये या ऐवजी व्यवस्थापनाने वित्तीय आधारसामग्री/ माहिती / दस्तऐवज आधारभूत कागदपत्रे ही डिजीटल माध्यमातून सॅप ॲक्सेस द्वारे डॅश बोर्ड / व्ही पी एन लिंक मार्फत उपलब्ध करुन दिल्यावर त्यानुसार करण्यात आली.	वस्तूस्थिती

अधिनियमाचे कलम १४३(३) नुसार तीन उपकंपन्यामधील अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्थेचे लेखापरिक्षणाचे अहवाल त्या कंपन्यांच्या लेखापरिक्षकांच्या अहवालावर विसंबून केलेले आहेत. या कंपन्या भारतात संस्थापित आहेत. आम्ही असे नमूद करतो की, कंपनीच्या दोन सहयोगी कंपनीकडून अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. वरील विषयावर आमचे मत पात्र केलेले नाही.	वस्तूस्थिती
महापारेषण या उपकंपनी प्रकरणी अधिनियमाचे कलम १४३(३) (१) यानुसार, महापारेषणच्या भारतात संस्थापित झालेल्या दोन सहयोगी कंपन्यातील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे अहवाल त्या कंपन्याच्या संबंधित लेखा परिक्षकाच्या अहवालावर आधारीत आहे.	वस्तूस्थिती

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट - २

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(६) (ब) यानुसार मराविम कंपनी लिमिटेडच्या दि. १३ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचा स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर दिलेले अभिप्राय -

म.रा.वि.मं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ यात विहीत केलेल्या आकृतीबंधानुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कायद्याच्या कलम १३९(५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरिक्षक हे या कायद्याच्या कलम १४३ नुसार स्वतंत्र आणि कायद्याच्या कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार या वित्तीय विवरणपत्रावर आभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी तसे केल्याचे त्यांच्या दि. २९ डिसेंबर २०२१ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

मी, भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यावतीने मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकाचे पूरक लेखापरिक्षण, कायद्यातील कलम १४३(६) (अ) नुसार केले. हे पूरक लेखाप रिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडील कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडे व कंपनीच्या कर्मचारी वृंदाकडे विचारणा करणे आणि लेख्यांच्या निवडक दस्तऐवजांचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.

माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारानुसार, सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय द्यावा लागेल असे किंवा त्यास पूरक ठरेल असे काहीही महत्वाचे माझ्या माहितीमध्ये आढळून आलेले नाही.

भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने

(आर. तिरुपत्ती व्यकंटास्वामी)
प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षण - दोन) महाराष्ट्र

स्थळ - २१/ ०३/ २०२२
मुंबई - नागपूर

संचालक मंडळाच्या अहवालाचे – परिशिष्ट २ अ

भारताचे मा. लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रावरील अभिप्रायांना मराविमं सूत्रधारी कं. लि. च्या व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे खालील प्रमाणे

अनु. क्र.	तपशील	उत्तर
१.	म.रा.वि.मं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ यात विहीत केलेल्या आकृतीबंधानुसार स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कायद्याच्या कलम १३९(५) नुसार नियुक्त केलेले सांविधिक लेखापरिक्षक हे या कायद्याच्या कलम १४३ नुसार स्वतंत्र आणि कायद्याच्या कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार या वित्तीय विवरणपत्रावर आभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी तसे केल्याचे त्यांच्या दि. २९ डिसेंबर २०२१ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहे.	वस्तुस्थिती
२.	मी, भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यावतीने मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकल वित्तीय विवरणपत्रकातचे पूरक लेखापरिक्षण, कायद्यातील कलम १४३(६) (अ) नुसार केले. हे पूरक लेखाप रिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडील कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक यांचेकडे व कंपनीच्या कर्मचारी वृंदाकडे विचारणा करणे आणि लेख्यांच्या निवडक दस्तऐवजांचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.	वस्तुस्थिती
३.	माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारानुसार, सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवालावर अभिप्राय द्यावा लागेल असे किंवा त्यास पूरक ठरेल असे काहीही महत्वाचे माझ्या माहितीमध्ये आढळून आलेले नाही.	वस्तुस्थिती

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे - परिशिष्ट ३

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षणक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(६) (ब),ज्याचे सहवाचन या अधिनियमाचे १२९ (४) सोबत केले जाते, त्यानुसार मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर दिलेले अभिप्राय

मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ मध्ये विहित केलेल्या वित्तीय अहवालाच्या आकृतीबंधानुसार, एकत्रित वित्तीय विवरण पत्रके सादर करणे, ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३९ (५) ज्याचे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, त्यानुसार सांविधिक लेखापरिक्षक नियुक्त केले आहेत. हे सांविधिक लेखापरिक्षक कंपनी अधिनियमाचे कलम १४३, ज्याचे सहवाचन १२९ (४) सोबत होते, त्याप्रमाणे त्यांनी या अधिनियमाचे कलम १४३(१०) या विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांशी सुसंगत असे स्वतंत्र लेखापरिक्षण करुन या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांवर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांचा लेखापरिक्षणाचा अहवाल दि. २८ एप्रिल २०२२ त्यांनी तसे केलेले आहे; असे नमूद करण्यात येते.

मी, भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्यावतीने, मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांचे पूरक लेखापरिक्षण सदर अधिनियमाचे कलम १४३(६) (अ), ज्यांचे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, त्यानुसार आयोजित केले. आम्ही, मराविमं सुत्रधारी कंपनी लि. आणि (या कंपनीच्या उपकंपन्या) महाराष्ट्र राज्या विद्युत पारेषण कंपनी लि., महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांच्या उपरोक्त तारखेला संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले आहे त्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांकडील कामकाजाची कागदपत्रे मिळविली नव्हती. आमचे पूरक लेखापरिक्षण हे प्रामुख्याने सांविधिक लेकापरिक्षकांकडे आणि कंपनीच्या कर्मचारी वृदांकडे विचारणा करणे आणि लेखापरिक्षणाच्या दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मार्यादेत करण्यात आलेले आहे.

माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे आणि माझे सर्वोतपरी ज्ञान यानुसार, कंपनी अधिनियमाचे कलम१४३(६) (ब) अंतर्गत काही अभिप्राय द्यावा किंवा सांविधिक लेखापरिक्षकांच्या अहवालात ज्यांची भर करता यावी असे काहीही महत्त्वाचे दिसून आलेले नाही.

भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने

(आर.तिरुपती व्यंकटास्वामी)

प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षण - २) महाराष्ट्र

स्थळ - महाराष्ट्र

दिनांक - ०८.०७.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे -परिशिष्ट ३ अ

मराविमं सुत्रधारी कंपनी लि. च्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर भारताचे मा. लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायास कंपनीच्या व्यवस्थापनाने खालीलप्रमाणे उत्तरे दिली आहेत.

अनु. क्र.	तपशील	उत्तर
१.	मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची, कंपनी अधिनियम २०१३ मध्ये विहित केलेल्या वित्तीय अहवालाच्या आकृतीबंधानुसार, एकत्रित वित्तीय विवरण पत्रके सादर करणे, ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनिय २०१३ चे कलम १३९ (५) ज्याचे सहवाचन कलम १२९ (४) सोबत होते, त्यानुसार सांविधिक लेखापरिक्षक नियुक्त केले आहेत. हे सांविधिक लेखापरिक्षक कंपनी अधिनियमाचे कलम १४३, ज्याचे सहवाचन १२९ (४) सोबत होते, त्याप्रमाणे त्यांनी या अधिनियमाचे कलम १४३(१०) या विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांशी सुसंगत असे स्वतंत्र लेखापरिक्षण करुन या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांवर अभिप्राय व्यक्त करण्यास जबाबदार आहेत. त्यांचा लेखापरिक्षणाचा अहवाल दि. २८ एप्रिल २०२२ त्यांनी तसे केलेले आहे; असे नमूद करण्यात येते.	वस्तुस्थिती
२.	मी, भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्यावतीने, मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांचे पूरक लेखापरिक्षण सदर अधिनियमाचे कलम १४३(६) (अ), ज्यांचे सहवाचन कम १२९ (४) सोबत हेते, त्यानुसार आयोजित केले. आम्ही, मराविमं सुत्रधारी कंपनी लि. आणि (या कंपनीच्या उपकंपन्या) महाराष्ट्र राज्या विद्युत पारेषण कंपनी लि., महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांच्या उपरोक्त तारखेला संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले आहे त्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांकडील कामकाजाची कागदपत्रे मिळविली नव्हती. आमचे पूरक लेखापरिक्षण हे प्रामुख्याने सांविधिक लेकापरिक्षकांकडे आणि कंपनीच्या कर्मचारी वृदांकडे विचारणा करणे आणि लेखापरिक्षणाच्या दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.	वस्तुस्थिती
३.	माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारानुसार, सांविधिक लेखापरिक्षकांचे अहवाल अभिप्राय द्यावा लागेल असे किंवा त्यास पूरक ठरेल असे काहीही महत्वाचे माझ्या माहितीमध्ये आढळून आलेले नाही.	वस्तुस्थिती

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे - परिशिष्ट - ४

फॉर्म नं. एम. आर - ३

सेक्रेटरीयल ऑडीट रिपोर्ट

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता

कलम २०४(१) आणि कंपनी अधिनियम, २०१३ (व्यवस्थापकीय कर्मचारी वृंदांच्या नेमणूका व परिश्रमिक नियमावली २०१४ यातील नियम क्र.९ यानुसार)

प्रति,
मा. सदस्य,
मराविमं. सूत्रधारी कंपनी मर्या.
हाँगकाँग बँक इमारात, ३ रा व ४था माळा,
महात्मा गांधी रोड, फोर्ट,
मुंबई ४००००१. महाराष्ट्र, भारत.

मी अजित वाय. साठे, ए. वाय. साठे अँड कंपनी या व्यावसायिक कंपनी सेक्रेटरीज, मुंबई याचा मालक आहे. यांनी लागू वैधानिक तरतुदींचे पालन आणि मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड (सी आय एन - यु ४०१०० एम एच २००५ एस जी सी १५३६४९) द्वारे लागू वैधानिक तरतुदींचे पालन आणि चांगल्या कॉपोरेट व्यवहारांचे सेक्रेटरीयल ऑडिट केले आहे (यापुढे कंपनी असा उल्लेख केला आहे) सेक्रेटरीयल ऑडीट अशा पध्दतीने केले गेल्याने मला कॉर्पोरेट वर्तणूक /वैधानिक अनुपालनांचे मुल्याकंन करण्यासाठी आणि त्यावर माझे मत व्यक्त करण्यासाठी वाजवी आधार प्रधान केला.

कंपनीची पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न भरलेले आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी आणि सेक्रेटरीयल आाडिट करताना कंपनी , तिचे अधिकारी, एजंट आणि अधिकृत प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे, स्पष्टीकरणे आणि आम्हाला दिलेले स्पष्टीकरणे आणि कॉपोरेट अफेअर्स आणि सिक्युरिटीज मंत्रालयाने कोविड -१९ साथीच्या आजाराच्या प्रसारामुळे दिलेल्या शिथिलता लक्षात घेऊन, मी याद्वारे अहवाल देतो की माझ्या मते, कंपनीने संपलेल्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत ३१ मार्च, २०२१ रोजी (लेखापरिक्षण कालावधी) येथे सूचीबध्द केलल्या वैधानिक तरतुदींचे पालन केले आहे आणि तसेच कंपनीकडे योग्य मंडळ प्रक्रिया आणि अनुपालन यंत्रणा आहे त्या प्रमाणात रीतीने आणि त्यानंतर केलेल्या अहवालाच्या अधीन आहे -

ही कंपनीने व्यवस्थितपणे ठेवलेल्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीने नोंदी केलेली पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त लेखन वही, फॉर्म्स व दाखल केलेल्या फॉर्म्सच्या प्रती इ. चे परिक्षण केले. त्यानुसार मी अहवाल देतो की, खालील कायदेशीर तरतुदीनुसार पुढील कायदेविषयक बाबींची प्रतिपुर्ती केली आहे.

१) कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) आणि कंपनी अधिनियम १९५६ (लागू होणाऱ्या मर्यादेत) आणि त्यानुसार केलेले नियम;

२) कंत्राटी प्रतिभूती (नियमन) कायदा १९५६ (एससीआरए) आणि त्या अंतर्गत केलेली नियमावली (कंपनी ही अनलिस्टेड पब्लिक कंपनी असल्याने तिला लागू नाही);

३) दि डिपॉझिटरीज कायदा १९९६ आणि त्या अंतर्गत केलेली नियमने व उप -विधी (कंपनीचे शेअर्स प्रत्यक्ष रुपात धारण केलेले असल्याने तिला लागू नाही);

४) परदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा १९९९ आणि त्यातील नियमावली व नियमने परकीय गुंतवणुकी, परदेशी थेट गुंतवणूक व परराष्ट्रीय वाणिज्यिक उसनवारी (लेखापरिक्षण काळात कंपनीला लागू नाही);

५) भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ कायदा १९९२ अंतर्गत विहित केलेली खालील नियमने व मार्गदर्शक सूचना पब्लिक अनलिस्टेड कंपनी असल्याने लेखापरिक्षण कालावधीत कंपनीला लागू नाही;

अ) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (शेअर्स मोठ्या प्रमाणात संपादन करणे व ताब्यात घेणे) नियमावली २०११

ब) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (अंतर्गत व्यापार बंधणे) नियमावली २०१५

क) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (भांडवल पुरिविणे व प्रकटने यांच्या आवश्यकता) नियमावली २००९

ड) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (लिस्टिंग बंधणे व प्रकटने यांची आवश्यकता) नियमावली २०१५

इ) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (कर्मचारी स्टॉक पर्याय योजना आणि कर्मचारी स्टॉक खरेदी योजना मार्गदर्शक तत्वे, १९९९) श्री आता भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (समभाग) आधारित कर्मचारी लाभ नियमके, २०१४ आणि भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (समभाग आधारित कर्मचारी लाभ) (सुधारणा) नियमके २०१५

फ) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (इश्यू अँड लिस्टिंग ऑफ कर्ज प्रतिभूती) नियमन २००८;

ग) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (इश्यू आणि शेयर ट्रान्सफर एजंटचे रजिस्ट्रार नियमन, १९९३ ग्राहकांशी व्यवहारासंबधी कंपनी कायदा.

ह) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (डिलिस्टींग ऑफ इक्विटी शेअर्स) नियमन २००९, आणि

य) भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (प्रतिभूती खरेदी)नियमके १९९८.

६) कंपनी निश्चितपणे लागू होणाऱ्या इतर कायद्यासंबंधी मला अशी माहिती देण्यात आली की, कंपनीला निश्चितपणे लागू होतील असे अन्य कोणतेही कायदे नाहीत,

मी, कंपनीला लागू होणाऱ्या खालील खंडाच्या अनुपालनाचे परिक्षण सुद्धा केले आहे.

१) दि इन्सिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेली सेक्रेटरीयल मानके (जशी प्रथम तयार केली आणि १ जुलै २०१५ पासून अंमलात आणलेली आणि १ ऑक्टोबर २०१७ पासून सुधारीत केलेली)

२) कंपनी बी एस ई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. यांचेसोबत केलेली लिस्टिंग अग्रीमेंट (कंपनी पब्लिक अनलिस्टेड कंपनी असल्याने तिला लेखा परिक्षण कालावधीत लागू नाहीत.)

लेखा परिक्षणाच्या कालावधीत कंपनीने उपरिनिर्दिष्ट कायदे, नियमावली, नियमने मार्गदर्शक सूचना मानके इ. च्या तरतूदींचे पालन केले असून खालील दिलेल्या शेऱ्यांच्या अधिन आहेत.

कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत

अ) या कंपनीने ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे वित्तीय वर्षाचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रकासह लेखापरिक्षण वित्तयी विवरण पत्रके, संचालकांचा व लेखापरिक्षकांचा अहवाल यांचे सोबत आणि भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय या सर्वांचा स्वीकार दि. ०२ सप्टेंबर २०२१ रोजीच्या तहकूब होऊन नंतर झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केला आहे.

ब) मंडळाची व समिती स्थापना

* १ एप्रिल २०२० ते २३ जुलै २०२० या कालावधीमध्ये मंडळामध्ये किमान २ स्वतंत्र संचालक ऐवजी १ (एक) स्वतं) संचालक नियुक्त होत.

* २३ जुले २०२० ते ३१ मार्च २०२१, या कालावधीमध्ये मंडळामध्ये एकही स्वतंत्र संचालक नियुक्त नव्हते.

* १ एप्रिल २०२० ते २३ जुन २०२० आणि २४ जुलै २०२० ते १६ डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये मंडळामध्ये एकही महिला संचालक नियुक्त नव्हती.

*कंपनीकडे वर्षभरात मंडळावर पूरेसे स्वतंत्र सचालक नसल्यामूळे लेखापरिक्षण समिती, नामनिर्देशन व परिश्रमिक समिती आणि कंपनीच्या समाजिक जबाबदारी समितीची योग्य रचना नव्हती.

माझ्या लेखा परिक्षणाच्या कालावधीत कंपनीने मला जी माहिती / अभिलेख दस्तऐवज दिले. त्याच्यावर विसंबून मी माझे परिक्षण कार्य केले. त्यामुळे माझे अहवाल त्या मर्यादेत आहेत.

मी पुढे अहवाल देतो की,,

कंपनीच्या संचालक मंडळाची रचना करताना त्यामध्ये कार्यकारी आणि अकार्यकारी संचालक आणि स्वतंत्र संचालक यांचा समतोल साधला असला तरी ही बाब वर नमूद केलेल्या निरीक्षणाच्या आधिन आहे. आढावा वर्षात संचालक मंडळात केलेले बदल कायद्यातील तरतुदीची पूर्तता करून केले आहेत.

मंडळाच्या बैठकीचे वेळापत्रक व कार्यक्रमपत्रिका, त्यातील विषयांच्या तपशीलवार टीपा इ. ची माहिती सर्व संचालकांना किमान सात दिवस आधी असा पुरेशा अवधीने त्याची सुचना कळविण्यात येते. संचालकांना कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांवर बैठकीपूर्वी अधिक माहिती स्पष्टीकरणे देणे व बैठकीत अर्थपूर्ण सहभाग होणे यासाठी एक यंत्रणा कार्यरत आहे.

निर्णय बहुमताने घेतले जात असले तरी काही सदस्यांचा विरोध असले तर त्यांचे मत इतिवृत्ताचा भाग म्हणून नोंदले जाते.

मी पुढे अहवाल देतो की या कंपनीचे आकारमान व कार्य करण्यास पुरेशी असणारी व्यवस्था कंपनीमध्ये आहे आणि ही व्यवस्था कंपनीला लागू होणारे कायदे, नियमावली, नियामन व मार्गदर्शक सूचना यांचे अनुपाल करते आणि त्यांचेकडे लक्ष ठेवते.

मी यापुढे नमुद करतो की, ही कंपनी महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची आहे आणि लेखा परिक्षण कालावधीमध्ये कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येकी १०/- रु. दर्शनी मुल्याप्रमाणे समभागाचे वाटप केले आहे.

जारी केलेले दिनांक	**इक्विटी शेअर्सची**	**मोबदला**	**शासन निर्णय क्र.**
१४/१०/२०२०	६४,०००,०००	रोख	खाली नमूद केल्याप्रमाणे

अ. क्र.	**महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. व दिनांक**	**वाटप केलेल्या समभागाची संख्या**	**वाटप केलेली तारीख**
१.	निधिवि २०१९/ प्र. क्र. ९२(भुसावळ)/ ऊर्जा -३ दि. ०१.०२.२०१९	६४,०००,०००	१४/१०/२०२०
२.	निधिवि २०१९/ प्र. क्र. ९२(भुसावळ)/ ऊर्जा -३ दि. ३१.०३.२०२०		

मी यापुढे असे नमुद करतो की, लेखापरिक्षण कालावधीमध्ये वरील व्यतिरिक्त खाली दिलेल्या इतर गोष्टी आढळून आल्या नाहीत.

१) सार्वजनिक /खाजगी समभाग/ ऋणपत्रे/स्वेट इक्वीटी वाटप

२) विमोचन/खरेदी केलेल्या प्रतिभूती

३) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८० च्या अनुषंगाने घेतलेला महत्वपूर्ण निर्णय

४) मेळ /एकत्रिकरण / पुर्नबांधणी इत्यादी

५) परदेशी तांत्रिक सहयोग

ए. वाय. साठे ॲण्ड क. करिता कंपनी सेक्रेटरीज

सी. एस. अजित साठे मालक
एफ. सी. एस. क. २८९९, सीओपी क्र. ७३८
यु डी आय एन - एफ ००२८९९सी००३११५७४५
पीइइआर रिव्हीव सर्टिफिकेट नं - १५८५/ २०२१
स्थळ - ठाणे
दिनांक - २५/०३/२०२२

आमच्या समान तारखेचे पत्र 'परिशिष्ट - १ मधील जे या अहवालाचा अंतर्गत भाग असून आमच्या अहवालाचे वाचन या पत्रासोबत करण्यात यावे.

सेक्रेटरीयल ऑडिट अहवालाचे सहपत्र - १

प्रति,
मा. सदस्य
मराविमं सुत्रधारी कंपनी लि.
हाँगकाँग बँक इमारात, मजला क्र. ३ व ४ महात्मा गांधी रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.
महाराष्ट्र, इंडिया

आमच्या समान तारखेच्या अहवालाचे वाचन या पत्रासोबत करण्यात यावे.

१) कंपनी सचिव यांच्या कामांचे अभिलेख जतन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. त्या अभिलेखांचे परिक्षण करुन त्या आधारे अभिलेखांवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

२) सेक्रेटरी संबंधीत कामाचे अभिलेख योग्य असल्याची रास्त हमी मिळविण्यासाठी आम्ही त्याच्या परक्षिणाचे कार्य व प्रक्रिया यांचे आम्ही अनुसरण केले. त्यातील पडताळणी प्रायोगिक तत्त्वावर आणि सेक्रेटरीच्या अभिलेखातून वस्तुस्थितीचे दर्शन अचूकपणे होण्याची हमी मिळविण्यासाठी करण्यात आले. आमचा विश्वास आहे की, आम्ही अनुसरलेल्या पद्धती व प्रक्रिया बाबतआमचे मत व्यक्त करण्यात योग्य आधार देतात.

३) कंपनीचे वित्तीय अभिलेख आणि लेख्यांची वह्या पुस्तके निर्दोष आणि योग्य असल्याची फेरतपासणी आम्ही केलेली नाही.

४) कायदे, नियमावली व नियमने तसेच घडलेल्या घटना आदिंबाबत जेथे आवश्यकता असेल तेथे आम्ही व्यवस्थापनाची निवेदने मिळविली.

५) लागू होणारे कॉर्पोरेट संबंधीचे व इतर कायदे व त्यातील तरतुदी, नियमावली, नियमने इ. चे अनुपालन करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. कार्यपद्धतीचे प्रायोगिक तत्त्वावर पडताळणी करणे, या मर्यादित आम्ही परिक्षण केले आहे.

६) हा सेक्रेटरीयल रिपोर्ट म्हणजे कंपनीची भविष्यातील जीवनक्षमता याची हमी नव्हे किंवा कंपनीने तिचे व्यवहार प्रभावीरित्या किंवा परिणामकारकरित्या पार पाडले यांचे आश्वासन नाही.

ए. वाय. साठे ॲण्ड कं. करिता
कंपनी सेक्रेटरीज

सी. एस. अजित साठे
मालक
एफ. सी. एस. २८९९, सीओपी नं. ७३८
यु डी आय एन - एफ ००२८९९सी००३११५७४५
पीइआर रिव्हीव सर्टिफिकेट नं - १५८५/ २०२१
स्थळ - ठाणे
दिनांक - २५/०३/२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट – ५

वर्ष २०२० -२१ च्या सेक्रेटरीयल ऑडिटर यांच्या अहवालातील निरीक्षणालर उत्तर

सेक्रेटरीयल ऑडिटर यांचे निरीक्षण	उत्तर
१) या कंपनीने ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे अहवाल एकत्रित वित्तीय विवरण पत्रकासह लेखा परिक्षित वित्तीय विवरण पत्रके, संचालकांचा अहवाल आणि त्यावर लेखापरिक्षकांचे तसेच भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय या सर्वांचा स्वीकार तहकूब होऊन नंतर झालेल्या आणि दि. २ सप्टेंबर २०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेत मध्ये केला आहे.	ही कंपनी सुत्रधारी कंपनी असल्याने तिला स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांसह एकत्रित वित्तयी विवरण पत्रके तयार करावी लागतात. याशिवाय ती शासकीय कंपनी असल्याने, भारताचे मा. लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी केले पूरक लेखा परिक्षण / प्रायोगिक लेखा परिक्षण यातील तरतूदी लागू असतात. संचालक मंडळाने स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांना दि. ०४ सप्टेंबर २०१९ रोजी मंजूरी दिली आणि सभासदाची वार्षिक सर्वसाधारण सभा २८.१२.२०१९ रोजी झाली. मात्र मा. कॅग यांचे दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील अभिप्राय उपलब्ध नसल्याने वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब करावी लागली आणि त्याचा स्वीकार नंतरच्या तहकब झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात आला.
२) १ एप्रिल २०२० ते २३ जुलै २०२० या कालावधीत बोर्डावर किमान २ ऐवजी एकच स्वतंत्र संचालक कार्यरत होता.	वस्तुस्थिती
३) २३ जुलै २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत बोर्डावर स्वतंत्र संचालक नव्हते.	वस्तुस्थिती
४) १ एप्रिल २०२० ते २३ जुलै २०२० आणि २४ जुलै २०२० ते १६ डिसेंबर २०२० या कालावधीत बोर्डावर एकही महिला संचालक नव्हती.	वस्तुस्थिती
५) कंपनीकडे वर्षभरात संचालक मंडळावर पुरेसे स्वतंत्र संचालक नसल्यामुळे, लेखापरिक्षण समिती, नामनिर्देशन आणि मोबदला समिती आणि सीएसआर समितीची योग्य रचना नव्हती.	वस्तुस्थिती

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे - परिशिष्ट – ६

कंपन्यांचे (लेखा) नियम २०१४ चे सहवाचन कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४(३) (म) अंतर्गत ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञानाचा स्वीकार, परकीय चलनातील मिळकत व खर्च

अ) ऊर्जा संवर्धनावर

(१)	ऊर्जा संवर्धनावर परिणाम व उचललेली पावले	वित्तीय वर्षात ऊर्जा संवर्धनाबाबत कोणतीही उपाय योजना करण्यात आलेली नाही.
(२)	ऊर्जेला पर्यायी स्त्रोताचा वापर करण्यासाठी घेललेली पावले	ऊर्जेला पर्यायी स्त्रोताचा वापर करण्याबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही
(३)	ऊर्जा संवर्धन उपरकणांवर भांडवली गुंतवणूक	लागू नाही

ब) तंत्रज्ञानाचा स्वीकार

(१)	तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी घेतलेले परिश्रम	लागू नाही
(२)	उत्पादन सुधारणा, खर्च कमी करणे, उत्पादन विकास किंवा आयात पर्याय यासारख्या उत्पादनांचा लाभ	लागू नाही
(३)	आयात केलेल्या तंत्रज्ञानाबाबत (वित्तीय वर्षाच्या सुरुवातीपासून मागच्या तीन वर्षाच्या काळात आयात केलेले) -	लागू नाही
	अ - आयात केलेल्या तंत्रज्ञानाच्या तपशील	
	ब - आयात वर्ष	
	क - तंत्रज्ञान पूर्णपणे आत्मासात केले आहे की नाही.	
	ड - पूर्णपणे आत्मसात झाले नसल्यास ज्या भागात आत्मसात झाले नाही त्याची कारणे	
(४)	संशोधन व विकास यावर झालेला खर्च	कंपनीने वर्षभरात संशोधन आणि विकास संबंधी कोणताही उपक्रम हाती घेतलेला नाही.

क) परदेशी चलनातील मिळकत आणि खर्च -

१)	निर्याती संबंधित उपक्रम - निर्यातील चालना देण्यासाठी घेतलेला पुढाकार, उत्पादने आणि सेवांसाठी नवीन निर्यात बाजारपेठांचा विकास आणि निर्यात योजना	लागू नाही
२)	एकूण परदेशी चलन कमविले व खर्च केले.	

तपशील	**२०२० -२१**	**२०१९ -२०**
परकीय चलनातील मिळकत	निरंक	निरंक
परकीय चलनामध्ये खर्च	निरंक	निरंक

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे - परिशिष्ट – ७

फॉर्म नं. एम जी टी ९ वार्षिक विवरणाचा उतारा दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा (कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९२(३) आणि कंपनीचे (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४ यातील नियम क्र. १२(१) नुसार)

१. नोंदणी व इतर तपशील -

१)	सी आय एन	यू ४०१०० एम एच २००५ एस जी सी १५३६४९
२)	नोंदणीची तारीख	३१.०५.२००५
३)	कंपनीचे नाव	म रा वि मं सुत्रधारी कंपनी मर्यादित
४)	कंपनीची श्रेणी/ उपश्रेणी	सार्वजनिक मर्यादित कंपनी शेअर्स ने राज्य शासकीय कंपनी
५)	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्काचा तपशील	हाँगकाँग बँक इमारत ३ रा व ४ था माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ फोन (०२२) २२६१९१०० फॅक्स (०२२) २२६१९१०१ ई मेल – msebhcl@gmail.com
६)	शेअर्स यादीवर आहे किंवा कसे	नाही
७)	रजिस्टार ऑफ ट्रान्सफर एजंटचे नाव, पत्ता व संपर्क तपशील (जर) असल्यास	एन एस डी एल डेटा बेस मॅनेजमेंट लिमिटेड सी आय एन - यू ७२४०० एम एच २००४ पी एल सी १४७०९४ पत्ता - ४ था माळा, ए विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०००१३ फोन नं. ९१ -२२ -२४९९४२०० ई मेल - inefo -ndml@nsdl.co.in

२. कपनीचे मुख्य व्यवसाय कार्य

कंपनीच्या एकूण उलाढालीत ज्याच्या १० टक्के किंवा जास्त योगदान असलेल्या सर्वव्यावसायिक कार्याची माहीती द्यावी

अनु. क्र.	मुख्य उत्पादन / सेवा यांची नावे व वर्णन	उत्पादन / सेवा यांचे एन आय सी कोड	कंपनीच्या एकूण उलाढालीतील टक्केवारी
	लागू नाही	लागू नाही	लागू नाही

३) सुत्रधारी, उपकंपनी व सहयोगी कंपन्यांचा तपशील

अ) सुत्रधारी कंपनी -निरंक

ब) कंपनी कायदा २०१३ च्या उपकलम २(८७) अंतर्गत उपकंपनी

अ. क्र.	कंपनीचे नाव व पत्ता	सीआयएन/ जीएलएन	उपकंपनी	भागांची धारण केलेली टक्केवारी	लागू होणारे कलम
१.	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. प्लॉट नं. जी -९, अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१, महाराष्ट्र.	यू ४०१०० एम एच २००५ एस जी सी १५३६४८	उपकंपनी	१००%	२(८७)

२.	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., प्लॉट नं. जी -९, अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू ४०१०९ एम एच २००५ एस जी सी १५३६४५	उपकंपनी	१००%	२(८७)
३.	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., प्लॉट नं. सी -९, ई. ब्लॉक, बांद्रा -कुर्ला कॉम्पलेक्स. बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू ४०१०९ एम एच २००५ एस जी सी १५३६४६	उपकंपनी	१००%	२(८७)
४.	महाजनको अश मॅनेजमेंट सव्हिसेस लि., प्लॉट नं. जी/९, ई. अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, २रा माळा, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू ४०१०५ एम एच २००७ एस जी सी १७३४३३	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. ची उपकंपनी	१००%	२(८७)
५.	महागुज कोलायरीज लि., प्लॉट नं. जी/९, अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, २रा माळा, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू १०१०२ एम एच २००६ एस जी सी १६५३२७	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. ची उपकंपनी	६०%	२(८७)
६.	धोपावे कोस्टल पॉवर लि.,प्लॉट नं. जी -९, अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, २रा माळा, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू ४०१०८ एम एच २००७ एस जी सी १६८८३६	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. ची उपकंपनी	१००%	२(८७)
७.	औरंगाबाद पॉवर कंपनी लि.,प्लॉट नं. जी/९, अनंत काणेकर मार्ग प्रकाशगड, २रा माळा, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१,महाराष्ट्र.	यू ४०१०९ एम एच २००७ एस जी सी १७१८५२	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. ची उपकंपनी	१००%	२(८७)

क) कंपनी कायदा २०१३ च्या उपकलम २(६) अंतर्गत (संयुक्त साहस कंपनी सह) सहयोगी कंपनी - निरंक

४. भागधारणेचे स्वरुप - (एकूण समभागाची टक्केवारी मध्ये भाग भांडवलाची विभागणी)

भागधारकांची श्रेणी	वर्षारंभी धारण केलेल्या शेअर्सची संख्या				वर्षाअखेरीस धारण केलेल्या शेअर्सची संख्या				वर्षभरातील बदलाची टक्केवारी
	डीमॅट	प्रत्यक्ष	एकूण	एकूण शेअर्सची टक्केवारी	डीमॅट	प्रत्यक्ष	एकूण	एकूण शेअर्सची टक्केवारी	
अ) प्रवर्तक									
१) भारतीय									
अ) व्यक्तीश -/ हिंदू अविभाजीत कुटुंब	-	-	-	-	-	-	-	-	-
ब) केंद्र शासन	-	-	-	-	-	-	-	-	-
क) राज्य शासन	-	८९,१०,९७,११,५०२	८९,१०,९७,११,५०२	१००%	-	८९,१७,३७,११,५०२	८९,१७,३७,११,५०२	१००%	-
ड)बॉडीज कॉर्पोरेट	-	-	-	-	-	-	-	-	-
इ) बँक/वित्तीय संस्था	-	-	-	-	-	-	-	-	-
फ) अन्य	-	-	-	-	-	-	-	-	-
उपबेरीज (अ) (१)	०	८९,१०,९७,११,५०२	८९,१०,९७,११,५०२	१००%	०	८९,१७,३७,११,५०२	८९,१७,३७,११,५०२	१००%	-
२) परदेशी									
अ) अनिवासी/व्यक्ती	-	-	-	-	-	-	-	-	-
ब) इतर व्यक्ती	-	-	-	-	-	-	-	-	-
क) बॉडीज कार्पोरेट	-	-	-	-	-	-	-	-	-
ड) बँक/ वित्तीय संस्था	-	-	-	-	-	-	-	-	-
इ) इतर	-	-	-	-	-	-	-	-	-
उपबेरीज (अ) (२)	०	०	०	०	०	०	०	०	०
प्रवर्तकांच्या एकूण भागधारणा (अ) = (अ)(१) + (अ) (२)	०	८९,१०,९७,११,५०२	८९,१०,९७,११,५०२	१००%	-	८९,१७,३७,११,५०२	८९,१७,३७,११,५०२	१००%	-
ब) सार्वजनिक भागधारणा									
१. संस्था	-	-	-	-	-	-	-	-	-
अ) मॅच्युअल फंड	-	-	-	-	-	-	-	-	-
ब) बँक/ वित्तीय संस्था	-	-	-	-	-	-	-	-	-

क) केंद्र शासन	-	-	-	-	-	-	-	-	-
ड) राज्य शासन	-	-	-	-	-	-	-	-	-
इ) साहसी भांडवल निधी	-	-	-	-	-	-	-	-	-
फ) वीमा कंपनी	-	-	-	-	-	-	-	-	-
ग) एकत्रित गुंतणुक संस्था	-	-	-	-	-	-	-	-	-
ज) परदेशी साहसी भांडवल	-	-	-	-	-	-	-	-	-
च) इतर (स्पष्ट करावे)	-	-	-	-	-	-	-	-	-
उपबेरीज (बी) (१)	०	०	०	०	०	०	०	०	०
२. संस्था व्यतिरिक्त									
अ) बॉडीज कॉर्पोरेट									
१) भारतीय	-	-	-	-	-	-	-	-	-
२) परदेशी	-	-	-	-	-	-	-	-	-
ब) व्यक्तीशा -	-	-	-	-	-	-	-	-	-
१) व्यक्तिगत भागधारधा नामभाग रु. १ लाखात भागधारणेपर्यंत भांडवल	-	-	-	-	-	-	-	-	-
ग) व्यक्तिगत भागधारक नाममात्र भाग रु. १ लाखापेक्षा जास्त भागधारणा	-	-	-	-	-	-	-	-	-
क) इतर (सष्ट करावे)	-	-	-	-	-	-	-	-	-
१) अनिवासी भारतीय	-	-	-	-	-	-	-	-	-
२) स्पष्ट सदस्य	-	-	-	-	-	-	-	-	-
३) हिंदू अविभाजित कुटुंब	-	-	-	-	-	-	-	-	-
उपबेरीज (ब) (२)	०	०	०	०	०	०	०	०	०
एकूण सार्वजनिक भागधारणा (ब) = (ब)(१)+(ब)(२)	०	०	०	०	०	०	०	-	-
क) जीडीआर/जागतिक गुंतवणूक कस्टोडीयन यांनी धारण केलेले शेअर्स	-	-	-	-	-	-	-	-	-
एकूण बेरीज (अ+ब+क)	०	८९,१०,९७,११,५०२	८९,१०,९७,११,५०२	१००%	-	८९,१७,३७,११,५०२	८९,१७,३७,११,५०२	१००/-	०

ब) प्रवर्तकांची भागधारणा -

अनु. क्र.	भागधारकाचे नाव	वित्तीय वर्षारंभीची भागधारणा			वित्तीय वर्षा अखेरची भागधारणा			वर्षातील भागधारणेच्या बदलाची टक्केवारी
		भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	गहाण/ बोजाधारी भागांची एकूण	भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	गहाण/ बोजाधारी भागांची एकूण टक्केवारी	
१	महाराष्ट्र शासन (नामनिर्देशित व्यक्तीसह)	८९,१०,९७,११,५०२	%	-	८९,१७,३७,११,५०२	१००%	-	-
	एकूण	८९,१०,९७,११,५०२	१००%	-	८९,१७,३७,११,५०२	१००%	-	-

क) प्रवर्तकांच्या भागधारणेतील बदल - (कृपया बदल नसल्यास, तसे स्पष्ट करावे)

तपशील	वित्तीय वर्षाच्या आरंभीची भागधारणा ०१/०४/२०२०		वित्तीय वर्ष २०२० -२०२१ दरम्यान संचित भागधारणा	
	भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी
वित्तीय वर्षाच्या आरंभी	८९,१०,९७,११,५०२	१००%	८९,१०,९७,११,५०२	१००%
१४/१०/२०२० रोजीचे समभाग वाटप	६,४०,००,०००	०.०७%	८९,१७,३७,११,५०२	१००%
वित्तीय वर्षाच्या अखेरीस	८९,१७,३७,११,५०२	१००%	८९,१७,३७,११,५०२	१००%

ड) वरच्या दहा स्थानावरील भागधारकांच्या भागधारणेचे स्वरुप (संचालक, प्रवर्तक व जागतिक गुंतवणूकधारक पावती, अमेरिकन गुंतवणूक पावतीधारक वगळून)

अ.क्र.	वरच्या दहा स्थानावरील प्रत्येकी भागधारक	वित्तीय वर्षारंभीची संख्या		वित्तीय वर्षाअखेरची संचित भागधरणा	
		भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी
१	*	-	-	-	-
२	*	-	-	-	-
३	*	-	-	-	-
४	*	-	-	-	-

*** सर्व समभाग नामनिर्देशित व्यक्तीसह राज्य शासनाने धारण केले आहे.**

ई)) संचालक व व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींची भागधारणा -

अ. क्र.	संचालक व व्यवस्थापकांतील महत्वाच्या व्यक्तीची प्रत्येकी भागणारणा	वित्तीय वर्षारंभीची संख्या		वित्तीय वर्षाअखेरची संचित भागधरणा		वित्तीय वर्षाच्या अखेरची भागधारणा
		भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	भागांची संख्या	कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी	
अ	संचालक					
	काणत्याही संचालकाची कंपनीच्या भागाची धारणा नाही (राज्य शासन नामनिर्देशित सोडून)					
ब	व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती					
	व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तीपैकी कोणीही कंपनीच्या भागाची धारणा केली नाही.					

५) ऋण ग्रस्तता (कंपनीची ऋण ग्रस्तता थकीत/ उपार्जित परंतु देय नसलेला)

	ठेवी वगळून प्रतिभूत कर्जे	अप्रतिभूत कर्जे	ठेवी	एकूण ऋण ग्रस्तता
वित्तीय वर्षारंभीची ऋणग्रस्तता				
१) मुद्दल रक्कम	-	-	-	-
२) देय व्याज पण न भरलेले	-	-	-	-
३) उपार्जित पण देय नसलेले व्याज	-	-	-	-
एकूण (१+२+३)	**०**	-	-	**०**
वित्तीय वर्षात ऋणग्रस्तेत बदल				
१) मुद्दलामध्ये भर / (तूट)	-	-	-	-
२) देय व्याज पण देय न भरलेले भर / (तूट)	-	-	-	-
३) उपार्जित पण देय नसलेले व्याज भर / (तूट)	-	-	-	-
वित्तीय वर्षाच्या अखेरीस ऋणग्रस्तता				
१) मुद्दल रक्कम	-	-	-	-
२) व्याज देय पण न भरलेले	-	-	-	-
३) उपार्जित पण देय नसलेले व्याज	-	-	-	-
एकूण (१+२+३)	**०**	**०**	**०**	**०**

६) संचालाक व व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींचे परिश्रमिक

अ) व्यवस्थापकीय संचालक, पूर्ण वेळ संचालक आणि किंवा व्यवस्थापक यांचे पारिश्रमिक

अनु. क्र.	परिश्रमिकांचा तपशील	व्यवस्थापकीय संचालक/पूर्ण वेळ संचालक/ व्यवस्थापकांची नांवी					एकूण रक्कम रु.
			असिम कुमार गुप्ता व्यवस्थापकीय संचालक	दिनेश वाघमारे व्यवस्थापकीय संचालक	अनूप कुमार सिंह (पूर्णवेळ संचालक)	सुनील लक्ष्मण पिंपळखुटे (पूर्णवेळ) संचालक	
१	**एकूण वेतन**						
	अ) आयक कायदा १९६१ च्या कलम १७(१) च्या तरतुदीनुसार वेतन	-	-	-	३४,६२,०५१	३२,२२,१९५	६६,८४,२४६
	ब) आयकर कायदा १९६१ कलम १७(२) च्या तरतुदीनुसार सूविधांचे मूल्य	-	-	-	-	-	
	क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(३)च्या तरतुदीनुसार वेतना ऐवजी नफा	-	-	-	-	-	-
२	साठा पर्याय	-	-	-	-	-	-
३	स्वेट इक्विटी	-	-	-	-	-	-
४	कमिशन - नफयाची टक्केवारी - इतर स्पष्ट करा	-	-	-	-	-	-
५	- इतर स्पष्ट करा	-	-	-	-	-	-
	एकूण (अ)	**-**	**-**	**-**	**३४,६२,०५१**	**३२,२२,१९५**	**६६,८४,२४६**
	कायद्यानुसार कमाल मर्यादा **	-	-	-	लागू नाही	लागू नाही	लागू नाही

** कंपनी कायदा २०१३ च्या कलम १९७ नुसार अनुपस्थिति किंवा नफ्याच्या अपुरेपणामुळे व्यवस्थापकांच्या परिश्रमिकांच्या बाबतच्या तरतूदी कंपनीला लागू नाहीत.

ब) इतर संचालकांचे परिश्रमिक

परिश्रमिकांचा तपशील	**संचालकांची नावे**			
स्वतंत्र संचालक	-	-	-	-
मंडळ/समिती बैठकांच्या उपस्थितीचे शुल्क	-	-	-	-
कमिशन -	-	-	-	-
इतर (कृपया स्पष्ट करा)	-	-	-	-
एकूण (१)	-	-	-	-
इतर अकार्यकारी संचालक	**-**	**-**	**-**	**-**
मडळ/समिती बैढठकांच्या उपस्थितीचे शुल्क	-	-	-	-
कमिशन	-	-	-	-
इतर (कृपया स्पष्ट करा)	-	-	-	-
एकूण (२)	-	-	-	-
एकूण (ब) (१+२)	-	-	-	-
एकूण व्यवस्थापकीय पारिश्रमिक	-	-	-	-
कायद्याप्रमाणे एकूण कमाल मर्यादा *	१,००,०००*			

* कंपनी कायदा २०१३ च्या कलम १९६च्या संबंधित नियमाच्या सहवाचनासह कंपनी तिच्या संचालकांना मंडळाच्या बैठकीला किंवा समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी बैठक शूल्क देते जे संचालक मंडळाच्या बैठकीला किंवा समितीच्या प्रत्येक बैठकीला एक लाखापेक्षा जास्त नसते शासन निर्णय (जी आर) पीएसयू १० -१०/ क्र. ९६/१० पीयू दि. १३ मार्च २०१२ नुसार वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांनी स्वतंत्र संचालक यांना रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) प्रती बैठक अशी बैठक शुल्क दिले आहे.

क) व्यवस्थापकीय संचालक/ व्यवस्थापक पूर्ण वेळ संचालक या व्यतिरिक्त व्यवस्थापकीय पदावरील व्यक्तींचे पारिश्रमिक

अ. क्र.	**परिश्रमिकांचा तपशील**	**व्यवस्थापकीय संचालक/ पूर्ण वेळ संचालक/व्यवस्थापकांची नावे**			
		सीईओ	**सीएस**	**सीएफओ ***	**एकूण रक्कम**
१	एकूण वेतन				
	अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(१) मधील तरतुदीनुसार वेतन	-	२३,८४,७७६	-	२३,८४,७७६
	ब) आयकर कायद्यातील १९६१	-	-	-	-
	च्या कलम १७(२) प्रमाणे सूविधांचे मूल्य	-	-	-	-
२	साठा पर्याय	लागू नाही	-	लागू नाही	-
३	स्वेट इक्विटी	लागू नाही	-	लागू नाही	-
४	कमिशन नफ्याची टक्केवारी इतर	लागू नाही	-		-
	इतर (स्पष्ट करणे)	-	-	-	-
५.	एकूण (१ ते ५)	लागू नाही	२३,८४,७७६	लागू नाही	२३,८४,७७६

* पूर्णवेळ संचालक (वित्त) यांची मुख्य वित्तीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

७) दंड/सजा/ मिटविलेले गुन्हे

प्रकार	कंपनी कायद्याचे कलम	संक्षिप्त वर्णन	दंड/सजा मिटविलेले गुन्हे/ लावलेले शुल्क	प्राधिकारी (आर डी / एन सी एल टी / कोर्ट)	जर दावा केला असल्यास तपशील द्यावा
अ) कंपनी					
दंड	**निरंक**				
शिक्षा					
मिटविणे					
ब) संचालक					
दंड	**निरंक**				
शिक्षा					
मिटविणे					
क) कसूर करणारे अन्य अधिकारी					
दंड	**निरंक**				
शिक्षा					
मिटविणे					

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

फॉर्म एओसी - १

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट - ८

उपकंपन्या/ सहयोगी कंपन्या/ संयुक्त साहसे याच्या वित्तीय स्थितीची ठळक वैशिष्ट्यांचा समावेश असलेले विवरणपत्र

(कायद्याचे कलम १२९ मधील उपकलम (३) यातील पहिल्या अटीप्रमाणे ज्याचे सहवाचन नियम ५ कंपनी लेखे नियमावली २०१४ यासह होते त्यानुसार)

भाग अ उपकंपन्या

अनु. क्र.	उपकंपन्या	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि.(रु. कोटी मध्ये)	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.(रु. लाखामध्ये)	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण क.लि. (रु. लाखा मध्ये)	महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लि. (रक्कम रु. मध्ये)*	महागुज कॉलयरीज लि. (रक्कम रु. मध्ये) *	धोपावे कोस्टल पॉवर लि. (रक्कम रु. मध्ये)*	औरंगाबाद पॉवर कं. लि.+ (रक्कम रु. मध्ये)
	स्वरुप	थेट	थेट	थेट	अप्रत्यक्ष	अप्रत्यक्ष	अप्रत्यक्ष	अप्रत्यक्ष
१.	उपकंपनी घेतल्याची तारीख	३१.०५.२००५	३१.०५.२००५	३१.०५.२००५	२४.०८.२००७	०१.११.२००६	१६.०३.२००७	२०.०६.२००७
२.	अहवाल कालावधी	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१	वि.वर्ष २०२० -२१
३.	अहवालाचे चलन	भारतीय रुपया	भारतीय रुपया	भारतीय रुपया	भारतीय रुपया	भारतीय रुपया	भारतीय रुपया	भारतीय रुपया
४	भाग भांडवल	२,५४०.७९	४७,७२,३९८.४९	८,९८,४९७.४७	५,००,०००	५,००,०००	५,००,०००	५,००,०००
५.	राखीव व आधिक्य	(६,४०२.७६)	(२४,७४,४५३.६५)	३,३२,६६२.४५	(१,४७,०२,९८६)	(१२,०२,९८,४७३)	(८,३०,६५,०६२)	(६,२४,६८,३६६)
६.	एकूण मत्ता	७२,१५५.१७	१,४६,३०,७९३.५७	२५,०७,४४८.१२	१२,९६,७३८	५४,४२,७८,६६६	८,२९,४२,४७०	१२,१२,१८६
७.	एकूण दायित्त्वे	७२,१५५.१७	१,४६,३०,७९३.५७	२५,०७,४४८.१२	१२,९६,७३८	५४,४२,७८,६६६	८,२९,४२,४७०	१२,१२,१८६
८.	गुंतवणुकी	२.११	३१,३३९.७८	१,४०,४२३.६८	-	-	-	-
९.	एकूए उलाढाल	२३,६२४.९९	७३,७१,१८३.४२	४,९९,०३९.१६	-	-	-	-
१०	करपूर्व नफा	४२४.६०	(१,४३,२३४.१०)	१,६८,८१४.४२	(५,०५४)	(३,२७,५६,३९३)	(३३,१००)	(६२,९०९)
११.	करासाठी तरतूद	१४८.९७	११,०७४.३०	(६१,४७७.२५)	-	-	-	-
१२.	करोत्तर नफा	२७५.६३	(१,३२,१५९.८०)	१,०७,३३७.१७	(५,०५४)	(३,२७,५६,३९३)	(३३,१००)	(६२,९०९)
१३.	प्रस्तावित लाभांश	-	-	-	-	-	-	-
१४.	भाग धारणेचा ठक्केवारी	१००%	१००%	१००%	१००%	६०%	१००%	१००%

* महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. ची उपकंपनी

+ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची उपकंपनी

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट -८ चा भाग ब

सहयोगी व संयुक्त साहसे कंपन्या (कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १२९(३) जे सहयोगी कंपन्या व संयुक्त साहसे यासंबंधी आहे, त्यानुसार)

अनु. क्र.	सहयोगी कंपन्या /संयुक्त साहस उपक्रम यांची नांवे	नाव १	नाव २	नाव ३
१	नवीनतम लेखा परिक्षण केलेल्या ताळेबंदाची तारीख	-	-	-
२	सहयोगी किंवा संयुक्त साहस कंपनी संपादनाची तारीख	-	-	-
३	वर्षाअखेरीस कंपनीने धारण केलेले सहयोगी कं./संयुक्त साहसे यांचे भाग	-	-	-
	संख्या	-	-	-
	सहयोगी कंपन्या/संयुक्त साहसे यात गुंतविलेल्या रकमा	-	-	-
	धारणेच्या मर्यादेची (टक्केवारी मध्ये)	-	-	-
४	त्यात महत्त्वाचा प्रभाव कसा आहे याचे वर्णन	-	-	-
५	सहयोगी व संयुक्त साहसे यांच्याशी एकत्रिकरण न करण्याची कारणे	-	-	-
६	लेखापरिक्षित केलेल्या नवीनतम ताळेबंदानुसार भागधारणेस श्रेय देण्याजोगे निव्वळ मोल	-	-	-
७	वर्षभराचा नफा / तोटा	-	-	-
	१) एकत्रिकरणामध्ये हिशेबात घेतलेले	-	-	-
	२) एकत्रिकरणामध्ये हिशेबात न घेतलेला	-	-	-

टिपा – अहवालाच्या तारखेला कंपनीला कोणत्याही सहयोगी किंवा संयुक्त साहस कंपन्या नव्हत्या.

१ ज्याचे प्रवर्तन कार्य सुरु व्हायचे अशा सहयोगी/ संयुक्त साहस कंपनी - नावे लागू नाही.

२ वर्षभरात परिसमापनात गेलेल्या किंवा विक्री केलेल्या सहयोगी संयुक्त साहस कंपनी - नावे लागू नाही.

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

चंद्रशेखर गद्रे
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट - ९

उपकंपनी, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्याची कामगिरी आणि कंपनीच्या एकूण कामगिरीमध्ये त्यांचे योगदान - भाग १

उपकंपनी, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्यांची कामगिरी

१) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि.(महापारेषण) -
आढावा वर्षामध्ये महापारेषण कंपनीची कामगिरी खालीलप्रमाणे

(रु. लाखामध्ये)

तपशील	**२०२० -२१**	**२०१९ -२०**
प्रवर्तनापासून महसूल	४,७७,३९७.३४	३,७२,२५५.४६
इतर उत्पन्न	२१,६४१.८२	३९,१४४.५१
एकूण उत्पन्न	४,९९,०३९.१६	४,११,३९९.९७
दुरुस्ती व देखभालीचा खर्च	१४,०९०.२०	२४,५३२.७१
कर्मचारी लाभ खर्च	१,०९,६२१.६३	१,२८,२९०.५७
वित्त खर्च	५०,५१२.८७	५३,६५८.५५
घसारा व कर्जफेडीचा खर्च	१,२१,७५६.१७	१,१९,४३७.०५
इतर खर्च	३४,२४३.८७	३६,१८९.५६
एकूण खर्च	३,३०,२२४.७४	३,६२,१०८.४४
करपूर्व नफा / (तोटा)	१,६८,८१४.४२	४९,२९१.५३
कर खर्च	(६१,६१७.०८)	(२८,०४५.७३)
वर्षासाठी नफा / (तोटा	१,०७,८५२.३३	२१,७४७.६२
इतर सर्वकष उत्पन्न	२०३.११	(८,२९०.७५)
कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न	**१,०८,०५५.४४**	**१३,४५६.८७**

२) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. लि.(महावितरण)

आढावा वर्षामध्ये महावितरण कंपनीची कामगिरी खाली दिल्याप्रमाणे -

(रु. लाखामध्ये)

तपशील	**२०२० -२१**	**२०१९ -२०**
प्रवर्तनापासून महसूल	७,३७१,१८३.४२	७,३७६,१४४.४०
इतर उत्पन्न	५७६,३११.८४	८४४,१८२.२८
एकूण उत्पन्न	**७,९४७,४९५.२६**	**८,२२०,३२६.६८**
वीज खरेदी	६,२६५,१३९.७०	६,७४९,९२०.१२
कर्मचारी लाभ खर्च	५३७,२३९.३९	५१८,५५७.०२
वित्त खर्च	५७२,२१०.७९	४५०,६४१.८०
घसारा व कर्जफेडीचा खर्च	३३९,४५४.०७	३०६,९०७.३२

इतर खर्च	६६७,६०३.७१	८१३,७३९.८१
एकूण खर्च	**८,३८१,६४७.६६**	**८,८३९,७६६.०७**
नियमन उत्पन्न खर्च	२९०,९१९.००	७०१,०७५.००
करपूर्व नफा / (तोटा)	**(१४३,२३३.४०)**	**८१,६३५.६१**
कर खर्च	(११,०७४.३०)	१३,१८०.४२
वर्षासाठी नफा / (तोटा	**(१३२,१५९.१०)**	**६८,४५५.१९**
इतर सर्वकष उत्पन्न	५४३.३५	(१०,००६.७९)
कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न	**(१३१,६१५.७५)**	**५८,४४८.४०**

१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.लि.(महानिर्मिती)

आढावा वर्षामध्ये महानिर्मिती कंपनीची कामगिरी खाली दिल्याप्रमाणे

(रु. कोटीमध्ये)

तपशील	**२०२० -२१**	**२०१९ -२०**
ठोक वीज विक्री	२०,८९१.५८	२१,९६३.९८
इतर प्रवर्तनापासून महसूल	२,६८३.८८	२,६९२.३३
इतर उत्पन्न	४९.५३	८०.०७
एकूण उत्पन्न	**२३,६२५.००**	**२४,७३६.३८**
वापरलेल्या मालाचा खर्च	१३,४९२.९८	१४,३९८.२७
कर्मचारी लाभ खर्च	१,४२९.४२	१,८२८.९७
वित्त खर्च	३,६३७.०४	३,५७८.७९
घसारा व कर्जफेडीचा खर्च	२,७३७.८०	२७७८.७४
इतर खर्च	१,९०६.४४	१,९३०.१७
एकूण खर्च	**२३,२०३.६८**	**२४,५१४.९४**
करपूर्व नफा / (तोटा)	**४२१.२७**	**२२१.४९**
कर खर्च	१४८.९७	६३.९०
कालावधीसाठी नफा / (तोटा	**२७२.३०**	**१५७.५९**
इतर सर्वकष उत्पन्न	०.५६	(१२२.९६)
कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न	**२७२.८६**	**३४.६३**

भाग – २

कंपनीच्या एकूण कामगिरीमध्ये उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त साहसे कंपन्या याचे योगदान

(रु. कोटीमध्ये)

अ. क्र.	तपशील	३१/०३/२०२१ रोजी	३१/०३/२०२० रोजी	बदल
१	प्रवर्तनापासून महसूल	७४,७१९	७४,५१९	२००
२	इतर उत्पन्न	६,०३१	८,९१६	-२,८८५
३	एकूण उत्पन्न	८०,७५०	८३,४३५	(२,६८५)
४	**एकूण खर्च**	**७८,२६९**	**८३,४५३**	**(५,१८४)**
५	घसाऱ्यापूर्वीचा नफा	(२,४८१)	(१८)	(२,४६३)
६	वर्षासाठी घसारा	७,३७०	७,०६७	३०३
७	करपूर्व नफा	(४,८८८)	(७,०८५)	(२,१९६)
८	सहयोगी व संयुक्त यांच्या नफ्यात वाटा	६	५	१
९	नियमन उत्पन्न (खर्च)	२,९०९	७,०११	(४,१०१)
१०	आयकर व स्थगित कर तरतूद	६५४	४८६	१७८
११	कालावधीसाठी नफा / (तोटा)	(२,६२७)	(५४५)	(२,०८२)
१२	इतर सर्वकष उत्पन्न	८	(३०६)	२९८
१३	कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न	(२,६१९)	(८५२)	(१,७६७)

ठळक वैशिष्ट्ये

वित्तीय वर्ष २०२० -२१ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत घसारा पूर्व नफा यामध्ये खालील कारणामुळे निव्वळ वाढ झाली आहे.

१) महावितरणच्या प्रवर्तनापासून महसूलात वाढ

अ. १ एप्रिल २०२० पासून दरामध्ये बदल

ब. लघुदाब कृषी वापराच्या करारामध्ये (दक्षलक्ष युनिट्स) मध्ये वाढ

२) महावितरणच्या मागील वर्षाच्या उत्पन्नामध्ये ३,२८२ कोटी रुपयांच्या पुर्नलेखन केलल्या संशयास्पद कर्जासाठी तरतूद समाविष्ट आहे.

३) महानिर्मितीने कमी वीजनिर्मिती केल्यामुळे कोळशाच्या वापरात घट.

४) महावितरणच्या विजखरेदी खर्चामध्ये घट खालील कारणांमूळे झाली

अ. महानिर्मिती व्यतिरिक्त इतर कंपन्याकडुन विज खरेदीमध्ये घट झाली.

ब. केंद्रिय विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशांकात घट झाल्यामुळे वैयक्तिक विज क्रेदातून विज खरेदी खर्चामध्ये घट झाली.

क. वित्तय वर्ष २०२० -२१ मध्ये एनटीपीसी आणि पीजीसीआयएलला कोविड -१९ मुळे स्थिर आकारामध्ये रु. २७९ कोटीची सूट मिळाली.

५) मागील वर्षांत कर्मचाऱ्यांच्या खर्चामध्ये वेतन निश्चिती थकबाकी समाविष्ट होती. चालू वर्षांचा खर्च वास्तविक आहे.

६) महावितरणच्या कंपनीच्या कारखाने आणि यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती आणि देखभालीमध्ये रु. ३४५ कोटींची वाढ

७) पुरवठदार आणि कंत्राटदारांना देय असलेल्या कार्यरत भांडवलाच्या व्याजात वाढ आणि महावितरणच्या बिल सवलतीवरील व्याज

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ	**दिनेश वाघमारे**
संचालक	व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०६८९२४७८	डीआयएन -०१८४३०९७
चंद्रशेखर गद्रे	**सुबोध झारे**
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त)	कंपनी सेक्रेटरी

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

संचालक मंडळाच्या परिशिष्ट -१०

कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचा वार्षिक अहवाल (वि. वर्ष २०२० -२१)

१. कंपनीच्या सामाजिक जबाबदारी धोरणाची संक्षिप्त रुपरेषा

कंपनी समाजातील विविध विभागातील जीवनमान समृध्द करण्यासाठी वचनबध्द आहे. कंपनी ज्या समुदायांमध्ये काम कते त्या समुदायांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीवर सकारात्मक प्रभाव पाडण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. नैतिकतेने वागणे आणि मोठया प्रमाणावर समाजाच्या आर्थिक विकासात योगदान देणे आणि शाश्वत विकासासाठी क्षमता निर्माण करणे ही कंपनीची सतत वचनबध्दता आहे.

कंपनीच्या सामाजिक जबाबदारीची रचना

अनु. क्र.	संचालकाचे नाव	पद/ संचालकाचे स्वरुप	वर्षभरात झालेल्या सीएसआर समितीच्या बैठकांची संख्या	वर्षभरात सीएसआर समितीच्या बैठकीत उपस्थितांची संख्या
१.	श्री.प्राजक्त प्रसाद तनपुरे	अध्यक्ष/ संचालक	०	०
२.	श्री. असिमकुमार गुप्ता*	सदस्य/व्यवस्थापकीय संचालक	०	०
३.	श्री. दिनेश वाघमारे **	सदस्य/व्यवस्थापकीय संचालक	०	०
४.	श्री.अनुप कुमार सिंग	सदस्य/ पूर्ण वेळ संचालक	०	०

*१ फेब्रुवारी २०२१ रोजी राजीनाम दिला

**१ फेब्रुवारी २०२१ पासून

३) वेब लिंकवर सीएसआऱ समितीची रचना, सीएसआर धोरण आणि मंडळाने मंजूर केलेले सीएसआर प्रकल्प कंपनीच्या वेबसाईडवर उपलब्ध केले जातात

www.msebindiea.com

४) कंपनी (कॉर्पोरेट समाजिक जबाबदारी धोरण) नियम, २०१४ च्या नियम ८ मधील उप - नियम (३) नुसार केलेल्या सीएसआर प्रकल्पांच्या प्रभाव मूल्यांकनाचा तपशील

आढावा वर्षाकरीता लागू नाही.

५) कंपनी (कॉर्पोरेट समाजिक जबाबदारी धोरण) नियम, २०१४ च्या नियम ७ मधील उप - नियम (३) नुसार सेट ऑफ साठी उपलब्ध रकमेचा तपशील आणि आर्थिक वर्षासाठी सेट ऑफ करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम जर असेल तर. निरंक

६) कलम १३५(५) नुसार कंपनीचा सरासरी निव्वळ नफा -

(रु. ८,३६,५४,५७१)

७) अ) कलम १३५(५) नुसार कंपनीच्या सरासरी निवळ नफ्याच्या दोन टक्के -

निरंक

ब) मागील आर्थिक वर्षांतील सीएसआर प्रकल्प किंवा कार्यक्रम किंवा उपक्रमांमुळे उद्भवणारे राखीव -

लागू नाही.

क) आर्थिक वर्षासाठी सेट ऑफ करणे आवश्यक असलेली रक्कम, जर असेल तर -

लागू नाही

ड) आर्थिक वर्षासाठी एकूण सीएसआर दायित्व (७ अ+ ७ ब= ७ क) -

निरंक

८. (अ) आर्थिक वर्षासाठी खर्च केलेली किंवा अनुपस्थितीत सीएसआर रक्कम

वित्तीय वर्षासाठी एकूण खर्च झालेली रक्कम (रु. मध्ये)	अखर्चित रक्कम				
	कलम १३५(६) नुसार खर्च न केलेल्या सीएसआर खात्यात एकूण रक्कम हस्तांतरित केली		कलम १३५ मधील दुसऱ्या तरतुदीनुसार अनुसूची ७ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निधीमध्ये रक्कम हस्तांतरित केली जाते.		
	रक्कम	हस्तांतरणाची तारीख	निधीचे नाव	रक्कम	हस्तांतरणाची तारीख
निरंक	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही

ब) आर्थिक वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांवर खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील -

लागू नाही

क) आर्थिक वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील -

लागू नाही

ड) प्रशासकीय ओव्हरहेड्समध्ये खर्च केलेली रक्कम -

निरंक

इ) प्रभाव मूल्यांकनावर खर्च केलेली रक्कम, लागू असल्यास -

निरंक

१) आर्थिक वर्षासाठी खर्च केलेली एकूण रक्कम(८ ब ८ क ८ ड ८ क) -

निरंक

ख) भरपाईसाठी जादा रक्कम, जर असेल तर -

लागू नाही

९ अ) मागील तीन आर्थिक वर्षांसाठी खर्च न केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील -

लागू नाही

ब) मागील आर्थिक वर्षातील चालू प्रकल्पांसाठी आर्थिक वर्षात खर्च केलेल्या सीएसआऱ रकमेचा तपशील -

निरंक

१०) आर्थिक वर्षात खर्च केलेल्या सीएसआरद्वारे भांडवली मालमत्तेची निर्मिती किंवा संपादन करण्याचे तपशील -

लागू नाही.

११) कारण (ती) जर कंपनी कलम १३५(५) नुसार सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के खर्च करु शकली नाही -

लागू नाही

संचालक मंडळाच्या वतीने **मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेड (सीएसआर कमिटी)**

दिनेश ताराचंद वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०१८४३०९७
पत्ता: ५ वा मजला, फ्लॅट नं. २
सुनीती जगन्नाथ भोसले मार्ग,
सचिवालय जिमखाना, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१

जुईली मिलींद वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८
पत्ता: फ्लॅट नं, ४२, बिल्डींग नं. ९,
एमएसईबी स्टाफ कॉटर्स, बांद्रा रिक्लमेशन,
लिलावती हॉस्पिटलजवळ, बांद्रा,
मुंबई - ४०० ०५०

संचालक मंडळाच्या अहवालाचे परिशिष्ट -११

फॉर्म नं. एओसी - २

(कंपनी कायदा २०१३) च्या कलम १३४ च्या उपकलम (३) खंड (एच) आणि कंपनी (लेखा) नियमावली २०१४ मधील नियम ८(२) च्या कलमाच्या अनुषंगाने मराविमं सुत्रधारी कंपनीने त्याच्या संबंधित व्यक्तीसोबत (कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८(१) नुसार केलेल्या कराराचा / व्यवस्थेचा तपशीलाची प्रकटने

१. सलगी न करता आधारावर केलेल्या करार किंवा व्यवस्था किंवा व्यवहाराचा तपशील - निरंक

२. नजीकच्या तत्त्वावर केलेले व्यवहार / कंत्राटे / व्यवस्था इ. चा तपशील

संबंधित व्यक्तीचे नाव आणि संबंधाचे स्वरुप	रक्कम (रु) कर वगळून	करार / व्यवस्था व्यवहाराचे प्रकार	करार / व्यवस्था व्यवहाराचा कालावधी	करार / व्यवस्था व्यवहाराच्या मूल्यासह मुख्य अटी, जर असेल तर	अशा करारा किंवा व्यवस्था किंवा व्यवहारामध्ये प्रवेश करण्यासाठी समर्थन	मंडळाच्या मंजूरीची तारीख	आगाऊ रक्कम दिली असल्यास जर असेल तर	कलम १८८ च्या प्रथम नियमानुसार आवश्यक असलेल्या सामान्य बैठकीत विशेष ठराव
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. (महावितरण) (संपूर्ण मालकीची उपकंपनी)	४१,२१,३९,९२८	दि. ३१.१२.२०१९ च्या सामंजस्य कराराच्या अटीवर मराविमं सुत्रधारी कं. मर्यादितची कार्यालयीन इमारती व मत्ता महावितरण, महानिर्मिती व महापारेषण याना भाडेट्टी करारावर दिली	दि. १.४.२०१८ रोजी पासून ५ वर्षासाठी लागू होणार्या व्यवस्थेसाठी ३१.१२.२०१८ रोजी सामंजस्य करार अंमलात आणून त्याचे अनुपालन करण्यात आले.	मराविम सुत्रधारी कं. मर्या. आणि तिच्या संपूर्ण मालकीच्या तीन उपकंपन्या नावे महावितरण, महानिर्मिती, व महापारेषण यांच्यामध्ये दि. ३१.१२.०१८ रोजी झालेल्या सामंजस्य कराराप्रमाणे.	शासकीय निर्देशा नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे मालमत्ता हितसंबंध अधिकार दायित्त्वे कार्यवाही आणि कर्मचारी हस्ता - तरणास कारणीभूत व अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र विद्युत हस्तांतर योजना २००५ दि. ०४.०६ २००५ मध्ये समाविष्ट आहे.	२८.१२.२०१८	निरंक	लागू नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. (महापारेषण) संपूर्ण मालकीची उपकंपनी)	१७,३८,९१,९२८							
महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं. लि. (महानिर्मिती) (संपूर्ण मालकीची उपकंपनी)	२२,९५,३६,९००							

संचालक मंडळाच्या वतीने

जुईली वाघ
संचालक
डीआयएन - ०६८९२४७८

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन -०१८४३०९७

स्थळ - मुंबई
दिनांक - २८.०९.२०२२

स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,

मा. सदस्य, म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनी लिमिटेड

स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर अहवाल

१. पात्र मत

आम्ही म.रा. वि.मं.सूत्रधारी कंपनी लिमिटेड (या अहवालात पुढे सदर ''कंपनी'' असे संबोधले आहे). या कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षांची वित्तीय विवरण पत्रके येथे जोडली असून त्याचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. या पत्रकात दि.३१ मार्च २०२१ रोजीचा कंपनीचा ताळेबंद, त्यावर्षीचे नफा आणि तोटा पत्रक, रोख प्रवाह पत्रक आणि त्या वर्षातील समाभागातील बदलांचे माहिती पत्रक तसेच महत्त्वांची लेखा धोरणे व त्या विषयीची स्पष्टीकरणे यांचा सारांश आदींचा समावेश आहे. (या वि.वि. पत्रकांना या अहवालात या पुढे भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेली ''स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके असे संबोधले आहे.'')

आमच्या अभ्यासाधिष्ठीत मतांनुसार आमचे सर्वोत्तम ज्ञान तसेच आम्हास दिलेली सर्व माहिती यानुसार ही वि.वि. पत्रके आमच्या अहवालातील पात्र मतांचा आधार आणि भारतीय लेखा मानकानुसार काही मानकांची पूर्तता केली नसण्या संबंधीचा परिच्छेद ७.३ (ड), यांचा अपवाद वगळता, वरील भारतीय लेखा मानकानुसार केलेली स्वायत्त वि.वि. पत्रके, संबंधित अधिनियमानुसार आवश्यक असलेली त्यात दिलेल्या आकृतीबंधानुसार देण्यात आलेली आहे आणि ती माहिती भा.ले. मानके यासह भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेली लेखातत्त्वे यांच्याशी सुसंगत असून ती कंपनीचे दि.३१ मार्च २०२१ रोजीच्या स्थितीचे सत्य व रास्तचित्र दर्शवितात. तसेच त्या तारखेस संपलेल्या वर्षातील कंपनीचा नफा (इतर सर्वकष उत्पन्नांसह कंपनीची वित्तीय कामागिरी) कंपनीचा रोकडता प्रवाह आणि त्यावर्षातील समभागाचे बदल दर्शवितात.

२. पात्र मतांचा आधार -

आम्ही येथे निम्नलिखित बाबींवर आमच्या लेखा परिक्षणासाठी आवश्यक ती माहिती आणि स्पष्टीकरणे मिळवण्यास असमर्थ ठरलो -

अ) *शासन निर्णय क्र. सुधारणा २०१०/प्र.क्र.११७/ ऊर्जा यानुसार हंगामी हस्तातरण योजनेचे अंतिमीकरण दि. ३१ मार्च २०१६ रोजी झाले. त्यानुसार हस्तांतरित केलेल्या रु. १४,४५३,४००,०००/- एवढया मूर्त स्थिर मत्तांची मालकी निश्चित करणेबाबत. (टिपा क्र. ७.२ पहावी)*

ब) *या कंपनीच्या नोंदवह्यात तिच्या उपकंपन्या महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती यांच्याकडील शिल्लक थकीत बाबींबद्दल, मेळ आणि विचार विनिमय करणे चालू आहे. (संदर्भ - टिपा क्र. ९.१ आणि १९.१) आणि त्याचा वित्तीय स्थितीवर आणि वित्तीय विवरणपत्रांतील प्रकटनांवर परिणाम होऊ शकतो*

क) *म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीने तिच्या उपकंपन्या - महावितरण आणि महानिर्मिती यांनी ग्रामीण विद्यूतीकरण विकास महामंडळाकडून अनुक्रमे रु. ८४०० कोटी आणि रु. १२८४ कोटी अशी कर्जे घेतली असून या कर्जांना म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने हमी दिलेली आहे. भा.ले. मानक १०९ च्या नुसार या हमी विषयी रास्त मूल्यांकन केलेले नाही. त्यामुळे संभाव्य परिणाम निश्चित सांगता येत नाही (संदर्भ - टिपा क्र. २६.७ पहावी)*

ड) *वित्तीय वर्ष २०२० -२०२१ मध्ये 'शेअर ॲप्लीकेशन मनी' रु. ४२.५० कोटी रक्कम मिळाली. त्याचे समभाग ०२/०९/२०२१ रोजी देण्यात आले. यामध्ये कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतूदीचे उल्लंघन झाले आहे. (टिपा क्र. १४.१ पहावी)*

ई) वर्षभरात रु. ६४०,०००,०००/- इतक्या किंमतीच्या शेअर स्वरूपातील रक्कम महाराष्ट्र शासनाकडून महानिर्मिती या अंगीकृत कंपनीस शासन निर्णयानुसार थेट देण्यात आली आणि त्यामुळे कंपनी अधिनियम२०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झाले. (टिपा क्र. १३ (क) पहावी)

उपरोक्त परिच्छेद (अ) ते (ई) यांचा विचार करता नफा, राखीव निधी आणि प्रतिभाग मिळकत यांच्यावर होणारे प्रभावी परिणामांचे सांख्यिकरण केले जाऊ शकत नाही आणि प्रकटही केले जाऊ शकत नाही.

आम्ही वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण सदर अधिनियमातील कलम १४३(१०)यात विनिर्देशित केलेल्या ''लेखापरिक्षणांची मानके'' याला अनुरुप केलेले आहे. या लेखा मानकाप्रमाणे आमच्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण करण्याच्या परीक्षक या नात्याने आमच्या जबाबदाऱ्या, या आमच्या अहवालातील लेखापरीक्षकांच्या जबाबदारीशी संबंधित प्रकरणात विशद केल्या आहेत. आम्ही भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांनी जारी केलेली नीती नियमांची संहिता आणि त्यासोबत अधिनियमातील तरतूदीमध्ये दिलेले वि.वि. पत्रकांच्या लेखापरिक्षणाची नीतीतत्त्वे या एकत्रितपणे जशा लागू होतात आणि आम्हाला लागू होणाऱ्या सर्व नितीनियमांनुसार आम्ही आमचे लेखापरीक्षण केले आहे. त्यासाठी अधिनियमातील तरतूदी आणि त्यातील नियमावलींचा आधार घेतला आहे. अधिनियम आणि आय सी ए आय यांची नीतीविषयक संहिता यानुसार आमची नैतिक जबाबदारी पार पाडली आहे. आमचा विश्वास आहे की आम्ही मिळविलेले लेखापरिक्षणासाठीचे पुरावे हे पुरेसे आहेत, आणि त्या वि.वि. पत्रकांवर आमचे मत व्यक्त करण्यास ते योग्य आधार देतात.

३. भर देण्यायोग्य प्रकरणे -

आम्ही वि.वि. पत्रकाच्या टिपा मधील खालील विषयांवर लक्ष वेधू इच्छितो -

३.१ टिपा क्रमांक ९.२ पहावी - यामध्ये कंपनीने लेखे वह्यातील अग्रीम कराची निव्वळ तरतूद रु. १,६६७,७१०,८८८/- (मा.वर्षी. रु. १,६०२,३९३,६०५/-) असून लेखा पुस्तकात कंपनीने करापोटी ४००,७२७,७२९/- इतक्या रकमेची तरतूद केली आहे. आणि आपली असहमती व्यक्त करीत कंपनीने रु. २९१,७००,०८१/- भरले आहेत. कराची प्रकरणे अपीलात गेले असल्याने आयकर अभिलेखानुसार दायित्व नाही. कंपनीने स्वत - घेतलेल्या निर्णयानुसार रक्कमेची तरतूद केली आहे आणि दर्शविलेली वसुलीची रक्कम ही योग्य रकमा याचा मेळ आणि खात्री करण्याच्या अधीन आहेत.

३.२ टिपा क्रमांक १०.१ पहावी - उपकंपन्यांकडून मालमत्तांच्या भाड्यापोटी थकबाकी रक्कम रु. ४,१६,६२,८६,२६६/- (मा.वर्षी रु. ३,७१६,८६५,५६७/-) बऱ्याच वर्षापासून थकीत आहे. भारतीय लेखा मानक १०९ नुसार अपेक्षित पतहानीसाठी तरतूद लेखावह्यात योग्यप्रकारे केलेली आहे.

३.३ टिपा क्रमांक ८.२ पहावी - यात कंपनीने महावितरणमध्ये केलेल्या गुंतवणूकीचे मूल्य रु. ४७७,२३९,८४९,०४०/- (मा.वर्षी रु. ४७७,२३९,८४९,०४०/-) महावितरण कंपनीला ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या काळात सातत्याने झालेल्या तोट्यामुळे कमी झाले आहे. शेअर्सच्या मूल्यातील घटीसाठी लेखा वहीत तरतूद केलेली नाही. जरी महावितरण कंपनीला वि. वर्ष २०१९ -२०२० मध्ये नफा झाला असला तरी ३१ मार्च २०२० पर्यंतचा राखीव निधी ऋणात्मक आहे. ३१.०३.२०२१ चे आकडेवारी अद्याप अंतिम झालेली नाही.

३.४ असे निरिक्षण आहे की, स्थापत्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे उपदान आणि रजा रोखीकरण यांची तरतूद लेखा वहयात नोंदली आहे. ती त्यांच्या मराविम सूत्रधारी मध्ये प्रतिनियुक्तीच्या तारखेऐवजी म्हणजे वित्तीय वर्ष २०१३ - २०१४ पासून न करता रुजू होण्याच्या तारखेपासून केली आहे.

३.५ टिपा क्रमांक २७ पहावी - यात कंपनीने नमुद केले आहे की, भाडयाने घेतलेल्या मालमत्तेचा कालावधी बाबत सकारण अनिश्चितता असल्याने कंपनीच्या 'मालमत्ता वापरांचा हक्क' याला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे जेथे कंपनी भाडेकरु आहे, अशा भाडेपट्टीच्या व्यवस्थांच्या संबंधित भाडेपट्टीचे संलग्न दायित्व मान्य केलेले नाही

३.६ आम्ही भारतीय लेखा मानक वि. वि. पत्रकांच्या सोबतच्या टिपा क्रमांक ३५ कडे लक्ष वेधू इच्छितो जी अनिश्चितता आणि कोविड -१९ची साथ स्थितीमुळे लावलेल्या ताळेबंदी व इतर बंधने यामुळे आर्थिक स्थितीवर झालेला परिणामांचे व्यवस्थापनाने केलेले मूल्यांकन स्पष्ट करते. या स्थितीच्या परिणामांचे निश्चित निर्धारण व त्याचा प्रभाव हा नंतरच्या काळातील परिस्थिती कशी बदलत जाते यावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे.

वरील सर्व विषयावर आमच्या अहवालात अभ्यासावर आधारित निष्कर्ष आमच्या अहवालात नोंदवता आलेले नाहीत.

४. वित्तीय पत्रके, त्यावर लेखापरिक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त अन्य माहिती

- इतर माहिती देण्याची जबाबदारी कंपनीच्या संचालक मंडळाची असते. इतर माहितीमध्ये संचालकांचा अहवाल, आदि बाबी समाविष्ट असतात. मात्र त्यात वित्तीय विवरण - पत्रे आणि त्यावर आमचा लेखापरिक्षण अहवाल यांचा अंर्तभाव नसतो. संचालकांचा अहवाल हा लेखापरिक्षण अहवालाच्या नियत तारखेनंतर मिळेल अशी अपेक्षा आहे.

- वि.वि. पत्रकांवरील आमची मते इतर माहितीवर व्यक्त केलेली नाहीत आणि ती माहिती, त्यातील निष्कर्ष यावर आम्ही कोणत्याही स्वरुपात खात्रीलायक निष्कर्ष व्यक्त केलेले नाही.

- वि.वि. पत्रकांच्या परिक्षणाच्या संबंधात दिलेली इतर माहिती वाचणे आणि ती प्रत्यक्षपणे वि.वि. पत्रकाशी विसंगत आहे किंवा कसे, किंवा आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत आम्ही मिळविलेल्या माहितीशी योग्य आहे किंवा मोठया प्रमाणात विसंगत आहे की नाही याची आमच्यावर जबाबदारी आहे.

- संचालकांचा अहवाल वाचताना, जर त्यात काही गैर विवरण आहे असे आमचे मत झाले तर, ते व्यवस्थापनातील/ प्रशासनातील संबंधितांना कळविणे हे लेखापरीक्षण मानक - ७२० अंतर्गत ''लेखापरिक्षकांची इतर माहिती संबंधीची जबाबदारी'' यातील सूचनांनुसार आवश्यक आहे.

५. स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी

कायद्याचे कलम १३४(५) यामध्ये कंपनीच्या संचालक मंडळ वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यास जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. ही वि. वि. पत्रके भारतीय लेखा मानकानुसार कंपनीच्या वित्तीय स्थितीचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी असावे. त्यामध्ये इतर सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह आणि कंपनीच्या समभाग धारणेतील बदल या माहितीसह वित्तीय कामगिरी स्पष्ट झाली पाहिजे. भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेली इतर लेखा तत्वानुसार ही वि.वि. पत्रे असली पाहिजेत. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या मालमत्ता सुरक्षा कायद्यातील तरतूदीनुसार करणे, अन्य लबाडी किंवा अनियमितता शोधणे आणि त्यांना आळा घालणे, योग्य लेखा धोरणांची निवड करून ती अंमलात आणणे, प्रमाणशीर व सुज्ञ असे न्यायनिर्णय आणि अंदाज करणे, अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे संकल्पचित्र तयार करून ती अंमलात आणणे आणि ती जतन करणे, कोणत्याही प्रत्यक्ष गैरविवरणापासून आणि लबाडी किंवा त्रुटी यापासून मुक्त असे संपूर्ण लेखांचे दस्ताऐवज परिपूर्णतेने सादर करणे.

कंपनी चालू ठेवण्यायोग्य आहे याचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे आणि त्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती जाहीर करण्याची आणि जोवर कंपनी विकण्याचा किंवा काम बंद करण्याचा निर्णय घेतला जात नाही किंवा तसे करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी स्थिती उदभवत नाही तोपर्यंत कंपनी चालू ठेवण्यायोग्य आहे या आधारावर लेखे तयार करण्याची जबाबदारीही आपली आहे हे लक्षात घेऊन व्यवस्थापनाने वित्तीय विवरण पत्रके तयार करायला हवी.

कंपनीचे संचालक मंडळ कंपनीच्या आर्थिक अहवाल तयार करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी देखील जबाबदार आहेत.

६. लेखापरीक्षकांची जबाबदारी -

वि.वि. पत्रके कोणत्याही लबाडी किंवा त्रुटीमुळे कोणत्याही गैर विवरणापासून मुक्त असल्याबद्दल योग्य खात्री मिळविणे आणि ही खात्री मिळवून आमची मते, अभिप्राय व्यक्त करणारा अहवाल देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. वाजवी खातरजमा करणे ही अतिशय उच्चस्तरीय हमी असते. सांविधिक लेखापरिक्षण यानुसार केलेले लेखापरिक्षण अस्तित्वातील प्रत्येक मोठे गैर विवरण शोधून काढू शकेलच असे नव्हे. लबाडी किंवा चुकीमुळे गैरविवरण उदभवू शकते. लबाडी आणि त्रुटी यांच्यामुळे हे वित्तीय गैरविवरण केले जाऊ शकते आणि वित्तीय विवरण पत्रकातील माहितीच्या स्वरूपातील या गैरविवरणाला एकत्रितरीत्या किंवा व्यक्तीगतरीत्या आधार मानून आर्थिक निर्णय घेणाऱ्यांना ते प्रभावित करू शकते.

लेखापरीक्षण हे सांविधिक लेखापरिक्षणाशी सुसंगत असते, त्याचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक न्यायनिर्णय बुद्धी वापरतो तसेच लेखापरिक्षणाच्या संपूर्ण कार्यात व्यावसायिक साशंकता बाळगून काम करतो. याशिवाय आम्ही खालीलप्रमाणे कृती करतो -

- वित्तीय विवरण पत्रकात लबाडी आणि त्रुटी यामुळे मोठया प्रमाणात असू शकणारी गैरव्यवहाराची जोखीम ओळखून तिचे मूल्यांकन करणे,या जोखमीचा मुकाबला करू शकेल अशी लेखापरीक्षण प्रक्रियेची आखणी करून त्यानुसार लेखापरीक्षण करणे आणि आमच्या निष्कर्षांसाठी आवश्यक आणि योग्य असे लेखाविषयक पुरावे गोळा करणे. घोटाळ्यामुळे किंवा लबाडीमुळे होणारे वित्तीय गैरविवरण वेळीच शोधले गेले नाही तर त्यामुळे निर्माण होणारी जोखीम त्रुटींमुळे उद्‌भवणाऱ्या जोखीमेपेक्षा ही खूप मोठी असते. कारण घोटाळा किंवा लबाडीमागे काही घटकांची हातमिळवणी, बनावट कागदपत्रे तयार करणे, हेतूपुरस्सरपणे एखादी माहिती वा आकडेवारी वगळणे, चुकीच्या पद्धतीने केले जाणारे सादरीकरण किंवा अंतर्गत प्रशासनिक नियंत्रणाची पायमल्ली ही कारणे असू शकतात.

- परिस्थितीनुसार लेखा परिक्षणाशी सुसंगत प्रक्रियेचे स्वरूप ठरविण्यासाठी लेखा परिक्षणाशी सुसंगत असलेली अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे. तसेच अधिनियमाचे कलम १४३(३) (१) यानुसार, कंपनीमधे पुरेशी अंर्तगत वित्तीय नियंत्रणे कार्यरत आहेत का आणि ती प्रभावीपणे कार्य करीत आहेत का या विषयी आम्हाला आमचा अभिप्राय द्यावयाचा असतो.

- वापरलेल्या लेखा तत्वांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, लेख्यातील अंदाज रास्त असल्याबद्दल आणि व्यवस्थापनाने यासंबंधी केलेली प्रकटने योग्य असल्याबद्दल विश्लेषणात्मक मते व्यक्त करणे.

- कंपनी सतत चालू राहणारी संस्था आहे असे व्यवस्थापनाचे मत लेख्यांच्या आणि लेखापरिक्षणात मिळविलेल्या पुराव्याचा आधारे योग्य असल्याबद्दल निष्कर्ष काढणे, काही घटना वा परिस्थिती यामुळे निर्माण होणा -या अनिश्चिततेमुळे कंपनी चालू राहण्याबाबत काही शंका निर्माण तर होत नाही ना हे ठरवावे लागते. जर अशी अनिश्चितता असल्याचा निष्कर्ष आम्ही काढला तर आमच्या लेखापरिक्षण अहवालात वि.वि. पत्रकातील संबंधित प्रकटनांकडे आम्हाला लक्ष वेधावे लागते. किंवा जर अशी प्रकटने अपूर्ण असली तर आम्हाला आमच्या निष्कर्षांमध्ये तसा बदल करावा लागतो. आमचे निष्कर्ष हे लेखापरिक्षणाच्या अहवालच्या तारखे पर्यंतच्या काळात मिळविलेल्या लेखापरिक्षण पुराव्याच्या आधारे काढलेले असतात. मात्र कदाचित भविष्यातील घटना किंवा स्थितीमुळे कंपनी चालू संस्था म्हणून कार्यरत राहू शकणार नाही असे होऊ शकते.

- वि.वि. पत्रकाचे सर्वंकष सादरीकरण, रचना आणि त्यातील अंतर्भूत माहिती व प्रकटने याचे आम्ही मुल्यांकन करतो. तसेच वित्तीय विवरण पत्रकातील व्यवहार आणि घटना यांचे उचित दर्शन वित्तीय विवरण पत्रकात घडविले जाते का नाही याचे विश्लेषण करतो.

- वित्तीय विवरण पत्रातील गैरविवरणांमधील रक्कम,व्यवहार आणि त्रुटी यांचे स्वरूप हे व्यक्तीश: किंवा एकत्रित प्रमाणात वि.वि.पत्रकांच्याआधारे विचारपूर्वक आर्थिक निर्णय घेणाऱ्यावर प्रभाव पाडू शकतात. आम्ही या महत्त्वाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक मूल्य अशा दोन्ही प्रकारे पुढील बाबी करताना विचार करतो - १) आमच्या लेखापरीक्षणाच्या कामाच्या व्याप्तीचे नियोजन करताना आणि आमच्या कामाच्या फलनिष्पत्तीचे मूल्यांकन करताना आणि २) वि. वि. पत्रातील ओळख निश्चिती झालेला प्रत्येक गैरविवरणांच्या परिणामाचे मूल्य आजमावताना.

तसेच आम्ही प्रशासनाची भूमिका बजावणाऱ्यांसोबत इतर विषयांबरोबर याबद्दल चर्चा करतो. लेखापरिक्षणाच्या योजनेची व्याप्ती आणि वेळ याला महत्त्व आहे. लेखापरिक्षणात सापडलेल्या महत्त्वाच्या बाकी अंतर्गत नियंत्रणातील त्रुटी याचाही या चर्चेत समावेश असतो.

तसेच आम्ही संकलित केलेल्या माहिती आणि स्वातंत्र्याबाबतची नैतिक आवश्यकता याचीही माहिती आम्ही प्रशासकांना एका निवेदकाद्वारे देतो. आमचे स्वातंत्र्य वृत्तीसाठी लागणाऱ्या संबंधित बाबींच्या गरजा आम्ही स्पष्ट करतो व सुरक्षा बाळगतो.

७ कायदेशिर आणि नियमन विषयक आवश्यकता -

१. कंपन्याचे (लेखापरिक्षण अहवाल) आदेश २०१६ (आदेश) केंद्रीय भारत सरकारने कायद्याचे कलम १४३ चे उपकलम (११) यानुसार जारी केला आहे. त्यानुसार आम्ही जोडपत्र (अ)यामध्ये एक निवेदन दिले आहे. त्यात आदेशातील परीच्छेद ३ आणि ४ मधील विनिर्देशित विषय ज्याप्रमाणात लागू होतील त्याची माहिती आहे.

२. कायद्याचे कलम १४३ (५) यानुसार आम्ही आमचा अहवाल जोडला आहे. कंपनीच्या ज्या नोंदवह्या आणि अभिलेख आम्हाला तपासण्यास योग्य वाटले त्याच्या आधारे, तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावर आधारित तसेच भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे आदेशानुसार आम्ही तयार केलेला अहवाल जोडपत्र (ब) येथे जोडला आहे.

३. अधिनियमाचे कलम १४३(३) यातील आवश्यकतानुसार, आमच्या लेखापरिक्षण अहवालच्या आधारे आम्ही खालील प्रमाणे माहिती देतो.

(अ) आम्ही आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे शोधली आणि मिळवली आहेत.

(ब) आमच्या मते, मात्र आमच्या पात्र मतांचा आधारे या परिच्छेदात वर्णन केलेले विषय हा अपवाद वगळता, आम्ही निवेदन करतो की कंपनीने कायद्यानुसार आवश्यक अशी लेखा वह्या योग्यप्रकारे जतन केल्या आहेत; असे आम्हास आमच्या लेखापरिक्षणात दिसून आले.

(क) या अहवालाशी निगडीत असलेली वि.वि. पत्रके म्हणजे ताळेबंद, नफा -तोटा पत्रक याशिवाय इतर सर्वंकष उत्पन्न, रोकडता प्रवाह पत्रक आणि समभागातील बदलांचे पत्रक ही सर्व संबंधित लेखावह्यांशी सुसंगत आहेत.

(ड) वरील परिच्छेद -२ व ३ यातील निरिक्षणाच्या अधीन राहून, वरील वि.वि. पत्रके कायद्याचे कलम १३३ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे भारतीय लेखा मानक यांचे पालन करतात असे आमचे मत आहे.

(इ) भारत सरकारची अधिसूचना क्र. जीएसआर ४६३ (इ) दि. ०५ जून २०१५ विचारात घेता कंपनी कायदा २०१३ चे कलम १६४ (२) हे या 'कंपनी'स लागू नाही.

(फ) कंपनीच्या वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा पुरेसेपणा तसेच या नियंत्रणांचा कामातील प्रभाव या विषयी आमचा वेगळा अहवाल जोडपत्र ''क'' यात दिला आहे. वित्तीय अहवालाकरिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव आणि पुरेसेपणा यावर आमच्या अहवालात कोणतीही दुरुस्ती/सुधारणा न केलेले आमचे मत आम्ही व्यक्त केले आहे.

(ग) कायद्याचे कलम १९७ (१६) च्या तरतूदीनुसार आम्ही नमूद करतो की ही कंपनी कायद्याचे कलम २ (४५) यातील अर्थानुसार एक शासकीय कंपनी असून कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. ०५ जून २०१५ नुसार व्यवस्थापकीय पारिश्रमिक या संबंधीचे कलम १९७ या कंपनीला लागू नाही.

(ह) लेखापरिक्षकांच्या अहवालात, कंपन्याचे (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली २०१४ तील नियम ११ नुसार समाविष्ट करण्याचे इतर वि. पत्रक दुरुस्त्या केल्या प्रमाणे, आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमूद करतो की;

१) या कंपनीने भा.ले. मानकानुसार स्वायत्त वि. वि. पत्रकातील टिपा क्र. २६ या मध्ये प्रलंबित खटल्याचे संभाव्य परिणाम प्रकट केले आहेत.

२) कंपनी कोणतेही दीर्घ मुदतीचे कंत्राटे केलेली नाहीत, ज्यात डेरिव्हेटीव कॉंट्रक्टचाही समावेश होतो, तसेच मंडळाच्या अंदाजानुसार कोणतेही मोठे तोटे संभाव्य नाहीत. त्यामुळे लागू होणारे कायदे आणि लेखामानकानुसार तरतूदीची आवश्यकता नाही.

३) कंपनीकडे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी यात स्थांनातरित करण्याजोगी रक्कम नाही.

एस पी सी एम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यू

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५ एएएएकेपी ६०२९

स्थळ - मुंबई
दिनांक - २९.१२.२०२१

स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'अ'

आमच्या समान तारखेच्या अहवालातील परिच्छेद क्र. ७.१ - शीर्षक; इतर कायदेशिर आणि नियामक आवश्यकता यात संदर्भ दिल्या प्रमाणे -

१. स्थिर मत्तांसंबंधी -

अ) या कंपनीने हस्तांतरण योजनेनुसार तिच्या वाट्याच्या मत्तांच्या बाबत एक स्थिर मत्ता नोंदवही जतन केलेली आहे. वरील योजनेनुसार कंपनीचे गठन झाल्यावर मालमत्तांचे हस्तांतर व त्यात पडणारी भर, मालमत्तांचे नेमके स्थान आणि त्यांची संख्या यांचा तपशील नोंदवहीत नोंदला जातो. (संदर्भ टीपा क्र. ७.५) कंपनीने स्थिर मालमत्ता नोंदी अधिक सुरळीत करण्याची गरज आहे. जेणेकरुन योग्य आणि ओळख निश्चिती करणारा अभिलेख तयार होतील. त्यात शक्यतो पूर्ण तपशील हवे. स्थिर मत्ताची संख्यात्मक माहिती आणि सद्यस्थिती यांचा तपशील समाविष्ट करावा.

ब) आम्हास स्पष्ट केल्याप्रमाणे या वर्षी कंपनीने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. अंतिम पडताळणी वर्ष २०१० -११ मधे केली होती. नंतर जर या नोंदीत काही भौतिक वा इतर विसंगती २०१० -११ नंतर उदभवल्या असल्या तर त्यांचा अंदाज करता येत नाही (टिपा ७.५पहावी).

क) आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, काही स्थावर मालमत्तांचे मालकीचे विलेख कंपनीच्या नावे धारण केलेले नाहीत. कारण सर्व मताचे हस्तांतरण महाराष्ट्र शासनाने म.रा.वि. मंडळाच्या पूनर्रचनेच्या निर्णयानुसार केलेले आहे. विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण १३ नुसार आणि शासन निर्णय क्र रिफॉर्म २०१०/प्र.क्र. ११७ / ऊर्जा नुसार दि. ३१ मार्च २०१६ रोजी या हस्तांतरणाचे अंतिमीकरण झाले. जेथे मालकीचे विलेख कंपनीच्या नांवे नाहीत त्या प्रकरणांचा तपशील असा;

मत्तांचे वर्णन	प्रकरणांची संख्या	क्षेत्रफळ एकरात	३१/०३/२०२१ रोजीचा ठोक गट (रु.)	३१/०३/२०२१ रोजीचा ठोक गट (रु.)	शेरा निव्वळ
जमिनी भाडेपट्टी	२	७.१०	२,०४५,९३४,४६८	१,५८,०५,२९,६०६	कंपनीने स्थानंतरणासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उपाय सुरु केले आहेत.
जमिनी मालकीय	४	१.८९	७०८,८८०,०००	७०८,८८०,०००	
इमारती व रचना	१३	उपलब्ध नाही	११,८१५,२९२,६६७	७,१५५,६८०,९२२	

२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या वर्ष कंपनीने फक्त भाड्याचे कार्य चालू ठेवले, म्हणून वरील मत्तांची यादी करण्याचे कार्य हाती घेतले नाही म्हणून आदेशातील खंड ३ (२) कंपनीस लागू होत नाही.

३. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८९ यानुसार जतन केलेल्या नोंदवहीतील समाविष्ट केलेला कोणतीही व्यक्ती किवा संस्था यांना, कंपनीने कर्जदारांकडून कर्ज परत करण्याची हमी देईल अशी संपत्ती वा वस्तू गहाण ठेवून कर्जे किंवा गहाण न ठेवता कर्जे दिलेली नाहीत. त्यामुळे आदेशातील खंड ३ (३) (अ) (ब) आणि (क) हे कंपनीला लागू होत नाहीत.

४. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षी कंपनीने कोणत्याही कर्जासाठी कलम १८६ नुसार हमी दिलेली नाही, तसेच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८५ आणि १८६ यात समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कर्जाला कंपनीने मंजूरी दिलेली नाही. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८६ च्या तरतूदीनुसार कंपनीने स्वत:च्या संपूर्ण मालकीच्या उपकंपनीत गुंतवणूक केली असल्याने कंपनी अधिनियमाचे कलम १८६ लागू होत नाही.

५. आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या वरुन असे दिसते की कंपनीने जनतेकडून ठेवी जमा केलेल्या नाहीत. म्हणून रिझर्व बँक आफ इंडियाचे आदेश, तसेच कंपनी कायदा २०१३ ची कलमे ७३ ते ७६ यातील तरतूदी किंवा

अन्य संबंधित तरतूदी आणि या अंतर्गत केलेली नियमावली कंपनीला लागू होत नाही. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या संबंधी कंपनी कायदे मंडळ किंवा राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण किंवा लवाद मंडळाने कोणताही आदेश दिलेला नाही.

६. ही कंपनी कोणतेही उत्पादन, प्रक्रिया उद्योग किंवा निर्मिती आणि/ किंवा तत्सम कार्य करीत नाही, म्हणून कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८ मधील उपकलम (१) यानुसार खर्च अभिलेखासंबंधी केंद्र सरकारने विहित केलेली नियमावली कंपनीला लागू होत नाही. म्हणून आदेशातील खंड (३) (६) च्या तरतूदी लागू होत नाही.

७. अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेले लेखा वह्याचे परिक्षण या आधारे कंपनीने ज्या विषयी वाद नाहीत असे सर्व सांविधिक देणी नियमित जमा केली आहेत. यामध्ये भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, सेवा कर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क, वस्तू व सेवा कर,उपकर आणि अन्य लागू असणारी सांविधिक देणी समाविष्ट आहेत. त्यांचा भरणा योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे केला आहे.

ब) भविष्य निर्वाह निधीचे दायित्व रु. १२५,४५९/- वगळता ३१ मार्च २०२१ पासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा,आयकर, वस्तू आणि सेवा कर, सीमा शुल्क, उपकर आणि इतर भौतिक वैधानिक देय थकबाकी संदर्भात कोणतीही निर्विवाद रक्कम देय नव्हती.

क) कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ३१ मार्च २०२१ रोजी कंपनीची देय असलेली वादग्रस्त देणी खालील तक्त्यात दिली आहे. या मध्ये आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क, मूल्यवर्धित कर आणि वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे.

अनु क्र.	सांविधिकांचे नांव	देण्याचे स्वरुप	रक्कम(रु.)मध्ये	संबंधित रक्कमांचा कालावाधी	ज्या मंचाकडे दावा प्रलंबित आहे त्यांचे नाव
१	आयकर कायदा १९६१	दंड	१४१,६५,५७,००२	निर्धारण वर्ष २००६ -०७	आयकर आयुक्त (अपील्स)
२	आयकर कायदा १९६१	दंड	१,१२१,७३६,८३७	निर्धारण वर्ष २००७ -०८	आयकर आयुक्त (अपील्स)
३	आयकर कायदा १९६१	दंड	१,२७१,०७९,१५९	निर्धारण वर्ष २००८ -०९	आयकर आयुक्त (अपील्स)
४	आयकर कायदा १९६१	दंड	१,०३४,८१५,२०७	निर्धारण वर्ष २००९ -१०	आयकर आयुक्त (अपील्स)
५	आयकर कायदा १९६१	दंड	९८०,३३८,०८९	निर्धारण वर्ष २०१० -११	आयकर आयुक्त (अपील्स)
६	आयकर कायदा १९६१	आयकर व्याज	१२,२९,३९०	निर्धारण वर्ष २०१८ -१९	अधिकार क्षेत्र अधिकारी

८. कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेकडून किंवा बँकांकडून कोणतेही कर्जे घेतली नाहीत आणि ऋणपत्रे जारी केलेले नाही. मात्र ३१ मार्च २०१६ रोजीचा हंगामी हस्तांतरण योजने अंतर्गत शासन निर्णय क्रं. रिफार्म २०१०/प्र.क्र. ११७ / ऊर्जा नुसार पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने जारी केलेल्या ऋणपत्राच्या बाबत दायित्वांबाबत कंपनीच्या अभिलेख्यांमध्ये उल्लेख नाही आणि त्यामुळे याबाबत आम्ही काहीही अभिप्राय देऊ शकत नाही.

९. आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने प्रारंभिक जनता देकार किंवा अन्य प्रकारे जनतेकडून कुठलाही निधी उभारलेला नाही, मुदतीची कर्जे उभारलेली नाहीत. त्यामुळे आदेशातील खंड ३(९) लागू होत नाही व त्यामुळे अभिप्राय व्यक्त केलेला नाही.

१०. आम्ही लेखावह्यांचे परिक्षण भारतात सर्वसमान्यपणे स्वीकारलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांना अनुसरून केलेले आहे.

त्यानुसार तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या वर्षी कंपनीमध्ये कोणतीही लबाडी किंवा घोटाळा झाल्याचे आढळले नाही किंवा लबाडीबाबतचा कोणताही अहवाल जारी झालेला नाही.

११. भारत सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली अधिसूचना क्र. जी एस आर ४६३ (ई) दि. ०५ जून २०१५ या नुसार या सरकारी कंपनीला कलम १९७ लागू होत नाही. त्यानुसार आदेशातील खंड ३(११) लागू नाही म्हणून त्यावर अभिप्राय दिलेला नाही.

१२. आमच्या मते मराविमं सूत्रधारी ही काही निधि कंपनी नाही म्हणून या आदेशातील निधी कंपनीसाठीच्या खंड ३(१२) च्या तरतूदी लागू होत नाहीत. म्हणून त्यावर अभिप्राय दिलेला नाही.

१३. आम्ही पार पाडलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे आणि आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने कंपनी अधिनियम २०१३चे कलम १७७ आणि १८८ यातील लागू असणाऱ्या तरतूदींचे अनुपालन संबंधित व्यक्ति संस्थांशी केलेल्या व्यवहाराच्या वेळी केलेले आहे. या व्यवहारांचा तपशील भा. ले. मानकाच्या लागू होणाऱ्या आवश्यकतांनुसार वि. वि. पत्रकात प्रकट केलेला आहे.

१४. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आम्ही केलेले कंपनीच्या ताळेबंदाचे सर्वंकष परिक्षण यानुसार कंपनीत या वर्षात शेअर्सचे खाजगी वितरण किंवा प्राधान्य क्रमाणे वाटप केलेले आहे. या वर्षी कंपनीने पूर्ण वा अंशत - रूपांतरित करता येईल अशा ऋणपत्रांचे खाजगी वितरण किंवा प्राधान्य क्रमाणे वाटप केलेले नाही. कंपनीने कायद्याचे कलम ४२ च्या आवश्यकतांची पूर्तता केलेली नाही आणि ज्या हेतूसाठी निधी उभारणी केली; तिचा वापर त्याच कामासाठी केला आहे.

१५. आमच्या लेखापरिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने संचालक किंवा त्या संबंधीत कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ मध्ये समाविष्ट व्यक्ति यांचे सोबत कोणतेही गैर -रोखीचे व्यवहार केलेले नाही.

१६. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार भारतीय रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४ चे कलम ४५ आय ए अंतर्गत कंपनीची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे संबंधित आदेशानुसार खंड ३ (१६) यातील तरतूदी कंपनीला लागू नाहीत.

एस पी सी एम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यू

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५ एएएएकेपी ६०२९

स्थळ - मुंबई
दिनांक - २९.१२.२०२१

परिशिष्ट ब भारताचे मा. लेखा नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ यातील उपकलम (५) नुसार दिलेले निदेश / उप निदेश याबाबत अहवाल -

भारताचे मा. लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी संबंधित अधिनियमाचे कलम १४३ यातील उपकलम (५) यानुसार दिलेल्या निदेश आणि कंपनीच्या नोंदवह्या व अभिलेख यांच्या तपासणीच्या आधारे आणि अभिलेख यांच्या तपासणीच्या आधारे आणि आम्हास योग्य वाटलेल्या तसेच आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यांच्या आधारे आम्ही या निदेशात विहित केलेल्या विषयांवर खालील निवेदन देत आहोत.

सूत्रधारी कंपनी (मराविम. सूत्रधारी कं. लि.) प्रकरणी -

१. अधिनियम १४३ चे उपकलम (५) अंतर्गत दिलेले निदेश -

लेखा नियंत्रक यांचे निर्देश		
अनु. क्र.	**निर्देश**	**उत्तरे**
१.	कर्जे / ऋणे / उसनवारी / व्याज सोडून देणे/ निर्लेखित करणे इ. प्रकरणे आहेत किंवा कसे ? असल्यास त्याची कारणे आणि त्यातील रक्कम	आमच्या मते आणि आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार कर्जे / ऋणे / उसनवारी / सोडून देण्याची / निर्लेखित करण्याची कोणतीही प्रकरणे नव्हती.
२.	तिसऱ्या पक्षाकडे पडून असलेल्या वस्तूमाल साठ्यासंबंधी योग्य ते अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ? तसेच शासन किंवा अन्य प्रधिकरणाकडून देणगी स्वरुपात मिळालेल्या मत्ताबाबत नोंदणी केली आहे किवा करु	आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार, तिसऱ्या पक्षाकडे कोणतेही वस्तू माल साठा पडून राहिलेला नाही तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणांकडून कोणत्याही मत्तांची देणगी मिळाली नाही.
३.	प्रलंबित असलेले खटले / न्यायाधिकरण, लवाद यांचेकडील प्रकरणे यांचा वर्ष निहाय अहवाल द्यावा त्यात प्रलंबित असल्याची कारणे द्यावीत / तसेच सर्व कायदेविषयक प्रकरणाच्या (परदेशी अणि स्थानिक) यांच्या खर्चावर देखरेख करणारी यंत्रणा अस्तित्त्वात / प्रभावी पणे कार्यरत असल्याबद्दल माहिती द्यावी.	ही माहिती या अहवालाचे जोडपत्र - १ यानुसार आहे.
४.	या कंपनीची निर्गुतवणूकी साठी निवड झाली असल्यास, त्यातील स्थितीबाबत तपशीलवार अहवाल द्यावा त्यात मत्तांच्या मूल्यांकन (अमूर्त मत्ता व जमीनी यांचेसह) तसेच दायित्त्वे (बांधिलकीची आणि सामान्य राखीव यांचे सह) याचे मूल्यांकनाचे परिक्षण करावे त्यामधे निर्गुतवणुकीची कार्यपद्धती आणि तिचा विद्यमान टप्पा याची माहिती	आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीची निर्गुतवणूकीसाठी निवड झालेली नाही.
५.	कंपनीकडे सर्व हिशेबांवर प्रक्रिया करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान प्रणाली आहे का? जर असल्यास, खात्यांच्या अखंडतेवर आयटी प्रणालीबाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम, आर्थिक परिणामांसह नमुद केले आहे का	लागू नाही, कारण सर्व लेखा व्यवहार मॅन्युअली पार पाडले जातात आणि नंतर लेखांकन नोंदी लेखा सॉफ्टवेअरमध्ये नोंद केल्या जातात.

६.	विद्यमान कर्जाचे पुनर्गठन आहे का किंवा कंपनीच्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थतेमुळे कंपनीच्या कर्जदाराने केलेली कर्जे/उसनवारी/व्याज इत्यादी माफ/निर्लेखित करण्याचे प्रकरणे आहेत का? होय असल्यास, आर्थिक परिणाम सांगितले जाऊ शकतात. अशा प्रकरणांचा योग्य हिशोब घेतला जातो की नाही? (जर, धनको ही सरकारी कंपनी असेल, तर हे निर्देश धनको कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकासाठी देखील लागू आहे).	आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, कर्जाच्या पुनर्गठनाची किंवा कंपनीच्या धनकोकडून कर्ज/उसनवारी/व्याज माफ/निर्लेखित करण्याची प्रकरणे नाहीत.
७.	केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सींकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला/प्राप्य असलेला निधी (अनुदान/अर्थसहाय्य) त्याच्या अटी व शर्तींनुसार योग्यरित्या जमा/वापरण्यात आला आहे का? विचलन प्रकरणांची यादी करा.	आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, केंद्र/राज्य सरकारी किंवा त्यांच्या संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी कोणताही निधी (अनुदान/अर्थसहाय्य इ.) प्राप्त/प्राप्य नाही.

जोडपत्र - १

अनु. क्रं.	वर्ष	इमारतीचे नाव	कोर्ट प्रकरण क्रमांक	कोर्टाचे नाव	कारणे	प्रकरणाची स्थिती
१	२००१	हॉंगकॉंग शांघाय बँक इमारत ३ रा मजला आणि ४ था मजल्याचा काही भाग	अपील क्रं. २१३/१८/ टीइआर /३४६/३६६ /२००१	लघुवाद न्यायालय मुंबई	३ रा व ४ था मजल्याचा भाग रिकामा करणे. एचएसबीसी येथे हा भाग मराविम सूत्रधारीच्या ताब्यात आहे.	लघु न्यायालयात-०५ येथे युक्तीवाद चालू पुढील तारीख २८ -१० -२०२१
२	२००४	एस्ट्रेला बॅटरीज् विस्तार इमारत धारावी, २ रा मजला	दावा क्र.१६६३/ २००४	मुंबई उच्च न्यायालय मुंबई	एस्ट्रेला बॅटरीज् विस्तार इमारत खरेदी प्रकरणी विशिष्ट भागाचे कार्यपाल्यासाठी मे.इ.बी.एल. विरोधात दावा दाखल	उलट तपासणी कोर्ट आयुक्ताच्या साक्षीने चालू. या उलट तपासणी नंतर दि.१४ -१० -१९ पर्यंत सत्यापन सादर करावयाचे आहे. पुढची तारीख दिली नाही.
३	२००९	एस्ट्रेला बॅटरीज् विस्तार इमारत धारावी, २ रा मजला	आर ए इ ५३३/ ८०१/ ०९	लघु न्यायालय मुंबई	केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यातील दुसरा माळा रिकामा करणे धारावी येथील इ.बी. एल. कंपाउंडमधील इमारत	लघु न्यायालय १० ची उत्तर दिले. परिशिष्ट २४ व २९ विरोधात उत्तर दिले. पुढील सुनावणी २१/१०/२०१ रोजी

भाग - २ लेखापरिक्षकांचे अभिप्राय उपनिर्देश (विभागांनुसार)

अ.नु.	उपनिदेश	उत्तर
१.	करारानिविष्ट अटिंप्रमाणे महसूल वसुलीची प्रभावी प्रणाली कंपनीमधे कार्यरत आहे किंवा कसे तसेच कंपनीला लागू होणाऱ्या लेखांच्या मानकांनुसार महसूलांचे योग्य लेखे, लेखा नोंद वह्यांमधे करण्यात येतात किंवा कसे	उपकंपन्यांकडील भाडे वसुली ही प्रदीर्घ काळापासून थकबाकी आहे, जरी ती योग्यरित्या मोजली गेली आहे.
२.	नव्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी जमीनीचे संपादन केले आहे का? त्यातील सर्व प्रकरणी समझोते व थकीत रक्कम चूकते जलदगतीने व पारदर्शक पद्धतीने केला आहे किंवा कसे याची माहिती द्यावी विचलन झाल्याच्या प्रकरणांचा तपशील द्यावा	हा खंड कंपनीला लागू नाही.
३.	लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेल्या नफा/ तोटा हा कंपनीच्या नफा/तोटा पत्रकानुसार आहे किंवा कसे?	होय, लेखापरिक्षण अहवालातील नमूद केलेला तोटा / कंपनीच्या नफा / तोटा पत्रकानुसार आहे.
४.	कंपनी कायद्याच्या तरतूदीनूसार कंपनीच्या सामाजिक जबाबदारी संबंधित अहवाल व प्रकटने तपासला आहेत का?	होय, कंपनी कायदा २०१३ चे कलम १३५ च्या अंतर्गत तरतूदीनूसार कंपनीच्या सामाजिक जबाबदारी संबंधीत प्रकटने केली आहेत.

स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'क'

कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १४३ चे उपकलम ३ अंतर्गत खंड (१)नुसार अंतर्गत वित्तिय नियंत्रणे याबाबतचा अहवाल -

आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी लि. या कंपनीचे दि. ३१ मार्च २०२१ या तारखेला संपलेल्या वित्तीय वर्षाचे भारतीय लेखा मानकानुसार तयार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाचे लेखापरीक्षण करीत असताना त्या सोबत वित्तीय अहवालासंबंधी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखा परीक्षण पार पाडले.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी -

भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्थेने वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे घटक नमूद केलेले आहेत. त्याचा विचार करून कंपनीने वित्तीय अहवाल देण्याचे निकष निश्चित केले असतात. त्याच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित करून प्रभावीरित्या त्यांचे संचालन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. या जबाबदारी मध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो - अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे स्वरूप तयार करणे, त्याची अमलबजावणी करून प्रभावीरित्या त्यांचे प्रवर्तन करणे आणि त्यातून कंपनीच्या व्यावसायिक कृती शिस्तबध्द रितीने व कार्यक्षमरित्या चालविणे आणि त्याचवेळी कंपनीच्या धोरणांना धरून वर्तन करणे, तिच्या मत्तांचे रक्षण करणे, लबाडी व चुका शोधणे व त्याला प्रतिबंध करणे, दस्तऐवज अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या आवश्यकतेप्रमाणे विश्वासार्ह वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे.

लेखापरीक्षकांची जबाबदारी -

कंपनीची वित्तीय माहिती देण्याबाबत तिच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी, आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल शिक्षण संस्था यानी अंतर्गत लेखा परिक्षणाची मार्गदर्शन टिपा आणि कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विनिर्देशित केलेली लेखा मानके यांचे दोन्हीचे विवरण केले आहे. ते कंपनीस ज्या मर्यादेत लागू होते त्याप्रमाणे परिक्षण केले जाते. आम्ही नैतिक गरजेचे अनुपालन होईल अशाप्रकारे आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करून कार्य पार पाडतो, जेणे करुन वित्तीय अहवाल तयार करण्याच्या कामांवर पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे आहे की नाही याची वाजवी खात्री आम्हाला करुन घेता येते.

वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पुरेशी यंत्रणा आहे की नाही आणि ती कार्यक्षम आहे की नाही याचे खात्रीलायक लेखाविषयक पुरावे गोळा करण्यासाठी आम्ही आमच्या लेखापरीक्षणात विविध प्रक्रिया करतो. वित्तीय अहवालांवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण समजून घेणे, अहवालांमधील रक्कमा, आकडेवारी वा अन्य स्वरूपातील कमतरता समजून घेणे, जोखीम लक्षात घेऊन आखलेल्या अतंर्गत वित्तिय नियंत्रणांची चाचणी व मूल्यांकनाचे काम आम्ही आमच्या लेखापरीक्षणात करतो.

वित्तीय विवरण पत्रकात लबाडी वा त्रुटीमुळे वित्तीय पत्रकातील चुकीची माहिती रुपी जोखमीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया निवडणे हे लेखापरीक्षकाच्या निर्णय प्रक्रियेवर अवलंबून असते.

कंपनीची वित्तीय माहितीच्या नोंदी घेण्यावरील(वित्तीय अहवाल तयार करण्यावरील) अंतर्गत वित्तीय नियंत्रणांबाबत आमचे मत व्यक्त करण्यासाठी आवश्यक असे रास्त व पुरेसे लेखा पुरावे आम्ही गोळा केले आहेत.

वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा अर्थ -

कंपनीचे वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे या प्रक्रियेची रचना वित्तीय विश्वासार्हतेची रास्त हमी मिळविण्यासाठी आहे. तसेच सर्वसाधारणपणे स्विकारलेली लेखा तत्त्वे यांना सुसंगत अशी आणि बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे हे सुद्धा यात अंतर्भूत आहे. कोणत्याही कंपनीचे वित्तीय माहिती देण्यावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यामध्ये पुढील धोरणे व प्रक्रियेच्या बाबी समाविष्ट असतात -

१. अभिलेख योग्य तपशीलासह जतन करणे व त्यातून कंपनी मत्तांचे व्यवहार, विल्हेवाट इ. चे अचूक व रास्त दर्शन घडते.

२. सर्वसाधारण स्वीकारलेल्या लेखा तत्त्वानुसार वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी मान्यता देण्यासाठी आवश्यक असतील अशाप्रकारे व्यवहाराची नोंदणी करण्यात येते आणि कंपनीचे प्राप्ती व खर्च हे व्यवस्थापनाने व संचालकांनी प्राधिकृत

केल्याप्रमाणे आहेत याची हमी देणे, आणि

३. कंपनीच्या मत्तेच्या संबंधीच्या वित्तीय विवरणपत्रात प्रत्यक्ष बाधक ठरू शकतील अशी मत्तांशी संबधित अप्राधिकृत(बेका यदेशीर) कृती म्हणजे मत्तांचे संपादन वापर किंवा विल्हेवाट इत्यादींना प्रतिबंध केला जातो किंवा ते वेळीच शोधता येतात याबद्दल योग्य हमी देणे.

वित्तीय अहवाल अंतर्गत नियंत्रणाच्या स्वाभाविक मर्यादा -

वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत नियंत्रणाच्या स्वाभाविक मर्यादा आहेत. त्यामुळे संबंधितांनी हातमिळवणी करणे, व्यवस्थापनाने अयोग्यरीत्या या नियंत्रणांचे उल्लंघन करणे, चुका किंवा लबाडीने प्रत्यक्ष गैर विवरण होणे आणि ते शोधले न जाणे असे प्रकार होऊ शकतात. याशिवाय वित्तीय अहवालासाठी अंतर्गत नियंत्रणाचे मूल्यांकन करताना भविष्यातील काळासाठी केलेले प्रक्षेप, अंदाज हे जोखीमांच्या अधीन असतात. त्यामुळे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अपूरी ठरतात. तसेच परिस्थितीतील बदल, धोरणांचे व कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यातील फरकामुळे अंतर्गत नियंत्रणांचा प्रभाव बिघडू शकतो.

मत -

आमच्या मते, भारतीय सनदी लेखापाल संस्थेने अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करण्यासाठी दिलेली मार्गदर्शक टिपणी यात नमूद केलेल्या आवश्यक घटकाना विचारात घेऊन आणि सर्व घटकांचा विचार करता, मराविम सूत्रधारी कंपनीमधे 'वित्तीय अहवाल देण्यासाठीची पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणा अस्तित्त्वात आहे आणि दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत ती प्रभावीरित्या कार्यरत होती.

एस पी सी एम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यू

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५ एएएएकेपी ६०२९

स्थळ - मुंबई
दिनांक - २९.१२.२०२१

भाग १ ताळेबंद

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या दि.३१.०३.२०२१ रोजी स्वायत्त ताळेबंद

(रक्कम रु. मध्ये)

अनु. क्र.	तपशील	टिपा क्रं.	३१मार्च २०२१ रोजी	३१ मार्च २०२० रोजी (सुधारित)	०१ एप्रिल २०१९ रोजी (सुधारित)
	१		२	३	३
	मत्ता				
(१)	**चालू नसलेल्या मत्ता**				
अ	मालमत्ता, कारखाने व उपकरणे	६	२,३९२,५६४,२६६	२,३८०,८३३,११४	२,४२०,७८९,८३४
ब	प्रगतीपथावरील भांडवली कामे	६	३,७५८,३००	६,९९४,०००	-
क	गुंतवणूकीच्या मालमत्ता	७	७,१५५,६८०,९२२	७,५१०,९७९,४४६	७,९२८,७४३,८०८
ड	ख्याती मूल्य		-	-	-
इ	इतर अमूर्त मत्ता		-	-	-
फ	विकसनशील अमूर्त मत्ता		-	-	-
ग	जैविक मत्ता, यंत्रसंच वगळून		-	-	-
ह	वित्तीय मत्ता		-	-	-
	(१) गुंतवणूक	८	८२१,५९४,०५८,६३०	८२१,१६९,०५८,६३०	८१८,८३४,२०८,६३०
	(२) व्यापारी येणी		-	-	-
	(३) कर्जे		-	-	-
	(४) इतर		-	-	-
य	स्थगित कर मत्ता (निव्वळ)		-	-	-
ज	चालू नसलेल्या इतर मत्ता	९	३८,७२८,४७४,१४७	३८,६९९,३९२,३४८	३८,६८०,४८०,६७९
(२)	**चालू मत्ता**				
(अ)	वस्तू सूची		-	-	-
(ब)	वित्तीय मत्ता				
	(१) गुंतवणूकी		-	-	-
	(२) व्यापारी येणी	१०	३,९२१,२०८,०७४	३,५००,४२०,४७०	३,१२०,१५३,०३६
	(३) रोख व रोख समतूल्य	११	३०७,१८२,२३३	२९७,२०९,९२०	२८९,२५६,६३९
	(४) बँकेतील शिल्लक (वरील (३) व्यतिरिक्त)		-	-	-
	(५) कर्ज		-	-	-
	(६) इतर		-	-	-
(क)	चालू करमत्ता (निव्वळ)		-	-	-
(ड)	इतर चालू मत्ता	१२	१५,५८९,८४९	५,४२६,५६८	६,३३७,११८
	विक्रीसाठीच्या मत्ता/ विल्हेवाटीच्या गटात विक्रीसाठी समाविष्ट मत्ता		-	-	-
	एकूण मत्ता		**८७४,११८,५१६,४२१**	**८७३,५७०,३१४,४९६**	**८७१,२७९,९६९,७४४**
	समभाग आणि दायित्वे				
	समभाग				
(अ)	समभाग भांडवल	१३	८९१,७३७,११५,०२०	८९१,०९७,११५,०२०	८८९,४०२,२६५,०२०
(ब)	इतर समभाग	१४	-२०,८०४,२६८,७३६	-२०,६७८,७१३,४२४	-२१,३३४,२२५,९८२
	दायित्वे				
(१)	**चालू नसलेली दायित्वे**				

(अ)	वित्तीय दायित्वे				
	(१) कर्जे -उसनवारी		-	-	-
	(२) व्यापारी देणी		-	-	-
	(३) इतर वित्तीय दायित्वे (ब मध्ये विनिर्देशित केलेल्या व्यतिरिक्त)		-	-	-
(ब)	तरतूदी	१५	५३,९६५,२३२	५८,५८६,३०४	४८,९४७,४६६
(क)	स्थगित कर दायित्वे (निव्वळ)	१६	-	-	-
(ड)	चालू नसलेली दायित्वे			-	-
(२)	**चालू दायित्वे**				
अ	वित्तीय दायित्वे				
	(१) कर्जे -उसनवारी		-	-	-
	२) व्यापारी देणी	१७	५८,२०७,२६७	२३,७७५,४५५	२४,३२५,७७६
	३) इतर वित्तीय दायित्वे (क मध्ये विनिर्देशित केलेली वगळून)	१८	१३,४८२,१९६	११,६६२,९९९	७,४८१,६२७
ब	इतर चालू दायित्वे	१९	३,०३८,१६९,११५	३,०३६,२२१,५०७	३,०९१,८००,५२०
क	तरतूदी	२०	२१,८४६,३२७	२१,६६६,६३५	३९,३७५,३१८
ड	चालू दायित्वे				
	विक्रीसाठी वर्गीकृत करून धारण केलेली/विल्हेवाटी गटात समाविष्ट केलेली दायित्वे		-	-	-
	एकूण दायित्वे आणि समभाग		**८७४,११८,५१६,४२१**	**८७३,५७०,३१४,४९६**	**८७१,२७९,९६९,७४४**
	महत्त्वाची लेखा धोरणे	१-५			
	लेख्यांवरील टिप्पा	६-३६			

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रं.११२१६५ डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५एएएएकेपी६०२९

सुनील पिंपळखुटे
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी
(डीआयएन-०१९१५७२५)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन-०१८४३०९७)

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक(वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए २२९८०

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

भाग - २ - नफा आणि तोट्याचे विवरण पत्रक

मराविमं सूत्रधारी कंपनी लि.चे ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा -तोटा पत्रक

(रक्कम रु. मध्ये)

अनु. क्र.	२०२० -२०२१	टिपा क्र.	२०२० -२०२१ या वर्षासाठी	२०१९ -२०२० या वर्षासाठी सुधारित
(i)	**प्रवर्तनातील महसूल**	२१	**८१६,१८७,४१६**	**८१६,१८७,४१६**
(ii)	**इतर उत्पन्न**	२२	**२०,८१२,२१०**	**२५,१६२,८०३**
I	**एकूण उत्पन्न** (i+ii)		**८३६,९९९,६२६**	**८४१,३५०,२१९**
	खर्च			
(i)	वापरलेल्या साहित्याचा खर्च		-	-
(ii)	व्यापारासाठी माल खरेदी		-	-
(iii)	तयार मालाची वस्तूसूची, व्यापारातील माल आणि प्रगती पथावरील कामे यात बदल		-	-
(iv)	कर्मचारी लाभ खर्च	२३	६५,३१०,३६२	७०,२१५,९२०
(v)	वित्त खर्च		-	-
(vi)	घसारा आणि कर्जफेड तरतूद	२४	४०६,११२,९७३	४६१,१९९,३४६
(vii)	इतर खर्च	२५	२७७,२९६,१७७	२८८,४१९,३४०
II	**एकूण खर्च** (i ते vii)		**७४८,७१९,५१२**	**८१९,८३४,६०६**
III	अपवादात्मक बाबी व करपूर्व नफा/(तोटा) आणि कर (II-I)		८८,२८०,११४	२१,५१५,६१३
IV	अपवादात्मक बाबी			
V	**करपूर्व नफा/ (तोटा) (III-IV)**		**८८,२८०,११४**	**२१,५१५,६१३**
VI	कर खर्च -			
	(१) चालू कर -मॅट		-	-
	(२) मॅट क्रेडिट अनुज्ञेयता		-	-
	(३) स्थगित कर		-	-
	(४) मागील वर्षातील कर		-	-
VII	**या कालावधीत प्रवर्तन चालू ठेवल्याने झालेला नफा/ (तोटा) (V-VI)**		**८८,२८०,११४**	**२१,५१५,६१३**
VIII	**प्रवर्तन खंडित केल्याने झालेला करपूर्व नफा/तोटा**		**-**	**-**
IX	प्रवर्तन खंडित केल्याने कर खर्च		-	-
X	**खंडित प्रवर्तनामुळे(करोत्तर) नफा/ (तोटा) (VIII-IX)**		**-**	**-**
XI	या कालावधीतील नफा/(तोटा)		८८,२८०,११४	२१,५१५,६१३
XII	**इतर सर्वंकष उत्पन्न**			
(A)	१) नफा किंवा तोटा यात पुन्हा वर्गीकरण न होणाऱ्या बाबी			
	२) नफा किंवा तोटा यात पुन्हा वर्गीकरण न होणार्या बाबी संबंधीचा आयकर			
	उपबेरीज (अ)			**-**
(B)	नफा किंवा तोटा यात पुन्हा वर्गीकरण होणाऱ्या बाबी		१,१६४,५७४	-६,००३,०५५
	नफा किंवा तोटा यात पुन्हा वर्गीकरण होणार्या बाबी संबंधीत आयकर			
	उपबेरीज (ब)		१,१६४,५७४	-६,००३,०५५
XIII	एकूण इतर सर्वकष उत्पन्न(अ+ब)		१,१६४,५७४	-६,००३,०५५

XIV	कालावधीतील एकूण सर्वकष उत्पन्न (XI-XIII)		८९,४४४,६८८	१५,५१२,५५८
XVII	प्रतिभाग मिळकत(प्रवर्तन चालू आणि बंद साठी)			
	मूळ (रु.)	३१	०.००१	०.०००
	सौम्यकृत (रु.)	३१	०.००१	०.०००
	महत्त्वाचा लेखा धोरणे	१ -५		
	लेख्यांवरिल टिपा	६ -३६		

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रं.११२१६५ डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५एएएएकेपी६०२९

सुनील पिंपळखुटे
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी
(डीआयएन-०१९१५७२५)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन-०१८४३०९७)

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक(वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए २२९८०

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

मराविमं सूत्रधारी कंपनी लि.चे ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा स्वायत्त रोकडता प्रवाह

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	२०२० -२०२१ या वर्षासाठी		२०१९ -२०२० या वर्षासाठी सुधारित	
अ) प्रवर्तनापासूनचा रोकडता प्रवाह				
निव्वळ नफा - करपूर्व		८८,२८०,११४		२१,५१५,६१३
समायोजने खालीलप्रमाणे				
घसारा	४०६,११२,९७३		४६१,६६२,१८९	
व्याज उत्पन्न	(१८,९८५,६३३)		(२१,४८८,३७९)	
मागील वर्षातील कर	-			
मागील कालावधी खर्च				७,४९८,७९१
कर खर्च	-	३८७,१२७,३४०	-	४४०,१७३,८१०
खेळत्या भांडवलातील बदलापूर्वीच्या प्रवर्तनापासूनचा नफा		**४७५,४०७,४५४**		**४६९,१८८,२१४**
समायोजने खालीलप्रमाणे				
राखीव मधील (वाढ) /घट	१,१६४,५७४		१६३,७७०,०९८	
इतर दिर्घकालीन दायित्वांमधील (वाढ) /घट	३४,४३१,८१२		(४,४३८,८००)	
दीर्घकालीन तरतूदीमधील वाढ /(घट)	(४,६२१,०७२)		७,७१३,८७८	
इतर चालू मत्ता मधील दायित्वे वाढ /(घट)	१,९४७,६०८		(५५,५७९,०१३)	
इतर चालू वित्तीय दायित्वे यातील वाढ /(घट)	१,८१९,१९७		४,१८१,३७२	
अल्प मुदत तरतूदीतील वाढ /(घट)	१७९,६९२		(१९,३९४,०३३)	
स्थगित कर दायित्वे यातील (वाढ) /घट	-		(१६९,७७३,१५५)	
इतर चालू नसलेल्या मत्ता यातील (वाढ) /घट	(२९,०८१,७९९)		(१८,९११,६६७)	
अल्पमुदतीची वित्तीय कर्जे व अग्रिमे यातील(वाढ) /घट	-		-	
इतर चालू मत्ता यातील (वाढ) /घट	(१०,१६३,२७८)		९१०,५५०	
व्यापारी येणी यातील (वाढ) /घट	(४२०,७८७,६०७)	(४२५,११०,८७३)	(३८०,२६७,४३५)	(४७१,७८८,२०५)
प्रवर्तनातून निर्मित रोकड		**५०,२९६,५८१**		**(२,५९९,९९१)**
वजा – भरलेले कर (परतावे -निव्वळ)		-	-	
असाधारण बाबींपूर्वी रोकडता प्रवाह		५०,२९६,५८१		(२,५९९,९९१)
जमा/वजा - असाधारण बाबी				
प्रवर्तन कार्यातून निव्वळ रोकड(अ)		**५०,२९६,५८१**		**(२,५९९,९९१)**
ब. गुंतवणूक कार्यातून रोकड प्रवाह				
स्थिर मत्ता खरेदी आणि प्रगतीपथावरील भांडवली कामात भर	(५९,३०९,९०१)		(१०,९३५,१०७)	
मत्तेची विक्री	-		-	
चालू नसलेल्या गुंतवणूकीची खरेदी	(१,०६५,०००,०००)		(२,३३४,८५०,०००)	
मिळालेले व्याज(टीडीएसची निव्वळ)	१८,९८५,६३३		२१,४८८,३७९	
मुदत पूर्ण झालेल्या ठेवी				
गुंतवणूक कार्यासाठी वापरलेली निव्वळ रोकड (ब)		**(१,१०५,३२४,२६८)**		**(२,३२४,२९६,७२८)**
(क) वित्तीय कार्यापासूनचा रोकडता प्रवाह				

वाटप प्रलंबित असणा -या शेअर अर्ज निधीपासूनची प्राप्ती	४२५,०००,०००		६४०,०००,०००	
शेअर्स वाटपातून मिळालेली रक्कम	६४०,०००,०००		१,६९४,८५०,०००	
व्याज दिले	-			
दीर्घकालीन कर्जाच्या व्याजात वाढ			-	
नफा व तोटा पत्रकात आकारलेले व्याज	-		-	
व्याजामुळे इतर चालू दायित्वांमध्ये घट	-		-	
वित्तीय कार्यातून निव्वळ रोकड (क)		१,०६५,०००,०००		२,३३४,८५०,०००
रोख व रोख सममूल्य यातील निव्वळ वाढ (अ+ ब+ क)		**९,९७२,३१३**		**७,९५३,२८१**
मुदतीच्या आंरभीची रोकड व रोकड सममूल्य		**२९७,२०९,९२०**		**२८९,२५६,६३९**
मुदतीच्या अखेरीस रोकड व रोकड सममूल्य		**३०७,१८२,२३३**		**२९७,२०९,९२०**
तळटीप -				
१) भारतीय लेखा मानक ७ रोकडता प्रवाह पत्रक यात विहित केल्याप्रमाणे अप्रत्यक्ष पद्धतीनुसार रोकडता प्रवाह तयार केला आहे.				
२) खालील वित्तीय विवरणात रोख व रोख समतूल्य यांचा समावेश आहे.				
रोख व रोख सममूल्य		**३१.०३.२०२१ रोजी**		**३१.०३.२०२० रोजी**
चालू खात्यातील शिल्लक		(१,५७५,३००)		७५२,२१४
हातातील धनादेश				
मुदतीच्या ठेवीतील शिल्लक (मुदत ३ महिन्यांपेक्षा कमी)				
मुदतीच्या ठेवीतील शिल्लक (मुदत १२ महिन्यांपेक्षा कमी, मात्र ३ महिन्यांपेक्षा जास्त)		३०८,७५७,५३३		२९६,४५७,७०६
एकूण		**३०७,१८२,२३३**		**२९७,२०९,९२०**

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रं.११२१६५ डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५एएएएकेपी६०२९

सुनील पिंपळखुटे
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी
(डीआयएन-०१९१५७२५)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन-०१८४३०९७)

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक(वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए २२९८०

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

समभागातील बदलांचे विवरण पत्रक

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षांत समभागातील बदलाचे स्वायत्त विवरण पत्रक

अ) समभाग भांडवल

तपशील	**(रक्कम रु. मध्ये)**
१ एप्रिल २०१९ रोजी	८८९,४०२,२६५,०२०
वाटप केलेले भाग भांडवल (टिपाप्रमाणे)	१,६९४,८५०,०००
३१ मार्च २०२० रोजी	८९१,०९७,११५,०२०
वाटप केलेले भाग भांडवल (टिपाप्रमाणे)	६४०,०००,०००
३१ मार्च २०२१ रोजी	८९१,७३७,११५,०२०

ब) संपूर्णपणे समभागाच्या स्वरुपातील विलेख

१) सक्तीचे रुपांतरणीय प्राधान्य समभाग

तपशील	**(रक्कम रु. मध्ये)**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
२०१९-२०२० मध्ये वाटप केलेले	-
३१ मार्च २०२० रोजी	-
२०२०-२०२१ मध्ये वाटप केलेले	
३१ मार्च २०२१ रोजी	-

२) सक्तीने रुपांतरणीय ऋणपत्रे

तपशील	**(रक्कम रु. मध्ये)**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
२०१९-२०२० मध्ये वाटप केलेले	-
३१ मार्च २०२० रोजी	-
२०२०-२०२१ मध्ये वाटप केलेले	
३१ मार्च २०२१ रोजी	-

३) विलेख (समभाग स्वरुपातील अन्य कोणतेही विलेख)

तपशील	**(रक्कम रु. मध्ये)**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
२०१९-२०२० मध्ये वाटप केलेले	-
३१ मार्च २०२० रोजी	-
२०२० -२०२१ मध्ये वाटप केलेले	
३१ मार्च २०२१ रोजी	-

समभागातील बदलांचे विवरण

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षातील समभाग बदलाचे स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रक

अ) समभाग भाग भांडवल

तपशील	(रक्कम रु. मध्ये)
३१ मार्च २०२० रोजी	८९१,०९७,११५,०२०
दिलेले भाग भांडवल	६४०,०००,०००
३१ मार्च २०२१ रोजी	८९१,७३७,११५,०२०

ब) इतर समभाग

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	वाटप प्रलंबित असलेला समभाग अर्ज निधी	संयुक्त वित्तीय विलेखातील समभाग घटक	राखीव आणि अधिक्य			
			भांडवली राखीव	प्रतिभूती राखीव	इतर राखीव (स्वरुप निर्दिष्ट करा)	ठेवून घेतलेली मिळकत
०१-०४-२०२० रोजीची शिल्लक	६४०,०००,०००	-	-	-	-	-२१,३१८,७१३,४२४
लेखा धोरणातील बदल/पूर्वीच्या कालावधीतील त्रुटीतील बदल	-	-	-	-	-	-
अहवाल कालावधीच्या सुरुवातीस सुधारित शिल्लक	-	-	-	-	-	-२१,३१८,७१३,४२४
वर्षातील नफा	-	-	-	-	-	८८,२८०,११४
वर्षातील इतर सर्वंकष उत्पन्न	-	-	-	-	-	१,१६४,५७४
लाभांश	-	-	-	-	-	-
राखून ठेवलेल्या मिळकतीचे हस्तांतरण		-	-	-	-	-
वर्षभरात प्राप्त शेअर अर्ज निधी	४२५,०००,०००	-	-	-	-	
वर्षभरात वाटप केलेले शेअर	६४०,०००,०००	-	-	-	-	-
३१ मार्च २०२१ पर्यंतची शिल्लक	४२५,०००,०००	-	-	-	-	-२१,२२९,२६८,७३७

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रं.११२१६५ डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५एएएएकेपी६०२९

सुनील पिंपळखुटे
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी
(डीआयएन-०१९१५७२५)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन-०१८४३०९७)

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक(वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए २२९८०

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

टिपा क्र. १ - सांघिक माहिती

महाराष्ट्र शासनाने विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण १३ नुसार पूर्वीच्या मरावि मंडळ या संस्थेची पुर्नरचना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराविमं सूत्रधारी कंपनी लि. स्थापित करण्यात आली. तिच्या पुढील तीन उपकंपन्या आहेत. त्या अशा - महाराष्ट्र राज्य वीज निमिर्ती कंपनी (महानिर्मिती), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) मराविमं सूत्रधारी कंपनी लि. चे कार्य दि. ६ जून २००५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या ''हंगामी हस्तांतर योजना'' याप्रमाणे सुरु झाले. हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनी आणि तीन उपकंपन्या पूर्वीच्या मरावि मंडळातून अस्तित्वात आल्या. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.रिफार्म २०१०/प्र.क./११७ ऊर्जा -३ अधिसूचित करून दि. ३१ मार्च २०१६ पासून वरील हंगामी हस्तांतर योजना आणि वित्तीय पूनर्रचना योजना यांचे अंतिमीकरण पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच ५ जून २००५ पासून केली आहे.

टिपा क्र. २ - तयार करण्याचा आधार

भारतीय लेखा मानकानुसार (यापुढे भारतीय लेखा मानके असा उल्लेख केला आहे) कंपनी कायदा २०१३ (अधिनियम) च्या कलम १३३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व वित्तीय बाबींमध्ये कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५ आणि कायद्याचे इतर संबंधित तरतूदींची पूर्तता करण्यासाठी भौतिक पैलूचा विचार करून स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यात आली आहेत.

वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाला काही अंदाज व गृहितके करावी लागतात. या अंदाजानुसार वास्तविक परिणाम भिन्न असू शकतात. वित्तीय अंदाजाचे बदलाचे परिणाम त्या वर्षाकरिता किंवा त्याचा बदलाच्या वर्षी आणि पुढील अनेक वर्षांकरिता, जर बदलाचा परिणाम वर्तमान व भविष्यकाळासाठी असेल तर वित्तीय अंदाज हे बदल केलेल्या वर्षांतच ओळखले जातील. (टिपा क्र. ४ महत्वाचे लेखा निर्णय, अंदाज व गृहितके पहावी).

खाली दिलेल्या लेखा धोरणामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक अहवाल कालावधीच्या शेवटी विशिष्ट आर्थिक मत्ता व दायित्त्वे उचित किमतीवर मोजल्या गेल्यास (वित्तीय विवरण पत्रे संबंधित लेखा धोरणे पहावी) वित्तीय विवरण ऐतिहासिक किमतीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत.

वित्तीय विवरण भारतीय रुपये (भारतीय रुपये किंवा रु.) मध्ये सादर केले जातात जे कंपनीचे कार्यान्मिक चलन आहे.

टिपा क्र. ३ - 'चालू व चालू नसलेली' असे वर्गीकरण करणे

ही कंपनी ताळेबंदातील मत्ता व दायित्त्वे चालू आणि चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण करून त्या सादर करते.

मत्ता चालू असते जेव्हा ती;

- नेहमीच्या कार्यचक्रात ज्या मत्तांतून अपेक्षित वसूली होते किंवा त्यांना विक्री योग्यता असते किंवा त्याचा वापर करता येतो.
- त्या प्रामुख्याने व्यापारी हेतूसाठी धारण केल्या जातात.
- अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात त्याची वसूली अपेक्षित असते.
- किंवा अहवाल वर्षानंतर किमान बारा महिन्यानंतर त्यातून रोख किंवा रोख सममुल्य मिळू शकते.

  किंवा

- अहवालानंतर बारा महिन्यात रोख किंवा रोख समतूल्य यांच्यावर देवघेवीची बंदी नसल्यास किंवा एखादे दायित्त्व चुकते करण्यासाठी वापर करता येते.

या व्यतिरिक्त उर्वरित सर्व मत्तांचे वर्गीकरण 'चालू नसलेल्या मत्ता' असे करण्यात येते.

दायित्त्वाचे खालील परिस्थितीत 'चालू' यात वर्गीकरण होते.

- नेहमीच्या कार्यचक्रात ते चुकते केले जाणे अपेक्षित असल्यास.
- ते प्रामुख्याने व्यापारी हेतुसाठी धारण केले जातात.

- अहवाल वर्षानंतर बारा महिन्यानंतर दायित्त्वे चुकते होणार असल्यास

  किंवा

- अहवालानंतर बारा महिन्यात स्थगिती चुकती करणे लांबणीवर टाकण्यासाठी कोणतेही बिनशर्त अधिकार नसते.

टिपा क्र. ४ - महत्त्वाचे लेखा न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते -

कंपनीची वित्तीय विवरणपत्रे तयार करताना कंपनीच्या अहवालात द्यावयाच्या रकमा, खर्च व मत्ता दायित्त्वे यांच्यावर परिणाम करणाऱ्या बाबी त्यासोबत प्रकटने करण्यासाठी आणि आकास्मिक दायित्त्वे प्रकट करण्यासाठी व्यवस्थापनास काही न्यायनिर्णय, अंदाज व गृहीते योजावी लागतात. ही गृहीते व अंदाज याच्या अनिश्चित स्वरुपामुळे ती भविष्यातील मत्ता किंवा दायित्त्वे याना बाधक होऊ शकतात.

भविष्यातील अनिश्चित अंदाज आणि इतर गृहीते यांच्यामुळे अहवालाच्या तारखेपर्यंत मोठ्या जोखीम उदभवतात. त्यासाठी पुढील वित्तीय वर्षासाठी मत्ता व दायित्त्वे यांच्या पुढे नेलेल्या रकमांच्याबाबत मोठी समायोजने करावी लागतात. त्याची माहिती खाली दिलेली आहे. कंपनीने वित्तीय विवरण पत्रके तयार करण्याच्या वेळी जे मापदंड उपलब्ध होते त्या आधारे काही गृहिते व अंदाज करण्यात आले. विद्यमान परिस्थिती आणि भविष्यातील घडामोडी यामध्ये तसेच बाजारातील चढउतारामुळे किंवा ज्यावर कंपनीचे नियंत्रण नाही अशा परिस्थितीमुळे बदल होऊ शकतात. असे बदल गृहीत धरावे लागतात व ते दाखविले जातात.

वित्तीय विवरण पत्रातील मान्यता दिलेल्या रकमांवर ज्यांचे सर्वात मोठे लक्षवेधक परिणाम होतात त्या अंदाज व न्यायनिर्णयाची माहिती खाली दिली आहे.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुष्य व उर्वरीत मूल्य.
- वित्तीय विलेखांचे रास्त मूल्य मापन.
- वित्तीय नसलेल्या इतर मत्ता कमी करणे.
- व्याख्यांकित लाभ बंधने, महत्त्वाची विमा गणिती गृहीते यांचे मापन.
- तरतूदी आणि आकस्मिकता.
- स्थगित कर मत्ता वसुलीचे मूल्यांकन
- महसूल मान्यता.

टिपा क्र. ५ - इतर महत्त्वाची लेखा धोरणे

१. मालमत्ता, कारखाने व साधने -

मालमत्ता, कारखाने व साधने या संचित घसा -याची निव्वळ, संचित कमी करण्याचे तोटे, जर काही असले तर यानुसार नमूद केले जातात. कारखान्यात एखादा भाग व साधन बदलण्याचा खर्च आणि दीर्घ मुदतीच्या बांधकाम प्रकल्पासाठी कर्जाचे खर्च यांनी मान्यतेचे निकष पूर्ण केले तर त्यांना खर्चात समाविष्ट केले जाते. तेव्हा मालमत्ता, कारखाने व साधने या मधील महत्त्वाचे भाग ठराविक कालावधीनंतर वांरवार बदलणे आवश्यक असेल तर कंपनी मत्तांच्या अशा घटकांना त्यांचे निश्चित उपयुक्त आयुष्य अशाप्रकारे मान्यता देते. तसेच त्यांच्या उपयुक्त आयुष्यानुसार घसारा देते. नंतरचे खर्च मत्तांच्या पुढे नेलेल्या रकमांत समाविष्ट केल्या जातात किंवा अशा घटकांचे भविष्यातील आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असल्यास आणि अशा घटकांच्या खर्चाचे विश्वासाने मापन करता येत असेल तर कंपनी अशा घटकांना वेगळी मत्ता म्हणून मान्यता देते. बदललेल्या घटकांची पुढे नेलेली रक्कम अमान्य केली जाते. दुरुस्ती व देखभालीचे सर्व इतर खर्च, नफा किंवा तोट्यात मान्य केले जातात.

प्रगती पथावरील भांडवली कामे यामध्ये विकसित होणाऱ्या / स्थापनेचे काम चालू असलेल्या मालमत्ता, कारखाने व साधनांचे खर्च समाविष्ट असतात ते ताळेबंदाच्या तारखेपर्यंत धरले जातात.

संशोधन व विकासासाठी मूर्त मत्तांवर केलेल्या भांडवली खर्चाचे वर्गीकरण मालमत्ता, कारखाने व साधनांमध्ये केले जाते व मालमत्ता, कारखाने व साधनांमध्ये त्यांचा घसारा आकारला जातो.

मालमत्ता, कारखाने व साधने निवृत्त किंवा काढून टाकल्यामुळे होणारी प्राप्ती किंवा हानी यांची निश्चिती विल्हेवाटीची निव्वळ मिळकत आणि मत्तांची पुढे नेलेली रक्कम यांच्या फरकानुसार करून तिला निवृत्ती / विल्हेवाटीच्या तारखेला नफा किंवा तोट्यात मान्यता दिली जाते.

मत्तांचा घसारा त्यांच्या अंदाजे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने उर्वरित आयुष्यासाठी केला जातो. मत्तांचे मूल्य व उपयुक्त आयुष्य यांचा आढावा प्रत्येक वित्तीय वर्षा अखेरीस किंवा जेव्हा आढाव्याची चिन्हे दिसतील तेव्हा करून त्याचे प्रक्षेपाने समायोजन केले जाते.

जेव्हा मालमत्तेचा वापर मालकाच्या हेतू ऐवजी गुंतवणूक असा केला जातो तेव्हा मालाचे वर्गीकरण गुंतवणूक मालमत्ता असे वर्गीकरणाच्या तारखेपासून केले जाते.

भाडयाच्या मत्ता -

भाडयाच्या जमिनीच्या परतफेडीची तरतूद भाडेपट्टीच्या मुदतीसाठी केली जाते. भाडेपट्टीच्या जमिनीवर उभारलेल्या इमारतींचा घसारा हा कंपनी कायदा २०१३ चे अनुसूची - २ यात विनिर्देशित केलेल्या तरतुदीनुसार केला जातो. (जर जमिनीची भाडे मुदत इमारतीच्या आयुष्यापेक्षा जास्त असेल तर).

इतर प्रकरणी, भाडेपट्टीच्या जमिनीवरील इमारतींसाठी जमिनीच्या प्राथमिक भाड्यावर परतफेडीची तरतूद केली जाते. मालकीच्या जमिनीवर घसारा आकारला जात नाही. मत्तांचे उपयुक्त आयुष्य खालीलप्रमाणे मानले जाते.

मत्तांचे स्वरुप	**वर्ष**
भाडेपट्टीची जमीन	०१ ते ९०
इमारती	०१ ते ६०
कारखाने व साधने	०१ ते १५
फर्निचर व जोडण्या	०१ ते १०
वाहने	०१ ते ०८
संगणक	०१ ते ०३

ज्या मत्तांचा खर्च रु. पाच हजार किंवा त्याहून कमी आहे त्यांचा पूर्ण घसारा वापरण्यास उपलब्ध होणाऱ्या तारखेपासून बारा महिन्यांसाठी केला जातो.

२. गुंतवणूक मालमत्ता -

गुंतवणूक मालमत्तांमध्ये मालकीच्या जमिनी आणि दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीचे उत्पन्न आणि / किंवा भांडवल वाढीसाठी धारण केलेल्या कार्यालयीन इमारती यांचा समावेश होतो. गुंतवणूक मालमत्ता प्रारंभी खर्चानुसार मान्य केल्या जातात. नंतर इमारती समाविष्ट असलेल्या मालमत्ता या त्यांच्या विद्यमान खर्च वजा संचित घसारा आणि संचित कमी करण्यातील तोटे अशाप्रकारे त्यांना मान्यता दिली जाते.

खर्च यामध्ये भाग बदलण्याचे खर्च, मान्यतेचे निकष पूर्ण झाल्यास दीर्घ मुदतीचे प्रकल्पाचे कर्ज खर्च समाविष्ट असतात. जेव्हा गुंतवणूकीच्या मालमत्तेचे महत्त्वाचे भाग काही कालांतर ठेवून बदलावयाचे असतात. तेव्हा कंपनी त्यांच्या उपयुक्त आयुष्याच्या आधारे घसारा आकारते. इतर सर्व दुरूस्ती व देखभालीचे खर्च यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

इमारतींच्या घसाऱ्यासाठी कंपनी अधिनियम २०१३ चे अनुसूची - २ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे इमारतींचा घसारा अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी दिला जातो. उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य आणि घसारा यांचा आढावा घेऊन भावी काळासाठी योग्य ठरतील अशी समायोजने प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस केली जातात. या आढाव्याच्या परिणामामुळे उदभवलेले बदल नफा-तोटा पत्रकात दाखविले जातात.

कंपनी जरी गुंतवणूक मालमत्तेचे मापन, खर्च आधारित मोजपट्टी वापरून करीत असली तरी, गुंतवणूक मालमत्तेचे रास्त मूल्य टिपांमध्ये प्रकट केल्या आहेत.

जेव्हा गुंतवणूक मालमत्ता काढून टाकल्या जातात किंवा ती वापरातून कायमची काढून घेतली जाते आणि तिचे विल्हेवाटीपासून कोणतेही आर्थिक लाभ उपेक्षित नसतील तेव्हा तिची मान्यता काढून घेतली जाते.

विल्हेवाटीची निव्वळ मिळकत आणि मत्तांची विद्यमान रक्कम यातील फरकाला नफा -तोटा पत्रकात घसाऱ्याच्या मुदतीमध्ये मान्यता दिली जाते.

३. अमूर्त मत्ता -

ज्या कंपनीचे अमूर्त मत्तांवर नियंत्रण असून भविष्यात त्यांचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होणे संभवनीय आहे. तसेच त्यांची खर्चाची मोजणी विश्वासार्ह रितीने करता येते, अशा अमूर्त मत्तांना मान्यता देण्यात येते.

प्रारंभी, स्वतंत्रपणे संपादन केलेल्या मत्ता त्यांच्या खर्चानुसार मान्य केल्या जातात. अमूर्त मत्ता व्यवसायाच्या संमिश्रणात संपादित केलेल्या असतात; त्यांचे खर्च हेच संपादन तारखेचे रास्त मूल्य असते. प्रारंभीच्या मान्यतेनंतर, अमूर्त मत्तांचे खर्च वजा संचित कर्जफेडीच्या आणि मत्ता करण्याचे संचित तोटे जर असतील तर ते वजा करून येणाऱ्या रक्कमे प्रमाणे पुढे नेले जातात.

अमूर्त मत्ता वापरण्याच्या उपलब्ध होण्याच्या तारखेपासून त्यांच्या कर्जफेडीच्या तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. त्यांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्याकारिता ती सरळ रेषा पध्दतीने मान्य केली जाते. (ख्याती मूल्य व्यतिरिक्त) अन्य अमूर्त मत्ता यांच्या कर्जफेडीच्या मुदत व पध्दत याचा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस आढावा घेतला जातो.

मत्तांच्या अपेक्षित उपयुक्त आयुष्यातील बदल किंवा मत्तांमध्ये समाविष्ट केलेले भविष्यातील आर्थिक बदलामुळे लाभाच्या वापराचे बदल यांचा लेखा कर्जफेडीची मुदत किंवा पध्दत यात योग्य बदल करून केला जातो आणि त्याला 'लेखा अंदाजातील बदल' मानले जाते.

अ) ख्याती मूल्य -

ख्याती मूल्य यास प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते नंतर ते खर्च हानी किंवा अन्य संचित कमी होण्याचे तोटे याप्रमाणे मान्य केले जाते.

ब) सॉफ्टवेअर -

सॉफ्टवेअर संपादन वापराचा संबंधित परवाना या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते व परवान्याच्या कालावधीसाठी (बहुदा ३ वर्षापेक्षा जास्त नाही) कर्जफेडीची तरतूद केली जाते.

क) परवाने (अनुज्ञाप्ती) -

संपादित परवाने प्रथम खर्चानुसार मान्य केले जातात. त्यानंतर परवान्यांचे मापन खर्च वजा संचित कर्जफेडीची तरतूद आणि जर ते कमी करण्याचा खर्च असेल तर त्याप्रमाणे केले जाते. कर्जफेडीला सदर परवान्याच्या मुदत संपण्यापूर्वीच्या कालावधीसाठी नफा -तोटा पत्रकात सरळ रेषा पध्दतीने मान्यता देण्यात येते. त्यांचे प्रकटन 'घसारा व कर्जफेड' या शीर्षकात केले जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादन केलेल्या परवान्यांसंबंधीची कर्जफेड तरतूद प्रामुख्याने उर्वरित परवाना कालावधीनुसार निश्चित केली जाते.

ड) इतर संपादित अमूर्त मत्ता -

इतर अमूर्त मत्तांना प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादित अमूर्त मत्तांची कर्जफेड तरतूद त्यांच्या वापर तारखेपासून अंदाजित उर्वरित आयुष्यासाठी केली जाते.

ज्या अमूर्त मत्तांचे उपयुक्त आयुष्य अनिश्चित असते (उदा. ख्यातीमूल्य), आणि ज्या अमूर्त मत्ता वापरण्यास अद्याप प्रारंभ नसतो, त्या कर्जफेडीच्या तरतूदीशी अधीन नसतात. तसेच त्याचे दरवर्षी कमी करण्यासाठी परिक्षण होत नसते. ज्या मत्ता घसारा व कर्जफेडीच्या अधीन नसतात, त्यांचा कमी करण्यासाठी आढावा घेतला जातो. जरी परिस्थितीत बदल करणारे घटना प्रसंग घडले आणि ते महत्त्वाचे, मर्यादेमध्ये नसले किंवा महसूलात किंवा मिळकतीत सातत्याने घट झाली आणि आर्थिक पर्यावरणांत विपरीत परिणाम झाले, तर त्यासाठी आढावा घेतला जातो.

४. वित्तीय नसलेल्या मत्ता कमी करणे -

ही कंपनी प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला कोणती मत्ता कमी करण्यास योग्य आहे याचा आढावा घेते तसेच मागील काळात कमी करण्याच्या मत्तांबाबत उलट काही करण्याची चिन्हे आहेत किंवा कसे हे पाहते. तशी चिन्हे असली किंवा कमी करण्याच्या वार्षिक परिक्षणाची गरज असली तर कंपनी वसूली योग्य रक्कम निश्चित करते आणि मत्ता चालू ठेवण्याची रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त असेल तर कमी करण्याच्या तोटयाला मान्यता देते.

वसूली योग्य रक्कम ही अधिक रास्त मूल्य वजा विक्री खर्च आणि वापर मूल्य यातून नक्की केले जाते. वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्यांच्या विद्यमान मूल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी पैशाचे वेळेनुसार मूल्याप्रमाणे, बाजाराचे निर्धारण दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. तसेच मत्ता विषयीच्या जोखीमा विचारात घेतल्या जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी सध्या बाजारातील व्यवहारांचा विचार केला जातो. जर असे व्यवहार ओळखता येत नसतील तर, एखादा योग्य मूल्यांकन नमुना वापरला जातो. ही मोजणी बहुविध मुल्यांकने, जाहीर शेअर व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या उदधृत प्रक्रिया किंवा रास्त मूल्याचे उपलब्ध निदर्शक यांचा उपयोग केला जातो.

चालु प्रवर्तनातील कमी करण्याचे तोटे (यामध्ये वस्तू सूची कमी करणे, समाविष्ट असते) यांना नफा-तोटा पत्रकातील योग्य विभागात मान्यता दिली जाते. मात्र यामध्ये ज्या मालमत्तांचे इतर सर्वंकष उत्पन्न यामधील पूर्वमूल्यांकनानुसार पूर्वी मूल्यांकन केले होते त्यांना वगळले जाते. अशा मालमत्तांचे मूल्य कमी करण्यासाठी त्याचे अन्य कोणत्याही मागील पुनर्मूल्यांकनातील इतर सर्वंकष उत्पन्न यातील रकमेपर्यंत मान्यता दिली जाते.

५. रोख व रोख सममूल्य -

रोख व रोख सममूल्य यामध्ये बँकेतील शिल्लक तसेच अल्प मुदतीसाठी ठेवलेली हातातील रक्कम, ज्यांचे रोखीत लवकर परिवर्तन करता येईल आणि मूल्यातील बदलांचा ज्यांना नगण्य स्वरूपाचा धोका आहे अशा गुंतवणूक यांचा समावेश होतो. वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात चालू दायित्त्वे यामध्ये उसनवारी स्वरूपाचे थकीत स्वरूपाचे बँकांचे ओव्हरड्राफ्ट दाखविले जातात. आणि ते कंपनीच्या रोख व्यवस्थापनाचे एकात्मिक भाग मानले जातात.

६. महसूल मान्यता -

जेव्हा महसूलाचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होण्याची शक्यता असेल आणि त्याची / विश्वासार्ह मोजणी करणे शक्य असेल तरच त्या महसूलाला मान्यता दिली जाते. महसुलाची मोजणीसाठी मिळालेल्या / मिळणाऱ्या बाबींचा हिशोब, यानुसार मान्यता दिली. सवलत आणि सूट व वस्तू व सेवा कर इतर कर्ज, शुल्क वगळून विचारात घेतली जातात. कंपनी विशिष्ट निकषानुसार तिच्या महसूल व्यवस्थेचे निर्धारण करते. म्हणजेच वस्तू विक्री किंवा सेवा यातील महत्त्वाचे धोके व मोबदले लक्षात घेणे, त्याद्वारे तेथे मुख्य किंवा दलालामार्फत होत आहे किंवा कसे हे निश्चित केले जाते.

अ) व्याजाचे उत्पन्न -

ज्या वित्तीय विलेखांचे मापन कर्जफेड खर्चात होते / आणि व्याज धारणकर्त्या वित्तीय मत्ता यांचे वर्गीकरण नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्याच्या वित्तीय मत्ता असे होते, त्यांच्या व्याज उत्पन्नाला प्रभावी व्याज दर वापरून मान्यता दिली जाते. वित्तीय विलेखांचे अपेक्षित उपयुक्त आयुष्य विचारात घेऊन आणि भविष्यातील रोखे प्राप्तीचे अंदाज करून त्याच्या तंतोतंत प्रमाणात कपात करून प्रभावी व्याज दर निश्चित केला जातो. किंवा अल्प मुदतीसाठी योग्य असल्यास, वित्तीय मत्तांच्या निव्वळ चालू मूल्यांप्रमाणे दर लावला जातो. उत्पन्नाच्या विवरण पत्रकात व्याजाचे उत्पन्नास 'वित्तीय उत्पन्न' म्हणून समाविष्ट केले जाते.

ब) लाभांश उत्पन्न -

जेव्हा कंपनीला ही रक्कम घेण्याचा हक्क प्रस्थापित झाला असतो; तेव्हा लाभांशाच्या उत्पन्नाला मान्यता दिली जाते.

क) भाड्याने उत्पन्न -

जेथे मत्तांच्या मालकीच्या जोखीम व मोबदला मोठ्या प्रमाणात भाडे देणाऱ्यांकडे निहित असतात अशा मत्तांच्या भाड्याच्या करारातील भाडेपट्टीच्या रकमांना, सरळ रेषा पद्धतीने आणि करारातील अटी व शर्तीप्रमाणे, नफा-तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

७. खर्च व उत्पन्नाचे लेखांकन / वर्गीकरण

पूर्वकालीन बाबींमध्ये एक किंवा अनेक वर्षापुर्वीच्या वित्तीय विवरण तयार करताना त्रुटी किंवा वगळण्याच्या परिणामांमधून चालू काळात उत्पन्न झालेल्या उत्पन्न किंवा खर्चामध्ये बाबी समाविष्ट असतात. त्याचे लेखांकन वेगवेगळे केले जाते;

अ) पूर्वीच्या कालावधी ज्यामध्ये त्रुटी आढळल्या त्या तुलनात्मक रक्कमाचे पुन: निवेदन करणे किंवा

ब) जेव्हा पूर्वीच्या कालावधीमध्ये सादर केलेल्या चूका, त्या कालावधीच्या आरंभीच्या शिल्लक मालमत्ता, दायित्वे आणि समभागाचे आरंभीची शिल्लक यांचे पुन: निवेदन केले जाते जेणे करून वित्तीय विवरणपत्रामध्ये जणू काही त्रुटी आली नव्हती तसे सादर केली जातात.

८. कर्मचारी लाभ -

कंपनीच्या नोकरीनंतरच्या लाभामध्ये व्याख्यांकित लाभ योजना आणि व्याख्यांकित अंशदान योजना समाविष्ट असतात. याशिवाय कंपनी स्थगित भरपाई व भरपाईची गैरहजेरी या स्वरूपात इतर लाभ पुरवते.

व्याख्यांकित लाभांची निवृत्ती योजना यामध्ये कंपनी निवृत्तीच्या बंधनामध्ये उपदान समाविष्ट होते. या योजनेत कर्मचाऱ्याला निवृत्तीच्या किंवा सेवा खंडित होण्याची वेळी एक रकमी उपदान दिले जाते. ते त्याचे वेतन व कंपनीतील कामाची वर्षे यावर आधारित असते.

व्याख्यांकित लाभांच्या निवृत्ती योजनेमध्ये योजनेच्या मत्तांचे रास्त मूल्य आणि योजनेच्या दायित्त्वांचे विद्यमान मूल्य यातील फरकाला वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात मत्ता किंवा दायित्व अशाप्रकारे मान्यता दिली जाते. योजनेतील दायित्त्वांची गणना 'प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड' वापरून आणि वित्तीय स्थितीच्या विवरणपत्राच्या तारखेस असलेली प्रमुख विमागणिती गृहिते लावून केली जाते. ज्या मत्ता दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभ निधीमध्ये किंवा पात्र विमा धोरणामध्ये धारण केलेल्या असतात, त्यांना नियोजन मत्ता म्हणतात.

व्याख्यांकित लाभ योजनेसंबंधीचे सर्व खर्चांना (निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्वाचे (मत्ता) पुनर्मूल्यांकन वगळून) त्यांचा नफा किंवा तोटा याप्रमाणे मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीमध्ये विमागणीती प्राप्ती किंवा हानी आणि नियोजन मत्तांचे परतावे यांचा समावेश असतो. त्यांना वित्तीय स्थितीचे विवरणपत्रात तात्काळ मान्यता दिली जाते. (निव्वळ व्याख्यांकित दायित्व (मत्ता) यांच्या व्याजाची निव्वळ वगळून) यासोबत ज्या मुदतीत इतर सर्वंकष उत्पन्न मिळते; त्यातून काही मिळकत ठेवून घेतलेली असते. तिच्यातील खर्ची किंवा जमा यांनासुध्दा संलग्न मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीचे नंतरच्या मुदतीतील नफा किंवा तोटा यामध्ये पुन - वर्गीकरण केले जात नाही.

भरपाई असलेली गैरहजेरी

संचित भरपाई असलेली गैरहजेरीचे संभाव्य मूल्य निर्धारित करण्यासाठी प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला प्रक्षेपित एकक क्रेडीट पद्धतीचा वापर करून स्वतंत्र विमागणिती शास्त्राकडून केलेल्या विमागणिती मुल्यांकनांद्वारे निर्धारित केले जाते. निव्वळ परिभाषित योजना दायित्त्व / (मत्ता) यांच्या पुर्न:मुल्यांकनातून होणारा फायदा किंवा तोटा हा इतर व्यापक उत्पन्नामध्ये ओळखला जातो या योजनांच्या संदर्भात उत्पन्न विवरणात आकारण्यात आलेली रक्कम प्रवर्तन खर्चात समाविष्ट आहे.

या योजनांसंबंधी उत्पन्नाचे विवरणपत्रात आकारलेली रक्कम प्रवर्तनीय खर्चात समाविष्ट केली जाते.

व्याख्यांकित अंशदान योजनेतील कंपनीचे अंशदानाला नफा किंवा तोटा यात त्यांच्या नियत वेळी मान्यता दिली जाते. कंपनीवर या योजनेत तिच्या मुदतीनुसार अंशदानाव्यतिरिक्त अन्य बंधन नाही.

९. कर्ज खर्च -

कर्जफेडीच्या खर्चात कंपनीने निधी कर्जाने घेण्यासाठी व्याज व इतर खर्च यांचा समावेश असतो. कर्जाचे खर्च हे एखादी मत्ता मिळविणे, उभारणी करणे किंवा मत्तेची निर्मिती करणे यासंबंधी असतात. मत्ता तिच्या इच्छित वापर किंवा विक्री करण्यासाठी बराच वेळ लागतो. या मत्तेसाठी केलेल्या खर्चाच्या काही भागाचे भांडवलीकरण केले जाते. इतर सर्व उसनवारी खर्च त्यांच्या कालावधीनुसार खर्च केले जातात.

१०. भाडेपट्टी -

या कंपनीने दि. ०१ एप्रिल २०१९ पासून भारतीय लेखा मानक भाडेपट्टी अंगिकारले आहे. त्यासाठी सुधारित पूर्वलक्षी प्रभाव पध्दतीचा अवलंब केलेला आहे. कंपनीने तिच्या भाडेपट्टीसाठी मानक लागू केले. त्याचा संचित परिणामांना लागू करण्याच्या प्रारंभ तारखेपासून मान्यता दिली, (०१ एप्रिल २०१९). त्यानुसार पूर्वीच्या कालावधीतील माहितीचे पुन: निवेदन केले नाही. कंपनीच्या भाड्याच्या मत्तांचे प्रामुख्याने जमिनी आणि इमारती तसेच कारखाने आणि यंत्रसामग्री अशा वर्गातील आहेत. कंपनी करार करतेवेळी तो साधा करार आहे की त्यात भाडेपट्टी समाविष्ट आहे किंवा कसे याचे निर्धारण करते. जर करारामध्ये ओळख निश्चित केलेल्या एखाद्या मत्तेचा विशिष्ट मुदतीसाठी वापर करण्याच्या नियंत्रणाचा आणि त्यासाठी विनिमयाचा समावेश असला तर भाडेपट्टीचा विचार केला जातो. ओळख निश्चित केलेल्या मत्ताविषयीच्या कंत्राटावर कंपनी पुढील प्रमाणे मूल्य विचार करते. (१) ओळख दिलेल्या मत्तांच्या वापराचा करारामध्ये उल्लेख आहे किंवा नाही. (२) भाडेपट्टी मुदतीमध्ये अशा मत्तांचा वापर करून कंपनीला आर्थिक लाभ मोठया प्रमाणात होणार आहे किंवा नाही (३) कंपनीला या मत्ता वापराच्या हक्काविषयी आदेश देण्यात येईल किंवा कसे, भाडेपट्टी सुरु होण्याच्या तारखेस कंपनी मत्ता वापरण्याचा हक्क मान्यता देते आणि ज्यामध्ये ती भाडेकरू आहे, त्यासाठी संलग्न भाडेपट्टीचे दायित्व मान्य करते. फक्त ज्या भाडेपट्टीचा कालावधी बारा महिने किंवा त्याहून कमी आहे (अल्प मुदतीची भाडेपट्टी) आणि मुल्याच्या भाड्यांचा अपवाद केला जातो. अशा अल्प मुदतीच्या आणि कमी मूल्याच्या मत्तांच्या भाड्यांना त्यांच्या मुदतीसाठी सरळ रेषा तत्वानुसार प्रवर्तन खर्च अशी मान्यता देते. या मत्ता वापर हक्काला प्रारंभी खर्चानुसार मंजुरी दिली जाते. यामध्ये भाड्याच्या दायित्वाची प्रारंभीच्या रकमांचे समायोजन ही भाडेपट्टी सुरु होण्यापूर्वीच्या पैशात केले जाते. त्यात भाड्याविषयीची प्रोत्साहनपर रक्कम असल्यास वजा केली जाते. नंतर त्याची मोजणी करुन संचित घसारा आणि कमी होण्याच्या हानी वजा (जर असावयास) केला जातो. वापरण्याचा हक्क असलेल्या मत्ता या घसारा आरंभ तारखे पासून सरळ रेषा पध्दतीने केला जातो. भाडेपट्टीची अल्प मुदत तत्वानुसार घसारा मोजला जातो. तसेच या मधून आणि संबंधित मत्तांचे उपयुक्त आयुष्य विचारात घेतले जाते. भविष्यात द्यावयाच्या भाड्यासाठी विद्यमान मूल्यानुसार प्रारंभी भाडेपट्टीचे दायित्व मोजले जाते. या भाड्यात व्याज दराची सूचना असेल तर त्याप्रमाणे ती कमी केली जाते. किंवा जर तसे निश्चित नसेल तर कर्जाचा वाढीव दर वापरून केले जाते. नंतर भाडेपट्टीच्या दायित्वात व्याज दिसावे यासाठी भाडेपट्टीचे दायित्व पुन्हा मोजले जाते आणि चलीत रक्कम वाढविण्यात येते व भाड्याच्या भरलेल्या रकमेनुसार यातील रक्कम कमी केली जाते. काही घटना जसे भाड्याच्या अटी -मुदत यात बदल होणे किंवा भाड्यासाठीचा निर्देशांक किंवा दर यात बदल करणे, अशा वेळी भाडेपट्टीच्या दायित्वाची पुर्नमोजणी केली जाते व त्यानुसार भाडे भरण्यात येते. पुर्नमोजणीमध्ये सामान्यत - भाड्यांच्या मत्तांचे समायोजन केले जाते. ताळेबंद पत्रकात भाड्याचे दायित्व आणि मत्ता वापराचा हक्क वेगवेगळे दर्शविले जातात आणि भाडेपट्टीचे देणे याचे वर्गीकरण वित्तीय रोकड प्रवाहात केले जाते.

११. प्रतिभाग मिळकत -

कंपनीच्या प्रतिभाग मिळकत निश्चितीसाठी कंपनीच्या समभाग धारकांना लागू होणाऱ्या निव्वळ नफ्यावर आधारित असते. यापैकी मूळ (मूलभूत प्रतिभाग मिळकत) प्रतिभाग मिळकतीचा हिशेब करण्यासाठी वर्षभरात समभाग वाटपाला सरासरी संख्या वापरली जाते.

सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीचा हिशेब करण्यासाठी वर्षभरातील सरासरी संख्या आणि सौम्यकृत सामान्य समतुल्य समभाग यांच्या अदत्त शेअर्सचा वापर केला जातो. (यातील पर्यायांसाठी ट्रेझरी स्टॉक मेथड वापरण्यात येते) जिथे निकाल विरोधी सौम्यकृत असण्याची शक्यता असते, तेव्हा अपवाद केला जातो.

१२. करावरील उत्पन्न -

अ) चालू आयकर

चालू आणि त्याआधीच्या कालावधीतील चालू आयकर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी करुन कर प्राधिकाऱ्यांना दिलेली किंवा द्यावयाची अपेक्षित रक्कम ठरविली जाते. चालू आयकराच्या बाबी इक्विटीमध्ये थेट मान्य केल्या जातात. कंपनी ठराविक कालावधीने कर प्रपत्रासंबंधी घेतलेल्या स्थितीविषयी मूल्यमापन करते, ती त्याला लागू होणाऱ्या कर नियमांचा व ते लागू झाले तर तरतुदी केल्या जातात, अर्थ लावण्याच्या अधीन असते.

ब) स्थगित कर

अहवालाच्या तारखेला मत्ता व दायित्त्वाच्या कराचा पाया आणि वित्तीय अहवालाच्या हेतुसाठी विद्यमान रकमा यांच्यातील हंगामी फरकासाठी स्थगित कर दायित्त्वाची तरतूद केली जाते. स्थगित कर दायित्त्वांना सर्व कर योग्य हंगामी फरकांसाठी मान्यता दिली जाते. याला अपवाद खालील प्रसंगी केला जातो.

- व्यवसाय संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारात ख्यातिमूल्य किंवा मत्ता किंवा दायित्व हे प्रारंभी मान्य केल्यामुळे स्थगित कर दायित्व उद्भवते आणि या व्यवहाराच्या वेळी लेख्यातील नफा किंवा कर योग्य नफा/ (कर तोटा) याला बाधा येत नाही, तेव्हा

- उपकंपन्या व सहयोगी कंपन्या यातील गुंतवणूकी आणि संयुक्त भागीदारी कंपन्यांमधील व्याज यांच्याशी संलग्न करपात्र हंगामी फरक, हंगामी फरक उलटे होण्याच्या वेळेला जेव्हा नियंत्रित करणे शक्य असते आणि लगतच्या भविष्यात हंगामी फरक उलटण्याची शक्यता नसते तेव्हा

अंदाज केलेला नसतो तेथे सर्व कपात योग्य हंगामी फरक वापर न करता पुढे नेलेल्या कर जमा आणि कर तोटे यासाठी स्थगीत कर मत्ता मान्य केले जातात. ही मान्यता, कपात योग्य हंगामी फरकासाठी संभाव्य कर नफा उपलब्ध होणे आणि न वापरलेले कर जमा आणि कर तोटे यांचा वापर केला जाणे. यांच्या मर्यादेत असते. यामध्ये खालील प्रकरणी अपवाद केला जातो.

- जेव्हा उद्योग संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारातील मत्ता किंवा दायित्त्व यांना प्रारंभिक मान्यता दिल्यामुळे कपात योग्य हंगामी फरकासंबंधी स्थगित कर मत्ता उद्भवते, आणि अशा व्यवहाराच्या वेळी, त्यामुळे नफ्याचा लेखा किंवा कर योग्य नफा / कर तोटा यांना बाधा होत नाही, तेव्हा

- उपकंपन्या व सहयोगी कंपन्या यातील गुंतवणुकी आणि संयुक्त भागीदारी संस्थांमधील व्याज यांच्याशी संलग्न असलेले कपात योग्य हंगामी फरक यांच्याबाबत स्थगित कर मत्ता मान्य केल्या जातात. मात्र त्याची मान्यता हंगामी फरक भविष्यात उलट होण्याचा संभव असणे आणि कर योग्य नफा उपलब्ध होऊन हंगामी फरकांचा वापर होणे या मर्यादेत असते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या विद्यमान रकमेचा आढावा घेण्यात येतो आणि या स्थगित कर मत्तांचे पूर्ण किंवा अंशत - वापर करण्यासाठी परवानगी देईल इतका कर योग्य नफा उपलब्ध नसेल तर त्या मर्यादेत ती रक्कम कमी केली जाते. अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचे पुनर्निधारण प्रत्येक अहवाल तारखेला केले जाते आणि ही मान्यता, भविष्यातील कर योग्य नफा, स्थगित कर मत्तांची भरपाई करू शकत असेल तर त्या मर्यादेत ती मान्यता दिली जाते.

ज्यावर्षी मत्ता वसुली होईल किंवा दायित्त्वे चुकती केली जातील, त्यावर्षासाठी जे कर दर लागू होण्याची अपेक्षा असेल त्यानुसार स्थगित कर मत्ता व दायित्त्वे यांची मोजणी केली जाते. कर दर व केलेले कर कायदे यांच्यावर किंवा अहवाल तारखेपर्यंत कायदे केले जाणार असल्यास त्यांच्या आधारे ही मोजणी केली जाते.

नफा किंवा तोटा यांच्या बाहेरच्या बाकीसंबंधी स्थगित कर मान्य केले तर ती मान्यता नफा व तोटा यांच्या बाहेर असते. स्थगित कराच्या बाबींच्या मुळाशी असलेले इतर सर्वकष उत्पन्नांतर्गत व्यवहार किंवा थेट इक्विटीमधील व्यवहार यांना मान्यता दिली जाते.

जर स्थगित कर मत्तांचे, चालू कर दायित्त्वासोबत वजावट करण्यासंबंधी कायदेशीररित्या अंमलबजावणीचा हक्क अस्तित्वात असेल, तर स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची भरपाई करता येते. मात्र स्थगित करार संबंधित एकाच कंपनीशी आणि कर प्राधिकरण यांच्याशी निगडीत असले पाहिजेत.

१३. तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे, आकस्मिक मत्ता आणि बांधिलकी -

अ) सर्वसाधारण -

जेव्हा कंपनीवर एखादे विद्यमान बंधन (कायदेशीर किंवा रचनात्मक) मागील काही घटनेमुळे आले असते, आणि त्या बंधनाची पूर्ती करण्यासाठी आर्थिक लाभाच्या संसाधनांचे बहिर्गमन होण्याची शक्यता असते, आणि त्या बंधनाच्या रकमेचा विश्वासार्ह अंदाज करता येतो तेव्हा त्यासाठी केलेल्या तरतुदींना मान्यता दिली जाते.

जेव्हा कंपनीला एखादी तरतूद संपूर्ण किंवा काही भागात प्रतिपूर्ती मिळेल अशी अपेक्षा असते, तेव्हा त्या तरतुदीला स्वतंत्र मत्ता

अशी मान्यता दिली जाते. मात्र ती प्रतिपूर्तीच्या खात्रीची वाटली पाहिजे. कोणत्याही तरतुदीच्या संबंधी केलेले खर्च उत्पन्नाच्या विवरण पत्रकात कोणत्याही प्रतिपूर्तीची निव्वळ अशा प्रकारे सादर केली जाते.

जर पैशांच्या वेळेवरील किंमतीचा परिणाम महत्त्वाचा असेल तर चालू कर दर वापरून तरतुदीत कसर (सवलत) केली जाते. ती योग्य व दायित्वाच्या जोखमीनुसार निश्चित व योग्य असावी. जेव्हा सवलत / कसर वापरली असेल तर वेळेनुसार तरतुदीमध्ये केलेल्या वाढीला वित्त खर्च असे मान्य केले जाते.

ब) आकस्मिकता -

आकस्मिक दायित्वे जर उद्योग संयोगाचा भाग म्हणून गृहीत धरली असतील तर त्यांना फक्त त्यांच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. आकस्मिक मत्तांना दिली जात नाही. मात्र जेव्हा उत्पन्न वसूल होण्याची चांगली शक्यता असेल तर संबंधित मत्तेला आकस्मिक मानले जात नाही. तर फक्त मत्ता असेच मानले जाते. आकस्मिक दायित्त्वाची माहिती वित्तीय विवरण पत्रांच्या टिपामधे प्रकट केली आहे. मात्र त्यासाठी आर्थिक लाभ देणाऱ्या संसाधनाचे बहिर्गमन नसावे. हीच अट आर्थिक लाभांची शक्यता असलेल्या आकस्मिक मत्तांना लागू आहे.

१४. रास्त मूल्यांचे मापन

कंपनी साधीत आणि अन्य काही गुंतवणूकी या वित्तीय विलेखांचे रास्त मूल्यांकन प्रत्येक ताळेबंदच्या तारखेला करते. रास्त मूल्य म्हणजे एखादी मत्ता विकल्यानंतर मिळालेली किंमत किंवा एखादे दायित्व हस्तांतरित करण्यासाठी भरलेली किंमत मात्र हा व्यवहार सुव्यवस्थितपणे बाजारातील सहभागी घटकांमध्ये मापनाच्या तारखेला झाला पाहिजे. रास्त मूल्य मापन हे एखादी मत्तेची विक्री किंवा दायित्व हस्तांतरण व्यवहार खालील प्रकारे झाले आहे, या गृहितावर आधारित आहे.

- मत्ता किंवा दायित्त्वे यांच्या मुख्य बाजारात

किंवा

- मुख्य बाजार अस्तित्त्वात नसल्यास, मत्ता व दायित्वे यासाठीच्या सर्वांत लाभदायक बाजारात प्रमुख किंवा सर्वांत लाभदायक बाजारपेठ कंपनीला सहज फायदेशीर पाहिजे.

मत्ता आणि दायित्त्वे वापरण्यासाठी असे गृहीत धरले जाते की, बाजारात सहभागी होणारे घटक मत्ता किंवा दायित्त्वाची किंमत करताना त्याच्या सर्वोत्कृष्ट आर्थिक हितांनुसार काम करतील.

कंपनी परिस्थितीनुरुप योग्य मूल्यांकन तंत्र आणि त्यांच्यासाठी रास्त मूल्ये मोजण्यास उपलब्ध असलेली पुरेशी माहिती यांचा उपयोग करते. निरीक्षण करता येतील अशा निवेशांचा कमाल वापर करते तर जे निवेश दिसत नाहीत त्यांचा कमीत कमी वापर करते.

या सर्व मत्ता व दायित्त्वे यांची मूल्यांनी मोजणी करुन ती वित्तीय विवरण पत्रात प्रकट करावयाची आहे. त्यांची येथे खाली दिलेल्या रास्त मूल्यांच्या स्तरात क्रमवारीने वर्गवारी केली जाते. सर्वांत कमी स्तरावरील इनपूट हा रास्त मूल्यात पूर्णत: महत्त्वाचा आहे. या आधारे ती करण्यात आली आहे

स्तर १ - उद्धृत केलेल्या (समायोजन न केलेल्या) बाजार किमती चांगल्या कार्यशील बाजारपेठेत तत्सम मत्ता / दायित्त्वे यांच्या किमती.

स्तर २ - रास्त मूल्यांकनासाठी ज्याचे थेट किंवा अप्रत्यक्ष निरिक्षण करता येते - अशा सर्वांत खालच्या स्तरावरील इनपूट आणि मूल्यांकन तंत्रज्ञान.

स्तर ३ - रास्त मूल्यांकनासाठी ज्यांचे निरिक्षण करता येत नाही. अशा सर्वात कमी स्तरावरील इनपूट व त्याचे मूल्यांकन तंत्रज्ञान.

ताळेबंदात पूनरावर्ती तत्त्वावर मान्य केल्या जाणाऱ्या मत्ता व दायित्त्वे यांच्या बाबतीत क्रमवारीच्या स्तराचे स्थानांतरण झाले आहे किंवा हे कंपनी श्रेणींचे पुनर्मुल्यमापन करुन ठरविते. (पूर्णत: रास्त मूल्य मापनासाठी महत्त्वाचा असलेल्या सर्वांत कमी स्तरावरील इनपूटच्या आधारे) अहवाल कालावधीच्या अखेरीस हे मापन केले जाते.

रास्त मूल्ये प्रकट करण्याच्या हेतूसाठी, कंपनीने मत्ता व श्रेणी यांचे वर्ग निश्चित केले आहेत. ही वर्गवारी मत्ता व दायित्त्वे यांचे स्वरुप, वैशिष्ट्ये आणि जोखीम तसेच वर स्पष्ट केलेली रास्त मूल्यमापनांचे स्तर यांच्या आधारे करण्यात आली आहे.

५. वित्तीय विलेख -

१) वित्तीय मत्ता -

प्रारंभिक मान्यता व मोजणी

सर्व वित्तीय मत्तांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक वित्तीय मत्ता संपादनाचे व्यवहार खर्च यानुसार मान्यता दिली आहे. ज्या वित्तीय मत्तांचे नफा किंवा तोटे यातील रास्त मूल्यानुसार नोंदणी झालेली नाही त्यांचा व्यवहार खर्च विचारात घेतला आहे.

वित्तीय मत्ता वर्गीकरण केले आहे. प्रारंभिक मान्यतेच्यावेळी वित्तीय मत्ता रास्त मूल्याने मोजल्या आहेत किंवा वित्तीय मत्ता कर्ज फेडीच्या खर्चानुसार मोजल्या आहेत.

त्यानंतरची मोजणी -

नंतरच्या मोजणीसाठी वित्तीय मत्तांच्या मोजणीचे खालील दोन स्थूल श्रेणीत वर्गीकरण केले आहे.

- रास्त मूल्यांप्रमाणे वित्तीय मत्ता.
- कर्जफेडीच्या खर्चानुसार वित्तीय मत्ता.

जेथे मत्तांचे मापन रास्त मूल्याने केले तेथे प्राप्ती व हानी यांना नफा तोटा पत्रकात संपूर्णत: मान्यता दिली (नफा किंवा तोट्यातील रास्त मूल्य) किंवा त्यांना इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिली जाते. (इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्ये)

खालील दोन अटींचे पालन करणाऱ्या वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेड खर्चानुसार केली (कमी करण्यासाठी कमी लिहिलेल्या खर्चाची निव्वळ) जर मत्ता रास्त मूल्यांने नफा -तोटा यामध्ये नामनिर्देशित केली नसेल तर.

उद्योग नमुना चाचणी -

कंपनीच्या बिझनेस मॉडेल टेस्टचे उद्दिष्ट वित्तीय मत्ता कंत्राटातील रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी वित्तीय मत्ता धारण करणे, हे असते.

(रास्त मूल्यातील बदल वसुलीसाठी कंत्राटाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी विकण्या ऐवजी)

रोख प्रवाह वैशिष्टपूर्ण चाचणी -

वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे विनिर्देशित तारखांना रोकडता प्रवाह मिळतो. त्यात प्रामुख्याने थकीत रकमेचे मुद्दल व व्याज यांचे पैसे असतात.

जी वित्तीय मत्ता खालील दोन अटी पूर्ण करते, ती इतर सर्वंकष उत्पन्नात रास्त मूल्याने मोजली जाते. मात्र ही मत्ता रास्त मूल्याच्या पर्यायामध्ये

रास्त मूल्याने नफा किंवा तोटा यासाठी रचलेली नसावी.

उद्योग नमुना चाचणी -

एखाद्या बिझनेस मॉडेलमध्ये समाविष्ट केलेली अशी वित्तीय मत्ता जिचे उद्दिष्टे कंत्राटाचा रोकड प्रवाह जमा करणे आणि वित्तीय मत्ता विकणे या दोन्ही प्रकारे पूर्ण केले जाते.

रोख प्रवाह वैशिष्टपूर्ण चाचणी -

वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे विनिर्देशित तारखांना रोकडता प्रवाहीत होते. त्यात प्रामुख्याने थकीत रकमेचे मुद्दल व व्याज यांचे देणे असते.

जरी एखादा विलेख कर्जफेड खर्च किंवा रास्त मूल्य यांच्या मापनाच्या दोन्ही अटी पूर्ण करुन इतर सर्वकष उत्पन्नात समाविष्ट होत असला तरी वित्तीय मत्ता मात्र मूल्याने मोजून नफा किंवा तोट्यात समाविष्ट केला जातो. मात्र असे करताना तिची मापन

किंवा विसंगत मान्यता (काही वेळा विजोड लेखेकरण असे म्हटले जाते) कमी झाली असावी. वेगवेगळ्या आधाराने अशा मत्ता किंवा दायित्वे यांचे मापन केल्यास किंवा मान्यता दिल्यास असे घडू शकते.

इतर सर्व वित्तीय मत्ता नफा किंवा तोटा यामधे रास्त मूल्यांनी मोजल्या जातात. सर्व समभागाचे विलेख ताळेबंद रास्त मूल्यांनी मोजले जातात. त्यातील मूल्य बदलांना नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. याला मात्र संस्थेने ज्यांच्या विद्यमान मूल्यातील बदलाला इतर सर्वकष उत्पन्नात मान्यता दिली आहे त्यांचा अपवाद केला जातो. जे समभाग विलेख व्यापारासाठी धारण केलेले नसतात, त्यांची रास्त मूल्याने प्रारंभिक मान्यता देण्यासाठी इतर सर्वकष उत्पन्नात निवड केली जाते. फक्त लाभांशाचे उत्पन्न नफा -तोटा पत्रकात मान्य केली जाते.

मान्यता काढून घेणे -

वित्तीय मत्ता (किंवा लागू असल्यास तिचा काही भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांचा समुहातील भाग) यांना प्रारंभी मान्यता दिलेली असते. (कंपनीच्या वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रातून ती खालील कारणामुळे काढून टाकली जाते.)

- मत्तेद्वारे रोकड प्रवाह मिळण्याचा हक्क संपणे किंवा
- जेव्हा कंपनी मत्तेकडून रोकडता प्रवाह मिळविण्याच्या हक्कांचे हस्तांतरण करते किंवा रोकडता प्रवाह तिसऱ्या पक्षाला कोणताही मोठा विलंब न करता देण्याचे बंधन पास थ्रू व्यवस्थेनुसार धारण करते, किंवा खालीलपैकी एक परिस्थितीतील असू शकते.

अ) कंपनी मत्तांचे जोखीम व मोबदले मोठया प्रमाणात स्थानांतरित करते किंवा

ब) कंपनी मत्तांसंबंधीचे जोखीम व मोबदले स्थानांतरित करीत नाही पण मत्तांची नियंत्रणे स्थानांतरित करते.

जेव्हा कंपनी मत्तांचा रोकडता प्रवाह प्राप्ती हक्क स्थानांतरित करते तेव्हा किंवा पास थ्रू व्यवस्था स्वीकारते, तेव्हा ती किती प्रमाणात त्याची मालकी स्वीकारता येईल याचे मूल्यांकन करते जेव्हा मत्तांचे सर्व धोके व मोबदले हस्तांतरित करीत नाही किंवा नियंत्रणे सोडत नाही तेव्हा कंपनी त्या स्थानांतरित मत्तांमधील कंपनीच्या संबंधाच्या प्रयत्नांची मान्यता चालू ठेवते. काही प्रकरणी कंपनी संलग्न दायित्त्वेमुद्धा मान्य करते. अशी स्थानांतरित मत्ता व संलग्न दायित्त्वे यांचे मापन कंपनीने ठेवून घेतलेल्या हक्क व बंधनाच्या आधारे केले जाते.

सतत सहभागामुळे स्थानांतरित मत्तावरील हमीचे स्वरूप त्यांचे मुल्यांकन मत्ताच्या विद्यमान मुल्यांनुसार मोजले जाते आणि कंपनीला परत देणे आवश्यक असलेल्या कमाल रकमेचा हिशेब केला जातो.

उपकंपन्या सहयोगी व संयुक्त कंपन्यांतील गुंतवणुकी

कंपनीने उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त भागीदारी कंपन्यातील गुंतवणुकीचा लेखा प्रत्यक्ष खर्चानुसार वित्तीय विवरण पत्रात केला आहे.

वित्तीय मत्ता कमी करणे -

कंपनी अपेक्षित पत तोटा (इसीएल) या मॉडेलवर आधारित कमी करण्याबाबत निर्धारण करते. ते खालीलप्रमाणे

- कर्जफेडी खर्चाने मोजणी केलेल्या वित्तीय मत्ता
- इतर सर्व समावेशक उत्पन्नाद्वारे वाजवी मूल्य पद्धतीने मोजलेल्या वित्तीय मत्ता (इतर सर्वकष उत्पन्न रास्त मूल्य)
- इसीएल या तोट्याची मोजणी तोटा भरपाईमधून आणि खालीलप्रमाणे रकमेच्या सममूल्य इतकी केली जाते.
- वित्तीय विलेखाबाबत अहवालाच्या तारखेपासून १२ महिन्याच्या शक्य असणाऱ्या कसूरीच्या अपेक्षित तोट्याप्रमाणे झालेली पत १२ महिन्यांची अपेक्षित पत तोटा) किंवा
- पूर्ण आयुष्याचे अपेक्षित पत तोटा (वित्तीय विलेखांच्या संपूर्ण आयुष्यातील संभवनीय कसुरीमुळे झालेला अपेक्षित पत तोटा) कमी करण्याच्या भरपाईला मान्यता देण्यासाठी कंपनी सरलीकृत्य दृष्टीकोनाचा खालील प्रमाणे वापरते -
- व्यापारी येणी किंवा कंत्राटाचा मिळणारा महसूल आणि
- सर्व भाडेपट्टीची येणी

या सरलीकृत्य दृष्टीकोनाचा अंतर्गत, कंपनी पत जोखीमेमध्ये होणाऱ्या बदलांचा पाठपुरावा करीत नाही. बहुदा प्रारंभिक मान्यतेपासून प्रत्येक अहवाल तारखेस आयुष्यभराच्या अपेक्षित पत तोटयाच्या आधारे कमी करण्याच्या भरपाईला मान्यता दिली जाते.

व्यापारी येण्याच्या विषयात कमी करण्याच्या हानीची भरपाई निश्चित करण्यासाठी कंपनी तरतूद तक्त्याचा वापर करते. तरतूद तक्ता याची रचना व्यापारी येण्यांच्याबाबत कसूर होण्याच्या ऐतिहासिक निरिक्षणांवर आधारित असते. त्यात व्यापारी येण्यांचे अपेक्षित आयुष्य आणि भविष्यातील अंदाजाविषयीचे समायोजने यांचाही विचार केलेला असतो. प्रत्येक अहवाल तारखेस कसूर होण्याच्या ऐतिहासिक दरांचे अद्यावतीकरण केले जाते, आणि भविष्यातील अंदाजातील बदलाचे विश्लेषण केले जाते.

इतर वित्तीय मत्ता कमी करण्यातील हानी आणि धोक्याविषयी मान्यता देताना कंपनी प्रारंभीच्या मान्यतेनंतर पत जोखीमेमध्ये महत्त्वपूर्ण वाढ झाली किंवा कसे हे निश्चित करते. जर पत जोखीमेमध्ये मोठी वाढ झाली नसेल तर १२ महिन्यांच्या अपेक्षित पत तोट्याची तरतूद मत्ता कमी करण्याच्या तोट्यासाठी केली जाते. मात्र जर पत जोखीम मोठया प्रमाणात वाढत असेल तर आयुष्याच्या अपेक्षित पत तोट्याचा वापर केला जातो. जर नंतरच्या कालावधीत विलेखाची पत गुणवत्ता सुधारली आणि त्यामुळे प्रारंभीच्या मान्यतेनंतर पत जोखीमेत मोठी वाढ नसेल तर कंपनी १२ महिन्याच्या आधारे केलेल्या मत्ता कमी करण्याच्या भरपाईला मान्यता देते.

पत जोखीम व कमी करण्याची हानी यातील वाढीचे निर्धारण करण्यासाठी कंपनी वाटप केलेल्या पत जोखीमांच्या वैशिष्ट्यांच्या आधारे वित्तीय विलेखांचे मिश्रण करते. जोखीमांमधील वाढ वेळेच्यानुसार ओळखता याव्यात यासाठी विश्लेषण करण्यास सहाय्य व्हावे, या उद्दिष्टाने ही कृती केली जाते.

वेळेचे मूल्य प्राप्त करण्यासाठी खालील स्तरांच्या आधारावर मालमत्तेच्या भाड्यापोटी दीर्घ मुदतीच्या व्यापारी येण्यावर अपेक्षित पत तोटा प्रदान केला जाते.

दिवसांची संख्या	अपेक्षित पत तोटा
० -९० दिवस	१%
९० -१८० दिवस	३.२५%
१८० दिवस पेक्षा जास्त	६.५%

२) वित्तीय दायित्त्वे

वित्तिय दायित्त्वे त्यानंतर प्रभावी व्याजदर पद्धतीचा अवलंब करुन कमी करण्याची खर्चावर मान्यता दिली जाते. ताळेबंद तारखेपासून एक वर्षाच्या आत परिपक्व(मॅच्यूअर) होणारे व्यापार व इतर देणी यांचे अल्पकालीन परिपक्वतेमुळे विद्यमान मूल्य हे अंदाजे रास्त मूल्य आहे.

मान्यता काढणे -

जेव्हा दायित्त्वावरील बंधन पूर्ण केले किंवा रद्द केली किंवा मुदत संपल्यानंतर वित्तीय दायित्त्वाची मान्यता काढून घेण्यात येते. जेव्हा एखादे विद्यमान वित्तीय दायित्त्व एकाच धनकोकडून मोठ्या प्रमाणात भिन्न अटींवर बदलले जाते, किंवा विद्यमान दायित्त्वाच्या अटीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले जातात तेव्हा अशी देवाण घेवाण किंवा बदल हा मूळ दायित्वाची मान्यता रद्द केले करून नविन दायित्वाला मान्य केल्याचे मानले जाते. संबंधित विद्यमान रक्कमेतील फरक नफा तोटा पत्रकामध्ये मान्य केला जातो.

३) वित्तीय विलेखांची भरपाई -

जर मान्यता प्राप्त रकमांची भरपाई करण्याबाबत विद्यमान अंमलबजावणी योग्य कायदेशीर हक्क असला आणि जर निव्वळ तत्त्वांवर समझोता करण्याचा आणि एकाच वेळी मत्त्यांच्या वसुलीतून दायित्वे निभावण्याचा हेतू असला तर वित्तीय मत्ता व दायित्त्वे यांच्या भरपाईची रक्कम ताळेबंदात नोंदवली जाते.

१६. रोकडता प्रवाह विवरणपत्रक

भारतीय लेखा मानक ७ रोकडता प्रवाह विवरणपत्राकमध्ये नमूद केलेल्या अप्रत्यक्ष पद्धतीनुसार रोकडता प्रवाह विवरण पत्रक तयार केले आहे. त्याच्या हेतुसाठी वरील व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख सममूल्य बाबी विचारात घेण्यात येतात तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशोबात घेतली जाते कारण ती कंपनीच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा भाग असते.

टिपा क्र. ६ - मालमत्ता, कारखाने व साधने

तपशील	भाड्याची जमीन	मालकीची जमीन	कारखाने व यंत्रसामुग्री	वाहने	फर्निचर व जोडणी	संगणक	एकूण	प्रगती पथावरील भांडवली कामे
३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षासाठी								
एकूण विद्यमान रक्कम								
१ एप्रिल २०१९ रोजीचे मूल्य	२,०४५,९३४,४६८	७०८,८८०,०००	१३९,१७८,६६२	११,३१५,५६५	१२५,८१५,३७०	३,२२४,४८१	३,०३४,३४८,५४६	-
भर	-	-	२,४५८,१४२	-	५२५,५४४	४८८,३७१	३,४७२,०५७	६,९९४,०००
समायोजन	-	-	-	-	-	-	-	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-	-	-	-	-	-	-	-
अखेरची एकूण विद्यमान रक्कम	**२,०४५,९३४,४६८**	**७०८,८८०,०००**	**१४१,६३६,८०४**	**११,३१५,५६५**	**१२६,३४०,९१४**	**३,७१२,८५२**	**३,०३७,८२०,६०३**	**६,९९४,०००**
संचित घसारा आणि कमी करणे								
प्रारंभिक संचित घसारा	३९९,५३७,३५६	-	९४,७६७,०४२	७,२५५,४७४	१०९,५०६,०९१	२,४९२,७४९	६१३,५५८,७१२	-
वर्षादरम्यान संचित घसारा	३२,९३२,८३२	-	६,४७९,४९३	७१६,२४७	२,८०७,०७५	४९३,१३०	४३,४२८,७७७	-
समायोजन	-	-	-	-	-	-	-	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-	-	-	-	-	-	-	-
अखेरचा संचित घसारा आणि कमी करणे	४३२,४७०,१८८	-	१०१,२४६,५३५	७,९७१,७२१	११२,३१३,१६६	२,९८५,८७९	६५६,९८७,४८९	-
निव्वळ विद्यमान रक्कम	**१,६१३,४६४,२८०**	**७०८,८८०,०००**	**४०,३९०,२६९**	**३,३४३,८४४**	**१४,०२७,७४८**	**७२६,९७३**	**२,३८०,८३३,११४**	**६,९९४,०००**
३१ माचै २०२१ रोजी संपलेले वर्ष	-	-	-	-	-	-	-	-
ठोक विद्यमान रक्कम	-	-	-	-	-	-	-	-

प्रारंभिक एकूण विद्यमान रक्कम (पुढे नेण्यासाठी)	२,०४५,९३४,४६८	७०८,८८०,०००	१४१,६३६,८०४	११,३१५,५६५	१२६,३४०,९१४	३,७१२,८५२	३,०३७,८२०,६०३	६,९९४,०००
भर	-	-	४८,८६७,७८२	-	२,४७४,७९०	१,६७९,३१६	५३,०२१,८८८	३,७५८,३००
समायोजन	-	-	-	-	-	-	-	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-	-	-	-	-	-	-	६,९९४,०००
अखेरची एकूण विद्यमान रक्कम	**२,०४५,९३४,४६८**	**७०८,८८०,०००**	**१९०,५०४,५८६**	**११,३१५,५६५**	**१२८,८१५,७०४**	**५,३९२,१६८**	**३,०९०,८४२,४९१**	**३,७५८,३००**
संचित घसारा आणि कमी करणे	-	-	-	-	-	-	-	-
प्रारंभिक संचित घसारा	४३२,४७०,१८८	-	१०१,२४६,५३५	७,९७१,७२१	११२,३१३,१६६	२,९८५,८७९	६५६,९८७,४८९	-
वर्षादरम्यान घसारा आकार	३२,९३४,६७४	-	४,६०७,९१५	६०२,०७५	२,६७१,८३५	४७४,२३७	४१,२९०,७३६	-
समायोजन	-	-	-	-	-	-	-	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-	-	-	-	-	-	-	-
अखेरचा संचित घसारा व कमी करणे	**४६५,४०४,८६२**	**-**	**१०५,८५४,४५०**	**८,५७३,७९६**	**११४,९८५,००१**	**३,४६०,११६**	**६९८,२७८,२२५**	**-**
निव्वळ विद्यमान रक्कम	**१,५८०,५२९,६०६**	**७०८,८८०,०००**	**८४,६५०,१३६**	**२,७४१,७६९**	**१३,८३०,७०३**	**१,९३२,०५२**	**२,३९२,५६४,२६६**	**३,७५८,३००**

टिपा क्रं.७
मालमत्तेमधील गुंतवणूक

(रक्कम रु. मध्ये)

तपाशील	**मालकीच्या इमारती**
मुल्य	
१.०४.२०१९ ची किंमत	११,८०५,२९९,९०४
भर	४६९,०५०
समायोजन	-
विल्हेवाट/ हस्तांतरण	
३१ मार्च २०२० रोजी	**११,८०५,७६८,९५४**
भर	९,५२३,७१३
समायोजन	-
विल्हेवाट/हस्तांतरण	
३१ मार्च २०२१ रोजी	**११,८१५,२९२,६६७**
संचित घसारा	
०१.०४.२०१९ रोजी	३,८७६,५५६,०९६
वर्षभरात घसारा शुल्क	४१८,२३३,४१२
समायोजन	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-
३१ मार्च २०२० रोजी	**४,२९४,७८९,५०८**
वर्षभरात घसारा शुल्क	३६४,८२२,२३७
समायोजन	-
विल्हेवाट/हस्तांतरण	-
३१ मार्च २०२१ रोजी	**४६५९६११७४५**
निव्वळ पुस्तकी मूल्य	
३१ मार्च २०२० रोजी	७,५१०,९७९,४४६
३१ मार्च २०२१ रोजी	७,१५५,६८०,९२२
रास्त मुल्य	
३१ मार्च २०२० रोजी	७,५१०,९७९,४४६
३१ मार्च २०२१ रोजी	७,१५५,६८०,९२२
	२०२० -२१
गुंतवणूकीच्या मालमत्तेमधून मिळणारे भाडे उत्पन्न	८१६,१८७,४१६
भाड्याचे उत्पन्न निर्माण करणारा थेट परिचालन खर्च(दुरुस्ती आणि देखरेखीसह)	१५०,४८०,७९८
गुंतवणूकीच्या मालमत्तातून होणारा नफा	**६६५,७०६,६१८**

७.१ भारतीय लेखा मानकांमध्ये संक्रमण झाल्यानंतर, मालमत्ता, कारखाने आणि साधने यांची १ एप्रिल २०१५ रोजीची सामान्यत - स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार मोजणी मान्यताप्राप्त करून निरंतर चालू ठेवण्याचा पर्याय म.रा. वि.मं. सूत्रधारी कंपनीने निवडला आहे. केंद्र सरकारद्वारा अधिसूचित केलेले आणि कंपनी अधिनियम १९५६ च्या इतर तरतुदींद्वारे कंपन्या (लेखा मानके) नियम २००६ मध्ये अधिसूचित केलेल्या पूर्वीच्या सर्वसाधारपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार ती मोजावी आणि ती मूळ किंमत मालमत्ता, कारखाने आणि साधन यांची मान्यताप्राप्त किंमत म्हणून वापरावी.

७.२ कंपनीच्या लेखा पुस्तकात दिसणाऱ्या स्थिर मत्ता यापूर्वीच्या म.रा. वि. मंडळाकडून वित्तीय पुनर्रचना योजनेप्रमाणे हस्तांतरीत झालेल्या आहेत. मात्र त्या अद्याप मराविम सूत्रधारी कं. लि. च्या नावे झालेल्या नाहीत. कंपनीकडे उपलब्ध असलेल्या प्रत्येक प्रकारच्या मत्तांच्या सर्वकष ठोक गटात त्याच्या नावाप्रमाणे चालू वर्षाचा घसारा हिशोब करून आकारला आहे.

७.३ मत्तांच्या उपयोग सुरु झाल्याची नेमकी तारीख पूर्वीच्या मरावि मंडळ/महाराष्ट्र शासन यांच्याकडे उपलब्ध नाही. त्या ऐवजी फक्त उपयोग सुरू झाल्याचे वर्ष उपलब्ध झाले. त्यामुळे मत्ताचा उपयोग संबंधित वर्ष दि. ०१ एप्रिल रोजी सुरु झाल्याचे मानण्यात आले व त्याचप्रमाणे त्या प्रथम वित्तीय वर्षाच्या घसाऱ्याचा हिशोब करण्यात आला.

७.४ वित्तीय पुनर्रचना योजनेच्या अंतिमीकरणानंतर मत्तांचे मूल्य रु. १३,९६७,५१२,०३०/- असे वाढले आणि त्याबदल्यात महाराष्ट्र शासनास समभाग दिले. महाराष्ट्र शासनाकडून मिळालेल्या मूल्यांप्रमाणे संबंधित मत्तांचे मूल्यांकन केले आणि त्यापुढे घसाऱ्याचा हिशेब उर्वरित आयुष्यासाठी करण्यात आला.

७.५ मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने २०१०-११ मध्ये केली. कंपनीने पुनर्रचनेच्या तारखेपासून म्हणजे ०६/०६/२००५ पासून चालू वित्तीय वर्षापर्यंत स्थिर मत्ता नोंदवही संकलित केली. पूर्वीच्या मराविमं कडून मिळालेल्या आरंभीच्या शिलकीचे अभिलेख प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळेला त्याचा मेळ करण्यात आला. मत्तांची किमत ०५/०६/२००५ चे मूल्यांकन व मत्ता नोंदवहीप्रमाणे कमी लिहिलेली किंमत यांचा मेळ आरंभीच्या लेख्या नोंदीसोबत केला.

७.६ पूर्वीच्या मरावि मंडळाने धारावीच्या इमारत व जमिनीच्या खरेदीच्या विलेखाचे १९८१ चे व्यवहार अद्याप नोंदणीकृत करावयाचे बाकी आहे. मात्र जमीन व इमारत मराविमं सूत्रधारी कंपनीच्या ताब्यात आहे आणि मुंबई महापालिकेच्या आदेशानुसार धारावी इमारतीच्या विक्रीच्या रु. ९,०४१,४२७/- उर्वरित रकमेवर १४ टक्के दराने व्याज दरमहा भरावयाचे असते. प्रकरण उच्च न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ आहे.

टिपा क्र. ८

चालू नसलेली गुंतवणूक (नॉन करंट इन्व्हेस्टमेंट)

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१ रोजी**	**३१ मार्च २०२० रोजी**	**०१ एप्रिल २०१९ रोजी**
व्यापारी गुंतवणूक			
समभागाच्या प्रकारातील गुंतवणूक			
- उद्घृत न केलेल्या			
- उपकंपन्या			
१. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. ५०,००० शेअर्स प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे (मागील वर्षी प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ५०,००० शेअर्स)	५००,०००	५००,०००	५००,०००

२. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. २५४०७,८९६,२२६ शेअर्स प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे (मागील वर्षी २५,३४३,८९६,२२६ शेअर्स प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे)	२५४,०७८,९६२,२६०	२५३,४३८,९६२,२६०	२५२,८४०,७६२,२६०
३. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. चे ५०,००० शेअर्स प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे (मागील वर्षी प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ५०,००० शेअर्स,)	५००,०००	५००,०००	५००,०००
४. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. चे ८,९८४,९२४,७३३ शेअर्स प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे (मागील वर्षी प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ८,९८४,९२४,७३३ शेअर्स)	८९,८४९,२४७,३३०	८९,८४९,२४७,३३०	८९,८४९,२४७,३३०
५. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. चे प्रत्येकी. रु. १०/- प्रमाणे ५०,००० शेअर्स (मागील वर्षी प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ५०,००० शेअर्स)	५००,०००	५००,०००	५००,०००
६. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. चे प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ४७,७२३,९३४,९०४ शेअर्स (मागील वर्षी प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ४७,७२३,९३४,९०४ शेअर्स)	४७७,२३९,३४९,०४०	४७७,२३९,३४९,०४०	४७६,१४२,६९९,०४०
- इतर कंपन्या			-
रत्नागिरी गॅस आणि पॉवर खासगी लि. ४४२,२२६,१३१ (मागील वर्षी ४४२,२२६,१३१ शेअर्स प्रत्येकी १०/- प्रमाणे)	-	-	-
संदर्भ टिपा क्र. ८.५			
कोकण एलएनजी लि. प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे ७४,०५३,८६९ शेअर्स संदर्भ टिपा क्र. ८.६			
उपबेरीज (अ)	८२१,१६९,०५८,६३०	८२०,५२९,०५८,६३०	८१८,८३४,२०८,६३०
वाटप प्रलंबित असलेला समभाग अर्ज निधी			
१. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.	**४२५,०००,०००**	**६४०,०००,०००**	**-**

२. महाराष्ट्र राज्य पारेषण विद्युत कंपनी मर्या.	-	-	
३. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.	-	-	
उपबेरीज (ब)	**४२५,०००,०००**	**६४०,०००,०००**	
बेरीज (अ+ब)	**८२१,५९४,०५८,६३०**	**८२१,१६९,०५८,६३०**	**८१८,८३४,२०८,६३०**

तपशील	**३१ मार्च २०२१ रोजी**	**३१ मार्च २०२० रोजी**	**०१ एप्रिल २०१९ रोजी**
उद्घृत गुंतवणुकीची एकत्रित रक्कम	-	-	-
उद्घृत न केलेल्या गुंतवणुकीची एकत्रित रक्कम	८२१,१६९,०५८,६३०	८२०,५२९,०५८,६३०	८१८,८३४,२०८,६३०

८.१) गुंतवणूकीत १,५००,००० रुपये उपकंपन्या असलेल्या महानिर्मिती, महापारेषण, महावितरण (म्हणजेच प्रत्येकी रु. ५००,०००) मुद्दा क्र.१, ३ आणि ५ मध्ये नमूद केल्यानुसार प्रारंभिक भाग भांडवलासाठी अंशदान असून त्याचे समभाग प्रमाणपत्र महाराष्ट्र शासनाच्या नामनिर्देशित व्यक्तींचे नावे जारी केले जातात आणि अद्याप कंपनीच्या नावावर हस्तांतरित केलेली नाहीत.

८.२) महावितरणच्या सततच्या तोटयामुळे शेअर प्रमाणपत्र ४७७,२३९,८४९,०४० रुपये ची महावितरणमधील गुंतवणूक मूल्यांकन कमी होत आहे. शेअर्सच्या मुल्यातील घटीची माहिती नोंदवहीत देण्यात आलेली नाही. २०१९-२० च्या अंतिम वर्षात महावितरणला नफा झाला असला तरी, ३१ मार्च २०२० पर्यंत राखीव रक्कम ऋणात्मक आहे. ३१.०३.२०२१ ची आकडेवारी अदयाप निश्चित झालेली नाही.

८.३) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मध्ये २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सरकारने शेअर्स अर्जाचे पैसे म्हणून रु. ४२५,०००,००० (मागील वर्षी ६४०,०००,०००) थेट भरले. ही रक्कम म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लि च्या वीज निर्मिती कंपनीमधील गुंतवणूकीचे प्रतिनिधित्व करते.

८.४) २०२०-२१ या आर्थिक वर्षात म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लि.ने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. च्या शेअर्समध्ये केलेली गुंतवणूक रु. ६४,००,००,००० (शेअर्सची संख्या ६४,०००,०००) आहे, ज्याची रक्कम महाराष्ट्र सरकारने थेट महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. दिली आहे, तसा शासन निर्णय महाराष्ट्र सरकारने जारी केला आहे.

८.५) रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा.लि. मध्ये गुंतवणूक रु. ५,१६२,८००,००० कोटी (मागील वर्षी रु. ५,१६२,८००,००० कोटी) आहे. रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा. लि. (आरजीपीपीएल) ने केपीएमजी द्वारे स्थिर मत्तांमधीसल घटीचा केपीएमजी या संस्थेद्वारा अभ्यास केला. त्यांनी त्यांचा अंतिम अहवाल १३.०५.२०१७ रोजी खालीलप्रमाणे सादर केला.

वस्तुस्थिती १

(रक्कम रु. मध्ये)

समभाग मूल्य	(३३,५५०,०००,०००)
स्थिर मत्ता कमी करणे	(२२,४१३,०००,०००)

वस्तुस्थिती २

(रक्कम रु. मध्ये)

कर्जाची संभाव्य पुर्नरचना लक्षात घेऊन

समभाग मूल्य	(७,५०१,०००,०००)
स्थिर मत्ता कमी करणे	(२२,४१३,०००,०००)

३१.०३.२०१७ पर्यंत समभाग धारणेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत.

समभाग धारकाचे नाव	**रक्कम रूपयांत**
एन.टी.पी.सी.लि.	९,७४३,०८३,०००
गेल(इंडिया लि.)	९,७४३,०८३,०००
म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी	५,१६२,८००,०००
आय. डी. बी.आय बँक लि.	४,८१६,८४०,७२०
स्टेट बँक ऑफ इंडिया लि.	३,८३३,६००,०००
आय.सी.आय.सी.आय.बँक लि.	३,४०५,१००,०००
कॅनरा बँक	८२२,१००,०००
आय.एफ.सी.आय.लि	६७६,११७,४३०
एकूण	३८,२०२,७२४,१५०

कमी केलेल्या मूल्यांकनासाठी आरजीपीपीएल वर परिणाम करणारे निर्देशांक -

बाह्य निर्देशक - कालबाह्य किंवा सामान्य वापर याच्या परिणामामुळे कालावधीत मालमत्तेचे मूल्य अपेक्षेपेक्षा जास्त लक्षणीयरित्या कमी झाले आहे. मालमत्तेच्या मुल्यात घट होण्याचे संकेत आहेत. कारण वीज प्रकल्प आणि एल. एन. जी. टर्मिनल गेल्या १० वर्षांपासून त्यांच्या स्थापित क्षमतेनुसार काम करीत नाहीत.

कंपनीच्या निव्वळ मोलामधे लक्षणीय घट -

आरजीपीपीएल ला गेल्या काही वर्षात नुकसान झाले आहे. ज्यामुळे कंपनीच्या निव्वळ मोलामध्ये घट झाली आहे. कंपनीचे निव्वळ मोल अनुक्रमे ६२२ कोटी आणि ९१३ कोटी असे मार्च १५ ते मार्च १६ आणि मार्च १६ ते मार्च १७ या कालावधीत कमी झाले आहे.

तपशील	**३१ मार्च २०१७**	**३१ मार्च २०१६**
भाग भांडवल	३८,२०३	३८,२०३
राखीव आणि आधिक्य	-४४,८१६	-३५,६८०
एकूण	**-६,६१३**	**२,५२३**

त्यांच्या अहवालानुसार समभागाचे रास्त मूल्य रु. ३,३५५ कोटी ऋणात्मक (निगेटीव्ह) आहे. त्याच्या आधारे त्यांच्या गुंतवणूकीचे दि. १ एप्रिल २०१५ रोजीचे रास्त मूल्य निरंक मानले गेले आहे.

८.६) रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा. लि. कंपनीच्या विभाजन योजनेस एनसीएलएटी यांनी त्यांचा आदेश दि. २८.०२.२०१८ नुसार मंजुरी दिली. आणि ०१.०१.२०१६ या तारखेपासून एलएनजी उपक्रम आरजीपीपीएल मधून काढून कोकण एलएनजी प्रा. लि. (केएलपीएल) कडे हस्तांतरित करण्यात आला.

एनसीएलएटी यांनी दिलेल्या विभाजनाच्या मंजुरीनंतर आणि सदर योजना अंमलात आल्यानंतर मराविमं सूत्रधारी कंपनीचे दिलेले / पूर्ण भरलेले समभाग भांडवल रु. ४,४२२,२६१,३१०/- रूपयाने कमी झाले. (प्रत्येकी रु. १०/- चे ४४२,२२६,१३१ शेअर्स)

त्याप्रमाणे, रु. ७४०,५३८,६९०/- (प्रत्येकी रु. १०/- चे ७४,०५३,८६९ इक्विटी शेअर्स) एवढी गुंतवणूक केएलपीएल कडे स्थानांतरित केली.

भारतीय लेखा मानक १०९ च्या तरतुदीची पूर्तता करण्यासाठी, आरजीपीपीएल मधील गुंतवणूकीचे दि. ०१ एप्रिल २०१५

रोजीचे रास्त मूल्य निरंक मानण्यात आले. तसेच याच आधारावर कोकण एलएनजी प्रा. लि. मधील गुंतवणूकीचे दि. ३१ मार्च २०१९ रोजीचे रास्त मूल्य ''निरंक'' असे धरण्यात आले आहे.

टिपा क्रं. - ९ इतर चालू नसलेली मत्ता

(रक्कम रु.मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
प्रतिभूती अनामती/ठेवी			
अप्रतिभूत –चांगली मानलेली			
संबंधितांना कर्जे आणि अग्रीमे	-	-	-
अप्रतिभूत –चांगल्या मानलेल्या			
महावितरण	३६,८६६,३५३,२७०	३६,९०४,७१३,९५०	३६,९६७,७७८,९२२
इतर कर्जे आणि अग्रीम			
अप्रतिभूत –चांगली मानलेली			
रोखीने किंवा अन्य स्वरूपात किंवा मूल्यस्वरूपात मिळू शकणारी अग्रीमे	३,७८९,६२९	२,३३९,९३३	३२२,८०१
वजा - संशयास्पद अग्रीमासाठी तरतूद	(३,५००,०००)	(२,०००,०००)	-
मिळू शकणारी निव्वळ अग्रीमे	**२८९,६२९**	**३३९,९३३**	**३२२,८०१**
इतर जमा	२,४२०,२७९	२४४,७७९	२४४,७७९
संकिर्ण कर्जे आणि अग्रीमे			
स्त्रोतापाशी कपात केलेले कर आणि अग्रीम कर (करासाठी केलेली निव्वळ तरतूद)	१,५६७,७१०,८८८	१,५०२,३९३,६०५	१,४२०,४३४,०९६
विरोध नोंदवून भरलेला आयकर	२९१,७००,०८१	२९१,७००,०८१	२९१,७००,०८१
इतर चालू मत्ता			
मुदतीच्या ठेवी	-	-	-
एकूण	**३८,७२८,४७४,१४७**	**३८,६९९,३९२,३४८**	**३८,६८०,४८०,६७९**

९.१) संबंधितांना कर्जे व अग्रिमे -

महावितरणकडे हस्तांतरित केलेले रू ३६,८६६,३५३,२६९ /-(मागील वर्षी ३६,९०४,७१३,९५०) यामध्ये सामान्य व विशेष दायित्त्वे, ठराविक मत्ता व आणि राखीव यांचा समावेश असून त्याची निव्वळ शिल्लक रक्कम रु. २,०७०,५५३,१३०/- आहे. याविषयी मेळ, चर्चा व विमर्श चालू आहे.

९.२) कंपनीने लेखा वहयात अग्रिम कर रु. १,६६७,७१०,८८८/-(मागील वर्षी १,६०२,३९३,६०५/-) लेखा वहयातील नोंदीमध्ये रक्कम रु. ४००,७२७,७२९ /- कर तरतूदीची निव्वळ आहे आणि हरकत/ विरोध नोंदवून दिलेल्या आयकर रु.२९१,७००,०८१/- आयकर दस्ताऐवजाप्रमाणे तसे दायित्वे नाही कारण काही प्रकरणी अपिल केलेली आहेत. लेखा वहयातील तरतूदी व्यवस्थापनाने आपल्या न्याय निर्णय बुध्दीने केले आहेत.

टिपा क्रं. १० व्यापारी येणी

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
दीर्घकालीन व्यापारी येणी			
- मालमत्तेच्या भाड्याच्या बदल्यात			
संबंधितांना कर्जे आणि अग्रीमे	-	-	-
चांगली मानलेली (सहा महिन्यांपेक्षा कमी काळ)	३,७२८,९२७,६४७	३,२८९,६४६,९१५	२,६५४,०६१,५४८
चांगली मानलेली (सहा महिन्यांपेक्षा कमी काळ)	४३८,९६३,५६०	४२८,८०५,०४६	६४४,९८५,५७२
वजा/जमा - अपेक्षित पत तोट्यासाठी भत्ता	(२४६,६८३,१३३)	(२१८,०३१,४९१)	(१७८,८९४,०८४)
एकूण	**३,९२१,२०८,०७४**	**३,५००,४२०,४७०**	**३,१२०,१५३,०३६**

१०.१) वरीलप्रमाणे मालमत्तेच्या भाड्यापोटी उपकंपन्यांकडील थकबाकीची रक्कम ही रु. ४,१६६,२८६,२६६/- (मागील वर्षी रु. ३,७१६,८६५,५६७/-) आणि ही थकबाकी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. यासाठी ३१.०३.२०२१ पर्यंत अपेक्षित पत हानीची तरतूद म्हणून रु. २४६,६८३,१३३/- इतक्या रकमेची (मागील वर्षी २१८,०३१,४९१/-) करण्यात आली आहे.

टिपा क्र. ११ - रोख आणि बँकेतील शिल्लक

(रक्कम रु.मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
रोख आणि रोख समतूल्य			
अ. बँकांतील शिल्लक			
चालू खात्यात	(१,५७६,९२३)	७४६,९७९	७०५,४८२
३ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवी	-	-	
ब. हातातील रोख	१,६२३	५,२३५	३२,१४३
क.हातातील धनादेश	-	-	-
इतर बँकातील शिल्लक			
३ महिन्यांपेक्षा जास्त व १२ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवी	३०८,७५७,५३३	२९६,४५७,७०६	२८८,५१९,०१४
एकूण	**३०७,१८२,२३३**	**२९७,२०९,९२०**	**२८९,२५६,६३९**

टिपा क्र. १२ - इतर चालू मत्ता

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०	१ एप्रिल २०१९
आगाऊ भरणा केलेले खर्च	१,१०७,४७९	१६१,८६०	२२७,३२२
मुदत ठेवींवर उपार्जित आणि देय व्याज	१४,४८२,३७०	५,२६४,७०८	६,१०९,७९६
एकूण	**१५,५८९,८४९**	**५,४२६,५६८**	**६,३३७,११८**

टिपा क्र. १३ स्वायत्त भाग भांडवल

तपशील	३१ मार्च २०२१		३१ मार्च २०२०	
	शेअर्सची संख्या	रक्कम	शेअर्सची संख्या	रक्कम
अ) प्राधिकृत भाग भांडवल	९९,०००,०००,०००	९९०,०००,०००,०००	९९,०००,०००,०००	९९०,०००,०००,०००
९९,०००,०००,००० (मागील वर्षी ९९,०००,०००,०००) समभाग (यापुढे समभाग असे संबोधिले आहे.) प्रत्येकी रु. १०/-				
ब) वितरण,अंशदान व भरणा केलेले भाग भांडवल				
८९,१७,३७,११,५०२ (मागील वर्षी ८९,१०९,७११,५०२) समभाग (यापुढे समभाग असे संबोधिले आहे.) पूर्ण भरलेले प्रत्येकी रु. १०/-	८९,१७३,७११,५०२	८९१,७३७,११५,०२०	८९,१०९,७११,५०२	८९१,०९७,११५,०२०
एकूण	**८९,१७३,७११,५०२**	**८९१,७३७,११५,०२०**	**८९,१०९,७११,५०२**	**८९१,०९७,११५,०२०**

अ) भांडवलाच्या ५% पेक्षा जास्त भागधारणा करणाऱ्या धारकांचा तपशील

तपशील	३१ मार्च २०२१		३१ मार्च २०२०	
भागधारकाचे नाव	धारण केलेले समभाग	पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाशी टक्केवारी	धारण केलेले समभाग	पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाशी टक्केवारी
महाराष्ट्र शासन आणि त्यांचे नामनिर्देशित	८९,१७३,७११,५०२	१००%	८९,१०९,७११,५०२	१००%
एकूण	८९,१७३,७११,५०२	१००%	८९,१०९,७११,५०२	१००%

ब) अहवाल वर्षाच्या आरंभी आणि शेवटी थकबाकी असलेल्या शेअर्सचा मेळ

समभागधारकाचे नाव	३१ मार्च, २०२१ रोजी	३१ मार्च, २०२० रोजी
	समभागांची संख्या	समभागांची संख्या
वर्षारंभीचे शिल्लक समभाग	८९,१०९,७११,५०२	८८,९४०,२२६,५०२
वर्षभरात वितरित समभाग	६४,०००,०००	१६९,४८५,०००
वर्षभरात पूर्नखरेदी केलेले समभाग	०	०
वर्षाच्या अखेरीस शिल्लक समभाग	८९,१७३,७११,५०२	८९,१०९,७११,५०२

क) वर्षभरात अभिदत्त, अंशदान आणि पूर्ण भरणा केलेल्या समभागांचा तपशील

१४ -१० -२०२० रोजी प्रत्येकी १० रु. च्या ६४,०००,००० समभागांचे वाटप करण्यात आले.

६४,०००,००० समभागांसाठी महाराष्ट्र शासनाने रु.६४०,०००,०००/- चा थेट भरणा/समायोजन महानिर्मिती कपनीत एका शासन निर्णयाद्वारे केला.

ड) प्रत्येक श्रेणीतील शेअर्ससाठी लागू असलेले हक्क, प्राधान्ये व बंधने–

कंपनीचे फक्त एकच श्रेणीचे समभाग असून त्यांचे दर्शनीमूल्य रु. १०/- आहे.

ई) सूत्रधारी कंपनीने किंवा शिखर सूत्रधारी कंपनीने धारण केलेले प्रत्येक श्रेणीतील शेअर्स

लागू नाही.

फ) पर्याय आणि कंत्राट किंवा बांधिलकी यानुसार विक्री किंवा निर्गुंतवणूकीसाठी राखून ठेवलेले शेअर्स

- लागू नाही.

ग) दिलेले बोनस शेअर्स, रोखीच्या विचारार्थ दिलेले शेअर्स, आणि अहवाल वर्षाच्या मागील पाच वर्षाच्या काळात पूर्नखरेदी केलेले शेअर्स -

तपशील	२०२० -२१	२०१९ -२०
अ) पूर्ण भरणा केलेले बोनस शेअर्स म्हणून दिलेले समभाग	निरंक	निरंक
ब) रोखी व्यतिरिक्त विचारार्थ दिलेले समभाग	निरंक	निरंक

ह) परिवर्तनाच्या सर्वात आधीच्या तारखेपासून उतरत्या क्रमाने सुरूवात करून अशा तारखेपासून जारी केलेल्या समभागामध्ये परिवर्तनीय असलेल्या कोणत्याही रोख्याच्या अटी/मुदत -

लागू नाही.

य) अदत्त मागणी (संचालक व अधिकारी यांच्या मागणीच्या अदत्त मागणीच्या एकत्रित मूल्य दर्शविणे)

लागू नाही.

ज) जप्त झालेले समभाग (मूळ भरलेली रक्कम) -

लागू नाही.

टिपा क्र. १४ - इतर मत्ता

(रक्कम रु.मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
नफा -तोटा पत्रकातील आधिक्य/(घट)			
प्रारंभिक शिल्लक	(२१,३१८,७१३,४२४)	(२१,३३४,२२५,९८२)	(२१,४१९,२९०,११३)
वजा - मागील काळातील समायोजन	-	-	४०५,१६०,६७६
पुर्नसंचयित शिल्लक	(२१,३१८,७१३,४२४)	(२१,३३४,२२५,९८२)	(२१,०१४,१२९,४३७)
अधिक -नफा/(तोटा) वर्षाचा	८९,४४४,६८८	१५,५१२,५५८	(३२०,०९६,५४५)
अखेरची शिल्लक	(२१,२२९,२६८,७३६)	(२१,३१८,७१३,४२४)	(२१,३३४,२२५,९८२)
एकूण(अ)	(२१,२२९,२६८,७३६)	(२१,३१८,७१३,४२४)	(२१,३३४,२२५,९८२)

वाटप प्रलंबित शेअर्स अर्जाचे निधी

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
१००% महाराष्ट्र शासनाशी संबंधित	४२५,०००,०००	६४०,०००,०००	-
एकूण(ब)	४२५,०००,०००	६४०,०००,०००	-
एकूण(अ +ब)	(२०,८०४,२६८,७३६)	(२०,६७८,७१३,४२४)	(२१,३३४,२२५,९८२)

१४.१) २०२०-२१ या आर्थिक वर्षात ४२.५० कोटी रुपयांचे शेअर अर्ज प्राप्त झाले आणि ०२-०९-२०२१ रोजी शेअर्सचे वाटप करण्यात आले. शेअर्स अर्जाचे पैसे थेट आमची उपकंपनी महानिर्मिती कंपनीचे शेअर्स संपादन करण्याकरीता आमची गुंतवणूक म्हणून देण्यात आले.

टिपा क्रं. १५ - दीर्घ मुदतीची तरतूद

(रक्कम रु.मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
कर्मचारी लाभासाठी तरतूदी			
गैरहजेरीच्या भरपाईची तरतूद	१९,२४४,००८	२२,२०८,१६९	१८,०५०,५३१
उपदानासाठी तरतूद	१९,४७१,७८८	२३,२२८,६२८	१९,६७२,३८८
इतर तरतूद	१५,२४९,४३६	१३,१४९,५०७	११,२२४,५४७
एकूण	**५३,९६५,२३२**	**५८,५८६,३०४**	**४८,९४७,४६६**

१५.१) उपदान आणि रजा रोखीकरण यांचे लेखे विमा गणिती शास्त्र मूल्यांकनांच्या आधारे केले आहे.

टिपा क्र. १६ - स्थगित कर दायित्व/मत्ता (निव्वळ)

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
स्थगित कर दायित्वे (अ)			
स्थिर मत्तांची किंमत कमी झालेल्या मूल्यामुळे काळातील फरक	२,१८३,७८२,५६३	२,२७६,९७६,१८०	२,४१५,२३९,२१०
एकूण (अ)	**२,१८३,७८२,५६३**	**२,२७६,९७६,१८०**	**२,४१५,२३९,२१०**
स्थगित कर मत्ता(ब)			
कर्मचारी लाभ	५२,७४४,९१९	५६,१००,६०५	५४,२२०,३४८
अशोषित घसारा	४,८१६,९०४,७६१	५,०१३,३२३,८५५	५,२६८,४७७,३३९
इतर	२४६,६८३,१३३	२१८,०३१,४९१	१७८,८९४,०८४
एकूण (ब)	**५,११६,३३२,८१३**	**५,२८७,४५५,९५१**	**५,५०१,५९४,७७१**
काळातील फरक (ब–अ)	**२,९३२,५५०,२५०**	**३,०१०,४७९,७७१**	**३,४१०,२०५,७०८**
कर दर	२७.८२%	२७.८२%	२७.८२%
स्थगित कर मत्ता/ दायित्वे	८१५,८३५,४८०	८३७,५१५,४७२	८५८,६२३,२८२
नफा आणि तोटा यात आकारलेला/ जमा केलेला स्थगित कर			

१६.१) आतापर्यंत, कंपनी तिच्या आर्थिक विवरणांमध्ये स्थगित कर मत्ता/दायित्व यांची नोंद घेत होती. आढावा वर्षा दरम्यान आर्थिक वर्षात, कंपनीने ऐतिहासिक करपूर्व उत्पन्न, भविष्यातील करपात्र नफा, यांचे पुनर्मूल्यांकन केले आहे. न वापरलेले व पुढे नेलेले कर हानी आणि कर पत यांचे समायोजन हे ज्या भविष्यातील संभाव्य करपात्र नफ्याच्या बदल्यात करावयाचे आहे त्याबाबत वाजवी अनिश्चितता लक्षात घेऊन यापुढे स्थगित कर मत्ता/दायित्व यांची नोंद घेणे गरजेचे नसल्याच्या निष्कर्षास कंपनी पोहोचली आहे.

टिपा क्र. १७ - व्यापारी देणी

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योजकांची देणी			
- इतर	५८,२०७,२६७	२३,७७५,४५५	२४,३२५,७७६
एकूण	**५८,२०७,२६७**	**२३,७७५,४५५**	**२४,३२५,७७६**

१७.१) सूक्ष्म आणि लघु उद्योगांना देय रकमेचा तपशील

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग अधिनियम २००६ च्या कलम २२ नुसार प्रकटीकरण -

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ (एमएसईएसईडी कायदा २००६) अंतर्गत स्वत:ची नोंदणी केलेल्या पुरवठादार आणि सेवा प्रदात्यांकडून मिळालेली माहिती आणि कंपनीकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची थकबाकी ही एमएसईएसईडी कायदा २००६ अंतर्गत परिभाषित केल्यानुसार निरंक आहे.

अ) प्रत्येक लेखा वर्षाच्या अखेरीस कोणत्याही पुरवठादारांकडील देय असलेले मुद्दल व व्याज यांच्या शिलकी खालीलप्रमाणे -

अनु क्र.	तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०	१ एप्रिल २०१९
१.	देय मुद्दल रक्कम आणि परतफेड न झालेली	निरंक	निरंक	निरंक
२.	वरील रकमेवर देय व्याज आणि त्यावरील न दिलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक
३.	दिलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक
४.	वर्षभरात ठरलेल्या तारखेच्या नंतर दिलेल्या रकमा	निरंक	निरंक	निरंक
५.	विलंब कालावधीसाठी उपार्जित आणि देय व्याज	निरंक	निरंक	निरंक
६.	उपार्जित आणि न दिलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक
७.	पुढील वर्षात देय झालेली रक्कम आणि व्याज	निरंक	निरंक	निरंक

१७.२ दि. ३१.०३.२०२१ रोजीची व्यापारी येणी शिल्लक ही संबंधित व्यापाऱ्याकडून पुष्टीकरणाच्या अधीन आहेत.

टिपा क्र. १८ - इतर चालू वित्तीय दायित्वे

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०	१ एप्रिल २०१९
इसारा रक्कम ठेव	१,६८७,९५०	१,२३३,८०९	५५९,०८०
ठेवून घेतलेली रक्कम	११,५७४,३८५	९,७६९,६७०	६,८८०,३२२
सुरक्षा अनामत	२१९,८६१	६५९,५२०	४२,२२५
एकूण	**१३,४८२,१९६**	**११,६६२,९९९**	**७,४८१,६२७**

टिपा क्रं.१९ - इतर चालू दायित्वे

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०	१ एप्रिल २०१९
अ) दीर्घ मुदतीची कर्जाची विद्यमान मुदत पूर्ती-अप्रतिभूत	-	-	-
ब) कर्जावरील उपार्जित आणि देय व्याज			
शासकीय कर्जाचे उपार्जित पण देय नसलेले व्याज	-	-	-
शासकीय कर्जाचे उपार्जित पण देय असलेले व्याज	-	-	-

क) आंतर कंपनी देणी			
महापारेषण	७४०,७५०,७९२	७४३,७४०,१५६	७४५,१९३,८४६
महानिर्मिती	२,२३१,८९२,७७९	२,२३०,२८३,६१८	२,२२८,९४८,१७३
मराविमं उर्वरित	५,३४६,१७०	५,५४६,१७०	५,५४६,१७०
मराविमं सीपीएफ	५८६,०४१	७८७,४३२	१९३,६७०
ड) इतर देय			
सांविधिक देणी	५९,५२२,०१०	५५,८०५,५८८	१११,८५९,८८२
इतर	७१,३२३	५८,५४३	५८,७७९
एकूण	३,०३८,१६९,११५	३,०३६,२२१,५०७	३,०९१,८००,५२०

या कंपनीने आंतर कंपनी देण्याच्या विद्यमान रकमा पुढे चालू ठेवण्याचे ठरविले आहे आणि विद्यमान मूल्य हेच रास्त मूल्य आहे असे समजण्यात आले.

१९.१) आंतर कंपनी देणी

१) आंतर कंपनी देणी - महापारेषण चे रु. ७४०,७५०,७९२/- (मागील वर्षी रु. ७४३,७४०,१५६/-) यामध्ये सामाईक आणि विनिर्देशित दायित्व, मत्ता व राखीव यांचे हस्तांतर समाविष्ट असून ही निव्वळ शिल्लक रक्कम रु. ५१७,६३८,२८३/- इतकी असून त्याचा मेळ घालणे विमर्श व चर्चा चालू आहे.

२) आंतर कंपनी देणी - महानिर्मिती रु. २,२३१,८९२,७७९/- (मागील वर्षी रु. २,२३०,२८३,६१८/-) यामध्ये यामध्ये सामाईक आणि विनिर्देशित दायित्व, मत्ता व राखीव यांचे हस्तांतर समाविष्ट असून ही निव्वळ शिल्लक रक्कम रु. ३,१६२,७८६,३५३/- इतकी असून त्याचा मेळ घालणे विमर्श व चर्चा चालू आहे.

३) आंतर कंपनी देणी - मराविमं उर्वरित रु. ५,३४६,१७०/- (मागील वर्षी रु. ५,५४६,१७०/-) जे बॉंड धारक सापडलेले नाहीत किंवा ज्यांची ओळख निश्चिती होऊ शकलेली नाही / अशा बॉंड धारकांना देय असलेली ही रक्कम आहे.

४) आंतर कंपनी देणी - मराविमं सीपीएफ रु. ५८६,०४१/- मागील वर्षी - (रु. ७८७,७३२/-) या रकमेबाबत ताळमेळ घालण्याचे काम चालू आहे.

टिपा क्रं. २० अल्प मुदतीच्या तरतूदी

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**	**१ एप्रिल २०१९**
कर्मचारी लाभासाठी तरतूदी			
गैर हजेरीच्या भरपाईची तरतूद	६,३१६,९४९	४,७२८,०४७	६,८१३,९४५
उपदानासाठी तरतूदी	७,७१२,१७४	५,९३५,७६१	९,६८३,४८४
लेखापरिक्षकांना देय शुल्क	९१८,७५०	६७५,०००	६७५,०००
इतर तरतूदी	६,८९८,४५४	१०,३२७,८२७	२२,२०२,८८९
एकूण	२१,८४६,३२७	२१,६६६,६३५	३९,३७५,३१८

टिपा क्र. २१ प्रवर्तनापासून महसूल

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**
भाडेपट्टी उत्पन्न	८१६,१८७,४१६	८१६,१८७,४१६
एकूण	**८१६,१८७,४१६**	**८१६,१८७,४१६**

टिपा क्र. २२ इतर उत्पन्न

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**
बँकेतील मुदती ठेवीवरील व्याज	१८,९८५,६३३	२१,४८८,३७९
कर्मचारी निवासी गाळ्यांचे भाडे	२८,७६२	१३२,९१८
इतर संकीर्ण प्राप्ती	४५५,४६४	५९४,३७१
भंगार विक्रीचे उत्पन्न	१,३१५,७८७	५००,८०२
निर्लेखित जादा तरतूद	२६,५६४	२,४४६,३३३
एकूण	**२०,८१२,२१०**	**२५,१६२,८०३**

टिपा क्र. २३ - कर्मचारी लाभ खर्च

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**
वेतन	५३,८६४,१४३	६१,३२३,२७२
संचालकांचे पारिश्रमिक	६,६८४,२४६	४,६२२,२१८
भविष्य निर्वाह निधीचे अंशदान	४,७६१,९७३	४,२७०,४३०
एकूण	**६५,३१०,३६२**	**७०,२१५,९२०**

२३.१) वेतनामध्ये महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण यांचे जे कर्मचारी कंपनीमध्ये प्रतिनियुक्तीवर काम करीत आहेत, त्यांचे वेतन समाविष्ट आहे.

२३.२) पूर्ण वेळ संचालक - श्री. सुनील पिंपळखुटे हे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यंत होते.

टिपा क्रं. २४ - घसारा व कर्जफेडीचा खर्च

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	**३१ मार्च २०२१**	**३१ मार्च २०२०**
घसारा व कर्जफेडीचा खर्च	४०६,११२,९७३	४६१,१९९,३४६
एकूण	**४०६,११२,९७३**	**४६१,१९९,३४६**

टिपा क्रं. २५ - इतर खर्च

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०
प्रशासकीय आणि सामान्य खर्च		
भाडे, दर आणि कर	४१,७५०,७५८	३२,६२४,२९०
कायदेसंबंधी आणि व्यावसायिक शुल्क	७,५१०,७१२	११,६५२,३५२
लेखापरिक्षकांचे शुल्क (सेवा करासह)		
लेखापरिक्षक म्हणून	७५०,०००	७५०,०००
इतर विषयी	-	-
छपाई व लेखन साहित्य खर्च	४११,९९२	९६३,२८३
वाहतूक खर्च	२३,२०५	४८,२५७
शुल्क व वर्गण्या	८०४,९२१	१,८८२,६७५
दूरध्वनी	१७३,०२०	२२१,७४६
स्थिर मत्तांचा विमा	१५२,७००	१९०,४३०
दुरुस्ती आणि देखभाल		
कार्यालयातील साधने	२५,४९१,०९९	३३,५९१,४२८
वाहने	३२८,१४५	४२१,१८३
फर्निचर	८१,०६९,८०३	५२,२०१,७७१
इमारती	३,८२१,३००	२,९३०,०६७
बैठकीचा खर्च	३३५,३३९	३२४,९५९
प्रवास खर्च	१,४३६,८४८	४९४,०८२
टपाल, व तार	६,६२५	११,२८८
बँकांचे आकार आणि कमीशन	१२,९५६	१२,२३१
पुस्तके आणि नियतकालीके	२८,१३२	३०,०४५
जाहिरात	९१३,५०४	१,०२९,७०८
वाहन भाडे शुल्क	५,४३९,७१७	१०,६८२,३५१

वाहन खर्च	१,०९३,१९०	१,२६८,६४३
विजेचे आकार	१६,५२४,९८९	३५,४३५,२२६
पाणी शुल्क	६,००४,७०१	६,७६७,१००
सुरक्षा शुल्क	२५,१४१,३९१	२३,४७८,७५२
कार्यालय परिसराची देखभाल खर्च	२५,८२३,५६४	२२,९२५,९००
इतर संकीर्ण खर्च	८३०,१२७	६,०६५,३६९
संचालकांना बैठकीसाठीचे मानधन	-	१३,०००
मुंबई महापालिका आदेशानुसार व्याज	१,२६५,७९६	१,२६५,७९६
अपेक्षित पत हानीसाठी तरतूद	२८,६५१,६४२	३९,१३७,४०७
निर्लेखित संशयास्पद अग्रीम	१,५००,०००	२,०००,०००
एकूण	**२७७,२९६,१७७**	**२८८,४१९,३४०**

२५.१) मराविमं सुत्रधारी कंपनी लि. चे नवीन सामंजस्य करार दि. ३१ १२ २०१८ नुसार मुख्य अभियंता (स्थापत्य), महावितरण सांघिक कार्यालय, वांद्रे यांच्या स्थापत्य विभागाचे कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यांचे खर्च तसेच वीज आकार, पाणी आकार, गृहस्वच्छता, सुरक्षा उपाय, सल्लागार शुल्क, कायदेविषयक शुल्क, मुद्रण व साहित्य, स्थापत्य, वीज देखभाल खर्च रु. ३४,३२५,२४७/- (मागील वर्षी रु. ४४,१७४,४७६/-) हे सर्व पैसे मराविमं सूत्रधारी ने महावितरणच्या वांद्रे सर्कलने सादर केलेल्या देयकांनुसार खर्च केले आहे.

२५.२) भारतीय लेखा मानक ८ च्या तरतुदींचे पालन करण्यासाठी, पूर्वीच्या बाबी (ज्यामध्ये एक किंवा अधिक पूर्वीच्या वर्षांची आर्थिक विवरणपत्रे तयार करताना त्रुटी किंवा वगळल्यामुळे चालू कालावधीत उत्पन्न किंवा खर्चाच्या बाबींचा समावेश होतो) स्वतंत्रपणे खालील पद्धतीने लेखाजोखा केला;

अ) ज्यामध्ये त्रुटी आहे त्या आधीच्या कालावधीसाठी तुलनात्मक रक्कम पुनर्स्थित करणे, किंवा

ब) सादर केलेल्या सुरुवातीच्या आधीच्या कालावधीपूर्वी जेव्हा त्रुटी उद्‌भवली तेव्हा त्या कालावधीसाठी मत्ता, दायित्वे आणि इक्विटीची प्रारंभिक शिल्लक पुनर्संचयित करणे, जेणेकरून त्रुटी कधीच आली नसल्याप्रमाणे वित्तीय विवरणे सादर केली जातील.

क) जेथे आधीच्या कालावधीतील त्रुटीचा संचयी परिणाम निश्चित करणे अव्यवहार्य असेल तेथे, संस्था उक्त त्रुटी नव्या वित्तीय विवरणपत्रात दुरुस्त करेल.

ड) नजरचुकीने झालेली चूक ही मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात लक्षात आली आणि ही चूक ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या मागील आर्थिक वर्षाशी किंवा त्यापूर्वीच्या कालावधीशी संबंधित असल्याने, विवरण पत्रातील प्रत्येक श्रेणीवर याचा होणारा प्रभाव सुधारित करून ताळेबंदातील तुलनात्मक आकडे आणि ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षातील नफा-तोट्याचे विवरण तयार केले आहे.

इ) कंपनीच्या संभाव्य भविष्यातील नफ्याच्या अनिश्चिततेच्या पुनर्मूल्यांकनामुळे, त्याच्या बदल्यात पुढे न वापरलेले कर नुकसान आणि/किंवा न वापरलेली कर पत यांच्यावर काळातील फरकामुळे पुढे वहन करावी लागणारी मोठी रक्कम समायोजित केली जाऊ शकते. कंपनीने स्थगित कर मालमत्ता/ दायित्व निश्चिती थांबवली आहे आणि म्हणून मागील २ वर्षात निश्चित करण्यात आलेले स्थगित कर मालमत्ता/ दायित्व वगळण्यासाठी पूर्वीचा कालावधीतील विवरण पत्रक सुधारित करण्यात आले आहेत.

अ) मार्च २०२० च्या अखेरीस नफा आणि तोट्याच्या विवरण पत्रातील सुधारित केलेल्या बाबींचा ताळमेळ

अनु. क्रं.	तपशील	नोंद नाव	टिपा क्र.	२०१९ -२०ची स्वीकृत आर्थिक आकडेवारी (१)	२०१९ -२०ची स्वीकृत आर्थिक आकडेवारी (सुधारित / पुनर्वर्गीकरणानंतर) (२)	निव्वळ परिणाम ३ = (२) -(१)
अ)	उत्पन्न					
१	भाड्याद्वारे उत्पन्न	प्रवर्तनातून महसूल	२१	०	८१६,१८७,४१६	८१६,१८७,४१६
२	भाड्याचे उत्पन्न	इतर उत्पन्न	२२	८१६,१८७,४१६	०	-८१६,१८७,४१६
३	प्राप्त रोख सवलत	इतर उत्पन्न	२२	२३९,४४०	०	-२३९,४४०
	उत्पन्नात निव्वळ घट			८१६,४२६,८५६	८१६,१८७,४१६	-२३९,४४०
ब)	खर्च					
१	वेतन	कर्मचारी लाभावरील खर्च	२३	५७,५२०,००६	६१,३२३,२७२	३,८०३,२६६
२	छपाई व लेखन साहित्य खर्च	इतर खर्च	२५	९२९,७७३	९६३,२८३	३,३५१०
३	भाडे, दर आणि कर	इतर खर्च	२५	३२,४०९,३११	३२,६२४,२९०	२१४,९७९
४	शुल्क व वर्गण्या	इतर खर्च	२५	१,८४८,४६९	१,८८२,६७५	३४,२०६
५	दुरुस्ती आणि देखभाल (कार्यालयीन उपकरणे)	इतर खर्च	२५	३२,६५३,८१७	३३,५९१,४२८	९,३७,६११
६	पाणी आकार	इतर खर्च	२५	६,७२३,९००	६,७६७,१००	४३,२००
७	दुरुस्ती आणि देखभाल (बांधकाम खर्च) (इमारती)	इतर खर्च	२५	५१,९५०,९५७	५२,२०१,७७१	२५०,८१४
८	कायदेशीर आणि व्यावसायिक शुल्क	इतर खर्च	२५	११,०६२,५३६	११,६५२,३५२	५८९,८१६
९	जाहिरात	इतर खर्च	२५	१,२२०,७३६	१,०२९,७०८	-१९१,०२८
१०	कार्यालय आस्थापनांची स्वच्छता	इतर खर्च	२५	२१,४०५,४८३	२२,९२५,९००	१,५२०,४१७
११	संकीर्ण खर्च	इतर खर्च	२५	६,०४२,८०९	६,०६५,३६९	२२,५६०
	खर्चात निव्वळ वाढ			६८६,२३५,७८६	६९३,४९५,१३७	७,२५९,३५१

क.	कर खर्चात कपात		
१	स्थगित कर पत (क्रेडिट)	-१६९,७७३,१५३	१६९,७७३,१५३
	स्थगित कर पतमध्ये निव्वळ घट	-१६९,७७३,१५३	१६९,७७३,१५३
	चूक दुरूस्तीमुळे/पुर्नवर्गीकरणामुळे नफ्यात निव्वळ घट (अ+ब+क)		१७७,२७१,९४४

ब) पूर्वलक्ष्यी प्रभावाने विविध श्रेणींच्या वित्तीय विवरणपत्रकातील दुरूस्ती आणि ताळमेळ (व्यवहार्य मर्यादेपर्यंत)

ताळेबंदातील सुधारित व पुनर्वर्गीकृत घटकांचा ३१ मार्च २०२० आणि १ एप्रिल २०१९ चा ताळमेळ

तपशील	नोंद नाव	३१ मार्च २०२०			१ एप्रिल २०१९		
		पूर्वी नोंदवल्याप्रमाणे	समायोजन/ पुनर्वर्गीकरण	सुधारित	पूर्वी नोंदवल्याप्रमाणे	समायोजन/ पुनर्वर्गीकरण	सुधारित
इतर चालू नसलेल्या मत्ता मुदती ठेवी	९	११६,६३६,८९३	-११६,६३६,८९३	०	०	०	०
चालू मत्ता - रोख आणि रोख समतुल्य	११	-	-	-	-	-	-
इतर बॅकातील शिल्लक		१७९,८२०,८१३	११६,६३६,८९३	२९६,४५७,७०६	२८८,५१९,०१४	०	२८८,५१९,०१४
इतर		८७३,२७३,८५६,७९०	०	८७३,२७३,८५६,७९०	८७०,९९१,४५०,७३०	०	८७०,९९१,४५०,७३०
एकूण मत्ता		**८७३,५७०,३१४,४९६**	**०**	**८७३,५७०,३१४,४९६**	**८७१,२७९,९६९,७४४**	**०**	**८७१,२७९,९६९,७४४**
इतर समभाग	१४	-२१,५४६,६०२,१५६	२२७,८८८,७३१	-२१,३१८,७१३,४२५	-२१,७३९,३८६,६५८	४०५,१६०,६७५	-२१,३३४,२२५,९८३
दीर्घकालीन तरतूद - इतर तरतूद	१५	०	१३,१४९,५०७	१३,१४९,५०७	०	११,२२४,५४७	११,२२४,५४७
चालू नसलेली दायित्वे - स्थगित कर दायित्वे (निव्वळ)	१६	२३८,२०५,३७०	-२३८,२०५,३७०	०	४०७,९७८,५२३	-४०७,९७८,५२३	०
चालू दायित्वे - व्यापारी देणी	१७	१९,८८६,९७६	३,८८८,४७९	२३,७७५,४५५	२४,३२५,७७६	०	२४,३२५,७७६
लघुकालीन तरतूद - इतर तरतूदी	२०	१७,०४९,१७५	-६,७२१,३४७	१०,३२७,८२८	३०,६०९,५८८	-८,४०६,६९९	२२,२०२,८८९
इतर		८९४,८४१,७७५,१३१	०	८९४,८४१,७७५,१३१	८९२,५५६,४४२,५१५	०	८९२,५५६,४४२,५१५
एकूण दायित्वे		**८७३,५७०,३१४,४९६**	**०**	**८७३,५७०,३१४,४९६**	**८७१,२७९,९६९,७४४**	**०**	**८७१,२७९,९६९,७४४**

क) २०१९-२० आर्थिक वर्षात नफ्यात घट - वाढलेल्या खर्चामुळे आणि स्थगित पत उलट केल्यामुळे रु. १९२,७८४,५०२/- नफा हा घट होऊन रु. १५,५१२,५५८/- वर आला आहे.

ड) २०१९ -२० या आर्थिक वर्षात प्रति समभाग उत्पन्नामधील बदल

स्थगित कर प्रभावामुळे प्रति समभाग उत्पन्नात खालीलप्रमाणे प्रभावी बदल झाले आहेत -

तपशील	**२०१९ -२०**	**२०१९ -२० (सुधारणेनंतर)**
नफा/(हानी) करानंतर	१९२,७८४,५०२	१५,५१२,५५८
भारीत सरासरी थकित इक्विटी शेअर्सची संख्या	८९,०७३,४९२,७९०	८९,०७३,४९२,७९०
इक्विटी शेअर्सचे दर्शनी मूल्य रू/- शेअर	१०	१०
प्रति शेअर उत्पन्न – मूलभूत	०.००२	०.०००२
प्रति शेअर उत्पन्न – सौम्यकृत	०.००२	०.०००२

टिपा क्रं. २६ - आकस्मिक दायित्त्वे आणि वचने

अ) आकस्मिक दायित्त्वे

(रक्कम रु. मध्ये)

देय रकमांचे स्वरूप	**३१ मार्च २०२१ रोजी**	**३१ मार्च २०२० रोजी**	**संबंधित कालावधीसाठीच्या रक्कमा**
दंड	१,४१६,५५७,००२	१,४१६,५५७,००२	२००६ -०७
दंड	१,३७१,७३६,८३७	१,३७१,७३६,८३७	२००७ -०८
दंड	१,२७१,०७९,१५९	१,२७१,०७९,१५९	२००८ -०९
दंड	१,१३४,८१५,२०७	१,१३४,८१५,२०७	२००९ -१०
दंड	९८०,३३८,०८९	९८०,३३८,०८९	२०१० -११
कर व व्याज	१५८,२८९,४४१	१५८,२८९,४४१	२०१२ -१३
कर व व्याज	११५,८९८,५६०	११५,८९८,५६०	२०१३ -१४
कर व व्याज	१,२२९,३९०	०	२०१८ -१९

२६.१) निर्धारण वर्ष २००७-०८ साठी एकूण दंडाची रक्कम रु. १,३७१,७३६,८३७/- (मागील वर्षी रु. १,३७१,७३६,८३७/-) यापैकी रु. २५०,०००,०००/- हे हरकत नोंदवून भरण्यात आले. पी. सी. आय. टी. अंतर्गत स्थगितीसह प्रकरण प्रलंबित आहे.

२६.२) निर्धारण वर्ष २००९-१० दंडाची रक्कम रु. १,१३४,८१५,२०७/- (मागील वर्षी रु. १,१३४,८१५,२०७/-) असून त्यापैकी रु. १००,०००,०००/- हरकत नोंदवून भरण्यात आले. पी. सी. आय. टी. अंतर्गत स्थगितीसह प्रकरण प्रलंबित आहे.

२६.३) निर्धारण वर्ष २०१२-१३ मधील एकूण कर आणि व्याज रु. १५८,२८९,४४१/- (मागील वर्षी रु. १५८,२८९,४४१/-) असून त्यापैकी रु. ७५,८०१,५२१/- भरले. उर्वरित शिल्लक मागणी आणि व्याज रु. ८३,७३५,८८१/-) यांचे जून २०१८ मधे पूर्ण भरणा / समायोजन केले.

२६.४) निर्धारण वर्ष २०१३-१४ साठी कर आणि व्याज यांचे एकूण रु. ११५,८९८,५६०/- (मागील वर्षी रु. ११५,८९८,५६०/-) झाले असून ही रक्कम पूर्णपणे भरली आहे.

२६.५) या कंपनीने कर्ज मंजूर करण्यासाठी महावितरण कंपनीच्या वतीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळास रु. ८,४०० कोटींची कॉर्पोरेट हमी दिली आहे.

२६.६) या वर्षी कंपनीने महानिर्मिती कं. लि. च्या वतीने ग्रा. वि. महामंडळास रु. १,२८४ कोटी कार्पोरेट हमी दिली.

२६.७) मराविमं सूत्रधारी कंपनीने तिच्या पूर्ण मालकीच्या उपकंपन्या - महावितरण आणि महानिर्मितीच्यावतीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाला कार्पोरेट हमी दिली आहे. या व्यतिरिक्त मराविमं सूत्रधारी कंपनीने कोणत्याही कंपनीला खुल्या बाजारात अशी कॉर्पोरेट हमी आत्तापर्यंत दिलेली नाही किंवा देण्याचा हेतू नाही. तसेच अशा कॉर्पोरेट हमी मुळे कोणतेही वाणिज्यिक लाभ मिळविण्याचा मराविमं सूत्रधारीचा उद्देश नाही. या शिवाय या उपकंपन्या ग्रामिण विद्युतीकरण महामंडळाकडून घेतलेल्या कर्जासाठी त्यांच्या मत्तांवर यापूर्वीच आकार लावण्यात आलेले आहेत. मराविमं सुत्रधारी कंपनी कॉर्पोरेट हमी म्हणजे हे त्या उपकंपन्याच्या दायित्वासाठी 'अतिरिक्त संरक्षण' आहे. म्हणून मराविमं सुत्रधारी कंपनीवर याची अत्यल्प जोखीम आहे. परिणामी कंपनीने यामध्ये कोणतीही व्यावसायिक उपयुक्तता नसल्याने या कार्पोरेट हमीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही. म्हणून मराविम सुत्रधारी कंपनीतर्फे तिच्या उपकंपन्याच्या वतीने दिलेल्या कॉर्पोरेट हमीसाठी कोणतेही कमिशन आकारलेले नाही. म्हणून मराविमं सूत्रधारी कंपनीने तिच्या उपकंपन्यांच्यावतीने दिलेल्या कार्पोरेट हमीला रास्त मुल्यांकन मान्यता दिलेली नसून त्याची लेखा वह्यात नोंद घेतलेली नाही.

२६.८) दि. ३१.३.२०२१ रोजी थकीत कायदेशीर खटले/प्रकरणे खालीलप्रमाणे

प्रकरणाचा तपशील	**याचिकाकर्ता**	**प्रतिवादी**
धारावी कार्यालय इमारत एस्ट्रेला बॅटरीज कंपाउंड येथील भूखंडाचा उपविभाग केस नं. १६६३/२००४.	मराविमं सूत्रधारी कंपनी	एस्ट्रेला बॅटरीज लि.
एस्ट्रेला बॅटरीज कंपाउंडच्या जागेत केंद्रिय उत्पादन शुल्क खात्याच्या ताब्यातील दुसऱ्या मजला रिकामा करणेबाबत केस नं. आर ए ई ५३३/८०१/२००९	मराविमं सुत्रधारी कंपनी	भारत संघराज
मराविमं सुत्रधारी कं. लि. च्या ताब्यात असलेली एच एस बी सी, फोर्ट येथील ३रा व ४ था मजला रिकामा करण्याचे प्रकरण अपील क्र. २१३/१८/टिइआर/३४६/३६६/२००१	मराविमं सुत्रधारी कंपनी	हाँगकाँग शांघाय बँक

वरील खटल्यातील उद्भवणाऱ्या दायित्वाच्या रक्कमेचे निश्चितीकरण केलेले नसल्याने आकस्मिक दायित्वाचे प्रकटन केलेले नाही.

ब) बांधिलकी -

ज्या कंत्राटांची कार्यवाही भांडवली लेख्यातून करणे शिल्लक आहे, आणि ज्याची 'इतर' तरतूद केलेली नाही त्याची अंदाजे रक्कम निरंक (मागील वर्षी रु. निरंक)

टिपा क्रं. २७ - भाडेपट्टे (भारतीय लेखा मानके ११६ नुसार)

पट्टेदारांसोबत सुरू असलेल्या खटल्यांमुळे भाडेपट्टा कालावधीबद्दल माहिती नसल्याने, भाडेपट्टीच्या कालावधीबद्दल तसेच भाडेपट्ट्यावरील जमीन/परिसराची भविष्यातील भाडेपट्टी देयके इत्यादींबद्दल वाजवी अनिश्चितता आहे, त्यानुसार भाडेपट्टा संबंधीचे प्रकटीकरण करणे शक्य नाही.

टिपा क्रं. २८ - कर्मचारी लाभ (भारतीय लेखा मानके १९ नुसार)

यावर्षी कंपनीने उपदान व रजा रोखीकरण याचे विमागणिती मुल्यांकन केले. त्यातून उद्भवलेल्या अल्प/जादा तरतुदींची नोंद नफा आणि तोटा पत्रकात आणि इतर सर्वंकष उपत्न्रात घेण्यात आली आहे. भारतीय लेखा मानके ११६ नुसार प्रकटीकरण विमागणिती अहवालात मर्यादेनुसार उपलब्ध केले आहे.

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
सवलत	६.८०%	६.७२%	६.८०%	६.७२%
वेतन वाढीचा दर	६.००%	६.००%	६.००%	६.००%
काढून घेण्याचा दर	२.००%	२.००%	२.००%	२.००%
निवृत्ती वय	५८ आणि ६० वर्ष	५८ आणि ६० वर्ष	वर्ग १,२,३ – ५८ वर्ष, ४ – ६० वर्ष	वर्ग १,२,३ – ५८ वर्ष, वर्ग ४ – ६० वर्ष

तक्ता क्रं. १ - नफा आणि तोटा पत्रकात मान्य केलेले एकूण खर्च

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
सेवा खर्च				
अ) चालू सेवा खर्च	१,४६६,९१५	१,१७०,२६०	१,६२१,४६८	१,२९७,५३९
ब) मागील सेवा खर्च	-	-	-	-
क) समझोत्यातील (प्राप्ती)/ तोटा	-	-	-	-
ड) एकूण सेवा खर्च	१,४६६,९१५	१,१७०,२६०	१,६२१,४६८	१,२९७,५३९
निव्वळ व्याज खर्च				
अ) डीबीओवरील व्याज खर्च	१,७६०,४०५	१,८१४,०४६	१,६५१,२५१	१,५८७,८५५
ब) नियोजन मत्तांवर व्याज (उत्पन्न)	-	-		-
क) कमाल मालमत्ता मर्यादेमुळे व्याज खर्च (असेट सिलिंग)	-	-		-
ड) एकूण निव्वळ खर्च	१,७६०,४०५	१,८१४,०४६	१६,५१,२५१	१,५८७,८५५
प्राप्ती/हानीची तात्काळ मान्यता (इतर दीर्घ मुदतीचे लाभ)	-	-	(१,६७६,३८३)	३,९४०,३९५
इतर खर्च/समायोजने	-	-	-	-
नफा–तोटा पत्रकात समाविष्ट व्याख्यांकित लाभ खर्च	**३,२२७,३२०**	**२,९८४,३०६**	**१,५९६,३३६**	**६,८२५,७८९**

तक्ता क्रं. २ - इतर सर्वंकष उत्पन्नात मान्य केलेले फेरमापनाचे परिणाम

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
अ) डी.बी.ओ. मधील लोकसंख्या शास्त्रीय गृहिते बदलल्यामुळे विमागणितातील (प्राप्ती) / हानी		(७५,३६३)	-	-
ब) डी.बी.ओ. मधील वित्तीय गृहिते बदलल्यामुळे विमागणितातील (प्राप्ती) / हानी	(११४,१७३)	१,०१६,९५८	-	-
क) डी.बी.ओ. मधील अनुभवाधारित विमागणितातील (प्राप्ती) / हानी	(१,०५०,४०१)	५,०६१,४६०	-	-
ड) नियोजन मत्तांचा परताव्याचा दर सवलत दरापेक्षा (जास्त/कमी)	-	-	-	-
इ) मालमत्ता कमाल मर्यादा / प्रचंड दायित्व यातील बदल (व्याज उत्पन्न वगळून)	-	-	-	-
फ) इतर सर्वंकष उत्पन्नात समाविष्ट एकूण विमागणितातील (प्राप्ती) / हानी	**(१,१६४,५७४)**	**६,००३,०५५**	**-**	**-**

तक्ता क्रं. ३ - सर्वकष उत्पन्नात मान्य केलेला एकूण खर्च

(रक्कम रु. मध्ये)

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
नफा तोटा पत्रकात मान्य केलेले खर्च	३,२२७,३२०	२,९८४,३०६	१,५९६,३३६	६,८२५,७८९
इतर सर्वंकष उत्पन्नामध्ये मान्यताप्राप्त रक्कम	(१,१६४,५७४)	६,००३,०५५	-	-
सर्वकष उत्पन्नात मान्यताप्राप्त एकूण खर्च	२,०६२,७४६	८,९८७,३६१	१,५९६,३३६	६,८२५,७८९

तक्ता क्रं.४ - व्याख्यांकित लाभ बंधनातील बदल

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
अगोदरच्या वर्षापर्यंत व्याख्यांकित लाभ बंधने	२९,१६४,३८९	२९,३५५,८७२	२६,९३६,२१६	२४,८६४,४७६
सेवा खर्च				

अ) चालू सेवा खर्च	१,४६६,९१५	१,१७०,२६०	१,६२१,४६८	१,२९७,५३९
ब) मागील सेवा खर्च	-	-	-	-
क) समझोत्यातील (प्राप्ती)/हानी	-	-	-	-
व्याज खर्च	**१,७६०,४०५**	**१,८१४,०४६**	**१,६५१,२५१**	**१,५८७,८५५**
नियोजन मत्तांपासून देय लाभ	-	-	-	-
नियोक्त्याव्दारे थेट देय लाभ	(४,०४३,१७३)	(९,१७८,८४४)	(२,९७१,५९५)	(४,७५४,०४९)
समझोते	-	-	-	-
सहभागींचे अंशदान	-	-	-	-
अधिग्रहण/हस्तांतरण	-	-	-	-
लोकसंख्या शास्त्रीय गृहितांनुसार विमागणिती (प्राप्ती)/हानी	-	(७५,३६३)	-	(३,८२७)
विमागणिती (प्राप्ती)/हानी – वित्तीय	(११४,१७३)	१,०१६,९५८	(१२६,५६३)	१,०७४,२९५
विमागणिती (प्राप्ती)/हानी – अनुभव	(१,०५०,४०१)	५,०६१,४६०	(१,५४९,८२०)	२,८६९,९२७
इतर खर्च/ समायोजने		-	-	-
चालू वर्षीचे व्याख्यांकित लाभ बंधने	**२७,१८३,९६२**	**२९,१६४,३८९**	**२५,५६०,९५७**	**२६,९३६,२१६**

तक्ता क्र ५ - नियोजन मत्तांच्या रास्त मूल्यात बदल

तपशील	**उपदान (विनानिधी)**		**रजा रोखीकरण (विनानिधी)**	
	२०२०-२०२१	**२०१९-२०२०**	**२०२०-२०२१**	**२०१९-२०२०**
मागील वर्षाच्या अखेरीस नियोजन मत्तांचे रास्त मूल्य	-	-	-	-
नियोजन मत्तांवरील अपेक्षित परतावा	-	-	-	-
मालकांचे अंशदान	-	-	-	-
सहभागी होणाऱ्यांचे अंशदान	-	-	-	-
नियोजन मत्तांकडून देय लाभ	-	-	-	-
समझोते	-	-	-	-
अधिग्रहण/निर्गुतवणूक	-	-	-	-
नियोजन मत्तांवरील विमा गणिती (प्राप्ती) / हानी	-	-	-	-
वर्षाअखेरीस नियोजन मत्तांचे रास्त मूल्य	-	-	-	-

तक्ता क्र ६ - निव्वळ व्याख्यांकित लाभ / (दायित्वे)

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
व्याख्यांकित लाभ बंधन	२७,१८३,९६२	२९,१६४,३८९	२५,५६०,९५७	२६,९३६,२१६
नियोजन मत्तांचे रास्त मूल्य		-	-	-
(आधिक्य)/ तूट	२७,१८३,९६२	२९,१६४,३८९	२५,५६०,९५७	२६,९३६,२१६
मत्ता कमाल मर्यादांचे परिणाम		-	-	-
निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्वे/(मत्ता)	**२७,१८३,९६२**	**२९,१६४,३८९**	**२५,५६०,९५७**	**२६,९३६,२१६**

तक्ता क्र ७ - ताळेबंदातील रकमांचा मेळ

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
अगोदरच्या वर्षाअखेरीपर्यंत निव्वळ व्याख्यांकित लाभाचे दायित्व /(मत्ता)	**२९,१६४,३८९**	**२९,३५५,८७२**	**२६,९३६,२१६**	**२४,८६४,४७६**
नफा व तोटा पत्रकातील व्याख्यांकित लाभ खर्च	३,२२७,३२०	२,९८४,३०६	१,५९६,३३६	६,८२५,७८९
इतर सर्वंकष उत्पन्नात समाविष्ट एकूण पुर्नमापन	(१,१६४,५७४)	६,००३,०५५	-	-
इतर महत्त्वाच्या घटना/भा.ले. मानक १९ नुसार एक वेळ समायोजन	-	-	-	-
अधिग्रहण/ निर्गुतवणूक	-	-	-	-
विविध योजनांच्या एकीकरणात मान्य केलेल्या रकमा	-	-	-	-
नियोक्त्याचे अंशदान	-	-	-	-
नियोक्त्याव्दारे देय थेट लाभ	(४,०४३,१७३)	(९,१७८,८४४)	(२,९७१,५९५)	(४,७५४,०४९)
परकीय चलनविनिमय दरातील बदलांचे परिणाम	-	-	-	-
वर्षाच्या अखेरीस निव्वळ व्याख्यांकित लाभाचे दायित्व /(मत्ता)	**२७,१८३,९६२**	**२९,१६४,३८९**	**२५,५६०,९५७**	**२६,९३६,२१६**

तक्ता क्र ८ - इतर सर्वंकष उत्पन्नाच्या मेळाचे विवरण

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
इतर सर्वंकष उत्पन्नाचे मेळ विवरण				
वर्षाच्या प्रारंभी एकत्रित इतर सर्वंकष उत्पन्न (उत्पन्न)/तोटा	(५,२४०,६५८)	(११,२४३,७१४)	-	-
इतर सर्वंकष उत्पन्नामधील समाविष्ट एकूण पुनर्मोजणी	(१,१६४,५७४)	६,००३,०५५	-	-
वर्षाच्या अखेरीस एकत्रित इतर सर्वंकष / (उत्पन्न) / खर्च	(६,४०५,२३३)	(५,२४०,६५८)	-	-

तक्ता क्र ९ - चालू / चालू नसलेली दायित्वे

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
चालू दायित्वे	७,७१२,१७४	५,९३५,७६१	६,३१६,९४९	४,७२८,०४७
चालू नसलेली दायित्वे	१९,४७१,७८७	२३,२२८,६२९	१९,२४४,००७	२२,२०८,१६९
चालू नसलेल्या मत्ता	-	-	-	-
एकूण	२७,१८३,९६२	२९,१६४,३८९	२५,५६०,९५७	२६,९३६,२१६

तक्ता क्र १० - भविष्यातील अपेक्षित रोकडता प्रवाह

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
वर्ष १	७,७१२,१७४	५,९३५,७६१	६,३१६,९४९	४,७२८,०४७
वर्ष २	६००,१८४	५,०९२,३२५	५७०,२४२	४,३९८,३४१
वर्ष ३	५,११६,७४६	६२२,१७८	४,१४८,२६०	५७३,०२८
वर्ष ४	३,९११,४४५	५,०६१,६६१	३,४७०,८०२	४,०८०,५०२
वर्ष ५	५,३२०,७२०	३,८३४,८४९	५,१५२,२२१	३,३३२,१९६
वर्ष ६ ते १०	५,५४८,८११	११,७२६,४३५	५,७६५,२३४	१२,१२८,६६६
१० वर्षावरील	१६,३४२,०५२	१५,१५७,०२१	२०,२७१,२८८	२१,३६१,९४७
सरासरी अपेक्षित भविष्यातील कामकाजाचे जीवन(वर्ष)	१३.०४	१२.५०	१३.०४	१२.५०

तक्ता क्र ११ - पुढील वर्षातील व्याख्यांकित लाभ योजनेचे घटक

तपशील	उपदान (विनानिधी)	रजा रोखीकरण (विनानिधी)
	०१/०४/२०२१ ते ३१/३/२०२२	०१/०४/२०२१ ते ३१/३/२०२२
सेवा खर्च		
अ) चालू सेवा खर्च	१,३२१,७४२	१,४१५,८४८
ब) मागील सेवा खर्च	-	-
क) समझोत्यासंबंधी (प्राप्ती)/हानी	-	-
ड) एकूण सेवा खर्च	१,३२१,७४२	१,४१५,८४८
निव्वळ व्याज खर्च		
अ) डी.बी.ओ.चा व्याज खर्च	१,५८६,२९५	१,५२३,३६९
ब) नियोजन मत्तांवरील व्याज(उत्पन्न)	-	-
क) मत्ता कमाल मर्यादाच्या परिणामावरील व्याज खर्च	-	-
ड) एकूण निव्वळ व्याज खर्च	१,५८६,२९५	१,५२३,३६९
इतर समायोजन	-	-
नफा - तोटा पत्रकात समाविष्ट व्याख्यांकित लाभ खर्च	**२,९०८,०३७**	**२,९३९,२१७**

नियोजन मत्ता

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
भारित सरासरी मालमत्ता वाटप वर्षाच्या अखेरीस खालीलप्रमाणे				
समभाग	०.०० %	०.०० %	०.०० %	०.०० %
रोखे	०.०० %	०.०० %	०.०० %	०.०० %
गिल्टस	०.०० %	०.०० %	०.०० %	०.०० %
विमा कंपनीबरोबर जमा केलेल्या मत्ता	०.०० %	०.०० %	०.०० %	०.०० %
इतर	०.०० %	०.०० %	०.०० %	०.०० %
एकूण	**०.०० %**	**०.०० %**	**०.०० %**	**०.०० %**
नियोजन मत्तावरील प्रत्यक्ष परतावा	-	-	-	-

संवेदनशीलता विश्लेषण

तपशील	उपदान (विनानिधी)		रजा रोखीकरण (विनानिधी)	
	२०२०-२०२१	२०१९-२०२०	२०२०-२०२१	२०१९-२०२०
व्याख्यांकित लाभ बंधने				
सवलत दर				
अ) सवलत दर -१०० बेसिस पॉइंट	२८,७०७,२१५	३०,८३५,१०६	२७,२५९,१२०	२८,७१९,९५१
अ) सवलत दर - १०० बेसिस पॉइंट (प्रभाव)%	५.६०%	५.७३%	६.६४%	६.६२%
ब) सवलत दर +१०० बेसिस पॉइंट	२५,९१९,९५४	२७,६९८,१७७	२४,१०२,४०९	२५,३९०,२३८
ब) सवलत दर +१०० बेसिस पॉइंट (प्रभाव)%	-४.६५%	-५.०३%	-५.७१%	-५.७४%
वेतनवाढीचा दर				
अ) दर - १०० बेसिस पॉइंट	२५,८३४,२९९	२७,६७५,७२९	२४,०७४,५५२	२५,३६६,६२०
अ) दर - १०० बेसिस पॉइंट (प्रभाव)%	-४.९६%	-५.१०%	-५.८२%	-५.८३%
ब) दर + १०० बेसिस पॉइंट	२८,७८१,४७४	३०,८३०,४८९	२७,२५५,०३५	२८,७१४,८४०
ब) दर + १०० बेसिस पॉइंट (प्रभाव)%	५.८८%	५.७१%	६.६३%	६.६०%

विमा गणिती तज्ञ यांनी केलेल्या मूल्यांकनावर विसंबून मांडले आहे.

टिपा क्र. २९ - विभागश - अहवाल (भा.ले.मानक १०८)

सूत्रधारी कंपनी ही एकमेव विभागाची व उद्देशाची कंपनी आहे, ज्याचा उद्देश महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपकंपन्यांचे भाग धारण करणे आहे. त्यामुळे भारतीय लेखा मानके १०८ अंतर्गत अतिरिक्त प्रकटीकरण आवश्यक नाही.

टिपा क्र. ३० - संबंधिता विषयी प्रकटने (भा.ले.मानके २४)

अ) उपकंपन्यांची यादी -

अ) उपकंपन्यांची यादी

अ. क्र.	ज्यांच्यावर नियंत्रण अस्तित्वात आहे, अशा संस्था	नातेसंबंध
१	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.	संपूर्ण मालकीची कंपनी
२	महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.	संपूर्ण मालकीची कंपनी
३	महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी लि.	संपूर्ण मालकीची कंपनी
५	औरंगाबाद पॉवर कंपनी लि.	महावितरणची उपकंपनी
६	धुळे थर्मल पॉवर कंपनी लि.	महानिर्मितीची उपकंपनी
७	महागूज कॉलयरीज लि.	महानिर्मितीची उपकंपनी
८	धोपावे कोस्टल पॉवर लि.	महानिर्मितीची उपकंपनी

वरील प्रकटने कंपनीकडून मिळालेल्या निवेदनावर आधारित आहेत. भारतीय लेखा मानक परिच्छेद २५ मधील दिलेल्या सवलतीनुसार या कंपनीला तिच्या उपकंपन्या – राज्य नियंत्रित उद्योग संस्था असल्याने, त्याविषयी प्रकटन करणे आवश्यक नाही.

संबंधित संस्थाचे नाव	**नातेसंबंध**
रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड	ज्या उद्योग संस्थेवर व्यवस्थापनातील महत्त्वाचे व्यक्ती आणि त्यांचे नातेवाईक इ. मोठ्या प्रमाणात प्रभाव पडू शकतात अशी संस्था

संबंधित संस्थेचे नाव	**व्यवहाराचे स्वरूप**	**रक्कम**
रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा. लि.	लाभांश प्राप्ती	निरंक
	वर्षभरातील गुंतवणूक	निरंक
	वर्षा अखेरची शिल्लक गुंतवणूक	प्रत्येकी रु. १०/- चे ४४२,२२६,१३१ शेअर्स आणि निव्वळ वसूली योग्य मूल्य निरंक
कोकण एल. एन. जी. लिमिटेड	लाभांश प्राप्ती	निरंक
	वर्षभरातील गुंतवणूक	निरंक
	अखेरची शिल्लक गुंतवणूक	प्रत्येकी रु. १०/- चे ७४,०५३,८६९ शेअर्स आणि निव्वळ वसूली योग्य मूल्य निरंक

ब) व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्ती

श्री . दिनेश वाघमारे	व्यवस्थापकीय संचालक
श्री. सुनील पिंपळखुटे	संचालक(वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
श्री. अनूप कुमार	संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी)
श्री. सुबोध झारे	कंपनी सेक्रेटरी

१. पूर्ण वेळ संचालक (वित्त) – याचे वर्षभरातील पारिश्रमिक रु. ३,२२२,१९५/-

२. पूर्ण वेळ संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) – याचे वर्षभरातील परिश्रमिक रु. ३,४६२,०५१/-

३. पूर्ण वेळ कंपनी सेक्रेटरी यांचे वर्षभरातील पारिश्रमिक रु. २,३८४,७७६/-

टिपा क्र. ३१ - कंपनीची सामाजिक जबाबदारी

कंपनी अधिनिय २०१३ चे कलम १३५ कंपनीच्या सामाजिक जबाबदारीसंबंधी असून ते या कंपनीला लागू आहे.

मागील ३ वर्षांतील कंपनीचा सरासरी नफा हा ऋणात्मक असल्याने (कंपनीला तोटा झाला असल्याने) कंपनीला सामाजिक जबाबदारीसाठी निधी खर्च करण्याची गरज नाही.

तपशील	**३१ मार्च २०२१ रोजी संपलेले वर्ष**	**३१ मार्च २०२० रोजी संपलेले वर्ष**
मागील तीन वर्षांतील सरासरी निव्वळ नफा	(८३,६५४,५७१)	(२१७,३४३,६३४)
मागील तीन वर्षांतील सरासरी निव्वळ नफ्यातील २% रक्कम	** (१,६७३,०९१)	** (४,३४६,८७३)
वर्षभरातील सीएसआरवर केलेले खर्च	-	-
सीएसआर बाबतीत प्रलंबित जबाबदाऱ्या	-	-

** सरासरी नफा कंपनीच्या सुधारित आर्थिक बाबी विचारात घेऊन गणना केली जाते.

टिपा क्र. ३२ - प्रति समभाग उत्पन्न (भा. लेखा मानक नुसार ३३)

तपशील	३१ मार्च २०२१ रोजी	३१ मार्च २०२० रोजी
करोत्तर नफा/(तोटा) रु.	८९,४४४,६८८	१५,५१२,५५८
थकबाकी असलेल्या समभागांची भारित सरासरी संख्या	८९,१३९,३४४,३७९	८९,०७३,४९२,७९०
समभागाचे दर्शनी मूल्य रू / समभाग	१०	१०
प्रति समभाग उत्पन्न (मूळ)	०.००१	०.०००२
प्रति समभाग उत्पन्न (सौम्यकृत)	०.००१	०.०००२

टिपा क्रं. ३३ - वित्तीय साधने - लेखे, वर्गीकरण आणि रास्त मूल्य मापन

सक्तीच्या किंवा व्यवहार बंद करून विक्रीच्या व्यतिरिक्त इच्छूक व्यक्तीच्या दरम्यानच्या चालू व्यवहारामध्ये ज्या प्रकारे साधन बदलले जाऊ शकते अशा रकमेत वित्तीय मत्ता आणि दायित्वे यांचे रास्त मूल्य समाविष्ट आहे.

रास्त मूल्यांच्या अंदाजासाठी खालील पध्दती आणि गृहिते वापरली जातात.

१) यामध्ये रोख आणि अल्प मुदतीच्या ठेवी, व्यापारी आणि इतर अल्प मुदतीची येणी, व्यापारी येणी, व्यापारी देणी, इतर चालू दायित्वे, बँका व वित्तीय संस्थांची अल्प मुदतीची कर्जे यांचे रास्त मूल्य अशा साधनांच्या अल्पकालिन मुदतपूर्णतेमुळे अंदाजे त्यांच्या विद्यमान रक्कमेप्रमाणे.

२) ज्या वित्तीय विलेखांचे निश्चित आणि बदलणारे व्याज दर आहेत, त्यांचे मूल्यांकन व्याज आणि संबंधित संस्थांची पत या मापदंडाच्या आधारे कंपनी ठरविते. त्याआधारे या येण्यांच्या अपेक्षित पतहानीच्या भरपाईसाठी भत्ते लेखांकित केले जातात.

वित्तीय विलेखाच्या रास्त मूल्याची निश्चिती आणि प्रकटने यासाठी मूल्यांकन तंत्रावर आधारित खालील श्रेणीबद्धतेच्या वापर केला जातो.

स्तर १ - उद्धृत (असमायोजित) प्रक्रिया - यासाठी समान मत्ता दायित्वाच्या सक्रिय बाजारपेठेतील प्रक्रीया विचारात घेतली जाते.

स्तर २ - रास्त मूल्यांशी संबंधित थेट किंवा अप्रत्यक्ष दिसून येणाऱ्या व प्रभाव करणाऱ्या अन्य पद्धती विचारात घेतली जातात.

स्तर ३ - असे तंत्रज्ञान जे वापरल्या जाणा -या निवेशांचा वापर करते, जे नमूद केलेल्या रास्त मूल्यांवर लक्षणीय परिणाम दर्शविते व जे दृश्यमान बाजार माहितीवर आधारित नाहीत.

टिपा क्र. ३४ - वित्तीय जोखीम व्यवस्थापनाची उद्दिष्टे व धोरणे -

कंपनीचे वित्तीय जोखीम व्यवस्थापन ही त्याच्या व्यवसाय धोरणाची योजना आणि अंमलबजावणी कशी करावी याचे एक अविभाज्य अंग आहे. व्यवस्थापन मंडळ हे वित्तीय जोखीम व्यवस्थापन धोरण ठरविते. वित्तीय विलेखांच्या किंमतीत बदल झाल्यास भविष्यात होणारी मिळकत हानीची जोखीम, रास्त मूल्य आणि भविष्यातील रोकडता प्रवाहाचे धोके यांचा बाजार जोखमीत समावेश होतो. व्याज दर, परकीय चलन, विनिमय दर, इक्विटी किंमत आणि इतर बाजारातील घटक यामधे बदल झाले तर बाजार जोखिमांप्रति संवेदनशील असलेल्या वित्तीय विलेखांचे मूल्य बदलू शकते. गुंतवणूकी, ठेवी, परकीय चलनाद्वारे मिळणाऱ्या वस्तू, कर्जे, देणगी व उसनवारी या सर्व जोखीम संवेदनशील घटकांचा बाजार जोखीमांमध्ये समावेश असतो.

व्याज दर जोखीम -

बाजारातील व्याजदरामधे बदल झाल्याने वित्तीय साधनांचे रास्त मूल्य किंवा भविष्यातील रोकडता प्रवाह यांच्यात होणारा बदल होण्याची जोखीम म्हणजे व्याज दर जोखीम आहे.

या कंपनी संबंधित अहवाल तारखांपर्यंत अशा महत्वाच्या व्याज दर जोखीमांना सामोरे जावे लागले नाही.

परकीय चलनाची जोखीम -

संबंधित अहवाल तारखेपर्यंत कंपनीला परकीय चलनाच्या व्यवहाराचा जोखमीला सामोरे जावे लागलेले नाही.

पत जोखीम -

पूर्वी ठरल्याप्रमाणे प्रतिपालकाला(काऊंटर पार्टी) त्यांचे दायित्व चुकिवणे शक्य नसेल तर या संभाव्यतेपासून उधारीची जोखीम निर्माण होते.

अशा प्रकाराचे व्यवस्थापन करण्यासाठी कंपनी नियत केलेल्या कालावधी नंतर संबंधित ग्राहक / संस्था यांच्या वित्तीय विश्वासार्हतेची पडताळणी करते. तसेच वित्तीय स्थिती, चालू आर्थिक प्रवाह तसेच एतिहासिक बुडीत कर्जाचे विश्लेषण करुन आणि येणी संबंधी वय आणि घटक विचारात घेऊन वित्तीय विश्वासार्हतेची पडताळणी केली जाते. त्यानुसार व्यक्तीगत जोखीमांच्या मर्यादा निश्चित केल्या जातात.

मालमत्तेची प्रारंभिक ओळख यावर थकबाकीदाराची संभाव्यता आणि चालू स्थितीत प्रत्येक अहवाल कालावधीत पत (उधारी) जोखमीत लक्षणीय वाढ झाली आहे का यावर कंपनी विचार करते. कर्जाच्या जोखमीत लक्षणीय वाढ झाली आहे का याचा विचार करण्यासाठी, कंपनी अहवालाच्या तारखेला मालमत्तेवर होणा -या मूलगामी जोखमीची तुलना प्रारंभिक काळातील मूलगामी जोखमीशी करते त्यात वाजवी आणि सहाय्यक अग्रेषित माहिती जसे की,

(१) उद्योगातील प्रत्यक्ष किंवा अपेक्षित महत्वाचे विपरीत बदल.

(२) प्रतिपालकाच्या (काऊंटर पार्टी)परिचालन परिणामात प्रत्यक्ष किंवा अपेक्षित महत्वाचे बदल.

(३) प्रतिपालकाच्या (काऊंटर पार्टी) क्षमतेनुसार त्याच्या जबाबदा -या पूर्ण करण्यासाठी महत्वपूर्ण बदल घडवून आणू शकणारी वित्तीय किंवा आर्थिक परिस्थिती

(४) समान प्रतिपालकाच्या (काऊंटर पार्टी) इतर वित्तीय विलेखांवर पत जोखीमांमध्ये मोठी वाढ होणे.

(५) दायित्व किंवा त्रयस्थ पक्षांच्या हमी किंवा उधारी संवर्धनास पूरक असलेल्या संपार्श्विक मूल्यांमध्ये महत्वपूर्ण बदल

जेव्हा वसुलीची वाजवी अपेक्षा नसते तेव्हा वित्तीय मत्ता निर्लेखित केल्या जातात. उदा. जेव्हा कंपनीचे ऋणको परतफेड योजनेत सहभागी होण्यात अयशस्वी होतात, जेव्हा कंपनीचे ऋणको कंत्राटी देणी दोन वर्षांपेक्षा अधिक काळ थकवतात. अशा वेळी कंपनी त्या कर्जाचे किंवा येण्याची निर्लेखित करण्यासाठी श्रेणीबध्द करते. कर्ज किंवा येणे रक्कम निर्लेखित केली तरी कंपनी वसूलीची कार्यवाही चालू ठेवते. वसूली झाल्यास त्यास नफा किंवा तोट्यात मान्यता दिली जाते.

अंदाज करणे किंवा गृहित धरणे या विषयीच्या तंत्रात या वर्षी कोणताही लक्षणीय बदल केलेला नाही.

रोकड सुलभते संबंधी धोके -

रोकड सुलभतेच्या धोक्याची व्याख्या - जेव्हा कंपनी तिचे दायित्वे त्यांच्या योग्य किमतीनुसार वेळेवर पूर्ण करण्यास असमर्थ ठरते तेव्हा ती रोकड सुलभतेची जोखीम असते.

अहवाल जाहीर करण्याच्या तारखेला कंपनी रोकड सुलभतेच्या जोखमीला सामोरी गेलेली नाही.

टिपा क्रं. ३५

सुरूवातीच्या मूल्यांकनावर आधारित, व्यवस्थापनाला कोविड १९ साथीच्या आजाराचा कंपनीच्या व्यवसायावर कोणताही महत्वपूर्ण परिणाम होण्याची अपेक्षा नाही. कंपनीने अंतर्गत आणि बाह्य माहितीच्या आधारे, मालमत्ता, उपकरणे, साधने आणि व्यापारी येणी यांच्या रकमेवरील कोविड -१९ च्या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन केले आहे. वाजवी अंदाज आणि अचूक निर्णयांचा वापर करून हे ठरविले आहे की या मालमत्तेची विद्यमान रक्कम पूर्नप्राप्ती करण्यायोग्य आहे. वरील बाबी आणि कंपनीच्या कार्यक्षमतेत हळूहळू तरलता स्थिती सुधारत असल्याने नजिकच्या भविष्यात आर्थिक जबाबदा -या पूर्ण करण्यात कोणतीही मोठी अनिश्चतता नाही.

टिपा क्र. ३६ - मागील वर्षाचे आकडेवारीचे आवश्यक तेथे पुर्नगटीकरण केले आहे.

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रं.११२१६५ डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन-२१०३९७६५एएएएकेपी६०२९

सुनील पिंपळखुटे
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी
(डीआयएन-०१९१५७२५)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन-०१८४३०९७)

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त)

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए २२९८०

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

स्थळ: मुंबई
दिनांक: २९.१२.२०२१

एकत्रित वित्तिय विवरण पत्रक

२०२०-२०२१

स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,
सर्व सन्माननीय सदस्य मराविम सुत्रधारी कं. लि.
कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरिक्षणाचा अहवाल

पात्रते विषयी अभिप्राय -

आम्ही, मराविमं सुत्रधारी कंपनी लिमिटेड (यापुढे 'कंपनी' असे संबोधले आहे) आणि तिच्या उपकंपन्या (सुत्रधारी व तिच्या उपकंपन्या यांचा एकत्रित उल्लेख पुढे 'समुह' असा केला आहे.) यांच्या ३१ मार्च २०२१ रोजीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचे लेखा परिक्षण केले. या पत्रकामध्ये एकत्रित ताळेबंद पत्रक, एकत्रित नफा आणि तोटा पत्रक (यामध्ये इतर सर्वकष उत्पन्न या सह) वरील तारखेला संपलेल्या वर्षातील समभाग धारणेतील बदल, एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक आणि कंपनीची महत्त्वाची लेखा धोरणे आणि इतर स्पष्ट करण्यात आलेली माहिती (यापुढे यांचा उल्लेख 'एकत्रित वित्तीय विवरण पत्रके वि. वि. पत्रके' असा केलेला आहे) यांचा समावेश आहे.

आमच्या मते आणि आमच्याकडील सर्वोत्तम माहिती तसेच आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे याच्या आधारे आम्ही निवेदन करतो की, आमच्या अहवालातील पात्रमतांचा आधार या शीर्षकाच्या परिच्छेदातील मजकूर तसेच परिच्छेद ९ (२) (ड) यात भारतीय लेखा मानके (भा. ले. मानके) याची पूर्तता नसलेल्या काही बाबी आणि कंपनीच्या उपकंपन्यांच्या वेगवेगळ्या स्वतंत्र वि. वि. पत्रकांचे लेखा परिक्षणाचे अहवाल आणि इतर माहिती या सर्वांचा अपवाद करता, ज्यांचे सहवाचन 'भर देण्याची प्रकरणे' आणि महत्वाची 'लेखा परिक्षणाची प्रकरणे' केले जाते. त्यानुसार आमच्या मते, वरील एकत्रित वि. वि. पत्रके ही कंपनी अधिनियम २०१३ ('कायदा') यात दिलेल्या आवश्यकता प्रमाणे आणि या कायद्याचे कलम १३३ ज्याचे वाचन कंपन्यासाठीची (भा. ले. मानके) नियमावली यानुसार २०१५ या सुधारीत नियमावली नुसार आणि भारतातील सर्वसाधारणपणे मान्य केलेली इतर लेखांची धोरणे यानुसार या समुहाची दि. ३१ मार्च २०२१ रोजीच्या वित्तीय स्थितीचे सत्य आणि रास्त दर्शन घडवितात. तसेच या समुहाच्या एकत्रित तोटा, एकूण सर्वंकष उत्पन्न (वित्तीय कामगिरी) समभागातील बदलाचे एकत्रित पत्रक आणि एकत्रित रोकडता प्रवाह यांची ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची माहिती देतात.

उपकंपनी महापारेषणच्या विषयी आम्ही पात्र अभिप्राय परिच्छदेच्या आधारे नमूद केलेल्या बाबींचा एकत्रित प्रभाव पडताळून पाहण्यासाठी पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षण पुरावे मिळवू शकलो नाही. म्हणून त्यावर अभिप्राय देऊ शकत नाही.

२. पात्रतेच्या मतांचा आधार –

मराविम सुत्रधारी कंपनीचे प्रकरणी आम्ही आमच्या लेखा परिक्षणासाठी आवश्यक अशी माहिती आणि स्पष्टीकरणे खालील विषयासाठी मिळवू शकलेलो नाही.

अ) शासन निर्णय २०१०/प्र.क्र.११७/ऊर्जा नुसार रु. १४,४५३,४००,०००/- च्या ३१ मार्च २०१६ रोजी अंतिम झालेल्या तात्पुरत्या हस्तांतरण योजनेअंतर्गत हस्तांतरित केलेल्या मूर्त स्थिर मालमत्तेची मालकी निर्धारित करणे (संदर्भ टिपा क्र. ४९(१)(१.२)

ब) कंपनीच्या उपकंपन्या म्हणजे महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती यांच्या कडील थकित शिलकीची नोंद कंपनीच्या लेखा वह्यात केली आहे. त्याविषयी मेळ, चर्चा आणि विमर्श चालू आहे. (संदर्भ - टिपा क्र. ४९(२.१) आणि ४९(५) त्यांचा वित्तीय स्थितीवर आणि वि. वि. प्रकरणातील प्रकटनावर काही परिणाम होऊ शकतील.

क) मराविमं सुत्रधारी कंपनीच्या पूर्ण मालकीच्या उपकंपन्या महावितरण आणि महानिर्मिती यानी अनुक्रमे रु. ८४०० कोटी आणि रु. १२८४ कोटी एवढ्या ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाच्या कर्जांना कॉर्पोरेट हमी दिल्या. भा. ले. मानक १०९ मधील आवश्यकतेनुसार त्याचे रास्त मुल्यांकन केलेले नाही म्हणून त्यांच्या प्रभावाचे निर्धारण अनिश्चित आहे. (संदर्भ टिपा ४२ (ए) (अ) (७)

ड) मागील वर्ष २०२०-२०२१ मध्ये प्राप्त झालेल्या समभाग अर्जाची रक्कम रु. ४२.५० कोटीचे समभाग २.०९.२०२१ रोजी वाटप करण्यात आले आहेत, यात कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झालेले दिसते. (संदर्भ - टिपा क्र. १९ (ड))

ई) महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे या वर्षातील रु. ६४०,०००,०००/- उपकंपन्यांच्या शेअर्स मिळवण्यासाठी महानिर्मितीला थेट भरले. यात कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ४२ च्या तरतुदीचे उल्लंघन झालेले दिसते. (संदर्भ - टिपा क्र. १८ (क)

फ) स्वमालकीची जमीनीच्या उपलब्ध तपशीलावरुन असे निदर्शनास आले की, भूतकाळात भाडेपट्टीच्या जमिनींशी संबंधित अनेक घटकांना उपकंपन्यांनी याच लेखाशीर्षा अंतर्गत दाखविले. त्यामुळे भाडेपट्टीची जमीन आणि मालकीची जमीन यांचे स्वतंत्र विलगीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे भाडेपट्टीच्या जमिनीच्या कर्ज फेड करण्यात आली नाही. अशा प्रकारांची माहिती / तपशील उपलब्ध नसल्याने त्यांच्या भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि. पत्रकावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.

उपरोक्त परिच्छेद (अ) ते (फ) यांचे तोटा, राखीव, प्रति समभाग मिळकत यांच्यावर होऊ शकणाऱ्या/झालेल्या परिणामांचे सांख्यिकरण केलेले नाही, सांख्यिकीकरण आणि प्रकटन शक्य नाही.

महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी

अ)या कंपनीने चालू वित्तीय वर्षांत, महावितरण कंपनीच्या विलंब भरणा आकाराचे व्याजात्मक महसूल म्हणून मान्यता दिली. ही रक्कम रु. २५११.५१ कोटी आहे. (३१ मार्च २०२१ पर्यंतची संचित रक्कम रु. १४८६२.१० कोटी) कंपनीने विलंब भरणा आकार आकारणीसाठी सातत्याने अंगीकारलेल्या पद्धतीनुसार आहे. ३१ मार्च २०२१ पर्यंतची विलंब भरणा आकाराची रक्कम पूर्णपणे वसुली होण्याजोगी नाही, महावितरणने त्यावर आक्षेप घेतला असल्याने या विलंब भरणा आकाराची वसुली संशयास्पद आहे. महावितरणने सूत्रधारी कंपनीला कळविल्यानुसार विलंब भरणा आकार हिशेबासाठी वेगळी आणि एकतर्फी पद्धती अवलंबिली आहे. महावितरणच्या म्हणण्यानुसार हा आकार रु. ४११२.२७ कोटी इतकाच होतो. त्यामुळे महानिमिर्तीने आकारलेली रक्कम आणि आणि महावितरणने तिच्या हिशेब पद्धतीने मोजलेली विलंब आकाराची रक्कम यामध्ये रु. १०७४९.८३ कोटींची तफावत आहे. त्याची अंतिम निष्पत्ती आणि महावितरणने पुर्नजिवित केलेल्या या वादामुळे ही वसुली होणे संशायस्पद आहे. त्यामुळे त्यासाठी तरतुद केली नाही. विलंब आकाराची रक्कम महावितरण व महानिर्मिती दोन्ही संस्थात मान्य होईल अशी निश्चित होणे आहे. (संदर्भ टिपा क्र. ५० (११) एकत्रित वित्तिय विवरणावरील).

ब) खालील बाबींकडे लक्ष वेधू इच्छितोः

१) वीज खरेदी करारानुसार महानिर्मितीने पुरविलेल्या विजेसाठी महावितरणकडून रु. २७०४०.४८ कोटी, (सध्याच्या रु. २५११.५१ च्या बिल न केलेल्या महसुलासह) वसूल करण्यायोग्य शिल्लक आहे, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. आर्थिक वर्षाअखेरीस महावितरणने महानिर्मितीला देय असलेली रक्कम रु. १५९५७.२४ कोटी असल्याची पुष्टी केली आहे. विवादित बाबींसाठी दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे या दोन शिल्लकींमधील संयुक्तपणे मेळ घातला आहे. आम्हाला सांगण्यात आले आहे की या विवादित बाबी, रक्कम आणि समस्यांचे निराकरण झाल्यावर अंतिम सुधारात्मक लेखांकन आणि समायोजन केले जाईल.

२) महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी लिमिटेड कडून वसूल करण्यायोग्य शिल्लक येणी रु. १४३.५२ कोटी मेळ आणि कायम होण्याच्या अधीन आहे. मात्र आम्हाला असे सांगितले की कंपनीने या विषयी पाठविलेल्या पत्रांना अद्याप उत्तरे मिळाली नाहीत. लेखा परिक्षणाचे पुरेसे आणि योग्य पुरावे नसल्याने या शिल्लकी रकमांवर जर काही परिणाम झाला तर त्याचा कंपनीच्या वर्षाच्या तोट्यावर होऊ शकणाऱ्या प्रभावावर मत देता येत नाही.

क) कोळसा कंपनीच्या शिलकी संबंधीत कोळसा कंपनीकडून पुष्टीकरण करणे व मेळ करणे यांच्या अधीन आहेत. आमच्या मते, कंपनीने साधारण खातेवहीच्या शिलकीच्या आधारे ताळमेळ घातलेला नाही. त्याबाबत माहिती नसल्याने त्याचे कंपनीच्या वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत. कोळसा कंपनी निहाय थकीत अग्रीमाची माहिती खालील प्रमाणे

(रु. कोटीत)

पुरवठादाराचे नाव	***महानिर्मितीच्या लेखावह्यात ३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक***
सिंगरेनी कॉलीयरीज प्रा. लि.	*१२४.८४ - जमा*
साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड लि.	*२५२.१७ - खर्च*

वेस्टर्न कोलफिल्ड लि.	*२०१३.४४ - जमा*
महानदी कोलेफिल्ड्स लि.	*१२०.१६ - जमा*
एकूण	***२००६.२७ - जमा***

कोळसा कंपन्याकडून पुष्टीकरण करणे आणि मेळ पूर्ण करणे तसेच डेबीट नोट्स योग्य प्रकारे पाठविणे या बाबी प्रलंबित असल्याने कोळश्या कंपन्याच्या कार्यक्षमतेची प्रोत्साहन इनव्हॉईस / कोळसा कमी उचलणे या विषयी तरतूद केलेली नाही. कंपनीने कोळसा कंपन्यावर अपुरे वितरण कमी पतीचा कोळसा पुरविणे यासारखे काही प्रतिदावे देखील दाखल केले आहेत. हे विवादित दावे आणि प्रतिदावे असल्यामुळे या सर्वांचा परिणाम अनिश्चित आहे. हे लक्षात घेता, आम्ही कंपनीच्या आर्तिक विवरणावर प्रभावी परिणांमावर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.

ड) रेल्वे कंपन्याकडील शिलकीचे पुष्टीकरण करणे / मेळ करणे यांच्या अधीन आहेत. बहुतेक शिलकी मागील काही वर्षातील असमायोजित थकीत रकमांच्या आहेत. त्यांची ठळक माहिती खालील तक्त्यांमध्ये दिली आहे.

(रु. कोटीत)

पुरवठादारांची नावे	***महानिर्मितीच्या नुसार ३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक***
दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ३००००)	*६.८६ खर्च*
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे (खाते क्र. ३०००१)	*४३.६६ खर्च*
मध्य रेल्वे (खाते क्र. ४३०००)	*३१.१५ खर्च*
एकूण	***८१.६८ खर्च***

पुष्टीकरण करणे व मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्याने वित्तीय लेखावह्यात आवश्यक ती समायोजने करता आली नाहीत. यामुळे त्याचे कंपनीच्या वि. वि. पत्रकावर होऊ शकणाऱ्या प्रभावी परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

ई) व्यापारी येणी, कर्जे व अग्रीमे, ठेवी आणि वाणिज्यक देणी यांच्या शिलकी यांच्या संबंधितांकडून खातरजमा करणे आणि / किंवा त्याप्रमाणे मेळ करणे, यांच्या अधीन आहेत. अशी निश्चिती आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांची परिणाम स्वरुप समायोजने केलेली नाहीत. मात्र आम्हाला माहिती देण्यात आली आहे की कंपनीने तिच्या पुरवठादारांना पत्रे पाठवून शिलकी खातरजमा करण्यास सांगितले आहे आणि तशी उत्तरे मिळाल्यावर त्यांचा मेळ करणे चालू आहे. तसेच आम्हास असे सांगण्यात आले की मेळ करणे ही कंपनीत सतत चालणारी प्रक्रीया आहे. लेखा परिक्षणाचे योग्य व पुरेसे पुरावे नसल्याने आम्ही शिलकीवर आणि कंपनीच्या तोट्यावर काही परिणाम होणार असतील तर त्या परिणामांवर आम्ही मत देऊ शकत नाही.

महापारेषण या उपकंपनीच्या प्रकरणी

खालील बाबी या आमच्या सुधारित मताचा आधार आहेत -

१) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ५३(१३) याकडे लक्ष वेधण्यात येते. त्यात वि. वर्ष २०१५-१६ मधील इतर उत्पन्न या लेखाशीर्षा अतंर्गत ३१ मार्च २०२१ रोजीची विलंब भरणा आकाराची संचित रक्कम रु. ८५,४९९ लाख (१० वितरण परवानाधारकांच्या संदर्भात) असल्याची माहिती दिलेली आहे. या कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वर्ष २०१६ चा आदेश क्र. ३१ वर्ष २०१६ याचा संदर्भ दिला आहे. त्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कंपनीची वि. वर्ष २०१५-१६ या वर्षातील एकूण महसूल आवश्यकता उपरोक्त रकमेने कमी केली होती आणि त्याचे वर्गीकरण 'विना दराचे उत्पन्न' असे केले होते. अशा कंपनीकडे असे उत्पन्न (म्हणजे व्यापारी येणी) वसुली निश्चित करण्यासाठीचा तपशिल उपलब्ध नव्हता. अशा विलंब भरणा आकाराचे लेखे 'इतर उत्पन्न' या वर्षी २०१५-१६ मध्ये करण्याची कृती ही कंपनीने लेखा धोरणाचे तसेच लागू होणाऱ्या लेखा मानकांचे उल्लंघन करणारी आहे. टिपा क्र. (११) महसूल मान्यता महापारेषणच्या महत्त्वाच्या लेखा धोरणे यात सांगितले आहे कि इतर उत्पनाला उपर्जित तत्वावर मान्यता देण्यात आली, मात्र जर अशा उत्पन्नातील अंतिम वसुली अनिश्चित असेल तर त्याचा अपवाद करावा. जर कंपनीने मागील वर्षात अशा उत्पन्नाची रक्कम रु. ८५,४९९ लाख मान्य केली नसती तर नफा तोटा पत्रकातील ठेवून घेतलेली शिल्लक यातील शिल्लक आणि व्यापारी येण्याच्या लेख्यातील शिल्लक तेवढ्याने कमी झाली असती.

२) कंपनीच्या निर्धारित धोरणाचे पालन न केल्यामुळे काही कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाच्या दाव्याची जादा प्रतिपूर्ती केली आहे, ही बाब आम्ही कंपनी व्यवहार मंत्रायलयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१२) यातील तरतूदींनुसार, आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये आमच्या लेखा परिक्षणात नोंदलेल्या या चुकीच्या किंवा फसव्या व्यवहार कार्यपद्धतीचा अहवाल केंद्र शासन, सचिव, कंपनी व्यवहार मंत्रालयाकडे २४ एप्रिल २०२० रोजी गेला आहे. ही कृती कंपनीच्या धोरणाशी अनुसरण करणारी नाही. दाव्यांचे पैसे देणे, कर्मचारी सेवा पुस्तिकात जागा कोऱ्या राहणे या बाबतची नियंत्रणे योग्य नव्हती. अशा जादा दाव्याची अंदाजे रक्कम रु. एक कोटी पेक्षा जास्त असून केंद्र शासनास तसे कळविण्यात आले होते. जादा रक्कम उलट फिरविणे, पुनर्लेखन करणे/तरतूद करणे याचे परिणाम अद्याप निश्चित केलेले नाहीत.

३) रजा रोखीकरणाची मूल्यांकन करण्याची कंपनीतील पद्धत / प्रक्रिया ही विमागणिती शास्त्राच्या आधारे असून ती अधिक बळकट करण्याची गरज आहे कारण रजेची आणि उपदानाची माहिती प्रणाली मधून निर्माण केली जाते व ती विमागणिती तज्ञांना देण्यात येते. त्यात अचूकता नसल्याचे दिसते. त्यामुळे रजा रोखीकरण व उपदानाचे मूल्यांकन त्याच्या योग्यतेबद्दल आम्हास मत देता येत नाही किंवा त्याचे विमागणिती मूल्यांकनाच्या व रकमा यावर अभिप्राय देता येत नाही.

४) २०१९-२०२० या आर्थिक वर्षी दि. ०१ एप्रिल २०१८ पासून कंपनीने कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा केली. त्याला संचालक मंडळाने कार्योत्तर मंजूरी दिली. असे ठरले की तीन हफ्त्यात हे पैसे दयावेत. त्याप्रमाणे दोन हफ्ते दिले. अन्य ३१ मार्च २०२१ पर्यंत प्रलंबित होते म्हणून त्यासाठी रु. ६,८७४.५१/- लाखांची तरतूद केली. त्याचे तपशील पडताळणीसाठी उपलब्ध नव्हते. त्याचा आवश्यक माहिती तपशील नसल्याने या तरतूदीचे आधार, प्रमाण आणि परिपूर्णता तपासता आलेली नाही, त्यावर अभिप्राय देता येत नाही.

५) व्यापारी येण्याची संस्था/व्यक्तीनुसार विभाजन आणि त्याची आयूर्मान याची माहिती प्रणालीतून मिळत नाही. व्यापारी येणी किती वर्षापासूनची आहेत याची व्यक्तीशः - तयार केलेली माहिती मध्ये बऱ्याच चुका आहेत. म्हणून लेखापरिक्षणात त्याची पूर्णपणे पडताळणी करता येत नाही. त्यामुळे अपेक्षित पत हानीच्या सोप्या पध्दतीने केलेल्या तरतूदीवर आम्हाला मत मांडता येत नाही.

५.१) याशिवाय आपल्या लेखा परिक्षणात व्यापारी येण्याचे एकत्रित रक्कम रु. ३,०१,१३१.७९ लाख याचा तपशील / विभागणी/ खातरजमा /पडताळणी करण्यास उपलब्ध नव्हती. या व्यापारी येण्यांच्या वसुलीच्या खात्रीचे जर काही परिणाम होणार असतील तर तसेच कर्जे व त्यासाठी तरतूद याचा भा. ले. मानकानुसार केलेल्या वित्तीय विवरणपत्रकांनुसार होणाऱ्या परिणामांची निश्चिती करता येत नाही. प्रणालीत उपलब्ध माहितीतील निवडक परिक्षणाच्या आधारे आणि राज्य पारेषण केंद्र येथील देयके कक्षातून मिळालेल्या माहिती वरुन असे दिसते की बऱ्याच संस्थाकडून व्यापारी येण्याची एकूण रु. ४,३५०.४८/- लाख वसुली संशयास्पद आहे पण त्यासाठी तरतूद केलेली नाही.

६) भा. ले. मानके १०१ भा. ले. मानक अंगीकार करण्याचा प्रारंभ यातील तरतुदीप्रमाणे कंपनीने तिच्या मालमत्ता, कारखाने आणि साधने याच्या लेख्यांसाठी खर्च मॉडेल हा पर्याय निवडला. त्यानुसार मालमत्ता, कारखाने आणि साधने संक्रमण तारखेचे विद्यमान मूल्य तिच्या मालमत्तेची किंमत मानण्यात आली. त्यानंतर घसारा व्यक्तीगत हाताने केले. स्प्रेड शिट वर मांडण्यात आला. त्यासाठी मालमत्ता, कारखाने आणि साधने मधील बाकीचे उपयुक्त आयुष्य विचारात घेण्यात आले. पण त्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमनानुसार उर्वरीत मुल्य मर्यादा विचारात घेतल्या नाही. याशिवाय बऱ्याच प्रकरणात घसारा मानवी पद्धतीने जादा हिशेब करण्यात आला. आणि परिमंडळातील किंवा प्रदेशातील जागेवरील मत्तांसाठी मुख्यालयात देण्यात आला. या कारणामुळे भांडवलीकरणाच्या तारखा, महात्वाच्या सुट्या भागांचे भांडवलीकरण याची संपूर्ण माहिती विसंगत आहे. मालमत्ता, कारखाने आणि उपकरणांचे बरेच नग असून त्यांची संपूर्ण माहिती / तपशील उपलब्ध नाही. संयुक्त परिणामामुळे घसारा सदोष होऊन त्याची निश्चिती नाही.

वरील सर्वसामान्य बाबी नुसार पूर्वग्रह न ठेवता लेखा परिक्षणा दरम्यान मत्ता नोंद वहीतील उपलब्ध छाननीच्या आधारे खालील विसंगती आढळल्या. ज्यांचे उपयुक्त आयुष्य पूर्णपणे संपले आहे अशा स्थिर मत्तांमधील बऱ्याच बाबींचे मूल्य रु. २९,२४०.२२/- लाख (ठोक वहीतील मुल्य) संचित घसारा रु. २१,८२८.३१/- लाख आणि निव्वळ वहीनोंद मूल्य रु. ७,४११.९१/- लाख या बाकी नोंदवहीचा भाग आहे. त्यामुळे त्या मर्यादेत मालमत्ता, कारखाने आणि साधने यांचे जादा विवरण झाले आहे.

६.१) तसेच मालमत्ता, कारखाने आणि साधने या लेखाशीर्षांत स्थगित कर दायित्वे रु. ६,८३७.२४ लाख मान्य केली आहेत. परंतु त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण लेखा परिक्षणाच्या वेळी मिळाले नव्हते.

६.२) ज्या बाबी / घटक यांच्यामुळे स्थगित कर मत्ता / दायित्त्वे यात वाढ होते, त्यांचे पुरेसे तपशील जतन केलेले नाहीत. ते नसल्याने स्थगित कर मत्ता / दायित्त्वे यांच्या मान्यता आणि प्रकटने पूर्ण आणि निर्दोषरित्या पूर्ण होत नाहीत. त्याच्या या वर्षीच्या नफा तोटा पत्रकांवरील प्रभाव निश्चित करता येत नाही.

७) स्वमालकीची जमीनीच्या उपलब्ध तपशीलाच्या छाननीनुसार असे दिसले की, भूतकाळात भाडेपट्टीच्या जमिनीचे समूहीकरण(एकत्रीकरण) करून त्या स्वमालकीची जमीनीच्या लेखाशीर्षात दाखविण्यात आल्या. त्यामुळे या जमिनीच्या कर्ज फेडीची तरतूद करण्यात आली नाही. अशा प्रकारांची माहिती / तपशील उपलब्ध नसल्याने त्याच्या भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि. पत्रकावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.

८) आमच्या लेखा परिक्षणात असे आढळले की, ६६ के. व्ही. उपकेंद्रे / पारेषणाच्या तारा याचे ठोक पुस्तकी मूल्य रु. १७,८४६.०८ लाख आहे आणि संचित घसारा दि. ३१ मार्च २०२० रोजी रु. १२,२६०.४७ लाख आहे. मात्र त्याचा कंपनीच्या कामकाजात उपयोग थांबला आहे. त्या कमी करण्यासाठीची कृती प्रलंबित आहे. यामुळे या मत्तांची लेखा वह्यात नोंदलेल्या विद्यमान मूल्यावर आम्हाला अभिप्राय देता येत नाही.

९) असे निरिक्षण आहे की, कंपनीच्या सॅप निर्मित अहवालात (कॅपेक्स रिपोर्ट - ४. ४) काही योजनांचा नकारात्मक भांडवली खर्च आकारला आहे. ही रक्कम रु. ४, २९९.९९ लाख असून त्याविषयी मान्य होणारे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे ताळेबंदामध्ये बांधकाम चालू असलेल्या मत्ता प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे कमी विवरण झाले तसेच काही बांधकाम चालू असलेल्या मत्तामध्ये गेल्या तीन वर्षात हालचाल नाही, त्या कमी करण्यासाठी लक्षणे शोधलेली नाहीत. त्यासाठी तरतूद नाही. त्यामुळे एकत्रित वि. वि. पत्रकावर त्याचे परिणामावर मत देता येत नाही.

१०) दि. ०१ एप्रिल २०१९ पासून भा. लेखा. मानक ११६ 'भाडेपट्टी' हे कंपनीने अंमलात आणले. कंपनीने या धोरणाचा स्वीकार सुधारित दृष्टीकोनासह केला आहे. त्यानुसार मत्ता या वापरण्याचा हक्क अशा प्रकारे मान्य केल्या आहेत. (भाड्याच्या मत्ता या ऐवजी वापरण्याच्या हक्कासह भाडेपट्टी मत्ता असे अभिप्रेत आहे). तसेच या भाडेपट्टीचे पैसे भविष्यात देताना विद्यमान मूल्य दायित्व समाविष्ट केले आहे. मात्र भाडेपट्टी संबंधीची कागदपत्रे आणि भाड्याच्या मालमत्तेचे अन्य दस्तऐवज उपलब्ध नसल्याने ज्या भाड्याच्या जागेत वापरण्याचा हक्क समाविष्ट आहे, अशांची ओळख निश्चिती करणे व त्यांना मान्यता देणे कंपनीला शक्य नाही. म्हणून भा. ले. मानक ११६ च्या तरतुदी नुसार अशा भाडेपट्टीच्या मत्तांवर कृती करता आलेली नाही. त्यामुळे त्याचा भा. ले. मानकानुसार एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणारे परिणाम निश्चित नाहीत.

११) वस्तुमाल साठ्याच्या मूल्यांकनाची सूची बाबत कंपनीचे धोरण (महापारेषणच्या महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील वस्तूमालसूची बाबतची टिपा क्र. (६)) म्हणते की अशा सूचीतील वस्तुमालाचे मुल्यांकन कमी केलेल्या किंमती नुसार किंवा वसुलीयोग्य मूल्य या प्रमाणे करावे. परंतु आमच्या लेखापरिक्षणात असे आढळले की, कंपनीकडे वसुली योग्य मूल्याची कुठलीही माहिती किंवा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे वस्तूमाल सूची मध्ये मुल्यांकन मूळ किंमत या प्रमाणे केले आहे. अशा पद्धतीचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर होणाऱ्या प्रभावाची खात्री करता येत नाही.

११.१) कंपनीने विक्रेते / बाहयस्त्रोत संस्थांना कर्जाच्या आधारावर दिलेली सामग्री / उपकरणे यांच्याशी संबंधित धोरण आणि कार्यपध्दती निश्चित केलेली नाही. अशा वस्तूंचे तपशील कंपनीच्या सातही विभागांकडून मागवण्यात आले होते. ते फक्त दोन झोनमधून प्राप्त झाले होते, जेथे असे आढळून आले की कर्जावर दिलेली सामग्री / उपकरणे वाजवी कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी विक्रेते / बाहयस्त्रोतांकडे राहिली. अशा बाबींचे संपूर्ण तपशील आणि देखरेखीचा अभाव असल्याने आम्ही एकत्रित वित्तीय विवरणावरील त्यांच्या प्रभावावर मत मांडू शकत नाही.

११.२) पुढे निरिक्षणानुसार ट्रान्सफॉर्मर विभागीय कार्यालयांद्वारे पुरवठादारांकडे दुरुस्तीसाठी पाठवले जातात. ट्रान्सफॉर्मर दुरूस्तीसाठी पाठविणे, दुरूस्तीनंतर परत येणे, या दुरूस्तीची गुणवत्ता याबाबतची माहिती व्यवस्थितपणे राखली जात नाही. सर्व झोनमधील ट्रान्सफॉर्मरशी संबंधित अशा आवश्यक माहितीच्या अभावामुळे आम्ही एकत्रित वि. वि. पत्रकावरील त्यांच्या परिणामावर मत देऊ शकत नाही.

१२)वापरात नसलेल्या मत्ता विक्रीसाठी धारणा (जी एल कोड २२२०१०) यासाठी वस्तूमाल सूचीतील माहिती / तपशील /

वर्ग पडताळणीसाठी उपलब्ध नव्हते. त्याची रक्कम रु. ३,५५३.२० लाख होते. या शिवाय असा मत्तांची धारणा त्यांच्या संचय मूल्यानुसार केली जाते. विद्यमान मूल्यापेक्षा कमी किंवा वसूली योग्य मूल्याऐवजी अशा मत्ता विद्यमान मूल्याने धारण केल्या आहेत. जर याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर काही परिणाम होणार असल्यास त्याची निश्चिती देता येत नाही.

१३) वि. वर्ष २००६-०७ मधे विशिष्ट प्रकल्पासाठी भांडवली मत्तासाठी शासकीय अनुदाने रु. २३,८५० लाख इतक्या रकमेची मिळाली होती. त्यापैकी रु. १५,४६०.६७ लाख या रकमेला महसूल म्हणून मान्यता देण्यापासून दि. ३१ मार्च २०२१ रोजी स्थगित ठेवले होते. या अनुदानाचा व त्याच्या विनिर्देशित मत्तांचा आणि त्या विषयीच्या अटी, स्थिती यांचा तपशील आम्हाला पडताळणीसाठी उपलब्ध नव्हता. म्हणून भा. ले. मानक २० व्या तरतुदीतील अटीप्रमाणे लेख्यासंबंधीचा अचूकता पूर्णत - यावर अभिप्राय देता येत नाही.

१४) सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ यानुसार नोंदणी केलेल्या पुरवठादार याच्या थकीतांचा तपशील कंपनीमध्ये गोळा व जतन करुन सादर केला जात नाही. म्हणून त्याच्या थकबाकीच्या व्याजाच्या तरतूदीची अचूकता तपासण्यात आली नाही.

१५) टिपा क्र. ५२ (१८) मधे कंपनीने मागील काळातील उत्पन्न व खर्च प्रकट केले आहेत. परंतु भा. ले. मानक ठलेखा धोरणे, लेखा अंदाजातील बदल व चुका' अंतर्गत बंधनकारक आवश्यकता नुसार त्याचे संबंधीत मागील वर्षात पुन्हा नमूद केले गेले / पुन्हा केले गेले नाहीत.

१६) केंद्रिय वीज नियामक आयोग यांच्या दि. १९ डिसेंबर २०१७ रोजीच्या आदेश आणि वि. वि. वर्ष २०१४-१५ याला लागू असणाऱ्या आदेशानुसार कंपनीने त्यावर्षी मिळालेल्या एकूण रु. १०,७८९.४१ लाख या रकमेपैकी रु. ५९९ लाख एवढ्या रकमेला उत्पन्न म्हणून मान्यता दिली. त्यात मागील वित्तीय वर्षापर्यंत पूर्णपणे उपार्जित उत्पन्न म्हणून मानले गेले होते. या आदेशाचा परिणाम मागील काळात लेख्यामध्ये देणे शिल्लक आहे. यामुळे नफा व तोटा पत्रकात आधिक्य कमी होईल आणि ग्राहका कडील अग्रिमे या रकमेने जास्त होईल. त्याचे परिणाम अनिश्चित असतील.

१७) ग्राहकांच्या आऊटराईट करारानुसार अनामतीची रक्कम ३१ मार्च २०२१ रोजीची रु. १,१३,६३९.५७ लाख होती. कंपनी या अनामती मिळाल्यावर त्यावरच्या पर्यवेक्षण आकाराला ठेवी प्राप्त झाल्यावर उत्पन्न म्हणून मान्यता देते. पर्यवेक्षण सेवा जेव्हा जेव्हा पुरविली जाते तेव्हा या पर्यवेक्षण शुल्कास मान्यता दिली जात नाही. मात्र अशी कृती भा. ले. मानक ११५ ठग्राहकांसोबतच्या करारापासूनचा महसूल ठ यातील तरतुदीच्या विरुद्ध आहे.

१७.१) महापारेषणच्या एकत्रित वि. वि. पत्रकातील लेखा धोरणांची टिपा क्र. (१०) (शासकीय अनुदान) याकडे लक्ष वेधण्यात येते. यात आऊट राईट वर्क्स (ओआरसी योजना) साठी ग्राहकांकडून प्राप्त अंशदानाचे लेखा यावर माहिती आहे. आमच्या लेखा परिक्षणाच्या काळात आम्हाला सांगण्यात आले कि ओ आर सी मत्ता / दायित्त्वे आणि त्यावरील उत्पन्न याबाबत कंपनीचे विशिष्ट धोरण आहे. परंतु कंपनीने त्याचे सातत्याने अनुसरण केल्याचे आढळले नाही. त्याविषयी आवश्यक माहिती / तपशील नसल्याने त्याचा प्रभाव निश्चित करता येत नाही.

१८) अहवाल वर्षात मान्यता दिलेल्या खालील उत्पन्नाच्या बाबी विषयी माहिती/ तपशील नसल्याने त्याचा आधार, प्रमाणे आणि परिपूर्णता याविषयी निश्चितता नाही.

जी एल कोड	लेखा शीर्षाचे नाव	समाविष्ट रक्कम (रु. लाखात)
३०००४०	अल्पकालीन ओपन एक्सेसच्या शुल्काबाबतच्या सामंजस्य करारामुळे प्राप्त होणारे उत्पन्न	५१८.२९
३०००५१	ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ अर्ज शुल्क / फक्त राज्य भार प्रेषण केंद्रासाठी)	२७.४९
३०००७०	पुर्ननियोजन शुल्क	३४२.८३
३१००१०	कर्मचारी कर्ज व अग्रिमे यापासूनचे व्याज	१०.९४
३१००२०	बँक ठेवीतील गुंतवणुकीपासूनचे व्याज	१९२१.५४

३२५०१०	कर्मचारी निवासस्थानाचे भाडे	३७.१७
३३००१०	भंगार विक्री (भंगारासाठी कोणतीही किंमत निश्चित केलेली नाही)	९४२.६१
३३५०१०	स्थिर मालमत्तेच्या विक्रीवरील नफा	६६२.६२
३८००४०	इतर संकीर्ण प्राप्ती(जी एस टी कर आकारणी योग्य)	१३६३.६१
३८००४१	इतर संकीर्ण प्राप्ती(जी एस टी कर व्यतिरिक्त)	२९१.२२
३८००६०	कंत्राटदाराकडील नुकसानीची वसुली	२८७२.७
३८०१२०	शासकीय अनुदान उत्पन्न	११६९.७६
३८०१५१	पूर्वीचा कालावधी – इतर उत्पन्न (जी एस टी सह)	१८६.७
३८०१४१	अंशत - ओपन अक्सेस सेवा घेणाऱ्या ग्राहकाकडून वितरण शुल्क म्हणून जमा केलेली रक्कम	५१६५.२४
३८०१४३	मुक्त प्रवेश/नाहरकत अर्ज प्रक्रिया शुल्क	१९५.३८
३०००८०	अतिरिक्त प्रेषण आणि नियामकांकडून महसूल	-४,५५७.८६
३७००१०	अल्पकालीन मुक्त प्रवेश शुल्क	११४६.८८
३०००२१	पॉवरग्रीड पारेषण शुल्कातून महसूल	२६५७.२४
३०००१०	एसटीयू पूल या खात्यातून पारेषण शुल्क म्हणून प्राप्त महसूल	१,५२२.९२

१९) एकत्रित वि. वि. पत्रकांच्या आकस्मित दायित्वे आणि आकस्मित मत्ता यांच्या माहितीची टिपा ४२(क) कडे लक्ष वेधण्यात येते. सांविधिक गरजाप्रमाणे दावे करा संबंधी मागणीचे पूर्ण तपशील अचूकपणे जतन केलेला नाही. म्हणून लेखा परिक्षणाच्या अवधीत त्याची पूर्ण पडताळणी करता आलेली नाही. आम्हाला उपलब्ध केलेल्या तपशिलावर आधारित तरतूदीच्या पर्याप्तेवर आम्ही भाष्य करण्यास अक्षम आहोत.

२०) महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड नावाच्या एका सहयोगी कंपनीमध्ये 'कंपनी'ची गुंतवणूक रु. १,७६०.९२ लाखांची असून त्या सहयोगीची सतत होणारा तोटा लक्षात घेता या कंपनीच्या हानीबाबत योग्यरित्या चाचणी केली गेली नाही.

२१) कंपनी कायद्याच्या कलम १३५ नुसार आणि या अंतर्गत बनविलेल्या नियमांनुसार कंपनीने कार्पोरेट सामाजिक दायित्वाचे (सीएसआर) वहन अधिक प्रभावीपणे करण्याची गरज आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत रु. १,३३५.०० लाख खर्च करणे अपेक्षित असताना केवळ ७००.१४ लाख खर्च करण्यात आले. अखर्चित उर्वरित रक्कम सीएसआरअंतर्गत आवश्यक असलेल्या विशिष्ट खात्यात खूप उशीराने हस्तांतरित करण्यात आले.

२२) खालील जीएल हेड्स/कोड्स यातील नमूद केलेल्या आणि मान्यता दिलेल्या रकमा(वैधानिक देय खात्यांव्यतिरिक्त १ लाख रुपयांपेक्षा जास्त) यांचे पुष्टीकरण करणे आणि मेळ करण्याच्या अधीन आहेत. खालील बाबींची आवश्यक माहिती / तपशील आमच्या लेखा परिक्षणाच्या पडताळणीसाठी उपलब्ध नव्हता.

जी एल कोड	**लेखा शीर्षाचे नाव**	**२०२० -२०२१ रक्कम (रु. लाखात) मत्ता/खर्च (दायित्व/उत्पन्न)**
१०००५०	भांडवली मत्तांच्या खर्चासाठी अनुदाने	-१५,४६०.६७
१०००५४	महानिर्मितीला अनुदान	-६१७.४८
१०१०७०	एलडीसीडी निधीसाठी राखीव	-६,९४१.५६

१२२०१०	स्थगित कर दायित्व	-२,५९,४९९.३६
१२३०३०	सुरक्षा अनामती	-६,५२७.५५
१२३०४०	जॉब्स/कामे यांच्या सुरक्षा अनामती	-११,१२८.७२
१२३०५०	विक्रेत्याकडून बयाणा ठेव	-१,१३०.२४
१२३०६०	पुरवठादारांची राखून ठेवलेली रक्कम	-७७,७२०.३४
१२३०६१	जोखीम आणि खर्च समायोजन	-३,२८५.६४
१२३०७०	पुरवठादाराकडून संकीर्ण ठेवी	-२१.२०
१२३०९०	ग्राहकांकडून अग्रिमे	-९७.९२
१२३१००	ग्राहकांकडून इतर अनामती - ओ.आर.सी.अनामती	-१,१३,६३९.५७
१२३११०	विक्रेत्याकडून रोकडता आकारासाठी ठेवून घेतलेली जी. एल.	-१२,९४५.७८
१३००१०	जी आर/आयआर क्लिअरिंग अकाऊंट	-५,९२३.५२
१३००२०	इ एम डी डमी एंट्री	-११७.१६
१३१०१०	किरकोळ पतदारांना देय - घरगुती(एस एम इ व्यतिरिक्त)	-२३,२०८.९०
१३३०१०	किरकोळ पतदार – आंतर कंपनी	-४,१२१.१९
१३४०१०	किरकोळ पतदार – कर्मचारी	-३६.८१
१४००६०	कर्मचाऱ्यांकडून संकीर्ण ठेवी	-३५.८९
१४०१७०	क्रेडिट सोसायटी	-३३.९८
१४०२५०	मेडीक्लेम टॉप अप प्रिमियम	-७.५७
१४०२५१	मेडीक्लेम सक्तीचा हप्ता – वेतनातून	२.१३
१४०२५२	कर्मचारी अपघात विमा	१.४८
१४०२७०	मेडीक्लेम प्रिमियम - निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी	-०.२०
१४१०४०	मराविम - भ.नि.नि. - नियोजन मत्तांच्या रास्त मूल्यातील तूट	-३,५९३.९२
१४२०१०	आयकरासाठी तरतूद	-३,१६,४३१.०३
१४३०३०	टीडीएस कंत्राटदारांना देय १९४ सी	-४७.९८
१४३०३१	ओएसएल तरतूदीवर देय टीडीएस	-२६.४७
१४४०१०	राज्य विक्री कर देय	०.०६
१४६०१०	कामगार उपकरातील कपात	-२४.४५
१५००१०	भांडवली कामासाठी तरतूद	-११,९३९.८६
१५००११	जीआर/आयआरच्या टीडीएससाठी तरतूद	०.८१
१५००३०	खर्चासाठी तरतूद – इतर	-१,६४४.१६
१५००४०	खर्चासाठी तरतूद – कर्मचारी	-३,८९३.०३
१५००५०	वेतन सुधारणेसाठी तरतूद	-६,८४७.५१

१५००७०	चौकशी प्रलंबित असलेल्या नुकसानीची तरतूद	-७२२.६५
१५०११०	कंपनीची सामाजिक जबाबदारी यासाठी तरतूद	-८,१३८.०१
१५०१३०	सेवा विलंबाच्या व्याजासाठी तरतूद	-२६४.४३
१५०१४०	वृक्ष/पीके/जमीन यांच्या नुकसान भरपाईसाठी तरतूद	-१,६२६.५४
१६००१०	मंडळासह कर्मचारी कल्याण निधीचे दायित्व	-६१४.०१
१६००२०	भ.नि.निधीचे विश्वस्तमंडळ आणि अंतिम समझोते	-२,३६१.८३
१६००३०	मराविमं कर्मचारी वारस कल्याण ट्रस्ट खाते	-६.४९
१६५०१०	जुने - धनादेश	-३१९.०३
१७००१०	त्रयस्थ पक्ष देण्यांसाठी दायित्व	-२०,११६.००
२०५०३०	सबस्टेशन – व्होल्ट ई १०० के व्ही(१०० के व्ही)	३३,४४०.२२
२०९६७०	एसएलडीसी हॉर्डवेअर	४२४.६७
२०९६८०	एसएलीडीसी टेलिकॉम उपकरणं	५१.२५
२०९६९०	एसएलीडीसी सुटे भाग	४४.७५
२१९७०१	ए सी सी घसारा वापरात नसलेल्या	-१०,९१३.७०
२२२०१०	मत्ता - वापरात नसलेल्या	१४,४६६.९०
२२३०३०	मंजुरी नसलेल्या सर्वेक्षण/अभ्यास यांच्यासाठी खर्चाची तरतूद	२९६.२५
२२३०४०	मंजुरी नसलेल्या योजनांच्या कार्यपूर्व जमिनी संपादनाचा खर्च	४९६.२९
२३००५०	भाड्याच्या जमिनीच्या विकास एयुसी खर्च व व्होल्ट जी १	२७१.५८
२३००६०	एयुसी भाड्याच्या जमिनीच्या विकास खर्च व व्होल्ट एच २	२४२.९६
२३२०१०	एयुसी इतर इमारती कार्यालये, निवास, प्रशिक्षण केंद्रे	८९१.४१
२३७०१०	एयुसी इतर	२४,०९७.४८
२३७०२०	एयुसी एल ई	५,५८०.४५
२३७०३०	एयुसी ओ र सी	८,२०६.९९
२३७०४०	एयुसी सॉफ्टवेअऱ विकास	३२६.०५
२३७०६०	प्रगतीपथावरील भांडवली कामे(शासकीय अनुदानाचे परिणाम)	२,३१८.८७
२३७०६१	प्रगतीपथावरील भांडवली कामे(वस्तू मालाचे परिणाम)	३,४९५.६१
२४०१००	बँकेत मुदत ठेव	४०,११२.११
२४०३००	एफडीआर एलडीसीडी फंडस - बँक	५,२६५.१५
२५००४०	मीटर आणि सबस्टेशन साहित्य	७,९५९.५८
२५००९०	इतर	१,९५२.४७
२५०११०	पीपीईसाठी वस्तूमालसूची(भा.ले. प्रभाव)	-२,८९०.९४

२५०१११	प्रगतीपथावरील भांडवली कामांची वस्तूमालसूची (भा.ले.मा. समायोजन)	-३,४९५.६१
२५५०१०	चौकशी प्रलंबित असलेले साहित्य	०.४७
२५५०२०	चौकशी प्रलंबित असल्याने साहित्याचे नुकसान	२००.११
२५५०४०	एम. ए. एस. ए.स्टॉक(वस्तूमालाची प्रत्यक्ष पडताळणी)	-११४.३४
२५६०१०	निकामी साहित्याचा साठा(भंगारासह)	५२२.०७
२६००१०	एस टी यु किरकोळ ऋणको -पारेषण शुल्क	३.५१
२६००११	किरकोळ ऋणको – पारेषण आकार	२,०३,२५७.८२
२६००३१	किरकोळ ऋणको -एसटीयू/ एसएल डीसी	५०८.५४
२६००४०	एस टी यु किरकोळ ऋणको इतर	९१,०४७.६७
२६००५०	टीडीएस येणी प्रमाणपत्र	१०.०८
२६००६०	किरकोळ ऋणको आंतर युनिट लेखे	२,०७७.९०
२६००८०	टीडीएस येणी - एमटीसी	२०,४८६.१५
२८५०३९	वितरण मुंबई ८०० ऐरोली नवी मुंबई - एसएलडीसी कळवा	२४.३६
२८५२५१	बँक ऑफ इंडिया एलडीसीडी फंड ऑपरेशन	०.१८
२८५३१०	त्रयस्थ संस्थांच्या दायित्व देण्यासाठी चालू खाते	२०,११६.००
२९००१०	कंत्राटदार/पुरवठादार - यांना अग्रिमे ओ अँड एम	१,७४४.७६
२९००२०	प्रकल्पाची भांडवली अग्रिमे	५४१.२९
२९२०५०	कर्मचाऱ्यांना कर्जे व अग्रिमे -संगणक अग्रिमे	११०.६९
२९२०६०	आंतरराष्ट्रीय मोफत प्रवासासाठी भत्ता - कर्मचाऱ्यांना कर्जे व अग्रिम	९.००
२९२१२०	कर्मचाऱ्यांना उपदानाचा अग्रिम	७.७९
२९३०१०	आयकर अग्रिम	२,२२,८५२.७३
२९३०११	टीडीएस प्राप्त प्रमाणपत्र	१६०.०९
२९३०१३	टिडीएस देय २०६सी(१एच)	-०.२३
२९३०१४	टीडीएस देय १९४०	४.९९
२९३०४०	स्त्रोतांवर आयकर कपात - इतर पावती	६२,८६५.४६
२९३०५०	संकीर्ण कर्ज आणि अग्रीमे	६.५०
२९३०६०	स्वय निर्धारित कर - आयकर	२५,१०८.३६
२९४०१०	गुंतवणुक निधीवर उपार्जित व देय उत्पन्न	३४५.४९
२९४०३०	कर्मचारी कर्जाचे उपार्जित पण देय नसलेले व्याज इ.	३१.९१
२९५०१०	कर्मचाऱ्यांकडील वसुली योग्य रक्कम	६३.६४
२९५०३०	आय टी आयला दिलेले प्रशिक्षण शूल्क – वसुली योग्य	-५.९०

२९६०३०	राज्य वीज मंडळ, शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांच्याकडून प्राप्त संकीर्ण रकमा	३९९.६६
२९६०५०	पुरवठादारांकडील अपेक्षित वसुली	११३.५३
२९६०६०	कंत्राटदारकडील अपेक्षित वसुली	१५४.३४
२९६०६१	संशयास्पद कर्जे व अग्रिमे यासाठी तरतूदी	११,६१३.५९
२९६०७०	प्रीपेड खर्च	४८८.२४
२९७०१०	दुरध्वनी प्राधिकरणांकडे ठेव	१९.७८
२९७०२०	इतर जमा	५,५३६.०५
४०००१०	दुरुस्ती आणि देखभाल(सर्व पारेषण)	३३,२४०.५५
४०००५०	साहित्य वापर - प्रकल्प	-१९,८३९.४६
४१००५०	बोनस/अंशदान	१,१५८.४२
४२४०१०	महापारेषणचे योगदान – कर्मचारी भविष्य निधिसाठी	७,९९९.५४
४३००३०	दर आणि कर	१,४९५.५६
४३०१००	माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार विषयक खर्च	६७५.०१
४३०१५२	शिकाऊ उमेदवारांचे वेतन	२५७.५१
४४६०१०	किरकोळ डेबिट निर्लेखित शिल्लक	९.२८
४५३०१०	निर्लेखित अमूर्त मत्ता	१९२.६६
४७४०१०	आयकर तरतूद	४९,२०४.६५
४७४०३०	स्थगित कर तरतूद	१२,२७२.६०
४७४०३१	इतर सर्वंकष उत्पन्नावरील आयकर	१०८.५९

वरील लेखाशीर्षात राहिलेल्या जुन्या थकीत शिलकी संबंधी मेळ, समायोजना आणि समझोते केले आणि त्यातून प्राप्ती व बाकी वसुली न झाल्यामुळे किंवा अपुरी झाल्यामुळे किंवा निर्लेखित केल्यामुळे काही लाभ / तोटे झाले तर त्यांची निश्चिती करता येत नाही. या शिवाय चालू किंवा चालू नसलेले लेखाशीर्ष अंतर्गत आवश्यक मत्ता / दायित्त्व यांचे विभाजन यांची आवश्यक माहिती / तपशील नसल्यामुळे अचूक पडताळणी करता येत नाही.

महावितरण या उपकंपनी विषयी

आम्ही येथे खालील परिच्छेद १ ते १२ मध्ये वर्णन केलेल्या बाबींकडे लक्ष वेधतो. या बाबींचे (सांख्यिकीकरण केलेल्या किंवा अन्य) स्वतंत्र किंवा सामुहिकरीत्या वि.वि. पत्रकावर होणा -या परिणामांची काही प्रकरणात ओळख निश्चित झालेली नाही. कारण योग्य व पुरेसे लेखापरीक्षण पुरावे नव्हते.

१. मालमत्ता, कारखाने आणि साधने - घसारा आणि कमी करणे

अ) एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा ५४(४) यात नमूद केले आहे कि, उपरोक्त मालमत्ता कारखाने आणि साधने भांडवलीकरण आणि काम पूर्ण केल्याचे अहवाल यांच्या तारखेसंबंधीची सर्वकष माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे यातील भांडवलीकरण न होणे आणि / किंवा विलंबाने करणे अशा काही घटना घडल्या (हे भा. ले. मानक १६ च्या आवश्यकते नुसार) त्यामुळे भांडवलीकरण न होणे / विलंब होणे आणि त्यामुळे घसारा व त्याचे परिणाम यांचे सांखिकिकरण उपलब्ध नव्हते. म्हणून लेखापरिक्षण वर्षामध्ये त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणारे परिणामाचे सांख्यिकीकरण केलेले नाही.

ब) या वर्षात सूत्रधारी कंपनीने कर्ज खर्च रु. १०९७.४५ लाख (२०१९-२० ला रु. २३९.०७ लाख, २०१८-१९ ला रु. ७५५.६३ लाख) एवढ्या रकमेचे मालमत्ता, कारखाने व साधने यांचे भांडवलीकरण केले. भांडवलीकरण करताना पात्र मत्तांची ओळख निश्चिती केली नाही. सर्वसाधारण आणि विशिष्ट कर्ज यांच्या व्याजाचे वितरण ज्या प्रकल्पांत खंड झाला त्यांचा व प्रगती पथावरील भांडवली कार्य (सीडब्लूआयपी) यांच्या आरंभीच्या खर्चाचा विचार केला नाही. तसेच एकूण प्रकल्प खर्चाचा ठोक तत्वावर विचार केला त्यातून शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अंशदान वजा केले नाही.

याशिवाय, सूत्रधारी कंपनीने कर्मचारी खर्च आणि कार्यालयीन खर्च रु. ३९,३७४.१९ लाख (२०१९-२०२० रोजी रु. ४३,१५८.७४ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. ४८,३०९.१२ लाख) टिपा क्र. ३५ आणि ३७) वरील खर्च प्रगतीपथावरील भांडवली खर्चाच्या वर १५ टक्के आहे. (मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या लेखा धोरणे यांची टिपा (फ) (१) (८) पहावी) मात्र सुत्रधारी कंपनीत या खर्चाची ओळख स्पष्टपणे निश्चित करण्याचे आणि त्याची भांडवली प्रगती पथावरील काम / मालमत्ता, कारखाने आणि साधने मधे भर घालण्याची पद्धती नाही. अशा खर्चाचे भांडवलीकरण करताना व्यत्यय आलेले प्रकल्प, भांडवली प्रगती पथावरील कामे यांची आरंभीची शिल्लक तसेच ठोक तत्वावरील प्रकल्प खर्चातील शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अनुदाने वजा केलेले नाही.

कर्ज खर्चाबाबत भाले मानके २३ आणि मालमत्ता, कारखाने व साधने यांच्याबाबतचे भालेमानके १६ हे एकत्रितरीत्या लक्षात घेऊन विचार केल्यास अशा प्रकारचे व्याज,कर्मचारी खर्च,आणि कार्यालयाचे व प्रशासन खर्च यांचे भांडवलीकरण हे या मानकांच्या आवश्यकतेनुसार झालेले नाही. ह्याबाबत पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षणाचे पुरावे उपलब्ध नसल्याने उपरोक्त भांडवलीकरणाच्या रकमांच्या अचूकते विषयी आम्हाला अभिप्राय देता येत नाही.

तसेच मागील सर्व वर्षापासून याच पद्धतीने कर्मचारी खर्च, कार्यालय खर्च आणि कर्ज खर्च यांचे भांडवलीकरण केले आहे. यामुळे स्थिर मत्तांचे भांडवलीकरणाच्या रकमांच्या प्रमाणात जादा विवरण झाले आहे, तसेच अधिक घसारा आकारण्यात आला. याच्या परिणामांचा अंदाज व सांख्यिकीकरण करता येत नाही.

क) व्यवस्थापनाने सूत्रधारी कंपनीची मालमत्ता, कारखाने व साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी या पडताळणीचे जर काही संभाव्य परिणाम एकत्रित वि. वि. पत्रकात होणार असतील तर त्याचा अंदाज करता येत नाही.

ड) प्रगतीपथावरील भांडवली कामे यात प्रकल्पातील वस्तूमाल साठ्याची रक्कम रु. ३,११,३०५.१८ लाख (२०१९-२०२० रोजी रु. ३,३३,२१५.३९ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. १७९,७९४.८९ लाख) समाविष्ट आहे. यावर्षी यात किती स्थानांतर झाले आणि ३१ मार्च २०२१ रोजीची विविध प्रकल्पाची स्थिती यांचे तपशील उपलब्ध केले नाहीत. ते नसल्याने त्यांचे एकत्रित वि. वि. पत्रकांवरील संभाव्य परिणामावर मत देता येत नाही.

इ) टिपा क्र. ५२(९) यात निर्धारित केल्याप्रमाणे, सूत्रधारी कंपनीने तिच्या मत्तांचा आढावा त्यांच्या आर्थिक कामगिरी नुसार केलेला आहे. मात्र त्या मत्ता कमी केलेल्या असल्या तर किंवा त्यांचे कामाचे खात्रीशिर तपशीलवार मूल्यांकन / गणना उपलब्ध नव्हते असे मुल्यांकन/ कामाचा अहवाल नसल्याने जर काही या मत्ता कमी करण्याचे परिणाम झाले असले तर भा. ले. मानके ३६ मालमत्ता कमी करणे यातील आवश्यकतांवर आम्ही मत प्रदर्शन करु शकत नाही.

२. भाडेपट्टी -

अ) टिपा क्र. ४३ (ड) (२) यात सांगितल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीने भाडेपट्टी मत्ता (मत्ता वापराचा अधिकार) आणि भाडेपट्टी दायित्वाला मान्यता देताना भाड्याचे देणे रु. १०.०० लाखापेक्षा प्रतिमाह रक्कमेचे भाडे विचारात घेतले नाही. ही कृती भा. ले. मानक ११६ भाडेपट्टी यात विनिर्देशित केलेल्या मान्यतेच्या निकषांशी सुसंगत नाही. याशिवाय संपूर्ण तपशिल नसल्याने, त्याचे एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

ब) पुरेसे आवश्यक तपशील उपलब्ध नसल्याने भा. ले. मानक ११६ च्या गरजांप्रमाणे प्रकटने केलेली नाहीत.

३. कारखान्यातील वस्तूमाल साठ्याव्यतिरिक्त वस्तूमालसाठा

सूत्रधारी कंपनीने विविध ठिकाणी वस्तूमालसाठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केली आहे. सूत्रधारी कंपनीने स्लो मूव्हिंग / नॉन -मूव्हिंग स्टॉक / अप्रचलित साठ्यासाठी प्रत्यक्ष पडताळणी अहवालावर आधारित रु. ४,९२६.३१ लाख ची तरतूद केली आहे. (आर्थिक वर्ष २०१९-२० रु. २,४४४.७९ लाख, आर्थिक वर्ष २०१८-१९ रु. २५९०.२२ लाख) स्लो मूव्हिंग

/ नॉन-मूव्हिंग / अप्रचलित साठ्याच्या तपशीलावर माहितीचा आणि व्यवस्थेच्या वयोमानाच्या अहवालाशी योग्य प्रकारे मेळ घातला नसल्याने आर्थिक तरतुदीच्या पर्याप्ततेवर आम्ही भाष्य करण्यास अक्षम आहोत.

४. व्यापारी येण्यातील अपेक्षित पत हानी

टिपा क्र. ५४(५)(२)(१)(अ) यात नमुद केल्या प्रमाणे सूत्रधारी कंपनीने भा. ले. मानक १०९ वित्तीय विलेख यामध्ये अपेक्षित पत हानीबाबत तरतूद केलेली आहे. या प्रकरणी खालील मुद्यावर लक्ष वेधण्यात येते.

अ) स्पॅनको नागपूर डिस्कॉम लिमिटेड वितरण फ्रँचायझी (संदर्भ टीपा क्र. ५२(८)(ब)) कडून प्राप्त होणाऱ्या रु. १६,२९४.१६ लाख (२०१९-२० रु. १३१२७.७१ लाख,१८ -१९ रु. ११९५२.४१ लाख रुपयाच्या संपूर्ण रकमेची तरतूद करण्याऐवजी सूत्रधारी कंपनीने रु. ६५१.७७ लाखची अपेक्षित पत हानीसाठी तरतूद केली. (२०१९-२०२० रु. १,७४.६०, २०१८-२०१९ रु. निरंक) (व्यापारी येणीवर सामान्य दराने गणना)

ब) सूत्रधारी कंपनीने मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को ऑप. सोसायटी लिमिटेड यांच्याकडे व्यापारी येणे रु. २,३४,९२०.०० लाख (२०१९-२०२० रोजी रु. २,३४,९२० लाख, २०१८-२०१९ रोजी रु. २,३४,९२० लाख) विचारात घेतलेले नाही.

क) सूत्रधारी कंपनीने व्याज मान्यता खंडित झालेल्या ग्राहकांकडून देय असलेल्या व्याजाच्या रकमेवर (रक्कम निश्चित केलेली नाही) १००% अपेक्षित पतहानी (ईसीएल) तरतूद विचारात घेतली नाही. महावितरणचे महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील एफ २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्याज ओळखण्याच्या संदर्भात लेखा धोरणाचे पालन करीत या ग्राहकांची व्याजाची मान्यता खंडित करण्यात आली आहे.

ड) टीप ५२(५)(२)(१)(अ) वर्षभरात अपेक्षित पतहानी (ईसीएल) मधील हालचालींशी संबंधित. सूत्रधारी कंपनीच्या व्यवस्थापनाने विविध श्रेणीतील ग्राहकांसाठी 'प्रोव्हिजन मॅट्रिक्स'च्या आधारे ईसीएलसाठी तरतूद केली आहे. कोविड १९ नंतरच्या स्थितीत हळूहळू होणाऱ्या सुधारणांमुळे व्यापारी येण्यांच्या वसुलीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वीच्या वर्षांत बुडीत कर्जे म्हणून भरीव रक्कम निर्लेखित केली गेली आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन,आम्ही ईसीएल आणि त्याची पर्याप्तता प्रदान करण्यासाठी स्वीकारलेल्या आधारावर भाष्य करण्यास अक्षम आहोत. वरील परिच्छेदात नमूद केलेल्या बाबींच्या संदर्भात लेखापरिक्षण पाठपुरावा तपशीलाच्या अनुपस्थितीत आम्ही लेखापरिक्षण अंतर्गत वर्षासाठी कंपनीच्या एकत्रित वित्तिय विवरण पत्रावर प्रभावी परिणांमावर भाष्य करण्याच्या स्थितीत नाही.

५) स्पष्ट न केलेल्या शिलकी आणि त्याचे वर्गीकरण व सादरीकरणाबाबत -

अ) आमच्या लेखापरीक्षणा दरम्यान सूत्रधारी कंपनीच्या खालील खात्यांशी संबंधित आवश्यक माहिती/तपशील पडताळणीसाठी मिळाले नाहीत.

(रु. लाखात)

जी एल कोड	लेखा शीर्षकाचे नाव	मत्ता(दायित्वे)
१०३०३०११	ग्राहकांच्या संकीर्ण अनामती	(१६६२.२३)
१०३०३०१३	इतर संकीर्ण अनामती	(१२७५.०५)
१०३०३०१५	कर्मचाऱ्यांच्या अनामती	(१.३०)
१०३०३०१९	ग्राहकांना देय असलेल्या सुरक्षा अनामती	(५५६८.९४)
१०३०३०२०	सौभाग्य योजनेच्या अंतर्गत रक्कमा	(०.५२)
१०५०१००२	परवानाधारकांना देय रक्कमांचे दायित्व	(४७१.७४)
१०५०१००७	विक्रेते भांडवल यांच्या सुरक्षा अनामती	(१,२८९.३२)
१०५०१००८	पुरवठादार आणि कंत्राटदारांकडून प्राप्त इसारा रक्कम ठेवी भांडवल	(७६२.३५)

१०५०१००९	विक्रेते संचालन व सुव्यवस्था यांच्याकडून प्राप्त सुरक्षा अनामती	(१२,२४५.०३)
१०५०१०१०	पुरवठादार, कंत्राटदार इसारा रक्कम ठेवी(संचालन व सुव्यवस्था)	(५,१६९.३२)
१०५०१०११	सुरक्षा अनामती – इतरांच्या	(७६६.०२)
१०५०१०१२	नॉन - डीडीएफ योजनेच्या परताव्याची रक्कम	(१०,०२०.७४)
१०५०१०१४	पुरवठादार/कंत्राटदाराकडून ठेवून घेतलेले पैसे	(२,११,२११.४५)
१०५०१०१५	ग्राहकांकडून प्राप्त इसारा रक्कम ठेवी	(११४.०७)
१०५०१०१७	ग्राहकाकडून प्राप्त सुरक्षा अनामती	(१९१.१३)
१०७००५०१	हंगामी सेवा जोडण्याच्या अनामती	(१,९५४.२४)
१०९००६०५	ग्राहकांचे नामंजूर झालेले धनादेश	(७७.६३)
१०९०२००१	पुरवठादार/कामे व देखभालीचे विक्रेते याचे दायित्वे	(८२,७३३.२९)
१०९०२००२	परकीय गुंतवणूक विक्रेते यांना देय रक्कम	(४,१२७.७६)
१०९०२००४	सेवा देणारे विक्रेते देय रक्कम	(२९.१९)
१०९०२००९	सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याला विक्रेते म्हणून देय रक्कम	(१०४.५१)
१०९०२१०३	खर्चासाठी दायित्व	(७४,१६३.३९)
१०९०२१०७	कर्मचाऱ्यांच्या देण्यांची दायित्वे	(९२२.२६)
१०९०२१०८	कर्मचाऱ्यांच्या ठेवी	(४७.०४)
१०९०२१११	संचालन व सुव्यवस्था खर्चासाठी तरतूद	(९,४६५.४९)
१०९०२३१०	बाहयस्त्रोत संस्थांच्या वेतनातीलकपात	८७८.८९
११०००००२	कर्मचाऱ्यांना केलेल्या खर्चाच्या दायित्वासाठी तरतूद	(७५६.७५)
१०९०२१०४	देय वेतन	(४२.५६)
१०९०२३०७	जीवन विमा प्रिमियम केलेली वसूली	(२५.४१)
१०९०२३४९	बाहयस्त्रोत संस्थाच्या वेतनातीलकर्मचाऱ्यांच्या पगारातून वसुली	(५,६८१.१७)
१०९०२३१६	कायद्यांतर्गत कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेले कल्याण निधी योगदान	(०.९४)
१०९०२००८	परवानाधारकांना देय	(०.१३)
१०९०२११६	वीज खरेदी खर्चासाठी तरतूद	(१,६१,४४९.२१)
२०६००००२	पुरवठादार/कंत्राटदार अग्रीम -इतर	३४,२४६.१३
२०६००१०३	इतर ठेवी	२,२८४.०९
२०९०१०२२	चोरी संदर्भात येणी	(२,५२०.४७)
२४०००००८	प्रवास भाड्याची अग्रीमे	४४.१६
२४००००१२	वैद्यकीय अग्रीम	३८३.१२

२४०००००१३	रजा प्रवास सवलतीसाठी अग्रिमे	७.१९
२४०००००१७	आय. टी.आय. प्रशिक्षणाचे शुल्क अग्रिमे	५५.००
२४१००००००६	कर्मचाऱ्यांच्या कर्जाचे देय नसलेले उपर्जित व्याज	२१.९२
२४१००००००७	कर्मचाऱ्यांकडून मिळू शकणारी रक्कम *	४३८.६८
२४१००००००८	माजी कर्मचाऱ्यांकडून मिळू शकणारी रक्कम	१६.०७
२४१०००००१०	इतर राज्य वीज मंडळांकडून मिळू शकणाऱ्या रक्कमा	९,४२९.४५
२४१०००००१८	भावी कर्मचाऱ्यांना अग्रिमे	१८.४९
२४१०००००२३	गोळा करणाऱ्या संस्था/कर्मचारी/माजी कर्मचारी यांच्याकडून अल्प प्रतिपूर्ती *	६६८.७८
२४१०००००२४	पुरवठादार कंत्राटदारांकडून वसुली	७६.८२
२०६०००२०५	परवानाधारकांची कर्जे/ अग्रिमे	३१.३४
२०९०१५१३	भंगार विकून मिळू शकणाऱ्या रक्कमा	२४१.४७
२०९०१५१०	ठोक विक्रीचे किरकोळ कर्जदार – आंतरराज्य	(१८,२३३.६४)

* या शिलकीसाठी पूर्णपणे तरतूदी वहयांमध्ये केल्या आहेत.

योग्य स्पष्टीकरणे / मेळ नसल्याच्या अनुपस्थितीमुळे या शिलकीच्या निर्दोषतेवर मत देता येत नाही.

वरील खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या जुन्या थकबाकींचा ताळमेळ आणि तडजोडीमुळे उदभवलेल्या समायोजनांचा परिणाम आणि वसूली न झाल्यामुळे किंवा अंशत - वसूली किंवा रक्कमा निर्लेखित केल्यामुळे उदभवू शकणाऱ्या संभाव्य नफा/तोटा हे निश्चित केले गेले नाहीत.

ब) विविध मत्ता आणि दायित्वाच्या शिल्लकी सूत्रधारी कंपनीच्या लेख्यांमध्ये समाविष्ट -

१) त्रिभाजनाच्या काळातील पुढे नेलेल्या शिलकी.

२) सॅप सॉफ्टवेअर वापरण्यास सुरूवात करताना या स्थलांतराच्या वेळी केलेल्या शिलकी.

याविषयीचे पुरेसा तपशील उपलब्ध नसल्याने शिलकी आणि त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकांवर घडू शकणारा प्रभाव यावर काही अभिप्राय आम्हाला देता येत नाही.

क) याशिवाय आवश्यक माहिती/तपशील उपलब्ध नसल्याने मत्ता व दायित्त्वे यांचं वित्तीय आणि अवित्तीय या वर्गीकरण मत्ता व दायित्त्वे यांचे ठोक एकत्रीकरण तसेच यांचे चालू आणि चालू नसलेली यातील द्विभाजीकरण या बाबी भा. ले. मानक ३२ - ठवित्तिय विलेख सादर करणेठ याच्याशी आणि कायद्यातील अनुसूची तीन यातील आवश्यकतेशी सुसंगत आहे किंवा कसे यावर आम्हाला मत देता येत नाही.

ड) सूत्रधारी कंपनीचे विविध खरेदी आदेश असे आहेत की त्यांची कार्यवाही ताळेबंदाच्या तारखेपर्यंत झालेली नव्हती. सुत्रधारी कंपनीने भांडवली अग्रिमे आणि भांडवली बांधिलकीच्या प्रकटीकरणासह भांडवली बाबींशी संबंधित खुल्या खरेदी आदेशाचे विवरण तयार केलेले नाहीत. ही माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही भांडवली आणि इतर बांधिलकी याबद्दल टिपा क्र. ४२ (ड) (अ) (३) यात नमूद केलेल्या प्रकटनेच्या अचूकतेबद्दल अभिप्राय देण्यास असमर्थ आहे.

६) बाह्य शिलकी कायम करणे / मेळ करणे

अ) एकत्रित वि. वि. पत्रकांची टिपा क्र. ५२ (३) याकडे लक्ष वेधण्यात येते यातील कर्जाच्या आणि अग्रिमांच्या शिलकी, विविध इतर खर्च/ जमा शिलकी आणि शासनाकडून येणी या कायम होण्याच्या तसेच मेळ आणि त्यातील परिणामांचे समायोजन करण्याच्या अधीन आहे. सूत्रधारी कंपनीची तिसऱ्या पक्षाकडून शिलकी पुष्टीकरण करण्याची व्यवस्था अधिक

बळकट करण्याची गरज आहे. याविषयी आवश्यक नोंदी / तपशील नसल्याने आम्ही अशा समायोजनेचे तसेच जून्या देण्याचे मेळ व समझोते झाल्यास संभाव्य नफा /तोटा आणि जर वसूली अपूर्ण किंवा अजिबात झाली नाही तर दायित्वाचा लेख्यावर होऊ शकणाऱ्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

ब) एकत्रित वि. वि. पत्रकातील टिपा क्र. १२ आणि टिपा क्र. ५२(३) यात उपलब्ध नसलेल्या खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात येते -

१) टपाल कार्यालयात शिलकी कायम करणे - लेखा वहयातील नोंदी प्रमाणे टपाल कार्यालयातील खालील शिलकीचे पुष्टीकरण उपलब्ध झालेले नाही.

(रु. लाखात)

वि. वर्ष	टपाल कार्यालये शिलकी	
	एकूण खर्ची शिल्लकी	एकूण जमा शिल्लकी
२०२०-२०२१	३३,२७७.३१	२३,२१५.५६
२०१९-२०२०	३६,४१०.८०	२६,३१३.०८
२०१८-२०१९	२८,४८०.३८	१८,९३६.०५

२) सूत्रधारी कंपनीच्या सर्व मंडळांसाठी पोस्ट कार्यालयाशी ताळमेळ

शिलकीचे पुष्टीकरण / मेळ यांची माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांचा लेखा परिक्षण वर्षाच्या एकत्रित वि. वि. पत्रकातील होऊ शकणाऱ्या परिणामांबाबात आम्हाला मत देता येत नाही.

क) एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४५(ड)यात नमूद केले आहे की, मिळण्या जोग्या शिलकी / देणी यांची सूत्रधारी कंपनीच्या लेखा वहयातील नोंदी आणि समूह कंपन्याच्या लेखा वहयातील संबंधित शिलकी यात रु. ९,७१,१७५ लाख (२०१९-२०२० या वर्षी रु. ४,२७,६१६.०० लाख,२०१८-२०१९ रोजी रु. २,२५,५०४ लाख) एवढा फरक आहे. या रकमा मेळ आणि कायम करण्याच्या अधीन आहेत.

मेळ नसल्याने या बाबीचा एकत्रित वि. वि. पत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

ड) सूत्रधारी कंपनीच्या वहयातील नोंदीनुसार शिल्लक रकमेतील रु. ६०७.६७ लाखांच्या फरकाबाबत आणि अंशदायी भविष्य निर्वाह निधी ट्रस्टच्या वहयांमध्ये दिसत असलेल्या शिल्लक रकमेबाबत कोणतेही तपशील/स्पष्टीकरण दिलेले नाही. पुरेशा तपशिलांच्या अभावामुळे नफा आणि तोटा पत्रकावर आणि राखून ठेवलेल्या कमाईवर होणाऱ्या प्रभावी परिणामांवर भाष्य करण्यास अक्षम आहोत.

७) नियामक दायित्व आकाराचा परतावा

टिपा क्र. ५२(२४) यात नमूद केल्याप्रमाणे, सूत्रधारी कंपनीने वि. वर्ष २००३-०४ ते वि. वर्ष २००६-०७ दरम्यान ग्राहकांकडून नियामक दायित्त्वाचा आकार गोळा केला होता. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (जमा केलेल्या रकमेपैकी) रु. ३,२२,७०० लाख ग्राहकांना परत करण्याचा आदेश दिला. सुत्रधारी कंपनीने ३१.०३.२०२१ पर्यंत रु. ३,१२,२७३ लाख (२०१९-२० मध्ये रु. ३,१२,३९४ लाख, २०१८-१९ मध्ये रु. ३,१२,२१७) परत केले आहेत. सूत्रधारी कंपनीने उर्वरीत शिल्लक रु. १०,४२७ लाख (२०१९-२० मध्ये रु. १०,३०६ लाख, २०१८-१९ मध्ये रु. १०,४८३ लाख) या ग्राहकांना परत करण्याच्या रकमेची तरतूद केली नाही.

८) शासकीय अनुदाने आणि ग्राहकांचे अंशदान -

अ) भा. ले. मानक २० - शासकीय अनुदानांचे लेखे करणे आणि शासकीय मदतीची प्रकटने करणे, यानुसार भांडवली मत्तांच्या शासकीय अनुदानांना ज्या कालावधी मध्ये कंपनी त्या संबंधीत भांडवली मत्तांचा खर्चाची परतफेड करते, त्या वेळेच्या नफा तोटा पत्रकात पध्दतशीर आधारावर मान्यता देते. सुत्रधारी कंपनी असे गृहीत धरते की सर्व प्राप्त अनुदाने वापरण्यात आली आणि मत्तांचे भांडवलीकरण त्याच वर्षी केले. अनुदानाच्या उपयोगा संबंधीचे पुरेसे व योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे उपलब्ध नसल्याने आम्ही त्याचे एकत्रित वि. वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर भाष्य करु शकत नाही.

ब) भांडवली मत्तांसाठी ग्राहकांचे अंशदान याला ज्या कालावधीत कंपनी या संबंधित मांडवली मत्तांच्या कर्जफेडीची तरतूद करते त्या कालावधीच्या नफा तोटा पध्दतशीर आधारावर मान्यता दिली जाते. सूत्रधारी कंपनी असे गृहित धरते की, असे सर्व मिळालेले अंशदान त्यावर्षी भांडवली मत्तांसाठी वापरण्यात आले. ग्राहक अंशदानाच्या वापराचा पुरेसे आणि योग्य लेखा परिक्षणात्मक पुरावे उपलब्ध नसल्याने एकत्रित वि. वि. पत्रकावर संभाव्य परिणामावर आम्हाला मत देता येत नाही.

९) टिपा क्र. ४२(ड) - यात प्रकट केलेल्या आकस्मिक दायित्त्वे व्यवस्थापनाने दिलेल्या व खात्री केलेल्या माहितीवर आधारित आहेत. सूत्रधारी कंपनीने पुरेशी कागदपत्रे दिली नसल्याने आणि लेखा परिक्षणाचा पाठ पुरावा नसल्याने आकस्मिक दायित्त्वांचा प्रकटनाच्या परिपूर्णतेवर आणि सूत्रधारी कंपनीच्या लेखा पुस्तकामध्ये कोणतीही अतिरिक्त तरतूद करणे आवश्यक आहे की नाही यावर आही भाष्य करण्यास अक्षम आहोत. नफा/तोटा आणि राखून ठेवलेल्या कमाईचा एकत्रित वित्तिय विवरणपत्रकांवर होणाऱ्या परिणांमाचा प्रभाव निश्चितपणे सांगता येणार नाही.

१०. कर्मचारी लाभ खर्च -

भाले मानके १९ नुसार कर्मचाऱ्यांना सूत्रधारी कंपनीतर्फे दिले जाणारे कर्मचारी लाभ जसे की, सेवानिवृत्त कर्मचारी लाभ, व्यांख्यांकित लाभ योजना, अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना यांच्या व्याजावरील तूटीचा विमागणिती शास्त्रानुसार मूल्यांकन सूत्रधारी कंपनीने करून घेतलेले नाही. या भविष्य निर्वाह निधीचे व्यवस्थापन मराविमं अंशदायी भविष्य निर्वाह निधी विश्वस्तातर्फे केले जाते. अशा मूल्यांकनाच्या अभावी नफा आणि तोट्याच्या एकत्रित विवरण पत्रकावर आणि राखीव कमाईवर होणा -या परिणामांबाबत आम्ही भाष्य करू शकत नाही.

११. विविध खर्चासाठी तरतुदी केलेल्या नसणे -

अ) एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४२(ड)(अ)(३)(ब)(अ) ते (इ) यात नमूद केल्याप्रमाणे देय रकमेची गणना करण्याच्या पद्धतीतील संदिग्धतेमुळे सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असून सूत्रधारी कंपनीने नवीन कोळसा वितरण धोरणानुसार वाढीव कोळसा किमतीच्या भरपाईच्या दायित्वाची तरतूद केलेली नाही. एनसीडीपीनुसार विविध विक्रेत्यांचे सुमारे रु. १४,४४,६०४.५९ लाख (२०१९-२०२० रु. ७,५८,३८५ लाख २०१८-२०१९ रु. ४,४२,७२९ लाख) देय आहेत.

ब) एकत्रित वि. वि. परिमाणाची टिपा क्र. ४२(ड)(अ)(३)(अ)(क) यात दिल्याप्रमाणे सुत्रधारी कंपनीने रत्नागिरी गॅस पॉवर प्रा. लि. ला देय स्थिर आकाराचे दायित्व रु. ४,३२,७६८ लाख यासाठी तरतूद केलेली नाही (२०१९-२०२० रोजी रु. ४,२२,८५६.२३, २०१८-२०१९ रोजी रु. ३,५१,००४ लाख). आरजीपीपीएल कंपनीला रु. १८,१०१.०७ लाख (२०१९-२०२० रोजी रु. १८,१०१.०७, २०१८-२०१९ रोजी रु. १८,१०१.०७ लाख) दिलेले असून त्यास अग्रिमे शिर्षकात दर्शविण्यात आले आहे.

क) एकत्रित वि. वि. पत्राच्या टिपा क्र. ५२(८)(ब) यात दिले आहे की सुत्रधारी कंपनीने वितरण फ्रेंचायजी स्पॅन्को नागपूर डिस्कॉम लिमिटेडची सेवा खंडित केल्याने त्यास देय असलेल्या रु. २१,६९७.२५ लाखांची (२०१९-२० मध्ये रु. १८,२२३.७१ लाख तर २०१८-१९ मध्ये रु. ११,४३५ जमा) तरतूद केलेली नाही.

१२) इतर बाबी

अ) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा ५२(२३) यात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सुत्रधारी कंपनीला प्रत्येक वर्षी निर्माण केलेल्या आकस्मिक राखीवच्या समतूल्य रक्कम विनिर्देशित केलेल्या प्रतिभूती मधे गुंतवणे आवश्यक आहे. सुत्रधारी कंपनीने वर्षभरात कोणतीही नियोजित गुंतवणूक केली नाही. अशा प्रकारे ३१ मार्च २०२१ पर्यंतची नियोजित गुंतवणूक रक्कम रु. ३१,३३९.७८ लाख आहे (२०१९-२०२० रोजी रु. ३१,३६९.८२ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. १८,५७२.५५ लाख) आणि आकस्मिक राखीव रु. १,२५,७३२ लाख आहेत (२०१९-२०२० रोजी रु. १,०९,९७६ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. ९५,७००.०० लाख).

ब) सुत्रधारी कंपनीने मालाच्या सोडवण्याची पावती व देयके पावती रु. १,८९,६१९.१२ लाख (२०१९-२०२० रोजी रु. २,०४,८०२.१० लाख, २०१८-२०१९ रोजी रु. १,२२,१५३. ३५ लाख) आणि कामे व देखभाल यांच्या पुरवठा दारांसाठी रु. ८२,७३३.२९ लाख (२०१९-२०२० रोजी रु. ५३,७०८.३५ लाख, २०१८-२०१९ रोजी

रु. ७०,२०७.९८ लाख) अशी अनुक्रमे दायित्त्वे दर्शविली आहेत. या शिलकी खर्च शिलकीची निव्वळ आहेत. यासाठी आवश्यक आकडेवारी आणि लेखा परिक्षणाचा पाठपुराठा नसल्याने त्यांचा सूत्रधारी कंपनीच्या मत्ता व दायित्त्वे यावर होणाऱ्या प्रभावाचा अंदाज आम्ही करु शकत नाही.

क) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ५२(१०) कडे लक्ष वेधण्यात येत. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजक कायदा या नुसार नोंदवलेल्या पतदारांची ओळख निश्चिती आणि त्यांना देय असलेल्या व्याजासाठी तरतूदी संबंधी आहे. सूत्रधारी कंपनीने दायित्त्वांचे सांख्यिकीकरण केलेले नाही म्हणून असे काही व्याज देय असेल तर, त्यांचे दायित्त्वाची तरतूद याचा अंदाज आम्हाला करता येत नाही. तसेच त्याचा लेखा परिक्षण वर्षातील नफ्यावर कोणते परिणाम होतील हे सांगता येत नाही. अशा सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योजकांची ओळख निश्चिती केली नसल्याने सबंधित कायद्याच्या तरतूदी प्रमाणे स्थितीचे प्रकटन केलेले नाही.

ड) लेखा वह्या आणि माहिती तंत्रज्ञान डेटा बेस यामध्ये नोंदलेल्या ग्राहकांच्या अनामत रकमेत खालील प्रमाणे फरक आहे. ढसंदर्भ टिपा क्र. ५२(५)(२)(१)(अ)(क)

(रु. लाखात)

तपशील	**३१.०३.२०२१ रोजी लेखा वह्यातील शिल्लक (अ)**	**३१.३०.२०२१ रोजी आयकर डेटाबेस मधील शिल्लक (ब)**	**फरक (अ) - (ब)**
सुरक्षा अमानत	८,५३,१०२.५६	८,४४,७१३.०४	८,३८९.५२

सुत्रधारी कंपनी या फरकाचा मेळ करण्याची प्रक्रियेत आहे.

इ) सुत्रधारी कंपनीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून मंजूर रक्कम रु. ८,५०,०००.००, लाखाचे एक कर्ज घेतले. ३१ मार्च २०२१ रोजी थकीत रक्कम रु. ७,१८,७५०.०० लाख होती. (२०१९-२०२० रोजी रु. ७,५१,२५०.०० लाख, २०१८-२०१९ रोजी रु. ८,०८,१२५.०० लाख) या कर्जाला मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ने हमी दिली असून त्यासाठी सूत्रधारी कंपनीने कुठलीही रक्कम आकारलेली नाही. मात्र भा. ले. मानक १०९ च्या आवश्यकते प्रमाणे या वित्तीय हमीचे रास्त मूल्यांकन झालेले नाही. यामुळे या वर्षीचा संचित तोटा रु. ८,१४४.०२ लाखाने कमी आहे आणि ठेवून घेतलेल्या मिळकतीची संचित शिल्लक ३१ मार्च २०२१ रोजी रु. २२,७८१.४९ लाख जास्त आहे.

उपरोक्त परिच्छेद क्र. १ ते १२ यात नोंदलेल्या विविध पात्रतांचा आयकर, नियामक मत्ता आणि स्थगित कर या बाबींवर परिणाम होऊ शकेल. या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

आमच्या मागील वर्षांतील अहवालातील परिच्छेद क्र. १(अ ते ड), २(अ ते ब), ४(अ ते इ), ५(अ ते ड), ६(अ ते क), ७, ८(अ ते ब), ९, ११(अ ते क), १२(अ ते इ) यात सुधारणा केल्या आहेत.

उपरोक्त वर्णन केलेल्या विषयाचे येथे जोडलेल्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामाचे योग्य प्रमाणे निश्चितीकरण व सांख्यिकीकरण खालील तक्त्यात केले आहे.

एकत्रित नफा तोट्यावर परिणाम

(रु. लाखात)

अ. क्र.	**संबंधित परिच्छेद**	**तपशिल**	**वि.वर्ष २०२०-२०२१**
			खर्च/उत्पन्न
१	७	तरतूद नसलेले खर्च - आरएलसी	१०,४२७
२	११	तरतूद नसलेले खर्च -एनसीडीपी	१४,४४,६०४.५९
३	११	तरतूद नसलेले खर्च -स्थिर आकार	४,३२,७६८

४	११	तरतूद नसलेले खर्च - – डी एफ दायित्व	२१,०४५.२५
५	१२	तरतूद नसलेले खर्च - कॉर्पोरेट गॅरंटी	८,१४४.०२
६	१२	ग्राहकांची सुरक्षा अनामत	(८,३८९.५२)
		एकूण	**१९,०८,५९९.३४**

एकत्रित ताळे बंदावर परिणाम

(रु. लाखात)

अ. क्र.	**संबंधित परिच्छेद**	**तपशिल**	**वि.वर्ष २०२० -२०२१**
			मत्ता / दायित्वे
१	७	चालू वित्तीय दायित्वे – नियामक दायित्वे	(१०,४२७)
२	११	तरतूद नसलेले खर्च – कोल पास थ्रू	(१४,४४,६०४.५९)
३	११	तरतूद नसलेले खर्च – स्थिर आकार	(४,३२,७६८)
४	११	तरतूद नसलेले खर्च – डी एफ दायित्व	(२१,०४५.२५)
५	१२	ग्राहकांची सुरक्षा अनामत	८,३८९.५२
६	१२	इतर समभाग – कॉर्पोरेट गॅरंटी	(८,१४४.०२)
७		ठेवून घेतलेली मिळकत	(१९,२३,२३६.८१)

आम्ही कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखापरिक्षणाची मानके यानुसार एकत्रित वि. वि. पत्रकाचे लेखापरिक्षण केले आहे. आमच्या लेखापरिक्षण अहवालात आमची जबाबदारी 'एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाबाबत लेखापरीक्षकांची जबाबदारी' या शीर्षकाखाली विशद केली आहे. भारतीय सनदी लेखपाल संस्थेने जारी केलेल्या नैतिक संहितेनुसार आम्ही या कंपनी समुहा पासून स्वतंत्र आहोत. त्याचेसह अधिनियम आणि नियमावलीत तरतुदीनुसार एकत्रित वि. वि. पत्रकांचे परिक्षण संबंधी नैतीक गरजांचे पालन करुन आणि इतर नैतीक जबाबदाऱ्या आम्ही पालन केलेले आहे. आमचा विश्वास आहे की या एकत्रित वि. वि. पत्रकांवर आमचे अभिप्राय देणेसाठी आम्ही पुरेसे आणि योग्य लेखापरिक्षण पुरावे मिळविले आहेत.

सतत चालू असणारी कंपनी या विषयीची प्रत्यक्ष अनिश्चिती

महावितरण या उपकंपनी विषयी

टिपा क्र. ५२(१) यात नमूद केल्याप्रमाणे या सूत्रधारी कंपनी समुहाचा ३१ मार्च २०२१ रोजीचा संचित तोटा रु. २५,३२,६२६.९४ लाख (२०१९-२०२० रोजी रु. २४,०१,०११.१९ लाख, २०१८-२०१९ रोजी रु. २४,५९,४५९.६० लाख) असून तो समुहाच्या निव्वळ मूल्यापेक्षा ५० टक्के जास्त आहे. ३१ मार्च २०२१ ची चालू दायित्त्वे चालू मत्तापेक्षा जास्त आहेत. मात्र महाराष्ट्र शासन गरज भासेल तेव्हा जादा समभाग निधी देईल अशी अपेक्षा असल्याने, स्वायत्त वि. वि. पत्रकांची मांडणी सतत कार्यरत असलेली संस्था या नुसारच केलेली आहे. आम्ही या विषयी व्यवस्थापनाने केलेले निर्धारण यावर विसंबून आहोत आणि म्हणून या विषयी आमच्या अहवालात सुधारणा केलेल्या नाहीत.

या उपकंपनीचे ऋणात्मक (निगेटिव्ह) निव्वळ मूल्य आणि ऋणात्मक प्रवर्तनातील रोकडता प्रवाह असून या उपकंपनीला चालू आणि मागील वर्षातही सातत्याने तोटा झालेला आहे. या बाबी तिच्या अस्तित्वाचा महत्वपूर्ण प्रत्यक्ष अनिश्चिती निर्देशीत करतात. आणि उपकंपनीमधे चालू राहण्याच्या पात्रते विषयी लक्षणीय शंका निर्माण करतात आणि त्यामुळे सर्वसाधारण व्यवहार / कार्ये करताना तिचे दायित्वे मिळविण्यास ती सक्षम नसू शकेल असे दर्शवितात.

३. भर देण्याची प्रकरणे -

मराविमं सुत्रधारी कंपनी लि. च्या प्रकरणी

आम्ही वित्तीय विवरण पत्रकाच्या टिपामधील खालील विषयांकडे लक्ष वेधू इच्छितो -

३.१) एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा ४७ (अ) यात म्हटले आहे की इतर अंतर्गत स्त्रोतांपासून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे नफा तोटा पत्रकातील संबंधितांच्या व्यवहाराचे विलोपन (एलिमिनेशन) केलेले आहे. यासंदर्भात भा. ले. मानके २४ आणि २५ यानुसार शासकीय कंपन्या / राज्य नियंत्रित उद्योग यांना त्याचे संबंधितांचे सोबतच्या व्यवहाराचे स्वायत्त वि. वि. पत्रकात प्रकट करण्यापासून सूट दिली आहे. म्हणून समूहातील कंपनीच्या उत्पन्न / खर्च यांच्या काही बाबींचे विलोपन केलेले नसल्याने त्यांचा एकत्रित वि. वि. पत्रकात होऊ शकणारा नेमका परिणाम सांगता येत नाही.

३.२) एकत्रित वि. वि. पत्रकांची टिपा ४७ (ब) यात म्हटल्याप्रमाणे उपकंपन्यांचे एकमेकांशी व्यवहारातील आंतर समुहाच्या शिलकीचे विलोपण झाल्यानंतर म्हणजे व्यापारी येणी व्यापारी देणी, कर्जे, उसनवारी यांच्या शिलकीचे एकत्रित वि. वि. पत्रकात जादा / कम विवरण झालेले आहे. कारण आंतर समूह शिलकीचे विलोपण व्यवस्थापन त्यासाठी समुहातील आंतर कंपनी व्यापारी येणी, देणी यांच्या दि. ३१.३.२०२१ रोजीच्या अखेरच्या शिलकी विचारात न घेता उपकंपन्यांनी नोंदलेले उत्पन्न / खर्च यांच्या रकमांचे विलोपन केले.विलोपनासाठी रक्कमांचा अचूक तपशील उपलब्ध नसल्याने आम्ही यांबाबींचा समुहाच्या मत्ता व दायित्त्वे यावर पडू शकणाऱ्या प्रभावाची निश्चिती करु शकत नाही.

३.३) टिपा क्र. ४९(२) (२.२) पहावी. यात कंपनीने अग्रिम कर रु. १,६६७,७१०,८८८ (मागील वर्षी रु. १,६०२,३९३,६०५) पुस्तकातील कर तरतुदींची निव्वळ रु. ४००,७२७,७२९ आणि निषेध नोंदवून भरलेल्या रकमा रु. २९१,७००,०८१ अशा दर्शविल्या आहेत. या प्रकरणी दावे दाखल केली असल्याने आयकर अभिलेखांनुसार असे कोणतेही दायित्त्व नाही. लेखावह्यातील तरतूदीची रक्कम केवळ कंपनीच्या न्यायबुद्धीने केली आहे. तर वसुली योग्य रकमा मेळ व पुष्टीकरण होण्याच्या अधीन आहेत.

३.४) टिपा क्र. ४९(५)(५.५) ज्यामध्ये उपकंपन्याकडून मालमत्ता भाड्यापोटीचे थकीत कर्जाच्या रकमा रु. ४,१६,६२,८६,२६६ लाख (मा. वर्षी रु. ३,७१६,८६५,५६७) प्रदीर्घ काळापासून थकीत आहेत. भा. ले. मानक १०९ नुसार अपेक्षित पत हानीची तरतूद लेखावहीत केली आहे.

३.५) असे निरिक्षण आहे की, लेखा वह्यात उपदान आणि रजा रोखीकरण यांच्या तरतूदीमध्ये स्थापत्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तरतूद समाविष्ट आहे. आणि तिची नोंद त्याच्या रुजू होणाऱ्या तारखेपासून आहेत. त्यांच्या मराविम सूत्रधारी क. मध्ये प्रतिनियुक्तीवर येण्यापासून म्हणजे वि. वर्ष २०१३-१४ पासूनच्या नाहीत.

३.६) टिपा क्र. ४३ (ए) पहावा. यात कंपनीने माहिती दिली आहे की भाडेपट्टीने घेतलेल्या जागांसंबंधी वाद असल्याने त्याच्या भाडेपट्टीच्या कालावधीबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे ''मत्ता वापरण्याचा हक्क'' याला मान्यता दिलेली नाही आणि जेथे मत्ता भाडेपट्टीवर आहे तेथे भाडेपट्टी व्यवस्थेला कंपनीने मान्यता दिलेली नाही.

३.७) सोबतच्या एकत्रित वि. वि. पत्रकाच्या टिपा क्र. ४९(१०) कडे आम्ही लक्ष वेधतो. यामध्ये व्यवस्थापनेने कोवीड -१९ च्या साथीमुळे लॉकडाउन व इतर बंधने याचा कंपनीवर आलेल्या मर्यादा आणि अनिश्चितता याचे मुल्यांकन केलेले आहे. याचा प्रभावाचे मुल्यांकन प्रामुख्याने नंतरच्या परिस्थितीवर अवलंबून असेल, त्यावर आमचे पात्र मत नाही.

महानिर्मिती या उपकंपनीचे प्रकरणी

आम्ही खालील टिपांकडे लक्ष वेधतो -

सुत्रधारी कंपनी - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड

टिप क्र. ४३(ब) (अ) (अ) ही विविध जलविद्युत निर्मिती केंद्राच्या सुविधासाठी महाराष्ट्र शासनासोबत केलेल्या भाडेपट्टी कराराच्या संबंधी आहे. या कराराची अंमलबजावणी अजून प्रलंबित आहे.

टिपा क्र ५०(१४) ही सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाशी संबंधित आहे. कर्मचाऱ्यांना दिलेल्या काही भत्यांचा समावेश भविष्य निर्वाहनिधी मधे अंशदानासाठी असलेल्या पात्र मिळकती मध्ये करावा असा निर्णय यात देण्यात आला आहे. यासंबंधी व्यवस्थापनाचा दृष्टिकोन निश्चित झालेला नाही. त्यामुळे त्याचा प्रभावाचा अंदाज केला नाही.

महागुज कोलायरीज लिमिटेड या उपकंपनी विषयी

१) टिपा क्र. ५०(२१) ही महागूज कोलायरीज कंपनीच्या वि. वि. पत्रकांचा भाग आहे. मागील काही वर्षात या कंपनीने मच्छकाटा-महानदी कोळसा खान विकसीत करण्याचा कामात केलेल्या रु. ५४,४०,७०,१११/- एवढ्या खर्चासाठी तरतूद केलेली नाही. मच्छकाटा महानदी कोळसा खान क्षेत्राचे वाटप मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ष २०१४ मध्ये रद्द केले त्यासाठीच्या खर्चाच्या प्रतिपूर्ती बाबत भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने विचार केलेला नाही आणि अजून हे क्षेत्र नव्याने अन्य कुणाला दिलेले नाही. व्यवस्थापनाचे असे मत आहे की सदर क्षेत्रे अन्य कुणा नवीन संस्थेला दिल्यानंतर आणि ते कोळसा मंत्रालयाने मंजूर केल्यानंतर आणि मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच कंपनीच्या लेखा वहयात समायोजन / तरतूद करावी.

२) महत्वाच्या लेखा धोरणाच्या परिच्छेद (ड) नुसार, यात महागुज कोलायरीज लिमिटेडचा संचित तोटा आणि पालक कंपनीने दिलेली कर्जे वगळल्यानंतर या कंपनीचे निव्वळ मूल्य पूर्णपणे संपले आहे. या कंपनीचा चालू वर्षीचा आणि मागील वर्षीचा निव्वळ तोटा रु. ३,२७,५६,३९३/- आहे आणि ताळेबंद तयार करण्याच्या तारखेस कंपनीची चालू दायित्त्वे तिच्या चालू मत्तांपेक्षा जास्त झाली आहेत. कार्यरत राहणारी संस्था म्हणून चालू राहण्याची या कंपनीकडे शक्ती असल्याबद्दल या परिस्थितीमुळे प्रत्यक्ष अनिश्चितता निर्माण झाली आहे. मात्र या कंपनीची वि. वि. पत्रके ''चालू संस्था'' या तत्त्वाने केली आहेत. त्याची कारणे या वि. वि. पत्रकांचा भाग असलेल्या कंपनीची महत्त्वाची धोरणे या विषयावरील परिच्छेद (ड) यात दिली आहेत. तथापि,एकत्रित वित्तिय विवरणपत्रकांवर याचा कोणताही परिणाम होत नाही कारण लाइफ बाय लाइन कन्सोलिडेशन सुत्रधारी कंपनीद्वारे केले आहे.

३. महागुज कोलायरीज लिमिटेड च्या वि. वि. पत्रकाच्या टिपा क्रमांक ४२(ब)(अ)(१)(११) या मध्ये कंपनीच्या विरोधात मेसर्स अदानी इंटरप्राइजेस लिमिटेडने दाखल केलेल्या कायदेशीर खटल्याच्या निकालासंबंधीची अनिश्चितता व्यक्त केली आहे आणि चालू असलेल्या लवाद प्रक्रियेच्या फल निष्पत्ती बाबत वर्णन केलेले आहे.

वरील बाबींच्या संदर्भात आमचे पात्रतेचे मत नाही.

उपकंपनी महानिर्मितीच्या बाबतीत -

खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

१. विलंब भरणा आकार (डीपीएस) च्या संदर्भात लेखांकनाशी संबंधित टीपा ४२(ड)(क)(अ) कडे लक्ष वेधले आहे. सूत्रधारी कंपनी आणि महानिर्मितीतर्फे व्याजाची गणना करण्यासाठी स्वीकारलेल्या पद्धतीमध्ये फरक आहे. महानिर्मितीच्या देय व्याजांचे विभाजन करून त्याची गणना करण्याऐवजी सूत्रधारी कंपनीने थकित मुद्दल चुकते करण्यासाठी देण्यात आलेल्या रकमांचे विभाजन करून त्यावर विलंब भरणा आकाराची गणना केली आहे. याशिवाय बिलिंगमध्ये काही फरक आहेत. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली गेली आहे.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडशी संबंधित विलंब भरणा आकारसाठी सूत्रधारी कंपनीच्या संदर्भात टीप ४२(ड)(क)(ब) कडे लक्ष वेधण्यात आले आहे. सूत्रधारी कंपनीतर्फे मुद्दल माफ करण्याचा निर्देश असूनही ३१ जुलै २०१५ रोजी देय असलेल्या मुद्दलाच्या रक्कमेवर विलंब भरणा आकाराची मागणी महापारेषणतर्फे केली जात आहे. याशिवाय काही अन्य मुद्यावर वाद असून त्यावर अद्याप तोडगा निघालेला नाही. विवादित मर्यादेपर्यंतची रक्कम आकस्मिक दायित्व म्हणून प्रकटने केली गेली आहे.

३) वर्षाच्या शेवटी सूत्रधारी कंपनीच्या निव्वळ संपत्तीच्या संबंधित महत्त्वपूर्ण असलेल्या आकस्मिक दायित्वांच्या संदर्भात टिपा क्र. ४२(ड) द्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.

४) टीपा क्र.४८ (ड) (अ) (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीने आयकर कायदा १९६१ कलम ११५ बीएए अंतर्गत पर्याय विचारात घेऊन त्या वर्षासाठी दाखल केलेल्या उत्पन्नाच्या परताव्याच्या आधारे आर्थिक वर्ष २०१९-२० शी संबंधित रु. ११,०७४ लाखाची आयकर तरतूद उलट फिरवली आहे.

५) एकत्रित विवरण पत्रकातील टिपा ५२(९) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, भा.ले.मानके १०९ नुसार सूत्रधारी कंपनीने अपेक्षित पत हानी (कालापव्यय) साठी २,३७८.०२ लाखांची (२०१९-२० मध्ये रु. १,०६९.४३ लाख, २०१८-१९ मध्ये रु. २,५५१.४३ लाख) तरतूद केली आहे. थकबाकीच्या प्रारंभीच्या तारखेपासून ही तरतूद करणे अव्यवहार्य असल्याने

थकबाकीवर प्राप्त करण्यायोग्य इतर कर्जांसाठी १ एप्रिल २०१५ ही संक्रमण तारीख निश्चित करून ही तरतूद करण्यात आली आहे.

६) टिपा क्र ४२(ड)(अ)(१)(अ)(५) कडे लक्ष वेधण्यात आले आहे, मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को-ऑपरेटिव्ह सोसायटीद्वारे सेवा पुरवलेल्या भागात सध्या सूत्रधारी कंपनी वीज पुरवठा करत आहे आणि या उद्देशासाठी मुळा -प्रवराच्या पायाभूत सुविधांचा वापर करत आहे. वापरकर्ता शुल्क भरण्याशी संबंधित प्रकरण वादात आहे. विवादाचे प्रलंबित निराकरण आणि आवश्यक कराराच्या अनुपस्थितीत, भा. ले. ११६ च्या लागू होण्याबाबतचे मूल्यांकन केले गेले नाही.

७) कोविड १९ च्या प्रादूर्भावानंतर समुहाच्या प्रवर्तनामध्ये मूल्यांकनांवर टीपा क्र. ५२(३२) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. वरील (१) ते (७) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींच्या संदर्भात आमचे मत बदलेले नाही.

४) लेखापरिक्षणातील महत्त्वाचे विषय

महानिर्मिती या उपकंपनी विषयी

उपकंपनी महानिर्मिती प्रकरणी लेखा परिक्षण विषयक महत्वाची प्रकरणे म्हणजे अशा बाबी की ज्या विद्यमान काळातील एकत्रित वि. वि. पत्रकाच्या आम्ही केलेल्या लेखा परिक्षणात आमच्या व्यावसायिक निर्णय बुद्धीच्या मते आम्हास अधिक महत्वाची वाटली. आम्ही एकत्रीत पत्रकाचे वि. वि. पत्रकाचे संपूर्ण लेखापरिक्षण केले त्यात या महत्त्वाच्या बाबीत आम्ही विशेष लक्ष दिले. आमचे मत निश्चित करतांना आम्ही त्याचा वेगळा अभिप्राय दिलेला नाही. सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी या वर्षात खालील बाबी लेखापरिक्षण दृष्ट्या महत्वाची निश्चित केल्या आहेत.

१) आकस्मिक दायित्त्वे / आकस्मिक मत्ता

कंपनीच्या विरोधात विविध मंचासमोर बरीच कायदेविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत. यातील आकस्मिक दायित्वातील रकमांचे प्रकटन करण्यासाठी व्यवस्थापनाने न्यायबुद्धीने केलेले अंदाज आवश्यक आहेत. कोळसा कंपन्यांनी महानिर्मिता कंपनीच्या वर विविध दावे केले आहेत. तसेच व्यवस्थापनाने सुद्धा आपल्या भूमिकेनुसार अनेक प्रतिदावे कोळसा कंपन्यावर दाखल केले आहेत.

आम्ही सदर बाबींना आमच्या लेखा परिक्षणातील महत्वपूर्ण बाब मानले आहे, कारण या प्रकरणांचा योग्य अर्थ लावण्यासाठी आणि त्यांच्या आधारे रकमांचे अंदाज करण्यासाठी उच्च दर्जाचे व्यवस्थापकीय अंदाज आवश्यक आहेत. या बाबी व्यवस्थापनाच्या पूर्वग्रहाचा प्रभाव पडू शकतो. असे दावे आणि प्रतिदावे यासाठी विविध विषयांवर व्यवस्थापनाने केलेले अंदाज आणि लावलेले अर्थ याची गरज असते. तसेच त्यात इतर समस्याही गुंतलेल्या असू शकतात. आणि त्याचे स्वरुप व्यक्तिनिष्ठ असू शकते.

(संदर्भ - एकत्रित वि. वि. पत्रकाची टिपा क्र. ४२ (ब) (अ) (१) आणि टिपा क्र. ४२ (ब) (अ) (४), महानिर्मितीचे महत्वाचे लेखा धोरण क्र १९ सोबत वाचावी.)

आम्ही कंपनीच्या अंतर्गत सूचना आणि कार्यपद्धती यामध्ये आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता या विषयीचे अंदाज आणि प्रकटने याविषयीची माहिती मिळविली आणि त्यादृष्टीने लेखा परिक्षणाच्या खालील कार्यपद्धती तयार केल्या.

- व्यवस्थापनाने प्रलंबित खटल्या संबंधिची सर्व माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली कार्यद्धती आणि नियंत्रणे यांच्या रचना समाजावून परिक्षण केले.

- कायदेविषयक बाबींमधील महत्वाच्या घडामोडी आणि विद्यमान स्थिती या बाबत व्यवस्थापनाशी चर्चा केली.

- कायदेविषयक प्रकरणे आणि त्यावर बाहेरची मते (जर असल्यास) या संबंधीचा पत्रव्यवहार व संबंधित कागदपत्रे व्यवस्थापनाकडू मिळवून त्याचे वाचन केले. आकस्मिक दायित्त्वे व मत्ता प्रकटनासाठी पुष्टीदायक महत्वपूर्ण पद्धती व गणना समजवून घेतल्या.

- यासाठी तरतूदी करणे आवश्यक आहेत, किंवा कसे यावर व्यवस्थापनाने केलेले न्यायनिर्णय आणि मूल्यांकन यांचे परिक्षण केले.

- प्रकटनांचा पुरेसेपणा आणि पूर्णता यांचा आढावा घेतला.

वरील कार्यपद्धतीच्या आधारे आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता या पुरेशा आणि प्रमाणशीर आहेत.

उपकंपनी - धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड

अ) सतत चालू असणारी कंपनी या विषयी प्रत्यक्ष अनिश्चिती

या उपकंपनीचे लेखे चालू असलेली कंपनी या तत्त्वानुसार केलेली नाहीत. कारण व्यवस्थापनने ती बंद करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी शासकीय परवानगीची प्रतिक्षा आहे.(महत्वाचे लेखा धोरणातील परिच्छेद ड नुसार).

ब) व्यवसायावरील कोव्हिड - १९ चा परिणाम

ही कंपनी सध्या मृतप्राय अवस्थेत असून 'सतत चालू असणारी कंपनी' या तत्वावर तिचे वित्तीय विवरण पत्रक तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कंपनीच्या व्यवसायावर कोव्हिड-१९ चा कोणताही परिणाम नाही.

क) रु. ८.२३ कोटींच्या प्रगतीपथावरील कामांचे निव्वळ प्राप्य मूल्य निरंक -

चालू नसलेल्या मत्तांच्या वर्गवारीतील प्रगतीपथावरील कामांचे मूल्य रु. ८.२३ कोटी असले तरी निव्वळ प्राप्य मूल्य निरंक आहे. कारण ज्या प्रकल्पासाठी हा खर्च करण्यात आला तो आता गुंडाळण्यात आला आहे.

तथापि, याचा एकत्रित वित्तिय विवरणावर कोणताही परिणाम होत नाही कारण ''लाइन बाय लाइन कन्सोलिडेशन'' सुत्रधारी कंपनीद्वारे केले जाते.

महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लि. या उपकंपनी प्रकरणी

या उपकंपनीला रु. ५,०५४ चा तोटा झाला आहे आणि ३१.०३.२०२१ रोजी संचित तोटा रु. १,४७,०२,९८६ इतका आहे. यामुळे कंपनीच्या निव्वळ संपत्तीची ऱ्हास झाली आहे. त्यामुळे कंपनीच्या 'सतत चालू असणारी कंपनी' च्या तत्वानुसार प्रभाव होतो. आम्ही तांत्रिक गोष्टी समजून घेण्यासाठी व्यवस्थापनाशी चर्चा केली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. आगामी काळात विविध कामे आणि प्रकल्प राबवण्याची व्यवस्थापनाची योजना आहे आणि कंपनीचा व्यवसाय आणि स्थिती पाहता, कंपनीने 'सतत चालू असणारी कंपनी' या संकल्पनेच्या आधारावर केली आहेत.

कोविड - १९ मुळे उदभवलेल्या गुंतागुंती

प्रस्तूत अहवालात व्यक्त केलेले मत प्रामुख्याने व्यवस्थापनाने आम्हाला इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या माहिती, तथ्ये आणि पुरविलेल्या तपशीलावर आधारित आहे. म्हणून लेखापरिक्षणाच्या संदर्भात लेखापरिक्षण प्रक्रिया पार पाडण्यासाठी आम्हाला डिजिटलरित्या प्रदान केलेल्या माहितीवर विसंबून होतो. याशिवाय व्यवस्थापनाच्या अंदाजानुसार भारताच्या केंद्र सरकारद्वारा लादलेल्या लॉकडॉउनमुळे आणि जागतिक स्तरावर पसरलेल्या साथीच्या आजारामुळे प्रकल्पाच्या संचालनास/अंमलबजावणीस आणखी विलंब होऊ शकतो.

आम्ही तुमचे लक्ष त्या उपकंपन्याच्या लेख्याच्या टिपा क्र. ५०(१२) कडे वेधतो, ज्यामध्ये वित्तिय विवरणपत्रे तयार करण्यात गुंतलेल्या काही अंदाजाच्या विकासामध्ये गुंतलेल्या महत्त्वपूर्ण अनिश्चिततेवर कोविड १९ साथीच्या रोगाचा आणि परिणामी लॉ कडाऊनच्या प्रभावाचे व्यवस्थापनाच्या मुल्यांकनांचे वर्णन आहे, ज्यामध्ये तरलतेचे मुल्यांकन करणे आणि त्याच्या पूर्नप्राप्त करण्यायोग्य मूल्याचा समावेश आहे. परंतु त्यापुरते मर्यादित नाही त्याची मालमत्ता आणि इतर मालमत्तेच्या निव्वळ प्राप्तीयोग्य मूल्य तारखेपर्यंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, व्यवस्थापनाचा असा विश्वास आहे की वित्तिय विकासामध्ये आणखी कोणतेही समायोजन आवश्यक नाही वरिल विषयावर आमचे पात्र मत नाही.

मात्र या सर्व घटकांचा एकत्रित विवरण पत्रकावर काहीही परिणाम होणार नाही. कारण सूत्रधारी कंपनीने 'लाईन बाय लाईन' एकत्रीकरण केलेले आहे.

५) एकत्रित वि. वि. व्यतिरिक्त माहिती विषयी लेखापरिक्षकांचा अहवाल

कंपनी समुहाचे संचालक मंडळ अन्य माहितीसाठी जबाबदार आहे. या इतर माहितीमध्ये संचालकांचा अहवाल समाविष्ट होतो, मात्र त्यात एकत्रित वि. वि. आणि त्यावर आमची मते यांचा समावेश नसतो.

एकत्रित वि. वि. वर आम्ही दिलेल्या मतांमध्ये इतर माहिती वरील मतांचा समावेश नसतो. आणि त्यावर आमची निष्कर्षात्मक हमीही नसते. एकत्रित वि. वि. च्या आमच्या लेखा परिक्षणाच्या बाबत आमची जबाबदारी पुढील प्रमाणे आहे.

वरील प्रमाणे निश्चित केलेली इतर माहिती जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा तिचे वाचन करणे, आणि इतर माहिती ए. वि. वि. शी विसंगत आहे किंवा कसे हे तपासणे किंवा आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान किंवा अन्य प्रकारे आम्ही जी माहिती मिळविली आहे, त्याच्याशी तुलना करून मोठ्याप्रमाणात गैरविवरण आहे किंवा कसे हे तपासणे.

जर आम्ही केलेल्या कामाच्या आधारे आमचा निष्कर्ष इतर माहितीमधे मोठ्या प्रमाणात गैरविवरण झालेले आहे असे असेल तर लेखा परिक्षकांच्या इतर माहिती विषयीच्या जबाबदाऱ्या, यातील सूचनेप्रमाणे आम्ही हे प्रकरण प्रशासनातील संबंधितांना कळविले आहे.

आम्हाला सूचित करण्यात आले आहे की, सूत्रधारी कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी संचालकांचा अहवाल आणि संबंधित परिशिष्टे अंतिम केली जातील आणि संचालक मंडळाच्या बैठकीत स्वीकारली जातील. त्यामुळे आम्ही आत्ताच त्यावर काहीही अभिप्राय देऊ शकत नाही.

६) एकत्रित वि. वि. पत्रकासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी

या समुहाचे संचालक मंडळ हे कंपनी अधिनियम १३४(५) यात नमूद केलेल्या विषयांसाठी जबाबदार आहेत. यामध्ये भा. ले. मानके आणि इतर भारतात सर्व सामान्यपणे स्वीकारलेली लेखा धोरणे यांचा आणि अधिनियमांच्या कलम १३३ ज्याचे वाचन कंपन्यांचे (लेखे) नियमावली २०१५ यातील नियम ०७ सोबत केले जाते. (दुरुस्ती केल्याप्रमाणे) यात विनिर्देशित केल्याप्रमाणे या कंपनी समुहाचा एकत्रित वित्तीय कामगिरी, एकत्रित वित्तीय स्थिती, एकत्रित सर्वकष समभागातील एकत्रित बदल आणि एकत्रित रोकडता प्रवाह यांचे सत्य आणि रास्त दर्शन घडविणारे एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करणे याची जबाबदारी आहे.

समूहातील समाविष्ट कंपन्यांचे संबंधित संचालक मंडळ हे अधिनियमातील तरतुदीनुसार समुहातील लेख्यांचे दस्तऐवजांचे जतन करणे आणि मत्ता सुरक्षित सांभाळणे आणि त्यातील होऊ शकणाऱ्या लबाड्यांना आळा घालणे, आणि अशा लबाड्या आणि इतर अनियमितता शोधणे तसेच योग्य लेखा धोरण निवडून ते अंमलात आणणे याला जबाबदार आहेत. यासाठी त्यांना योग्य आणि सूज्ञ न्यायनिर्णय आणि अंदाज करावे लागतात आणि पुरेसे लेखा नियंत्रणे तयार करुन त्याची अंमलबजावणी करुन ती योग्य प्रकारे कार्यरत ठेवणे, आणि त्यातून लेख्यांच्या दस्तऐवजांची अचूकता आणि पुरेसेपणा याची हमी मिळविणे आणि त्याद्वारे कंपनीची सत्य व रास्त दर्शन घडविणारी आणि लबाडी किंवा चूक भूल त्यामुळे होणारे गैर विवरण नसलेली भा. ले. मानके नुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करुन ती सादर करणे.

एकत्रित वि.वि.पत्रके तयार करताना समुहातील समाविष्ट कंपन्याचे संचालक मंडळ, याचे वर या समुहाची चालू असणारा समुह आहे, याचे निर्धारण करण्याची जबाबदारी असते. चालू असलेली संस्था या विषयीच्या लागू होणाऱ्या माहितीचे प्रकटन करावे लागते त्यासाठी चालू असणे या आधारे केलेले लेखे वापरावे लागतात.

जर व्यवस्थापनास समुहाचे परिसमापन करावयाचा हेतू असेल किंवा काम थांबविण्याचे किंवा तसे करण्याशिवाय अन्य कोणताही वास्तववादी पर्याय नसेल तर वरील ठेवण्यासंबंधीची कृती करावी लागणार नाही. समूहातील संबंधित कंपन्यांचे संबंधित संचालक मंडळाकडे समुहाची वित्तीय अहवाल देण्याच्या प्रक्रियेकडे सुद्धा लक्ष देण्याची जबाबदारी असते.

७) एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचे लेखा परिक्षणाबाबत लेखापरिक्षकांची जबाबदारी

आमच्या लेखापरिक्षणाचे उद्दिष्ट आहे की, ही एकत्रित वि. वि. पत्रके संपूर्णत - कोणत्याही मोठ्या गैर विवरणापासून मुक्त आहेत किंवा कसे याची योग्य कारणासह हमी मिळविणे आणि लेखा परिक्षणाच्या अहवाल देऊन आमची मते व्यक्त करणे (गैरविवरणे लबाडी किवा त्रुटीमुळे होऊ शकतात) प्रमाणानुसार दिलेली योग्य हमी म्हणजे उच्च स्तरावरुन दिलेली खात्री असते. मात्र अशी हमी म्हणजे कोणतेही लेखा परिक्षण हे भारतीय लेखा मानके यांना तंतोतंत अनुसरुन केलेली असूनसुद्धा गैर विवरणाचा शोध लावू शकेल, याची खात्री देणे नव्हे. गैरविवरण लबाडी किंवा त्रुटी यामुळे उद्भवते. आणि अशी कृती व्यक्तीश - किंवा काही जणांनी मिळून केलेली असू शकते. एकत्रित वि. वि. पत्रकाच्या वापर करुन आर्थिक निर्णय घेणाऱ्याच्यावर त्याचा प्रभाव पाडू शकतो.

लेखा मानकांच्यानुसार केलेल्या लेखापरिक्षणाचा एक भाग म्हणून आम्ही आमच्या व्यावसायिक न्यायनिर्णय बुद्धीचा उपयोग तर करतोच, त्या सोबत लेखा परिक्षणात व्यावसायिक संशय बुद्धीने काम करतो. तसेच आम्ही पुढील प्रमाणे सुद्धा कार्य करतो.

१) एकत्रित वि. वि. पत्रकातील लबाडीमुळे किंवा त्रुटीमुळे झालेले गैर विवरणाच्या जोखिमा शोधणे आणि त्याची ओळख निश्चिती आणि मूल्यांकन करणे. या जोखिमाबाबत प्रतिसादात्मक ठरेल अशा लेखा परिक्षण पद्धतीची रचना आखणे आणि त्यानुसार लेखापरिक्षण करणे

त्यातून आमच्या मताना पुष्टी देणारे लेखापरिक्षणाचे योग्य आणि पुरेसे पुरावे मिळविणे. लबाडीने केलेल्या मोठे गैर विवरण शोधून काढणे हे काम त्रुटीमुळे झालेल्या गैरविवरणापेक्षा अधिक जोखिमेचे असते. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट कागदपत्रे तयार करणे, हेतूपुरस्सर दिशाभूल करणे, माहिती न दाखविणे चुकीची निवेदनपत्रे देणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे याचा अंतर्भाव होतो.

२) अंतर्गत वित्तीय नियंत्रणेही लेखापरिक्षणासंबंधी असून त्याद्वारे परिस्थितीनुरुप लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना करण्यास योग्य असल्याची ग्वाही मिळविणे. अधिनियमाचे कलम १४३(३)(१) यानुसार, आम्ही या समुहातील सबंधित कंपनी व तिच्या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या यामध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असून एकत्रित वि. वि. पत्रकाच्या संदर्भानुसार वित्तीय अहवाल देण्यासाठी ती प्रभावी व योग्य आहेत किंवा कसे यावर आमचे मत व्यक्त करण्यासठी आमच्यावर जबाबदारी आहे.

३) व्यवस्थापनांकडून वापरण्यात येणाऱ्या लेखा धोरणांच्या योग्यताचे, लेख्यांच्या अंदाजांची वाजवीपणा आणि समुहाच्या व्यवस्थापनाने केलेली संबंधित प्रकटने यांचे मूल्यांकन करणे.

४) व्यवस्थापनाने, कंपनीसमूह हा सतत चालू ठेवण्याच्या स्थितीत आहे अशा प्रकारे व्यवस्थापनाने लेखे केले आहेत. याबाबत निष्कर्ष काढणे, आणि आम्ही मिळविलेल्या लेखा परिक्षणाच्या पुराव्याच्या आधारे मोठ्या प्रमाणातील संबंधित घटना किंवा स्थिती यांच्यामुळे समुहाचे कार्य चालू राहण्याबाबत काही अनिश्चिता आहे आणि बराच संशय वाटतो किंवा कसे यावर अभिप्राय देणे. जर अशी मोठ्या प्रमाणात अनिश्चिती असल्याचे आमचे मत झाले तर आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालात त्याकडे आम्हाला लक्ष वेधावे लागते किंवा या विषयी प्रकटने अपूरी असल्यास आमच्या मतांमध्ये सुधारणा करावी लागते. 'सतत चालू असणारी कंपनी विषयी प्रत्यक्ष अनिश्चितता' यावरील आमच्या अहवालात परिच्छेद संदर्भासाठी वाचावा. आमचे निष्कर्ष हे आम्ही लेखा परिक्षणाच्या अखेरच्या तारखेपर्यंत मिळविलेल्या लेखा पुराव्यांच्या आधारे व्यक्त केले जातात. मात्र, भविष्यात घडणा -या घटनांमुळे समुहाचे काम चालू राहणे बंद होऊ शकते.

५) वि. वि. पत्रकांचे सादरीकरण, रचना आणि त्यात अंतर्भूत बाबी तसेच प्रकटने याचे समग्र मूल्यांकन करणे आणि व्यवहार व घटना यांचे उचित सादरीकरण वि.वि. पत्रकात झाले आहे किंवा कसे हे तपासणे.

६) समुहातील कंपन्यांची वित्तीय माहिती तसेच अंतर्गत उद्योगातील कार्य यासंबंधी पुरेसे आणि योग्य लेखा परिक्षणाचे पुरावे मिळविणे आणि एकत्रित वि. वि. वर मत व्यक्त करणे. अशा एकत्रित वि. वि. मध्ये समाविष्ट कंपन्या संस्था यांचे मागदर्शन पर्यावेक्षण कामगिरी याचीही आमच्यावर जबाबदारी असते.

भौतिकता म्हणजे एकत्रित वित्तीय विवरणापत्रामधील चुकीच्या विधानांचे परिणाम आहे. जे वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे एकत्रित वित्तिय विवरणपत्राचे वाजवी ज्ञान असलेल्या वापरकर्त्याच्या आर्थिक निर्णयावर प्रभाव टाकण्याची शक्यता निर्माण करते. यामध्ये आम्ही परिणामकारक भौतिकता आणि गुणात्मक घटकांचा विचार करतो (१) आमच्या लेखापरिक्षण कार्याच्या व्याप्तीचे नियोजन करताना आणि आमच्या कामाच्या परिणांमाचे मुल्यमापन करताना (२) एकत्रित वित्तिय विवरणपत्रावर शोधलेल्या कोणत्याही चूकीच्या विधानांच्या परिणामाचे मुल्यांकन करण्यासाठी तसेच इतर बाबींसह लेखापरिक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ आणि महत्त्वपूर्ण लेखापरिक्षण निष्कर्षाबाबत संवाद साधतो.

आम्ही प्रशासनाचे कर्ते यांच्याशी इतर विषयासोबतच आमच्या लेखा परीक्षणात आम्ही शोधलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या उणीवा यावर चर्चा करतो.

तसेच अशा प्रशासनच्या प्रमुखांना आम्ही निवेदन देतो की आम्ही स्वातंत्र्यासंबंधीच्या नैतिक गरजांची पूर्तता केलेली आहे. तसेच आमच्या स्वातंत्र्याच्या संबंधित सर्व विषयांवर चर्चा करतो अशा लागू होणाऱ्या संबंधित सुरक्षेच्या बाबी याची माहिती देतो.

प्रशासनाचा भार सांभाळणाऱ्याशी चर्चा केल्यानंतर आम्ही एकत्रित वि. वि. च्या अंत्यंत महत्वाच्या बाबी आणि लेखा परिक्षणातील महत्वाचे विषय निश्चित करतो.

त्याचे लेखा परिक्षकांच्या अहवालात वर्णन करतो मात्र जर जे विषय सार्वजनिकरीत्या जाहीर करण्यास कायद्याने मनाई असेल तर त्या बाबीचे प्रकटन टाळण्यात येतात. तसेच काही दुर्मिळ परिस्थितीत असे प्रकटने केल्याने लोकहित साध्य होण्यापेक्षा अधिक अन्य काही विपरीत परिणाम घडतील असे वाटत असेल तर तसे विषय आमच्या अहवालात न कळविण्याचा निर्णय आम्ही घेतो.

८) इतर विषय

मराविमं सूत्रधारी कं. लि.च्या प्रकरणी

आम्ही या कंपनी समुहातील तीन उपकंपन्या म्हणजे महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण आणि इतर समुहातील त्यांच्या कंपन्या यांचे एकत्रित / स्वायत्त वि. वि. पत्रकाचे लेखा परिक्षण केलेले नाही. त्याच्या वि. वि. पत्रकातील एकूण मत्ता रु. २,४३,५४४.९३ कोटीच्या असून महसूल रु. १,०८,०९०.३४ कोटी आहे. (कमी करण्यापूर्वीचा) असे एकत्रित वि. वि. मध्ये दिसते. या वित्तीय विवरणामध्ये / वित्तीय माहितील लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केले असून व्यवस्थापनाने त्याचे अहवाल आम्हाला पुरविले. आणि एकत्रित वि. वि. वरील आमचे अभिप्राय या उपकंपनीच्या रकमा आणि प्रकटने याच्याशी त्याप्रमाणे संलग्न आहेत आणि अधिनियमाचे कलम १४३(३) आणि (११) यानुसार आमचे अहवाल उपकंपन्यांच्या इतर लेखापरिक्षकांच्या अहवालावर आधारीत आहेत.

वरील विषयावर आमचे पात्र मत नाही.

महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी

सुत्रधारी कंपनी: महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कं. मर्या. -

या वर्षी कोविड-१९ साथ रोखण्यासाठी शासनाने संपूर्ण लॉकडाऊनचा अंमल लागू केला होता. त्यामुळे सुत्रधारी कंपनीच्या लेखा परिक्षणासाठी आम्ही कंपनीच्या कोणत्याही कारखान्याला किंवा जागांना प्रत्यक्ष भेट देऊ शकलो नाही. अहवालाच्या वर्षांत सांविधिक लेखा परिक्षणाचे काम 'घरी थांबून काम करणे' या तत्वानुसार करण्यात आले म्हणजेच कारखाने किंवा कंपनी कार्यालयात जाऊ न शकल्याने व्यवस्थापनाने डिजिटल माध्यमातून म्हणजे डॅश बोर्ड व्हाया व्ही पी एन लिंक मधून सॅप प्रणालीत आम्हाला प्रवेश देत वित्तीय डेटा / माहिती / अभिलेख / आधारभूत सामग्री उपलब्ध केली. त्याच्या आधारे सांविधिक लेखा परिक्षणाचे काम आम्ही केले.

२) कंपनीचे अंतर्गत लेखा परीक्षणाचे काम सनदी लेखापालांच्या बाह्य संस्थेद्वारे केले जाते. त्याचे चालू वित्तीय वर्षातील पहिल्या दोन तिमाहीचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करुन दिले. काही प्रकल्प आणि स्थळांचे चालू वित्तीय वर्षातील तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीचे अहवाल कोविड १९ लॉकडाऊनमुळे उपलब्ध झाले नाहीत.

३) यातील ०३ उपकंपन्याच्या वित्तीय विवरण पत्रकाचे / वित्तीय माहितीचे लेखा परिक्षण आम्ही केले नाही. त्यामध्ये ३१ मार्च २०२१ रोजी एकूण मत्ता रु. ६२.८४ कोटी, एकूण महसूल रु. ७०१४८/- कोटी आणि निव्वळ रोकडता प्रवाहातील आवक या तारखेला संपलेल्या वर्षी रु. २०५६ कोटी होती असे एकत्रित वि. वि. मध्ये आहे.

४) या एकत्रित वि. वि. मध्ये ३१ मार्च २०२१ रोजीच्या निव्वळ तोट्यात समुहाचा वाटा रु. ०.०५ कोटी असून तो व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या अलेखापरिक्षित वि. वि. पत्रके/ अलेखापरिक्षित वित्तीय माहितीवर आधारित आहे.

५) आम्ही नमूद करतो की या तीन उपकंपन्यांची वि. वि. पत्रके / वित्तीय माहिती यांचे लेखा परिक्षण आम्ही केले नाही. तर ते अन्य लेखा परिक्षकांनी केले असून व्यवस्थापनाने त्यांचे लेखा परीक्षण अहवाल आम्हाला व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिले व आमचा अहवाल तयार करताना त्यांचा आम्ही अभ्यास केला आहे. दोन सहयोगी कंपन्याचे वि. वि. पत्रके / वित्तीय माहिती ही त्यांच्या हंगामी अलेखापरिक्षित वित्तीय विवरण पत्रके/ वित्तीय माहिती यांच्यावर आधारित आहे. ही माहिती आम्हाला व्यवस्थापनाने दिली.

६) उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यांच्या उपरोक्त रकमा आणि प्रकटने यांच्या संदर्भात एकत्रित वि. वि. मधे आम्ही दिलेले मत आणि अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम(३) नुसार आमचा उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांच्या विषयीचा अहवाल हा पूर्णपणे इतर लेखा परिक्षकांच्या अहवालावर अवलंबून आहे.

आम्ही इतर लेखा परिक्षकांचे अहवाल, त्यांचे काम आणि व्यवस्थापनाने प्रमाणित केलेले वित्तीय विवरण पत्रे/वित्तीय माहिती यावर विसंबून आहोत. त्यामुळे एकत्रित वित्तीय विवरणांवरील आमचे मत आणि इतर कायदेशीर व नियमनांच्या आवश्यकतेवरचे आमचे अहवाल हे 'पात्रतेचे मत' नाहीत.

महापारेषण या उपकंपनीच्या प्रकरणी

जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड (जे. पी. टी. एल.) आणि महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एम. टी. सी. आय. एल.) या भारतातील सहयोगी कंपन्याचे लेखा परिक्षण आम्ही केलेले नाही. त्याचे वित्तीय विवरण पत्रकात त्या तारखेला संपलेल्या वर्षाच्या अखेर करोत्तर निव्वळ नफा रु. ६५४.९९ लाख दिसतो. तसे एकत्रित वि. वि. मधे विचारात घेतलेले आहे. या वि. वि. पत्रकाचे लेखापरिक्षण अन्य लेखापरिक्षकांनी केले आहे. त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हास दिले. त्यामुळे एकत्रित वि. वि. वरचे या रकमेच्या व प्रकटनाचा संबंधातील आमचे मत आणि अधिनियमाच्या कलम १४३ नुसार आमचे वरील कंपन्याबाबत अहवाल हे पूर्णपणे अन्य लेखापरिक्षकांच्या अहवालावर आधारीत आहेत.

१) भा. ले. मानकानुसारच्या एकत्रित वि. वि. पत्रक तयार आणि सादर करणे यांचा आधारातील परिच्छदेतील महत्त्वपूर्ण लेखा धोरणांमधील परिच्छेद ब कडे लक्ष वेधतो. कंपनीने तिच्या संपूर्ण मालकीची एक उपकंपनी जिचे नाव 'खारघर विक्रोली ट्रान्समिशन प्रा. लि. (के.व्ही.टी.पी.एल.)' आहे, या समुहात समाविष्ट केलेली नाही. म्हणून याविषयी आमच्या मतात सुधारणा केलेली नाही.

२) या वर्षी कोवीडसाठी शासनाने संपूर्ण लॉकडाऊन लागू केल्याने अहवाल वर्षातील लेखापरिक्षण प्रक्रियेचे अंतिमीकरण दूरवरून करण्यात आले. (म्हणजेच कंपनीच्या कार्यालया व्यतिरिक्त अन्य जागेवरुन) या साठी व्यवस्थापनाने डिजीटल माध्यम उपलब्ध करुन दिलेली आधार सामग्री (डेटा) उपलब्ध व शक्य होईल तेव्हढे तपशील आणि वित्तीय माहिती/अहवाल या मर्यादेत हे काम केले. लेखा परीक्षणादरम्यान आवश्यक माहितीची खातरजमा आणि पर्यायी पद्धतीने केली.

महावितरण या उपकंपनीच्या प्रकरणी

या उपकंपनीच्या स्वायत्त वि. वि. पत्रकाचे आणि अन्य माहितीचे आम्ही लेखापरिक्षण केलेले नाही. त्यांच्या वि. वि. पत्रकात ३१ मार्च २०२१ रोजी एकूण मत्ता रु. १२.१२ लाख असून एकूण महसूल रु. ०.७० लाख आणि त्यातारखेस संपलेल्या वर्षाचा निव्वळ रोकड प्रवाह ०.०१२ लाख होता. ही वि. वि. पत्रे आणि इतर वित्तीय माहितीचे लेखा परिक्षण अन्य लेखापरिक्षकांनी केले असून त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला दिले. एकत्रित वि. वि. पत्रकातील या उपकंपन्याचे संबंधित रक्कम आणि प्रकटने यावर आमचे मत आणि अहवाल अधिनियमच्या कमल १४३ मधील उपकलम(३) यातील अटी प्रमाणे दिले आहे, आणि ते पूर्णपणे इतर लेखा परिक्षकांच्या अहवालावर आधारलेले आहेत.

९) कायदेशीर आणि नियमनांच्या आवश्यकतेवरील अहवाल

१) कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) यातील आवश्यकता नुसार भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम(५) नुसार दिलेले निर्देश / उपनिर्देश यानुसारचे अहवाल कंपनीच्या व उपकंपन्यांचा स्वायत्त वि.वि. पत्रका सोबत दिले आहेत. यामुळे ते अहवाल येथे या संदर्भात पुन्हा दिलेले नाहीत.

२) अधिनियमांचे कलम १४३(३) यातील गरजेनुसार, आमच्या लेखा परिक्षणाच्या आम्ही खालील प्रमाणे माहिती देत आहोत.

अ) आम्ही सर्व माहिती मागवली आणि मिळविली, याला पुढील अपवाद आहेत. आमच्या अहवालातील पात्र मतांचा आधार या परिच्छेदातील विषयाच्या संभाव्य परिणामाचा आणि उपकंपन्या महानिर्मिती मधील त्रयस्थ पक्षातील शिलकी कायम करणे याचे सूत्रधारी कंपनी च्या एकत्रित वि. वि. पत्रकावर जर काही परिणाम होतील त्याचा अंदाज करता येत नाही. आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या मते आमच्या लेखा परिक्षणाच्या हेतूसाठी असे अपवाद आवश्यक होते.

ब) आमच्या मते आणि 'आमच्या पात्र मतांचा आधार' या परिच्छेदातील मजकूराचा अपवाद करता, असे दिसते की या कंपनी समुहात कायद्याप्रमाणे आवश्यक अशा प्रकारे लेखा वह्या यांचे व्यवस्थित जतन केलेले आहे. असे आम्ही केलेल्या या लेखानोंद वह्यांच्या तपासणीत दिसून आले.

क) या अहवाला सोबत जोडलेल्या खालील वि.वि. पत्रके भा. ले. मानकानुसार एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा -तोटा पत्रक (इतर सर्वंकष उत्पन्नासह), एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक आणि इक्विटी बदलांचे एकत्रित विवरण पत्रकातील बरीच माहिती ही संबंधित लेखा वह्यातील नोंदीशी तंतोतंत जुळतात.

ड) पात्र मतांचा आधार यात वर्णन केलेल्या बाबींशी अधीन राहून आमचे मत असे आहे की, उपरोक्त भा. ले. मानक नुसार केलेली एकत्रित वि. वि. अधिनयमाच्या कलम १३३ यात विनिर्देशित केलेल्या भारतीय लेखा मानकांची पूर्तता करतात.

इ) पात्र मतांचा आधार आणि भर देण्याची प्रकरणे यात वर्णन केलेल्या बाबींचा समुहाच्या कामावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे आमचे मत आहे.

फ) भारत सरकारची दि. ०५ जून २०१५ रोजी जारी केलेली अधिसूचना क्र. जी एस आर ४६३(३) यानुसार कंपनी अधिनियम २००५ च्या कलम १६४(२) च्या तरतुदी या कंपनीस लागू नाहीत.

ग) लेखे यांची देखभाल जतन करणे आणि इतर संलग्न विषयावरील पात्र मतांचा आधार या शीर्षकाच्या परिच्छेदात नमूद आहेत.

ह) वित्तीय अहवाला करिता अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पर्याप्तता आणि अशा वित्तीय नियंत्रणाची समुहाची परिणामकारकता यासाठी जोडलेला वेगळा अहवाल जोडपत्र 'अ' यात दिला आहे.

(य) अधिनियमाचे कलम १९७(१६) यातील तरतुदी नुसार आम्ही खालील प्रमाणे माहिती देत आहोत.

अधिनियमाचे कलम २(४५) यातील अर्थानुसार हा कंपनी समूह एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे अधिनियमातील १९७ मधील व्यवस्थापनांचे पारिश्रामिक याच्या तरतुदी, कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना क्र. जी एस आर ४६३(इ) ०५ जून २०१५ नुसार या कंपनी समुहास लागू नाहीत.

ज) कंपन्यांचे (लेखापरिक्षण आणि लेखापरिक्षक) नियमावली वर्ष २०१४ दुरुस्ती नंतरची यातील नियम ११ नुसार लेखापरिक्षक यांच्या अहवालात समाविष्ट करण्याचे इतर विषय याबाबत आमचे मत आणि आमची सर्वोतपरी माहिती आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार खालील माहिती देण्यात येते -

अ) या एकत्रित वि. वि. मध्ये वित्तीय बाबींवर प्रलंबित खटल्याचे परिणाम याची माहिती प्रकट केली आहे. यासाठी एकत्रित वि.वि. पत्रकाचा टिपा क्र. ४२ पहावी. पात्र मत्तांचा आधार या परिच्छदेत वर्णन केलेला बाबींच्या परिणामांच्या अधीन राहून (प्रमाणानुसार किंवा अन्यथा) प्रकटने केली आहेत. (महावितरण आणि महापारेषण या उपकंपन्यांच्या पात्र मताच्या आधारावरील महापारेषणचा परिच्छेद १९ पहावा.)

ब) पात्र मत्तांचा आधार या परिच्छदेत वर्णन केलेला बाबींच्या परिणामांमुळे (प्रमाणबध्द किंवा अन्यथा) सदर कंपनी समुहाने दीर्घ मुदतीच्या कंत्राटामध्ये जर कुठले मोठे आणि अंदाज असलेले तोटे झाले तर त्यासाठी पुरेशी तरतुद केली किंवा कसे यावर काहीही निवेदन आम्ही करु शकत नाही. लागू होणारे कायदे आणि लेख्यांची मानके यानुसार अशी पर्याप्ती तरतुद करणे आवश्यक असते. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच इतर लेखापरिक्षकांचे अहवालाच्या आधारे या समुहातील कंपन्यांनी कोणत्याही डेरिव्हेटीव्ह करारासह दीर्घ मुदतीच्या करारात भाग घेतलेला नाही.

क) सूत्रधारी कंपनी आणि अन्य कोणत्याही उपकंपन्यांकडे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरण करण्याची गरज नाही.

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता,
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यू

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन -२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

स्थळ - पुणे
दिनांक - २८.०४.२०२२

स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवालाचे 'जोडपत्र अ'

कंपनी अधिनियम २०१३ कलम १४३ मधील उपकलम ३, खंड (१) यानुसार वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची माहिती याविषयी आमच्या समान तारखेच्या अहवालात इतर कायदेशिर आणि नियमनाच्या आवश्यकता या शीर्षकाच्या परिच्छेदात मुद्दा ९(२) (ह) येथे याचा संदर्भ दिला आहे.

मत-

या कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात आमच्या लेखापरिक्षणासोबत, आम्ही मराविमं सुत्रधारी कंपनी मर्यादित (यापूढे कंपनी असे संबोधले आहे) आणि तिच्या उपकंपन्याचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण वित्तयी प्रतिवेदन देण्यासाठी केले. ही कंपनी आणि तिच्या उपकंपन्या भारतात संस्थापित झालेल्या आहेत. उपकंपन्यांच लेखा परिक्षकांनी ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षांसाठी वित्तीय माहिती देण्यासाठी त्या उप कंपन्यांतील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण केले.

मराविमं सूत्रधारी कंपनी प्रकरणी

आमच्या मते या कंपनीमधे निवेदनासाठी सर्वोतपरीने पर्याप्त अंतर्गत वित्तीय प्रणाली, वित्तीय प्रतीवेदनासाठी असून ती ३१ मार्च २०२१ पर्यंत प्रभावीरित्या कार्यरत होती. ती कंपनीने वित्तीय माहितीसाठी जे निकष स्थापित केले आहेत, त्या आधारे ही आधारीत आहे. भारतीय सनदी लेखाप संस्थेने वित्तीय प्रतिवेदन देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे यावर एक मार्गदर्शक सूचना वितरीत केली आहे. त्यात दिलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणासाठी घटक दिले आहेत. त्याचा विचार करुन ही नियंत्रणे या कंपनीत आहेत.

महावितरण या उपकंपनी विषयी

सूत्रधारी कंपनी (महावितरण) (मतांचा अस्वीकार) -

आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे, या वर्षी या सुत्रधारी कंपनीने तिच्या वित्तीय विवरण पत्राच्या संदर्भानुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यासाठी एक आकृतीबंध तयार केलेला आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिवेदनांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे या विषयी जी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. (मार्गदर्शक टिपा) याच्या आधारे या आकृती बंधातील महत्वाचे घटक ठरविले आहेत. यानंतर सूत्रधारी कंपनीने, ३१ मार्च २०२१ पूर्वी आणि दरम्यान काही धोके आणि नियंत्रणाची ओळख निश्चिती केली. आणि अशा नियंत्रणाचा प्रवर्तनावर अंशत - परिक्षण सुद्धा केले.

आम्हाला माहिती देण्यात आली की, ३१ मार्च २०२१ नंतर उर्वरित धोके आणि नियंत्रणे यांच्या प्रवर्तनावरील परिणामांचे परिक्षण करण्यात आले. मात्र आम्ही सदर धोके आणि नियंत्रणे यांची रचना आणि प्रवर्तनातील परिणामकारकता यांचे परिक्षण ३१ मार्च २०२१ नंतर करु शकलो. कागदोपत्री नोंदलेले सर्व धोके, नियंत्रणे आणि परिवर्तनातील त्यांची परिणामकारकता याच्या रचनेचे परिक्षणाच्या ३१ मार्च २०२१ पर्यंत केलेले नसल्याने त्याची पुरेशी उपयुक्तता आणि योग्यता याचे लेखा परिक्षणात्मक पुरावे नसल्यामुळे या कंपनीमधे वित्तीय प्रतिवेदन करण्यच्या दृष्टीने, पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावी होती किंवा कसे, ३१ मार्च २०२१ रोजी या कंपनीमधे वि. वि. पत्रकासाठी वित्तीय प्रतिवेदनाचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असण्याबाबत आम्ही कोणतेही मत व्यक्त करीत नाही.

महावितरणची उपकंपनी (मत)

उपकंपनीचे लेखा परिक्षकांच्या मते, दि. ३१ मार्च २०२१ रोजी या उपकंपनी वित्त प्रतिवेदनासाठीचा अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी होती, आणि ती प्रभावीरित्या कार्यरत होती. त्यांची रचना कंपनीने स्थापित केलेल्या वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण यासाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे होती, व त्याआधारे त्यातील घटक होते.

महानिर्मिती उपकंपनीच्या प्रकरणी

पात्र मत

ही एक शासकीय कंपनी असल्यामुळे कंपनीची वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे याची रचना विविध पुस्तिका,

नियमावल्या, परिपत्रके आणि वेळोवेळी दिलेल्या सूचना यांच्यानुसार तयार केलेली आहे. कंपनीच्या वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावरचे आमचे मत त्यानी केलेल्या व्याख्येनुसार आणि सॅप ईआरपी यंत्रणेतील नियंत्रणांना लक्षात घेऊन व्यक्त केले आहे. वि. वि. पत्रकांच्या आमच्या लेखा परिक्षणाच्य काळात आम्ही वित्तीय प्रतिवेदनासाठी परिक्षण तत्वानुसार आणि नियंत्रण प्रक्रियेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचा पर्याप्ततेच्या आढाव्याच्या आधारे नियंत्रण प्रक्रीयेची रचना आणि तिच्या पुरेसेपणाची रचना आणि प्रभाव या दोन्ही मधे काही त्रुटी शोधल्या. त्याची माहिती वरील ठपात्र मत्तांचा आधारठ या परिच्छेदात दिली आहे.

पात्र मतांचा आधार या परिच्छेद (१) यामध्ये सांगितलेले मोठ्या दुर्बलतेचे झालेले/होऊ शकणारे परिणाम यांना वगळल्यानंतर. नियंत्रणाच्या कसोट्याचे यश यावर आमचे मत असे आहे की, कंपनीने ३१ मार्च २०२१ पर्यंत सर्वोतोपरी मोठ्या प्रमाणात वित्तीय प्रतिवेदनेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे कार्यरत ठेवली होती, आणि अशा प्रतिवेदनेसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावी रित्या चालू होती.

आम्ही ओळखून काढलेल्या मोठ्या दुर्बलतांचा विचार करुन ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या आमच्या लेखापरिक्षण लागू केलेल्या लेखापरिक्षणांच्या चाचण्यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा यांची माहिती वर दिली आहे. ती कंपनीच्या एकत्रित वि. वि. पत्रकांच्या संदर्भात आहे.

परिच्छेद (१) यात सांगितलेल्या मोठ्या दुर्बलता या प्रामुख्याने पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमांची समायोजने वेळेवर करणे आणि त्यामुळे दायित्वांची तरतूद करणे यांची आहेत. त्याचा परिणाम ए. वि. वि. वरील आमच्या मत्तांवर झाला आहे. त्यावर आम्ही आमच्या मुख्य लेखापरिक्षण अहवालात एक पात्र मत दिले आहे.

पात्र माताचा आधार यातील परिच्छेद (२ आणि ३) यांत नमूद केलेली अन्य मोठी दुर्बलता याचा एकत्रित वि. वि. वरील आमच्या मतांना बाधा येत नाही.

महागुज कोलायरीज लि. या उपकंपनीचे लेखापरिक्षण आम्ही केलेले नाही. त्या अन्य लेखापरिक्षकांनी खालील प्रमाणे अहवाल दिला आहे -

मतांचा अस्वीकार -

आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिनिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करणे याबाबत दिलेल्या मार्गदर्शक टिपणी मधे नमुद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक या आधारे किंवा त्याचा विचार करुन वित्तीय प्रतिवेदन करण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केलेली नाही. या कारणांमुळे या कंपनीमधे दि. ३१ मार्च २०२१ रोजी वित्तीय प्रतिवेदनासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावरित्या कार्यरत होती, किंवा कसे यावर अभिप्राय देण्यासाठी, पुरेसे लेखापरिक्षणाचे पुरावे मिळवू शकलो नाही.

कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण करण्यासाठी आम्ही काही कसोट्या लागू केल्या होत्या. त्या कसोट्यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा यानुसार आम्ही उपरोक्त ठमतांचा अस्वीकारठ विचारात घेतला आहे. आमच्या मुख्य लेखापरिक्षणाच्या अहवाल ''भर दिलेले विषय'' या परिच्छेदाच्या अधीन राहून उपरोक्त मतांचा अस्वीकार हा कंपनीच्या वि. वि. पत्रकांवर आम्ही दिलेल्या मतांना बाधा करत नाही.

वित्तीय प्रतिवेदनासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांमधे प्रत्यक्ष दुर्बलता ही एका किंवा अनेक उणीवांचे मिश्रण असते. यामुळे कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम विवरणपत्रकात मोठ्या प्रमाणात गैर विवरण होऊ शकते, त्याला वेळेवर आळा घालणे किंवा शोध घेणे शक्य नसते.

महापारेषण या उपकंपनीचे प्रकरणी

या कंपनीमधील वित्तीय प्रतिवेदनासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आणि तिची रचना यात सुधारणा करण्याची गरज आहे. कारण त्यामधील नियंत्रणाच्या दृष्टीने असलेल्या काही चुका काढून टाकावे लागतील आणि ती सर्वसमावेशक करावी लागेल. प्रक्रिया नियंत्रण सारणी यातील निवडक पडताळणी केली. ही सारणी आम्हाला उपलब्ध करुन दिली असता काही ओळखीच्या प्रक्रिया आणि जोखिम यांच्यासाठी ती अग्रवात केली पाहिजे तसेच वित्तीय प्रतिवेदनासाठीच्या वित्तीय अंतर्गत नियंत्रणाचे निकष कंपनीने स्थापित केली आहे. त्याचा विचार करता मार्गदर्शक टिपात सांगितलेले अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक

घटक, प्रक्रिया नियंत्रणाच्या प्रवर्तनातील प्रभाव आणि योग्य कागदपत्रे यांचा समावेश कंपनीचे आकारास व व्यवहारास सुसंगत अशा प्रकारे बळकट केला पाहिजे.

'इतर विषय' या शीर्षकाच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रकरणी सहयोगी कंपनीचे भारतात संस्थापित झाल्या आहेत. त्याचे लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केले. त्याचे अहवाल विचारत घेतल्या तेव्हा असे दिसून आले की या सहयोगी कंपन्यामध्ये दि. ३१ मार्च २०२१ रोजी वित्तीय प्रतिवेदन करण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रणाली सर्वोतपरी पुरेशी होती आणि प्रभावीरित्या कार्यरत होती. या सहयोगी कंपन्यांनी वित्तीय प्रतिवेदनाचे निकषाच्या आधारे सनदीलेखापाल संस्थेच्या मार्गदर्शक टिपे प्रमाणे आवश्यक घटक विचारात घेतले आहेत असे मत आहे.

पात्र मतांचा आधार -

महानिर्मिती या कंपनीच्या प्रकरणी -

आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरण आणि आमचे लेखापरिक्षण यानुसार सुत्रधारी कंपनीच्या प्रकरणी ३१ मार्च २०२१ खालील दुर्बलताची ओळख निश्चिती झाली, जेथे अंतर्गत नियंत्रणे प्रभावीरित्या कार्यरत नव्हती.

पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमांची वेळेवर समायोजने करणे आणि त्या दायित्वाची तरतूद करणे याबाबतची कंपनीची अंतर्गत नियंत्रणे;

परिसमापनातील नुकसानाची वसुली आणि अंतिमीकरण याविषयी कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे / धोरणेः

उपकंपन्यामधील कर्मचाऱ्यांचे दस्तऐवजांचे व्यवस्थापनाबाबत सूत्रधारी कंपनीचे वित्तीय नियंत्रण आणि सॅप प्रणालीतील वेतन आणि वित्तीय मोड्युलमधील आकडेवारींचा परस्परसंबंध याबद्दलची माहिती पाहता आली नाही आणि त्यांचा ताळमेळ घालता आला नाही.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणांविषयी व्यवस्थापनाची जबाबदारी

ज्या कंपन्या आणि उपकंपन्या भारत देशात संस्थापीत झालेल्या आहेत, त्यांचे संबंधित संचालक मंडळ एकत्रित वि. वि. पत्रकाच्या संदर्भात करावयाच्या प्रतिवेदनासाठी अंतर्गत नियंत्रणे स्थापन करणे आणि त्यांचे संचालन करणे, याची जबाबदारी असते. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय प्रतिवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे, यावर दिलेल्या मार्गदर्शक सूचनेत याचे आवश्यक घटक दिले असून त्यानुसार प्रत्येक कंपनीने निकषांच्या आधारे ही कृती करावी लागते.

या जबाबदारी मधे कंपनीचा उद्योग व्यवसाय कार्यक्षमरित्या व्यवस्थित चालावा यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि जतन करणे यांची अंतर्भाव असतो. तसेच कंपनीच्या संबंधित धोरणांना धरुन कामे करणे, मत्तांचे रक्षण आणि लबाडी किंवा चुका यांना आळा घालणे व त्या शोधणे ही कामे पण समाविष्ट आहेत. कंपनी अधिनियम २०१३ मधील आवश्यकतेनुसार अचूक आणि परिपूर्ण लेख्यांचे दस्ताऐवज तयार करणे आणि वेळेवर वित्तीय माहिती तयार करणे आवश्यक असते.

लेखापरिक्षकांची जबाबदारी

कंपनी आणि तिच्या उपकंपन्या या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या आहेत, त्याच्या वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वत्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करुन त्याआधारे अभिप्राय व्यक्त करणे, ही आमची जबाबदारी आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी वित्तीय निवेदनांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखा परिक्षण यावर एक मार्गदर्शक टिपा तयार केली आहे. तसेच कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (१०) यामधे लेखा परिक्षणांची मानके विहित केली आहेत. ती एकत्रित वि. वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणात ज्या मर्यादेपर्यंत लागू होतात, त्या प्रमाणे आम्ही आमचे लेखापरिक्षण केले आहे. उपरोक्त मानके आणि मार्गदर्शक सूचना यानुसार नैतिक गरजांची पूर्तता करणे, आणि एकत्रित वि. वि. पत्रकांच्या संदर्भात वित्तीय निवेदने देण्याच्या दृष्टीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केली आहेत, आणि ते प्रभावीरित्या मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत, याच रास्त व प्रमाणशिर हमी मिळविणे या दृष्टिने आम्ही लेखा परिक्षण करतो.

आमच्या लेखा परिक्षणामध्ये वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पर्याप्त असल्याचे लेखापरिक्षणातील पुरावे मिळावे या हेतूने कामाची पद्धती निश्चित केली जाते. एकत्रित वि. वि. पत्रकाचे संदर्भात वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे

लेखापरिक्षण करुन त्याच्या उपयुक्ततेची हमी मिळविणे त्यात मोठ्या प्रमाणात दुर्बलतेची जोखीम असल्यास तिचे मूल्यांकन करणे आणि त्या जोखिमेच्या मुल्यांकनाचे आधारे अंतर्गत नियंत्रणाची रचना करून काम करणे, दुर्बल जागा शोधणे आणि प्रभावीपणाचे मूल्यांकन करणे अशा प्रकारे प्रक्रियेची निवड ही लेखा परिक्षकांची न्याय निर्णय करण्याच्या बुद्धीवर अवलंबून असते. एकत्रित वि. वि. मधे कोणतेही मोठे गैर विवरण, लबाडी किंवा चुकीने झालेले नाही याचे निर्धारण करावे लागते.

आमचा विश्वास आहे कि आम्ही आमचा लेखा परिक्षणातून आणि उपकंपन्यांचा लेखापरिक्षकांनी त्याचा लेखापरिक्षणातून असे लेखी परिक्षणात्मक पुरावे मिळविले आहेत ते येथे खाली दिलेल्या इतर विषय या परिच्छेदात संदर्भ दिल्याप्रमाणे ते पुरेसे व योग्य आहेत आणि वित्तीय निवेदनासाठीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमचे लेखा परिक्षणाच्या मतांना पुरेसा आणि योग्य आधार देतात.

वित्तीय अहवालांवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा अर्थ

एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचा संदर्भात वित्तीय अहवालावरील कंपनीचे अंर्तगत वित्तीय नियंत्रण ही वित्तीय अहावलाच्या विश्वासार्हते बद्दल वाजवी हमी देण्यासाठी सामान्यत - स्वीकारल्या गेलेल्या लेखातत्वानूसार बाह्य हेतूसाठी वित्तीय विवरण तयार करण्यासाठी तयार केलेली प्रक्रिया आहे. एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या संदर्भात वित्तीय अहवालावरील कंपनीच्या अंर्तगत वित्तीय नियंत्रणामध्ये धोरणांचा व प्रक्रियांचा समावेश असतो.

१. कंपनीच्या मालमत्तेचे व्यवहार आणि रचना वाजवी तपशिलात अचूक आणि निष्पक्षपणे प्रतिवेदन करणाऱ्या नोंदींच्या देखभालीशी संबंधित.

२. वाजवी हमी द्यावी की सामान्यत - स्वीकृत लेखा तत्वानुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रक तयार करण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यकतेनुसार व्यवहार नोंदलेले जातात आणि कंपनीच्या जमा आणि खर्च कंपनीच्या व्यवस्थापन व संचालकांच्या मान्यतेनुसार केले जात आहे; आणि

३. कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत अधिग्रहण वापर किंवा विल्हेवाट रोखणे किंवा वेळेवर शोधणे यासंबंधी वाजवी हमी द्यावी ज्याचा एकत्रित वित्तीय विवरणावर मोठा परिणाम होऊ शकतो..

एकत्रित वित्तीय पत्रकाच्या संदर्भात वित्तीय निवेदनासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा -

वित्तीय निवेदनासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या काही अंगभूत मर्यादा आहेत. यामध्ये संगनमत किंवा अयोग्य व्यवस्थापन ही अंतर्गत नियंत्रणांना वरचढ होऊ शकतात. चुका किंवा लबाडी यामुळे गैर विवरण होते आणि ते शोधले जात नाही. तसेच भविष्यासंबंधी केलेले अंदाज त्या वेळेची परिस्थिती बदलल्यास अपुरे ठरतात आणि ते जोखमांच्या अधीन असतात. किंवा धोरणात मोठ्या प्रमाणात बदल होणे किंवा पद्धती जादा खराब होणे यामुळे ते अपुरे होतात.

इतर विषय

सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी

अधिनियमाचे कलम १४३(३)(१) यानुसार एकत्रित वि. वि. च्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव आणि पुरेसेपणा यावरचा आमचा अहवाल, उपकंपन्यांच्या बाबत त्यांच्या संबंधित लेखा परिक्षकांच्या अहवालावर संपूर्णपणे अवलंबून आहे.

वरील विषयावर आमचे पात्र मत नाही.

महावितरण या उपकंपनी प्रकरणी

अधिनियमांचे कलम १४३(३)(१)यानुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा प्रभाव व पुरेसेपणा या वरचा आमचा अहवाल, उपकंपन्यांच्या बाबत त्यांच्या संबंधित लेखापरिक्षकांच्या अहवालावर संपूर्णपणे अवलंबून आहे.

महानिर्मिती या उपकंपनीच्या प्रकरणी

अहवाल वर्षात या सूत्रधारी कंपनीच्या कारखाने किंवा अन्य जागा यांना आम्ही कोविड - १९ मुळे संपूर्ण शासकीय लॉकडाऊन असल्याने प्रत्यक्ष भेट देऊन काम करू शकलो नाही. या अहवालाच्या वर्षात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे संबंधीत लेखापरिक्षणाची

कामे ङ्घघरून काम करणेङ्ग या पध्दतीने करण्यात आली. म्हणून कंपनीचे कारखाने आणि कार्यालये या ऐवजी व्यवस्थापनाने वित्तीय आधारसामग्री/ माहिती /दस्तऐवज आधारभूत कागदपत्रे ही डिजीटल माध्यमातून सॅप ॲक्सेस द्वारे डॅश बोर्ड / व्ही पी एन लिंक मार्फत उपलब्ध करुन दिल्यावर त्यानुसार करण्यात आली.

अधिनियमाचे कलम १४३(३) नुसार तीन उपकंपन्यामधील अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्थेचे लेखापरिक्षणाचे अहवाल त्या कंपन्यांच्या लेखापरिक्षकांच्या अहवालावर विसंबून केलेले आहेत. या कंपन्या भारतात संस्थापित आहेत. आम्ही असे नमूद करतो की, कंपनीच्या दोन सहयोगी कंपनीकडून अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. वरील विषयावर आमचे मत पात्र केलेले नाही.

महापारेषण या उपकंपनी प्रकरणी

अधिनियमाचे कलम १४३(३) (१) यानुसार, महापारेषणच्या भारतात संस्थापित झालेल्या दोन सहयोगी कंपन्यातील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे अहवाल त्या कंपन्याच्या संबंधित लेखा परिक्षकाच्या अहवालावर आधारीत आहे.

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता,
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५ डब्ल्यू

सीए सुहास पी. बोरा
भागीदार
सदस्यता क्र. ०३९७६५
यूडीआयएन -२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

स्थळ - पुणे
दिनांक - २८.०४.२०२२

भाग १ - ताळेबंद

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या ताळेबंद ३१ मार्च २०२१ रोजीचे एकत्रित विवरण पत्रक (रक्कम रु. कोटीत)

	तपशील	टिपा क्रं.	३१ मार्च २०२१ या वर्षासाठी	३१ मार्च २०२० या वर्षासाठी (सुधारित)	१ एप्रिल २०२१ या वर्षासाठी (सुधारित)
	१		२	३	
	मत्ता				
(१)	**चालू नसलेल्या मत्ता**				
अ	मालमत्तता, कारखाने व साधने	२	११५,०३३.२०	११६,०७०.६१	१,१६,८४४.७३
	वजा - निकामी साहीत्याची तरतूद				
	निव्वळ मालमत्ता, कारखाने व साधने		**११५,०३३.२०**	**११६,०७०.६१**	**१,१६,८४४.७३**
ब	मत्ता वापरण्याचे हक्क	२ अ	४,२२६.२०	४,४९१.१४	१२०.७६
क	प्रगती पथावरील भांडवली कामे	२ ब	१०,८८८.१६	९,६६०.७८	६,६९२.४८
	वजा-निकामी साहित्याची तरतूद				
	निव्वळ मालमत्ता, कारखाने व साधने		१०,८८८.१६	९,६६०.७८	६,६९२.४८
ड	गुंतवणूकीच्या मालमत्ता				
इ	ख्याती मुल्य				
फ	इतर अमूर्त मत्ता	२ क	१७.५५	९.२९	१५.६४
ग	अमूर्त मत्ता विकसनशील	२ ड	२३९.६८	१४५.४७	१४५.३०
ह	उपकंपनी, सहयोगी कंपनी व संयुक्त साहसे यात गुंतवणूकी	३	८.१२	३.१८	-४.३७
य	वित्तीय मत्ता				
	(१) गुंतवणूकी	४	१,१५१.६९	१,१७१.०७	९४४.४३
	(२) व्यापारी येणी			-	-
	(३) कर्जे	५	१.२४	१.५४	२.२७
	(४) इतर	६	८७८.८१	८३३.६८	७२८.८५
ज	स्थगीत कर मत्ता (निव्वळ)				
	चालू नसलेल्या कर मत्ता (निव्वळ)	७	३९७.९४	६१४.१८	५९८.३५
च	चालू नसलेल्या इतर मत्ता	८	१,३२३.९१	१,३८१.४५	२,१२०.७२
(२)	**चालू मत्ता**				
अ	वस्तू माल सूची	९	१,४७५.९२	२,४९१.०४	१,९७२.२०
ब	वित्तीय मत्ता				
	(१) गुंतवणूकी	१०	५१२.५९	४२८.३०	१३०.२३
	(२) व्यापारी येणी	११	४९,७२४.८७	३९,३६६.८१	४०,५९५.८३
	(३) रोख व रोख समतूल्य	१२	१,२५९.९२	२,५५९.५५	१,३७०.६२
	(४) बँकेतील शिल्लक (वरील (३) व्यतिरिक्त)		-	-	
	(५) कर्ज	१३	४०.१८	१६.१६	१७.७६
	(६) इतर	१४	१०,४६४.९१	१०,७७५.०५	१२,८४०.५५
क	चालू कर मत्ता (निव्वळ)		-	-	-
ड	इतर चालू मत्ता (निव्वळ)	१५	९३७.८८	१,२९९.५४	१,४९१.९०
	विक्रीसाठीच्या मत्ता/विल्हेवाटीच्या गटात विक्रीसाठी समाविष्ट मत्ता	१६	२५८.१४	२६१.९८	२३६.८३
	नियामक मत्ता	१७	१९,०७८.६८	१६,१६९.४९	९,१५८.७४
	एकूण मत्ता		**२,१७,९१९.५९**	**२,०७,७५०.२९**	**१,९६,०२३.८३**
	समभाग आणि दायित्वे				

	समभाग				
अ	समभाग भांडवल	१८	८९,१७३.७१	८९,१०९.७१	८८,९४०.२३
ब	इतर समभाग	१९	-३६,३७१.०८	-३३,७३०.००	-३२,९३२.६३
	पालकांचे मालकांसह देय समभाग		**५२,८०२.६३**	**५५,३७९.७१**	**५६,००७.६०**
	महानिर्मिती व्यतिरिक्त विनानियंत्रणाचे हितसंबंध		२१.४२	२१.५२	२१.७१
			५२,८२४.०५	**५५,४०१.२३**	**५६,०२९.३०**
	दायित्वे				
(१)	**चालू नसलेली दायित्वे**				
अ	वित्तीय दायित्वे				
	(१) कर्जे - उसनवारी	२०	५४,३४८.७५	५६,१८७.७०	५१,१९१.८९
	(२) व्यापारी येणी		-	-	
	(३) इतर वित्तीय दायित्वे (ब मध्ये विनिर्देशित केलेल्या व्यतिरिक्त)	२१	१४,९४८.४५	१४,५५१.८१	११,०५४.१८
	(४) इतर विना-वित्तीय दायित्वे				
ब	तरतूदी	२२	६,४१५.९३	६,११३.१४	५,२१९.३४
क	स्थगित कर दायित्वे (निव्वळ)	२३	३,६२७.१५	३,३०७.३६	३,२०१.३७
ड	इतर चालू नसलेली दायित्वे	२४	९,८९३.८१	९,६५३.४९	९,५११.२२
(२)	**चालू दायित्वे**				
अ	वित्तीय दायित्वे				
	(१) कर्जे - उसनवारी	२५	१४,१९१.६३	१४,३७८.५१	१३,७७०.४४
	(२) व्यापारी येणी	२६	१७,२४१.६०	७,३९७.३८	१६,५०७.२६
	(३) इतर वित्तीय दायित्वे (ब मध्ये विनिर्देशित केलेल्या व्यतिरिक्त)	२७	३५,५९२.१२	२९,६१२.९५	२१,४६२.२१
ब	इतर चालू दायित्वे	२८	३,१४५.३३	४,१४१.०६	३,०२२.०२
क	तरतूदी	२९	५,६९०.७७	६,८९३.६१	४,८०५.२२
ड	चालू कर दायित्वे (निव्वळ)	३०	-	११२.०६	२४९.३६
	विक्रीसाठी वर्गीक्रत करू न धारण केलेली विल्हेवाटी गटात समाविष्ट केलेली दायित्वे				
	एकूण दायित्वे आणि समभाग		**२१७,९१९.५९**	**२०७,७५०.२९**	**१,९६,०२३.८३**
	महत्वाची लेखा धोरणे	**१**			
	लेख्यांवरील टिपा	**२ ते ५६**			

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी.बोरा
भागीदार
सदस्यता क्र.०३९७६५
यूडीआयएन:२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

रविंद्र सावंत
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी, प्रभारी
(डीआयएन:०८७७८४२४)

जगन्नाथन सरवानासामी
संचालक (सु व अं)
(डीआयएन:०९२९९०६४)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:०१८४३०९७)

चंद्रशेखर गद्रे
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), प्रभारी

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए२२९८०

स्थळ: पूणे
तारीख: २८.०४.२०२२

स्थळ: मुंबई
तारीख: २८.०४.२०२२

भाग २ - नफा आणि तोटा पत्रक

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा - तोटा विषयक एकत्रित विवरण पत्रक (रक्कम रु. कोटीत)

अनु. क्र.	तपशील	टिपा क्र.	२०२०-२०२१ या वर्षासाठी	२०१९-२०२० या वर्षासाठी (सुधारित)
	महसूल			
(i)	प्रवर्तनातील महसूल	३१	७४,७१९.२९	७४,५१९.५३
(ii)	इतर उत्पन्न)	३२	६,०३१.१५	८,९१५.८५
I	**एकूण उत्पन्न** (i + ii)		**८०,७५०.४४**	**८३,४३५.३९**
	खर्च			
(i)	वापरलेल्या मालाचा खर्च	३३	१३,४९२.९८	१४,३९८.२७
(ii)	वीज खरेदी	३४	३८,६९७.११	४२,६०१.७७
(iii)	भांडार माल खरेदी		-	-
(iv)	तयार मालाची वस्तूसूची, व्यापारातील माल आणि प्रगती पथावरील कामे यात बदल		-	-
(v)	कर्मचारी लाभ खर्च	३५	७,९०४.५६	८,३०४.४७
(vi)	दुरूस्ती आणि देखभाल	३६	१,२६८.५६	९७७.०८
(vii)	प्रशासकीय व सामान्य खर्च	३७	५२९.१४	४९०.९८
(viii)	वित्त खर्च	३८	९,२५३.२०	७,८८८.५३
(ix)	घसारा आणि कर्जफेड तरतूद	३९	७,३६९.६४	७,०६७.४३
(x)	इतर खर्च	४०	७,१२३.७७	८,७९१.६९
II	**एकूण खर्च** (i ते x)		**८५,६३८.९५**	**९०,५२०.२२**
III	अपवादात्मक बाबी व करपूर्व नफा/(तोटा) आणि कर (**I - II**)		-४,८८८.५०	-७,०८४.८३
IV	सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपन्यांमधील नफ्यातील वाटा		६.५०	५.०६
V	अपवादात्मक बाबी		-	-
VI	नियामक उत्पन्न/खर्च	४१	२,९०९.१९	७,०१०.७५
VII	**करपूर्व नफा / (तोटा) (III+IV+V+VI)**		**-१,९७२.८१**	**-६९.०२**
VIII	कर खर्च -			
	(१) चालू कर	४८	४४६.४३	३२५.६५
	(२) मॅट क्रेडिट अनुज्ञेयता		-	-
	(३) स्थगित कर		३१८.७१	१५०.५१
	(४) मागील वर्षातील कर		-११०.७४	-
			६५४.४०	४७६.१६
IX	**या कालावधीत प्रवर्तन चालू ठेवल्याने झालेला नफा/ (तोटा) (VII - VIII)**		**-२,६२७.२१**	**-५४५.१८**
X	प्रवर्तन खंडित केल्याने झालेला करपूर्व नफा/तोटा		-	
XI	प्रवर्तन खंडित केल्याने कर खर्च		-	-

XII	खंडित प्रवर्तनामुळे (करोत्तर) नफा/(तोटा) (X - XI)		-	-
XIII	या कालावधीतील नफा/(तोटा) (IX + XII)		-२,६२७.२१	-५४५.१८
XIV	इतर सर्वंकष उत्पन्न		-	-
(A)	१) नफा किंवा तोटयात पुन्हा वर्गीकरण न होणाऱ्या बाबी		९.४२	-४१३.४८
	२) नफा किंवा तोटयात पुन्हा वर्गीकरण न होणार्या बाबी संबंधीचा आयकर		-१.२७	१०६.९४
	३) समभाग पद्धत वापरण्यासाठी इतर सर्वंकष उत्पन्नात निव्वळ लेखा केलेला सहयोग/ संयुक्त उपक्रम कंपन्यांच्या निव्वळ नफ्यातील वाटा		०	०
	उपबेरीज (अ)		**८.१४**	**-३०६.५४**
(B)	I) नफा किंवा तोटयात पुन्हा वर्गीकरण होणाऱ्या बाबी			
	II) नफा किंवा तोटयात पुन्हा वर्गीकरण होणार्या बाबी संबंधीत आयकर			
	उपबेरीज (ब)			
XV	**एकूण इतर सर्वकष उत्पन्न(अ+ब)**		**८.१४**	**-३०६.५४**
XVI	**कालावधीतील एकूण सर्वंकष उत्पन्न (XIII + XV)**		**-२,६१९.०७**	**-८५१.७२**
XVII	प्रतिभाग मिळकत(प्रवर्तन चालू ठेवण्या साठी)	४६		
	मूळ (रु.)		-०.२९	-०.१०
	सौम्यकृत (रु.)		-०.२९	-०.१०
	महत्त्वाची लेखा धोरणे	१		
	लेख्यांवरिल टिपा	२ ते ५६		

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी.बोरा
भागीदार
सदस्यता क्र.०३९७६५
यूडीआयएन:२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

रविंद्र सावंत
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी, प्रभारी
(डीआयएन:०८७७८४२४)

जगन्नाथन सरवानासामी
संचालक (सु व अं)
(डीआयएन:०९२९९०६४)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:०१८४३०९७)

चंद्रशेखर गद्रे
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), प्रभारी

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए२२९८०

स्थळ: पूणे
तारीख: २८.०४.२०२२

स्थळ: मुंबई
तारीख: २८.०४.२०२२

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा एकत्रित रोकडता प्रवाह

(रक्कम रु. कोटीत)

तपशील	२०२० -२१		२०१९ -२०	
अ) प्रवर्तनापासूनचा रोकडता प्रवाह				
निव्वळ नफा - करपूर्व		-१,९७२.८१		-६९.०२
समायोजने खालीलप्रमाणे				
व्याजापासून महसूल	९१.२६		९७.६१	
वित्त खर्च	९,२५३.२०		७,८८८.५३	
घसारा आणि कर्जफेड खर्च	७,३६९.६४		७,०६७.४३	
		१६,७१४.१०		**१५,०५३.५७**
खेळत्या भांडवलातील बदलापूर्वीच्या प्रवर्तनापासूनचा नफा		**१४,७४१.२८**		**१४,९८४.५५**
खेळत्या भांडवलातील बदल				
प्रवर्तनीय मत्तामधील (वाढ)/घट यासाठी समायोजने खालीलप्रमाणे -				
वित्तीय गुंतवणुकीमधील (वाढ)/घट	१९.३८		-२२६.६४	
वित्तीय व्यापारी येणीमधील (वाढ)/घट	-		-	
वित्तीय कर्जे आणि अग्रीमे मधील(वाढ)/घट	०.२९		०.७३	
इतर चालू वित्तीय मत्ता मधील (वाढ)/घट	-४५.१४		-१०४.८२	
चालू नसलेली कर मत्ता यातील (वाढ)/घट	२१६.२४		१५.८३	
इतर चालू नसलेल्या मत्ता यातील (वाढ)/घट	५७.५५		७३९.२६	
वस्तू मालसूचीमधील (वाढ)/घट	१,०१५.१३		-५१८.८४	
चालू वित्तीय गुंतवणुकीतील (वाढ)/घट	-८४.२९		-२९८.०७	
चालू वित्तीय व्यापारी येणी यातील (वाढ)/घट	-१०,३५८.०६		१,२२९.०२	
चालू वित्तीय कर्जे व अग्रिमे यातील(वाढ)/घट	-२४.०२		१.६१	
वित्तीय इतर चालू मत्ता यातील (वाढ)/घट	३१०.१४		२,०६५.५१	
इतर चालू मत्ता यातील (वाढ)/घट	३६१.६६		१९२.३६	
विक्रीसाठीच्या मत्ता यातील (वाढ)/घट	३.८४		-२५.१५	
नियामक मत्ता यातील (वाढ)/घट	-२,९०९.१९		-७,०१०.७५	
इतर वित्तीय उसनवारी यातील (वाढ)/घट	-१,८३८.९५		४,९९५.८१	

इतर वित्तीय दायित्वे यातील (वाढ)/घट	३९६.६४		३,४९७.६३	
वित्तीय तरतूदी यातील (वाढ)/घट	३०२.७९		८९३.८०	
स्थगित कर दायित्वे यातील (वाढ)/घट	३१९.८०		१०५.९९	
इतर चालू नसलेली दायित्वे यातील (वाढ)/घट	२४०.३२		१४२.२७	
इतर चालू उसनवारी यातील (वाढ)/घट	-१८६.८७		६०८.०६	
चालू व्यापारी देणी यातील (वाढ)/घट	९,८४४.२२		-९,१०९.८८	
चालू वित्तीय दायित्वे यातील (वाढ)/घट	५९७९.१७		८,१५०.७३	
इतर चालू दायित्वे यातील (वाढ)/घट	-९९५.७३		१,११९.०४	
इतर चालू तरतूदी यातील (वाढ)/घट	-१,२०२.८५		२,०८८.३९	
चालू कर दायित्वे यातील (वाढ)/घट	-११२.०६		-१३७.३०	
इतर सर्वंकष उत्पन्न यातील (वाढ)/घट	-१३.९७	१,२९६.०१	-२५२.३६	८,१३०.५७
प्रवर्तनातून निर्माण झालेली रोकड				
वजा – भरलेले कर (मागील वर्षासह)		-६५४.४०		-४७६.१६
प्रवर्तन कार्यातून निव्वळ रोकड (अ)		**१५,३८२.९०**		**२२,६३८.९५**
ब. गुंतवणूक कार्यातून रोकड प्रवाह				
स्थिर मत्ता खरेदी आणि प्रगतीपथावरील भांडवली कामात भर	-७,३९७.१२		-१३,६२५.८२	
मत्तेची विक्री आणि प्रगतीपथावरील भांडवली कामात भर				
संयुक्त उपक्रम आणि उपकंपन्यांमधील गुंतवणूक	-४.९४		-७.५५	
मिळालेले व्याज (टीडीएसची निव्वळ)	-९१.२६		-९७.६१	
व्याज आणि अग्रीमे				
गुंतवणूक कार्यासाठी वापरलेली निव्वळ रोकड (ब)		**-७,४९३.३३**		**-१३,७३०.९९**
(क) वित्तीय कार्यापासूनचा रोकडता प्रवाह				
शेअर वाटपा पासूनची प्राप्ती	६४.००		१६९.४९	
व्याज आणि वित्तीय आकार	-९,२५३.२०		-७,८८८.५३	
वित्तीय कार्यातून निव्वळ रोकड (क)		**-९,१८९.२०**		**-७,७१९.०४**
रोख व रोख सममूल्य यातील निव्वळ वाढ (अ+ ब+क)		**-१,२९९.६३**		**१,१८८.९२**

मुदतीच्या आंरभीची रोकड व रोकड सममूल्य		**२,५५९.५५**		**१,३७०.६२**
मुदतीच्या अखेरीस रोकड व रोकड सममूल्य		**१,२५९.९२**		**२,५५९.५५**
रोख व रोख सममूल्य यातील घटक				
हातातील शिल्लक		७८.३२		१.३६
बँकांतील शिल्लक		६९०.२३		१,७०५.८८
३ महिन्यांपेक्षा मुदत कमी असलेल्या मुदत ठेवी		७४.५६		३७.३९
चालू खाती				
१२ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या बचत खात्यातील मुदत ठेवी		८८.३७		२९.६५
१२ महिन्यांपेक्षा जास्त मुदतीच्या बचत खात्यातील मुदत ठेवी		३२७.६७		७८४.९७
हातातील धनादेश/धनाकर्ष		०.७७		०.३१
रोख व रोख समतूल्य - टिपा १२ प्रमाणे		**१,२५९.९२**		**२,५५९.५५**

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी.बोरा
भागीदार
सदस्यता क्र.०३९७६५
यूडीआयएन:२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

रविंद्र सावंत
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी, प्रभारी
(डीआयएन:०८७७८४२४)

जगन्नाथन सरवानासामी
संचालक (सु व अं)
(डीआयएन:०९२९९०६४)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:०१८४३०९७)

चंद्रशेखर गद्रे
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), प्रभारी

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए२२९८०

स्थळ: पूणे
तारीख: २८.०४.२०२२

स्थळ: मुंबई
तारीख: २८.०४.२०२२

समभागातील बदलांचे विवरण पत्रक

भाग – १ ताळेबंद

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षांत समभागातील बदलाचे स्वतंत्र विवरण पत्रक

अ) समभाग भांडवल

(रक्कम रुपये कोटीत)

तपशील	**रक्कम**
१ एप्रिल २०१९ रोजी	८८,९४०.२३
वाटप केलेले भाग भांडवल (टिपा १८ प्रमाणे)	१६९.४९
३१ मार्च २०२० रोजी	८९१०९.७१
वाटप केलेले भाग भांडवल (टिपा १८ प्रमाणे)	६४.००
३१ मार्च २०२१ रोजी	**८९,१७३.७१**

ब) संपूर्णपणे समभागाच्या स्वरुपातील विलेख

१) सक्तीचे रुपांतरणीय प्राधान्य समभाग

(रक्कम रुपये कोटीत)

तपशील	**रक्कम**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
२०१९-२०२० मध्ये वाटप केलेले	-
३१ मार्च २०२० रोजी	-
२०२०-२०२१ मध्ये वाटप केलेले	
३१ मार्च २०२१ रोजी	-

२) सक्तीने रुपांतरणीय केलेले ऋणपत्रे

(रक्कम रुपये कोटीत)

तपशील	**रक्कम**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
२०१९-२०२० मध्ये वाटप केलेले	-
३१ मार्च २०२० रोजी	-
२०२०-२०२१ मध्ये वाटप केलेले	
३१ मार्च २०२१ रोजी	-

३) विलेख (समभाग स्वरुपातील अन्य कोणतेही विलेख)

(रक्कम रुपये कोटीत)

तपशील	**रक्कम**
१ एप्रिल २०१९ रोजी	-
वाटप केलेले भाग भांडवल (टिपा १८प्रमाणे)	-

३१ मार्च २०२० रोजी	-
वाटप केलेले भाग भांडवल (टिपा १८प्रमाणे)	
३१ मार्च २०२१ रोजी	**-**

ब) इतर समभाग

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी

(रक्कम रुपये कोटीत)

तपशील	वाटप प्रलंबित शेअर अर्ज निधी	ठेवून घेतलेली मिळकत	सांविधिक राखीव निधी	इतर समभाग	विशेष राखीव	आकस्मिक राखीव	भार प्रेषण केंद्र सश-क्तीकरण राखीव	एकूण इतर समभाग
०१ -०४ -२०१९ रोजी	**-**	**-३४,२५६.२५**	**५७७.००**	**२६.३५**	**१३९.३९**	**५६२.०६**	**४०.५३**	**-३२,९१०.९२**
अधिक या वर्षाचा नफा	-	-५४५.१८	-	-	-	-	-	-५४५.१८
इतर सर्वकष उत्पन्न	-	-३०६.५४	-	-	-	-	-	-३०६.५४
अधिक वर्षभरातील भर	१२३.८२	-	-	०.७४	-	६५.९७	२२.७०	२१३.२३
वर्षभरातील कपात	-५९.८२	-८८.६७	-	-	-	-	-१०.५८	-१५९.०७
३१ -०३ -२०२० रोजी	**६४.००**	**-३५,१९६.६४**	**५७७.००**	**२७.०९**	**१३९.३९**	**६२८.०३**	**५२.६५**	**-३३,७०८.४८**
अधिक या वर्षाचा नफा	-	-२,६२७.२१	-	-	-	-	-	-२,६२७.२१
इतर सर्वकष उत्पन्न	-	८.१४	-	-	-	-	-	८.१४
अधिक वर्षभरातील भर	-	-	-	१.२०	-	६८.४०	१८.५८	८८.१८
वर्षभरातील कपात	-२१.५०	-८६.९८	-	-	-	-	-१.८१	-११०.२९
३१ -०३ -२०२१ रोजी	**४२.५०**	**-३७,९०२.६८**	**५७७.००**	**२८.२९**	**१३९.३९**	**६९६.४३**	**६९.४२**	**-३६,३४९.६६**

वित्तीय विवरण पत्रासोबतच्या टिपा पहाव्यात
आमच्या समान तारखेच्या अहवालानुसार

एसपीसीएम ॲण्ड असोशिएट्स करिता
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११२१६५डब्ल्यू

मराविमं सुत्रधारी कंपनीच्या
संचालक मंडळासाठी आणि वतीने

सीए सुहास पी.बोरा
भागीदार
सदस्यता क्र.०३९७६५
यूडीआयएन:२२०३९७६५एआयएटीडीई९१९५

रविंद्र सावंत
संचालक (वित्त) व मुख्य वित्त अधिकारी, प्रभारी
(डीआयएन:०८७७८४२४)

जगन्नाथन सरवानासामी
संचालक (सु व अं)
(डीआयएन:०९२९९०६४)

दिनेश वाघमारे
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:०१८४३०९७)

चंद्रशेखर गद्रे
मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), प्रभारी

सुबोध झारे
कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्र. ए२२९८०

स्थळ: पूणे
तारीख: २८.०४.२०२२

स्थळ: मुंबई
तारीख: २८.०४.२०२२

टिपा क्र. १ -

३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय संबंधीची महत्त्वाची लेखा धोरणे -

अ) सांघिक माहिती

महाराष्ट्र शासनाने विद्युत अधिनियम २००३ चे प्रकरण -१३ यानुसार पूर्वीच्या मरावि मंडळ या संस्थेची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराविमं सुत्रधारी कंपनी लि. दि. ३१ मे २००५ रोजी स्थापित करण्यात आली. तिच्या पुढील तीन उपकंपन्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महानिर्मिती), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि (महावितरण) मराविमं सुत्रधारी कं. लि. ने तिचे कार्य ६ जून २००५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या हंगामी हस्तांतरण योजना याप्रमाणे सुरु केले. ही हंगामी हस्तांतरण योजनेनुसार कंपनी आणि तीन उपकंपन्या पूर्वीच्या मरावि मंडळातून अस्तित्वात आल्या. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. रिफॉर्म २०१०/ प्र.क्र.११७/ ऊर्जा - ३. अधिसूचित करुन दि. ३१ मार्च २०१६ पासून वरील हंगामी हस्तांतर योजनेचे अंतिमीकरण पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे ५ जून २००५ पासून केले. त्यासाठी वित्तीय पुनर्रचना योजना मंजूर केली व ती ३१/३/२०१६ पासून अंमलात आली.

ब) एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करण्याचा आधार -

भारतीय लेखा मानकांचे अनुपालन करणे -

भारतीय लेखा मानकांनुसार (येथे भारतीय लेखा मानके म्हणून उल्लेख केल्यानंतर) कंपनी कायदा २०१३ (अधिनियम) च्या कलम १३३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व वित्तीय बाबींमध्ये (कंपन्या भारतीय लेखा मानके) नियम २०१५ आणि कायद्याचे इतर संबंधित तरतुदींची पूर्तता करण्यासाठी महत्त्वाच्या पैलूंचा विचार करुन स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यात आली.

वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाला काही अंदाज गृहितके करावी लागतात. या अंदाजानुसार वास्तविक परिणाम भिन्न असू शकतात. वित्तीय अंदाजाचे बदलाचा परिणाम त्या वर्षाकरिता किंवा त्यांच्या बदलाच्या वर्षी आणि पुढील अनेक वर्षाकरिता, जर बदलाचा परिणाम वर्तमान व भविष्यकाळासाठी असेल तर वित्तीय अंदाज हे बदल केलेल्या वर्षातच ओळखले जातील.

खाली दिलेल्या लेखा धोरणामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रत्येक अहवाल कालावधीच्या शेवटी विशिष्ट आर्थिक मत्ता व दायित्त्वे उचित किमतीवर मोजल्या गेल्यास (वित्तीय साधनांशी संबंधित लेखा धोरणे पहावी) वित्तीय विवरण ऐतिहासिक किमतीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत. वित्तीय विवरणपत्रकांमधे प्रकट केलेल्या रकमा, अनुसूची क्र. तीन यामधील आवश्यकतानुसार नजीकच्या कोटी रुपयांमधे रुपांतरीत केल्या आहेत.

एकत्रीकरणाची तत्वे -

एकत्रित वित्तीय विवरणपत्रके ही मराविमं सूत्रधारी कंपनी लि. आणि तिच्या खालील उपकंपन्या यांच्या एकत्रीकरणाशी संबंधित आहेत.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.(महावितरण)	मराविमं सूत्रधारी कं.ची १०० टक्के उपकंपनी
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.लि.(महानिर्मिती)	मराविमं सूत्रधारी कं.ची १०० टक्के उपकंपनी
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि.(महापारेषण)	मराविमं सूत्रधारी कं.ची १०० टक्के उपकंपनी
धोपावे कोस्टल पॉवर लि. (डीपीसीएल)	महानिर्मिती कंपनीची १०० टक्के उपकंपनी
महाजनको अश मॅनेजमेंट सर्विसेस लि. (एम.ए.एम.एस.एल)	महानिर्मिती कंपनीची १०० टक्के उपकंपनी
महागूज कोलायरीज लि. (एम.सी.एल)	महानिर्मिती कंपनीची ६० टक्के उपकंपनी
यू.सी.एम.	महानिर्मितीची सहयोगी कंपनी (१८.७५ टक्के मालकी)

छत्तीसगड कटधोरा डोंगरगड रेल्वे मर्या.	महानिर्मितीची सहयोगी कंपनी (२६ टक्के मालकी)
औरंगाबाद पॉवर कं.लि.(ए.पी.सी.एल.)	महावितरण कंपनीची १०० टक्के उपकंपनी
जयगड पॉवर ट्रान्स्को लि.(जे.पी.टी.एल.)	महापारेषणची सहयोगी कंपनी (२६ टक्के मालकी)
महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एम.टी.सी.आय.एल.)	महापारेषण सहयोगी कंपनी (२६ टक्के मालकी)

या समूहातील सर्व कंपन्या या कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार नोंदणी केलेल्या कंपन्या आहेत. त्या विद्युत अधिनियम २००३ नुसार शासीत कंपन्या आहेत. विद्युत अधिनियम २००३. ज्याचे सहवाचन त्या अंतर्गत केलेल्या नियमावली सोबत होते विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ नुसार जर नियमावली कंपनी अधिनियमांशी सुसंगत नसेल तेव्हा लागू होणाऱ्या मर्यादित विद्युत अधिनियम व त्याची नियमावली अभिभावी होते. एकत्रित वित्तीय विवरण पत्रे ही ओळी नुसार त्या आधारे (लाईन-बाय-लाईन) एकत्रित केली आहेत.

सहयोगी / संयुक्त उपक्रम (इक्विटी अकाऊंटेड इन्व्हेस्टीज)

समभाग पद्धती -

समभाग पद्धती अंतर्गत, प्रारंभी सहयोगी आणि संयुक्त उपक्रम संस्थेतील गुंतवणूकीला खर्च किंमत यानुसार मान्यता दिली जाते आणि त्यातील विद्यमान रक्कम स्थापनेच्या तारखेनंतर कंपनीच्या हिश्याला मान्यता देण्यासाठी त्या प्रमाणात वाढविण्यात किंवा घटविण्यात येते. गुंतवणूक केलेल्या संस्थेचा नफा किंवा तोटा यामधे कंपनीच्या वाटा कंपनीच्या नफा किंवा तोटा पत्रकात मान्य केला जातो. गुंतवणूक केलेल्या संस्थेकडून मिळालेल्या / वितरीत झालेल्या रकमेनुसार गुंतवणूकीची विद्यमान रक्कम कमी केली जाते. गुंतवणूक केलेल्या संस्थेचे सर्वकष उत्पन्नात बदल झाल्यामुळे त्याप्रमाणात कंपनीचे स्वारस्य हितसंबंध बदलतात. त्यासाठी आवश्यक असल्यास कंपनीस समायोजन करावे लागते. कंपनीच्या अशा बदलत्या हिश्याला कंपनीच्या इतर सर्वकष उत्पन्नात मान्यता दिली जाते.

जयगड पॉवर ट्रानस्को लि. (जे पी टी एल) ही एक संयुक्त उपक्रम कंपनी आहे. त्यात जे एस डब्लू एनर्जी लि. ची ७४ टक्के समभाग धारणा असून महापारेषणची २६ टक्के समभाग धारणा आहे. जयगड - नवीन कोयना या ४०० केव्ही डबल सर्किट (क्यु. यु. ए. डी.) ५४.७३९ कि. मी. लांबीच्या पारेषण तारेची उभारणी, संचालन व देखभालीसाठी जयगड पॉवर ट्रानस्को लि. ही कंपनी स्थापित करण्यात आली. या तारेची लांबी आहे. याशिवाय जयगड - कराड या ११० कि. मी. लांबीच्या ४०० केव्ही डबल सर्कीट (क्यु यु ए डी) पारेषण तारेचेही वरीलप्रमाणे काम ही कंपनी करते.

महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इफ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एमटीसीआयएल) ही स्टरलाईट टेक्नॉलॉजी (भागधारणा ७२.१० टक्के) आणि महापारेषण कंपनी (भागधारणा २७.९० टक्के) यांची संयुक्त उपक्रम कंपनी आहे. या कंपनीचे मुख्य कार्य हे भाडेतत्वावरील, किरकोळ आणि अन्य उद्योजक कार्पोरेट ग्राहकांना ऑप्टीकल पॉवर ग्राऊंड वायर (ओ.पी.जी.डब्लू.) चे जाळे यातील तारतंतू क्षमता किरकोळ घाऊक भावाने भाडेपट्टीने देणे हे आहे.

संयुक्त उपक्रम ही एक संयुक्त नियंत्रणाची रचना असते. ती संमतीच्या कराराने स्थापित झालेली असते व त्यासाठी एकमताने वित्तीय व प्रवर्तनाचे निर्णय केले जातात. त्यातील गुंतवणूकीचा लेखा इक्विटी मेथड (गुंतवणूकदार संस्थेतील समभागांचे लेखे करणे) या प्रकारे केले जातात आणि प्रारंभी ती खर्चानुसार मान्य केला जातो. त्यात जेव्हा नियंत्रण नसलेले हितसंबंधी यांना भाग घेण्याचे व त्यातून महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठीचे अधिकार असू शकतात. त्याचे कंपनीतर्फे एकत्रीकरण केले जात नाही. अशा संस्थाच्या गुंतवणूकीचे लेखे समभागातील पद्धतीने केले जातात.

एकत्रीकरणानंतर व्यवहारांचे निर्मूलन -

एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करताना समुहा अंतर्गत शिलकी आणि व्यवहार आणि त्यातून उद्भवणारे ज्यांची वसूली होऊ शकणार नाही असे उत्पन्न कंपनीच्या स्वारस्याच्या प्रमाणानुसार नाहीसे केले जाते. गुंतवणूकदारांच्या गुंतवणूकीच्या मर्यादेपर्यंत गुंतवणूकीच्या विरुद्ध इक्वीटी अकाउंट गुंतवणूकदारांच्या व्यवहारामुळे वसूल न होणाऱ्या नफा किंवा तोटा दूर केला जातो.

नियंत्रण नसलेले हितसंबंध -

ज्या कंपनीच्या निव्वळ व ओळख निश्चित केलेल्या मत्ता संपादन करण्याच्या तारखेला संपादित केल्या असतील, त्या कंपनीच्या शेअरच्या प्रमाणात नियंत्रण नसलेले हितसंबंध यांची मोजणी केली जाते. एखाद्या उपकंपनी समुहाचे समभागातील स्वारस्य यामधे बदल झाला तरी त्याची फलनिष्पत्ती नियंत्रण गमावणे अशाप्रकारे झाली नसेल; तर त्याचे लेखा समभाग व्यवहारात केले जातात.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीक पॉवर ट्रेडींग कंपनी (एम एस इ पी टी सी एल) या कंपनीचे मराविमं सूत्रधारी कंपनीमधे दि. १/४/२०१५ पासून आदेश क्र. २४/०२/२०१४ सी एल-३ दि. १६/७/२०१५ यानुसार विलीनीकरण झाले.

एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करताना शक्यतो सारख्या व्यवहारांसाठी एक समान लेखा धोरण वापरले जाते. तसेच समान परिस्थितीतील अन्य घटना व्यवहार यांना कंपनीच्या वेगळ्या वित्तीय विवरण पत्रात तश्याच पद्धतीने सादर केले जाते. लागू होणाऱ्या विद्युत कायद्यानुसार निर्माण केलेल्या मत्ता व दायित्वे यांना योग्य त्या लेखांशीर्षांतर्गत चालू ठेवले जाते.

क) 'चालू व चालू नसलेले' असे वर्गीकरण -

कंपनी मत्ता व दायित्त्वे यांना ताळेबंदात चालू / चालू नसलेल्या आधारे सादर करते मत्ता खालील परिस्थितीत चालू असल्याचे मानले जाते.

- ज्या मत्तांद्वारे नेहमीच्या कार्याच्या चक्रात वसुली किंवा इच्छित विक्री किंवा वापर होणे अपेक्षित असते.
- ज्या मत्ता प्रामुख्याने व्यापारासाठी धारण केलेल्या असतात.
- अहवाल कालावधीच्या नंतर बारा महिन्यात वसुली केली जाते.

  किंवा

- अहवाल कालावधीनंतर बारा महिन्यात तिचे रोख किंवा सममूल्यात रुपांतर केले जाते जर तसा व्यवहार करण्यास मनाई किंवा एखादे दायित्व चुकते करण्यास वापरावयाची नसल्यास

याशिवाय इतर सर्व मत्ता यांना चालू नसलेल्या मत्ता असे मानले जाते

दायित्त्वे हे खालील परिस्थितीत 'चालू' मानले जाते -

- जे चुकते - पूर्ण करणे नेहमीच्या कार्यचक्रात करणे अपेक्षित असते.
- जे प्रामुख्याने व्यापारी हेतूसाठी धारण केले जाते
- जे अहवाल काळानंतर बारा महिन्यात चुकते केले जाते

किंवा

- जे अहवाल काळानंतर बारा महिन्यात चुकते केले जात नाही त्यांना दायित्त्व स्थगित करण्याचा अधिकार नाही.

स्थगित कर मत्ता / दायित्त्वे यांचे निव्वळ तत्त्वावर 'चालू नसलेले' असे वर्गीकरण होते

इतर सर्व दायित्त्वांचे वर्गीकरण चालू नसलेली यात केले जाते

ड) ऐतिहासिक खर्चाचे संकेत यावर टिपणी -

एकत्रित वित्तीय विवरणपत्रके चालू राहणारी संख्या अंतर्गत ऐतिहासिक खर्च संकेत यानुसार तयार केलेली आहेत त्याला खालील बाबींचा अपवाद आहे.

अ) जे रास्त मूल्य त्या आधारे केले आहेत असे काही वित्तीय विलेख,

ब) ज्या रास्त मूल्याच्या आधारे केल्या आहेत अशा कर्मचारी लाभ योजना

क) विक्रीसाठी काढलेल्या मत्तांचे मापन त्याच्या कमी झालेल्या विद्यमान मूल्यानुसार केले जाते, प्रत्येक अहवालाच्या मुदतीच्या अखेरीस ते केले जाते ते खालील लेखा धोरणात स्पष्ट केले आहे.

मे. महागूज कंपनीच्या प्रकरणी, मा. सर्वोच्च न्यायालयांने दि. २५/८/२०१४ रोजीच्या आदेश दिला असून त्याचे वाचन दि. २४/०९/२०१४ रोजीच्या आदेशासोबत केले जाते. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने वर्ष १९९३ ते २०१० या कालखंडात केलेले खाण जागांचे वाटप रद्द केले आहे. यामध्ये कंपनीत असलेल्या मच्छाकाटा - महानदी कोळसा ब्लॉकचा समावेश आहे. भारत सरकारचे दि कोल माईन्स (स्पेशल प्रोव्हीजन्स) ॲक्ट २०१५ हा अधिनियम (क्र. ११ वर्ष २०१५) दि. २१-१०-२०१४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने जारी केला आहे. त्यानुसार रद्द केलेल्या खाण ब्लॉकचे पुनर्वाटपाची प्रक्रिया केली जाणार आहे. त्यानुसार भारत सरकारचे कोळसा मंत्रालय यांनी सदर ब्लॉकचे पुनर्वाटप नव्या संस्थेत केल्यानंतर कागदपत्रे हस्तांतरित करणेची प्रक्रिया सुरु होईल आणि भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने दिलेल्या सूचनांनुसार भूगर्भ शास्त्रीय अहवाल, खाण योजना, खाणी बंद करण्याची योजना इ. प्रक्रिया यांचे पालन प्राप्त निर्देशांनुसार करण्यात येतील. या कारणांमुळे या कंपनीची वित्तीय विवरण पत्रके चालू असलेली कंपनी या नावानुसार केली आहे.

में डी. सी. पी. एल.च्या प्रकरणी सूत्रधारी कंपनीच्या मंडळाने धोपावे कोस्टल पॉवर लि. (डी सी पी एल) ही उपकंपनी बंद करण्यास मंजुरी दिली व महाराष्ट्र शासना कडे त्यास मान्यता देण्याबद्दल कळविले आहे. त्यामुळे या कंपनीचे लेखे चालू असणारी संस्था या तत्वानुसार तयार केलेले नाहीत.

इ) महत्त्वाचे लेखा न्याय निर्णय, अंदाज व गृहिते -

कंपनीची वित्तीय विवरणपत्रके तयार करण्यासाठी कंपनीच्या व्यवस्थापनाला काही न्याय निर्णय अंदाज व गृहिते करावी लागतात. त्याचा परिणाम अहवालातील महसूल, खर्च, मत्ता व दायित्त्वे, त्या सोबतीची प्रकटने आणि आकस्मिक दायित्त्वे यांचे प्रकटने या सर्व बाबीवर होतो. गृहिते आणि अंदाज यांच्या आवश्यकता यांचे परिणाम झाल्याने भविष्यासाठी मत्ता व दायित्त्वे यांच्या विद्यमान रकमात मोठी समायोजने करावी लागतात.

भविष्याशी संबंधित मुख्य गृहितके आणि अहवालाच्या तारखेला अंदाज अनिश्चिततेचे इतर प्रमुख स्त्रोत, त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षा मध्ये मालमत्तेची आणि दायित्वाची विद्यमान रक्कम यामध्ये महत्वपूर्ण समायोजने होण्याचा लक्षणीय धोका आहे, त्याचे खाली वर्णन केले आहे. वित्तीय विवरण पत्रके तयार करण्याच्या वेळी उपलब्ध मापदंडाच्या आधारे कंपनीची गृहिते आणि अंदाज केलेले असतात मात्र भविष्यासाठी अंदाज करताना जी परिस्थिती व बाजाराची स्थिती गृहित धरली असते, ती भविष्यात कंपनीच्या नियंत्रणा बाह्य परिस्थितीमुळे बदलू शकते असे बदल प्रत्यक्ष घडल्यावरच लक्षात येतात.

वित्तीय विवरण पत्रकांमधे मान्यता दिलेल्या रकमांवर लेखाधोरणाप्रमाणे महत्वाचे परिणाम घडवू शकणाऱ्या अंदाज व गृहितांची माहिती खालीलप्रमाणे आहे -

- मालमत्ता, कारखाने आणि साधने तसेच अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुष्य व उर्वरित मूल्य यांच्याविषयी केलेले अंदाज
- वित्तीय विलेखांचे रास्त मूल्याने मापन करणे.
- वित्त बाह्यमत्ता कमी होणे.
- व्याख्यांकित लाभ बंधने, महत्त्वाची विमा गणिती गृहिते यांची मोजणी होणे.
- तरतुदी आणि आकस्मिकता
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुलीचे मूल्यमापन
- महसूल मान्यता

फ) इतर महत्त्वपूर्ण लेखा धोरणे -

१. मालमत्ता, कारखाने आणि साधने

मराविमं सूत्रधारी कंपनी बाबत -

मालमत्ता, कारखाने व साधने खर्चाप्रमाणे संचित घसाऱ्याची निव्वळ आणि जर काही संचित कमी करण्याने हानी असतील तर त्याप्रमाणे नमूद केल्या जातात. कारखान्यातील सुटे भाग, साधने बदलणे आणि मान्यतेचे निकष पूर्ण होणार असतील अशा दीर्घ मुदतीच्या प्रकल्पातील उसनवारी, कर्जाचे खर्च यांचे समावेश वरील खर्चात केला जातो. जेव्हा मालमत्ता, कारखाने

आणि साधने यातील महत्त्वपूर्ण भाग ठराविक अंतराने बदलणे आवश्यक असेल तर कंपनी अशा भागांना मत्तामधील उपयुक्त आयुष्य असलेले घटक अशी मान्यता देते आणि त्यांच्या उपयुक्त आयुष्यासाठी घसाऱ्याची तरतूद करते. नंतरचे खर्च मत्तांच्या विद्यमान रकमेत समाविष्ट केल्या जातात किंवा योग्य वाटल्यास वेगळी मत्ता म्हणून मान्यता दिली जाते. मात्र भविष्यात या भागांचे आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असल्याची खात्री असेल तरच असे केले जाते. जो भाग बदलला त्याची चालू किंमतीची मान्यता काढून घेतली जाते. इतर सर्व दुरुस्ती व देखभालीचे खर्च नफा किंवा तोटा यात मान्य केला जातो. प्रगती पथावरील भांडवली कामात मालमत्ता, कारखाने व साधने यांचा तसेच स्थापित करावयांच्या / विकसनशील उपकरणांचा खर्च ताळेबंदाप्रमाणे समाविष्ट असतो.

संशोधन व विकास यांच्या मूर्त मत्तांच्या भांडवली खर्चाचे वर्गीकरण याचे मालमत्ता, कारखाने व साधने यात केले जाते. त्यास त्यांच्या प्रमाणे घसारा आकारणी होते.

मालमत्ता, कारखाना व साधने यांची निवृत्ती किंवा विल्हेवाट यातील झालेली प्राप्ती किंवा हानी यांची निश्चिती विल्हेवाटीची निव्वळ प्राप्ती आणि हानी यांना मत्तेचा निव्वळ विल्हेवाटीची मिळकत आणि मत्तेची निवृत्ती / विल्हेवाट तारखेला नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

मत्तांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी त्यांचा घसारा उर्वरित मूल्याप्रमाणे सरळ रेषा पद्धतीने आकारण्यात येतो. मत्तांचे उर्वरित मूल्य आणि उपयुक्त आयुष्य यांचा आढावा प्रत्येक वित्तीय वर्षात किंवा जेव्हा त्यांची तशी लक्षणे दिसतील तेव्हा घेतला जातो व प्रक्षेपाने समायोजन केले जाते.

जेव्हा मालमत्तेचा वापर मालकीच्या भोगवट्या ऐवजी गुंतवणूक मालमत्ता असा होतो, तेव्हा तिचे वर्गीकरणाच्या तारखेला तसे पुर्नवर्गीकरण केले जाते.

भाडेपट्टीची मत्ता -

भाडेपट्टीच्या जमिनीच्या परतफेड भाडेपट्टीच्या कार्यकाळासाठी केली जाते. भाडेपट्टीच्या जमिनीवर बांधलेल्या इमारतींचा घसारा, कंपनी अधिनियम २०१३ ची अनुसूची - दोन यात विनिर्देशित केल्या प्रमाणे उपयुक्त आयूष्य शोधून केला जातो.

अन्य प्रकरणी भाडेपट्टीच्या जमिनीवरील इमारतीची परतफेड जमीनीच्या प्राथमिक भाडेपट्टीनुसार केली जाते. मालकीच्या जमिनीचा घसारा नसतो.

मत्तांच्या उपयुक्त आयुष्याचा अंदाज खालीलप्रमाणे आहे.

मत्तांचे स्वरुप	**वर्ष**
भाडेपट्टीची जमीन	०१ ते ९०
इमारती	०१ ते ६०
कारखाने व साधने	०१ ते १५
फर्नीचर व तोडणी	०१ ते १०
वाहने	०१ ते ०८
संगणक	०१ ते ०३

ज्या मत्तांचा व्यक्तीश - खर्च रुपये पाच हजार किंवा त्याहून कमी आहे त्यांचा घसारा वापराच्या उपलब्ध झालेल्या तारखेपासून बारा महिन्यात केला जातो.

महानिर्मिती प्रकरणी

मालमत्ता, कारखाने आणि साधन -

१. मालकांच्या जमिनी खर्चानुसार पुढे नेल्या जातात. मालमत्ता, कारखाने व साधने मधील इतर बाबी खर्चानुसार नमूद केल्या जातात, त्यात संचित साऱ्याची निव्वळ आणि संचित कमी करण्याचे तोटे जर काही असेल तर त्यासह केले जाते.

२. मत्तांच्या प्रारंभीच्या खर्चात त्याची खरेदी किंमत किंवा बांधकामाचा खर्च (यामधे आयात शुल्क, वाहतूक आणि अन्य परत न केले जाणारे कर समाविष्ट असतात) तसेच मत्ता तिच्या जागेवर व प्रवर्तनाच्या स्थितीत आणण्यासाठी व्यवस्थापनाच्या हेतु नुसार केलेले प्रासंगिक खर्च तसेच पात्र मत्तांचे कर्ज खर्च (मत्ता तिच्या वापरासाठी तयार करण्यासाठी लागलेला वेळ) या सर्व खर्चाचा समावेश केला जातो.

खरेदीची किंमत म्हणजे एकूण भरलेली रक्कम आणि मत्ता संपादनासाठी अन्य बाबींचे रास्त मूल्य होय. याशिवाय खर्चामध्ये प्रायोगिकरित्या ती चालविण्यासाठी केलेले खर्च (अशा प्रायोगिक संचालनात उत्पादन केलेल्या वस्तूची विक्रीची रक्कम त्यातून वजा केल्यानंतर) आणि प्रवर्तनाचे खर्च म्हणजे वाहतूक, स्थापनेचे आकार इ. उभारणीच्या काळातील इतर उत्पन्नाची निव्वळ समाविष्ट असतात. प्रकल्प उभारणीच्या काळातील थेट खर्च, प्रवर्तनाच्या संबंधित प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यासह पुढे नेले जातात.

नंतर खर्च मत्तांच्या रकमात समाविष्ट केले जातात किंवा जर मत्तेपासून भविष्यातील आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असतील आणि जर त्याबाबींचा खर्च विश्वासार्हरीत्या मोजता येत असेल तर त्या मत्तेला वेगळी मान्यता देता येते.

३. कंपनीने भांडवली खर्च करुन ही तिची मालकी व नियंत्रण नसलेल्या मालमत्ता, कारखाने व साधने निर्माण केल्या असतील तर, त्यांचे बांधकाम चालू असे पर्यंत त्या प्रगतीपथावरील भांडवली कामाचा भाग अशा प्रकारे दर्शविल्या जातात. आणि त्या समान निकामी मत्ता खर्च वजा करुन त्या समान रकमेची तरतूद केली जाते व ज्या वर्षी केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण करुन कंपनीच्या मालकी नसलेल्या मत्तांची निर्मिती करणे यासाठी तरतूद करुन त्यात समायोजन केले जाते. कंपनीची मालकी नसलेल्या मत्ता आणि कंपनीची सामाजिक जबाबदारीचे खर्च केल्यानंतर ते नफा -तोटा पत्रकात आकारले जातात.

४. मत्ता समर्थ करण्याचे धोरण (प्रकरण निहाय तत्त्वावर) कंपनी भविष्यातील आर्थिक लाभांसाठी काही अन्य मत्ता संपादन करते व त्यांचा समावेश मालमत्ता, कारखाना व साधने यामध्ये करते (अशा मत्तांचा भविष्यात वाढते लाभ मिळण्याची थेट संबंध नसला तरी असे करावे लागते) अशा बाबीं मालमत्ता, कारखाना व साधने या मान्यतेसाठी पात्र असतात. कारण त्यांचा भविष्यात आर्थिक लाभ देणाऱ्या मत्तांशी संबंध असतो. मात्र कंपनी अशा मत्तांची प्रकरण निहाय तत्त्वावर पडताळणी केल्यानंतरच भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील ज्या भांडवली कामांचा जेथे कंत्राटदारांच्या अंतिम देयके अदा करणे बाकी असेल, त्या प्रकरणी हंगामी तत्त्वावर आणि भविष्यातील आवश्यक समायोजनांच्या अधीन राहून भांडवलीकरण केले जाते.

६. भांडवली कंत्राटाच्या किंमतीतील विचलनाचे दावे, कंपनीने स्वीकारल्यास, त्यांचे लेखे केले जातात.

७. मालमत्ता, कारखाना व साधने यामधील एखादी बाब किंवा तिचा भाग यांना प्रारंभी मान्यता दिली असेल आणि त्याची विल्हेवाट करताना आणि वापरातून भविष्यात आर्थिक लाभाची अपेक्षा नसेल तर, त्याची मान्यता काढण्यात येते. विल्हेवाट किंवा अमान्य केल्यावर जर काही प्राप्ती किंवा हानी उद्भवली तर ती नफा तोटा पत्रकात दाखविली जाते.

८. नव्याने कार्यान्वित केलेल्या प्रकल्पांच्या भांडवली खर्चाकरिता कंपनी निम्नलिखित धोरणाचे पालन करते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची बहुवर्षी वीज दर नियमने २०१९ यांच्याशी हे धोरण सुसंगत आहेत.

कंपनी अधिकचे अनिवार्य जादा भाग / गंभीर स्पेअर्स / सुरुवातीचे स्पेअर्स जे मुळ प्रकल्प स्थापनेबरोबर घेतले जातात किंवा स्थापनेनंतर ३ वर्षात घेतले जातात ज्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याची परवानगी असते याचे भांडवलीकरण प्रकल्प खर्चाच्या ४% इतकी केली जाते.

९. मालमत्ता, कारखाना व साधने यामधील सुट्या भागांचे वर्गीकरण त्यांच्या आवश्यकता पूर्ण केल्यावर त्याचे भांडवलीकरण केले जाते. मात्र प्रत्येक सुटे भागाचे मूल्य मर्यादेपेक्षा जास्त असावे. अन्य प्रकरणी, सुट्या भागांची प्राप्ती झाल्यावर ते वस्तूमाल सूचीत नोंदले जातात आणि वापरा नंतर त्याची आकारणी नफा तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्राचे जुने सुटे भाग ज्या वर्षी बदलले जातात आणि जेव्हा जुने संबंधित भाग पुढे वापरण्यास निरुपयोगी झाल्याचे आढळते, त्यावर्षी जुन्या सुट्या भागांचे मूल्य कमी करुन ते नफा तोटा पत्रकात आकारले जातात. मात्र जर जुने संबंधित भागाची दुरुस्ती व पुर्नवापर शक्य असेल तर मत्ताच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यांमध्ये दोषाचा घसारा केला जातो. दुरुस्तीचे खर्च नफा तोटा पत्रकात आकारले जातात.

११. जेव्हा मत्तांच्या मूळ भागाची भांडवल/सुटया भागाचे कमी केलेले मूल्य माहिती नसेल तेव्हा मत्तेचा भाग / भांडवली सुटे भाग बदलले तर मत्तेच्या नव्या भागाची नव्या सुट्या भागाचा खर्च / निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल.

१२. कंपनीने पूर्वीच्या सर्वसामान्य लेखा मानकानुसारचे मालमत्ता, कारखाने व साधने यांचे विद्यमान मूल्य, भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण करताना 'मानीव किंमत' म्हणून निवडण्यात आले.

प्रगतीपथावरील भांडवली कामे -

नवे प्रकल्प / क्षमता विस्तार यातील मालमत्ता कारखाने व साधने बाबत असे प्रकल्प क्षमताविस्तार प्रत्यक्ष कार्यान्वित होण्याच्यातारखे संबंधित खर्च आणि व्याज खर्च यांचे भांडवलीकरण केले जाते. तसेच नवे प्रकल्प / क्षमता विस्तार, प्रकल्पाचा प्रारंभिक संशोधन आणि तांत्रिक व वित्तीय व्यवहार्यता याचा अभ्यास पूर्ण झाल्यावर त्याला कंपनीच्या संचालक मंडळाने मान्यता दिल्यानंतर त्याच्या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते, प्रकल्पाच्या शक्यता आजमावण्याच्या आणि व्यवहार्यता अभ्यासाच्या खर्चाची आकारणी त्या काळातील नफा तोटा पत्रकात केली जाते.

अ) प्रकल्पातील बॉयलर टर्बाईन जनरेटर संबंधित कार्ये आणि बॅलन्स ऑफ प्लांट संबंधित कार्ये पूर्ण होई पर्यंत प्रकल्पाशी थेट संबंध असलेला वेतन खर्च प्रकल्प खर्चाचा भाग मानले जाते.

ब) प्रकल्प उभारणीशी थेट संबंध असलेले प्रशासकीय आणि सामान्य खर्च यांना प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर एक वर्षा पर्यंत प्रकल्प खर्चाचा भाग मानले जाते. कारण उर्वरित प्रकल्प संबंधित कामे पूर्ण करावयाची असतात. नंतर त्याचे भांडवलीकरण होईल त्यानंतर तो नफा तोटा पत्रकात आकारला जाईल.

क) कोराडी येथील निर्मिती बांधकाम कार्यामध्ये आणि मुख्य कार्यालयातील कोणतेही खर्च लघू भांडवली योजनेत सामावले जाणार नाहीत. ज्या बांधकामाच्या कामांना बारा महिन्यापेक्षा कमी वेळ लागतो त्यांना स्मॉल कॅपिटल स्किम म्हटले जाते.

ड) जेव्हा कंपनी एकापेक्षा जास्त प्रकल्प / भांडवली योजना (लघु योजना व्यतिरिक्त) यांची कार्यवाही करीत असते. तेव्हा निर्मिती बाधकाम कार्यालय, कोराडी आणि मुख्यालय येथे केलेली सामाईक खर्च वर्षभरातील प्रगतीपथावरील कामांच्या खर्चात भर म्हणून समाविष्ट केला जाईल.

परिसमापनातील नुकसान यांचे समायोजन मालमत्ता कारखाना आणि साधने यांच्या त्या वर्षीच्या खर्चात केले जाते.

महापारेषण संबंधी -

मालमत्ता, कारखाने आणि साधने

भविष्यात ज्या खर्चातून आर्थिक लाभ मिळणे संभवणीय असेल असेच संबंधित खर्चाचे भांडवलीकरण केले जाते.

विद्यमान मत्ता बदलण्यासाठी संपादन केलेल्या मालमत्ता, कारखाने व साधने यांचे भांडवलीकरण केले जाते आणि संबंधित जुन्या मत्ता वापरात काढून टाकल्या जातात / निवृत्त केल्या जातात आणि मान्यता काढली जाते. जर बदललेल्या भागाचा खर्च किंवा त्यापूर्वीच्या तपासणी तपशील उपलब्ध नसेल तर तत्सम नवीन भाग / निरिक्षण यांचा अंदाजे खर्च याचा उपयोग केला जातो. तो बदललेल्या विद्यमान भागाचा खर्च याचा / निरिक्षणाच्या घटकाचा निदर्शक मानला जातो व जेव्हा असा भाग मिळविला असेल किंवा निरिक्षण केले असेल त्यानुसार त्याची किंमत ठरविली जाते.

जेव्हा मत्ता कार्यान्वित केली जाते, उपकेंद्राचे बांधकाम आणि पारेषण ताराची रचना केली जाते आणि जेव्हा कंत्राटदाराच्या देयकाचे अंतिमीकरण झाले नसते तेव्हा हंगामी तत्वावर भांडवलीकरण केले जाते. ते ज्या वर्षी अंतिमीकरण होईल तेव्हाच्या समायोजनाच्या अधिन असते.

जमिनीच्या खर्चात भरपाई आणि जेव्हा जमिनीचा ताबा घेतला जाईल त्याचे खर्च समाविष्ट असतात. जमिनीचे स्तर करणे, ती व्यवस्थित करुन दर्जा मिळविणे यासाठी खर्चात जमीन विकासाचा खर्च म्हणून भांडवलीकरण केले जाते.

ज्याची किंमत रु. १०,००,०००/- किंवा त्याहून जास्त आहे असे सुटे भाग पर्यायी साधने आणि त्याच्या देखभालीची साधने यांनी मालमत्ता, कारखाने व साधने यातील मान्यतेचे निकष पूर्ण केली तर त्याचे भांडवलीकरण केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भागाचे वस्तुमाल सूचीत समाविष्ट करून ते वापरल्यानंतर नफा -तोटा पत्रकात आकारले जातात.

जेव्हा मालमत्ता, कारखाने व साधने यातील एखाद्या वस्तूने वापर / विल्हेवाट यातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ अपेक्षित नसतील तर त्यांची मान्यता काढून घेतली जाते.

मालमत्ता, कारखाने आणि साधने यांची विल्हेवाट / निवृत्ती याद्वारे होणारी प्राप्ती किवा हानी निश्चित करण्यासाठी विल्हेवाटीची मिळकत आणि त्या मत्ताचे चालू मूल्य यातील फरकाला विल्हेवाटीच्या तारखेला नफातोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

प्रगती पथावरील भांडवली कामे

मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या बांधकामासाठी केलेल्या साहित्याचा खर्च, उभारणीचे आकार, आणि इतर खर्च यांना उभारणीच्या कामाचा भांडवली करणाच्या तारखे पर्यंतची प्रगती यांच्या आधारे भांडवलीकरण केले जाते.

मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या रचनेसाठी असलेल्या प्रकल्प कार्यालयाच्या खर्चाचे निश्चिती केली जाते व संबंधित मत्तांच्या खर्चात त्याचे पध्दतशीरपणे वाटप केले जाते. कंत्राटातील किमतीचे विचलन / विनिमय दरातील बदल यामुळे समझोते न झालेली दायित्वे यांचा लेखा कंत्राटातील अटीनुसार अंदाज तत्वाने केली जाते.

मंजुरीत योजनांतर्गत प्रकल्पाची ओळख, सर्वेक्षण आणि त्याच्या व्यवहार्यतेचा अभ्यास यासाठी केलेल खर्च हे त्या अभ्यासास नाकारण्याच्या कालावधीपर्यंत किंवा तीन वर्षासाठी जे आधी होईल या तत्वावर प्रगतीपथावरील भांडवली कामे यात विशेष बाब म्हणून दर्शविले जातात. नाकारण्यात आलेले सदर खर्च नफा तोटा पत्रकात आकारले जातात.

महावितरणच्या प्रकरणी

मालमत्ता, कारखाने आणि साधने

अ) मालकीच्या जमिनी खर्चानुसार वहन केल्या जातात.

ब) जेव्हा एखाद्या वस्तुमुळे भविष्यात आर्थिक लाभ कंपनी समूहाचे प्रवाहीत होणे संभवनीय असेल, आणि त्या वस्तुच्या खर्चाची विश्वासार्ह मोजणी करता येत असेल तर त्या मालमत्ता, कारखाने आणि साधने यांना मंजुरी देण्यात येईल. मालमत्ता, कारखाना आणि साधने यात जर काही कर / शूल्क यांच्या जमा असल्यास त्यांची निव्वळ संचित घसारा आणि संचित घट यानुसार ती नमूद केली जाते. कारखाना व साधने संबंधित प्रशिक्षणाचे शूल्क दिले तर ते खर्चाचा भाग समजले जाते. खर्चामधे खरेदीची रक्कम आणि सदर मत्ता इच्छित कामासाठी योग्य करण्याचा योग्य खर्च समाविष्ट असतो. तसेच मत्ता पात्र करण्यासाठी कर्ज खर्चाचे भांडवलीकरण समुहाच्या लेखाधोरणानुसार केले जाते.

क) भा. ले. मानकात संक्रमित होताना दि. ०१ एप्रिल २०१५ रोजी पूर्वीची सर्व साधारणपणे स्विकारलेल्या लेखा धोरणानुसार मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या वहन मूल्याला खर्च मानले आहे.

ड) भा. ले. मानक १६ नुसार एक वर्षापेक्षा जास्त उपयुक्त आयुच्या असलेल्या वस्तूमाल सूचीतील वस्तुचा लेखा मालमत्ता, कारखाने व साधने प्रमाणे केली आहे.

इ) मान्यता काढणे -

मालमत्ता, कारखाने आणि साधने यातील एखाद्या वस्तुचे भविष्यात आर्थिक लाभ मिळणार नसेल किवा त्याची विल्हेवाट लावल्यानंतर त्या वस्तुची मान्यता काढण्यात येते. मालमत्ता, कारखाने व साधनेतील अशा वस्तुची विल्हेवाट किंवा निवृत्ती याचा लाभ किंवा हानी विक्रीतील पैसे आणि मत्तेतील वहन मूल्य यातील फरकानुसार निश्चित केली जाते आणि ती नफा तोटा पत्रकात मान्य केली जाते.

प्रगतीपथावरील भांडवली कामे -

(अ) कर्मचाऱ्यांचा खर्च आणि प्रशासन व सामान्य खर्चासाठी प्रगतीपथावर असलेल्या भांडवली कामाच्या पंधरा टक्के भांडवली प्रगतीपथावरील कामात जोडला जातो. कारण संचालन व देखभाल ही जबाबदारी असलेली मंडळे हे दोन्ही भांडवली काम आणि संचालन व देखभालीचे काम करीत आहेत.

ब) वर्षभरात पात्र मत्ता संपादन करण्यासाठी बांधकामाच्या कालावधीतील कर्जाचे व्याजाचे भांडवलीकरण त्यावर्षीच्या प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये केले जाते. त्यासाठी लागू होणाऱ्या कर्जाचा सरासरी दराचा आधार घेतला जातो.

क) कंत्राटाच्या किमतीचे विचलनाचे दावे असल्यास त्याच लेखे समूहाने स्वीकारले तर केले जातील.

२) घसारा

महानिर्मिती कंपनी प्रकरणी

अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी कर्ज फेडीची तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमनाप्रमाणे सरळ रेषा पद्दती ३.३४ टक्के प्रती वर्ष या दराने केली जाते.

ब) मालमत्ता, कारखाने व साधने

१) सूत्रधारी कंपनी ही जिचे वीजदराचे नियमन होत असल्याने ती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी विहित केलेले घसारा दर पध्दती आणि मत्तांचे आयुष्य याचे अनुसरण करते. त्यानुसार कंपनी सरळरेषा पद्धतीने मत्तांच्या किमतीच्या ९० टक्के पर्यंत घसारा आकारते..

२) मालमत्ता, कारखाना आणि त्यांत वर्षभरात भर घातलेली / विल्हेवाट केलेली / काढून टाकलेली साधने यांचा घसारा यथाप्रमाणे तत्त्वाने केला जातो आणि तो ज्या महिन्यात ही भर / विल्हेवाट / काढून टाकल्याची कृती केली तेव्हापासून लागू होते. हरित क्षेत्र / बिना वापराचे क्षेत्र प्रकल्प यांचे भांडवलीकरणाच्या प्रकरणी वाणिज्य प्रवर्तन, आरंभाच्या तारखेपासून या घसारा नफा तोटा पत्रकात आकारला जातो.

३) खालील उप परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या मत्ता व्यतिरिक्त ज्या अन्य मत्तांचे कार्य सुरु झाल्यानंतरही ९० टक्के पर्यंत घसारा आकारला नसेल, त्या मत्तांसाठी कंपनी खालील विहित दरांनी घसारा आकारणी करते. अशा मत्तांचा संचित घसारा ज्या वर्षी ७० टक्के होईल त्याच्या अखेरीपर्यंत मत्तांच्या ठोक गटांवर हे दर लावले जातात. घसारा ७० टक्के पूर्ण झाल्यानंतर कंपनी उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी ९० टक्के पर्यंत घसारा आकारते. औष्णिक व वायू आधारीत वीज निर्मिती केंद्राचे उपयुक्त वय २५ वर्षे आणि जलविद्युत केंद्राचे ३५ वर्षे धरावे असे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिले आहे.

मत्तांचे प्रकार	**घसारा**
जल विद्युत केंद्रातील कारखाने व यंत्र सामुग्री विजेचे, स्थिर विजचे, आणि वायु आधारीत वीज निर्मिती केंद्रे कुलींग टॉवर, हायड्रॉलिक कामे, ट्रान्सफॉर्मर व इतर स्थिर साधने, पारेषणाच्या तारा केबल नेटवर्क इ.	५.२८%
इमारती व इतर स्थापत्य कामे	३.३४%

४) खालील मत्तांचा घसारा सरळ रेषा पध्दतीने मत्तांच्या मूल्यांच्या ९० टक्के खालीलप्रमाणे आकारला जातो.

मत्तांचे प्रकार	**घसारा**
फर्नीचर, जोडणी व इतर कार्यालयीन साधने	६.३३%
वाहने	९.५०%
माहिती तंत्रज्ञानाची साधने	१५.००%

५) ज्या मालमत्ता, कारखाने व साधने यांचे खर्च प्रारंभिक मर्यादेपेक्षा जास्त नाहीत त्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. टॅबलेट किंवा मोबाईल फोन यांची किंमत त्यांची प्रारंभिक मर्यादा काहीही असली तरी तो खर्च खरेदी वर्षात महसूलात आकारला जातो.

क) अमूर्त मत्ता -

नवीन एप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी व तिसऱ्या पक्षाकडून अंमलबजावणीच्या खर्चाचे तसेच परवाना खरेदी खर्च यांच्या कर्जाची परतफेड महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे त्यांचे दर खालीलप्रमाणे विहीत केली.

मत्तांचे प्रकार	घसारा
सॉफ्टवेअर	३०%

कंपनी अधिनियम – २०१३ ची अनुसूची – दोन यात विहीत केल्याप्रमाणे सरळ रेषा पध्दतीने, उपकंपन्यांच्या मत्तांचा घसारा आकारण्यात येतो.

महापारेषण प्रकरणी -

घसारा -

पारेषण व्यवसायाशी संबंधित मत्तांचा घसारा / कर्जफेड यांच्या तरतुदी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दर आणि पद्धती अधिसूनित केल्या प्रमाणे सरळ रेषापद्धतीने वसूलीसाठी आकारल्या जातात.

सॉफ्टवेअरला अमूर्त मत्ता मानून त्यानुसार ती वापरण्याच्या हक्काची कायदेशीर मुदतीसाठी किंवा ४ वर्षे यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे आणि उर्वरित मूल्य 'निरंक' मानून केले जाते.

मोबाईल फोन्स खरेदीच्या तारखेपासून ३ वर्षांपर्यंत आकारले जाते.

वर्षभरात मालमत्ता, कारखाना व साधने मध्ये भर / घट झाल्यास त्याचा घसारा / कर्जफेड तरतूद ज्या तारखेस सदर मत्ता वापरण्यास उपलब्ध झाली / काढून टाकली त्या तारखेपासून / पर्यंत यथा प्रमाणतत्त्वावर आकारली जाते.

जर घसारा योग्य मालमत्ता, कारखाना व साधने यांचा खर्च किंमतीचे समायोजन शुल्कात बदल किंवा तत्सम कारणामुळे वाढला / कमी झाला असेल आणि असा मत्तांच्या कर्जफेड न केलेली शिलकीचा घसारा पूर्वलक्षी प्रभावाने आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विहीत नियमावलीतील दर पद्धत यानुसार करण्यात यावा.

सुटे भाग, आरक्षित साधने व सेवेची साधने यांचे भांडवलीकरणानंतर त्यांचा घसारा, त्यांचा वापर सुरु केल्याच्या तारखेपासून पारेषण उद्योगातील संबंधित मत्तांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी, सरळ रेषा पद्धतीने केला जातो. या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केलेले दर व पद्धत वापरण्यात येते.

प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस पारेषण व्यवसायाशी संबंध नसणाऱ्या मत्तांचे उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य व पसाऱ्याची पद्धत यांचा आढावा घेऊन आवश्यक तेथे समायोजने केली जातात.

रु. ५,०००/- किंवा त्याहून कमी खर्चाच्या मालमत्ता, कारखाने व साधने मत्ताचा त्यांच्या संपादन वर्षात पूर्णपणे घसारा आकारला जातो.

भाडेपट्टीची जमीन (महापारेषणच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद केल्यानुसार भारतीय लेखा मानके - ११६ अंतर्गत वापरण्याचा अधिकार म्हणून गणली जाणारी) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दर नियमनामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दर आणि पध्दतीनुसार भाडेपट्टीच्या कालावधीत पूर्णपणे काढून टाकण्यात येते.

विविध श्रेणीतील मत्तांसाठी असलेले घसारा दर खालीलप्रमाणे

तपशील	दर %
मूर्त मत्ता	
हायड्रॉलिक कामे	५.२८%
इमारती व इतर स्थापत्य कामे	३.३४%
कारखाना आणि यंत्रसामुग्री	५.२८%
पारेषण तारा केबल नेटवर्क इ.	५.२८%
फर्नीचर, जोडणी व कार्यालयीन साधने	५.२८% ते १५%
वाहने	६.३३%

महावितरण प्रकरणी

घसारा/ कर्जफेड तरतूद -

मालमत्ता, कारखाने व साधने

या कंपनीने मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या प्रत्येक नगाचे उपयुक्त आयुष्याचा अंदाज तांत्रिक -वाणिज्य मूल्यांकनाच्या आधारे केला आहे. या अंदाजात मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या नगाच्या वापराची पद्धत समाविष्ट आहे. त्यानुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या किंमतीने ९० टक्के पर्यंत घसारा आकारते. याशिवाय तात्पूरती उभारणी केलेल्या मत्ताचा १०० टक्के घसारा त्याच वर्षात आकारण्यात येतो.

सध्याचा अंदाज हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर निश्चितीसाठीच्या (बहुवर्षीय वीज दर) नियमावली २०१५ या समान आहे.

घसाऱ्याचे दर खालीलप्रमाणे आहेत -

मत्तांचा गट	**दर (%)**
भाडेपट्टी जमीन	३.३४
इमारती	३.३४
हायड्रॉलिक कामे	५.२८
इतर स्थापत्य कामे	३.३४
कारखाने व यंत्रसामग्री	५.२८
तारा - केबल नेटवर्क	५.२८
संप्रेषण उपकरणे	६.३३
वाहने	९.५०
फर्निचर व जोडण्या	६.३३
कार्यालयीन साहित्य	६.३३
माहिती तंत्रज्ञानाची साधने	१५.००
इतर मत्ता	५.२८

ज्या मत्तांचा कार्यान्वित झाल्यापासून ७० टक्के पर्यंत पसारा आकारलेला नाही, त्यांचा संचित घसारा ज्यावर्षी ७० टक्केपर्यंत पोहोचेपर्यंत सूत्रधारी कंपनी विहित दराने घसारा आकारते. संचित घसारा ७० टक्के झाल्यावर कंपनी मत्तेच्या उर्वरित आयुष्याच्या आधारे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (बहुवर्षीय दर) नियमन २०१५ च्या नियमावलीच्या आवश्यकतानुसार ९० टक्के पर्यंत घसारा आकारतो.

वर्षभरातील मत्तामधील भर / कमी करणे यावर यथाप्रमाणे दराने घसारा दिला जातो.

ज्या मतांचा प्रत्येकी किमत रु. ५,०००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे. त्यांचा घसारा वापराच्या वर्षात १०० टक्के आकारला जातो.

३. गुंतवणूक मालमत्ता

मराविमं सूत्रधारी कंपनी प्रकरणी -

गुंतवणूक मालमत्तांमध्ये मालकीची जमिनी आणि दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीचे उत्पन्न आणि / किंवा भांडवल वाढीसीठी धारण केलेल्या कार्यालयीन इमारती यांचा समावेश होतो. गुंतवणूक मालमत्ता प्रारंभी खर्चानुसार मान्य केल्या जातात. नंतर इमारती

समाविष्ट असलेल्या मालमत्ता या त्याच्या विद्यमान खर्च वजा संचित घसारा आणि संचित कमी करण्यातील तोटे अशाप्रकारे त्यांना मान्यता दिली जाते.

खर्च यामध्ये भाग बदलण्याचे खर्च, मान्यतेचे निकष पूर्ण झाल्यास दीर्घ मुदतीचे प्रकल्पाचे कर्ज खर्च समाविष्ट असतात. जेव्हा गुंतवणुकीच्या मालमत्तेचे महत्त्वाचे भाग काही कालांतर ठेवून बदलावयाचे आसतात. तेव्हा कंपनी त्यांच्या उपयुक्त आयुष्याच्या आधारे घसारा आकारते. इतर सर्व दुरुस्ती देखभालीचे खर्च यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

इमारतींच्या घसाऱ्यासाठी कंपनी अधिनियम २०१३ चे अनुसूची २ यात विनिर्देशित केल्याप्रमाणे इमारतींचा घसारा अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी दिला जातो. उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य आणि घसारा यांचा आढावा घेऊन भावी काळासाठी योग्य ठरतील अशी समायोजने प्रत्येकी वित्तीय वर्षांच्या अखेरीस केली जातात. या आढाव्याचे परिणामामुळे उद्भवलेले बदल नफा-तोटा पत्रकात दाखविले जातात.

कंपनी जरी गुंतवणूक मालमत्तेचे मापन, खर्च आधारित मोजपट्टी वापरुन करीत असली तरी, गुंतवणूक मालमत्तेचे रास्त मूल्य टीपांमध्ये प्रकट केल्या आहेत.

जेव्हा गुंतवणूक मालमत्ता काढून टाकल्या जातात किंवा ती वापरातून कायमची काढून घेतली जाते आणि तिचे विल्हेवाटापासून कोणतेही आर्थिक लाभ अपेक्षित नसतील तेव्हा तिची मान्यता काढून घेतली जाते.

विल्हेवाटीची निव्वळ मिळकत आणि मत्तांची विद्यमान रक्कम यातील फरकाला नफा-तोटा पत्रकात घसाऱ्याच्या मुदतीमध्ये मान्यता दिली जाते.

४) अमूर्त मत्ता -

मराविमं सुत्रधारी संबंधी

ज्या अमूर्त मत्तांची ओळख निश्चिती झाली आहे, आणि कंपनीचे त्यावर नियंत्रण असून भविष्यात त्यांचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होणे संभवनीय आहे, तसेच त्यांची मोजणी विश्वासह रितीने करता येते, अशा अमूर्त मत्तांना मान्यता देण्यात येते.

प्रारंभी, स्वतंत्रपणे संपादन केलेल्या मत्ता त्यांच्या खर्चानुसार मान्य केल्या जातात. ज्या अमूर्त मत्ता व्यवसायाच्या संमिश्रणातून संपादित केलेल्या असतात, त्यांचे खर्च हेच संपादन तारखेचे रास्त मूल्य असते. प्रारंभीच्या मान्यतेनंतर, अमूर्त मत्तांचे खर्च वजा संचित कर्जफेडीच्या तरतुदी आणि मत्ता कमी करण्याचे संचित तोटे जर असतील तर ते वजा करुन येणाऱ्या रक्कमेप्रमाणे पुढे नेले जातात.

अमूर्त मत्ता उपलब्ध होण्याच्या तारखेपासून त्यांच्या कर्जफेडीच्या तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. त्यांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्याकरिता ती सरळ रेषा पद्धतीने मान्य केली जाते. सदिच्छा / ख्याती मूल्य व्यतिरिक्त अन्य अमूर्त मत्ता यांच्या कर्जफेडीची मुदत व पद्धत याचा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस आढावा घेतला जातो. मत्तांच्या अपेक्षित उपयुक्त आयुष्यातील बदल किंवा मत्तांमध्ये समाविष्ट केलेले भविष्यातील आर्थिक बदलाच्या लाभाच्या वापराचे बदल याचा लेखा कर्जफेडीची मुदत किंवा पद्धत यात योग्य करुन केला जातो आणि त्याला 'लेखा अंदाजातील बदल' मानले जाते.

अ) ख्याती मूल्य

ख्याती मुल्य यांस प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते. नंतर ते खर्च हानी किंवा अन्य संचित कमी होण्याचे तोटे याप्रमाणे मान्य केले जाते.

ब) सॉफ्टवेअर -

सॉफ्टवेअर संपादन वापराचा परवाना या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते व परवान्याच्या कालावधीसाठी (बहुदा ३ वर्षापेक्षा जास्त नाही.) कर्जफेडीची तरतूद केली जाते.

क) परवाने -

संपादित परवाने प्रथम खर्चानुसार मान्य केले जातात. त्यानंतर परवान्यांचे मापन खर्च वजा संचित कर्जफेडीची तरतूद आणि जर कमी करण्याचा खर्च असेल तर त्याप्रमाणे केले जाते. कजफिडीचा सदर परवान्याच्या मुदत संपण्यापूर्वीच्या कालावधीसाठी

नफा-तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने मान्यता देण्यात येते. त्यांचे प्रकटन 'घसारा व कर्जफेडी' या शीर्षकात केले जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादन केलेल्या परवान्यासंबंधी कर्जफेड तरतूद प्रामुख्याने उर्वरित परवाना कालावधीनुसार निश्चित केली जाते.

ड) इतर संपादित अमूर्त मत्ता -

इतर अमूर्त मत्तांना प्रारंभी खर्चानुसार मान्यता दिली जाते. व्यवसाय संमिश्रणात संपादित अमूर्त मत्तांची कर्जफेड तरतूद त्यांच्या वास तारखेपासून अंदाजित उर्वरित आयुष्यासाठी केली जाते.

अमूर्त मत्ता ज्यांचे अमर्याद जीवनमान आहे, उदाहणार्थ ख्यातीमुल्य आणि अद्याप वापरली न गेलेली अमूर्त मत्ताच्या दरवर्षी दुर्बलता चाचणी तपासणी केल्यानंतर बदल होण्याची शक्यता आहे. घसारा आणि मुल्य ऱ्हास अधीन असलेल्या मालमत्तेची दुर्बल तपासली जाते. जेव्हा जेव्हा घटकांमध्ये किंवा परिस्थितीमध्ये बदल होत नाही.

महानिर्मिती प्रकरणी - अमूर्त मत्ता

अमूर्त मत्ता या त्यांचे संचित कर्ज फेड खर्च आणि संचित कमी केल्याचे नुकसान (जर असल्यास) त्याची निव्वळ या प्रमाणे पुढे नेल्या जातात. अमूर्त मत्ता (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) यांच्या उपयुक्त आयुष्यानुसार त्यांच्या कर्ज फेडीची तरतूद सरळ रेषा पद्धतीने केली जाते. आणि जेव्हा ती अमूर्त मत्ता करवी असे चिन्ह दिसेल तेव्हा तिचे कमी करण्याबाबत निर्धारण केले जाते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्या प्रमाणे सॉफ्टवेअरची कर्जफेड तरतूद केली जाते. अमूर्त मत्तांचे कर्जफेड खर्च आणि कमी केल्याचे नुकसान यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या कंपनीने भा. ले. मानक पद्धतीत संक्रमण करतांना मागील सर्व साधारण लेखा तत्वानुसार अमूर्त मत्तांचे विद्यमान मूल्य पुढे नेण्याचा पर्याय निवडला आहे.

महापारेषण प्रकरणी -

अमूर्त मत्ता -

अमूर्त मत्ता यांना खर्चा प्रमाणे मान्यता दिली जाते व मापन केले जाते. प्रारंभिक मान्यतेनंतर, खर्च वजा संचित कर्जफेड आणि संचित कमी केल्याचे नुकसान याप्रमाणे पुढे नेल्या जातात.

यापूर्वी भांडवलीकरण केलेल्या अमूर्त मत्तापासून जेव्हा भविष्यात आर्थिक लाभ त्यांच्या केले जाते, आणि कर्जफेडीची तरतूद प्रक्षेपित केली जाते.

जेव्हा अंतर्गत वापरासाठी मिळवले जाते (संबंधित हार्डवेअरच्या एकात्मिक भाग नसलेले) आणि त्यातून महत्त्वाचे आर्थिक लाभ भविष्यात मिळ्याची अपेक्षा असते, आणि जे ते वापरण्यास सिद्ध होते तेव्हा त्याच्या खर्चाला अमूर्त मत्ता अशी मान्यता दिली जाते.

अमूर्त मत्तांची विल्हेवाट लावल्यावर किंवा त्यांच्या वापरातून भविष्यात आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता नसते तेव्हा त्यांची मान्यता घेतली जाते. अमान्य करण्याच्या कृतीतून प्राप्ती किंवा नुकसान झाले तर त्याला नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. ही प्राप्ती किंवा नुकसान झाले तर त्याला नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. ही प्राप्ती किंवा नुकसान विल्हेवाटीची निव्वळ आणि विद्यमान किंमत या फरकातून मोजले जाते.

महावितरण प्रकरणी -

अमूर्त मत्ता -

त्यांच्या संचित कर्जफेड आणि जर काही संचित कमी करण्याचे तोटे असतील तर त्या खर्चाच्या निव्वळ रक्कमा पुढे चालू ठेवल्या जातात. अंतर्गत निर्माण केलेल्या अमूर्त मत्तांचे त्यांचा विकासाचा खर्च वगळून, भांडवलीकरण केले जात नाही. संबंधित खर्च, नफा-तोटा पत्रकात, त्या कालावधीत दाखविला जातो. प्रकल्पाच्या तांत्रिक व वाणिज्यिक शक्यतांचे व भावी आर्थिक लाभांचे प्रात्यक्षिक सादर केले तर त्याचा विकास खर्चाचे भांडवलीकरण केले जाते. अमूर्त मत्तांच्या कंत्राट किंवा वॉरंटीच्या मुदतीपैकी जे अधिक कालावधीचे असेल त्यानुसार कर्जफेड तरतूद केली जाते. तसेच अशा अमूर्त मत्ता कमी करण्याची चिन्हे असल्यास त्याचे मुल्यांकन केले जाते. अमूर्त मत्तांचा कर्जफेड खर्च आणि कमी करण्याचे तोटे यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या कंपनीने भा. ले. मानकात संक्रमण केल्याच्या तारखेत म्हणजेच ०१ एप्रिल २०१५

रोजी पूर्वीच्या सर्व सामान्य लेखा मानकाप्रमाणे अमूर्त मत्तांचे विद्यमान मूल्याचा मानीव खर्च म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

५. वित्तीय नसलेल्या मत्ता कमी करणे

मराविमं सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी -

ही कंपनी तिच्या प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला, कोणत्या मत्ता कमी करण्यास योग्य आहे याचा आढावा घेते. तसेच मागील काळात कमी करण्याच्या मत्तांबाबत उलट काही चिन्हे आहेत किंवा कसे हे पाहते. तशी चिन्हे असली किंवा कमी करण्याच्या वार्षिक परिक्षणाची गरज असली तर कंपनी वसूली योग्य रक्कम निश्चित करते आणि मत्ता चालू ठेवण्याची रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त असेल तर कमी करण्याच्या तोट्याला मान्यता देते.

वसूली योग्य रक्कम निश्चिती उच्चतम रास्त मूल्य वजा विक्री खर्च आणि वापरातील मूल्य या प्रकारे निश्चित केली जाते. वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्यांच्या विद्यमान मुल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी पैशाचे वेळेनुसार मूल्याप्रमाणे, बाजाराचे निर्धारण दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. तसेच मत्ता विषयीच्या जोखीम विचारात घेतल्या जातात. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी सध्या बाजारातील व्यवहारांचा विचार केला जातो. जर असे व्यवहार ओळखता येत नसतील तर, एखादे योग्य मूल्यांकन नमुना वापरला जातो. ही मोजणी बहुविध मूल्यांकने, जाहीर शेअर व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्सच्या उद्धृत प्रक्रिया किंवा रास्त मूल्यांचे उपलब्ध निदर्शक यांचा उपयोग केला जातो..

चालू प्रवर्तनातील कमी करण्याचे तोटे, (यामध्ये वस्तुसूची कमी करणे, समाविष्ट असते) यांना नफा -तोटा पत्रकातील योग्य विभागात मान्यता दिली जाते. मात्र यामध्ये ज्या मालमत्तांचे इतर सर्वकष उत्पन्न यामधील पूनर्मूल्यांकनानुसार पूर्वी मूल्यांकन केले होते त्यांना वगळले जाते. अशा मालमत्तांचे मूल्य कमी करण्यासाठी त्याचे अन्य कोणत्याही मागील पूनर्मूल्यांकनातील इतर सर्वकष उत्पन्न पर्यंतच्या रकमेप्रमाणे मान्यता दिली जाते.

महानिर्मिती प्रकरणी -

वित्तीय नसलेल्या मता कमी करणे

प्रत्येक ताळेबंद तारखेला वस्तुसूची व्यतिरिक्त वित्तीय नसलेल्या मत्ता, स्थगित कर मत्ता आणि विक्रीसाठी धारण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता यांचा आढावा घेतला जातो आणि मत्ता कमी करण्याची चिन्हे असल्याची पाहणी केली जाते.

जर अशी चिन्हे आढळली किंवा त्यासाठी मत्ता कमी करण्याची वार्षिक परिक्षण आवश्यक असेल तर समूह मत्तांकडून वसुली योग्य रकमेचा अंदाज करतो. कोणत्याही मत्तेचे वसुली योग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या रोख निर्मिती युनीट यांचे वसुली योग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या रोख निर्मिती युनीट यांचे रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च आणि वापरातील मूल्य या पेक्षा जास्त असते. जर व्यक्तिगत मत्ता इतर मत्ता किंवा समुह यातून मोठ्या प्रमाणात वेगळ्याप्रकारे रोख प्रवाहांची निर्मिती करीत नसेल तर तिचे वसुली योग्य मूल्य निश्चित केले जाते.

जेव्हा मत्ता किंवा रोख निर्मिती यूनीटची चालू रक्कम वसुली योग्य रकमेपेक्षा जास्त होते तेव्हा ती कमी करण्यास योग्य असल्याचे ठरवून ती वसुली योग्य मूल्याइतके कमी केले जाते.

वापरातील मूल्याचे निर्धारण करण्यासाठी भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह त्याच्या विद्यमान मूल्याइतके कमी करण्यात येते. त्यासाठी पैशाचे वेळेनुरुप मूल्यावरून चालू बाजार मूल्यांकन आणि मत्तांच्या जोखीमा दर्शविणारा कर पूर्व सवलत दर वापरला जातो. रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी अलिकडच्या बाजारातील व्यवहार घेतले जातात, असे व्यवहार ओळखता आले नाही तर मूल्यांकनाचे योग्य मॉडेल वापरले जाते.

मे. महागूज कंपनीच्या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी २५.०८.२०१४ रोजी दिलेला निर्णय आणि त्यानंतर रिट याचिका (क्रिमिनल) नं. १२० वर्ष २०१२ यातील आदेश तसेच इतर संबंधित प्रकरणे स्क्रिनिंग कमिटीने वाटप केलेले आणि सरकारच्या वितरण पद्धतीमधून दिलेले कोळसा खाणीचे सर्व वाटप बेकायदेशीर असल्याचा निकाल दिला आणि २०४ खाणीचे वाटप रद्द केले. कोळसा मंत्रालयाने दि. ०१.१०.२०१४ रोजीच्या पत्राने कंपनीला याची माहिती दिली आणि त्याच्या वेबसाईटवर माहिती प्रदर्शित केली त्यात मच्छकाटा महानदी कोळसा खाणीचाही समावेश होता.

त्यानंतर कोळसा मंत्रालयाने यापूर्वी ज्यांना वाटप केले त्यांच्याबद्दल मूल्यमापनाचा तपशील मागविला व तसे शपथ पत्र सादर करण्यास सांगितले. त्यानुसार कोळसा खाणीच्या विकासासाठी शपथपत्रातून सादर केली. कोळसा मंत्रालयाने ही माहिती मागविली आणि त्यानंतर त्यांच्याकडे ही कागद पत्रे म्हणजे भूगर्भशास्त्रीय अहवाल, खाणीची योजन, खाण बंद करावयाची योजना आणि हक्क, पूर्वी वाटप झालेल्या कोळसा संस्थेकडून नवीन यशस्वी बोलीदाराकडे पाठविण्याची यंत्रणा आहे. जुन्या वाटप प्राप्त संस्थेकडून केलेला खर्चाचे मूल्यमापन कोळसा मंत्रालयाकडून केले जात आहे. कोळसा मंत्रालयाने मार्च २०१५ पासून स्पर्धात्मक बोलीद्वारे पुनर्वाटप सुरु केले आहे.

३१ मार्च २०१९ पर्यंत मच्छकाटा महानदी खाणी पूर्नवाटप झालेले नव्हते. कोळसा मंत्रालयाने कंपनीने केलेल्या खर्चाच्या मूल्यामापनाबाबत काहीही कळविलेले नव्हते. यामुळे व्यवस्थापनाचे मत आहे की कंपनीच्या कोणत्याही मत्ता अद्याप कमी झालेल्या नाही.

वि. वर्ष २०१४-१५ पर्यंत रु. ५४,४०,७०,१११/- रुपये खर्च झाले असून ते ताळेबंदात 'चालू नसलेल्या मत्ता' या प्रकारे दाखविल्या आहेत. या खर्चात प्रामुख्याने कंपनी संस्थापनेचा खर्च भूगर्भ अहवाल खरेदी करण्यासाठी सी एम पी डी आय एल ला दिलेले पैसे, वॉशॉबिलीटी टेस्ट रिपोर्ट, सल्लागार शूल्क, कायदेशीर आणि व्यावसायिक आकार आणि कोळसा खाण विकासासाठी केलेले खर्च समाविष्ट आहेत. कंपनीचे असे मत आहे की भूगर्भ शास्त्रीय अहवाल खरेदीचा खर्च मागील वर्षातील असून समन्वय कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी दावा केलेल्या खाणीच्या पायाभूत खर्चाशी जोडता येते.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी कोळसा ब्लॉक वाटप रद्द केल्यानंतर कोळसा मंत्रालयाने (विशेष तरतूदीचा) अध्यादेश २०१४ लागू केला असून त्यानुसार पूर्वीच्या वाटप संस्थांना भरपाईचे मूल्यमापन सुरु केले आहे. त्यात दिलेल्या उत्तरात एम जी सी एल यांनी कंपनीने केलेले खर्च कळविले. याशिवाय कोळसा मंत्रालयाने, पूर्वीच्या वाटप प्राप्त कर्त्यांनी केलेल्या खर्चाचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया सुरु केली. ज्या खाण ब्लॉकचे पूर्नवाटप / मालकी देण्यात आली, त्या बाबतच ही प्रक्रिया सुरु आहे. मच्छकाटा कोळसा ब्लॉकचे पूर्नवाटप अद्याप कुठल्याही बोलीदाराला झालेले नाही. त्यामुळे कोळसा मंत्रालयाने त्याचे मूल्यांकन अद्याप केलेले नाही.

कंपनीच्या खर्चाची प्रतिपूर्ती ही कोळसा मंत्रालयाच्या अध्यादेश (विशेष तरतूदी) २०१४ यानी मूल्यांकन व तरतूदी प्रमाणे गुणवत्तेवर अवलंबून असेल. सध्या याबाबात तरतूद केली नाही. मात्र कोळसा मंत्रालयाने अंतिमिकरण केल्यावर आवश्यक समायोजन तरतूद लेख्यांमध्ये केली जाईल.

महापारेषण प्रकरणी

वस्तूमाल सूची व्यतिरिक्त इतर वित्तीय नसलेल्या मत्ता

भा. ले. मानक ३६ यामधे रोकड निर्मात्या युनीट्ची व्याख्या दिली आहे. त्यानुसार प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला असे कमी करावयाचे यूनिट्स ओळखून काढले जातात. आणि जर रोख निर्मिती युनीट चालू ठेवण्याची रक्कम तिच्या वसूलीच्या योग्य रकमेपेक्षा जास्त असली तर (रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च आणि वापर मूल्य यापेक्षा जास्त) कमी करण्याची हानी मान्य केली जाते. चालू ठेवण्याची रक्कम वसुली योग्य रकमे इतकी कमी केली जाते. आणि कमी रकमेस नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. पूर्वीच्या लेखा कालावधीत ज्या कमी करण्याच्या तोट्यास मान्यता दिली होती ती वसुली योग्य रकमेच्या अंदाजातील वाढी इतकी उलट केली जाते. मत्ता कमी केल्यानंतर तिचे सुधारीत मूल्यानुसार उर्वरित आयुष्यासाठी घसारा कमी केला जातो.

महावितरण प्रकरणी -

वित्तीय नसलेल्या मत्ता कमी करणे

प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला वित्तीय नसलेल्या मत्तांचा आढावा घेऊन ती कमी करण्याची चिन्हे आहेत का हे पाहिले जाते.

जर अशी चिन्हे आढळली किंवा मत्तांच्या वार्षिक परिक्षणाची गरज भासली तर कंपनी सदर मत्तेद्वारे वसूल होऊ शकणाऱ्या रकमेचा समुह अंदाज करते. कोणत्याही मत्तेचे वसूलीयोग्य मूल्य हे तिचे किंवा तिच्या रोख निर्मिती युनिट यांचे रास्त मूल्य वजा विल्हेवाट खर्च आणि वापरातील मूल्य यापेक्षा जास्त असते. व्यक्तिगत मत्तेची वसुली योग्य रक्कम निश्चित केली जाते. त्यासाठी ती मत्ता रोख प्रवाह निर्माण करणारी नसावी किंवा ते प्रवाह इतर मत्ता किंवा मत्ताचा गट यापेक्षा जास्त नसावे.

जेव्हा मत्ता किंवा रोख निर्मिती युनिट यांचे विद्यमान रक्कम तिच्या वसुली योग्य रकमेपेक्षा जास्त होते, तेव्हा ती मत्ता कमी करण्याचा विचार केला जातो आणि ती तिच्या वसुलीयोग्य रकमेइतकी कमी लिहिली जाते..

वापरातील मूल्य निर्धारणासाठी भविष्यातील रोकड प्रवाह विद्यमान मूल्याइतके कमी केले जातात. त्यासाठी सध्याचे बाजार पेठेतील वेळेनुसार पैशाचे मूल्य आणि मत्तेच्या विशिष्ट जोखीम दर्शविणारा करपूर्व सवलत दर वापरला जातो. रास्तमूल्य वजा विल्हेवाट खर्च निश्चित करण्यासाठी, बाजारातील चालू व्यवहार विचारात घेण्यात येतात. जर अशा व्यवहारांची ओळख निश्चिती होत नसेल तर योग्य मूल्यांकन मॉडेल वापरले जाते.

६. वस्तुसूची

महानिर्मिती प्रकरणी

माल साठ्यामधील वस्तू, सुटे भाग यांचे मूल्यांकन खर्चाच्या कमी स्तरावर होते किंवा निव्वळ वसुली योग्य मूल्य याप्रमाणे केले जाते आणि वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथड याप्रकारे खर्च निश्चित केला जातो तथापि, वीज निर्मितीसाठी ठेवलेले साहित्य आणि इतर वस्तू किमतीपेक्षा कमी लिहिल्या जात नाहीत. कारण वीजेची विक्री ही वीज निर्मितीच्या खर्चापेक्षा जास्त दराने केली जाईल. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळू शकणारा व्हॅटचा परतावा) आणि सदर वस्तूमाल त्यांच्या विद्यमान जागेवर व स्थितीत आणण्यासाठीचे खर्च समाविष्ट असतात. सेवा देऊ न शकणारे आणि निकामी वस्तू आणि सुटे भाग यांचे तोटे लेख्यांसाठी घेतलेल्या आढाव्यात निश्चित केले जातात.

महापारेषण प्रकरणी

वस्तुसूचीचे मूल्य खर्चापेक्षा आणि निव्वळ वाजवी मूल्यापेक्षी कमी स्तरावर केले जाते. वस्तू माल सूचीचे मूल्य निर्धारण वेटेड सरासरीच्या आधारे निश्चित केले जाते.

वस्तू सूचीच्या किमतीत खरेदी खर्च व ती वस्तु सध्याच्या जागेवर स्थितीत आणण्याचे खर्च समाविष्ट असतात. वस्तूमालाला 'प्रथम आत प्रथम बाहेर' तत्त्वावर दिल्या जातात.

ज्या सुट्या भागांना मालमत्ता, कारखाना व साधने यातील निकष पूर्ण करता येत नाही त्यांची नोंद वस्तुसूचीत केली जाते.

निकामी, मंद गतीचा व निरुपयोगी मालसाठा प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी ओळखून काढला जातो व गरज असल्यास त्यांच्यासाठी तरतूद केली जाते.

महावितरण प्रकरणी

ज्या वस्तुसूचीचे उपयुक्त आयुष्य एका वर्षापर्यंत आहे, त्यांचे मूल्य वेटेड सरासरी खर्चापेक्षा कमी आणि निव्वळ पुर्नविक्रीचे मूल्य यांच्या कमी स्तरानुसार केले जाते.

पडताळणीनंतर सुट्या भागाचे व विनाउपयोगी भांडाराचे तोटे ओळखून लेख्यामध्ये नोंद घेतली जाते.

७. कर्ज खर्च

मराविम सूत्रधारी कं. लि. प्रकरणी

कर्ज खर्चात कंपनीने निधी कर्जाने घेण्यासंबंधी केलेले व्याज व इतर खर्च याचा समावेश असतो. कर्जाचे खर्च हे एखादी मत्ता मिळविणे, उभारणी करणे किंवा मत्तेची खरेदी करणे यासाठी असतात. मत्तेचा इच्छित वापर किंवा विक्री करण्यासाठी बराच वेळ लागतो. या मत्तेसाठी केलेल्या खर्चाच्या काही भागाचे भांडवलीकरण केले जाते. इतर सर्व कर्ज खर्च ज्या कालावधीत होतात त्या कालावधीत खर्च केले जातात.

महानिर्मितीच्या प्रकरणी

कर्ज खर्चात निधी कर्जाने घेण्याच्या संबंधित व्याज व इतर खर्च समाविष्ट असतात. हे कर्ज खर्च, मत्ता घेणे, तिचा उभारणी करणे आदी कामांसाठी खर्च केले जातात. मत्ता तिच्या इच्छित कामासाठी तयार होण्यास वेळ लागतो. ज्या महिन्यात मत्ता तशाप्रकारे तयार होते, तो पर्यंत मत्तेच्या खर्चाच्या एका भागाचे भांडवलीकरण केले जाते. अन्य भांडवली मत्तांचे संपादन किंवा रचना यासाठी लागू असलेल्या, इतर कर्ज खर्चाना ज्या काळात असे खर्च केले त्याना व्यय अशी मान्यता दिली जाते.

महापारेषण प्रकरणी

कर्ज खर्चामधे निधी कर्जाने मिळविण्यासाठी व्याज आणि केलेले इतर खर्च यांचा समावेश असतो. कर्ज खर्चात विनिमयातील फरकाचे मर्यादेत केलेल्या समायोजनाचा अंतर्भाव सुद्धा असतो.

वरील धोरण क्र. २.४ यात संदर्भ दिल्याप्रमाणे बांधकाम दरम्यान व्याज आणि त्याचा खर्च यांना 'प्रगतीपथावरील भांडवली बांधकाम अंतर्गत वेगळी बाब म्हणून बाजूला ठेवले जाते. आणि त्याचे मत्ता सोबत जोडून प्रगती पथावरील भांडवली बांधकामात अखेरच्या शिल्लकीच्या प्रमाणात भांडवलीकरण केले जाते. योजनेचा प्रत्यक्ष बांधकाम दरम्यान व्याजाचे, जेथे शक्य असेल तेथे मोजला जातो. जर योजना उरलेली असेल तर बांधकाम दरम्यान व्याजाच्या हिशेबासाठी आरंभीचा भांडवली खर्चाचा बांधकाम दरम्यान व्याजासाठी कर्ज. समभागाचे गुणोत्तर ७०-३० असे विचारात घेतले जाते. तसेच त्या वर्षी केलेला भांडवली खर्च विचारात घेतला जातो. भांडवलीकरणासाठी फीफो पद्धत अनुसरली जाते. म्हणजेच भांडवली खर्चाची आरंभीची शिल्लकी घेऊन मत्तेचे भांडवल केले जाते. बांधकामा दरम्यान व्याजाच्या मोजणीसाठी प्रत्येक वित्तीय संस्था आणि बँका यांचा वेटेड ॲव्हरेज रेट ऑफ इंटरेस्ट (सरासरी व्याज दर) लावला जातो.

पात्र मत्तेचे (म्हणजे मत्ता इच्छित वापरासाठी तयार होण्यास बराच काळ घेते) संपादन किंवा बांधकाम याचे कर्ज खर्चाचे भांडवलीकरण करून त्यास मत्ता खर्चाचा भाग मानले जाते इतर सर्व कर्ज खर्च नफा -तोटा पत्रकात आकारले जातात.

जेव्हा पात्र मत्ता तिच्या इच्छित वापरासाठी तयार करण्यासाठीची सर्व कामे पूर्ण होतात तेव्हा कर्ज खर्चाचे भांडवलीकरण करणे थांबते. पात्र मत्ता खर्च प्रलंबित असतांना विशिष्ट कर्जाचा निधी हंगामी गुंतवणूकीत ठेवल्यास त्याचे गुंतवणूक उत्पन्न भांडवलीकरणास पात्र कर्ज खर्चातून वजा केले जाते.

सहयोगी कंपन्याकडून मत्तांचा घसारा आणि कर्जफेड सरळ रेषा पद्धतीने आकारला जातो. (कंपनी अधिनियम २०१३ नुसार अनुसूची दोन मधील 'भाग-ब' यातील तरतूद नुसार)

८. चालू नसलेल्या मत्तांची विक्री

महानिर्मितीच्या प्रकरणी

चालू नसलेल्या मत्ता सतत वापरात ठेवण्यापेक्षा त्याचे विद्यमान मूल्य जर विक्री व्यवहारातून वसूल होणार असेल तर त्यांचे विक्रिसाठी काढलेल्या मत्ता असे वर्गीकरण केले जाते. जेव्हा विक्री होण्याची चांगली शक्यता असेल आणि जर सद्यस्थितीत मत्ता विक्रीसाठी त्वरीत उपलब्ध असेल तरच वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते, अशा मत्तांची मोजणी त्यांच्या वहन रकमेपेक्षा कमी केली जाते. आणि विक्रीचा खर्च रास्त मूल्यातून वजा केला जातो.

मालमत्ता, कारखाने आणि अमूर्त मत्तांचे जेव्हा विक्रीसाठी वर्गीकरण केले जाते तेव्हा त्याचा घसारा किंवा कर्जफेड तरतूद केली जात नाही.

महापारेषण प्रकरणी

चालू नसलेल्या मत्तांना सतत वापरात ठेवण्यापेक्षा त्याचे विद्यमान मूल्य जर विक्री व्यवहारातून वसूल होणार असेल तर त्यांचे वर्गीकरण विक्रीसाठी केलेल्या मत्ता असे केले जाते. जेव्हा विक्रि होण्याची चांगली शक्यता असेल आणि जर सद्यस्थितीत मत्ता विक्रीसाठी त्वरीत उपलब्ध असेल तरच वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते. केवळ मालमत्तेच्या विक्रीसाठी नेहमीच्या आणि प्रथा असलेल्या मुदतीच्या अधीन असेल तर, अशा मत्तांची मोजणी त्यांच्या वहन रकमेपेक्षा कमी केली जाते, आणि विक्रिचा खर्च रास्त मूल्यातून वजा केला जातो. मालमत्ता, कारखाने आणि अमूर्त मत्तांचे जेव्हा विक्रीसाठी वर्गीकरण केले जाते तेव्हा त्याचा घसारा किंवा कर्जफेड केली जात नाही.

९. भाडेपट्टी

मराविमं सूत्रधारी कंपनी संबंधी

या कंपनीने दि. १ एप्रिल २०१९ पासून भा. ले. मानक ११६ 'भाडेपट्टी' याचा अंगिकार केला त्यासाठी सुधारीत पूर्वलक्षी पद्धती वापरली आहे. कंपनीने तिच्या भाड्यांना सदर मानक संचित परिणामानुसार लागू केले असून त्याचा प्रभाव आरंभीच्या तारखेपासून (०१ एप्रिल २०१९) मान्य केला आहे. त्यानुसार मागील काळातील माहितीचे पुन्हा निवेदन केलेले नाही.

कंपनीच्या भाड्याच्या मत्तांचे वर्गीकरणाचे प्रामुख्याने पुढील प्रकार आहेत. ते म्हणजे जमीन आणि इमारती,तसेच कारखाने आणि यंत्रसामग्री. कंपनी कोणत्याही करारामधे भाडेपट्टीचा अंतर्भाव आहे किंवा कसे याचे निर्धारण कराराचे वेळी करते. जर करारात भाडेपट्टी समाविष्ट असली तर त्या प्रकारे ओळख निश्चिती केलेल्या मत्तांच्या वापराचे नियंत्रण त्या मुदतीसाठी आहे का याचा विचार केला जातो. त्यासाठी कंपनी पुढील गोष्टीचे मूल्यमापन करते.

१) करारात ओळख दर्शक मत्तांचा वापराचा अंतर्भाव असतो. २) कंपनीला भाडेपट्टीच्या मुदतीमधे मत्तांच्या वापराद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ असले पाहिजेत. ३) कंपनीला मत्ता वापराचे आदेश देण्याचे अधिकार असले पाहिजेत. भाडेपट्टी सुरु होण्याच्या तारखेपासून कंपनी मत्ता वापरण्याचा हक्क याला मान्यता देते. तसेच संबंधित भाडेपट्टीचे दायित्त्व मान्य करते. मात्र जर भाड्याची मुदत बारा महिन्यापेक्षा कमी (अल्प मुदतीची भाडेपट्टी) आणि कमी मूल्याची असल्यास तिचा अपवाद केला जातो. कंपनी अशा अल्प मुदतीच्या आणि कमी मुल्याच्या मत्तांच्या भाडेखर्चासाठी सरळ रेषा पद्धतीने त्या मुदतीकरिता प्रवर्तन खर्च म्हणून मान्यता देते. मत्ता वापराचा हक्क प्रथम खर्च म्हणून मान्यता देण्यात येते, त्यात प्रारंभी भाडे दायित्त्व असते. त्याचे समायोजन भाडे सुरु होण्याच्या तारखेपूर्वीच्या अन्य भाडे दायित्वात केले जाते. अन्य काही थेट खर्च असले तर ते मिळविले जातात. काही प्रोत्साहके असली तर ती वजा केली जातात. त्यानंतर त्यांची मोजणी, खर्च वजा संचित घसारा आणि कमी करण्याची हानी असल्यास ती धरुन केली जाते. वापराच्या हक्क असलेल्या मत्तांचा घसारा प्रारंभाच्या तारखेपासून सरळ रेषा पद्धतीने भाडे पट्ट्याच्या अल्प मुदतीसाठी आणि मत्तेच्या उपयुक्त आयुष्यासाठी केला जातो. भविष्यातील भाडेपट्टीचे दायित्व विद्यमान मुल्यानुसार केले जाते. या भाडेपट्टीतील सूचक व्याजदर वापरून भाडयाच्या रकमेत सवलत घेता येते किंवा जर त्याची निश्चिती सहज करता येत नसली तर इन्क्रिमेंटल बॉरोईंग रेट्स वापरले जातात. भाडेपट्टीच्या दायित्वाची पुनर्मोजणी केली जाते. त्यामध्ये भाडेपट्टीचे व्याज दर्शविण्यासाठी विद्यमान रक्कम वाढविली जाते. आणि भरलेल्या पैशानुसार ती कमी दर्शविली जाते. जर काही घटना म्हणजे भाडे मुदत अटी यात बदल केला किंवा निर्देशकांत किंवा भाडेपट्टी निश्चित करण्याच्या दरात बदल झाला तर भाड्याचे दायित्त्व पून - मोजले जाते. त्यात सामान्यपणे भाड्याच्या मत्तांचे समायोजन केले जाते. ताळेबंद पत्रकात भाडेदायित्व आणि वापराचा हक्क वेगवेगळे सादर केले जातात. दिलेल्या भाडे रकमेचे रोकडता प्रवाहात 'वित्तीय रोकडता प्रवाह' असे वर्गीकरण होते.

महानिर्मितीच्या प्रकरणी

दि ०१ एप्रिल २०१९ रोजीचे किंवा त्यानंतरच्या करारात भाडेपट्टीचे निर्धारण कंपनी करते. जर अशी भाडेपट्टी करारात असली तर त्यामध्ये ओळख निश्चिती केलेल्या मत्ता, कराराच्या मुदतीकरिता नियंत्रित करण्याचा हक्क आहे किंवा कसे याचा विचार केला जातो. अशा नियंत्रणाच्या हक्काचे निर्धारण करताना कंपनी खालील प्रमाणे विचार करते.

ओळखनिश्चिती केलेली मत्ता वापरण्याचा हक्क असणे हा हक्क स्पष्टपणे किंवा सूक्ष्मपणे विनिर्देशित केलेले असावा. तो प्रत्यक्ष आणि लक्षणीय असा किंवा त्यात प्रत्यक्ष वेगळी क्षमता दिसावी. जर पुरवठादाराकडे महत्त्वाचा पर्यायी हक्क असला तर ती मत्ता ओळखली जाणार नाही.

कंपनीकडे सदर मत्ता वापरुन मोठ्या प्रमाणात सर्व आर्थिक लाभ मिळविण्याचे हक्क संपूर्ण मुदतीकरता असावेत.

कंपनीकडे अशा मत्तांच्या वापराबाबत आदेश देण्याचा हक्क पाहिजे. दि. ०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या करारासाठी कंपनीने भाडेपट्टी करारात भाडयाची व्यवस्था कशी आहे हे निश्चित केले आणि तसेच खालील बाबींचे मुल्यमापन केले.

विशिष्ट एक किंवा अनेक मत्ता वापरण्याच्या व्यवस्था पूर्णपणे आहेत का ? या व्यवस्थेत मत्ता वापराचा हक्क लिहिला आहे का ?

१) कंपनी भाडेकरु असल्यास

मत्ता वापराचा हक्क भाड्याच्या मुदतीच्या अखेरीस सरळ रेषा पद्धती वापरुन कमी होतो. याशिवाय जर मुदतीत काही नुकसान कमी होत जाणारे असले तर त्यामुळे वापराचा हक्क कमी होतो. जर काही पुनर्मोजणी असेल तर त्यासाठी समायोजन करावे लागते.

प्रारंभी भाड्याचे दायित्त्व जे भाड्याच्या आरंभी भरलेले नसते त्या भाड्याच्या देण्याच्या विद्यमान मूल्याप्रमाणे मोजले जाते, आणि कंपनीचा वाढणारा कर्जदर वापरुन तसे कमी केले जाते. भाड्याचे दायित्त्व कर्जफेडीच्या खर्चानुसार मोजण्यात येते.

ज्या भाडेपट्टीची मुदत बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा अल्पमुदतीच्या भाडेपट्टीच्या देण्याला कंपनी खर्च म्हणून मान्यता देते.

२) कंपनी भाडेपट्टीने देणारी संस्था असल्यास

जेव्हा कंपनी जर भाड्याने देणारी संस्था असते त्या तुलनात्मक कालासाठी कंपनीची धोरणे भा. ले. मानक ११६ नुसार विहित केलेल्या पध्दतीनुसार दिले जातात.

महापारेषणच्या प्रकरणी

ओळख निश्चिती केलेल्या मत्तेचा एक विशिष्ट मुदतीसाठी देवाणघेवीच्या प्रकारे मत्ता वापराचे नियंत्रण दिलेली भाडेपट्टी म्हणजे करार होय.

कंपनी जेव्हा भाडेकरू असते

ही कंपनी जेव्हा करारातील भाडेपट्टी संबंधीच्या प्रत्येक घटकाचा लेखे करते, हे लेखे करारातील इतर भाड्या व्यतिरिक्त घटकांपासून वेगळे असतात. भाडेपट्टीतील घटकाचे लेखे त्याच्या संबंधित एकल किंमतीवर आधारीत असतात आणि भाडेव्यतिरिक्त घटकाचे मिळून स्वायत्त घटक असतात.

कंपनी मत्ता वापराच्या हक्काला त्या मुदतीसाठी आणि मुदतीच्या आरंभाच्या तारखेपासून मान्यता देते. मत्ता वापराच्या हक्काचा खर्च सुरुवातीपासून किंवा त्यापूर्वी मोजला जातो. त्यामध्ये भाडेपट्टी दायित्त्वाची प्रारंभीची मोजणी समाविष्ट असते. तिथे समायोजन आरंभ तारखेच्या पूर्वीच्या कोणत्याही भाडे दायित्त्वाच्या रकमे सोबत केले जाते. भाडयासाठी काही प्रोत्साहके मिळाली असली तर ती त्यातून वजा केली जातात. आणि अन्य काही प्रारंभिक थेट खर्च केले असल्यास ते मिळविले जातात. तसेच भाडेकरूने जागेतील काही मत्ता काढावयाचे असले किंवा मत्ते व तिच्या जागेची पूनर्जोडणी करावयाची असली तर त्याच्या खर्चाचे अंदाज पत्रक केले जाते. नंतर वापराच्या हक्काच्या मत्तेची मोजणी खर्च वजा संचित घसारा, कमी करण्याचा संचित खर्च, (जर असल्यास) अशी केली जाते. वापराचा हक्क मिळालेल्या मत्तेचा घसारा सरळ रेषा पद्धतीने भाडेपट्टीच्या अल्प मुदतीसाठी किंवा सदर मत्तेच्या उर्वरित आयुष्यासाठी केला जातो. मत्ता वापराच्या उपयुक्त आयुष्याची निश्चिती मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या प्रमाणेच केली जाते. जेव्हा वापर हक्काच्या मत्तेच्या विद्यमान खर्चाची वसुली होणार नाही, जर तोटा होण्याचे संकेत असतील तर ती कमी करण्यासाठी परिक्षण केले जाते. आणि त्यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

कंपनी भाडेपट्टीचे दायित्व, भाड्याच्या आरंभी न भरलेल्या भाड्याच्या विद्यमान मूल्यानुसार मोजते, भाडेपट्टीत अंतर्भूत असलेल्या व्याज दराप्रमाणे सवलत दिली जाते. (व्याज दर सहज निश्चित असल्यास) व्याजदर सहज उपलब्ध नसल्यास कंपनी इन्क्रीमेंट्स बॉरोईज रेट यासाठी वापरते. यासमान भाडेपट्टीसाठी कंपनी भाडेपट्टी निहाय तत्वावर इन्क्रीमेंट्स बॉरोईंग रेटचा सर्वांच्या साठी वापर करते. भाडेपट्टीचे दायित्व नंतर पुन: मोजले जाते. त्यात भाड्याच्या दायित्वाचे व्याज दिसण्यासाठी विद्यमान रक्कमा वाढविण्यात येते, आणि भरलेली रक्कम दाखविण्याच्या दृष्टीने विद्यमान रक्कम कमी केली जाते. किंवा स्थिर भाडयाच्या रकमेत सुधारणा करते. यासाठी पूनर्निर्धारण किंवा भाडयात सुधारणा केलेला फरक किंवा स्थिर दरातील मोठया सुधारणा दिसतील अशा प्रकारे रचना केली जाते. अशा सुधारणांमुळे आणि वापर हक्काच्या मतांच्या समायोजनेमुळे भाडयापट्टीच्या दायित्वाचे पूनर्मापनास त्याच्या स्वरूपानुसार नफा तोटा पत्रकात मान्यता देते. जेव्हा अशा मत्तांचे विद्यमान मूल्य शून्य इतके कमी होते आणि जेव्हा भाडेपट्टीचे दायित्त्वाचे मापनात आणखी घट होण्याची शक्यता असते तेव्हा कंपनी उर्वरित रकमेला नफा तोटा पत्रकात मान्यता देते.

महावितरण प्रकरणी

भाडेपट्टी

भाडेपट्टी जेव्हा सुरु होते तेव्हा तिच्या व्यवस्थेनुसार ती भाडेपट्टी आहे किंवा कसे हे ठरविले जाते. ही व्यवस्था किंवा तिच्या अंतर्गत बाबी जर संबंधित मत्तेच्या वापरावर अवलंबून असतील तर किंवा सदर मत्ता आणि व्यवस्था वापराचा अधिकार असल्याचे स्पष्ट दाखवित असतील तर त्या व्यवस्थेचे पूर्ण स्वरुप भाडेपट्टीचे असते. (जरी हक्क स्पष्टपणे विनिर्देशित केला नसला तरी) भाडेपट्टी अटीनुसार जर मालकी हक्काच्या सर्व जोखिमा आणि मोबदले भाडेकरुकडे मोठ्या प्रमाणात हस्तांतरीत करीत असेल तर तिचे वर्गीकरण 'वित्तीय भाडेपट्टी' असे केले जाते, इतर सर्व भाडेपट्ट्यांचे वर्गीकरण 'प्रवर्तनाच्या भाडेपट्ट्या' असे केले जाते.

(अ) कंपनी भाडेकरू असल्यास

या कंपनी समुहाने मत्ता वापराचा हक्क आणि भाडेपट्टी दायित्व भाडे सुरु होण्याच्या तारखेपासून भाडेपट्टीचे दायित्व मान्य केले आहे. वापर हक्काच्या मत्तांचे मापन प्रारंभी खर्चानुसार केले जाते. त्यामध्ये भाडयाच्या दायित्त्वाची सुरुवातीची रक्कम समाविष्ट असते. किंवा तारखेपूर्वी काही भाडयाच्या रकमा दिल्या असतील तर त्याचे समायोजन केले जाते. अधिक काही खर्च केले असले किंवा मत्ता मोडतोड व काढून टाकण्यासाठीच्या व पूनर्रचनेचे खर्चाचे अंदाज केले असले तर प्रोत्साहिके मिळविले जातात. प्रोत्साहिके असली तर ती वजा केली जातात.

नंतर मत्ता वापर हक्काच्या मत्तांच्या कर्ज फेडीची तरतूद सुरु होण्याच्या तारखेपासून सरळ रेषा पध्दतीने मुदती अखेर पर्यंतच्या काळासाठी केली जाते.मत्ता वापर हक्काच्या उपयुक्त आयुष्याचे अंदाज निर्धारण मालमत्ता, कारखाने व साधने यांच्या आधारावर केले जातात.

भाडेपट्टीचे दायित्व प्रारंभी भाड्याच्या विद्यमान मूल्याप्रमाणे मोजले जाते, जे आरंभ तारखेला दिलेले नसावे. भाडेकरारात व्याज दर सूचित असल्यास त्याची सवलत विचारात घेतली जाते. तशी नसल्यास, समुहाचा इन्क्रिमेंटल बॉरोईंग रेट्स नुसार गणना केली जाते. सामान्यत - कंपनी समूह या इन्क्रिमेंटल बॉरोईंग रेट्सला डिस्काउंट रेट मानतो.

ब) अल्प मुदतीची भाडी आणि कमी मूल्याच्या मत्ताचे भाडे

कंपनी समूहाने अल्प मुदतीच्या भाडेपट्ट्यांना म्हणजे ज्याची भाडेपट्टी १२ महिन्यापेक्षा कमी आहे आणि मूल्य व भाडी रु. १० लाखापेक्षा प्रतिमाह कमी आहे,अशा मत्तांसाठी भा. ले मानक ११६ लावू नये असे ठरविले आहे. अशा मत्तांचे भाडे या मुदतीसाठी खर्च म्हणून मान्य केले जाते.

कंपनीने अल्प मुदती भाडेपट्टीना भा. ले. मानत १९६ लागू करू नये असे ठरविले आहे. ज्याची मुदत १२ महिने किंवा त्याहून कमी आहे त्यांना अल्प मुदतीच्या आणि कमी मूल्याच्या भाडेपट्टया मानले जाते. अशा भाडेपट्ट्यांना सरळ रेषा तत्वानुसार त्यांच्या मुदतीसाठी खर्च अशी मान्यता दिली जाते.

संक्रमणानंतर कंपनीने उर्वरित भाड्याना मापन विद्यमान मूल्यानुसार करून भाडेपट्टी दायित्त्वाना मान्यता दिली. वापर हक्काच्या मत्तांबाबत जणू काही त्यांच्या भाडेपट्ट्यांच्या तारखापासून त्यांना मानक लागू आहे असे मानून त्यांच्या विद्यमान रकमांना मान्यता दिली. मात्र १ एप्रिल २०१९ पासून भाड्याच्यासाठी इन्क्रिमेटल बॉरोइंग रेट वापरून व तशी सवलत दिली. ज्याचे वर्गीकरण वित्तीय या भाडेपट्टया असे भा.ले. मानक १७ प्रमाणे केले जाते. अशा वापर हक्काच्या मत्तांचे विद्यमान मूल्य आणि भा. ले. ११६ लागू करण्याच्या तारखेचे भाडेपट्टी दायित्त्व यानुसार भा. ले. मानक १७ नुसार भाडे दायित्व आणि भाडे मत्ता यांचे विद्यमान मूल्य आहे, असे मानण्यात आले.

कंपनी ही भाड्याने देणारी संस्था असल्यास

कंपनीने भाडेपट्टी सुरु झाल्यापासून प्रत्येक भाडेपट्टीचे वर्गीकरण प्रवर्तन भाडेपट्टी किंवा वित्तीय भाडेपट्टी असे केले आहे. प्रवर्तन भाडेपट्टीतून मिळणाऱ्या भाड्यांना त्याच्या मुदतीपर्यंत सरळ रेषा पद्धतीने उत्पन्न म्हणून मान्यता दिली जाते. वित्तीय भाड्यात वित्तीय उत्पन्न अशी मान्यता दिली जाते. ती त्यांच्या भाड्याच्या मुदतीपूरती असते आणि मत्ता मालकाच्या (लेसर) भाड्यासाठीच्या निव्वळ गुंतवणूकी स्थिर मुदतीच्या परताव्याच्या दराच्या आकृतीबंधावर आधारित असते. जेव्हा कंपनी एक भाड्याने देणारी मधली संस्था असते तेव्हा तिच्या हिताचा लेखा भाडेपट्टीच्या लेखाशीर्षात केला जातो.

जर व्यवस्थेमध्ये भाडेपट्टीचे आणि त्या व्यतिरीक्त घटक असले तर कंपनी भा. ले. मानक ११५ लागू करते. ग्राहकांसोबतच्या कराराचे महसूल असा विचार केला जातो.

कंपनीने भा. ले. मानक ११५ स्वीकारले आहे. ते १ एप्रिल २०१९ पासून अंमलात आणले ते मानक कंपनीच्या भाडेपट्टींना सुधारीत पूर्वलक्षी प्रभावाने लागू केले. त्यानुसार कंपनीने तूलनात्मक माहितीचे पून: निवेदन केलेले नाही. कंपनीने केलेले भाड्याचे करार प्रामुख्याने जमिनी आणि इमारती यांचे आहेत. त्या जागा सामान्य स्थितीत व्यवहार चालविण्यासाठी आहेत. या करारानुसार कोणतीही भाड्याची बंधने किंवा भाड्याच्या विचलनाची बांधिलकी नाहीत.

कंपनीला भा. ले. मानक ११६ नुसार कोणतेही समायोजन करण्याची गरज नाही. कंपनीने भा. ले. मानक ११५६ नुसार भाड्याच्या सुरुवातीच्या तारखेपासू त्याचे लेखे केले आहेत.

क) कंपनीने भाड्याने जागा दिल्यास

समूह हा जर मालक असेल तर त्या भाड्याचे उत्पन्न सरळ रेषा पद्धतीने भाड्याच्या कालावधीकरिता मान्य केले जाते.जर ही प्राप्ती अपेक्षित चलनवाढीची भरपाई म्हणून वाढविण्याची तरतूद त्यात नसेल तर असे केले जाते.ताळेबंदात भाडेपट्टी त्यांच्या स्वरूपानुसार मान्य केले जातात.

१०) शासकीय अनुदाने

महानिर्मिती प्रकरणी

जेव्हा अनुदाने मिळतील अशी योग्य हमी असते आणि त्याच्या सर्व अटींचे पालन केले जाते तेव्हा त्याला शासकीय अनुदानांना मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबीशी संलग्न असते, तेव्हा त्याला नफा तोटा पत्रकात योग्य पद्धतीच्या तत्वावर आणि ज्या संलग्न खर्चाच्या भरपाईसाठी त्याचा हेतु आहे, ते खर्च केल्यानंतर, त्यांच्या मुदतीसाठी नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

भारतीय लेखामानक २० यातील तरतूदीनुसार, भारत सरकारने २० सप्टेंबर २०१८ रोजी जारी केलेल्या सुधारित नियमावलीनुसार, मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने, स्थगित उत्पन्न म्हणून किंवा मत्तांच्या वहन रकमेतून अनुदान वजा करून त्याप्रमाणे ताळेबंदात दाखवण्यात असे बदल केले. परिणामी, वि.वर्ष २०२०-२१ मध्ये कंपनीने मत्तांच्या मूल्यांकन अनुदाने वजा करण्याचा पर्याय निवडला आहे.

महापारेषण प्रकरणी

अ) शासकीय अनुदाने

जेव्हा अनुदान मिळण्याचे आणि कंपनीकडून त्याच्या अटींचे पालन होण्याची योग्य हमी असते तेव्हा शासकीय अनुदानाला रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबींशी संलग्न असते, तेव्हा त्याला संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी, नफा -तोटा पत्रकात पद्धतीशीर आधारावर आणि ज्या हेतुसाठी खर्चाची भरपाई करायची आहे त्यासाठी मान्यता दिली जाते.

मालमत्ता, कारखाने व साधने संबंधित शासकीय अनुदाने, चालू नसलेल्या दायित्वामध्ये स्थगित उत्पन्न म्हणून समाविष्ट केल्या जातात आणि नफा -तोटा पत्रकात सरळ रेषा पद्धतीने संबंधित मत्तांच्या अपेक्षित आयुष्यासाठी जमा केल्या जातात व इतर उत्पन्नामध्ये दाखविल्या जातात.

ब) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचे प्रकल्प

महाराष्ट्र शासनाचे अपरांपरागत ऊर्जा निर्मितीस प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. त्यानुसार, खाजगी विकासकांनी आस्थापित केलेल्या अशा वीज निर्मिती प्रकल्पातील ५० टक्के वीज बाहेर काढण्याचा खर्च कंपनीतर्फे केला जातो. उर्वरित ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) ही संस्था करते.

क) ग्राहकांकडून ओ आर सी कामासाठी मिळालेल्या अंशदानाचे लेखे

ग्राहकांकडून मिळालेल्या थेट ग्राहक अंशदानावर खालील प्रमाणे प्रक्रिया केली जाते.

१) जर स्थिर मत्तांची निर्मिती करण्यासाठी मिळालेल्या अग्रिमांचा अद्याप खर्च केला नसेल तर त्या रकमेला संबंधित स्थिर मत्ता पूर्ण होईपर्यंत चालू नसलेली दायित्वे अशा प्रकारे मानले जाते.

२) जर अंशदान पर्यावेक्षण आकार या कारणासाठी फक्त मिळाले असेल तर त्याला मिळेलेल्या वर्षातील इतर उत्पन्न समजण्यात येते.

३) जर अंशदान आधीच तयार केलेल्या मत्तांसाठी मिळाले असेल तर ते मिळालेल्या वर्षी संबंधित मत्तांसाठी कमी करण्यात येते.

महावितरण प्रकरणी

शासकिय अनुदाने व ग्राहकांचे अंशदान

जोपर्यंत कंपनी शासकीय अनुदानांच्या सर्व अटींचे अनुपालन करील व अनुदान मिळेल याची निश्चिती हमी मिळेपर्यंत अनुदानाला मान्यता दिली जात नाही.

उत्पन्नाशी संलग्न शासकीय अनुदाने निश्चित केल्यावर नफा -तोटा पत्रकात त्यांच्या इच्छित भरपाईच्या काळासाठी मान्य केली जातात. आणि, इतर उत्पन्नात सादर केली जातात.

'मालमत्ता, कारखाना व साधने' यातील बाबी खरेदी करण्यासाठी शासकीय अनुदान वित्तीय विवरणपत्रात भांडवली अनुदान असे दर्शविले जाते आणि नफा -तोटा पत्रकात मत्तेच्या अपेक्षित आयुष्यासाठी पद्धतशीर तत्त्वावर इतर उत्पन शीर्षाखाली जमा केले जाते. मालमत्ता कारखाने व साधने खरेदी/ बांधकाम करण्यासाठी संबंधी ग्राहकांचे अंशदान नफा तोटा पत्रकांत पध्दतशीर तत्वावर जमा केले जाते.

११. महसूल मान्यता

मराविमं सुत्रधारी प्रकरणी

जेव्हा महसूलांचे आर्थिक लाभ कंपनीमध्ये प्रवाहित होण्याची शक्यता असेल आणि त्याची विश्वासार्ह मोजणी करणे शक्य असेल तरच त्या महसुलाला मान्यता दिली जाते. महसुलाच्या मोजणीसाठी मिळालेल्या /मिळणाऱ्या बाबींचा वाटप, कपात आणि मुल्यवर्धित कर व सेवा कर किवा शुल्के वगळून विचारात घेतली जातात. कंपनी विशिष्ट निकषानुसार तिच्या महसूल व्यवस्थेचे निर्धारण करते. म्हणजे वस्तू विक्री किंवा सेवा यातील महत्त्वाचे धोके व मोबदले लक्षात घेणे, त्याद्वारे तेथे मुख्य किंवा दलालामार्फत होत आहे किंवा कसे हे निश्चित केले जाते

अ) व्याजाचे उत्पन्न

ज्या वित्तीय विलेखांचे मापन कर्जफेड खर्चात होते / आणि व्याज धारणकर्त्या वित्तीय मत्ता यांचे वर्गीकरण नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्याच्या वित्तीय मत्ता असे होते, त्यांच्या व्याज उत्पन्नाला प्रभावी व्याज दर वापरून मान्यता दिली जाते. वित्तीय विलेखांचे अपेक्षित उपयुक्त आयूष्य विचारात घेऊन आणि भविष्यातील रोखे प्राप्तीचे अंदाज करुन त्याच्या तंतोतंत प्रमाणात कपात करुन प्रभावी व्याज दर निश्चित केला जातो किंवा अल्प मुदतीसाठी, योग्य असल्यास, वित्तीय मत्तांच्या निव्वळ चालू मूल्याप्रमाणे दर लावला जातो. उत्पन्नाच्या विवरण पत्रकात व्याजाचे उत्पन्नास 'वित्तीय उत्पन्न' म्हणून समाविष्ट केले जाते.

ब) लाभांश उत्पन्न

जेव्हा कंपनीला ही रक्कम घेण्याचा हक्क प्रस्थापित झाला असतो, तेव्हा लाभांशाच्या उत्पन्नाला मान्यता दिली जाते.

क) भाड्याचे उत्पन्न

जेथे मत्ताच्या मालकीच्या जोखीमा व मोबदला मोठ्या प्रमाणात भाडे देणाऱ्यांकडे निहित असतात अशा मत्तांच्या भाड्याच्या करारातील भाडेपट्टीच्या रकमांना, सरळ रेषा पद्धतीने आणि करारातील अटी व शर्तीप्रमाणे, नफा -तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

महानिर्मिती प्रकरणी

महसूल मान्यता

१) वीज विक्रीच्या महसुलीचा लेखा वर्षाच्या आरंभी महाराष्ट्र विद्यूत नियामक आयोगाने मंजूर केलेल्या पूर्व निर्धारीत दराच्या आधारे केला जातो. त्यात इंधन समायोजन आकार आणि लेखा कालाच्या पूर्वी पासून लेखा काल समाप्ती पर्यंतचे उपार्जित झालेले विना देयक महसूल समाविष्ट असतात. लेखा वर्षाच्या अखेर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून समायोजित होण्याच्या अधीन असतात.

२) महावितरण कंपनीच्या वीज खरेदी करारातील अटींप्रमाणे कंपनी विलंब भरणा अधिभार याला स्टेट बँक ऑफ इंडिया मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेडिंग (एमसीएलआर) अधीक ३५० × बेसीस पॉईंट, प्रतिमाह यानुसार मान्यता देते. ऊर्जा देयकांच्या क्रेडिट पिरियड नंतरच्या विलंबासाठी याप्रमाणे उपार्जन तत्त्वावर आकारणी केली जाते.

३) थकीत रकमेवरील व्याज उत्पन्न आणि लागू होणारा व्याज दर हे व्याज उत्पन्न मान्य करण्यासाठी विचारात घेतले जातात.

४) फ्लाय ऍश विक्री ग्राहक मान्य दराने केली जाते. यातून मिळालेली रक्कम फ्लाय ऍश वापर निधी या वेगळ्या लेखा शीर्षात जमा केली जाते. हे वेगळे लेखाशीर्ष ऊर्जा व वन मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना दि. ३/११/२००९ नुसार तयार केले आहे. सदर निधी राख वापराच्या प्रोत्साहनासाठी खर्च केला जातो.

५) इतर उत्पन्न उपर्जित तत्वावर मान्य केले जाते. भंगार विक्री, नामंजूर कोळसा, इ. जेव्हा कंपनीच्या आवारातून खरेदीदार उचलतो तेव्हा त्याचे लेखे केले जातात. त्याच्या व्यवहाराची बीजके कंपनी तयार करते. परिसमापनातील नुकसानाचे जेव्हा त्यासंबंधित प्रकल्पासोबत थेट ओळख निश्चिती होते, त्याच्या वसुलीचे समायोजन प्रकल्प खर्चासोबत केले जाते आणि प्रकल्प साकार होतानाचा भविष्यातील जादा खर्च त्यामुळे कमी होतो. प्रकल्पासाठी कंत्राटदारांना दिलेली अग्रिमे उपार्जित झाल्यावर ती प्रकल्प खर्चात समायोजित केली जातात. इतर सर्व प्रकरणी परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते.

६) विकल्या न गेलेल्या ऊर्जा बचतीच्या प्रमाणपत्रांच्या मूल्यांना वित्तीय वर्षांच्या अखेरीस कंपनी मान्यता देते. ती उपार्जित तत्त्वाने महसूलात जमा केली जातात. अशी प्रमाणपत्रे विकल्यानंतर, त्यांचे उपार्जित मूल्य आणि विक्रिचे वास्तव्य मूल्य यातील फरकाचे समायोजन वास्तव विक्रीच्या नवर्षाच्या नफा आणि तोटा पत्रकात केले जाते.

महापारेषण प्रकरणी

महसूल मान्यता

मिळालेला / मिळण्याजोगा महसूलाचे मापन रास्त मूल्याने केले जाते. किंवा परताव्याची निव्वळ, व्यापारी भरपाई, सवलती इ. स्वरुपात मिळालेल्या रकमा महसूल म्हणून घोषित केल्या जातात.

पारेषण उत्पन्न

वीज पारेषणाचा वितरण परवानाधारक संस्थाकडून महसूल याचे लेखे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मासिक राज्यांतर्गत पारेषण दर आदेशाच्या आधारे केले जातात.

प्रवर्तनाचे महसूल म्हणजे - खुला प्रवेश आकार, एसएलडीसी आकार, रिशेड्युलिंग आकार यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे मान्यता मिळते.

लाभांश उत्पन्न

लाभांश मिळविण्याचा हक्क, प्रस्थापित केल्यावर त्याला मान्यता मिळते.

व्याज उत्पन्न

व्याज उत्पन्नाचा लेखा उपर्जित तत्वाने केला जातो.

भंगार विक्री

भंगार विक्रीचे उत्पन्न मान्य केल्यावर त्याचे लेखे केले जातात.

पर्यवेक्षण आकार

ग्राहकाचे ठोक अंशदान यापासून मिळालेल्या पर्यवेक्षण आकारांना प्राप्तीच्या वर्षात मान्यता दिली जाते.

इतर उत्पन्न

इतर उत्पन्नाला उपार्जन तत्त्वावर मान्यता मिळते. मात्र जेव्हा अशा उत्पन्नाची अंतिम वसुलीची खात्री नसेल तर त्याचा अपवाद केला जातो.

महावितरण प्रकरणी

महसूल मान्यता

ग्राहकांसोबतच्या करारातून मिळणारा महसूल ओळखला जातो जेव्हा वस्तू किंवा सेवांचे नियंत्रण ग्राहकाला अशा रकमेवर हस्तांतरित केले जाते जे त्या वस्तू आणि सेवांच्या बदल्यात कंपनीला हक्क मिळण्याची अपेक्षा करते.

अ) वीज विक्री

१) वीज विक्रीचे आर्थिक लाभ जेव्हा समुहाकडे प्रवाहित होतील आणि त्याची विश्वासार्ह मोजणी करता येईल तेव्हाच त्याला मान्यता मिळते. महसूल प्रत्यक्ष मिळणे किंवा मिळणारा असेल त्याचा विचार करुन ती मोजणी रास्त मूल्याने केली जाते. अंदाजित कपाती, सवलती आणि इतर तत्सम सवलती याची वजावट महसुलातून केली जाते.

२) वीज विक्रीचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज दरानुसार ग्राहकांना दिलेल्या देयकांच्या आधारे केला जातो. त्यात जर काही इंधन समायोजन आकार असेल तर तो समाविष्ट केला जातो.

३) विनादेयक महसूलाचा लेखा वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत अंदाजे तत्त्वावर केला जातो. त्यात जर काही इंधन समायोजन आकार असेल तर तो समाविष्ट केला जातो.

(४) वीज अधिनियम २००३ चे कलम १३५ अन्वये वीज चोरी बाबत आणि कलम १२६ अन्वये विजेच्या अनधिकृत वापरासाठी ग्राहक किंवा बाह्य व्यक्ती यांना सुत्रधारी कंपनीच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी केलेल्या निर्धारणानुसार दिलेल्या देयकांना लगेच पूर्णपणे मान्यता दिली जाते.

५) विलंब भरणा अधिभार चा महसूल उपार्जित तत्त्वावर मान्य करण्यात येतो. ग्राहकांच्या थकबाकीच्या मुद्दलावरील व्याज फक्त २ वर्षासाठी मान्यता दिली जाते. दोन वर्षापेक्षा जास्त काळाच्या थकबाकीवरील व्याजाला उपार्जन तत्वाऐवजी प्राप्तीच्या तत्त्वाने मान्यता दिली जाते.

ब) इतर प्रवर्तनीय उत्पन्न व इतर उत्पन्न

१) नियामक उत्पन्न / खर्च

सुत्रधारी कंपनीच्या वीज दराचे नियमन महाराष्ट्र विद्यूत नियामक आयोग या नियामक मत्ता / दायित्त्वाचा लेखा आयोगाच्या वीज दर नियमने / आदेश यात अधिसुचित केलेल्या तत्त्वांच्या आधारे केला जातो. भारतीय लेखा मानक ११४ नियामक स्थगन लेखे नुसार नियामक मत्ता /दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते. म्हणजेच लेखा वहयातील नोंदीप्रमाणे प्रत्यक्ष केलेला महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यानुसार मान्यता मिळते. बहुवर्षीय वीजदर नियमने अंतर्गत मा. आयोगाने केलेल्या कामगिरीचा आढावा / मध्यावधी आढावा यातून उद्भवलेली समायोजने आढावा पूर्ण झाल्यावर केली जातात.

२) भंगार विक्रीला वसुलीनंतर मान्यता दिली जाते, त्याचा लेखा उपार्जित तत्वाने केला जातो. मात्र ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीच्या वेळी केलेला भंगार विक्रीचा अपवाद वगळता.

३) चालू नसलेल्या गुंतवणुकीच्या वरील व्याज उत्पन्नाचा लेखा उपार्जन तत्त्वावर केला जातो. त्यासाठी प्रभावी व्याज दर पद्धती वापरली जाते. चालू नसलेल्या गुंतवणुकी व्यतिरिक्त इतर व्याजाचा लेखा उपार्जन तत्त्वावर केला जातो.

४) जेव्हा लाभांश उत्पन्न मिळविण्याचा हक्क प्रस्थापित होतो तेव्हा त्याचा लेखा केला जातो.

५) राष्ट्रीय वीज निधी अंतर्गत व्याजाच्या अर्थसाह्याच्या योजनेतंर्गत दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याजावर दिलेल्या सहाय्याला मंजुरीच्या वर्षात मान्यता दिली जाते.

खर्च उत्पन्न यांचे लेखे / वर्गीकरण

मराविमं सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी

पूर्व काळातील बाबीमध्ये मागील काळातील एका किंवा जास्त वर्षातील वित्तीय विवरण पत्रके तयार करताना झालेल्या चूकभूलीमुळे खर्च आणि उत्पन्न यांच्या काही बाबींचा समावेश असतो आणि त्या चालू मुदतीमध्ये आणल्या जातात. त्यांचे लेखे खाली प्रकारे केले जाते.

अ) पूर्व काळातील रक्कमा यांत चुका झाल्या त्या तूलनात्मक रकमांत पून: निवेदन करणे किंवा

(ब) अगदी पूर्वीच्या काळात जेव्हा चूका झाल्या त्या काळातील मत्ता, दायित्त्वे आणि समभाग यांच्या आरंभीच्या शिलकी रकमांचे पुन: निवेदन करणे. त्यामुळे जणू काही चुका कधी झालेल्याच नव्हत्या अशा प्रकारे वित्तीय विवरणपत्रे सादर करणे.

जेव्हा मागील काळातील चुकांचा संचित परिणाम निश्चित करणे अव्यवहार्य असते, तेव्हा असा परिणाम मागील काळातील संभाव्य तारखेपासून असे परिणाम संभाव्यपणे दुरुस्त कले जातात.

महानिर्मिती कंपनी प्रकरणी

खर्च व उत्पन्न यांचे वर्गीकरण आणि लेखे

मागील काही वर्षातील आणि जर काही मर्यादेपेक्षा असले तर वरील काळातील एकूण उत्पन्न /खर्च एकत्र केले जाते आणि ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्त केले जाते.

विम्याचे दावे स्वीकरले गेल्यास त्या आधारे लेखे केले जातात.

इतर सर्व दावे / हक्क यांचे लेखे प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातात.

महापारेषण प्रकरणी -

पूर्वीच्या काळातील चुकांची दुरूस्ती पूर्वलक्ष्यी प्रभावाने करण्यात आली आहे. ज्या काळात या चुका घडल्या त्या काळातील तुलनात्मक रकमांची फेरमांडणी करून किंवा आर्थिक स्थितीच्या सुरूवातीच्या काळातील आकडेवारींची पुन्हा माहिती देऊन ही दुरूस्ती करण्यात आली.

महावितरण प्रकरणी

पूर्वीच्या काळातील चुकांची दुरूस्ती पूर्वलक्ष्यी प्रभावाने करण्यात आली आहे. खूप आधीच्या काळात या चुका घडल्या असतील तर मत्ता, दायित्वे आणि समभाग यांची खाते उघडण्याच्या वेळेस जी स्थिती होती तीच पुन्हा सादर करण्यात आली आहे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम २(९१) नुसार पूर्वीच्या काळातील या चुका उलाढालीच्या ०.५ टक्केहून कमी असल्यास पूर्वीच्या काळातील माहिती पुन्हा द्यावी लागत नाही.

१३) कर्मचारी लाभ

मराविमं सुत्रधारी कंपनी बाबत

कर्मचारी लाभ

कंपनीच्या नोकरीनंतरच्या लाभामध्ये व्याख्यांकित लाभ योजना आणि व्याख्यांकित अंशदान योजना समाविष्ट असतात. या शिवाय कंपनी स्थगित भरपाई आणि गैरहजेरीची भरपाई यासाठी लाभ पुरविते.

व्याख्यांकित निवृत्ती लाभ योजनेमध्ये कंपनी निवृत्ती बंधने उपदान समाविष्ट आहे. या योजनेत कर्मचाऱ्याला निवृत्तीच्या किंवा सेवा खंडित होण्याच्या वेळी एक रकमी उपदान दिले जाते. ते त्याचे वेतन व कंपनीतील कामाची वर्षे यावर आधारीत व्याख्यांकित लाभाच्या निवृत्ती योजनेच्या मत्तांचे रास्त मूल्य योजनेच्या दायित्त्वाचे विद्यमान मूल्य यातील फरकाला वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रात मत्ता किंवा दात्त्वि अशाप्रकारे मान्यता दिली जाते. योजनेतील दायित्त्वांची गणना 'प्रोज्क्टेड युनीट क्रेडीट मेथड' वापरून आणि वित्तीय स्थितीच्या विवरणपत्राच्या तारखेस असलेली प्रमुख विमागणिती गृहीते लावून केली जाते. ज्या मत्ता दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभ निधीमध्ये किंवा पात्र विमा धोरणामध्ये धारण केलेल्या असतात, त्यांना नियोजन मत्ता म्हणतात.

व्याख्यांकित लाभ योजनेसंबंधीचे सर्व खर्चांना निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्वाचे (मत्ता) पुनर्मूल्यांकन वगळून त्यांचा नफा किंवा तोटा याप्रमाणे मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीमध्ये विमागणिती प्राप्ती किंवा हानी आणि नियोजन मत्तांचे परतावे यांचा समावेश असतो. त्यांना वित्तीय स्थितीचे विवरणपत्रात तात्काळ मान्यता दिली जाते. (निव्वळ व्याख्यांकित दायित्त्व (मत्ता) यांच्या व्याजाची निव्वळ वगळून) यासोबत ज्या मुदतीत इतर सर्वंकष उत्पन्न मिळते; त्यातून काही मिळकत ठेवून घेतलेली असते. तिच्यातील खर्ची किंवा जमा यांनासुद्धा संलग्न मान्यता दिली जाते. पुनर्मोजणीचे नंतरच्या मुदतीतील नफा किंवा तोटा यामध्ये पुर्न वर्गीकरण केले जात नाही.

भरपाईची गैरहजेरी

भरपाई अनुपस्थिती जमा होण्याची अपेक्षित किंमत शिल्लक जमा झालेल्या न वापरलेल्या अधिकाराचा परिणाम म्हणून भरल्या

जाणाऱ्या अतिरिक्त रक्कमेवर अपेक्षित असलेल्या अतिरिक्त रक्कमेवर प्रक्षेपित यूनिट पत पद्धतीचा वापर करून प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला स्वतंत्र अभ्यासाद्वारे केलेल्या प्रत्यक्ष मुल्यांकनाद्वारे निश्चित केले जाते. निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्व (मत्ता) च्या पूर्नर्मोजणीद्वारे होणारे नुकसान आणि तोटे इतर सर्वकष उत्पन्नामध्ये ओळखले जातात.

या योजनांच्या बाबतीत उत्पन्न विवरणपत्रात आकारण्यात येणारी रक्कम ऑपरेटींग कॉस्टमध्ये समाविष्ट केली जाते.

व्यांख्यांकित अंशदान योजनेमध्ये कंपनीचे योगदान जेव्हा देय होते त्यावेळी नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कंपनीच्या या नियतकालिक योगदानाच्या पलीकडे कोणतीही बंधने नाहीत.

महानिर्मिती प्रकरणी

कर्मचारी लाभ

अल्पमुदतीचे कर्मचारी लाभ

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिली, त्या वर्षाच्या नफा व तोटा पत्रकात अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभांना विना कपात रकमेतील खर्च अशी मान्यता दिली जाते.

सानुग्रह अनुदान

कंपनी जेव्हा आपल्या कर्मचा -यांसाठी सानुग्रह अनुदानाची घोषणा करते तेव्हा कंपनीतर्फे लेखा पुस्तकात सानुग्रह खर्च म्हणून नोंद घेतली जाते.

दीर्घकालिन कर्मचारी लाभ

अ) व्याख्यांकित लाभ योजना

कंपनी एक वेगळ्या विश्वस्त निधीमध्ये भविष्य निर्वाह निधीसाठी तिचे अंशदान आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान यांचा भरणा करते. हा विश्वस्तनिधी समुहातील इतर कंपन्यांच्या निधीचेही व्यवस्थपन करतो. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमध्ये केले जाते मुदतीमध्ये केलेले निधींमधील योगदानास खर्च म्हणून मान्यता मिळते आणि ते नफा-तोटा पत्रकात आकारले जाते.

ब) निवृत्तीनंतरचे लाभ

व्याख्यांकित कर्मचारी लाभ यातील उपदानासारख्या दायित्त्वांची निश्चिती वर्षांच्या अखेरीस स्वतंत्र विभागणिती शास्त्र यांचेकडून प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरुन केली जाते.

निव्वळ व्याख्यांकित दायित्त्वाचे पूनर्मापन केले जाते. त्यामध्ये विमागणिती प्राप्ती किंवा तोटे, निव्वळ मत्तांचे परतावे (व्याज वगळून) आणि मत्तांच्या मर्यादांचे परिणाम याचा समावेश असतो. (जर काही व्याज असल्यास ते वगळून) अशा पूनर्मापनाला इतर सर्वंकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते..

क)इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ

इतर दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभांची दायित्त्वे म्हणजे रोखीकरण यांची निश्चिती स्वतंत्र विमागणिती शास्त्र यांनी प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केलेल्या विमागणिती मूल्यांकनांनुसार केली जाते.

महापारेषण प्रकरणी

अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ

अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ विनाकपात रकमेनुसार वित्तीय पत्रकात मान्य केले जातात, आणि ते दिलेल्या सेवेशी निगडीत असते.

इतर दीर्घ मुदतीची कर्मचारी लाभाची बंधने

सेवेतून रजा आणि आजारपणाची रजा यांचे दायित्त्व बारा महिन्या मध्ये चुकते होणे अपेक्षित नसते. म्हणून त्यांचे मापन भविष्यातील अपेक्षित पैसे भरण्यासाठीच्या विद्यामान मूल्याने केले जाते. कर्मचाऱ्यांनी अहवाल काळाच्या अखेरीपर्यंत ज्या सेवा पुरविल्या त्या संदर्भात भविष्यात पैसे देणे अपेक्षित असते. विभागणिती मूल्यांकनावर आधारित या काळासाठी त्याची प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरुन या दायित्त्वाची मोजणी केली जाते.

सदर लाभांसाठी कॉर्पोरेट बॉडसची मुदती अखेरची प्राप्ती वापरुन सवलत दिली जाते. ही मुदत संबंधित बंधनाच्या मुदतीशी सुसंगत असते.

समायोजन अनुभव आणि विमागणिती गृहीते बदलामुळे पुनर्मोजणी करावी लागते, तिला नफा तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

नोकरीनंतरचे लाभ

कंपनी खालील नोकरीनंतरच्या लाभाचे संचालन करते.

(१) व्याख्यांकित लाभ योजना जसे उपदान आणि

(२) व्याख्यांकित अंशदान योजना जसे भविष्य निर्वाह निधी

व्याख्यांकित लाभ योजना

व्याख्यांकित कर्मचारी लाभातील उपदान या बंधनाचे दायित्व स्वतंत्र विभागणिती तज्ञांकडून वर्ष निहाय पद्धतीने आणि प्रोजेक्टेड युनिट क्रेडीट मेथड वापरुन केले जाते.

व्याख्यांकित लाभ विद्यमान मूल्य, भविष्यातील अंदाजित रोख प्रवाह कमी करुन केले जाते. तसेच त्यासाठी अहवाल मुदतीच्या अखेरीस सरकारी बाँड्सच्या बाजारातील प्राप्तीचा संदर्भ घेतला जातो. या बाँडची मुदत संबंधित बंधनाच्या मुदती इतकीच असते.

अनुभव समायोजने आणि विभागणितां मधील बदलांमुळे होणारे पूनर्मापन लाभ तोटा, ते उद्भवलेल्या कालावधी मध्ये थेट इतर सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये ओळखले जातात. ते समभागातील बदलामध्ये राखूने ठेवलेले उत्पन्नामधे समाविष्ट करुन ताळेबंदात दर्शविले जातात.

व्याख्यांकित अंशदान योजना

व्याख्यांकित अंशदान योजना यामध्ये भविष्य निर्वाह निधी आदी बाबी येतात. त्या खर्चानंतर नफा -तोटा पत्रकात आकारल्या जातात. याशिवाय काही कर्मचाऱ्यांसाठी भविष्य निर्वाह निधीचे मासिक अंशदान एका वेगळ्या विश्वस्तांकडे जमा होते. हे विश्वस्त समुहातील इतर कंपन्यांच्या निधीचेही व्यवस्थापन करतात. या विश्वस्तांकडून देय असलेल्या व्याजाचा किमान दर शासनाच्या अधिसूचित दराशी सुसंगत असतो. त्यात तूट झाल्यास तो भरुन काढण्याचे कंपनीवर बंधन असते.

महावितरण प्रकरणी

कर्मचारी लाभ

अ. अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ

कर्मचाऱ्यांनी सेवा दिल्याच्या मुदतीमध्ये त्यांना काही लाभ उपार्जित केले जातात. यामध्ये पगार व वेतन, वार्षिक रजा आणि आजारीपणाची रजा यासंबंधीचे लाभांचे दायित्त्वाला मान्यता दिली जाते. कर्मचाऱ्यांना सेवेच्या बद्दल द्यावयाच्या लाभाची रक्कम विनाकपात दिली जाते.

अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभासंबंधी मान्य केलेल्या दायित्त्वाचे मापन, सेवेच्या बदलात द्यावयाच्या अपेक्षित लाभाच्या विनाकपात रकमेमध्ये केले जाते.

ब. व्याख्यांकित अंशदान योजना

जेव्हा कर्मचारी सेवा देतात तेव्हा त्यांचा अंशदानावर हक्क असतो. अशा निवृत्तीसाठीच्या लाभाच्या योजनेच्या व्याख्यांकित अंशदानाच्या पैसे भरण्याला खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

क) व्याख्यांकित लाभ योजना

व्याख्यांकित लाभाच्या निवृत्ती योजनेसाठी द्यावयाच्या लाभाचा खर्च प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरून केला जातो. यासाठी प्रत्येक अहवाल वर्षाच्या मुदतीच्या अखेरीस विमागणिती बदल पुढे नेण्यात येतात. यासाठी पुनर्मापन करुन ते

तात्काळ ताळेबंदात दर्शविले जाते. या पूनर्मापनात पुढील बाबी समाविष्ट असतात. विमागणिती प्राप्ती व हानी, मत्तांच्या मर्यादा बदलल्यास त्याचे परिणाम (लागू असल्यास) आणि नियोजन मत्तांचा परतावा (निव्वळ व्याज वगळून) ज्या मुदतीत इतर सर्वंकष उत्पन्न मिळते त्यातील आकार किंवा जमा या उत्पन्नात मान्य केली जाते. इतर सर्वंकष उत्पनात मान्यता दिलेले पूनर्मापन हे तात्काळ ठेवून घेतलेल्या मिळकतीत दाखविले जाते आणि त्यांचे नफा किंवा तोटा यामध्ये पुनर्वर्गीकरण केले जात नाही. योजना दुरुस्त / सुधारित केल्यास त्या मुदतीमधील मागील सेवा खर्च नफा किंवा तोटा यात मान्य केला जातो. निव्वळ व्याजाचा हिशेब करण्यासाठी मुदतीच्या प्रारंभीच्या कपात केलेला दर निव्वळ व्याख्यांकित दायित्त्वे किंवा मत्ता यांना लावला जातो. ताळेबंदात मान्यता दिलेली निवृत्ती लाभाची बंधने ही कंपनीच्या व्याख्यांकित लाभ योजनेतील प्रत्यक्ष तूट किंवा लाभ दर्शवितात. या हिशेबात आधिक्य असल्यास ते उपलब्ध आर्थिक लाभाची विद्यमान मूल्याइतके मर्यादित आहे. हे आर्थिक लाभ योजनेतील परतावे किंवा भविष्यातील अंशदानातील कपात या स्वरुपाचे आहेत. प्रारंभी जेव्हा कंपनी खंडित लाभाचे देकार मागे घेऊ शकत नाही आणि जेव्हा कंपनी संबंधित पुनर्रचित खर्च मान्य करते तेव्हा खंडित लाभाचे दायित्त्व मान्य केले जाते.

ड) इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ

कंपनी समुहाच्या इतर दीर्घ मुदतीच्या कर्मचारी लाभाने रजा रोखीकरणाच्या लाभाचा अंतर्भाव होतो.

रजा रोखीकरणासंबंधी समुहाचे निव्वळ बंधन म्हणजे कर्मचाऱ्यांनी त्यांच्या चालू व मागील कालावधीत दिलेल्या सेवेबद्दल ज्या रकमेचा भविष्यात लाभ घेतला असता ती रक्कम या लाभाचे विद्यमान मूल्य निश्चित करण्यासाठी सदर लाभ ही सवलत असते. आणि संबंधित मत्तेच्या रास्त मूल्याची वजावट केली जाते. सवलत दर हा भारत सरकारच्या प्रतिभूतीच्या बाजारातील उत्पन्नावर आधारीत असतो. समूहाच्या बंधनाच्या मुदतीच्या नजीक असलेली ठेवींची परपक्वतेची तारीख याच्या नोंदीची तारीख असते. या हिशेबासाठी प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरली जाते. त्यातील विमागणिती प्राप्ती किंवा हानी यांना त्या उद्भवणाऱ्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

१४. उपकंपन्या, सहयोगी कंपन्या आणि संयुक्त उपक्रम कंपन्यामधील गुंतवणूक

१. महानिर्मिती संबंधी

उपकंपन्या व संयुक्त उपक्रमे यातील गुंतवणूकी यांच्या समभागातील गुंतवणूक खर्च आणि जर संचित कमी करणेच्या बाबी असल्यास त्या वजा करुन नोंदल्या जातात. तसेच प्रत्येक अहवाल देण्याच्या तारखेला त्यांचा कमी करण्याच्या बाबत आढावा घेतला जातो.

या कंपनी समुहाने ज्या तारखेला भा. ले. मानक पध्दती अनुसरली ह्या तारखेला त्या पूर्वीच्या सर्व सामान्य लेखा मानक नुसार उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रमे यांच्यातील गुंतवणूकीचे विद्यमान मूल्य मान्य केले आहे.

२. महापारेषण संबंधी

प्रारंभी कंपनीने समभाग पद्धतीनुसार सहयोगी संयुक्त उपक्रमे यातील गुंतवणूकींना खर्चाप्रमाणे मान्यता दिली आणि संपादनाच्या तारखेनंतर या गुंतवणूक केलेल्या संस्थांच्या नफा किंवा तोटा यातील कंपनीचा वाटा मान्य करण्यासाठी विद्यमान रकमेत वाढ किंवा घट करण्यात येते. या गुंतवणूक केलेल्या संस्थांच्या नफा/तोटा यातील कंपनीचा वाटा तिच्या नफा -तोटा पत्रकात मान्य केला जातो. गुंतवणूक केलेल्या एखाद्या संस्थेकडून विद्यमान रक्कम कमी करण्यासाठी काही वितरीत केली जाते. तसेच गुंतवणूक केलेल्या संस्थांच्या इतर सर्वंकष उत्पन्नात बदल झाल्यामुळे त्या प्रमाणात कंपनीचे हितसंबंधात बदल होतात. त्यासाठी विद्यमान रकमेत समायोजने केली जातात. या बदलातील कंपनीच्या वाट्यामधील बदल इतर सर्वकष उत्पन्नात मान्य केले जातात.

सहयोगी कंपन्या मधील गुंतवणूक ही भा.ले.मानक २७ प्रमाणे खर्चानुसार पुढे नेली जाते. या खर्चामध्ये गुंतवणूक संपादनाच्या खर्चासाठी भरलेली किंमत आणि थेट खर्च देय खर्च यांचा समावेश असतो.

१५. परकीय चलनातील व्यवहार

महानिर्मिती प्रकरणी

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्याच्या संबंधित विनिमय दराने त्याच्या तारखेला नोंदले जातात.

परकीय चलनातील मत्ता आणि दायित्त्वे यांचे अहवाल तारखेस स्पॉट रेट मध्ये रुपांतर केले जाते.

पैशातील व्यवहारात विनिमय फरकामुळे त्याचा हिशेब किंवा पूनर्विवरण वर्षाच्या अखेरीस उद्भवल्यास त्याला नफा तोटा पत्रकात विनिमय दरातील फरक किंवा वित्त खर्च यात मान्यता दिली जाते. (कर्जाच्या खर्चातील समायोजन नुसार)

महापारेषण कंपनी प्रकरणी

१. कामासाठी आणि सादर करावयाचे चलन

भारतीय रुपया हे कंपनीचे कामासाठी वापरले जाणारे आणि सादर करण्याचे चलन आहे. वि. वि. पत्रके त्यात सादर केली जातात.

२. व्यवहार आणि शिलकी

परकीय चलनातील व्यवहारांना त्या तारखेच्या विद्यमान विनिमय दराने मान्यता दिली जाते, परकीय चलनातील व्यवहार पूर्ण केल्यावर प्राप्ती किंवा हानी यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. वर्षाच्या शेवटी परकीय चलनातील मत्ता व दायित्त्वे यांचे त्यांच्या विनिमय दराने रूपांतर करून आणि अंतिम चलनातील फरक याला नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

१६. रोख आणि रोख समतूल्य

मराविमं सूत्रधारी प्रकरणी

रोख आणि रोख समतुल्य यामध्ये अल्पकाळासाठी बँकेतील आणि हाती ठेवलेली रोख रक्कम, रोकड सुविधा असलेल्या गुंतवणूकी यांचा समावेश होतो. या गुंतवणूकीची तात्काळ ज्ञात रोख रुपांतर होणे शक्य असते. मात्र त्या मूल्यातील बदलाच्या जोखिमेच्या अधीन असतात. कंपनी रोकड व्यवस्थापनात बँकेच्या ओव्हरड्राफ्ट असतात. ते वित्तीय स्थितीच्या विवरणपत्रकात चालू दायित्त्वे यात दाखविली जातात.

महानिर्मितीच्या प्रकरणी

रोख व रोख समतुल्य यामध्ये हातातील रोख बँकेतील शिल्लक, इतर आणि मुदतीची व तात्काळ रोकड सुलभ गुंतवणूकी याचा समावेश होतो. या गुंतवणूकीची पूर्ण होण्याची मूळ मुदत तीन महिन्यापेक्षा कमी असते. ती मूल्यातील बदलाच्या काहीशी अधीन असते.

महापारेषण प्रकरणी

ताळेबंदातील रोख आणि रोख समतुल्य यामध्ये बँकेतील व हातील रोख, चेक, ड्राफ्ट आणि मुदत पूर्ण होण्याची मूळ मुदत तीन महिन्यापेक्षा कमी आहे,अशा डिमांड डिपॉझीट यांचा समावेश होतो. या डिपॉझिट मुल्यांतील बदलाच्या काहीशा अधिन असतात. रोकड प्रवाह विवरण पत्रकाच्या उद्देशासाठी रोख व तत्समान बाबीमध्ये बँकेतील रोख, हातातील रोख, चेक व ड्राफ्ट याचा समावेश होतो. ज्यांची मुदत तीन महिन्यांपेक्षा कमी आहे अशा ठेवींना कंपनी रोकड सुलभ गुंतवणूकी मानते आणि त्याचे रोखीत सहज रुपांतर करता येते व त्यांची रक्कम ज्ञात असते.

महावितरण कंपनी प्रकरणी

रोख आणि बँक शिल्लक यामधे हातातील रोख रक्कम,बँकेतील शिल्लक, इतर अल्प मुदतीच्या रोकड सुलभता चांगली असलेल्या व तीन महिन्यापेक्षा कमी मुदतीच्या ठेवी किंवा त्वरीत ज्ञात रोख रकमेत रुपांतर होणाऱ्या अन्य गुंतवणूकी असतात. त्यांना मूल्यातील बदलाचा काहीसा धोका असू शकतो.

१७. उत्पन्नावरील कर

मराविमं सुत्रधारी कंपनी प्रकरणी

अ) चालू आयकर

चालू आणि त्याआधीची कालावधीतील चालू आयकर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी करुन कर अधिकाऱ्यांकडून वसूल करावयाची किंवा द्यावयाची रकमेची मोजणी केली जाते. इक्विटीमधे सरळ मान्यता दिलेल्या चालू आयकरांच्या बाबी विचारात

घेतल्या जातात. कंपनी कराच्या प्रपत्रातील स्थितीचे ठराविक कालाने मूल्यमापन करते. त्यासाठी लागू होणाऱ्या नियमनांचा अर्थ लावून आवश्यकतेप्रमाणे तरतूदी केल्या जातात.

ब) स्थगित कर

अहवालाच्या तारखेला मत्ता व दायित्वे यांच्या कराचा पाया आणि वित्तीय अहवालाच्या हेतुसाठी विद्यमान रकमा यांच्यातील हंगामी फरकासाठी स्थगित कर मत्ता/दायित्त्वाची तरतूद केली जाते. स्थगित कर दायित्त्वांना सर्व करपात्र हंगामी फरकांसाठी मान्यता दिली जाते, मात्र खालील कारणास्तव अपवाद केला जातो -

- जेव्हा व्यावसायिक संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारात मत्तांचे / दायित्त्वाचे ख्याती मूल्य प्रारंभी मान्य केल्यामुळे स्थगित कर दायित्व उद्भवले असेल आणि व्यवहाराच्या वेळी त्याचा नफ्यांचा लेखा किंवा कर पात्र नफा / (कर तोटा) याला बाधा आली नसल्यास ती विचारात घेतली जाते.

- उपकंपन्या व सहयोगी कंपन्या यातील गुंतवणुकी आणि संयुक्त उपक्रम कंपन्यामधील व्याज यांच्याशी संलग्न करयोग्य हंगामी फरक याबाबत हंगामी फरकाचे नियंत्रण शक्य असते, आणि हंगामी फरक भविष्यात उलटे होण्याचा अंदाज केलेला नसतो.

सर्व कपात योग्य हंगामी फरक वापर न करता पुढे नेलेल्या कर जमा आणि कर तोटे यासाठी स्थगित कर मत्ता मान्य केले जातात. ही मान्यता, कपात योग्य हंगामी फरकासाठी संभाव्य कर नफा उपलब्ध होणे आणि न वापरलेले कर जमा आणि कर तोटे यांचा वापर केला जाणे, यांच्या मर्यादेत असते. यामधे खालील प्रकरणी अपवाद केला जातो.

- जेव्हा उद्योग संयोग नसलेल्या एखाद्या व्यवहारातील मत्ता किंवा दायित्त्व यांना प्रारंभिक मान्यता दिल्यामुळे कपात योग्य हंगामी फरकासंबंधी स्थगित कर मत्ता उद्भवते, आणि अशा व्यवहाराच्या वेळी, त्यामुळे नफ्याचा लेखा किंवा कर योग्य नफा/ कर तोटा यांना बाधा होत नाही.

- तेव्हा उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यातील गुंतवणुकी आणि संयुक्त उपक्रम संस्थांमधील व्याज याच्याशी संलग्न असलेले कपात योग्य हंगामी फरक यांच्याबाबत स्थगीत कर मत्ता मान्य केल्या जातात. मात्र त्यांची मान्यता, हंगामी फरक भविष्यात उलट होण्याचा संभव असणे आणि कर योग्य नफा उपलब्ध होऊन हंगामी फरकांचा वापर होणे, या मर्यादेत असते.

प्रत्येक अहवालतारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे नेलेल्या रकमेचा आढावा घेण्यात येतो आणि या स्थगित कर मत्तांचे पूर्ण किंवा अशंत - वापर करण्यासाठी परवानगी देईल इतका कर योग्य नफा उपलब्ध नसेल तर त्या मर्यादेत ती रक्कम कमी केली जाते. अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचे पुनर्निधारण प्रत्येक अहवाल तारखेला केले जाते. आणि ही मान्यता, भविष्यातील करयोग्य नफा स्थगीत कर मत्तांची भरपाई करु शकत असेल तर त्या मर्यादेत त्याला मान्यता दिली जाते.

ज्यावर्षी मत्ता वसुली होईल किंवा दायित्त्व चुकती केली जातील, त्यावर्षीसाठी जे कर दर लागू होण्याची अपेक्षा असेल त्यानुसार स्थगीत कर मत्ता व दायित्त्वे यांची मोजणी केली जाते. कर दर व केलेले कर कायदे यांच्यावर किंवा अहवाल तारखेपर्यंत कायदे केले जाणार असल्यास त्यांच्या आधारे ही मोजणी केली जाते.

नफा किंवा तोटा यांच्या बाहेरच्या बाकी संबंधी स्थगीत कर मान्य केले तर ती मान्यता नफा व तोटा यांच्या बाहेर असते. स्थगित कराच्या बाबींच्या मुळाशी असलेले इतर सर्वकष उत्पनांतर्गत व्यवहार किंवा थेट समभागामधील व्यवहार यांना मान्यता दिली जाते.

जर चालू उत्पन्नांच्या कर मत्तांचे चालू कर दायित्त्वासोबत वजावट करण्यासंबंधी कायदेशीररित्या अंमलबजावणीचा हक्क अस्तित्वात असेल तर स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची भरपाई करता येते. मात्र हे स्थगित कर संबंधित कंपनी व प्राधिकारी यांच्याशी निगडीत असले पाहिजेत.

महानिर्मिती प्रकरणी

आयकर खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यातील निव्वळ फरक यांचा समावेश असतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा अशा करांचा सबंध इतर सर्वकष उत्पन्नात मान्य केलेल्या अन्य बाबींशी असतो किंवा समभागांशी असतो तेव्हा त्याचा अपवाद केला जातो. अशा प्रकरणी चालू व स्थगित कर इतर सर्वकष उत्पन्नात किंवा थेट समभागात, अनुक्रमे मान्य केले जातात.

अ) चालू कर

आयकर अधिनियम १९६१ च्या तरतूदीनुसार वर्षभरातील उत्पन्नाचा चालू कर निश्चित केला जातो. त्यासाठी परवानगी प्राप्त कर सवलती कपाती / नामंजूरी विचारात घेतल्या जातात. अहवालाच्या वेळी लागू असणारे, कायदे केलेले व कायदे होणार असल्यास त्याप्रमाणे हिशेब केले जातात. जेव्हा आयकर अधिनियम १९६१ चे कलम ११५ जेबी च्या मॅट तरतूदी नुसार चालू कर आकारला जातो, तेव्हा अशा रकमांसाठी नंतरच्या निर्धारण वर्षासाठी पताचा लाभ उपलब्ध असतो. आणि जेव्हा तो प्रत्यक्ष वसूल होतो तेव्हा त्याला मान्यता दिली जाते.

ब) स्थगित कर

ताळेबंद पद्धत वापरून स्थगित कर मान्य केले जातात. मत्तांच्या कराचा आधार आणि दायित्वे यातील कपातयोग्य आणि कर फरकानुसार त्यांना मान्यता देण्यात येते.

स्थगित कर दायित्त्वांना त्याच्या हंगामी करपात्र फरकासाठी मान्यता दिली जाते.

स्थगित कर मत्तांना सर्व कपात योग्य हंगामी फरकासाठी मान्यता दिली जाते. पुढे नेलेले जे वापरले नाहीत असे कर जमा (क्रेडीट) आणि कर हानी यात समाविष्ट असतात. जेव्हा कर पात्र नफा उपलब्ध होण्याची शक्यता असेल आणि त्यातून हंगामी फरकांची कपात करता येत असेल अशावेळी विना वापराच्या कर जमा व तोटे याचा उपयोग होईल.

स्थगित कर मत्तांच्या वहन रकमेचा आढावा प्रत्येक अहवाल तारखेला घेण्यात येतो आणि जेव्हा स्थगित कराचा काळ किंवा काही भागांना परवानगी मिळू शकेल इतका करयोग्य नफा उपलब्ध नसेल तो पर्यंत त्यात कपात केली जाते. अमान्य स्थगित कर मत्तांचे पूनर्निर्धारण प्रत्येक अहवाल तारखेस होते आणि जोपर्यंत स्थगित कराची पूर्नवसुली भविष्यातील करपात्र नफ्यातून होणे शक्य असेल तो पर्यंत तो मान्य केला जातो.

स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी वर्षभरात लागू होऊ शकतील अशा अपेक्षित कर दराने केली जाते. जेव्हा मत्ता वसुली होतात किंवा दायित्त्वे चुकती होतात तेव्हा अहवाल तारखेस कायद्याने लागू होणाऱ्या (कर कायद्यांच्या) आधारे ही मोजणी होते.

जेव्हा चालू कर दायित्त्व इतकी चालु कर मत्ता असतील आणि ती त्याच कर योग्य संस्थेशी व करप्राधिकरणाशी संबंधित असतील आणि कायदेशीर अंमल बजावणीचा हक्क असेल तर स्थगित कर मत्ता आणि स्थगित कर दायित्त्वे यांची भरपाई होईल.

महापारेषण प्रकरणी

कालावधीतील कर खर्च किंवा जमा हा लागू होणाऱ्या दराने कालावधीतील कर पात्र उत्पन्नाच्या देय कर इतका असतो. त्याचे स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वातील बदलाप्रमाणे समायोजन केले जाते. त्यात तात्पुरते फरक आणि विनावापराचे कर तोटे यांचे मत्ता व दायित्वे परिणाम होतात.

कंपनी, उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या ज्या देशात काम करतात आणि करपात्र उत्पन्न निर्माण करतात तेथे केलेले किंवा अहवाल वर्षात करण्यात येणारे कायदे यांच्या आधारे चालू आयकर आकाराची मोजणी केली जाते. व्यवस्थापन नियत कालावधीनंतर परिस्थितीनुरुप लागू होणाऱ्या कर परताव्यामधील स्थितीचे मुल्यांकन करते. कर नियमने ही त्याचा अर्थ लावण्याच्या अधीन असतात.

कर प्राधिकाऱ्यांना द्यावयाच्या अपेक्षित रकमा यांची तरतुदी स्थापित आहेत.

स्थगित आयकरासाठी पूर्णपणे तरतूद केली जाते. त्यासाठी मत्ता आणि दायित्त्वे यांचे कराचे आधार यातील हंगामी फरक दायित्त्व पद्धती वापरली जाते. संबंधित विद्यमान रकमा वि. वि. पत्रकात असतात. स्थगित आयकर कायदा केलेले आणि अहवाल मुदतीच्या अखेरपर्यंत होऊ शकणारे व लागू होणारे संभाव्य कायदे यातील कर दर (कर कायदे) यांच्या नुसार स्थगित आयकर निश्चित केला जातो. संबंधित आयकर मत्ता जेव्हा वसूल होतात किंवा स्थगित आयकर दायित्त्व चुकते होते तेव्हा कायदे लागू होऊ शकतात.

जेव्हा स्थगित कर मत्ता कपात योग्य हंगामी फरकासाठी आणि विनावापराच्या कर तोट्या करिता मान्य केल्या जातात. मात्र त्यासाठी भविष्यातील कर योग्य रकमा उपरोक्त हंगामी फरक आणि तोटे यासाठी उपलब्ध असल्या पाहिजेत.

जेव्हा कंपनीला चालू कर मत्ता आणि दायित्त्वे यांची भरपाई करण्याचा कायदेशीर अधिकार असतो, आणि जेव्हा तिचा निव्वळ तत्त्वावर चुकती करण्याची किंवा मत्ता वसूल करून त्याचवेळी दायित्त्व चुकते करण्याचा हेतू असतो, तेव्हा स्थगित कर आणि मत्ता यांची भरपाई करता येते.

चालू आणि स्थगित कर यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र तेव्हा त्याचा संबंध सर्वकष उत्पन्नात मान्यता दिलेल्या बाबींशी असतो, किंवा थेट समभागाशी असतो, तेव्हा अपवाद केला जातो.

फक्त जेव्हा कंपनी विशिष्ट कालावधीतील नेहमीचा आयकर भरेल यांचा खात्रीलायक पुरावा असतो तेव्हा आणि त्या किमान पर्यायी कर जमा ही स्थगित कर मत्ता म्हणून मान्य केल्या जातात. अशा मत्तांचा प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला आढावा घेतला जातो. आणि जेव्हा कंपनी त्या कालावधीतील नेहमीचा आयकर भरेल याचा खात्रीचा पुरावा जर नसेल, तर त्या मर्यादित मॅट क्रेडीट मत्तांचे वहन मूल्य कमी लिहिले जाते.

महावितरणच्या प्रकरणी

आयकराच्या तरतुदीमधे चालू कर आणि स्थगित कर समाविष्ट असतात. चालू कर आयकराच्या प्रचलित दरानुसार निर्धारित केले जातात. आयकर मत्ता आणि दायित्त्वे त्यांना हंगामी फरकानुसार मान्यता दिली जाते. हे हंगामी फरक मत्ता आणि दायित्त्वे यांचे कर आधार आणि एकत्रित वि. वि. पत्रकातील त्याच्या वहन रकमा यानुसार केले जातात. करपात्र उत्पन्न उपलब्ध संभवनीय असेल तर त्या मर्यादेत स्थगित कर मत्ता मान्य केल्या जातात. प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांचा आढावा घेतला जातो आणि जेव्हा पुढे संबंधित कर लाभाची वसुली होण्याची अजिबात शक्यता नसेल तर त्यामर्यादेत त्या कमी केल्या जातात. मॅट क्रेडीट इत्यादी हे स्थगित कर मत्ताचे अविभाज्य भाग आहे.

१८. तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे, आकस्मिक मत्ता आणि बांधिलकी

मराविमं सूत्रधारी प्रकरणी

अ) सर्वसाधारण

जेव्हा कंपनीवर एखादं विद्यमान बंधन (कायदेशीर किंवा रचनात्मक) मागील काही घटनेमुळे आले असते आणि त्या बंधनाची पूर्ती करण्यासाठी आर्थिक लाभाच्या संसाधनांचे बहिर्गमन होण्याची शक्यता असते; आणि बंधनाच्या रकमेचा विश्वासार्ह अंदाज करता येतो तेव्हा त्यासाठी केलेल्या तरतुदींना मान्यता दिली जाते.

जेव्हा कंपनीला एखादी तरतूद संपूर्ण किवा काही भागात परत मिळेल अशी अपेक्षा असते; तेव्हा त्या तरतुदीला स्वतंत्र मत्ता अशी मान्यता दिली जाते. मात्र ती प्रतीपूर्ती खात्रीची हवी. कोणत्याही तरतुदीच्या संबंधी केलेले खर्च उत्पन्नाच्या विवरण पत्रकात कोणत्याही प्रतिपूर्तीची निव्वळ अशा प्रकारे सादर केली जाते.

जर पैशांच्या वेळेचे मूल्याचा परिणाम महत्त्वाचा असेल तर चालू कर दर वापरून तरतुदीत कसर केली जाते ती योग्य व दायित्त्वाच्या जोखमीनुसार निश्चित व योग्य असावी. जेव्हा सवलत/कसर वापरली असेल तर वेळेनुसार तरतुदीमध्ये केलेल्या वाढीला वित्त खर्च असे मान्य केले जाते.

ब) आकस्मिकता

आकस्मिक दायित्त्वे जर उद्योग संयोगाचा भाग म्हणून गृहीत धरली असतील तर त्यांना फक्त त्यांच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. आकस्मिक मत्तांना मान्यता दिली जात नाही. मात्र जेव्हा उत्पन्न वसूल होण्याची खात्री असते तेव्हा मान्यता दिली जाते. आकस्मिक मत्तांना मान्यता दिली जात नाही. मात्र जेव्हा उत्पन्न वसूल होण्याची चांगली शक्यता असेल तर संबंधित मत्तेला आकस्मिक मानले जात नाही. तर फक्त मत्ता असेच मानले जाते. आकस्मिक दायित्वाची माहिती विवरणपत्रांच्या टिपांमध्ये प्रगट केली जाते. मात्र त्यासाठी आर्थिक लाभ संबंधित संसाधनाचे बहिर्गमन नसावे. जर आर्थिक लाभाचा प्रवाह कंपनीकडे येणे असेल तर हीच बाब आकस्मिक मत्तांनाही लागू होते.

महानिर्मिती प्रकरणी

जेव्हा एखाद्या मागील घटनेमुळे विद्यमान काळात बंधन असते आणि बंधन चुकते करण्यासाठी कंपनीच्या आर्थिक लाभासंबंधीची संसाधने मूर्त स्वरुपात बाहेर जाणे संभवनीय असते आणि त्या बंधनाचे विश्वासार्ह रकमेत अंदाज करता येतो. तेव्हा त्याच्या तरतुदींना मान्यता दिली जाते.

जर पैशाचे वेळेचे मूल्य खूप मोठ्या प्रमाणात असेल तर, योग्य सवलत दराने तरतुदीमध्ये सवलत दिली जाते. अशी सवलत जर काळाच्या ओघात तरतुदीमध्ये वाढ झाली असेल तर काळाच्या ओघात वाढलेल्या तरतुदीस वित्त खर्च म्हणून मान्यता दिली जाते. ज्या विद्यमान बंधनामुळे कंपनीची संसाधने बाहेर जाणे संभवनीय नसते किवा बंधनाच्या रकमेची मोजणी खात्रीने पूर्ण करता येत नाही.

आकस्मिक दायित्त्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते. पण जेव्हा आर्थिक संसाधने बाहेर जाण्याची शक्यता खूप कमी आहे असा विचार असला तर ती प्रकट केली जातात.

आकस्मिक दायित्त्वे आणि भांडवली बांधिलकी संबंधित बाबीप्रमाणे प्रकट केल्या जातात. त्या टिपा क्र. ५०(८.२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी प्रवेश मर्यादेपेक्षा जास्त असल्या पाहिजे.

आकस्मिक मत्तांना मान्यता दिली जात नाही. मात्र या मत्ता मर्यादेपेक्षा जास्त असतील आणि जर त्यांचे आर्थिक लाभ कंपनीला मिळणार असतील तर, त्या वित्तीय विवरण पत्रात प्रकट केल्या जातात.

महापारेषण प्रकरणी

अ) तरतुदी

जेव्हा एखाद्या भूतकालीन घटनेमुळे कंपनीवर बंधन आले असेल (कायदेशीर किंवा रचनात्मक) आणि ते बधन चुकते करण्यासाठी आर्थिक लाभाची संसाधने बाहेर जाणार असतील तसेच त्यांची रकमेची विश्वासार्ह मोजणी करता येत असेल तर, त्याच्या तरतुदी मान्य केल्या जातात. जर पैशाचे वेळेनुसार मूल्य खूप असेल तर तरतुदीमध्ये कसर केली जाते. कसर काढून घेण्यास नफा -तोटा पत्रकात वित्त खर्च अशी मान्यता दिली जाते. प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेस तरतुदींचा आढावा घेऊन त्याचे चालू सर्वोत्कृष्ट अंदाजांमध्ये समावेश करण्यासाठी समायोजने केली जातात.

ब) आकस्मिकता

जेव्हा एखाद्या मागील घटनांमुळे एखादे संभाव्य बंधन उद्भवते, कंपनीचे नियंत्रण नसलेल्या भविष्यातील घटनांमुळे त्याला पुष्टि मिळते; किंवा अशा बंधनाचा हिशेब चुकता करण्यासाठी कंपनीची आर्थिक संसाधने बाहेर जाण्याची शक्यता असते आणि त्यातील रकमेचा अंदाज करता येत नाही, अशावेळी आकस्मिक दायित्त्व प्रकट केली जातात. त्याची माहिती वित्तीय विवरणात प्रकट केली जाते. आकस्मिक मत्ता मान्य केल्या जात नाहीत. प्रत्येक ताळेबंद तारखेला त्यांचा आढावा घेतला जातो आणि विद्यमान व्यवस्थापकीय अंदाजात दाखविण्यासाठी समयोजन केले जाते.

महावितरण प्रकरणी

जेव्हा एखाद्या जुन्या घटनेमुळे समुहावर विद्यमान बंधन असते, आणि ते चुकते करण्यासाठी संसाधने बाहेर जाण्याची शक्यता असते तसेच त्यासंबंधी तांत्रिक मूल्यमापन व अनुभवाच्या आधारे विश्वासार्ह अंदाज करणे शक्य असते, तेव्हा त्याच्या तरतुदीला मान्यता दिली जाते. या तरतुदी त्यांच्या विद्यमान मूल्याइतक्या कमी करता येत नाहीत. ताळेबंदाच्या तारखेला व्यवस्थापनाला ते चुकती करण्यासाठी अदा करावे लागतात. ज्या दायित्त्वाचे भविष्यातील परिस्थितीचा अंदाज निश्चितपणे करता येत नाही, त्यांना मान्यता दिली जात नाही. अशा आकस्मिक दायित्त्वांना मान्यता नसली तरी त्या व्यवस्थापनाच्या न्यायनिर्णयानुसार लेख्यांच्या टिपांमध्ये प्रकट केल्या जातात. प्रत्येक ताळेबंदाच्या तारखांना त्याचा आढावा घेऊन चालू व्यवस्थापकीय अंदाजात त्यांची समायोजने दाखविली जातात.

आर्थिक लाभ मिळणे शक्य असेल तर आकस्मिक मत्ता प्रकट केल्या जातात. आकस्मिक मत्तांचे बाबत जर आर्थिक लाभ कंपनीत प्रवाहित होत असतील तर त्या प्रकट केल्या जातात. तसेच व्यवहार्य असेल तर त्यांचे आर्थिक परिणाम यांचे अंदाज प्रकट केले जातील.

आकस्मिक दायित्त्वे जेव्हा त्यांचे रुपांतर प्रत्यक्ष मागणीत होते तेव्हाच कारणे दाखवा सूचना विचारात घेतली जातात. त्याचे पैसे अग्रिम म्हणून दाखविले जातात.

विविध वित्तीय अधिनियमानुसार, ज्या प्रकरणी कंपनी समुहाने / विभागाने अपील दाखल केली आहेत. त्यांचा समावेश आकस्मिक दायित्वात केला जातो.

१९. रास्त मूल्य मोजणी

मराविमं सूत्रधारी कं. लि.प्रकरणी

ही कंपनी डेरिव्हेटीव्ह किंवा तत्सम गुंतवणूकी, या वित्तीय विलेखाची मोजणी, त्यांच्या रास्त मूल्यानुसार, प्रत्येक ताळेबंद तारखेला करते. रास्त मूल्य म्हणजे जेव्हा बाजारातून सहभागी सदस्यामध्ये मत्ता विक्री किंवा दायित्व हस्तांतरण असे व्यवहार सुव्यवस्थितपणे एखाद्या मान्य तारखेला झाल्यास, त्यात मिळालेली किमत रास्त मूल्यांचे मापन काही गृहीतांवर आधारीत असते. ते म्हणजे मत्ता विक्री किंवा दायित्वाचे हस्तांतरण हे खालील पैकी एका प्रकारे झाले असावे.

- मुख्य बाजारपेठेत मत्ता किंवा दायित्व या साठी
- किंवा
- मुख्य बाजारपेठ नसल्यास, मत्ता / दायित्व यासाठी सर्वांत लाभदायक बाजार मुख्य किंवा सर्वांत लाभदायक बाजार कंपनीला सहज शक्य असला पाहिजे.

कोणतेही बाजारातील सहभागी होणारे त्यांच्या सर्वोतोपरी योग्य आर्थिक हितासाठी मत्ता / दायित्व यांची किमत करतील या गृहीताचा वापर करुन कोणत्याही मत्ता / दायित्व यांची रास्त मूल्य मोजले जाते.

कोणत्याही अवित्तीय मत्तेची रास्त मूल्य मोजणी करताना बाजारात सहभागी होणाऱ्या कडे ही मत्ता सर्वोच्च आणि सर्वोत्तम कुवत वापरुन आर्थिक लाभ निर्माण करण्याची शक्तिचा विचार करते. ती वस्तू बाजारात सहभागी होणाऱ्या संबंधित सदस्यांने ती मत्ता सर्वोच्च आणि सर्वोत्तम लाभासाठी वापरावी.

कंपनी परिस्थितीनुरुप मूल्यमापन तंत्रे वापरते. त्यासाठी रास्तमूल्य मापनासाठी पुरेशी आधारभूत माहिती उपलब्ध करून घेते. संबंधित निरिक्षणयोग्य माहितीचा कमाल वापर करते आणि अदृश्य माहितीचा वापर कमीत कमी करते.

ज्यांचे रास्तमूल्य मोजावयाचे आहे किंवा वि. वि. पत्रकात प्रकट करावयाचे आहे, त्याच्या रास्तमुल्यांची खालील प्रमाणे श्रेणी रचना केली जाते. रास्तमूल्यासाठी संपूर्णपणे महत्वाच्या निवेशाच्या कमीस्तराच्या आधारे ती केली आहे -

स्तर १ - चांगल्या कार्यशील बाजारात तत्सम मत्ता / दायित्वे उदधृत केल्या जाणाऱ्या आणि (असमायोजित) किमती.

स्तर २ - थेट किंवा अप्रत्यक्षरीत्या निरीक्षणयोग्य व रास्त मूल्य मोजणीच्यादृष्टीने महत्वाचे असलेल्या किमान स्तरावरील माहितीवर आधारित मूल्यांकनाचे तंत्रज्ञान

स्तर ३ - निरिक्षणास योग्य असा माहितीचा ज्यांना आधार नाही असे मत्ता / दायित्व यासाठीचे निवेश (निरिक्षण बाह्य)

जेव्हा कार्यशील बाजारात एखाद्या विलेखासाठी उदधृत दर उपलब्ध असतात तेव्हा कंपनी ती किमत वापरून त्या विलेखाचे रास्त मूल्य मोजले जाते. ज्या बाजारात सदर मत्ता / दायित्व यांचे व्यवहार वारंवार केले जातात आणि किमतीची माहिती मोठयाप्रमाणात सतत उपलब्ध असते त्याला कार्यशील बाजार मानले जाते. तेथे उदधृत किंमत नसल्यास कंपनी संबंधित निरिक्षण योग्य निवेशाचा कमाल वापराचे मूल्यांकन उपयोगात आणते आणि निरिक्षण बाह्य निवेशांचा कमीतकमी आधार घेते. निवड केलेल्या मूल्यांकन तंत्रात बाजारातील सहभागी होणारे जे घटक किंमत ठरविण्यासाठी विचारात घेतात त्यांचा समावेश असतो.

कंपनी नियमितपणे उपरोक्त निरिक्षण योग्य निवेशांचा आणि मूल्यांकन समायोजनाचा आढावा घेते जर तिसऱ्या पक्षाकडून माहिती दलालांनी उद्धृत केलेली माहिती किंवा किंमतीच्या सेवा, यांचा उपयोग केला तर त्यानुसार रास्त मूल्य मोजणी केली जाते, कंपनी तिने काढलेल्या निष्कर्षासाठी तिसऱ्या पक्षा कडून मिळविलेले पुराव्याच्या आधारे निर्धारण करणे आणि भा. ले. मानकाच्या गरजा पूर्ण करणारे मूल्यांकन केले आहे, असा निष्कर्ष काढते. रास्त मूल्याची श्रेणी रचनामधील स्तर त्यामधे समाविष्ट असतो. त्यानुसार वर्गवारी केली जाते.

महानिर्मिती प्रकरणी

मत्ता विक्री / दायित्वाचे हस्तांतरण हे व्यवहार जेव्हा योग्यप्रकारे चांगल्या पूरक बाजारपेठे मध्ये आणि तेथील सहभागी सदस्यांकडून नोंदयोग्य तारखेस झाल्यावर जी किंमत मिळते; त्याला रास्त मूल्य म्हणतात. मुख्य बाजारपेठ नसल्यास ज्या तारखेस कंपनी सहज प्रवेश असून ते सर्वात लाभदायक आहे असा बाजार.

मत्ता / दायित्व यांचे रास्तमूल्य मोजण्यासाठी कंपनी बाजारातील निरिक्षण करता येईल अशी माहिती शक्यतो वापरते. रास्त मूल्यांचे श्रेणीनिहाय विविध शासन विभागणी केला जाते. मूल्यांकनासाठी वापरला जाणाऱ्या तांत्रिक निकषाच्या आधारे अशी वर्गवारी केली जाते. ती अशी;

स्तर १ - कार्यशील बाजारात समान प्रकारच्या मत्ता किंवा दायित्वे उद्धृत केले जाणारे (असमायोजित) दर.

स्तर २ - वरील स्तर - १ मधे समावेश नसलेले अन्य आणि निरिक्षण करता येतील असे संबंधित मत्ता / दायित्वे यांचे निवेश ते थेट किंवा अप्रत्यक्षरित्या (किमतीच्या आधारे) बघता यावेत.

स्तर ३ - मत्ता किंवा दायित्वे यांच्या बाबत निरिक्षण करता येईल अशी माहिती उपलब्ध नसते असे निवेश (विना निरिक्षणाचे निवेश).

ज्या मत्ता आणि दायत्वे यांना वित्तीय विवरण पत्रा मधे आवर्ती तत्वावर मान्यता दिली जाते, त्या साठी कंपनी निर्णय करते. हे व्यवहार श्रेणी रचनेतील स्तरांमध्ये झाले आहेत किंवा कसे, त्यासाठी श्रेणीकरण पूर्नमूल्यांकन यांचा विचार झाला का यानुसार निर्णय केले जाते (यासाठी निवेशाचा सर्वात खालचा स्तर सर्वकष रास्त मूल्याच्या आधारासाठी महत्वाचा असतो) अहवाल तारखेच्या अखेरीस हे मापन केले जाते.

महापारेषण प्रकरणी

ही कंपनी प्रत्येक अहवाल तारखेला काही वित्तीय विलेखांचे त्यांच्या रास्त मूल्यानुसार मापन करते.

काही लेखा धोरणे आणि प्रकटने यातील आवश्यकतानुसार वित्तीय आणि अवित्तीय मत्ता व दायित्वे यांचे रास्त मूल्याचे मूल्यमापन करावयाचे असते.

रास्त मूल्य म्हणजे मत्ता विक्री साठी मिळणारी किंवा दायित्व हस्तांतरणासाठी द्यावी लागणारी कार्यशील बाजारपेठेतील किमत होय.

हा व्यवहार कार्यशील बाजारात सहभागी होणाऱ्यांमधे योग्य प्रकारे होऊन तारखेला नोंदला गेला पाहिजे. बाजारपेठ मुख्य हवी, तशी तो नसल्यास कंपनीला त्या तारखेला सहजप्राप्त दुसऱ्या लाभदायक बाजारात हा व्यवहार झाला पाहिजे. एखाद्या दायित्वाच्या रास्त मूल्यामध्ये तिच्या अकार्यक्षमतेच्या धोक्याचे दर्शन घडले पाहिजे.

वित्तीय विलेखाच्या रास्त मूल्यांकनाचा सर्वोत्कृष्ट अंदाज तिच्या सामान्य व्यवहारातील किमतीच्या मान्यतेनुसार केले जाते. म्हणजेच, केलेल्या हिशोबाचे रास्त मूल्य असते. जर कंपनीने असा निर्णय केला की, प्रारंभिक मान्यतेचे रास्त मूल्य व्यवहाराच्या किमतीपेक्षा वेगळे आहे आणि रास्तमूल्याची कार्यशील बाजारातील समान मत्ता / दायित्वाच्या उद्धृत किमतीचा पुरावा नाही, किंवा ते निरिक्षण करता येईल अशा माहितीचा वापर करणाऱ्या मूल्यांकन तंत्रावर आधारलेले नाही; तर प्रारंभी रास्तमूल्याने मोजलेले वित्तीय विलेखाचे समायोजन प्रारंभिक रास्तमूल्य व व्यवहार किमत याच्या फरकानुसार केले जाते.

नंतर हा फरक नफा-तोटा पत्रकात मान्य केला जातो. त्यासाठी विलेखाच्या आयुष्याचा योग्य आधार विचारात घेतला जातो. परंतु जोपर्यंत मूल्यांकनाला निरिक्षण योग्य बाजार माहितीचा पूर्ण पुरावा नसतो किंवा व्यवहार बंद केला जातो तोपर्यंतच मान्यता असते. मत्ता / दायित्व यांच्या मोजणीसाठी कंपनी शक्यतो निरिक्षणास योग्य अशी बाजार माहिती वापरते. रास्तमूल्याची श्रेणी रचना त्याच्या मूल्यांकन तंत्रासाठी वापरलेल्या निवेशावर अवलंबून असते. ते असे;

स्तर १ - समान मत्ता / दायित्वासाठी कार्यशील बाजारातील उद्धृत मूल्य (असमायोजन)

स्तर २ - वरील स्तर - १ मध्ये समावेश नसलेले आणि संबंधित मत्ता / दायित्वे यासाठीचे निरिक्षण योग्य निवेश, थेट (किमती) किंवा अप्रत्यक्ष (किंमत काढलेले)

स्तर ३ - मत्ता / दायित्वे यांचे निरिक्षणाचा आधार नसलेले निवेश (निरिक्षण बाह्य)

जेव्हा एखाद्या विलेखासाठी कार्यशील बाजारतील उदधृत किंमत उपलब्ध असते जेव्हा ती किंमत वापरुन कंपनी रास्तमूल्याची मोजणी करते. ज्या बाजारात मत्ता / दायित्वे यांचे व्यवहार वारंवार आणि मोठ्या प्रमाणात होतात आणि किंमतीची माहिती सतत मिळते त्याला कार्यशील बाजार म्हणतात. जर अशा बाजारात किंमत उदधृत केलेली नसली तर कंपनी संबंधित निवेशासाठी निरिक्षण उपयोगाचा कमाल वापर करते. आणि न दिसणाऱ्या निवेशांचा कमीतकमी वापर करते. बाजारात सहभागी होणारे

व्यवहारांच्या किमतीसाठी ज्या घटकांचा विचार करतात, त्यांचा समावेश कंपनीने निवडलेल्या मूल्यांकन तंत्रज्ञानात असतो.

कंपनी नेहमी महत्वपूर्ण अनिरिक्षणी माहिती व मूल्यांकन समायोजनांच्या या माहितीच्या आढावा घेते. जर तिसऱ्या पक्षाने म्हणजे दलालाने उदधृत केलेली माहिती किंवा किमान सेवा यांचा उपयोग केला तर, त्यानुसार रास्त मूल्यमापन केले जाते, आणि भा. ले. मानकाच्या गरजांची पूर्तता निष्कर्ष काढणे आणि मूल्यांकनाची वर्गवारी व श्रेणी रचना करणे.

महावितरण प्रकरणी

रास्तमूल्य म्हणजे बाजारातील सहभागी संस्थांमध्ये मत्ता विक्री किंवा दायित्व हस्तांतरण होण्यासाठी किमान हे व्यवहार सुव्यवस्थित मुख्य बाजारात तारखेच्या नोंदीसह झाले पाहिजे. मुख्य बाजार नसल्यास त्या तारखेला कंपनी समुहात सर्वात लाभदायक व सहज प्राप्त असलेला अन्य बाजार मत्ता व दायित्व यांच्या रास्त मूल्य मोजण्यासाठी कंपनी समुह शक्यतो निरीक्षण योग्य बाजार माहितीच्या वापर करतो. रास्त मूल्याचे वेगवेगळ्या स्तरात श्रेणीकरण केले जाते. रास्त मूल्यांसाठी असलेल्या निवेशाच्या आधारे श्रेणीकरण केले जाते ते असे,

स्तर १ - चांगल्या कार्यशील बाजारात तत्सम मत्ता / दायित्वे उदधृत केल्या जाणाऱ्या आणि (असमायोजित) किमती.

स्तर २ - वरील स्तर १ मधील समाविष्ट किमतीपेक्षा इतर निवेश ते संबंधित मत्ता / दायित्व या साठी थेट (म्हणजे किमती) किंवा अप्रत्यक्ष निरिक्षणसाठी करता येतील असे असावेत (म्हणजे किमतीच्या आधारे काढलेले).

स्तर ३ - निरिक्षणास योग्य असा माहितीचा ज्यांना आधार नाही असे मत्ता / दायित्व यासाठीचे निवेश (निरिक्षण बाह्य).

मत्ता व दायित्वे यांना एकत्रित वि.वि. पत्रकात आवर्ती तत्वावर मान्यता देण्यात येते. त्यासाठी कंपनी समुह व्यवहार स्तरांमध्ये आणि श्रेणी रचनेत झाला आहे किंवा कसे हे निश्चित करते, (रास्त मूल्यांकनाच्या संपूर्ण मोजणीसाठी सर्वात नियमानुसार महत्वाचा असतो. त्या आधारे श्रेणीकरण केले जाते).

२०. वित्तीय विलेख

मराविमं सूत्रधारी कंपनी लि. प्रकरणी

१. वित्तीय मत्ता

प्रारंभिक मान्यता आणि मापन

वित्तीय विलेखातील करारात सहभागी झाल्यानंतर वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांना कंपनी मान्यता देते.सर्व वित्तीय मत्ता प्रारंभी रास्त मूल्य यानुसार मान्य केल्या जातात. यात व्यापारात होणाऱ्या प्राप्तीचा समावेश होत नाही, कारण ही प्राप्ती सुरूवातीला त्या व्यवहाराच्या किंमतीनुसार आकारली जाते. जे व्यवहार नफा किंवा तोटा या माध्यमातून रास्त मूल्यानुसार नोंदल्या जात नाहीत आणि वित्तीय मत्ता वा वित्तीय दायित्वे धारण करणे वा त्यांच्याशी संबंधित असतात ते व्यवहार सुरूवातीला मान्य केलेल्या रास्त मूल्यात जोडले किंवा वजा केले जातात. नफा किंवा तोटा यांच्या माध्यमातून रास्त मूल्यानुसार नोंदले जाणारे वित्तीय मत्ता व दायित्वे यांच्याशी संबंधित व्यवहार खर्चांची नोंद नफा-तोटा पत्रकात घेतली जाते.

नंतरची मोजणी

नंतरच्या मोजणीसाठी वित्तीय मत्तांचे पुढील दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

रास्त मूल्यांप्रमाणे वित्तीय मत्ता

कर्जफेडीच्या खर्चाप्रमाणे वित्तीय मत्ता

जेथे मत्तांची मोजणी रास्त मूल्याने केली जाते; तेथे लाभ आणि हानी यांना संपूर्णपणे नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. म्हणजेच नफा व तोट्यांमधील रास्त मूल्य) किंवा त्यांना इतर सर्वकष उत्पन्नात मान्यता दिली जाते. (म्हणजेच, इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्ये).

खालील दोन अटींचे पालन करणाऱ्या वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेड खर्चानुसार केली जाते. (कमी करण्यासाठी कमी लिहिलेल्या खर्चाची निव्वळ मात्र त्यासाठी सदर मत्ता रास्त मूल्याने नफा -तोटा यामधे नामनिर्देशित केलेली नसावी.)

उद्योग नमुना चाचणी - कंपनीच्या उद्योग नमुना चाचणी उद्दिष्ट 'करारानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी वित्तीय मत्ता धारण करणे असे असते. (विलेखाची कंत्राटानुसार मुदत पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या रास्त मूल्यातील बदलाचे वसुलीसाठी विलेख विकणे योग्य असते.)

रोकड प्रवाह वैशिष्ट्यपूर्ण चाचणी

वित्तीय मत्तांच्या कराराच्या अटीनुसार विनिर्देशित केलेल्या तारखांना रोकडता प्रवाह उदभवतो. तो प्रामुख्याने थकीत मुद्दलाच्या रकमेचा आणि त्याचा देय व्याज यांच्यामुळे असतो.

जी वित्तीय मत्ता खालील दोन अटी पूर्ण करते, तिची मोजणी रास्त मूल्यानुसार आणि इतर सर्वंकष मूल्यामार्फत केली जाते. मात्र त्यासाठी सदर मत्तेची रचना रास्त मूल्यानुसार आणि नफा -तोटा यासाठीच्या रास्त मूल्य पर्यायातून झालेली नसावी.

उद्योग नमुना चाचणी - वित्तीय मत्ता उद्योग नमुना चाचणीमधे धारण केल्या जातात. त्यांचे उद्दिष्ट करारानुसार रोकडता प्रवाह जमा करणे आणि ती वित्तीय मत्ता विकणे या दोन्ही प्रकारे साध्य होते.

रोकडता प्रवाह वैशिष्ट्यपूर्ण चाचणी - वित्तीय मत्तांच्या कराराच्या अटींनुसार विनिर्देशित केलेल्या तारखांना मुद्दलावरील व्याज आणि मुद्दल यांची परतफेड केल्यामुळे मिळतो.

जरी एखादा विलेख, दोन्ही आवश्यकता कर्जफेडीच्या खर्चाची मोजणी करुन किंवा इतर सर्वकष उत्पन्नातील रास्त मूल्याने पूर्ण करीत असेल, तरी वित्तीय मत्तेचे मापन नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्याने करावे लागते. तसे केल्याने मोजणी नाहीशी होत असेल किंवा खूप कमी होत असेल किंवा मान्यतेतील खंड दाखवित असेल. (याला काही वेळ लेख्यातील विसंगती -) मत्ता / दायित्वे यांच्या मोजणी करताना किंवा वेगवेगळ्या आधाराने प्राप्ती किंवा हानी मोजतांना असे घडू शकते.

इतर सर्व मत्ता नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्याने मोजण्यात येऊन सर्व समभाग गुंतवणूक ताळेबंदात रास्त मूल्याने मोजल्या जातात मूल्यातील बदलास नफा -तोटा पत्रकात मान्यता मिळते. मात्र जर कंपनीने समभाग गुंतवणूकीसाठी मूल्यातील बदलास 'इतर सर्वकष उत्पन्न' रक्कम सादर करण्याचे ठरविले असले तर त्यांचा अपवाद केला जातो.

जेव्हा एखादी समभाग गुंतवणूक व्यापारासाठी धारण केली नसेल आणि प्रारंभीक मान्यतेसाठी अपरिवर्तनीय निवड केली असेल आणि त्यासाठी इतर सर्वकष उत्पन्नामधून रास्त मूल्याने मोजणीला मान्यता दिली असेल तर नफा तोटा पत्रकात लाभांश उत्पन्न मान्य केले जाते.

मान्यता काढून घेणे

एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेथे लागू असेल तेथे, वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा काही भागांचा गट हा प्रारंभिक रित्या अमान्य केला जातो. (म्हणजेच तो कंपनीच्या वित्तीय स्थितीच्या विवरण पत्रकातून काढला जातो) त्यासाठीची कारणे खालील प्रमाणे असतात.

- अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळविण्याचा हक्क संपला असतो. किंवा
- कंपनी ज्या मत्तांकडून रोकडता मिळविण्याचा हक्क हस्तांतरित करते किंवा कंपनीला मिळणारा संपूर्ण रोकडता प्रवाह कुठल्याही विलंब न करता तिसऱ्या पक्षाकडे भरण्याचे बंधन 'पास थ्रू' व्यवस्थे मार्फत स्वीकारते आणि खालील परिस्थितीत तसे केले जाते.

अ) मत्ताच्या सर्व जोखिमा आणि मोबदले यांचे मोठया प्रमाणात कंपनी स्थानांतरण करते किंवा

ब) कंपनी संबधित मत्तांच्या सर्व जोखिमा आणि मोबदले याचे हस्तांतरण करीत नाही. किंवा त्या मोठया प्रमाणात ठेवून घेत नाही मात्र त्या मत्तांचे नियंत्रण हस्तांतरीत करते.

जेव्हा कंपनी एखाद्या मत्तेकडून, रोकडता प्रवाह मिळविण्याचा हक्क हस्तांतरीत करते किंवा 'पास थ्रू' व्यवस्थेत सहभागी होते. तेव्हा ती मत्ता मालकीच्या कोणत्या जोखिमा आणि मोबदले आपल्याकडे कायम ठेवते आहे; याचे मूल्यांकन करते. कंपनीने जर मत्तेचे मोठ्या प्रमाणात सर्व जोखिमा व मोबदले तिच्याकडे ठेवले नसते किंवा मत्ता नियंत्रण हस्तांतरीत केले नसले तर कंपनी त्या हस्तांतरीत मत्तेला मान्यता देणे. तिच्या गुंतवणूकीच्या प्रमाणात चालू ठेवते. अशा प्रकरणी कंपनी सहयोगी दायित्वे हस्तांतरीत मत्ता यांना मान्यता देते. सहयोगी दायित्वाची मोजणी, कंपनीने ठेवून घेतलेल्या हक्क व बंधने यांच्या आधारे केली जाते.

कंपनी चालू ठेवलेल्या गुंतवणूकीचे स्वरूप हस्तांतरीत मत्तेच्या हमीच्या प्रमाणे असते. त्यांची मोजणी मत्तेच्या मूळ वहन रकमेच्या कमी स्तरावर आणि कंपनीला भराव्या लागणाऱ्या परतफेडीच्या कमाल रकमेच्या आधारे केले जाते.

सहयोगी, संयुक्त उपक्रमे व उपकंपन्यामधील गुंतवणूकी

कंपनीने उपकंपन्या व सहयोगी कंपन्या आणि संयुक्त उपक्रमे यातील तिच्या गुंतवणूकींचे मापन त्यांच्या खर्च किमती नुसार करते.

वित्तीय मत्ता कमी करणे

कंपनी खालील बाबी कमी करण्यासाठी 'अपेक्षित पत हानी' मॉडेल याचा आधार घेते.

- वित्तीय मत्ता कर्ज फेडीच्या खर्चानुसार मोजणे,
- वित्तीय मत्तांचे मापन इतर व्यापक उत्पन्नाद्वारे वाजवी मुल्य पद्धतीने म्हणजेच इतर सर्वंकष उत्पत्रामधील रास्त मूल्य यानुसार करते.

अपेक्षित पत हानी याचे मापन करण्यासाठी खालील बाबींनुसार हानी भरपाईची मोजणी केली जाते.

- १२ महिन्यातील अपेक्षित पत हानी (म्हणजे अहवालाच्या तारखेपासून १२ महिन्यात वित्तीय विलेखाच्या कसुरीच्या कारणामुळे होऊ शकणारी अपेक्षित पत हानी) किंवा
- पूर्ण आयुष्याची अपेक्षित पत हानी (वित्तीय विलेखाच्या आयुष्य / वयोमर्यादेत होऊ शकणाऱ्या कसुरीची अपेक्षित पत हानी).

कंपनी मत्ता कपात करण्याच्या भरपाईच्या मान्यतेसाठी ''सुलभ पद्धत'' अनुसरते.

- व्यापारी येणी किंवा करारानुसार मिळू शकणारा महसूल आणि
- सर्व भाडेपट्टींची येणी

यासुलभ कार्यपद्धतीमध्ये पतींच्या जोखीमांमधे होऊ शकणाऱ्या बदलांचा मागोवा, कंपनी शोधत नाही. त्यापेक्षा पतीच्या प्रारंभिक मान्यतेच्या तारखेपासून सुरुवात करून प्रत्येक अहवाल तारखेला, कमी करण्याच्या भरपाईला मान्यता देते.

कंपनी व्यापारी येण्यांच्या तपशीलाबाबत कपात करण्याच्या भरपाईची निश्चिती करण्यासाठी तरतुदींची सारिणी वापरते. ही तरतूद सारिणी व्यापारी येण्याच्या अपेक्षित आयुष्यभरासाठी होणाऱ्या कसुरीच्या प्रमाणाच्या ऐतिहासिक अनुभवाच्या निरिक्षणाच्या आधारे तयार केली असते. प्रत्येक अहवालाच्या तारखेला हे कसूरीचे ऐतिहासिक निरिक्षणांचे अद्यावतीकरण केले जाते आणि भविष्यासाठी केलेल्या अंदाजांचे विश्लेषण करण्यात येते.

इतर वित्तीय मत्ता कपात आणि जोखीमांना तोंड देणे यांना मान्यता देण्यासाठी पत जोखीमेत सुरुवातीनंतर मोठी वाढ झाली आहे किंवा कसे, याची कंपनी निश्चिती करते. जर पत जोखीमेत मोठी वाढ झाली नसेल तर कपात भरपाईसाठी १२ महिन्याची अपेक्षित पत हानी वापरण्यात येते. मात्र त्यानंतरच्या कालावधीत जर, विलेखांच्या पतीची गुणवत्ता सुधारून प्रारंभीच्या मान्यतेनंतर पतहानी मोठ्या प्रमाणात वाढणार नसली तर कंपनी १२ महिन्याच्या अपेक्षित पतहानीच्या आधारे केलेली कपातीची भरपाई उलट करते.

पत जोखिमा आणि कंपनीचे तोटे यामधे होणाऱ्या वाढींचे निर्धारण करण्याकरिता, कंपनी ज्या पत जोखिमांच्या वैशिष्ट्यांचे समविभाजनाच्या आधारे वित्तीय विलेख एकत्र करते. त्यातून वित्तीय मत्तांमध्ये वेळेनुरूप होणाऱ्या महत्त्वाच्या वाढीचे विश्लेषण करण्याचा हेतू साध्य होतो आणि जोखिमांची ओळख निश्चिती होते.

अपेक्षित पत हानी दीर्घ मुदतीची व्यापारी येणी यातील मालमत्तेच्या भाड्यावर अपेक्षित पत हानीची तरतूद केली जाते. वेळेच्या मूल्यानुसार प्राप्तीसाठी ती खालील सारणी आधारे केली जाते.

दिवसांची संख्या	इ सी एल
० -९० दिवस	१%
९१ - १८० दिवस	३.२५ %
१८० आणि त्यापेक्षा अधिक दिवस	६.५ %

२) वित्तयी दायित्वे - वित्तीय दायित्वे नंतर कर्जफेड तरतूदीनुसार पुढे नेली जातात. त्यासाठी प्रभावी व्याज पद्धत वापरण्यात येते. ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षात ज्याची मुदत पूर्ण होते अशा व्यापारी आणि अन्य देणी यांच्या साठी विद्यमान रक्कम रास्त मूल्याच्या जवळपास असते कारण या विलेखांची मुदत अल्प असते.

मान्यता काढून घेणे

ज्या वित्तीय दायित्वाचे बंधन पूर्ण केले जाते किंवा रद्द होते किंवा संपते तेव्हा तिची मान्यता काढून घेतली जाते. जर विद्यमान दायित्वाच्या जागी त्याच धनकोंचे दुस -या स्वरूपात दायित्व बदलून आणले असेल तर त्यानुसार विद्यमान दायित्वात सुधारणा कली जाते. अशी अदलबदल किंवा सुधारणा याला मूळ दायित्वाची अमान्यता आणि नव्या दायित्वाला मान्यता असे मानले जाते. त्यातील फरकाच्या रकमेला नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

३) वित्तीय विलेखाची भरपाई - वित्तीय मत्ता आणि दायित्वे यांची भरपाई करण्याविषयी अंमलबजावणी योग्य कायदेशीर अधिकार चालू असेल तर त्यांची भरपाई करता येते आणि त्यांची निव्वळ रक्कम ताळेबंदात नोंदली जाते. त्यासाठी निव्वळ तत्वावर करण्याचा उद्देश असावा, मत्तांची वसूली आणि दायित्वे चुकती करणे त्याचवेळी झाले असले पाहिजे.

महानिर्मितीसंबंधी

या कंपनी समुहात जेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांना मान्यता दिली जाते तेव्हा ती वित्तीय विलेखाचा कंत्राट करारातील एक झाली आहेत, असे मानण्यात येते. समुहातील वित्तीय दायित्वे यात खालील बाबी समाविष्ट आहेत.

(१) चालू वित्तीय मत्ता यामध्ये प्रामुख्याने व्यापारी येणी, बँकेतील रोख आणि रोख सममूल्य अल्प मुदतीच्या ठेवी यांचा अंतर्भाव होता.

(२) चालू नसलेल्या वित्तीय मत्ता यामधे प्रामुख्याने उपकंपन्यांना दिलेली समभाग गुंतवणूक तसेच उपकंपन्यांना दिलेली कर्जे आणि अग्रिमे दीर्घ मुदतीची व्यापारी येणी इ. समाविष्ट असतात.

वित्तीय मत्ता

(अ) प्रारंभिक मान्यता आणि मोजणी

वित्तीय मत्तांना प्रारंभी त्यांचे रास्त मूल्य अधिक सदर वित्तीय मत्ता संपादनासाठी केलेला व्यवहार खर्च याप्रमाणे मान्यता दिली जाते. वित्तीय मत्तांना व्यवहार खर्च नफा -तोटा पत्रकात एफ व्ही टी पी एल यानुसार आकारण्यात येतात.

(ब) नंतरची मोजणी

संबंधित वित्तीय मत्तांच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी निश्चित केली जाते. वित्तीय मत्ताचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले जाते

(अ) कर्ज फेड खर्च म्हणून नंतरची मोजणी

(ब) वित्तीय मत्ता मोजणी

(क) इतर सर्वंकष उत्पन्नांतर्गत रास्त मूल्य किंवा

(ड) नफा किंवा तोटा मार्फत रास्त मूल्य

वित्तीय मत्ता व्यवस्थापनाच्या औद्योगिक प्रारुपाच्या आधारे आणि वित्तीय मत्ताचे करारा नुसार रोकडता प्रवाहाची वैशिष्टये यानुसार

कर्जफेड खर्च

कर्जाच्या विलेखाची मोजणी कर्ज फेड खर्चानुसार करण्यासाठी खालील दोन्ही अटीची पुर्तता होणे आवश्यक आहे. धारणकर्ता मत्ता उद्योगाच्या प्रारुपातील असावी आणि तिची उद्दिष्टे खालील प्रमाणे असली पाहिजे.

- कंत्राटातील रोकडता प्रवाह जमा करण्यासाठी मत्ता धारण केली असावी
- मत्तांच्या करारात अटी नुसार एका विशिष्ट दिनांकाला रोकडता प्रवाह जमा होणे आवश्यक आहे. जो रोखप्रवाह थकीत मुद्दल आणि व्याज याचे देणे भरणे (एस पी पी आइ) या एकमेव भरण्याचे असावे.

प्रारंभिक मोजणी नंतर, या वित्तीय मत्ता नंतर कर्ज फेड खर्च नुसार मोजल्या जातात. त्यासाठी परिणामकारक लागू होणारे व्याज दर पध्दत (इ आय आर) वापरली जाते आणि कर्ज फेडीच्या खर्चाला नफा तोटा यामध्ये मान्यता दिली जाते.

कर्ज विलेख (एफ व्ही टी पी एल नुसार)

कर्ज विलेखाचे मूल्यमापनासाठी नफा व तोटा यातील रास्त मूल्य ही उर्वरित श्रेणी आहे.

प्रारंभीच्या मोजणी नंतर, व्याज दरातील कोणतेही बदल, यांना नफा तोटा पत्रकात मंजूरी दिली जाते. या बदलामध्ये व्याजाचे उत्पन्न कमी केल्याने होणारे तोटे आणि इतर निव्वळ लाभ आणि हानी यांचा समावेश असतो.

इक्विटी गुंतवणूकी

भा. ले. मानक १०९ याच्या व्याप्तीत समावेश होणाऱ्या सर्व इक्वीटीच्या गुंतवणूकीचे मापन रास्त मूल्याने होते. ज्या इक्विटी विलेखांचा वापर व्यापारी हेतूसाठी होतो त्यांचे वर्गीकरण एफ. व्ही. टी. पी. एल. नुसार होते. इतर सर्व इक्विटी विलेखासाठी वर्गीकरण एफ. व्ही. ओ. सी. आय. किंवा एफ.व्ही. टी. पी. एल. या द्वारे करण्या बदल कंपनी निर्णय घेते तो निर्णय विलेख निहाय असतो हे वर्गीकरण प्रारंभिक मान्यते नुसार केले जाते आणि ते बदलता येत नाही.

एफ. व्ही ओ.सी. आय यानुसार वर्गीकरण केलेले इक्विटी विलेखांचे रास्त मूल्य बदलले तर त्याला इतर सर्वंकष उत्पन्न यात मान्यता दिला जाते. मात्र लाभांश याला अपवाद केले जातात. ओसीआय रकमांचा पूर्नवापर नफा-तोटा पत्रकात केला जात नाही. त्यांची विक्री झाली तरी तसे होत नाही.

जे इक्वीटी विलेख एफ.व्ही. टी. पी. एल. श्रेणी मध्ये समाविष्ट केले जातात त्यांचे मापन सर्व रास्त मूल्य बदलासह रास्त मूल्य असे केले जाते. त्यास नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यांच्या इक्विटी विलेखातील गुंतवणूकी या खर्च वजा कमी करणे यानुसार पुढे नेल्या जातात.

वित्तीय मत्ता कमी करणे

भा. ले. मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्ता कर्ज फेड खर्चा नुसार मोजल्या जातात आणि एफ व्ही ओ.सी. आय नुसार पुढे नेल्या जातात, त्यांचे मापन आणि मान्यता यासाठी कंपनी अपेक्षित पत हानी प्रारूप लागू करते.

व्यापारी येण्याच्या तोटयातील हानीचे मापन सुलभ दृष्टिकोन अनुसरून केले जाते. प्रत्येक अहवाल तारखेला आयुष्यभर अपेक्षित पत हानी समान रकमेनुसार केले जाते. अहवाल तारखेला जोखमीचे निर्धारण करुन त्याची तुलना मान्यतेच्या तारखेला केल त्या जोखिम निर्धारणासोबत केली जाते. त्या आधारे कंपनी नफा तोटा यानी अपेक्षित पत हानी तरतूद नुसार कमी करण्यासाठी हानी किंवा प्राप्ती यांना मान्यता देते.

वित्तीय मत्ता अमान्य करणे

कोणतीही वित्तीय मत्ता (किंवा, लागू असल्यास वित्तीय मत्ताचा भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या समूहातील काही भाग) यांना प्रामुख्याने खालील कारणांसाठी अमान्यता दिली जाते (म्हणजेच कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकातून वगळण्यात येते.)

जेव्हा संबंधित मत्तांतून रोकड प्रवाह प्राप्तीचा हक्क संपतो, किंवा.

जेव्हा कंपनी रोकड प्राप्ती हक्क हस्तांतरित करते किंवा मिळालेला रोकडता प्रवाहाचा पैसा बिना विलंब भरण्याचे बंधन स्वीकारते. त्यासाठी पास थ्रू व्यवस्था तयार करते तेव्हा, किंवा

(अ) जेव्हा कंपनी संबंधित मत्तेची संपूर्ण जोखीम आणि मोठ्या प्रमाणात हस्तांतरित करते, किंवा

(ब) जेव्हा कंपनी मत्तेच्या जोखिमा व मोबदले यांचे मोठया प्रमाणात हस्तांतरण करीत नाही किंवा त्या ठेवून सुध्दा घेत नाही माग त्यांचे नियंत्रण सुपूर्द करते, तेव्हा

वित्तीय मत्ता अमान्य केल्यावर त्याचे वहन मूल्य व त्याची मिळणारी किंमत यातील फरकाला नफा तोटयात मान्यता दिली जाते.

वित्तीय दायित्वे

(ब) वित्तीय दायित्वे आणि इक्विटी विलेखा

कर्ज किंवा इक्विटी असे वर्गीकरण करणे

कोणत्याही कंपनीने दिलेल्या विलेखाचे वर्गीकरण त्याच्या संबंधीच्या कंत्राट करार याची रचनांतील महत्वाचा भाग यानुसार आणि वित्तीय दायित्वे आणि वित्तीय विलेख यांच्या व्याख्येनुसार वित्तीय दायित्वे किंवा इक्विटी असे केले जाते.

इक्विटी विलेख

इक्वीटी विलेख हा एक कंत्राट, करार असतो. तो कंपनी ची सर्व दायित्वे वजा केल्यानंतर उरलेल्या मत्तांचा पूरावा असतो. कंपनीने केलेले वित्तीय विलेख यांना त्यांच्या मिळालेला मिळकतीनुसार मान्यता दिली जाते.

वित्तीय दायित्वे

कंपनी च्या विद्यमान (चार) वित्तिय दायित्वामधे प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश केला जातो. (अ) कर्जउसनवारी (ब) व्यापारी देणी (क) भांडवली खर्चाचे दायित्व (ड) सुरक्षा अनामती (ई) इतर देणी.

प्रारंभिक मान्यता आणि मोजणी

सर्व वित्तीय दायित्वे (नंतर त्यांची मोजणी नफा तोटा याद्वारे रास्त मूल्य यातून झालेला नाही) यांना त्याचे व्यवहार खर्चाची निव्वळ याचे रास्त मूल्य यानुसार प्रारंभिक मान्यता दिली जाते. हे रास्त मूल्य संबंधित वित्तीय दायित्वांना थेट लागू असले पाहिजे. कंपनीच्या वित्तीय दायित्वांमध्ये व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी या सर्वांचा समावेश असतो.

नंतरचे मापन

वित्तीय दायित्वांचे मापन खाली वर्णन केलेल्या त्याच्या वर्गीकरणावर अवलंबून आहे.

(१) उसनवारी

उसनवारीला प्रारंभिक मान्यता रास्त मूल्यानुसार त्यासाठी केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ या प्रमाणे दिली जाते. उसनवारीचे मापन त्यांच्या कर्ज फेडीचे खर्च यानुसार केले जाते. मिळकत (व्यवहार खर्चाची निव्वळ) आणि प्रतिपूर्ती रक्कम याला नफा तोटा पत्रकात उसनवारी/कर्ज यांच्या कालावधीसाठी मान्यता दिली जाते. त्यासाठी लागू होणारी व्याज पध्दत वापरली जाते. कर्ज सुविधेसाठी भरलेले शूल्क याला कर्जाचा व्यवहार खर्च समजण्यात येतो (यासाठी) या सुविधा ज्या प्रमाणात नंतर मिळण्याची शक्यता असते, त्याप्रमाणात मान्यता दिली जाते. या प्रकरणात सुविधा मिळेपर्यंत शुल्क स्थगित ठेवले आहे.

जेव्हा कर्ज/उसनवारीच्या करारातील बंधन पूर्ण करते किंवा रद्द केले जाते किंवा संपते; तेव्हा ते ताळेबंद पत्रकातून वगळले जाते. संपलेल्या वित्तीय दायित्वाची वहन रक्कम आणि भरलेली रक्कम यातील फरकाला नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती/तोटा) अशाप्रकारे मान्यता दिली जाते.

कंपनी कर्जाचे वर्गीकरण चालु दायित्वे असे करते. मात्र त्यासाठी कंपनीला सदर दायित्व चुकते करण्यासाठीची मुदत अहवाल तारखेनंतर किमान बारा महिने स्थगित ठेवण्याचा विना अट अधिकार असला पाहिजे. जेव्हा अहवाल तारखेला किंवा त्यापूर्वी दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेच्या तरतूदीचा भंग होतो आणि त्यामुळे दायित्व मागणी केल्यास अहवाल तारखेला देय होते; आणि भंग झाल्यावर जर कर्ज देणाऱ्याने अहवाल तारखे नंतर आणि वित्तीय विवरण पत्रकात देण्यापूर्वी मंजूरी आधी, पैसे न मागण्यास संमती दिली तर कंपनी या दायित्वाचे वर्गीकरण चालू दायित्व करीत नाही.

२) व्यापारी आणि इतर देणी

वित्तीय मुदतीच्या अखेरपर्यंत कंपनी घेतलेल्या माल आणि सेवा यांच्या रकमा दिल्या नसतील अशा रकमा व्यापारी आणि इतर देय या मध्ये असतात. या रकमा अप्रतिभूत असतात आणि सामान्यपणे मान्यतेनंतर बारा महिन्यात दिल्या जातात. जर त्यांची देय रकम अहवाल तारखे नंतर बारा महिन्यात चुकती करणे आवश्यक नसेल तर त्यांना व्यापारी आणि इतर देणी अशा प्रकारे सादर केले जाते. प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यानुसार त्यांना मान्यता दिली जाते नंतर लागू होणाऱ्या व्याज दराच्या पद्धती नुसार त्यांची कर्ज खर्चा प्रमाणे मोजणी केली जाते.

मान्यता काढणे

जेव्हा एखादा वित्तीय दायित्त्वाचे बंधन पूर्ण केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा ते संपते, तेव्हा तिची मान्यता काढली जाते. जर विद्यमान वित्तीय दायित्वाच्या ऐवजी, त्याच्या धनकोकडुन, दुसरे दायित्व लागू झाले तर आणि जर त्याच्या अटी वेगळया असतील किंवा अटीत मोठया सुधारणा केल्या असतील तर तसा विनिमय किंवा सुधारणा यांनुसार मूळ दायित्व हे अमान्य केले आहे आणि नवीन दायित्व मान्य केले जाते. या पुढे नेलेल्या दोन्ही रकमांतील फरकाला स्वतंत्र वित्तिय विवरण पत्रकातील नफा -तोटा यात मान्यता दिली जाते.

वित्तीय विलेखांची भरपाई

जर मान्यता दिलेल्या रकमांची भरपाई करण्यासाठी अंमलबजावणी करण्यास योग्य असा विद्यमान हेतू असला आणि निव्वळ समझोता करण्याचा हेतू असला किंवा मत्ता व दायित्वे एकाच वेळी वसुली आणि समझोत्याने मिटवायची असेल तर संबंधित वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व यांनी भरपाई करून निव्वळ रककम ताळेबंदात नोंदली जाते.

महापारेषण कंपनी सबंधी

प्रारंभिक मान्यता आणि मोजणी

व्यापारी येणी आणि कर्ज प्रतिभूती यांना प्रारंभी मूळ स्वरूपात मान्यता दिली जाते. इतर वित्तीय मत्ताच्या प्रकरणात जेव्हा कंपनी त्यांच्या करार विलेखात एक सहभागी घटक होते; तेव्हा त्यांना मान्यता दिली जाते. ज्या वित्तीय मत्तांचे नंतर नफा -तोटा यामध्ये रास्त मूल्यानुसार मापन केले जाते. त्या वगळून इतर सर्व मत्तांचे रास्त मूल्य अधिक त्यासंपादनाचा व्यावहार खर्च यानुसार प्रारंभिक मान्यता दिली जाते.

नंतरची मोजणी

सबंधित वित्तीय मत्तांचे जसे वर्गीकरण होते, त्यानुसार नंतर मोजणी निश्चित केली जाते. वित्तीय मत्ता मत्तांच्या व्यवस्थापनाचे बिझनेस मॉडेल आणि त्यांच्या कराराद्वारे होणारे रोकडता प्रवाह यांच्या आधारे कंपनी कर्ज फेड खर्चा नुसार आणि इतर सर्वंकष उत्पन्ना मार्फत रास्त मूल्य किंवा नफा व तोटा या द्वारे रास्त मूल्य यानुसार वर्गीकरण करते.

कर्जफेड खर्चा नुसार कर्जाचे विलेख

खालील अटी पूर्ण झाल्यास कर्जाचे विलेख याचे मापन कर्ज फेड च्या खर्चा नुसार केले जाते -

सबंधित मत्ता धारण करणे कंपनीच्या बिझनेस मॉडेल नुसार असते.

या मॉडेलचा उद्देश कंत्राटानुसार रोकडता प्रवाह मिळविण्यासाठी मत्ता धारण करणे असा आहे. आणि

मत्ताच्या करारानुसार रोकडता प्रवाहात सदर मत्ता विहित तारखांना रोकडता प्रवाह देते. त्यामध्ये थकीत रकमांचे केवळ मुद्दल आणि व्याज यांचा समावेश असतो.

प्रारंभिक मापनानंतर अशा वित्तीय मत्ता परिणामकारक व्याज दर पध्दतीने कर्ज फेड खर्चा नुसार मोजल्या जातात. या कर्ज फेड खर्चाचा हिशेब करण्यासाठी या परिणामकारक व्याज दराचा एकात्मिक भाग असलेली सवलत किंवा अधिभार आणि शूल्क किंवा खर्च या बाबी विचारात घेतल्या जातात. सदर परिणामकारक व्याज दराचा कर्ज फेड खर्च एकात्मिक नफा-तोटा पत्रकात वित्तीय उत्पन्न यात समाविष्ट केले जाते. कमी केल्यास त्यातून उद्भवलेले तोटे यांना नफा तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

एफ व्ही ओ सी आय मार्फत रास्त मूल्यानुसार कर्ज विलेख

कर्ज विलेख याचे मापन इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्त मूल्य या पध्दतीने करण्यासाठी खालील दोन अटी पूर्ण होणे आवश्यक असते. संबंधित मत्ता बिझनेस मॉडेल नुसार धारण केलेली असली पाहिजे आणि या बिझनेस मॉडेलच्या उद्धिष्टाची पूर्ती झाली पाहिजे -

(१) रोकड प्रवाह जमा करणे व वित्तीय मत्तांची विक्री करणे.

(२) मत्तांच्या करारनिविष्ट अटीनुसार विहित तारखांना थकीत मूल्य रकमेचे मुद्दल आणि व्याज यांचा रोख प्रवाह झाला पाहिजे.

प्रारंभिक मापनानंतर या मत्तांचे पूनर्मापन रास्तमूल्य यानुसार केले जाते. त्यासाठी परिणामकारक व्याज पद्धत अंतर्गत व्याजाचे उत्पन्न, परकीय चलनातील लाभ आणि तोटे आणि मत्ता कमी करण्याचे तोटे यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. इतर निव्वळ प्राप्ती किंवा तोटे यांना इतर सर्वकष उत्पन्नात मान्यता दिली जाते.

एफ व्ही पी टी एल नुसार कर्ज विलेख

नफा किंवा तोटा या द्वारे रास्त मूल्य काढणे ही वित्तीय मत्तांची उर्वरीत श्रेणी आहे. जे कर्ज विलेख परत फेड खर्च किंवा एफ व्ही ओ सी आय यांचे निकष पूर्ण करीत नाही त्यांचे वर्गीकरण एफ व्ही पी टी एल असे केले जाते.

प्रारंभिक मापनानंतर रास्त मूल्यात होणाऱ्या बदलांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या मध्ये व्याजाचे उत्पन्न, परकीय चलनातील हानी व लाभ, मूल्य हानीचे तोटे आणि इतर निव्वळ लाभ किंवा हानी यांचा समावेश आहे.

इक्विटी गुंतवणूकी

भा. ले. मानक १०९ च्या नुसार सर्व इक्विटी गुंतवणूकीचे रास्तमूल्याने मापन केले जाते. ज्या इक्विटीचे विलेख व्यापारासाठी धारण केले जातात त्यांचे वर्गीकरण एफ व्ही टी पी एल (फेअर व्हॅल्यू थ्रू प्रॉफिट अँड लॉस) असे होते. इतर सर्व इक्विटी विलेखांचे वर्गीकरण एफ व्ही ओ सी आय (फेअर व्हॅल्यू थ्रू अदर कॉम्प्रेहेन्सिव्ह इन्कम) मध्ये किंवा एफ व्ही टी पी एल या मधे करायचे किंवा कसे याचा निर्णय कंपनी करते. हा निर्णय विलेख निहाय केले जातो. प्रारंभी दिलेल्या मान्यतेनुसार केलेले वर्गीकरण केलेल्या इक्विटी विलेखांमधील रास्तमूल्याचे बदल यांना इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिली जाते. मात्र लाभांशाचा अपवाद केला जातो. या इक्विटी विलेखांच्या लाभांशाना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. एफ व्ही टी पी एल श्रेणीत समाविष्ट केलेल्या इक्विटी विलेखांचे मापन आणि त्यांचे सर्व बदल यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

अमान्य करणे

एखादी वित्तीय मत्ता (किंवा लागू असल्यास वित्तीय मत्ता किंवा तत्सम मत्तांचा समुह) प्रामुख्याने अमान्य केले जाते. (कंपनीच्या ताळेबंदातून वगळली जाते). जेव्हा

- अशा मत्ता कडून रोकडता प्रवाह मिळविण्याचा हक्क संपल्यास किंवा ;
- कंपनीने तिला मत्तेपासून रोकडता प्रवाह मिळविण्याचा हक्क हस्तांतरीत केला किंवा एक पास थ्रु व्यवस्था करुन तिसऱ्या पक्षाला कोणत्याही प्रत्यक्ष विलंबाशिवाय रोकडता प्रवाह पूर्णपणे मिळविण्याचा हक्क हस्तांतरीत केला तर किंवा ;
- अशा मत्तांच्या सर्व जोखिमा आणि मोबदले मोठ्या प्रमाणात हस्तांतरित केले तर, किंवा ;
- जर कंपनीने जोखिमा व मोबदले यांचे मोठ्या प्रमाणात हस्तांतरण न करता मत्तांचे नियंत्रण हस्तांतरीत केले तर

मान्यता काढून घेतल्यावर सर्व कर्ज विलेखाद्वारे (एफ व्ही ओ सी आय ने मोजलेले कर्ज विलेख वगळून) लाभ किंवा हानी झाली तर त्याला आणि इतर (एफ व्ही टी पी एल द्वारे मोजणी केलेल्या) इक्विटी विलेखांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. ज्या कर्ज विलेखांचे मापन एफ व्ही ओ सी आय पद्धतीने केले आहे; त्याची प्राप्ती किंवा हानी यांना आणि ओ सी आय चे संचित रकमा यांचे पूनर्वर्गीकरण नफा -तोटा यात केले जाते. ज्या इक्विटी विलेखांचे मापन एफ व्ही ओ सी आय ने केले आहे त्यांचे आणि ओ सी आय मधील संचित या मान्यता काढून घेतल्यानंतर त्यांचे नफा -तोटा पत्रकात पुन - वर्गीकरण केले जात नाही.

वित्तीय मत्ता कमी करणे

भा.ले. मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्ताचे मापन कर्ज फेडीच्या खर्चानुसार केले आणि कर्ज विलेखांचे मापन एफ व्ही ओ सी आय नुसार केले त्या मत्तांचे मापन आणि मान्यता कंपनी' अपेक्षित पत हानी' अर्थात 'इसीएल' मॉडेल प्रमाणे करते.

व्यापारी येण्यांचा तोटा सुलभ पद्धतीने मोजण्यात येतो, प्रत्येक अहवाल तारखेला आयुष्यभर अपेक्षित पत हानीची समान रक्कम या नुसार मोजणी केली जाते. कर्जाच्या प्रतिभूती आणि बँकातील शिलकी या सारख्या अन्य इतर वित्तीय मत्तांच्या नुकसानीचा भरपाई १२ महिन्याच्या इ सी एल प्रमाणे मोजली जाते. मात्र त्यासाठी या मत्तांच्या प्रारंभिक मान्यतेतर पत जोखिमेत लक्षणीय बिघाड नसावी किंवा मत्ताची पत जोखीम किरकोळ असल्याचा निर्णय अहवाल तारखेत झाला असावा.

व्यापारी येणी आणि इतर वित्तीय मत्ता यांच्या अपेक्षित पत हानी (इ सी एल) यांना कंपनी मान्यता देते. इ सी एल मधे प्रामुख्याने दोन महत्वाचे घटक असतात ते म्हणजे वेळेनुसार हानी (मनी व्हॅल्यू) आणि पतहानी (क्रेडीट लॉस). वेळेची हानी योग्य त्या सवलत दराने गणना केली जाते.

व्यवस्थापनाचा विश्वास आहे की, कर्मचारी लाभाची विमागणिती मूल्यांकन ठरविण्यास वापरलेला दर हा जमा करण्यातील विलंबामुळे होणारा तोटा दाखवितो. वर्षातून एकदा या दराचा आढावा घेण्यात येतो. पतहानीच्या हिशोबा साठी १० वर्ष मुदतीच्या कार्पोरेट बॉंडचा ताळेबंदाच्या तारखेला 'क्रेडीट स्प्रेड' याचा आधार घेण्यात येतो.

इ.सी.एल. गणनेसाठी व्यापारी येण्याच्या पुढील ३ श्रेणी आहेत.

१) वितरण परवानाधारक (समुहातील कंपन्या आणि इतर)

२) खुल्या प्रवेशाचे ग्राहक (दीर्घ आणि अल्प मुदतीचे)

३) नियमित (इतर) ग्राहक

या सर्व श्रेणीसाठी वेळेची हानी समान मानली जाते. त्यात कार्पोरेट बॉंडच्या क्रेडीट स्प्रेडच्या आधारे पत हानीची तरतूद केली जाते. (एफ आय एम एम डी ए यांनी प्रकाशित केलेली माहिती) व्यवस्थापनाने वरील तीनही गटासाठी योग्य पत दरांचा अंदाज केला आहे.

वित्तीय दायित्वे

प्रारंभिक मान्यता व मापन

कंपनी जेव्हा विलेखातील करारनिविष्ट तरतूदी मध्ये सहभागी होते, त्यानुसार वित्तीय मत्तांना प्रारंभिक मान्यता देण्यात येते.

नंतरची मोजणी

संबंधित वित्तीय मत्तांचे वर्गीकरण संदर्भानुसार नंतरचे मापन ठरविण्यात येते.

एफ व्ही टी पी एल मार्फत वित्तीय दायित्वांचे रास्तमूल्य

वित्तीय दायित्वांचे वर्गीकरण नफा -तोटा यातील रास्तमूल्य (एफ व्ही टी पी एल) असे केले असते आणि हे वर्गीकरण व्यापारासाठी असून किंवा त्याला तशी मान्यता दिली जाते. एफ व्ही टी पी एल प्रमाणे रास्तमूल्यानुसार वित्तीय दायित्वाचे मापन केले जाते आणि व्याज खर्चासह इतर बदल यांना नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

वित्तीय दायित्वे - कर्जफेडी खर्चानुसार

प्रारंभिक मान्यतेनंतर ज्यांचे वर्गीकरण एफ व्ही टी पी एल असे झालेले नाही अशा वित्तीय मत्ता वगळून इतर वित्तीय मत्तांची मोजणी कर्जफेड खर्चानुसार आणि लागू होणारा व्याज दराची पद्धत वापरून केली जाते.

कर्जफेड मोजतांना प्रभावी व्याज दराचा एकात्मिक भाग असलेल्या सवलती, प्रिमियम, शुल्क किंवा खर्च विचारात घेतले जातात. प्रभावी व्याज दराची पद्धत वापरून काढलेला कर्ज फेड खर्च नफा -तोटा पत्रकात 'वित्त खर्च' यामध्ये समाविष्ट केले जातो.

मान्यता काढून घेणे

जेव्हा वित्तीय दायित्वाची बंधने पूर्णपणे दिली जातात किंवा रद्द होतात किंवा संपतात तेव्हा त्या वित्तीय दायित्वाची मान्यता काढून घेतली जाते. जेव्हा विद्यमान वित्तीय दायित्वाच्या ऐवजी त्याच धनकोकडून दुसरे दायित्व मोठ्या स्वरुपाच्या अटीनुसार आकारले जाते किंवा विद्यमान दायित्वाच्या अटी मोठ्या प्रमाणात बदलल्या जातात (जसे विनिमय, देवघेव किंवा रूपभेद/ सुधारणा) असे असल्यास मूळ दायित्वाची मान्यता काढली जाते आणि नव्या स्वरूपातील दायित्व मान्य केले जाते. संबंधित वहन रकमातील फरकाला नफा -तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

वित्तीय विलेखांची भरपाई

जर चालू मान्यता प्राप्त रकमांची भरपाई करण्याचा कायदेशीर अधिकार असेल आणि निव्वळ तत्वावर समझोता करण्याचा

किंवा मत्ता वसुलीचा त्याच वेळी दायित्व चुकती करण्याचा हेतू असेल तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांची भरपाई करून निवळ रकम ताळेबंदात मान्यता देण्यात येते.

महावितरण कंपनीच्या संबंधी

वित्तीय विलेख हा एक कोणताही कंत्राट असतो त्यातून एका कंपनीची वित्तीय मत्ता मध्ये वाढ होते. तर दुसऱ्या कंपनीचे वित्तीय दायित्व किंवा इक्विटी विलेख तयार होते.

प्रारंभिक मान्यता

जेव्हा कंत्राटातील कराराच्या तरतूदीनुसार कंपनी समुह हा एक त्यातील सहभागी घटक असतो, तेव्हा कंपनी समूह संबंधित वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्व यांना मान्यता देतो. प्रारंभिक स्तरावर सर्व वित्तीय मत्ता आणि दायित्वे यांना रास्तमूल्यानुसार मान्यता दिली जाते. वित्तीय मत्ता किंवा दायित्व संपादित करण्या साठी किंवा देण्यासाठी थेट लागणारा व्यवहार खर्च जो नफा -तोट्यात योग्य रास्तमूल्यानुसार नसतो, अशा खर्चाची भर/ कपात प्रारंभिक मान्यता देतांना केली जाते. वित्तीय मत्ता मिळविण्यासाठी केलेला व्यवहार खर्च आणि वित्तीय दायित्वाचा खर्च यांना नफा -तोटा पत्रकात रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते.

अ) वित्तीय मत्ता

वित्तीय मत्तांची नियमित मार्गाने खरेदी किंवा विक्री या व्यापारी तारखेच्यानुसार मान्यता दिली जाते आणि मान्यता काढून घेतली जाते. नियमित पद्धतीने खरेदी किंवा विक्री म्हणजे ज्या खरेदी किंवा विक्री द्वारे मत्तांचे देणे नियमन स्थापन केलेल्या किंवा बाजारपेठ जागेतील संकेताप्रमाणे असलेल्या वेळेच्या आकृतीबंधात होणे असते.

मान्यता प्राप्त सर्व वित्तीय मत्ता नंतर संपूर्णपणे मोजण्यात येतात. ही मोजणी कर्ज फेड खर्च किंवा रास्त मूल्य यानुसार होते. वित्तीय मत्तांच्या वर्गीकरणावर मोजणी अवलंबून असते.

१) कर्ज फेड खर्चानुसार वित्तीय मत्ता

जर उद्योगाचे उद्दिष्ट कंत्राट कराराद्वारे रोकड प्रवाह मिळविण्यासाठी वित्तीय मत्ता धारण करणे असे असेल तर आणि करारातील अटीनुसार वित्तीय मत्ता द्वारे विनिर्देशित तारखांना केवळ थकित रकमेचे मुद्दल आणि व्याज यांचा रोकड प्रवाह मिळत असेल, तर अशा वित्तीय मतांचे नंतर कर्ज फेड खर्चानुसार मापन केले जाते.

२) एफ व्ही ओटी एल नुसार वित्तीय मत्ता

ज्या बिझनेस मॉडेल द्वारे करारातील रोकडता प्रवाह जमा करणे वित्तीय मत्ता विकणे ही दोन्ही उद्दिष्टे पूर्ण होतात, आणि विनिर्देशित तारखांना थकीत रकमेचे मुद्दल आणि व्याज यांची रोकड प्रवाहित होत असेल तर असे बिझनेस मॉडेल धारण करून त्यातील वित्तीय मत्तेचे मापन इतर सर्वकष उत्पन्नामार्फत रास्तमूल्यानुसार केले जाते.

कंपनी समूह विलेखाच्या प्रारंभिक मान्यतेसाठी विलेख निहाय तत्वानुसार अपरिवर्तनीय निवड करतो. व्यापारासाठी धारण केलेल्या इक्विटी गुंतवणूकी वगळून, अन्य इक्विटी गुंतवणूकी संबंधीचे इतर सर्वंकष उत्पन्नातील रास्तमूल्यानुसार सादर केले जातात. त्यानंतरची मोजणी रास्तमूल्यातील बदलानुसार जी प्राप्ती किंवा तोटे होतात त्यासह केली जाते. त्याला इतर सर्वंकष उत्पन्नात मान्यता दिली जाते. आणि या उत्पन्नातील राखीव समभाग विलेख यात जमा केले जाते. संचित प्राप्ती किंवा हानी यांचे गुंतवणूकी काढल्यावर होणाऱ्या नफा किंवा तोट्यात पुनवर्गीकरण केले जाते.

३) एफ व्ही टी पी एल नुसार वित्तीय मत्ता

जर समुहाने व्यापारासाठी धारण न केलेल्या इक्विटी विलेखातील गुंतवणूकी याच्या इतर सर्वकष उत्पन्नातील नंतर झालेले बदल रास्त मूल्याचे मान्यता सादर करू नये असे अपरिवर्तनशील निवड केली तर इक्विटी विलेखातील गुंतवणूकीचे वर्गीकरण एफ व्ही टी पी एल असे केले जाते. (म्हणजे नफा किंवा तोटा यातील रास्त मूल्यानुसार वित्तीय मत्ता).

इतर वित्तीय मत्तांचे मापन एफ व्ही टी पी एल पद्धतीने केले जाते. मात्र त्यांना प्रारंभिक मान्यता देतांना त्यांचे मापन कर्ज फेड खर्चाने किंवा एफ व्ही टी ओ सी आय द्वारे झालेले नसावे. ज्या वित्तीय मत्तां किंवा दायित्वे संपादनाचा व्यवहार खर्च एफ व्ही टी पी एल याच्याशी थेट लागू असतो त्यांना नफा किंवा तोट्यात तात्काळ मान्यता दिली जाते..

ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत ज्या व्यापारी व इतर येण्यांची मुदत पूर्ण होते, आणि त्यांची वहन रक्कम या विलेखाच्या मुदतीपूर्तीच्या रकमेच्या रास्तमूल्याच्या जवळपास असली तर त्याचे निवेदन खर्चाप्रमाणे केले जाते.

व्याज धारण करणाऱ्या वित्तीय मत्तासाठी प्रभावी व्याज दराने मोजली जात नाही. त्यांना व्याजाचा बाजारातील दर लागू असतो आणि तो वेळोवेळी पूर्नरचना / बदल यांच्या अधीन असतो.

४) उपकंपन्या, संयुक्त उपक्रमे आणि सहयोगी कंपन्यातील गुंतवणूकी

भा. ले. मानक २७ - स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रके यानुसार उपकंपन्या, संयुक्त उपक्रमे आणि सहयोगी कंपन्या यातील गुंतवणूकी खर्चानुसार पुढे नेल्या जातात. त्या कमी करण्याबाबत परीक्षण केले जाते.

५) वित्तीय मत्ता कमी करणे

या कंपनी समुहाने व्यापारी येणी व इत्तर वित्तिय मत्ता यांचा अपेक्षित पतहानीला (इ सी एल) मान्यता दिली आहे. इ. सी. एल. ची गणना करण्यासाठी व्यापारी येण्याची चार गटात विभागणी केले आहे, ती अशी - १) शासकिय प्राधिकारी / संस्था, २) वीज पुरवठा कायमचा खंडित केलेले ग्राहक, ३) शेतीचे ग्राहक आणि ४) नियमित व्यापारी येण्यांची त्यांच्या व्याजासह गणना केली जाते. त्यासाठी मागील अनुभव, व्यावहारीक घटक ग्राहकांची विभागणी, त्यांच्या वयानुसार वर्तन यांच्या आधारे पत हानी मोजली जाते. कंपनी कडे असलेल्या सुरक्षा अनामतीत व्यक्तीश - ग्राहक निहाय बदल केला जातो.

इतर येणी आणि समुहातील इतर कंपन्याकडून येणी यांच्याकडून इ.सी.एलची तरतूद फक्त वेळेची हानी (टाइम लॉस)च्या मर्यादित केली जातो. इतर वित्तिय मत्तांच्या वेळेची हानी याच्या हिशेबासाठी कर्मचारी कामाच्या विभागातील मूल्यांकनातील योग्य सवलत दर वापरण्यात येतो.

६) मान्यता काढून घेणे

जेव्हा एखाद्या वित्तीय मत्ता काढून रोकडता प्रवाह मिळविण्याचा कंपनी समुहाला हक्क संपतो तेंव्हा किंवा समुहाने रोकड प्रवाह मिळविण्याचा आपला हक्क हस्तांतरित केला किंवा मिळणारी रोकड प्रवाह कोणत्याही विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षा कडे देण्याचे बंधन स्वीकारले व त्यासाठी 'पास थ्रु' व्यवस्था केली आणि जर (अ) समुहाने मत्तांच्या सर्व जोखिमा आणि मोबदले मोठ्याप्रमाणात हस्तांतरित केले तर किंवा (ब) समुहाने रक्कमेच्या जोखिमा मोबदले मोठ्या प्रमाणात हस्तांतरित केले नाही तर किंवा ठेवून घेतले नाहीत मात्र मत्तांचे नियंत्रण हस्तांतरित केले तर वित्तीय मत्तांची प्रारंभिक स्तरावर मान्यता काढून घेतली जाते.

ब) वित्तीय दायित्वे

१) समभाग विलेख

समभाग विलेख म्हणजे कंपनीच्या मत्तातील उर्वरित / अवशेषात्मक हितसंबंधाचा, (दायित्वे वजा केल्यानंतरचा) पुरावा दर्शविणारा करार असतो.

२) वित्तीय दायित्वे नंतरची मोजणी

वित्तीय दायित्वांची नंतरची मोजणी कर्ज फेड खर्चानुसार आणि प्रभावी व्याज दर वापरून केली जाते. मात्र ज्याची मोजणी एफव्हीटीपीएल नुसार केली आहे त्या दायित्वांचा या साठी अपवाद केला जातो. ताळेबंदाच्या तारखेला एक वर्षाच्या काळात ज्या व्यापारी व इतर देणी यांची मुदत संपते आणि यांची पुढे नेलेली रक्कम अल्प मुदतीमधे रास्त मूल्या इतकी असल्यास ती खर्चाप्रमाणे पुढे नेण्यात येते. समूह कर्जाचे वर्गीकरण नंतर मोजणी केलेल्या 'कर्ज फेडीच्या खर्चानुसार करतो'.

ज्या वित्तीय दायित्वावर व्याज आकारली असते त्यांच्या प्रभावी व्याज दराची गणना केली जात नाही. कारण या वित्तीय दायित्वावर बाजारातील व्याज दर लागू असतो, त्या पुर्नरचना होणे / बदलणे यांच्या अधीन असतो.

३) मान्यता काढणे

ज्या वित्तीय दायित्वाचे बंधन पूर्ण होते किंवा रद्द होते किंवा संपते त्या दायित्वाची मान्यता काढली जाते.

क) वित्तीय विलेखांची भरपाई

जर मान्यता प्राप्त रकमांची भरपाई करण्याची अंमलबजावणीचा कायदेशीर अधिकार असला तर वित्तीय मत्ता आणि वित्तीय

दायित्वे याची भरपाई करता येते व निव्वळ रक्कम ताळेबंदात प्रकट केली जाते. मत्तांची वसूली निव्वळ तत्वावर करणे आणि त्याचवेळी दायित्वे चुकविणे या हेतूसाठी असे करता येते.

२१) व्यापारी येणी

महानिर्मिती प्रकरणी - कंपनीने व्यापारी येण्यांचे वर्गीकरण कर्जफेडीच्या खर्चानुसार वित्तीय विलेख असे केले. व्यापारी येणी त्यांच्या मूळ बिजकांतील रक्कम वजा अपेक्षित पत हानी तरतूद यानुसार पुढे नेली. या वित्तीय मत्ता कमी करण्यातील नुकसानीला मान्यता देण्यात त्यांची मूळ मान्यते पासूनच्या पत जोखीमेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे किंवा कसे यांचे निर्धारण कंपनीने केले.

२२) प्रतिभाग मिळकत

कंपनीची प्रतिभाग मिळकत कंपनीच्या समभागधारकांना देय होणाऱ्या निव्वळ नफ्याच्या आधारे ठरते. मूळ प्रतिभाग मिळकत याचा हिशोब करण्यासाठी वर्षभरातील सरासरी वेटेड शेअर्सच्या संख्येनुसार केले जातो.

सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीच्या हिशेब करण्यासाठी कॉमन आणि डायल्यूटीव्ह कॉमन समतुल्य वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते. त्यामध्ये वर्षभरातील शेअर्सची संख्या आणि शेअर्सचा पर्याय यांचाही समावेश केला जाते. (ऑप्शनसाठी शेअसर स्टॉक मेथड वापरली जाते) मात्र जर त्याची फल निश्चिती सौम्यकृतच्या विरोधात असेल तर अपवाद केला जातो.

२३) रोख प्रवाह, विवरण पत्रक

मराविमं सूत्रधारी कंपनी प्रकरणी

भा. ले. मानक -७ - रोकडता प्रवाह विवरणासाठी यात विहित केलेल्या अप्रत्यक्ष पद्धतीनुसार रोख प्रवाहाचे विवरण पत्रक तयार केले जाते. त्यासाठी कंपनी समुहाचा भाग असलेल्या पुढील गोष्टी विचारात घेतल्या जातात जसे - रोख आणि रोख सममुल्य (वरती व्याख्या दिल्याप्रमाणे) थकीत बँक ड्राफ्टची निव्वळ रक्कम. या बाकी समुहाच्या रोख व्यवस्थापनाचा एकात्मिक भाग आहेत.

सक्रीय, गुंतवणूक आणि वित्त पुरवठा यामधील रोख प्रवाह वेगळे केले जातात.

२४) महापूर, आग, वादळ इ. मुळे होणाऱ्या नुकसानीचे लेखे करणे

१) महावितरण प्रकरणी

उपलब्ध माहितीच्या आधारे महापूर, आग, वादळ इ. मुळे स्थिर मत्तांच्या होणाऱ्या नुकसानीची मान्यता देण्यात येते. जर तरतूदी जादा / कमी झाल्या तर सक्षम प्राधिकारी यांच्या मंजुरी नंतर मान्यता दिली जाते.

२५) लेखा धोरण व प्रकटने यातील बद्दल

१) नवीन आणि सुधारीत मानके

कंपनी व्यवहार मंत्रालयाने विद्यमान भा.ले. मानकांमधे दुरूस्त्या अधिसुचित करीत असते. मात्र दि. ०१ एप्रिल २०२१ पासून लागू होणारी कोणतीही अधिसूचना जारी करण्यात आलेली नाही.

टिपा क्र. २ - मालमत्ता, कारखाने आणि साधने

(रक्कम रु. कोटीत)

तपशील	जमीन (विकासासह)		इमारती			इतर स्थापत्य कामे		कारखाने यंत्रे व साधने	लाईन व केबल नेटवर्क	वाहने	फर्निचर व जोडणी	कार्यालयीन साहित्य	कंपनीच्या मालकीच्या नसलेला भांडवली खर्च	एकूण मूर्तमत्ता
	भाडेपट्टीची जमीन	मालकीची जमीन	कारखाने इमारती	इतर	हायड्रोलिक कामे	रेल्वे साईडिंग	रस्ते व इतर							
०१.०४.२०१९ रोजीच्या वार्षिक लेख्यानुसार	३३६.५८	१२७२८.१०	८९०.५३	५०५२.१२	२५५४.८९	१४७५.७९	१७८४.६६	६४६७१.३७	५०७६९.३४	३६.२२	१३३.०१	४०६.६०	५७.४९	१४०८९६.६९
भर	०.११	२३.१६	१.१३	३५.९९	३८.४७	३.८५	२०७.४३	२७९२.०७	३०१२.७०	७.३२	५.१५	१३.८०	०.००	६१४१.१८
कपात/समायोजने	-०.०१	-१.६६	-७.८९	-५.४२	-७८.०१	०.५६	-४.७१	-८२२.७५	७८.३३	-१.६०	-१.०७	-९.५०	०.००	-८५३.७१
३१.०३.२०२० रोजीच्या वार्षिक लेख्याप्रमाणे	**३३६.६७**	**१२७४९.६०**	**८८३.७८**	**५०८२.६९**	**२५१५.३५**	**१४८०.२०**	**१९८७.३८**	**६६६४०.७०**	**५३८६०.३७**	**४१.९४**	**१३७.०९**	**४१०.९०**	**५७.४९**	**१४६१८४.१५**
भर	०.३१	१७.३६	०.७७	७७.५७	२७.६८	१०६.०५	१५०.६४	३३१९.२०	२३६८.३९	६.४७	५.८८	१९.४०	०.००	६०९९.७३
कपात/समायोजने	८६.२४	-१११.६३	०.००	-०.०३	०.००	०.००	-०.०४	-३२.७५	-१४.४६	-०.३४	-०.०८	-२.०८	०.००	-७५.१६
३१.०३.२०२१ रोजीच्या वार्षिक लेख्याप्रमाणे	**४२३.२३**	**१२६५५.३२**	**८८४.५५**	**५१६०.२३**	**२५४३.०३**	**१५८६.२५**	**२१३७.९८**	**६९९२७.१५**	**५६२१४.३०**	**४८.०८**	**१४२.८९**	**४२८.२२**	**५७.४९**	**१५२२०८.७२**
संचित घसारा आणि कमी करणे														
०१.०४.२०१९ रोजीच्या वार्षिक लेखानुसार	५९.६८	०.००	६१.६६	९८५.७४	५६९.४१	२०७.४०	२७८.१९	१२०८७.४८	९६१२.८४	६.१०	३४.२८	१३१.८५	१७.३२	२४०५१.९५
भर	८.२८	०.००	३६.७२	१९९.९८	१३४.२७	६७.९२	८८.६५	३६८७.१३	२५२६.०८	३.४६	७.७२	३१.७०	४.५४	६७९६.४४
कपात/समायोजने	०.००	०.००	-७.१०	-५.८६	-७०.१४	०.३४	-४.२४	-६६९.४२	२५.८०	-१.४२	-०.८६	-१.९६	०.००	-७३४.८६
३१.०३.२०२० रोजीच्या वार्षिक लेख्याप्रमाणे	**६७.९६**	**०.००**	**९१.२८**	**११७९.८६**	**६३३.५४**	**२७५.६५**	**३६२.६०**	**१५१०५.१९**	**१२१६४.७३**	**८.१४**	**४१.१३**	**१६१.५९**	**२१.८६**	**३०११३.५४**
भर	९.५६	०.००	३६.६८	१८७.१७	१३९.९८	६२.५२	७९.०८	३८६२.१९	२६३२.३४	३.९४	७.८९	४९.२५	४.५४	७०७५.१३
कपात/समायोजने	-०.०१	०.००	०.००	-०.०२	०.००	०.००	०.००	-१०.२७	-१.५९	-०.३०	-०.०२	-०.९४	०.००	-१३.१५
३१ मार्च २०२१ रोजीच्या वार्षिक लेख्याप्रमाणे	**७७.५१**	**०.००**	**१२७.९६**	**१३६७.००**	**७७३.५२**	**३३८.१८**	**४४१.६८**	**१८९५७.११**	**१४७९५.४८**	**११.७७**	**४९.०१**	**२०९.९०**	**२६.४०**	**३७१७५.५१**
०१.०४.२०१९	०.००	०.००		०.००										०.००
०१ एप्रिल २०१९ रोजीच्या	**२७६.८९**	**१२७२८.१०**	**८२८.८७**	**४०६६.३८**	**१९८५.४८**	**१२६८.३९**	**१५०६.४७**	**५२५८३.८९**	**४११५६.४९**	**३०.१२**	**९८.७३**	**२७४.७५**	**४०.१६**	**११६८४४.७३**
३१.०३.२०२०														०.००
३१ मार्च २०२० रोजीच्या	**२६८.७१**	**१२७४९.६०**	**७९२.५०**	**३९०२.८३**	**१८८१.८१**	**१२०४.५५**	**१६२४.७८**	**५१५३५.५१**	**४१६९५.६४**	**३३.८१**	**९५.९५**	**२४९.३१**	**३५.६३**	**११६०७०.६१**
३१.०३.२०२१														०.००
३१ मार्च २०२१ रोजीच्या	**३४५.७१**	**१२६५५.३२**	**७५६.५९**	**३७९३.२३**	**१७६९.५१**	**१२४८.०७**	**१६९६.३०**	**५०९७०.०४**	**४१४१८.८२**	**३६.३१**	**९३.८८**	**२१८.३२**	**३१.०९**	**११५०३३.२०**

२.१ भारतीय लेखा मानकांमध्ये संक्रमण झाल्यानंतर, मालमत्ता, कारखाने आणि साधने यांची १ एप्रिल २०१५ रोजीची सामान्यत - स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार मोजलेली मान्यताप्राप्त पुढे नेण्याची किंमत निरंतर चालू ठेवण्याचा पर्याय म.रा.वि. मं. सुत्रधारी कंपनीने निवडला आहे. केंद्र सरकारद्वारा अधिसूचित केलेले आणि कंपनी अधिनियम १९५६ च्या इतर तरतुदींद्वारे कंपन्या (लेखा मानके) नियम २००६ मध्ये अधिसूचित केलेल्या पूर्वीच्या सर्वसाधारपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार ती मोजली गेली आणि ती मूळ किंमत मालमत्ता, कारखाने आणि साधने यांची मान्यताप्राप्त किंमत म्हणून वापरावी.

२.२ कंपनीच्या लेखा पुस्तकात दिसणाऱ्या स्थिर मत्ता यापूर्वीच्या म.रा. वि. मंडळाकडून वित्तीय पुनर्रचना योजनेप्रमाणे हस्तांतरीय झालेल्या आहेत. मात्र त्या अद्याप मराविमं सूत्रधारी कं. लि. च्या नावे झालेल्या नाहीत. कंपनीकडे उपलब्ध असलेल्या प्रत्येक प्रकारच्या मत्तांच्या सर्वकष ठोक गटात त्याच्या नावाप्रमाणे चालू वर्षाचा घसारा हिशोब करून आकारला आहे.

२.३ मत्तांच्या उपयोग सुरू झाल्याची नेमकी तारीख पूर्वीच्या मरावि मंडळ/महाराष्ट्र शासन यांच्याकडे उपलब्ध नाही. त्या ऐवजी फक्त उपयोग सुरू झाल्याचे वर्ष उपलब्ध झाले. त्यामुळे मत्तांचा उपयोग संबंधित वर्ष दि. ०१ एप्रिल रोजी सुरू झाल्याचे मानण्यात आले व त्याचप्रमाणे त्या प्रथम वित्तीय वर्षाच्या घसाऱ्याचा हिशोब करण्यात आला.

२.४ वित्तीय पुनर्रचना योजनेच्या अंतिमीकरणानंतर मत्तांचे मूल्य रु. १३,९६७, ५१२,०३०/- असे वाढले, त्यासाठी महाराष्ट्र शासनास समभाग दिले. महाराष्ट्र शासनाकडून मिळालेल्या मूल्यांप्रमाणे संबंधित मत्तांचे मूल्यांकन केले आणि त्यापुढे घसाऱ्याचा उर्वरित आयुष्यासाठी करण्यात आला.

२.५ मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने २०१०-११ मध्ये केली. कंपनीने पुनर्रचनेच्या तारखेपासून म्हणजे ०६/०६/२००५ पासून चालू वित्तीय वर्षापर्यंत स्थिर मत्ता नोंदवही संकलित केली. पूर्वीच्या मराविमं कडून मिळालेल्या आरंभीच्या शिलकीचे अभिलेख प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळेला त्याचा मेळ करण्यात आला. मत्तांची किंमत ०५/०६/२००६ चे मूल्यांकन व मत्ता नोंदवहीप्रमाणे कमी लिहिलेली किंमत याचा मेळ आरंभीच्या लेख्या नोंदीसोबत केला.

२.६ पूर्वीच्या मरावि मंडळाने धारावीच्या इमारत व जमिनीच्या खरेदीच्या विलेखाचे १९८१ चे व्यवहार अद्याप नोंदणीकृत करावयाचे बाकी आहे. मात्र जमीन व इमारत मराविमं सुत्रधारी कंपनीच्या ताब्यात आहे आणि महापालिकेच्या आदेशानुसार धारावी इमारतीच्या विक्रीच्या रु. ९,०४१, ४२७/- उर्वरित रकमेवर १४ टक्के दराने व्याज दरमहा भरावयाचे असते. प्रकरण उच्च न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ आहे.

टिपा क्र. २ 'अ' - वापराचा हक्क असलेल्या मत्ता

(रु. कोटीत)

तपशील	**सॉफ्टवेअर परवाने**
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०४/२०१९ रोजी	**१२०.७७**
भर	४,६५७.८५
घट/कपात	१.०५
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०३/२०२० रोजी	**४,७७९.६८**
भर	१५.६१
कपात	४.५५
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०३/२०२१ रोजी	**४,७९९.८४**
कर्जफेडची संचित तरतूदी	
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०४/२०१९ रोजी	**०.०१**
भर	२८८.५२
कपात	०.००
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२० रोजी	**२८८.५३**
भर	२७१.७३
कपात	१३.३७
खालील देयकाप्रमाणे - ३१/०३/२०२१ रोजी	**५७३.६३**
निव्वळ वहन रक्कम	
३१ मार्च २०२१ रोजी	**४,२२६.२०**
३१ मार्च २०२० रोजी	**४,४९१.१४**
३१ मार्च २०१९ रोजी	**१२०.७६**

टिपा क्रं. २ ब - प्रगतीपथावरील भांडवली कामे

(रक्कम रु. कोटीत)

तपशील	प्रगती पथावरील मालकीच्या जमिनी	प्रगती पथावरील कारखान्याच्या जमिनी	प्रगती पथावरील इतर इमारती	प्रगती पथावरील रस्ते व इतर कामे	प्रगती पथावरील कारखाने व यंत्रसामग्री	प्रगती पथावरील वाहने	प्रगती पथावरील फर्निचर व जोडण्या	प्रगती पथावरील कार्यालयीन साधने	प्रगती पथावरील मूर्त मत्ता एकूण
०१.०४.२०१९ रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१४.४९**	**२९३६.४२**	**३२८५.५१**	**७४.२७**	**४२१.०८**	**०.००**	**०.००**	**०.९५**	**६७३२.७१**
भर	०.००	२०७९.७५	१४७६.६१	६०.३४	६८९.२१	०.००	१.१८	०.५६	४३०७.६५
कपात	-१३.४६	-११९६.२५	-२.३५	-१०.०४	-११०.५८	-०.००	०.००	-०.५६	-१३३३.२४
३१.०३.२०२० रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१.०३**	**३८१९.९२**	**४७५९.७६**	**१२४.५८**	**९९९.७१**	**०.००**	**१.१८**	**०.९५**	**९७०७.१३**
भर	०.००	१९४७.४८	१०.४१	३२.१३	१२०६.१६	०.००	०.४०	३.३२	३१९९.९०
कपात	०.००	-११५१.८२	-८६७.८४	-९६.७८	१६९.४९	०.००	-१.१७	-०.८९	-१९४९.०१
३१.०३.२०२१ रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१.०३**	**४६१५.५८**	**३९०२.३४**	**५९.९४**	**२३७५.३५**	**०.००**	**०.४०**	**३.३८**	**१०९५८.०१**
वजा - जुनाट मालासाठी तरतुदी	०.००	०.००	६.२६	०.००	३३.९८	०.००	०.००	०.००	४०.२३
३१.०३.२०१९ रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१४.४९**	**२९३६.४२**	**३२७९.२५**	**७४.२७**	**३८७.१०**	**०.००**	**०.००**	**०.९५**	**६६९२.४८**
वजा - जुनाट मालासाठी तरतुदी	०.००	०.००	६.२६	०.००	४०.०९	०.००	०.००	०.००	४६.३५
३१.०३.२०२० रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१.०३**	**३८१९.९२**	**४७५३.५०**	**१२४.५८**	**९५९.६२**	**०.००**	**१.१८**	**०.९५**	**९६६०.७८**
जुनाट मालासाठी तरतुदी	०.००	०.००	६.२६	०.००	६३.५९	०.००	०.००	०.००	६९.८५
३१.०३.२०२१ रोजी वार्षिक लेख्यांप्रमाणे	**१.०३**	**४६१५.५८**	**३८९६.०८**	**५९.९४**	**२३११.७६**	**०.००**	**०.४०**	**३.३८**	**१०८८८.१६**

टिपा क्र. २ क - इतर अमूर्त मत्ता

तपशील	सॉफ्टवेअर परवाने
वार्षिक लेख्याप्रमाणे - १/०४/२०१९ रोजी	**१२१.८९**
भर	१.२५
घट/कपात	-०.२१
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२० रोजी	**१२२.९३**
भर	१५.७२
कपात	-१.०८
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२१ रोजी	**१३७.५७**
कर्जफेडची संचित तरतूदी	
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०४/२०१९ रोजी	**१०६.२५**
भर	६.५३
कपात	०.८६
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२० रोजी	**११३.६४**
भर	६.५२
कपात	-०.१४
खालील देयकाप्रमाणे - ३१/०३/२०२१ रोजी	**१२०.०२**
निव्वळ वहन रक्कम	
३१ मार्च २०२१ रोजी	**१७.५५**
३१ मार्च २०२० रोजी	**९.२९**
३१ मार्च २०१९ रोजी	**१५.६४**

टिपा क्र. २ ड - प्रगतीपथावर अमूर्त मत्ता

तपशील	रक्कम रुपये मध्ये
वार्षिक लेख्याप्रमाणे - ०१/०४/२०१९ रोजी	**१४५.३०**
भर	०.१७
कपात	
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२० रोजी	**१४५.४७**
भर	१०५.७५
कपात	११.५४
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२१ रोजी	**२३९.६८**
वजा - निकामी मालासाठी तरतूद	
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२० रोजी	**१४५.४७**
वार्षिक लेख्याप्रमाणे - ३१/०३/२०२१ रोजी	**२३९.६८**

टिपा क्रं.३ - चालू नसलेल्या मत्ता - उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रमे यामध्ये गुंतवणूक

(रु. कोटीत)

तपशील	३१ मार्च २०२१ रोजी	३१ मार्च २०२० रोजी	३१ मार्च २०१९ रोजी
उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रमे यांत गुंतवणूकी			
किमतीनुसार उद्धृत केलेल्या			
अ) उपकंपन्याच्या समभागात गुंतवणूकी			
खारघर - विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. लि. (संदर्भ टिपा क्र. ५१(३ब)	०.००	०.०५	०.००
शेअर्सची संख्या (रु. १०/ प्रमाणे ५०,००० शेअर्स, मागील वर्षी - निरंक)			
सहयोगी कंपन्यात गुंतवणूकी			
किंमतीनुसार उद्धृत केलेल्या			
जयगड पॉवर ट्रान्समिशन लि. (जे.पी.टी.एल)	४०.३७	३३.०५	३०.३६
सहयोगीतील नफा - तोटयात वाटा, इक्विटी मेथड वापरून लेखा केलेली, जेपीटीएलच्या कराची निव्वळ	६.५४	७.३२	६.२७
सहयोगी सर्वकष उत्पन्नातील वाटा, इक्विटी मेथड वापरून लेखा केलेली, जेपीटीएलच्या कराची निव्वळ			
लाभांश प्राप्तीमुळे वहन गुंतवणूकीतील कपात	०.००	०.००	-३.५८
महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एमटीसीआयएल)	०.००	०.००	२.९५
शेअर्सची संख्या - प्रत्येकी रु. १०/- चे ८६,४८,२२२ मागील वर्षी ६१,४८,२२२ त्यात वि. वर्ष २०१८-२०१९ दरम्यान समाविष्ट दिलेले बोनस शेअर्स संख्या - २१,७२,२४२ समाविष्ट (टिपा.क्र.३.१ व ३.२)			
वर्षभरात इक्विटीमध्ये जादा गुंतवणूक वाटा	०.००	२.५०	०.००
सहयोगीतील नफा – तोटयात वाटा, इक्विटी मेथड वापरून लेखा केलेली एमटीसीआयएल कराची निव्वळ	०.००	-२.५०	-२.९१
सहयोगी सर्वकष उत्पन्नातील वाटा, इक्विटी मेथड वापरून लेखा केलेली एमटीसीआयएलच्या कराची निव्वळ	०.००	०.००	-०.०४
१५% संचयी नसलेले सहभागी पूर्तता करण्यायोग्य प्राधान्य शेअर्स महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एमटीसीआयएल)	६.४९	५.१९	५.२२
वर्षभरातील प्राधान्य शेअर्स मधील गुंतवणूकी	१.०८	२.५०	०.००
सहयोगीतील नफा - तोटयात वाटा, इक्विटी मेथड वापरून एमटीसीआयएलच्या कराची निव्वळ	-१.३९	-१.२१	-०.०३

यु सी एम कोल कं. लि. ३०,००० चे प्रत्येकी रु. १०/- चे पूर्ण भरणा केलेले शेअर्स	-०.४४	-०.३९	-०.४३
छत्तीसगड - कटघोडा - डोंगरगड रेल्वे लि. चे ५,२०,००० शेअर्स - प्रत्येकी रु. १०/- पूर्णभरणा केलेले (मा. वर्षी ५,२००,०००)	०.५२	०.५२	०.५२
उपकंपन्यातील क्वासी इक्वीटी गुंतवणूक (अग्रिमाच्या स्वरुपात)	५.३२	५.३२	५.३२
वजा - गुंतवणूकीच्या मूल्यातील अपेक्षित पत हानी आणि कमी होणे या साठी तरतूद	-५०.३६	-४९.१७	-४८.०१
एकूण	८.१२	३.१८	-४.३७

३.१) एम. टी. सी. आय. एलच्या वर्ष २०२०-२१ च्या तोटयात कंपनीचा वाटा रु. १३८.९७ लाख आहे. ह्या तोटयाची रक्कम कंपनीच्या एकत्रित लेखा वहयातील इक्विटी मध्ये केलेल्या गुंतवणूक मूल्यापेक्षा जास्त झाली आहे. यामुळे वि. वर्ष ३१ मार्च २०२१ च्या तोट्यात कंपनीचा वाटा एक्विटी गुंतवणूकीच्या वहन मूल्या इतकी मर्यादित केली आहे. (रुपये ७५७.१० लाख).

३.२) सहयोगी कंपनीच्या तोटयातील कंपनीच्या वाटयाचे प्रथम इक्विटी मधील गूंतवणूकी सोबत समायोजन केले, आणि उर्वरित तोटयाचे प्राधान्य शेअर्स मधील गुंतवणूकी सोबत समायोजन केले.

टिपा क्र. ४ - चालू नसलेल्या मत्ता - वित्तीय मत्ता व गुंतवणूकी

(रु. कोटीत)

तपशील	**३१ मार्च २०२१ रोजी**	**३१ मार्च २०२० रोजी**	**१ एप्रिल २०१९ रोजी**
उदधृत केलेल्या			
परतफेडीच्या खर्चाच्या तरतुदीनुसार			
शासकीय प्रतिभूती यात गुंतवणूकी (टिपा क्र. ४१)	५०५.९७	५४७.७७	२८३.४९
बॉण्ड्स मधील गुंतवणूक (टिपा क्र. ४.१)	२७९.६७	२५५.८७	४३४.६८
उद्धृत न केलेल्या			
इक्विटी पध्दतीचा वापर करून सहयोगीचा नफा आणि तोटा,एमटीसीआयमधून कराचा निव्वळ वाटा	०.००	०.१६	०.००
इक्विटी पध्दतीचा वापर करून सहयोगीचा नफा आणि तोटा, एमटीसीआयएलमधून कराचा निव्वळ वाटा	०.००	-०.१६	०.००
एमटीसीआयएलच्या प्राधान्य शेअरमध्ये गुंतवणूक (टिपा क्र. ४.२)	०.००	१.०८	०.००
मुदत ठेवी	५२.६५	५२.६५	४०.५३
२) कर्जफेड खर्चानुसार बॉंडमधील गुंतवणूकी			
उद्घृत केलेल्या			
बॉंड्स (आकस्मिक राखीव विरूद्ध नियोजित)			

८.१५% शासकीय एफसीआय बाँड्स २०२२	१०.४९	१०.४९	१०.४९
(१०५०००० रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८.०१% शासकीय तेल बाँड २०२३	१९.४१	१९.३८	१९.३६
(१९५०००० रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८.०३% शासकीय अन्न महामंडळ बाँड्स २०२४	९.९५	९.९३	९.९२
(१०००००००(०) रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८.२३% शासकीय अन्न महामंडळ बॉड्स २०२७	९.९८	९.९७	९.९७
(१०००००००(१००००००) रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८ % शासकीय तेल बाँड्स २०२६	५१.१३	५१.३१	५१.४७
(५००००००० रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८.२८% भारत सरकार २०३२	२६.८५	२६.८५	२६.८४
(२७००००००(२७००००००) रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
८.३०% भारत सरकार २०४०	२८.७५	२८.७४	२८.७४
(२९००००००(२९००००००) रोखे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १००/-)			
९.४५% वीज वित्त महामंडळ २०२६	२८.९५	२८.९५	२८.९४
